# Critical Studies on Economic Policy of Nanasaheb Peshwa 1740 to 1761

# ‘‘नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास १७४०-१७६१’’

तात्त्विक व सामाजिक विद्या शाखांतर्गत ‘इतिहास’ विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर करणेत आलेला संशोधन प्रबंध


- संशोधक -

**श्री. गौतम नामदेव ढाले**

एम. ए. (इतिहास, मराठी), बी. एड्., एम. फिल, सेट (इतिहास)

कायम नोंदणी क्रमांक PRN. No. S02109000893

श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर

- मार्गदर्शक -

**प्रा. डॉ. अमर पांडे** (सहयोगी प्राध्यापक)

एम. ए., एम. फिल., पीएच. डी.

एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली.



## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

मे २०११

# प्रतिज्ञापत्र

मी श्री. ढाले गौतम नामदेव असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, ''नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावरील संशोधन प्रबंधामध्ये करण्यात आलेले संशोधन कार्य हे माझ्या स्वतःच्या प्रयत्नाचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनाचे संदर्भ घेण्यात आले आहेत. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही विद्यापीठ स्तरावर कोणतीही पदवी मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेले नाही, असे मी घोषित करतो.

सांगली

दिनांक : मे २०११


**श्री. गौतम नामदेव ढाले**

एम. ए. (इतिहास, मराठी), बी. एड्., एम. फिल, सेट (इतिहास)

श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय,

जयसिंगपूर

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, सदर विद्या वाचस्पती पदवीसाठी श्री. गौतम नामदेव ढाले यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या पीएच. डी. (Ph. D.) अभ्यासक्रमांतर्गत असलेला एक भाग म्हणून सदर प्रबंध आपणाकडे सादर करीत आहेत. शोध प्रबंधाचा विषय ''नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास - १७४०-१७६१'' हा आहे. हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

- मार्गदर्शक -

**प्रा. डॉ. अमर पांडे** (सहयोगी प्राध्यापक)

एम. ए., एम. फिल., पीएच. डी.

एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली.

स्थळ : सांगली

दिनांक : मे २०११

# ऋणनिर्देश

मी गौतम ढाले, रा. सांगली श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर या ठिकाणी इतिहास या विषयाचा सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करीत आहे. आपल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये पीएच. डी. (विद्या वाचस्पती) Ph.D. या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास या विषयाचे संशोधन केलेले आहे. या संशोधन कार्यात ज्यांचे अनमोल मार्गदर्शन, सहकार्य, प्रेरणा व प्रोत्साहन लाभले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही माझी औपचारिकता नसून ते मी माझे परम कर्तव्य समजतो. प्रस्तूत विषयाच्या संशोधनासाठी ज्यांचे प्रोत्साहन, सहकार्य व अनमोल असे मार्गदर्शन लाभले आणि ज्यांच्यामुळे उत्स्फूर्त प्रेरणा मिळून माझे संशोधनाचे कार्य पूर्णत्वास गेले, असे माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. अमर पांडे यांच्यामुळे हा प्रबंध मला वेळेत पूर्ण करता आला. मी ज्या ज्या वेळी सरांच्याकडे जात असे, त्या त्या वेळी सर मला नेहमी एखादी तरी नवीन सूचना करीत. त्यामुळे या प्रबंधाचे काम करीत असताना त्यांची उत्स्फूर्त प्रेरणा मला मिळाली, त्याबद्दल मी सरांचा सदैव ऋणी आहे. त्याचप्रमाणे डॉ. पांडेसर यांच्या सुविद्य पत्नी सौ. शैलजा पांडे यांचेही मला अनमोल सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे या आपल्या विद्यापीठाने मला पीएच. डी. शिक्षणक्रम करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी विद्यापीठाचा आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय कुलगुरु डॉ. दिपक टिळक, विद्यापीठाचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. दिपक देशपांडे, चितळे महाविद्यालय भिलवडी तसेच विद्यापीठाच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. श्रध्दा कुंभोजकर यांचेही मला प्रोत्साहन लाभले व त्यांनी मला संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्या सर्वांचे नम्रपणे आभार व्यक्त करतो. त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे तात्त्विक व सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता आदरणीय विजय कारेकर यांचाही मी विशेष आभारी आहे. टिळक विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव जगदिश साळवे, प्रा. जगन कराडे, डॉ. पाटील एस. जी., नवनाथ भांडले या विद्यापीठातील मान्यवरांचे मला अनमोल सहकार्य मिळाले म्हणून त्यांचाही मी आभारी आहे.

सदरच्या शोध प्रबंधासाठी मला पुराभिलेखागार पुणे, अभिलेखाधिकारी श्रीमती इं. ज. रोडगे तसेच त्यांचे सहाय्यक अभिलेखापाल कैलास लोखंडे, संकलक महेश पाटील, इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी पुना पुराभिलेखागार या विभागातील कागदपत्रांचे पुरावे, संबंधित साहित्य उपलब्ध करून दिले, त्यांचाही मी विशेष आभारी आहे. याशिवाय शिपाईमामा उघडे ज्ञानदेव सोमा, वाघमारे एम. वाय. इत्यादी मान्यवरांनी प्रबंधासाठी लागेल ते सर्व साहित्य, पुरावे उपलब्ध करून बहुमूल्य सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

याशिवाय पुराभिलेखागार कोल्हापूरचे अभिलेखाधिकारी मा. ग. वि. खोडके, त्यांचे सहकारी संशोधन सहाय्यक एस. एस. लाटकर यांनीही योग्य ते पुरावे व साहित्य

देऊन तसेच मोडी लिपीतील भाषांतरास मदत करून बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

सदरच्या शोध प्रबंधासाठी माझे गुरुवर्य ए. डी. राजोबा, उपप्राचार्य भरतेश्वर पाटील, डॉ. ऋतुजा खोत, डॉ. मेघना उद्गावकर, प्रा. अशोक भटकर, प्रा. अशोक चौगुले या सर्वांचे मला विशेष मार्गदर्शन मिळाले, म्हणून त्यांचाही मी खास आभारी आहे. श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. के. एस. पाटील, ग्रंथपाल ए. ए. मासुले, प्रा. दशरथ हाक्के, प्रा. दादासाहेब कोरुचे, प्रा. लालासाहेब पाटील, प्रा. डॉ. विजय पाटील, प्रा. प्रकाश पाटील यांचाही मी त्यांच्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

तसेच लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, चेअरमन मा. सुरेश पाटील, सेक्रेटरी मा. व्ही. टी. चौगुले, खजिनदार मा. ॲड. विजयकुमार सकळेसाहेब, प्रा. एम. बी. चौगुलेसाहेब या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मला पीएच. डी. हा अभ्यासक्रम करण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल त्या सर्वांचा मी विशेष आभारी आहे.

या प्रबंधासाठी मला माझे मित्र प्रा. अशोक राजोबा, प्रा. राजू सावंत, प्रा. कैलास शेलार, प्रा. गजानन चव्हाण, प्रा. सुधीर बनसोडे, प्रा. रवींद्र ढाले, प्रा. योगेश कांबळे यांचेही मला बहुमोल सहकार्य मिळाले, त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

तसेच गंगाबाई खिवराज घोडावत महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य के. बी. तंबाके आणि इतिहास विभागप्रमुख प्रा. सौ. विद्या कुरुडे इत्यादींचे मला सहकार्य व मार्गदर्शन मिळाले, त्यांचेही मी आभार व्यक्त करतो.

हा प्रबंध टंकलिखित करणारे माझे मित्र सहजयोग कॉम्प्युटर्स, सांगलीचे जगन्नाथ पाटील व अशोक ढेरे यांनी वेळेत काम पूर्ण करून दिल्याबद्दल मी आभारी आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे जिने मला या जगात लहानाचे मोठे करून शिकविले, अक्षरांची ओळख करून स्वतःचे महत्त्व समजून दिले, त्या कामाच्या आईचे आणि वडिलांचे ऋण सर्वात मोठे आहे. ते ऋण कधीही न फिटणारे आहे तरीसुध्दा माझे भावांजलीचे दोन शब्द ऋणातून व्यक्त करतो.

स्थळ : सांगली
दिनांक : मे २०११

संशोधक,
श्री. गौतम नामदेव ढाले
श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या
महाविद्यालय, जयसिंगपूर.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | II |
| | प्रमाणपत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV |
| | अनुक्रमणिका | VI |
| | परिशिष्ट्ये | xi |
| १. | प्रकरण - १ | १-१६ |
| | नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास | २ |
| | प्रस्तावना | २ |
| | १.१ संशोधन समस्येचे शीर्षक | ४ |
| | १.२ संशोधनाची समस्या | ४ |
| | १.३ संकल्पनात्मक - कार्यात्मक व्याख्या | ४ |
| | १.४ संशोधनाची उद्दिष्टे | ५ |
| | १.५ संशोधनाच्या व्याप्ती व मर्यादा | ६ |
| | १.६ संशोधनाचे महत्त्व | ७ |
| | १.७ संशोधनाची सैध्दांतिक पार्श्वभूमी | ८ |
| | १.८ संशोधनाची गृहितके | १० |
| | १.९ संशोधनाची कार्यपध्दती | १० |
| | १.१० नमुना निवड | १० |
| | १.११ संशोधनाची साधने | ११ |
| | १.१२ प्रकरण योजना | १२ |
| | १.१३ तथ्य संकलन | १२ |
| | १.१४ प्रकरण संदर्भ | १४ |
| २. | प्रकरण - २ | १७-४१ |
| | संबंधित संशोधन व साहित्याचा आढावा | १७ |
| | २.१ प्रस्तावना | १८ |
| | २.२ संदर्भ साहित्याचा हेतू | २० |
| | २.३ संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज | २१ |

| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | २.४ समस्येसंबंधी संबंधित संशोधनाचा आढावा | २२ |
| | २.५ समस्येसंदर्भातील संदर्भ साहित्याचा (साधनांचा) आढावा | ३२ |
| | २.६ संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे झालेला फायदा | ३६ |
| | २.७ प्रस्तूत संशोधनातील वेगळेपण | ३७ |
| | २.८ प्रकरण संदर्भ | ४० |
| ३. | प्रकरण - ३ | ४२-७० |
| | संशोधनाची कार्यपध्दती | ४२ |
| | ३.१ प्रस्तावना | ४३ |
| | ३.२ शैक्षणिक संशोधनाच्या पध्दती | ४३ |
| | ३.३ संशोधन पध्दतीचे वर्गीकरण | ४४ |
| | ३.४ ऐतिहासिक संशोधनाचे स्वरूप व महत्त्व | ४६ |
| | ३.५ ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या | ४८ |
| | ३.६ ऐतिहासिक संशोधनाचे वर्गीकरण | ५१ |
| | ३.७ वर्णनात्मक संशोधन पध्दती | ५२ |
| | ३.८ नमुना निवड | ५२ |
| | ३.९ साधन निवडीचे समर्थन | ५४ |
| | ३.१० संबंधित संशोधनाची पूर्वपिठीका | ५४ |
| | ३.११ प्रकरण संदर्भ | ६९ |
| ४. | प्रकरण - ४ | ७१-१२१ |
| | नानासाहेब पेशवे सत्ता स्थापनेची पार्श्वभूमी | ७१ |
| | ४.१ प्रस्तावना | ७२ |
| | ४.२ सामान्य कारभाराचे स्वरूप | ८४ |
| | ४.३ रघुजी भोसल्याशी समेट | ८८ |
| | ४.४ मराठे मोघल बादशहा सनदा स्वरूप | ९६ |
| | ४.५ पेशव्यांच्या कालखंडातील दक्षिण उत्तर भारतातील प्रमुख घटना | ९९ |
| | ४.६ नानासाहेबांचे पेशवे पदावरून निलंबन | १०८ |
| | ४.७ प्रकरण संदर्भ | ११९ |
| | | |

| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५ | प्रकरण - ५ | १२२-२८६ |
| | सामग्री विश्लेषण संकलित माहितीची मिमांसा | १२२-२८६ |
| | अ) नानासाहेब पेशवे महसूल व्यवस्थेची माहिती व रचना | १२४ |
| | ५.१ प्रस्तावना | १२४ |
| | ५.२ जमीन महसूल सुधारणा | १३३ |
| | ५.३ कोकण विभागातील महसूल सुधारणा | १३३ |
| | ५.४ कोकण विभाग पडीक जमीन धोरण | १३४ |
| | ५.५ सारासवलत धोरण | १३५ |
| | ५.६ कर, पाटबंधारे, तगाई धोरण | १३६ |
| | ५.७ आर्थिक व्यवस्था व घटक | १३७ |
| | ५.८ पेशवेकालीन महसूल अधिकारी वर्ग | १५४ |
| | ५.९ शेती व महसुलातील सुधारणा | १५९ |
| | ५.१० जमीन महसुलातील प्रमुख घटक | १६२ |
| | ५.११ महसूल आकारणी पध्दती | १६५ |
| | ५.१२ जमीन महसुलाची प्रतवारी व वर्गवारी | १६७ |
| | ५.१३ इतर सारा सवलत धोरण | १७० |
| | ५.१४ पडीक जमिनीबद्दलचे धोरण | १७२ |
| | ५.१५ तगाई, लिलाव पध्दती धोरण | १७३ |
| | ५.१६ जमीन दान धोरण | १७४ |
| | ५.१७ आर्थिक महत्त्व आणि गरज | १७४ |
| | ५.१८ आर्थिक धोरणांचा पुरस्कर्ता | १७६ |
| | ५.१९ प्रकरण संदर्भ | १८२ |
| | ब) सार्वजनिक खर्च व इतर बाबी | १८४-२०१ |
| | ५.१ प्रस्तावना | १८४ |
| | ५.२ सार्वजनिक उत्पन्नाची साधने | १८६ |
| | ५.३ उत्पन्नाचे साधन या दृष्टीने चौथाई सरदेशमुखी | १९३ |
| | ५.४ नानासाहेब व खर्चाच्या बाबी | १९८ |
| | ५.५ प्रकरण संदर्भ | २०१ |
| | | |

| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | क) नानासाहेब पेशवे यांचे व्यापार व उद्योग धंदे | २०२-२५२ |
| | ५.१ प्रस्तावना | २०२ |
| | ५.२ व्यापार उद्योग विषयक धोरण | २०३ |
| | ५.३ नानासाहेबांचे परराष्ट्र व्यापारविषयक धोरण | २१७ |
| | ५.४ नानासाहेब पेशवे कालखंडातील व्यापार | २२२ |
| | ५.५ अंतर्गत व्यापार | २२४ |
| | ५.६ वाहतुकीची साधने, व्यापारी जमाती | २२६ |
| | ५.७ अंतर्गत बाजारपेठा, व्यापारी वस्तू | २२७ |
| | ५.८ नानासाहेब पेशवे व आर्थिक प्रशासन | २३० |
| | ५.९ व्यापारी व सावकारी वर्गाचा उदय | २३४ |
| | ५.१० पेशवे व चलन व्यवस्था | २५० |
| | ड) नानासाहेब पेशवे यांचे वतनदार व सावकारविषयक धोरण | २५३-२८६ |
| | ५.१ प्रस्तावना | २५३ |
| | ५.२ पेशवे व मराठा काळातील प्रशासन | २५६ |
| | ५.३ अर्थव्यवस्थेचे खांब (पिलर्स) | २६८ |
| | ५.४ प्रकरण संदर्भ | २८२ |
| ६. | प्रकरण - ६ | २८६-३३० |
| | **सारांश व निष्कर्ष** | २८६ |
| | ६.१ प्रस्तावना | २८७ |
| | ६.२ संशोधन समस्येचे शीर्षक | २८७ |
| | ६.३ संशोधनाचे महत्त्व | २८९ |
| | ६.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी | २९० |
| | ६.५ संशोधनाची गृहितके | २९० |
| | ६.६ संशोधनाची कार्यपध्दती | २९१ |
| | ६.७ नमुना निवड | २९१ |
| | ६.८ समस्येसंबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा | २९१ |
| | ६.९ प्रायोगिक पध्दती | ३०५ |
| | ६.१० सर्वेक्षण पध्दती | ३०५ |
| | | |

| अ.क्र. | अध्यायाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | ६.११ ऐतिहासिक संशोधन पध्दती | ३०६ |
| | ६.१२ उपसंहार | ३०७ |
| | ६.१३ बाळाजीच्या कार्याचे मूल्यमापन | ३११ |
| | ६.१४ निष्कर्ष व अनुमान | ३१३ |
| | ६.१४.१ उद्दिष्टानुसार निष्कर्ष | ३१४ |
| | ६.१४.२. गृहितकानुसार निष्कर्ष | ३१६ |
| | ६.१५ पुढील संशोधनासाठी विषय | ३१८ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३२०-३३२ |
| | परिशिष्टे | ३३३ |

# परिशिष्ट्ये यादी



| अ.क्र. | शीर्षक |
|---|---|
| अ) | पुणे पुराभिलेख विभागाचे पत्र |
| ब) | कोल्हापूर पुराभिलेख विभागाचे पत्र |
| क) | वि. स. खांडेकर व नगर वाचनालय सांगली यांचे पत्र |
| ड) | पेशवाईचा आलेख |
| इ) | नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांचा आढावा आलेख |
| फ) | नकाशे<br>१) नानासाहेबांचे राज्य<br>२) मराठ्यांचा चौथाई संदर्भात नकाशा |
| ग) | नानासाहेबांची हस्ताक्षर प्रत व त्याचा मराठी अनुवाद |
| ज) | पडताळा सूची |

पेशवे कालखंडात मराठी राज्याची अर्थव्यवस्था सुव्यवस्थित करणारा पेशवा १७४०-१७६१



# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब

जन्म : १२ डिसेंबर १७२१ मृत्यू : २३ जून १७६१

जि. पुणे, नाणे मावळ (साते) जि. पुणे (पर्वती)

प्रकरण १

# प्रस्तावना

१.१ संशोधन समस्येचे शीर्षक

१.२ संशोधनाची समस्या

१.२ संशोधनाची उद्दिष्टे

१.३ संकलपनात्मक - कार्यात्मक व्याख्या

१.४ संशोधनाच्या व्याप्ती व मर्यादा

१.५ संशोधनाचे महत्त्व

१.६ संशोधनाची सैध्दांतिक पार्श्वभूमी

१.७ संशोधनाची गृहितके

१.८ संशोधनाची कार्यपध्दती

१.९ नमुना निवड

१.१० संशोधनाची साधने

१.११ प्रकरण योजना

१.१२ तथ्य संकलन

१.१३ प्रकरण संदर्भ

प्रकरण १

# नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास

## <u>प्रस्तावना -</u>

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पेशवेकाळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पेशवे काळ म्हणजे मराठी राज्याच्या विस्ताराचा काळ मानला जातो. पेशवाईची सुरुवात १७१३ पासून झाली. ही एक क्रांती मानावी लागेल. कारण पिंगळे घराण्याकडून भट घराण्याकडे पेशवाई आली. या दृष्टीने पेशवे कालखंड एक महत्त्वपूर्ण कालखंड होता. पेशव्यांनी मराठ्यांची राजधानी पुणे या शहराचा मूलभूत पाया तयार केला. आज पुण्याला महाराष्ट्रात व देशात जे महत्त्वाचे स्थान आहे, त्याचे श्रेय पेशव्यांना देणे उचित ठरेल. पुण्याचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात जो विकास झाला, त्याचे कारण पेशव्यांनी राबविलेल्या ध्येयधोरणांनाच द्यावे लागेल. पेशव्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक निर्णयांचा एकूणच महाराष्ट्राच्या समाज जनजीवनावर परिणाम झाला, त्याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. साधारणपणे १७१३ ते १८१८ हा पेशवाईचा कालखंड मानला जातो. या काळामध्ये अनेक पेशव्यांनी आपली कर्तबगारी दाखवली. मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. मराठ्यांचे वर्चस्व दक्षिण व उत्तर भारतात निर्माण केले. या दृष्टीने पेशव्यांनी राबविलेल्या धोरणांचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. मराठ्यांची राजधानी पुणे म्हणजे महाराष्ट्राचे भूषण मानावे लागेल. नानासाहेबांनी मनगटी बळाचा वापर करण्यापेक्षा बुद्धीचातुर्याच्या जोरावर आपली राजवट दैदिप्यमान केली.

पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करत असताना प्रामाणिकपणा, सचोटी, लढवय्येपणा, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वासाच्या जोरावर नवीन सरदार घराणी उदयास आणली. या सरदार घराण्यांचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सुरक्षिततेसाठी व मराठी राज्याच्या विस्तारासाठी उपयोग करून घेतला. मराठ्यांच्या इतिहासामध्ये **'सरदारकीने काम करावे'** या धोरणानुसार नानासाहेब पेशव्यांनी मराठी साम्राज्याचा विस्तार दिल्लीपासून ते श्रीरंगपट्टण आणि बंगालपासून गुजरातपर्यंत केलेला दिसून येतो. त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी सत्तेचा जरीपटका अटकेपार पोचवला. तसेच दक्षिणेकडील शत्रू प्रामुख्याने निजाम,

हैदरअली व नबाबांचा बंदोबस्त केला. त्यांच्याकडून चौथाई, सरदेशमुखी वसूल केली. याचा उपयोग आपल्या राज्यातील विविध सुधारणा, लष्कर खर्च व सुरक्षितता यावर केला. याचबरोबर उत्तरेकडील मोघल असोत, रोहिले असोत अथवा इतर जाट, रजपूत या विरोधकांचाही त्यांनी बंदोबस्त केला व मराठी सत्तेला नावारूपाला आणले. या दृष्टीने पेशवे कालखंड म्हणजे एक महत्त्वपूर्ण कालखंड होता असेच म्हणावे लागेल. अशा या कालखंडातील एक महान **पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब** यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा विचार होणे आवश्यक आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे. कारण या नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये मराठी सत्तेचा फैलाव 'न भूतो न भविष्यती' इतका झाला. हा पेशवा लढवय्यापेक्षा उतम प्रशासक असून मराठ्यांच्या इतिहासामध्ये राजकारण धुरंधर आणि प्रशासक म्हणून ओळखला जाणारा पेशवा होय. नानासाहेब पेशव्यांचा कालखंड १७४० ते १७६१ असा दीर्घ २१ वर्षांचा काळ सत्ता वापरण्यासाठी त्यांना मिळाला. या २१ वर्षांच्या काळामध्ये नानासाहेबांनी छत्रपती शाहूंचा विश्वास संपादन केला. १७४० ते १७४८ या पहिल्या काळामध्ये नानासाहेबांनी उत्तरेकडे एकूण चार स्वाऱ्या केल्या. एक माळवा स्वारी, दुसरी भेलसा स्वारी, तिसरी नेवाईची स्वारी तर चौथी बंगालची स्वारी होय. या सर्व स्वाऱ्यांमधून चौथाई, सरदेशमुखी, हक्क मिळविले. त्यानंतर मात्र दुसऱ्या कालखंडात १७४८ ते १७६१ पर्यंत हा नानासाहेब पेशवा उत्तरेच्या स्वारीवर गेला नाही. उत्तरेच्या स्वारीची पूर्ण जबाबदारी आपला लहान बंधू रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा यांच्याकडे सोपविली. रघुनाथरावांच्या मदतीला शिंदे आणि होळकर हे मराठ्यांचे मातब्बर सरदार दिले होते. १७४० ते १७४८ या कालखंडामध्ये साताराच्या छ. शाहूंकडे महाराणी ताराबाई व दाभाडे घराण्यातील उमाबाई दाभाडे यांनी छ. शाहूकडे नानासाहेब पेशव्यांबद्दल तक्रारी केल्या. तेव्हा छ. शाहूने नानासाहेबांना 'पेशवे' पदावरून निलंबित केले तेव्हा नानासाहेबांनी प्रामाणिकपणे पेशवेपदाची वस्त्रे परत केली. बंडखोरी केली नाही. त्यांचा हा प्रामाणिकपणा पाहून छ. शाहूंचा नानासाहेबांवर विश्वास बसला आणि पुन्हा त्यांना सन्मानपूर्वक पेशवाईची वस्त्रे दिली. अशा या नानासाहेबांवर हातून कळत न कळत काही चुकाही झाल्या असतील. त्यामध्ये त्यांनी आंग्रेचे आरमार नष्ट करणे, रघुजी भोसले या मराठी सरदाराला मदत न करणे, परिणामी उत्तर भारतात प्रबळ इंग्रजी सत्ता उदयास आली. त्याच्या काळातील अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे पानिपतची तिसरी लढाई होय. (दि. १४ जानेवारी

१७६१) या लढाईत मराठ्यांची सव्वालाख बांगडी फुटली असे म्हटले जाते. यावेळी मोठी जीवितहानी झाली. या वरील सर्व घटनेस नानासाहेबांना जबाबदार धरले जाते.

अशा या नानासाहेबांजवळ त्यांच्या आजोबांचे गुण होते. मात्र वडिलांचे लढवय्याचे फार गुण दिसत नाहीत. त्यांच्याजवळ राजकारण चातुर्य, मनुष्य स्वभावाची पारख करण्याची विद्या आणि स्वभावाचे माधुर्य यामुळे नानासाहेबांनी मराठी राज्याचा विस्तार दिल्लीपासून श्रीरंगपट्टणपर्यंत आणि बंगालपासून गुजरातपर्यंत केला. असा हा नानासाहेब बैठा, मुत्सद्दी व उत्तम प्रशासक पेशवा होता. म्हणजे सरदारकीने काम करावे व आपण बसावे हे तत्त्व नानासाहेबांनी अंगिकारल्याचे दिसून येते. नानासाहेबांनी कोल्हापूरच्या दुसऱ्या संभाजीबरोबर छ. शाहूंच्या अपरोक्ष सहा कलमी करार केला होता. कारण या दोघांनाही संतान नव्हते. तेव्हा छत्रपती शाहूंचे 'दत्तक वारस' या दृष्टीने या कराराला महत्त्वाचे स्थान आहे. अशा या नानासाहेब पेशव्यांच्या राजकीय, सामाजिक कार्यापेक्षा त्यांनी केलेल्या आर्थिक कार्याचा, सुधारणांचा चिकित्सक विचार होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संशोधकाने ही समस्या महत्त्वाची मानून नानासाहेबांच्या आर्थिक व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा शोध सदर संशोधनात घेण्यात आला आहे. या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांचे आर्थिक धोरण या संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे.

## १.१ संशोधन समस्येचे शीर्षक -

''नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास''

## १.२ संशोधनाची समस्या -

नानासाहेब पेशवेंच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे व परिणामांचे विश्लेषण करणे, ही या संशोधनाची मूलभूत समस्या आहे. या समस्येचा संशोधकाने चिकित्सकपणे अभ्यास करून नानासाहेबांनी राबविलेल्या आर्थिक धोरणांचा व सुधारणांचा अभ्यास या संशोधनात मांडला आहे.

## १.३ संकल्पनात्मक व्याख्या -

पेशव्यांच्या मालिकेमधील आर्थिक आणि प्रशासकीय धोरणांचा पुरस्कार करणार एकमेव पेशवा

कार्यात्मक व्याख्या -

१) नानासाहेब पेशवे - मराठी राज्याला पेशवे कालखंडामध्ये आपल्या २१ वर्षांच्या दीर्घ राजवटीत आर्थिक स्थैर्य मिळवून देणारा महान पेशवा म्हणून नानासाहेबांचा उल्लेख केला जातो. त्यांनी केलेल्या प्रशासकीय कारभाराचा मूळ गाभा या संशोधनात व्यक्त करण्यात आला आहे.

संकल्पनात्मक व्याख्या -

प्रजेच्या कल्याणाचा विचार करून व राज्याच्या महसूलाचा विचार करून प्रगतीपथावर विकास करणाऱ्या आर्थिक धोरणांचा विचार

कार्यात्मक व्याख्या -

२) आर्थिक धोरण - पेशवे काळात राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी केल्या जाणाऱ्या धोरणांचा समावेश या संशोधनात केला आहे. ही नानासाहेब पेशव्यांची कामगिरी अफलातूनच होती, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संकल्पनात्मक व्याख्या -

नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांचा सर्वांगीण अभ्यास

कार्यात्मक व्याख्या

३) चिकित्सक अभ्यास - नानासाहेब पेशव्यांनी प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी, उत्पन्न वाढविण्यासाठी, राज्य मजबुतीकरण करण्यासाठी राबविलेल्या योजनांचा बारकाईने अभ्यास या संशोधनात केला गेला आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे -

१) नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांची चिकित्सक पध्दतीने मांडणी करणे.

२) पेशव्यांच्या सत्तेचा उदय कसा झाला? त्याचा शोध घेणे.

३) नानासाहेब पेशव्यांचे सत्तारोहण व कारकीर्द अभ्यासणे.

४) नानासाहेब पेशव्यांचे इतर राजकीय सत्ता स्वकियांशी झालेल्या संघर्षाचा अभ्यास करणे.

५) नानासाहेब पेशव्यांचे शेती व इतर व्यवसायविषयक धोरण अभ्यासणे.

६) नानासाहेब पेशव्यांचे व्यापार, उद्योग तसेच परराष्ट्रीय व्यापारविषयक आर्थिक धोरण अभ्यासणे.

७) नानासाहेब पेशव्यांचे पतपेढ्या, सावकारी व्यवहारविषयक धोरण अभ्यासणे.

८) नानासाहेब पेशव्यांचे महसूल, लष्कराच्या संदर्भातील आर्थिक धोरण अभ्यासणे.

९) नानासाहेब पेशव्यांचे वतनदारांच्या संदर्भातील आर्थिक धोरण अभ्यासणे.

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवाईच्या कार्याला अनन्यसाधारण महत्व आहे. पेशवे राजवटीतील निर्णयांचा अभ्यास केल्याशिवाय इतिहास संशोधकाला पुढे जाता येत नाही. पेशवाईमध्ये बाजीराव पेशवे आणि नानासाहेब पेशवे या दोघांच्या सत्तेला तुलनात्मकदृष्ट्या अधिक काळ मिळाला आहे. बाजीराव पेशव्यांची सर्व कारकीर्द लढाईत गेली. विशेषतः नानासाहेब पेशव्यांच्या सत्तेला मोठे स्थैर्य मिळाले होते. त्यामुळे नानासाहेबांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक निर्णयाचा त्यांच्या सत्तेवर महत्त्वपूर्ण परिणाम झालेला आहे. म्हणूनच नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. आर्थिक धोरणामध्ये शेती, व्यापार, पतपेढ्या, उद्योग व्यवसाय वतनदार, सावकारविषयक धोरणांचा अंतर्भाव आहे, ही या संशोधनाची व्याप्ती आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवे राज्यकर्त्यांचे आपापल्या परीने योगदान दिसून येते. विशेषतः नानासाहेबांचे या सर्वांमध्ये स्थैर्य, कालखंडाच्या दृष्टीकोनातून अधिक योगदान असल्याने नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणापुरताच हा विषय मर्यादित केला आहे. विशेष म्हणजे नानासाहेबांनी आपल्या कारकिर्दीत विविध निर्णय घेवून आपली धोरणे स्पष्ट केली होती. एका बाजूला स्थैर्य तर दुसऱ्या बाजूला पानिपतचा पराभव. त्यामुळे ढवळून निघालेली पेशवाई हे वास्तव नानासाहेबांच्या कारकिर्दीत घडले. म्हणूनच नानासाहेबांच्या एकूण जीवन पटावरील केवळ आर्थिक धोरणापुरतेच हे संशोधन मर्यादित करण्यात आले आहे.

## १.६ संशोधनाचे महत्त्व -

मराठी सत्तेच्या प्रचंड विस्ताराला कारणीभूत झालेल्या नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास केला असून, त्यांच्या दोन कालखंडातील आर्थिक कामगिरी महत्त्वाची ठरली आहे. तसेच संशोधनामध्ये पुणे व परिसर प्रामुख्याने सुपे, सासवड, बारामती व वाई या क्षेत्रातील आर्थिक घडामोडीशी निगडीत असणाऱ्या धोरणांवर प्रकाश टाकला आहे.

१) छ. शाहूंच्या हयातीत असताना १७४० ते १७४९

२) छ. शाहूंच्या मृत्यूनंतर कालखंड १७४९ ते १७६१

वरील दोन्ही कालखंडामध्ये नानासाहेब पेशव्यांनी केलेल्या लढाया, दक्षिण उत्तर भारतामध्ये मराठी सत्तेचा केलेला विस्तार यासाठी त्यांनी राबविलेली धोरणे प्रामुख्याने राजकीय धोरणापेक्षा आर्थिक धोरणांचा चिकित्सक विचार या संशोधनामध्ये केला आहे. कारण कोणत्याही देशाचा, समाजाचा, कुटुंबाचा खरा मूलभूत पाया आर्थिक नितीमध्येच असतो. या दृष्टीने नानासाहेबांनी राबविलेली धोरणे इतिहासाचे वाचक, अभ्यासक, विचारवंत व चिकित्सक यांच्याकरिता या संशोधनाचा निश्चितच उपयोग होईल असे प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते. त्यांच्या आर्थिक धोरणांचा व कामगिरीचा, प्रशासकीय कौशल्याचा परिचय करून घेण्यासाठी व अभ्यासासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

आजपर्यंत नानासाहेबांच्या राजकीय लढाया, धोरणे यांचा अभ्यास विद्यार्थी वाचकांसमोर मांडलेला दिसून येत असला तरी त्यांच्या राजकीय कारकिर्दीबरोबरच आर्थिक दृष्टीने केलेले नियोजन व सुधरणा या धोरणांचा चिकित्सक अभ्यास व्हावा या दृष्टीनेही हे संशोधन महत्त्वाचे वाटल्याने संशोधकाने नानासाहेब एक प्रशासक म्हणून त्यांच्या आर्थिक कार्याचा वेगळेपणा या संशोधनातून व्यक्त केला आहे. नानासाहेबांच्या प्रदीर्घ अशा २१ वर्षाच्या कारकिर्दीत मराठी राज्याला स्थैर्य प्राप्त झाले, मराठी सत्तेचा मोठा फैलाव झाला म्हणूनच इतर पेशव्यांपेक्षा नानासाहेबांचे एक वेगळेपण या संशोधनातून मांडण्यात आले आहे.

## १.७ सैध्दांतिक चर्चा व पार्श्वभूमी -

महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये छ. शिवरायांनी आदर्श व उत्तम प्रशासन व्यवस्था निर्माण केली. लष्कर व आरमार, शेती, महसूल, वतनदार व्यवस्था, चौथाई, सरदेशमुखी या सर्व क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणला. आपली राजवट दैदिप्यमान व जनताभिमुख बनवली. शिवरायांचा आदर्श पुढील काळात प्रारंभीच्या पेशव्यांनी प्रामुख्याने बाळाजी विश्वनाथ, बाजीराव पेशवे आणि नानासाहेब पेशवे यांनी चालू ठेवला. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पेशवे यांची राजवट संकटे व युध्द मोहिमा तसेच धामधुमीत गेली. मात्र पुढील पेशव्यांचा कार्याचा मूलभूत पाया वरील दोन पेशव्यांनी करून ठेवला, असे म्हटले तर वावगे ठरू नये. नानासाहेब पेशव्यांनी आपल्या कर्तबगारी व मुत्सद्देगिरीच्या जोरावर मराठी राज्याची इमारत उंच केली. मराठी राज्याचा मोठा विस्तार घडवून आणला. पेशवे पदाचे महत्त्व वाढविले, एवढेच नव्हे तर पुणे या शहराचे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात अव्वल स्थान निर्माण केले. आपल्या गुणकौशल्याच्या जोरावर छ. शाहूंची आर्थिक चिंता संपवली. मराठी राज्याच्या अर्थव्यवस्थेला आकार देऊन आर्थिक नियंत्रण प्रस्थापित केले. खऱ्या अर्थाने पुणे शहराचा मूलभूत पाया त्यांनी तयार केला. पुण्याला या देशामध्ये अग्रस्थानी बसविले. पुण्याचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, क्रीडा अशा सर्व क्षेत्रांचा विकास केला. शनिवारवाड्यात कात्रजचे पाणी पोहोचविले. मूळा-मुठा नदीवर पूल बांधून सुविधा निर्माण केल्या. पर्वती, सारसबाग, गणेश मंदिर, अनेक पेठा, रस्ते वसवून पुण्याची शान वाढविली. क्रीडा क्षेत्रात पुण्याला महत्त्व आणून दिले. ऑल्मिपिक स्पर्धेची खरी सुरुवात नानासाहेब पेशव्यांनी केली. पुण्याचे इन्फ्रान्स्ट्रक्चर खऱ्या अर्थाने नानासाहेब पेशव्यांनी तयार केले असे म्हणावे लागेल.

नानासाहेबांच्या प्रशासकीय धोरणांचा एकूण पुणे, मराठी सत्ता व इतर समाज जीवनावर झालेले परिणाम खऱ्या अर्थाने मराठी राज्याला पुढे नेणारे दिसतात. नानासाहेब पेशव्यांना दीर्घकालीन २१ वर्षांची स्थिर राजवट मिळाली. त्यामुळेच त्यांना आर्थिकदृष्ट्या नियोजन करणे, धोरणे राबविणे शक्य झाले. त्यांच्या कालखंडामध्ये मराठी सत्तेचा दक्षिण व उत्तर भारत अशा सर्वच ठिकाणी मराठ्यांचा बोलबाला झाला. नानासाहेबांच्या अराजकीय कार्याची नोंद घेणे आवश्यक बनले. इतिहासामध्ये सर्वच

गोष्टींची दखल व नोंदी घेतल्या जातीलच असे नाही. तेव्हा त्यांच्या अराजकीय कामगिरीला प्रकाशमान करण्याचे काम या संशोधनातून विद्यार्थी वाचकांसमोर व समाजासमोर केले आहे. त्यांच्या विविध पैलूंचा विचार, तत्त्वज्ञ इतिहासकार व समाज यांच्यापुढे प्रकाशित करणे हे या संशोधनाचे मूल्य आहे.

नानासाहेबांच्या राजकीय कार्याचा इतिहास मांडला गेला, अभ्यासला गेला ही त्यांच्या कार्याची एक बाजू, मात्र त्यांच्या कार्याची दुसरी बाजू पानिपत प्रकरणामुळे प्रकाशमान झाली नाही. म्हणूनच त्यांच्या दुसऱ्या बाजूचा विचार इतिहासकार, अभ्यासक, संशोधक आणि समाजाला या संशोधनातून निश्चितच उपयोगी ठरेल. म्हणूनच या संशोधनाचे मूल्य वाढले आहे. नानासाहेब पेशव्यांनी मराठी राज्याला एक स्थिर राज्य म्हणून मान्यता मिळविण्यास मदत केली. त्यांच्या कालखंडामध्ये मराठी सत्ता वैभवाच्या शिखरावर पोचली. परंतु पानिपतच्या लढाईच्या पराभवाचा कलंक त्यांच्या नावासमोर कायमस्वरूपी चिकटल्यामुळे त्यांना दुर्लक्षित करण्यात आले. ही त्यांच्या राजकीय कार्याची एक बाजू असेल मात्र त्यांच्या कार्याची दुसरी अराजकीय बाजू या संशोधनातून प्रकाशित होत आहे. पेशवे कालखंडामध्ये त्यांचे स्थान अजरामर आहे. त्यांनी केलेल्या शेती, उद्योग, व्यापार, वतनदारी, सावकार, चौथाई, सरदेशमुखी इत्यादीबाबत मराठी राज्याला आर्थिक स्थिरता मिळवून दिली. आपल्या कर्तबगारीने प्रतिकूल परिस्थितीत मराठी राज्याचा आर्थिक डोलारा सुव्यवस्थित सांभाळला. त्यांनी मराठी राज्याचे केलेले आर्थिक व्यवस्थापन खऱ्या अर्थाने विचार करायला लावणारे आहे. या संशोधनातून त्यांच्या प्रशासनातील आर्थिक घटनांचा मागोवा घेतला आहे. पेशवे कालखंडातील मराठी प्रशासनाचा मूलभूत पाया त्यांनी तयार केला.

छ. शिवाजी महाराज यांच्यानंतर राज्य व्यवस्थेत खऱ्या अर्थाने सुधारणा करणारा एकमेव प्रशासक म्हणून नानासाहेब पेशवे यांचे कार्य या संशोधनातून पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.८ संशोधनाची गृहितके -

१) नानासाहेब पेशव्यांच्या राजकीय सत्तेला स्थान मिळाल्याने त्यांना राज्य कारभाराची आर्थिक घडी बसवता आली.

२) नानासाहेबांनी आर्थिक धोरणांना प्राधान्य दिले.

३) मराठी सत्तेचा नानासाहेबांनी महाराष्ट्राबाहेर विस्तार केल्याने त्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झाली.

४) नानासाहेब पेशव्यांकडे सत्तेची सुत्रे केंद्रीत झाल्यामुळे त्यांना आर्थिक धोरण व निर्णय घेणे शक्य झाले.

५) नानासाहेब यांच्यामुळे पेशवाईतील कर्जाचा बोजा कमी झाला.

६) नानासाहेब पेशवे (बजेट मॅनेजमेंट) अंदाज पत्रकाचे व्यवस्थापन करण्यात कुशल होते.

## १.९ संशोधनाची कार्यपध्दती -

संशोधनामध्ये संशोधन पध्दत हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. या संशोधनामध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत, यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा आणि वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. एका विशिष्ट अशा सामाजिक, आर्थिक, राजकीय शक्तीच्या संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थिती संदर्भात नानासाहेब पेशव्यांनी कोणती धोरणे निर्धारित केली, याचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये केला आहे.

## १.१० नमुना निवड पध्दती -

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुणे आणि पुणे परिसराची निवड केली आहे. कारण नानासाहेबांच्या कर्तबगारीची सुरुवात राजधानी पुणे शहरातच झाली.

बाळाजी बाजीरावच्या कर्तृत्वाने इतिहासाच्या पानेच्या पाने जरी भरली असली तरी तिचा अभ्यास संपूर्णपणे करणे अशक्य होईल. म्हणूनच नमुना निवड केली जाते. नमुना संपूर्ण जनसंख्येचा प्रातिनिधीक गट असतो. प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधकाने बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या फक्त आर्थिक धोरणांचा विचार निवड म्हणून केला आहे.

## १.११ संशोधनाची साधने -

अ) प्राथमिक साधने -

१) या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला.

२) ऐतिहासिक कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली.

३) पेशवेकालीन, सामाजिक, आर्थिक पत्रव्यवहार, पेशवे दप्तर ही सर्व अप्रकाशित प्राथमिक साधने तपासण्यात आली.

४) इतिहास संग्रह भाग १ ते ७ पारसनीस संपादित - पेशवे दप्तरातील माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे आणि स्फुटनिक.

५) ऐतिहासिक पत्रव्यवहार - संपादक गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, य. मा. काळे

६) बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी भाग २, संपादक द. ब. पारसनीस मुंबई ७

७) सरदेसाई यांच्या रियासती, वि. का. राजवाडे यांचे २२ खंड, ४५ खंड - पुरंदरेंचे दप्तर.

ब) दुय्यम साधने -

१) बखरी, आज्ञापत्रे, लेख आणि साहित्य

२) भावे वा. कृ. - पेशवेकालीन महाराष्ट्र

३) चाफेकर ना. गो. - पेशवाईच्या सावलीत

४) गवळी पा. आ. - पेशवेकालीन महाराष्ट्र

५) गाडगीळ ध. रा. - पुणे सोशिओ - इकॉनॉमिक सर्व्हे पार्ट १

६) गाडगीळ डी. आर. - पुणे शहरातील महाजन आणि नगरसेठ

७) गोखले म. वि.- छत्रपतींचे पंतप्रधान

८) जोशी शं. ना. - मराठेकालीन समाजदर्शन

९) सांगली, कोल्हापूर, पुणे येथील विविध महाविद्यालयांची ग्रंथालये, त्याचबरोबर शिवाजी व पुणे विद्यापीठातील समृध्द ग्रंथालयातील ग्रंथांचा उपयोग करण्यात आला आहे.

## १.१२ प्रकरण योजना

१) प्रस्तावना

२) पेशव्यांच्या सत्ता स्थापनेची पार्श्वभूमी

३) नानासाहेब पेशवे सत्तारोहण व कारकीर्द

४) नानासाहेब पेशवे यांची शेतीविषयक धोरणे व सुधारणा

५) नानासाहेब पेशवे यांचे व्यापार, उद्योगधंदे व परराष्ट्रीय व्यापारविषयक धोरणे

६) नानासाहेब पेशवे यांचे वतनदार, सावकार व पतपेढीविषयक आर्थिक धोरणे

७) निष्कर्ष व सारांश -

संशोधकाने संशोधनाचे उचित अनुमान येण्यासाठी संशोधनाचा आराखडा उद्दिष्ट व गृहितकांना धरून सादर केला आहे. मिळालेल्या प्राथमिक साधनांच्या व दुय्यम साधनांच्या आधारे संशोधन वस्तूनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला असून, संशोधकाने गृहितके आणि उद्दिष्टे स्पष्ट करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे व इतर मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधन प्रबंध पूर्ण केला आहे.

## १.१३ तथ्य संकलन -

इतिहासाच्या संशोधनासाठी सत्य माहिती समोर आणणारे स्त्रोत महत्त्वाचे ठरतात. अन्यथा चुकीचा इतिहास सांगितला जाण्याची भिती असते. त्यामुळे इतिहासातील सत्यता पुढे येऊ शकत नाही. संशोधकाने प्रस्तूत संशोधनाचे वास्तव सत्य पुढे आणण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे अंतर्गत व बाह्य मिमांसा केली आहे. सेनबॉस व लॉजिलॉस यांच्या मते जसे No Documents No History म्हणजे कागदपत्रे नसतील इतिहास नसतो, हे इतिहासातील वस्तूनिष्ठ सत्य लक्षात घेऊन प्रस्तूत संशोधनामध्ये बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांचे आर्थिक धोरण

समाजातील अभ्यासकांसमोर समोर आणण्यासाठी खालील प्राथमिक व दुय्यम स्त्रोत वापरले गेले आहेत. बाळाजी बाजीरावच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम साधनांची बाह्य व आंतरिक चिकित्साद्वारे विश्लेषण या प्रबंधामध्ये करण्यात आले आहे.

## १.१४ प्रकरण संदर्भ -


अ) प्राथमिक साधने-

१) अ. रा. कुलकर्णींचे खंड

२) गॅझेटियर ऑफ बाँबे प्रेसिडेन्सी पार्ट ३, खंड ९ व १०

३) गर्गे स. मा., मराठी रियासत, खंड ४, पृष्ठ ४१, ४३-४३, ४९, ८१, ३६२, ३६८,

४) खरे ग. ह., हिंगणे दप्तर- खंड १, पृष्ठ क्र. १४-१८, पृष्ठ १७,

५) खोबरेकर वि. गो. - महाराष्ट्रातील दप्तरखाने

६) पारसनीस डी. बी. - इतिहास संग्रह, अर्थविज्ञान

७) पेशवे दप्तर, खंड १७, १८, २७, २८, ३४, ४३

८) पुरंदरेंचे दप्तर

९) पारसनीस डी. बी. संपादित, इतिहास संग्रह भाग १ ते ७, पेशवे दप्तरातील माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे आणि स्फुटनिक.

११) रानडे एम. जी.- राईज ऑफ मराठा पॉवर

१२) सरदेसाई गो. स., कुलकर्णी कृ. पां., काळे य. मा., संपादक ऐतिहासिक पत्रव्यवहार

१३) पारसनीस डी. बी. संपादक, बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी भाग २, मुंबई ७

१४) राजवाडे वि. का.- मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, २२

१५) राजवाडे वि. का., ऐतिहासिक प्रस्तावना पृष्ठ १४३-१४५

१६) साने का. ना., काव्ये इतिहास संग्रह, पत्रे, यादी, लेखांक ५६, पृष्ठ ५६, ६८, ७१.

६) सरदेसाई गो. स. यांच्या रियासती, ४५ खंड

१७) सरदेसाई गो. स. - मराठी रियासती खंड ४, मध्य विभाग २, पृष्ठ १०, मध्य विभाग २, पृष्ठ ४०४, पृष्ठ ३१, पृष्ठ ४१६

१८) सरदेसाई गो. स. - पेशवे दप्तर खंड ६, ३१, पेशवे दप्तर २१, पत्र क्र. ८, पृष्ठ क्र. १४-३२

१९) सरदेसाई गो. स. - न्यू हिस्ट्री ऑफ मराठाज

ब) दुय्यम साधने -

१) ओक प्रमोद - पेशवे घराण्याचा इतिहास, २००१, ऋतुपर्ण अनिरुध्द कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजमनगर, पुणे.

२) बखरी, आज्ञापत्रे, लेख आणि साहित्य

३) भावे वा. कृ. - पेशवेकालीन महाराष्ट्र

४) भांडारकर पु. ल.- संशोधन पध्दती

५) भिंताडे वि. रा. - शैक्षणिक संशोधन पध्दती, (१९९९) नूतन प्रकाशन पुणे

६) चाफेकर ना. गो. - पेशवाईच्या सावलीत

७) चिटणीस कृ. ना. - सोशिओ इकॉनॉमिक अस्पेक्टस् ऑफ मेडिव्हियल इंडिया

८) चिटणीस कृ. ना.- मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग ३

९) देसाई सु. धा. - सोशल लाईफ इन महाराष्ट्र अंडर दि पेशवाज्

१०) गवळी बा. आ. - पेशवेकालीन महाराष्ट्र २०००, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद

११) गाडगीळ ध. रा. - पुणे सोशिओ - इकॉनॉमिक सर्व्हे पार्ट १

१२) गाडगीळ डी. आर. - पुणे शहरातील महाजन आणि नगरसेठ

१३) गोखले म. वि. - छत्रपतींचे पंतप्रधान बाळाजी बाजीराव १९८८, पंढरी प्रकाशन, लोकमान्यनगर, पुणे.

१४) जोशी शं. ना. - मराठेकालीन समाजदर्शन

१५) महाजन टी. टी. - इंडस्ट्री ट्रेड अँड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरीयड

१६) मुळे रा. शं. व उमाटे वि. तु. - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे १९७७, नूतन प्रकाशन पुणे.

१७) नाईल्स टिन्सगार्ड - १७ व्या शतकातील आशिया खंडातील व्यापारक्रांती

क) इंग्रजी साधने -

1) Baten B. - Powel - Study of the Dekkan Villages, their origin and development (J. R. A. S. 1897)

2) Gadgil P. - Poona : A Socio, Economic survey.

3) Grand-Duff J. S. - A History of the Maratha's, 1921, London.

4) Kincaid C. and Parasnis D. - A History of Maratha people, 1918 London.

प्रकरण २

# संबंधित संशोधन व साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज

२.३ संदर्भ साहित्याचा हेतू

२.४ समस्येसंबंधी संबंधित संशोधनाचा आढावा

२.५ समस्येसंदर्भातील संदर्भ साहित्याचा (साधनांचा) आढावा

२.६ संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे झालेला फायदा

२.७ प्रस्तूत संशोधनातील वेगळेपण

२.८ प्रकरण संदर्भ

# संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

## २.१ प्रस्तावना -

प्रत्यक्ष संशोधनाला सुरुवात करण्यापूर्वी संशोधक संशोधन विषयाच्या निवडीसाठी वेगवेगळी संशोधने वाचत असतो. त्यामुळे संशोधनाचा विषय निश्चित करण्यास मदत होते. संशोधनाचा आराखडा तयार करणे, माहिती संकलित करून माहितीचे अर्थ निर्वचन करणे इत्यादी संबंधित साहित्याचा उपयोग होतो. म्हणून कोणत्याही विषयासंबंधी संशोधन हाती घेतल्यावर त्याबाबत पूर्वी काय अभ्यास झालेला आहे, याचा आढावा घेणे आवश्यक असते. त्यामुळे नवीन संशोधनाची दिशा ठरविता येते.

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पेशवे कालखंडाला अनन्य साधारण महत्व आहे. साधारणपणे १७१३ पासून ते १८१८ हा पेशवाईचा कालखंड मानला जातो. या काळामध्ये प्रारंभी सुरुवातीस छ. शाहूंच्या सल्ल्यानुसार मराठ्यांचे प्रशासन, राज्यकारभार व इतर सर्वच धोरणांचा विचार होत असे. साधारणपणे १७१३ पासून बाळाजी विश्वनाथच्या रूपाने भट घराण्यातील पहिला पेशवा मिळाला. छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यात बाळाजी विश्वनाथचे योगदान सर्वश्रेष्ठ मानले जाते. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. बाळाजी विश्वनाथनंतर त्याचा मोठा मुलगा बाजीराव यास छ. शाहूने कराडजवळ मसूर या गावी पेशवेपदाची वस्त्रे दिली. पेशवा बाजीराव वडिलांप्रमाणे प्रामाणिक आणि वैचारिक होता. एवढेच नव्हे तर तो लढवय्याही होता. वयाच्या १९ व्या वर्षी तो पेशवा बनला. अत्यंत लढवय्या पेशवा म्हणून त्याचा उल्लेख मराठ्यांच्या इतिहासात केला जातो. सर ''रिचर्ड टेंपल''ने त्यांचा उल्लेख फायटिंग पेशवा म्हणून केला आहे. त्याने प्रचंड मोठा साम्राज्यविस्तार केला. चौथाई, सरदेशमुखीसाठी लढाया केल्या. त्यामुळे मराठी सत्तेचा वटवृक्ष सर्वत्र फोफावला. असे जरी असले तरी सततची युध्दे, लढाया यामुळे प्रचंड आर्थिक ताण छत्रपती आणि पेशव्यांना सोसावा लागला. दरम्यान त्याचा नर्मदा नदीकाठी रावेर येथे २८ एप्रिल १७४० रोजी मृत्यू झाला. अशा आकस्मिक घटनेमुळे मराठी शाहीवर मोठे संकट कोसळले. तेव्हा छ. शाहूंनी धोरणात्मक निर्णय घेऊन बाजीराव पेशव्यांचा मोठा मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांना पेशवाईची वस्त्रे दिली. अशा या बाळाजी बाजीराव पेशव्यांसमोर अनेक समस्या उभ्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे -

१) नादिरशहाने लुटलेल्या दिल्लीची व्यवस्था लावणे आवश्यक होते.

२) बाजीराव पेशव्याने सततच्या लढायामुळे प्रचंड कर्जाचा डोंगर व आर्थिक चणचण दूर करणे, शिवाय विस्कटलेली अर्थव्यवस्थेची घडी मजबूत करणे आवश्यक होते.

३) माळवा सनद मिळवून चौथाई सरदेशमुखीच्या माध्यमातून अर्थव्यवस्था सुरळीत करणे.

४) दक्षिण कर्नाटकातील नबाबांना वठणीवर आणणे आणि चौथाई, सरदेशमुखी वसूल करणे, राज्याची आर्थिक घडी बसविणे.

५) छ. शाहूंच्या दरबारातील विरोधकांचा बंदोबस्त करणे, अशा सर्व समस्यांवर बाळाजी बाजीरावाला पेशवा बनताच मात करणे आवश्यक होते. या समस्या सोडविण्यासाठी बाळाजी बाजीरावने आपल्या मुत्सद्देगिरीचा वापर केला. बाळाजी बाजीराव हा वडिलांप्रमाणे लढवय्य नव्हता तर मुत्सद्देगिरी-बाबतीत अव्वल होता, असे म्हणावे लागेल. छ. शाहूंची अर्थव्यवस्था मजबूत करून त्याने मराठी सत्तेचा जरीपटका उत्तर व दक्षिण भारतात फिरवला. अशा या बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कामगिरीचे दोन भाग दिसून येतात.

१) १७४० ते १८४८-४९ हा प्रारंभीचा कालखंड.

२) १७४९ ते १७६१ हा दुसरा कालखंड.

यापैकी पहिल्या काळात नानासाहेब पेशव्याने विरोधकांचे कारस्थान मोडून छ. शाहूंचा विश्वास संपादन केला. माळवा, बुंदेलखंड, गुजरात, दिल्ली, कर्नाटक इ. प्रांतातून खंडण्या वसूल केल्या. छ. शाहूंना झालेले कर्ज प्रामाणिकपणे फेडले. एवढेच नव्हे तर वडील बाजीराव यांनी केलेल्या युध्दामुळे झालेले प्रचंड कर्ज सावकार, व्यापारी यांचे देणे त्याने हे सर्व प्रश्न निकालात काढले. अशा रितीने पहिल्या सत्रामध्ये छ. शाहूंचा पूर्ण विश्वास संपादन करून प्रामाणिकपणे छ. शाहूंच्या आज्ञेचे पालन केले. छ. शाहूने टाकलेला विश्वास सार्थ करून दाखविला. इतर अनेक सावकारांची देणी फेडून टाकली. त्याचबरोबर दक्षिण आणि उत्तर भारतामध्ये मोठा साम्राज्य विस्तार निर्माण करून भारतात एक प्रबळ सत्ता निर्माण केली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

नानासाहेब पेशवे यांनी आपल्या दुसऱ्या कालखंडामध्ये छ. शाहूंच्या मृत्यूनंतर सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. आपला भाऊ रघुनाथराव दादा आणि मराठ्यांचे मातब्बर सरदार शिंदे होळकर यांच्या मदतीने उत्तरेत मराठ्यांचे पूर्ण वर्चस्व निर्माण केले. जणू मराठे त्या भागाचे, प्रांताचे किंगमेकर बनले. तर दक्षिणेत निजाम व इतर नबाबांच्यावर वचक निर्माण केला. अनेक नबाबांचा पराभव करून खंडण्या वसूल केल्या. राज्याची अर्थव्यवस्थेची दिशा निश्चित करून आर्थिक घडी, आर्थिक व्यवस्थापन निर्माण केले. शेती, उद्योग, व्यापार, महसूल, वतनदार, चौथाई, सरदेशमुखी इ. बाबतीत महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. रस्ते, हमरस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, पुण्याची नगररचना, शनिवारवाड्यात कात्रजचे पाणी, दळणवळण व्यवस्था या माध्यमातून सुधारणा केल्या. व्यापारी पेठा, बाजार, बागा, हॉटेल्स, सार्वजनिक ठिकाणे बनवून पुण्याची शान फक्त भारतातच नव्हे तर जगात नावलौकिकास आणली. एवढेच नव्हे तर खेळात व खेळण्याच्या नियोजन व्यवस्थेतही त्यांनी बाजी मारली होती. व्यायामासाठी त्यांनी जनतेस सुविधा निर्माण करून दिल्या होत्या. मल्ल विद्येला प्रोत्साहन दिले होते. तेव्हा अशा या महान पेशव्याने आपल्या एकवीस वर्षांच्या दीर्घ राजवटीत विशेषकरून आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या मराठी सत्ता स्वयंपूर्ण बनविली. जणू एक सुवर्णकाळ निर्माण करून पुण्याची आर्थिक भरभराट निर्माण केली. सातारा ऐवजी पुणे या शहराला त्यांनी राजधानी बनविले. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी केलेल्या अराजकीय दुर्लक्षित कार्याचा विचार या संशोधनामध्ये केला गेला आहे. त्यांच्या आर्थिक धोरणांचा साकल्याने विचार व्हावा म्हणून संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज वाटली. नानासाहेब पेशव्यांच्या प्रशासकीय आर्थिक अभ्यासाची समस्या निवडून एका दुर्लक्षित भागावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे केला आहे.

## २.२ संबंधित संदर्भ साहित्याचा हेतू

संबंधित साहित्याचा अभ्यास करण्याचा मुख्य हेतू म्हणजे नानासाहेब पेशवे यांनी आपल्या २१ वर्षाच्या कालखंडामध्ये मराठी सत्तेचा विस्तार केला. त्यांच्या राजवटीला स्थिरता मिळाल्यामुळे त्यांची आर्थिक धोरणे अभ्यासणे या मुख्य हेतूबरोबरच त्यांच्या राजकीय कार्यापेक्षा आर्थिक लष्करी आणि प्रशासकीय कामगिरी सर्वश्रेष्ठ आहे. त्याचा आजपर्यंत विचार झालेला दिसत नाही. केवळ पानिपतमुळे एक

अपयशी पेशवा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असले तरी त्यांची दुर्लक्षित झालेली अराजकीय आर्थिक कार्याची बाजू किती मजबूत होती, हे त्यांच्या आर्थिक धोरणांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. संबंधित साहित्याच्या अभ्यासामुळे पूर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा अभ्यास केला तर संशोधकाला पुढीलप्रमाणे फायदा होतो.

१) दुसऱ्या संशोधकाने या सारखाच प्रश्न कसा हाताळला आहे हे समजते.

२) समस्या कशी सोडवावी, कोणत्या पध्दती व तंत्रे वापरावीत, याची व्यवस्थित माहिती मिळते.

३) संशोधकाला माहीत नसलेली नवीन आधार सामग्री उपलब्ध होते.

४) पूर्वसंशोधकाला स्वतःच्या अभ्यासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजते व तत्सम प्रश्न सोडविण्यासाठी मदत होऊ शकते.

५) संशोधकाला त्याच समस्येच्या क्षेत्रात किंवा संदर्भात नवीन काय करण्याची गरज आहे, हे लक्षात येते.

६) स्वतःच्या संशोधन प्रबंधाचे मूल्यमापन इतरांच्या कार्याशी त्याची तुलना करता येते.

७) पूर्वीच्या झालेल्या संशोधन साहित्याच्या अभ्यासामुळे समस्येचे सुसूत्रीकरण करता येते.

८) संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग होतो.

## २.३ संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज

मराठी सत्तेच्या प्रचंड विस्ताराला कारणीभूत झालेल्या नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास केला असून, त्यांच्या दोन कालखंडातील आर्थिक कामगिरी महत्त्वाची ठरली आहे. तसेच संशोधनामध्ये पुणे व परिसर प्रामुख्याने सुपे, सासवड, बारामती व वाई या क्षेत्रातील आर्थिक घडामोडीशी निगडीत असणाऱ्या धोरणांवर प्रकाश टाकला आहे.

१) छ. शाहूंच्या हयातीत असताना १७४० ते १७४९

२) छ. शाहूंच्या मृत्यूनंतर कालखंड १७४९ ते १७६१

वरील दोन्ही कालखंडामध्ये नानासाहेब पेशव्यांनी केलेल्या लढाया, दक्षिण उत्तर भारतामध्ये मराठी सत्तेचा केलेला विस्तार यासाठी त्यांनी राबविलेली धोरणे प्रामुख्याने राजकीय धोरणापेक्षा आर्थिक धोरणांचा चिकित्सक विचार या संशोधनामध्ये केला

आहे. नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांचा व कामगिरीचा, प्रशासकीय कौशल्याचा परिचय करून घेण्यासाठी व अभ्यासासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. आजपर्यंत नानासाहेबांच्या राजकीय लढाया, धोरणे यांचा अभ्यास विद्यार्थी वाचकांसमोर मांडलेला दिसून येत असला तरी त्यांच्या राजकीय कारकिर्दीबरोबरच आर्थिक दृष्टीने केलेले नियोजन व सुधरणा या धोरणांचा चिकित्सक अभ्यास व्हावा या दृष्टीनेही हे संशोधन महत्त्वाचे वाटल्याने संशोधकाने नानासाहेब एक प्रशासक म्हणून त्यांच्या आर्थिक कार्याचा वेगळेपणा या संशोधनातून व्यक्त केला आहे.

## २.४ समस्येसंबंधित संशोधनाचा आढावा -

संशोधकाने समस्येसंबंधित इतर संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेतला आहे. नानासाहेब पेशवा यांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास या संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने आपले संशोधन विषया संदर्भातील सखोल माहिती अभ्यास करून घेणे आवश्यक आहे, हे त्यातून समजू शकेल. त्यामुळे समस्येची पुनरावृत्ती टाळता येईल. तसेच या अभ्यासामुळे संशोधकाला आपली समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, स्पष्टीकरण उपलब्ध होईल व संशोधन पध्दतीही निवडता येईल. संबंधित संशोधन हे नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील असून, नानासाहेब पेशवे यांनी शेती, उद्योग, व्यापार, वेगवेगळे व्यवसाय, इतर कारागिरी व सुधारणा करून आर्थिक व्यवस्थापन कसे केले, त्यांच्या कालखंडाला स्थिरता लाभल्यामुळे तत्कालीन त्यांच्या काळातील सावकार, व्यापारी, वतनदार त्यांच्याबरोबर त्यांचे सहसंबंध काय होते, हे तपासणे आवश्यक ठरते. नानासाहेब पेशव्यांनी शेतीच्या बाबतीत केलेल्या सुधारणा राबविलेली धोरणे आजच्या राज्यकर्त्यांना विचार करावयास लावणारी आहेत. महसूल विषयक धोरणांचा तर त्यांचा आदर्श सर्वांनीच घ्यावा, असे त्यांचे योगदान दिसून येते. आज्ञापालन काय, कसे व एक प्रशासकीय पेशवा या दृष्टीने त्यांच्या कार्याचे मूल्यमापन या संशोधनामध्ये केले गेले आहे.

नानासाहेबांनी सर्वत्र मराठी सत्तेचा दबदबा निर्माण केला. दक्षिण आणि उत्तर भारतात मराठ्यांची मोठी सत्ता निर्माण केली. पुणे शहराला राजधानी बनवून जगात नावलौकिक मिळवून दिला. चौथाई, सरदेशमुखीच्या बाबतीत त्यांचे धोरण अभ्यासणे

आवश्यक आहे. या सर्व आर्थिक घटकातून त्यांनी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित बसवलीच. अनेक सावकारांची देणी निकालात काढली. राज्यव्यवस्थेची विस्कटलेली घडी पुन्हा व्यवस्थित करवून घेतली. या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते. याचा फायदा निश्चितच इतिहासाचे अभ्यासक, वाचक, इतिहासकार विद्यार्थी संशोधकांना, विद्वानांना होईल. त्याचबरोबर या संबंधित संशोधनाचा अभ्यास करीत असताना संबंधित संशोधनाबाबत यापूर्वी कोणकोणत्या व्यक्तींनी अभ्यासकांनी संशोधकांनी काही संशोधन केले आहे का, किंवा काही लिखाण केले आहे का? याचाही आढावा या संशोधनामध्ये खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

संशोधकाचे नाव- जावळे एस. एस.
एम. ए. एम. फिल

संशोधनाचा विषय- पेशवेकालीन महाराष्ट्रातील धंदे व व्यवसाय
एम. फिल प्रबंध
सन १९८९

संशोधनाची उद्दिष्ट्ये-

१) पेशवे कालखंडातील पेशव्यांचे व्यवसायविषयक धोरणाचे महत्त्व स्पष्ट करणे.
२) पेशवे काळातील पेशव्यांचे उद्योगाबाबतचे धोरण उद्योगाभिमुख कसे होते, ते स्पष्ट करणे.
३) १७१३ पासून ते १८१८ पर्यंत पेशवे काळातील धंदे व व्यवसाय विषयक धोरणांचा सर्वांगीण आढावा घेणे.
४) सर्वच पेशव्यांचे धंदे व व्यवसाय धोरणांचा या संशोधनामध्ये आढावा घेणे.
५) पेशव्यांनी उद्योग व्यवसायासाठी केलेल्या सुधारणा, सवलती व कामगिरीची माहिती स्पष्ट करणे.
६) पेशव्यांनी धंदे-व्यवसायासाठी घेतलेले धोरणात्मक निर्णय व सुधारणांचा मागोवा घेणे.
७) पेशवे कालखंडातील धंदे व व्यवसायविषयीची माहिती इतर अभ्यास व संशोधक यांच्यासमोर ठेवणे.

निष्कर्ष-

१) पेशवे काळातील उद्योगधंदे व व्यवसायाचे महत्त्व या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

२) पेशवे कालखंडात कोणकोणते व्यवसाय केले जात होते, याची माहिती या संशोधनातून समाजाला व इतिहासाच्या वाचकांना समजली.

३) पेशवे कालखंडातील वेगवेगळे व्यवसाय, वेगवेगळ्या जमाती कशा प्रकारे करीत होत्या, याची माहिती या संशोधनातून समजली.

४) पेशवे कालखंडातील वेगवेगळ्या उद्योगांची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

५) या संशोधनातून पेशवे काळातील धंदे व व्यवसाय, त्याचबरोबर पेशव्यांनी या संदर्भात केलेल्या कार्याची माहिती इतिहास अभ्यासकांना या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

७) पेशव्यांनी धंदे व व्यवसायासंदर्भात घेतलेले धोरणात्मक निर्णय आर्थिक बाबींशी असणाऱ्या गोष्टी व महत्त्व या दृष्टीने वरील संशोधन महत्त्वपूर्ण ठरले आहे.

८) पेशव्यांचे धंदे, व्यवसायविषयक निती व्यवसायासाठी त्यांनी तयार केलेल्या बाजारपेठे, रस्ते व इतर सुधारणांची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

९) पेशवाईची सुरुवात १७१३ पासून सुरू होते ते १८१८ पर्यंतच्या कालखंडात पेशव्यांनी महाराष्ट्रातील धंदे, व्यवसायविषयक केलेल्या सर्वांगीण कार्याचा आढावा कसा घेतला ते या संशोधनातून स्पष्ट झाले.

१०) पेशव्यांनी महाराष्ट्रातील व्यवसाय व धंद्यासाठी दिलेल्या सवलतींची माहिती या संशोधनातून मिळाली आहे.

११) पेशवेकाळात महाराष्ट्रात वेगवेगळे कारागीर, वेगवेगळे व्यावसाईक, त्यांचे जीवनमान कसे होते इत्यादी माहिती संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

२) संशोधकाचे नांव - कदम प्रतिमा एस.

एम. ए. एमफिल

संशोधनाचा विषय - छत्रपती ऑफ सातारा (१७०७-१८१८)

एम. फिल प्रबंध

संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१) छ. संभाजीचा मुलगा मराठ्यांचा खरा वारसदार या दृष्टीने छ. शाहूंचे महत्व स्पष्ट करणे.

२) मुघलांच्या कैदेतून छ. शाहूंची कशी सुटका झाली आणि महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वप्रथम त्याला कोणत्या संकटाला सामोरे जावे लागले, त्याचा शोध घेणे.

३) छ. शाहूंच्या कामगिरीची माहिती इतिहास अभ्यासकांसमोर वाचकांसमोर आणणे.

४) छ. शाहू आणि मोघल यांचे संबंध या संशोधनातून स्पष्ट करणे.

५) छ. शाहू व महाराणी ताराबाई यांचा संघर्ष आणि यादवीचा आढावा घेणे.

६) छ. शाहूने सातारा ही राजधानी ठिकाण बनविले. या दृष्टीने साताराचे महत्त्व वाढले. त्याचा शोध घेणे.

७) १७०७ पासून म्हणजेच छ. शाहूंच्या सुटकेपासून ते १७४९ पर्यंत म्हणजे छ. शाहूंच्या मृत्यूपर्यंत छत्रपती या नात्याने छ. शाहूने केलेल्या सर्वांगीण कार्याचा आढावा या संशोधनामध्ये घेणे.

८) छ. शाहूंचे आणि त्याच्या सरदाराचे सहसंबंध स्पष्ट करणे या दृष्टीने छ. शाहूंचे धोरण अभ्यासणे.

९) छ. शाहू व त्यांचे प्रधान म्हणजे पेशवे यांच्या संबंधाचा आढावा घेणे.

निष्कर्ष -

१) स्वराज्याचा खरा वारसदार छ. शाहू आहे. तो तोतया नाही या दृष्टीने या संशोधनामध्ये छ. शाहूंचे महत्त्व स्पष्ट करणे.

२) छ. शाहूंनी केलेल्या कामगिरीची माहिती या संशोधनातून मिळाली आहे.

३) छ. शाहू हा मनमिळाऊ स्वभावाचा होता. त्यांनी केलेली प्रारंभीक कामगिरी या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

४) छ. शाहू औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलांच्या अंकित बनून महाराष्ट्रामध्ये परत आल्यानंतर छ. शाहूंचे आसन स्थिर कसे झाले, याची माहिती या संशोधनातून समजली आहे.

५) छ. शाहूने आपल्या सरदारांचे संघटन कसे केले, याची माहिती या संशोधनातून मिळाली.

६) छ. शाहूंनी दिल्लीच्या राजकीय उठावात पेशवा बाळाजी विश्वनाथ मार्फत सय्यद बंधुंना मदत करण्यास कशा पध्दतीने पाठविले इ. सर्वांगीण माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

७) छ. शाहू व महाराणी ताराबाई संघर्ष यामध्ये महाराणी ताराबाई ही कोल्हापूर येथे तर छ. शाहू सातारा येथे अशा मराठ्यांच्या दोन राजधान्या निर्माण झाल्या, याची माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

८) छ. शाहूने महाराणी ताराबाईंचा व इतर सरदारांचा कसा बंदोबस्त केला, याची माहिती या संशोधनातून समजली.

९) छ. शाहूने आपली राजधानी सातारा बनवून सरदारांचे केलेले संघटन १७०७ पासून ते १७४९ पर्यंत छ. शाहूंच्या कालखंडाचा सर्वांगीण आढावा या संशोधनातून घेतला आहे. छ. शाहूंची परिपूर्ण कामगिरीचा शोध या संशोधनातून स्पष्ट होतो.

१०) छ. शाहूंचे पेशवा बाळाजी विश्वनाथ, पेशवा बाजीराव पहिला आणि पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याबद्दलची आस्था व विश्वास या संशोधनातून स्पष्ट झाला आहे.

३) संशोधकाचे नांव- कांबळे आर. एच.

एम. ए. एम. फिल

संशोधनाचा विषय- Expanssion of Maratha Power History of the early Phase (Ph. D.) प्रबंध

संशोधनाची उद्दिष्ट्ये-

१) मराठी सत्तेचा विस्तार पेशवा बाजीराव पहिल्याने कसा केला, त्याच्या कामगिरीचा शोध घेणे.

२) मराठी सत्तेच्या विस्तारास बाजीराव पहिला कितपत कारणीभूत होता, हे स्पष्ट करणे.

३) बाजीराव पेशव्याने उत्तरेकडील माळवा, बुंदेलखंड, गुजरात, दिल्ली येथे दिलेली धडक इ. कामगिरीचा आढावा घेणे.

४) बाजीराव पेशव्याचे उत्तरेकडील धोरण अभ्यासणे आणि त्याने निर्माण केलेली उत्तरेकडील सरदार घराण्यांच्या कामगिरीचा शोध घेणे.

५) बाजीराव पेशव्याने कर्नाटकातून आणलेल्या चौथाई सरदेशमुखी सनदांचा आढावा घेणे.

६) बाजीराव पेशव्याने पालखेड आणि भूपाळ या दोन लढाईत मराठ्यांचा १८ व्या शतकातील प्रबळ शत्रू निजाम याचा केलेला पराभव व युध्दे यांची माहिती घेणे.

७) बाजीराव पेशव्याने वसई येथे पोर्तुगीजांचा केलेला पराभव तर जंजिरा येथे सिद्यांचा कसा बंदोबस्त केला याचे अवलोकन करणे.

८) बाजीराव पेशवे व बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल यांच्या संबंधाचा आढावा घेणे.

निष्कर्ष -

१) मराठी सत्तेचा विस्तार खऱ्या अर्थाने पेशवा बाजीराव पहिल्याने केला, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

२) मराठी सत्तेच्या विस्तारास सर्वांगीण म्हणून बाजीराव पेशवे कारणीभूत होते या संशोधनातून स्पष्ट झाले.

३) छ. शिवाजी महाराजांच्या नंतर मराठ्यांच्यात पराक्रमी एक लढवय्या पेशवा म्हणून बाजीराव पेशव्यांचा उल्लेख या संशोधनातून स्पष्ट होतो.

४) बाजीराव पेशवे यांनी माळवा, बुंदेलखंड, गुजरात या भागातून चौथाई, सरदेशमुखी कशी आणली आणि छ. शाहूंच्या राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसविण्याचा प्रयत्न केला आहे, याची माहिती या संशोधनातून मिळते.

५) बाजीराव पेशव्याने उत्तरेकडे प्रचंड साम्राज्य विस्तार करून सरदार घराणी निर्माण केली. त्याला बृहन्महाराष्ट्राचा निर्माता असे म्हणतात, असे संशोधनातून निष्कर्ष निघतो.

६) बाजीराव पेशव्याने कर्नाटकातील कनकगिरी, चित्रदुर्ग, सावनूर या मोहिमांमधून चौथाई, सरदेशमुख तेथील नबाबांकडून वसूल केली, याची माहिती या संशोधनातून अभ्यासकाला आढळून आली.

७) बाजीराव पेशवे लष्करीदृष्ट्या मजबूत होते, हे त्यांनी पालखेड येथे निजामावरील मिळविलेला अप्रतिम विजय होता. तर भूपाळच्या लढाईत निजामाचा केलेला

पराभव हा बाजीरावच्या लष्करी कर्तृत्वाचा विचार करावयास लावणारा होता, हे या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

८) बाजीराव पेशव्यांनी वसई येथे चिमाजी आप्पाच्या सहाय्याने पोर्तुगीजांना वठणीवर आणले तर स्वतः परकीय सत्ता सिद्यांचा बंदोबस्त केला. याचा आढावा या संशोधनातून मिळतो.

९) बाजीराव पेशवे व बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याची त्याने मुघल सुभेदार बंगश याच्या तावडीतून कशी सुटका केली, त्याचबरोबर छत्रसाल राजाने बाजीराव पेशव्याला आपला तिसरा मुलगा मानून रूपवती मस्तानी भेट दिली, याची परिपूर्ण माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

९) बाजीराव पेशवे व छ. शाहू यांच्या संबंधाचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. त्याचबरोबर पुढील पेशवा नानासाहेब यांच्या कामगिरीचा मूलभूत पाया बाजीराव पेशव्याने स्वतःच्या कर्तबगारीने रचला हे या संशोधनातून पुढे येते.

४) संशोधकाचे नांव - देखणे के. डी.
पीएच. डी. प्रबंध

संशोधनाचा विषय - Agrarian System in Maharashtra
Under the Peshwas 1982
(Ph. D.) प्रबंध

उद्दिष्ट्ये -

१) पेशवे कालखंडातील शेती व्यवस्थेची माहिती स्पष्ट करणे.

२) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील शेती, महसूल या बाबतीत पेशव्यांच्या धोरणांचा मागोवा घेणे.

३) साधारणपणे १७१३ पासून पेशवे कालखंड सुरू झाला असला तरी पहिले दोन पेशवे सोडले तर मराठी राज्याला स्थिरता नानासाहेब पेशवे यांच्या कालखंडापासून झाली, असेच म्हणावे लागते. तेव्हा शेती व इतर धोरणांच्या भूमिकेचा सर्वांगीण आढावा घेणे.

४) पेशव्यांच्या साम्राज्य विस्तारापाठीमागची भूमिका स्पष्ट करणे.

५) महाराष्ट्रामध्ये पेशव्यांनी शेतीविषयक राबविलेल्या धोरणांचा साकल्याने विचार करणे.

६) महाराष्ट्रातील सर्वच पेशव्यांचे शेतीबाबतीतील धोरण व केलेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

निष्कर्ष -

१) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील शेती पध्दतीची आणि शेती व्यवस्थेची माहिती सविस्तरपणे स्पष्ट केली आहे.

२) पेशवे कालखंडातील जमीन महसूल व्यवस्थेची माहिती स्पष्ट झाली आहे.

३) पेशव्यांचे महसूल आकारणीबाबतचे धोरण स्पष्ट झाले आहे.

४) पेशव्यांनी शेती व महसूल अर्थव्यवस्थेच्या अंगांना कसे महत्त्व दिले व राज्याच्या अर्थव्यवस्थेची घडी सुव्यवस्थित बसवली या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरले आहे.

५) १७१३ पासून ते १८१८ पर्यंत हा पेशवे काल महाराष्ट्रातील एक सुवर्णकाळ समजला जात असला तरी काही ठराविक पेशव्यांनी राज्याला स्थिरता प्राप्त करून दिल्याने शेती पध्दतीतील महत्त्वाच्या बाबींचा विचार या संशोधनातून समजतो.

६) महाराष्ट्रातील शेतीपध्दतीत पेशवे किती दक्ष होते, आपल्या अधिकाऱ्यांना त्यांनी महसूल आकारणी व शेती बाबतीत केलेल्या सूचनांवरून या संशोधनात स्पष्ट होते.

७) परंपरेनुसार भारताचा मुख्य व्यवसाय शेती म्हणूनच या अर्थव्यवस्थेच्या महत्त्वपूर्ण घटकाकडे पेशव्यांनी प्रामाणिकपणे लक्ष दिल्याचे या संशोधनातून लक्षात येते.

५) संशोधकाचे नांव - गवळी पी. ए.
पीएच. डी. प्रबंध

संशोधनाचा विषय - Society and Social Disablitys under the Peshwas
(Ph. D.) प्रबंध

उद्दिष्टये-

१) पेशवेकालीन सामाजिक जीवन व परिस्थिती समजावून घेणे.

२) पेशवे काळात महाराष्ट्रातील सामाजिक जीवनामध्ये विविध वर्ग जातींचा दर्जा समजावून घेणे.

३) पेशव्यांचे कनिष्ठ वर्गासंबंधीचे धोरण समजावून घेणे.

४) पेशवे काळात सामाजिक जीवनातील चार वर्गाची समाजातील व्यवस्थेची माहिती स्पष्ट करणे.

५) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेमधील कनिष्ठ वर्गाचा दर्जा स्पष्ट करणे.

६) पेशव्यांचे जातीबाबतचे धोरण स्पष्ट करणे.

७) पेशवे काळातील महाराष्ट्रातील जातीव्यवस्थेची माहिती वाचक व अभ्यासकांच्या समोर आणणे.

निष्कर्ष -

१) पी. ए. गवळी यांनी आपल्या संशोधनातून महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाची माहिती स्पष्ट केली आहे.

२) संशोधकांनी या संशोधनातून कनिष्ठ वर्गाला दिल्या जाणाऱ्या वागणुकीबाबतचा विचार स्पष्ट केलेला दिसतो.

३) पेशवे काळामध्ये सामाजिक जीवनातील चार वर्गाचे महत्त्व स्पष्ट करून, त्यांचा समाजातील दर्जा कसा होता याची माहिती मिळते.

४) पेशव्यांनी कनिष्ठ जातीविषयीचा दृष्टीकोन कसा ठेवला, परिणामी जातीभेदाची भावना कशी वाढली या दृष्टीने संशोधनात संशोधकाने मांडलेली भूमिका सडेतोडपणे समजून आली आहे.

५) पेशवे कालखंडातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेची माहिती स्पष्ट करून पेशव्यांचा कनिष्ठ वर्गाबद्दलचा सर्वांगीण आढावा या संशोधनातून घेण्यात आला आहे.

६) पेशवे काळात सामाजिक जीवनात कनिष्ठ जातींना तुच्छ लेखले जात होते. त्यांच्यावरील जाचक बंधने, अटी इ. बाबतीविषयी या संशोधनातून स्पष्ट होते.

७) पेशवे काळात सामाजिक जीवनाबरोबर राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात या चार वर्णांना करावी लागणारे कार्ये कोणत्या जातीने कोणते कार्य करावे हे निश्चित ठरले असून, जातींच्या उतरंडीची माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

६) संशोधकाचे नाव- देशमुख दि. बा.

एम. फिल प्रबंध

संशोधनाचा विषय- पेशवेकालीन कोकण १७५६ ते १८१८

सन २०००

उद्दिष्ट्ये -

१) पेशव्यांचे कोकणविषयक धोरण अभ्यासणे.

२) पेशव्यांचे कोकणामधील लोकांविषयी संबंध स्पष्ट करणे.

३) पेशवे यांनी कोकणातील अधिकाऱ्यांना कोकणाच्या संरक्षणासाठी दिलेल्या धोरणांचा पाठपुरावा करवून घेणे.

४) पेशवे काळामध्ये पेशव्यांनी कोकणातील वतनदार, देशमुख, जहागीरदार, यांचे बाबतीतील धोरणांचा विचार स्पष्ट करणे.

५) १७५६ ते १८१८ या काळातील पेशव्यांच्या सर्वांगीण कोकणविषयक धोरणांचा आढावा घेणे.

६) महाराष्ट्रात १७५६ मध्ये पुणे येथे नानासाहेब पेशवे हे सत्तेवर होते, हा कालखंड अमर्याद सत्तेचा काळ होता. या काळातील नानासाहेब पेशवे यांचे कोकणविषयक धोरण समजावून घेणे.

उद्दिष्टे -

१) पेशव्यांनी कोकण हा मराठी राज्यातील महत्त्वाचा भाग मानला होता. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने कोकण भागाचे पुष्कळ महत्त्व होते, हे त्यांनी जाणले होते हे समजते.

२) कोकणातील सर्वच हालचालीकडे पेशव्यांनी प्रामाणिकपणे लक्ष दिल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते.

३) देश व कोकण हे राज्याचे दोन भाग होते. या दोन्ही भागावर पेशव्यांनी आपली पकड घट्ट केली होती हे या संशोधनावरून लक्षात येते.

४) पेशव्यांनी कोकणातील घोणसरी, कुडाळ या समृध्द भागाकडे लक्ष दिल्याचे स्पष्ट होते.

५) पेशव्यांनी खेमा सावंत याच्या राष्ट्रविरोधी कारवायांना आळा घातला. कोकणातील अनेक बंडखोरांना वठणीवर आणून कोकण भागात शांतता, सुव्यवस्था निर्माण केली, हे या संशोधनातून समजून येते.

६) १७५६ मध्ये महाराष्ट्रातील पुणे येथे नानासाहेब पेशवे हे प्रमुख होते. त्यांनी कोकणातील आणि कोकण जवळील सर्व प्रदेशावर प्रामाणिक अधिकारी नेमून कोकणी समाजाला दिलासा मिळवून दिला, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

७) कोकण या राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे भाग आहे, परकीय सत्ता सिद्दी पोर्तुगीज यांना वठणीवर आणण्यासाठी त्याचबरोबर तेथील स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी पेशव्यांनी कोकण भागावर विशेष लक्ष दिल्याचे समजून येते.

८) १७५६ ते १८१८ या कालखंडातील पेशव्यांच्या कोकणविषयक सर्वांगीण धोरणांचा सर्वांगीण आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे.

९) पेशवे आणि कोकण तसेच कोकणी समाज, तेथील विविध व्यवसाय, रस्ते सुधारणा अशा विविध बाबींची माहिती या संशोधनातून समजून आली आहे.

## २.५ संबंधित संदर्भ साहित्याचा आढावा -

नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास या संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने समस्येसंबंधी संदर्भसाहित्याचा वापर केलेला आहे. आपल्या संशोधन विषयासंदर्भातील सखोल माहितीचा अभ्यास करून घेणे आवश्यक ठरते. कारण त्यामुळे आपण निवडलेल्या समस्येवर यापूर्वी उपाय शोधला आहे काय? हे त्यातून समजू शकेल. त्यामुळे पुनरावृत्ती टाळता येईल. तसेच समस्येसंबंधीत संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे संशोधकाला आपली समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, स्पष्टीकरण उपलब्ध होईल व संशोधनाची पध्दतही निवडता येईल.

संबंधित संशोधन हे नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधकाने या समस्येला महत्त्व दिले. या समस्येच्या माध्यमातून संशोधकाने नानासाहेब पेशवे यांनी आपल्या २१ वर्षाच्या दीर्घ राजवटीमध्ये

मराठी साम्राज्याचा विस्तार केलाच एवढेच नव्हे तर मराठे अजिंक्य आहेत, ही भावना शत्रुंच्या मनात निर्माण केली. हे करीत असताना नानासाहेब पेशव्यांनी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित निर्माण केली. अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीने प्रमुख असणारी महत्त्वाची अंगे त्यामध्ये, शेती, महसूल, उद्योग, व्यापार, चलन व्यवस्था, सावकारी, पतपेढी व्यवहार, वतनदारी पध्दती या अर्थव्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या विविध अंगांचा सांगोपांग विचार करून राज्याचे आर्थिक नियंत्रण सुस्थिर बनवले. या पूर्वीच्या पेशव्यांची संपूर्ण राजवट युध्द मोहिमा व धामधुमीत गेली. त्यामुळे राज्याला आर्थिक चणचणीला सामोरे जावे लागले. छत्रपती ही प्रमुख जबाबदारी पेलणारे शाहू राजे यांनाही आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले. या सर्व राज्यातील समस्या नानासाहेब पेशवे यांनी आपल्या प्रशासकीय मुत्सद्दगिरीने, कौशल्याने प्रामाणिकपणे सोडविल्या. या दृष्टीने संशोधकाने या समस्येचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक कागदपत्रे प्रामुख्याने पेशवे दप्तर, त्यामधील नोंदी आणि पेशवे कालखंडावरील विविध ऐतिहासिक लेखकांनी विचारवंतांनी लिहिलेली प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधने याचा अभ्यासासाठी वापर केला आहे. त्याचबरोबर संशोधकाने नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांची माहिती घेत असताना तत्कालीन विविध घराण्यांनी लिहिलेले लेख, पत्रे, नियतकालिके, रोजनिशी व दप्तरांचाही अभ्यास संशोधकाने केला आहे. संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने यापूर्वी कोणकोणत्या व्यक्तींनी संशोधन केले आहे, काही लिखाण केले आहे का? याचाही आढावा या संशोधनातून घेतलेला आहे. नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करीत असताना संशोधकाने प्राथमिक साधनांमध्ये प्रामुख्याने गो. स. सरदेसाई यांच्या रियासती, न्यू हिस्ट्री ऑफ मराठा, पेशवे दप्तर खंड ६, ३१, मराठी रियासती खंड ४, पारसनीस डी. बी. यांचे इतिहास संग्रह, अर्थविज्ञान, रा. ब. वाड- नानासाहेबांच्या रोजनिशी कैफयती व यादी (भाग १ ते ३), श्रीकृष्ण आठल्ये, हिंगणगावकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपंथांची बखर, अप्रकाशित साधने, न्या. रानडे एम. के. यांचे राईज ऑफ मराठा पॉवर, अ. रा. कुलकर्णी यांचे खंड, बॉंबे गॅझेट, गॅझेटियर ऑफबॉंबे प्रेसिडेन्सी भाग ३, खंड ९ व १०, खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, इतिहाससंग्रह भाग १ ते ७ पारसनीस संपादित- पेशवे दप्तर- ऐतिहास गोष्टी, चरित्रे, टिपणे व स्फुटनिका, ऐतिहासिक पत्रव्यवहार-

संपादक गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, य. मा. काळे, वि. का. राजवाडे यांचे मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १, २० व २२. तसेच प्र. न. देशपांडे- मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष, सेतू माधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द हिंदवी स्वराज्य व मोघल, त्र्यं. शं. शेजवलकर श्री शिवछत्रपती, पानिपत १९६१, निजाम पेशवे संबंध, न. र. फाटक- मराठी सत्तेचा उत्कर्ष, कृ. न. चिटणीस- मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था खंड १ ते ४, आपटे व ओतूरकर संपादक- महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, सावंत आणि जाधव- मराठ्यांचा प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक इतिहास, वा. कृ. भावे- पेशवेकालीन महाराष्ट्र, डॉ. वि. गो. खोबरेकर- मराठा अंमलाचे स्वरूप, ग. ह. खरे व अ. रा. कुलकर्णी- मराठ्यांचा इतिहास भाग १ ते ३, सदाशिव आठवले आणि प्र. ल. सासवडकर- मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, डॉ. प्रभाकर गद्रे- मराठी राज्य व मराठी लोक, महाले-पाठक- मराठी सत्तेचा इतिहास, पेशवे दप्तर क्र. १२, १३ व २८; पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, पुडके क्र. ४, पत्र क्र. ५३३-३४, ८२, ८३; छ. शाहू दप्तर पुडके क्र. १६, पत्र क्र. ८६७, गो. स. सरदेसाई संपादित- बाळाजी बाजीराव उत्तर हिंद, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई १९३२, पृष्ठ क्र. ३४, वा. सी. बेंद्रे, संपादित मराठ्यांच्या इतिहासाची साधने, सेतू माधवराव पगडी- मराठी व निजाम संबंध., आपटे द. ब.- लेखसंग्रह पुणे, प्रमोद ओक- पेशवे घराण्याचा इतिहास, गर्गे स. म.- मराठी रियासती, करवीर रियासती पुणे १९६८, दिघे वि. गो.- मराठ्यांच्या उत्तरेतील मोहिमा, देसाई सु. धा. - सोशल लाईफ इन महाराष्ट्र बॉम्बे १९८०, चाफेकर ना. गो.- बदलापूर पेशवाईच्या सावलीत, पुणे. पारसनीस द. ब.,- ब्रम्हेंद्र स्वामींचे चरित्र, त्याचबरोबर गाडगीळ ध. रा.- पुणे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे भाग १, गाडगीळ डी. आर.- पुणे शहरातील महाजन आणि नगरसेठ, जोशी शं. ना.- मराठेकालीन समाजदर्शन इत्यादी प्राथमिक साधनांचा अभ्यास करून संशोधकाने नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणावर त्याचप्रमाणे त्यांच्या प्रशासकीय कामगिरीवर प्रकाश टाकलेला आहे. दुय्यम साधनांमध्ये संशोधकाने बखरी, आज्ञापत्रे लेख आणि साहित्य या साधनांचा वापर केला आहे. महाजन टी. टी. यांचे इंडस्ट्री ट्रेड अँड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरीयड, पानिपत बखर, चिमाजी आप्पांचे चरित्र, चित्रगुप्तांची बखर यांचा वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर संशोधकाने मराठी

ग्रंथ, वाचन, लेखन प्रामुख्याने आपटे द. ब. यांचा लेखसंग्रह पुरंदरे पु. वा., चिमाजी आप्पांचे चरित्र, त्याचबरोबर निरीक्षण आणि वाचन करीत असताना कोश वाग्ङमयांचा वापर केला आहे. केळकर य. न. यांचे ऐतिहासिक शब्दकोश १, २ पुणे. चित्राव, सिध्देश्वर शास्त्री, मध्ययुगीन चरित्रकोश, जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वखंड कोश ४, दाते य. र.- महाराष्ट्र शब्द कोश पुणे, त्याचबरोबर संशोधकाने संशोधनात्मक मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके यांचाही वापर अभ्यासासाठी केला आहे. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १ ते १६, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, नियतकालिके, त्रैमासिके यांचा वापर संशोधकाने अभ्यासासाठी केला असून त्याचबरोबर इंग्रजी कागदपत्रांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये Choskey R. D.- Economic History of Bombay Deccan, Dighe V. G.- Bajirao I and Maratha Expansion Bombay, Duff Grant- History of the Marathas, Ranade M. G.- Introduction to Peswa's Dairies, Khare G. H- Select Articles Pune 1962, Sardesai G. S.- New History of Marathas Bombay 1971, Shina H. N.- Rise of Peswas Alahabad 1954, Sardesai G. S- I new History of the Marathas -II, Vol I, II,III., C. Kincaid and D. Parasnis- A History of Maratha people London 1918, Mahaja T. T.- Trade & Commerce during Peshwa period.

संशोधकाने नानासाहेब पेशवे यांच्या प्रारंभीची कारकीर्द १७४० ते १७४८ पर्यंतचा लष्करी मोहिमांचा वरील साधनांच्या आधारे आढावा घेऊन, नानासाहेबांच्या कर्तबगारी व मुत्सद्देगिरी, कौशल्याचा प्रारंभिक कामगिरीचा सत्तारोहन प्रसंगाची माहिती वरील कागदपत्रामधून संशोधकाने प्रबंधामध्ये वेचून घेतली आहे. त्याचप्रमाणे नानासाहेब पेशवे यांच्या दुसऱ्या कालखंडाची प्रामुख्याने छ. शाहूंच्या मृत्यूनंतर १७४९ ते १९६१ या काळातील त्यांच्या प्रशासकीय व आर्थिक घडामोडींवर प्रकाश टाकलेला आहे. छ. शाहू नंतर नानासाहेब पेशव्याने पुणे शहराला राजधानीचे स्वरूप प्राप्त करून देवून भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहासामध्ये पुण्याचे नाव सर्वात वरती आणून ठेवले आहे. हे करीत असताना त्यांनी शेती, उद्योग, व्यापार, वतनदारी पध्दती, सावकारी या सर्व अंगांना स्पर्श करून अराजकीय क्षेत्रामध्ये एक अव्वल दर्जाचा प्रशासक म्हणून सर्व पेशव्यांच्या मालिकेमध्ये नाव उमटविलेले दिसून येते.

## २.६ संदर्भ साहित्यामुळे झालेला फायदा

नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करीत असताना संशोधकाला नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक कामगिरीवर ठळक प्रकाश टाकता आला. नानासाहेब पेशव्याने राजकीय कार्याबरोबरच आपल्या २१ वर्षाच्या कारकिर्दीत राज्याची राजकीय घडी बसविली, एवढेच नव्हे तर आर्थिक घडीही सुस्थिर केली. पुणे या शहराला राजधानीचे स्वरूप प्राप्त करून दिले. पुण्याची भौगोलिक परिस्थिती पूर्ण विकसीत करून बदलून टाकली. पुण्याला सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त करून दिले. प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास करीत असताना संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला नानासाहेबांच्या प्रशासकीय कामगिरीची ओळख इतिहासाचे अभ्यासक, वाचक व तज्ञांना करून देता आली. संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे नानासाहेबांचे अप्रकाशित असणारे कार्य हे पानिपत प्रकरणामुळे झाकोळले गेले होते. त्याची प्रशासकीय मुत्सद्देगिरी रयतेच्या दृष्टीने किंवा शेतकऱ्यांच्या दृष्टीने असो अथवा राज्याच्या दृष्टीने असो, ही प्रशासकीय कर्तबगारी या संदर्भसाहित्याच्या अभ्यासामुळे इतिहासाच्या वाचक अभ्यासकांसमोर आणता आली. नानासाहेबांची महसूल व्यवस्था ही किती कौतुकास्पद आहे, याचे वर्णन डॉ. सेन यांनी The revenue policy of the peshwas was based on the princip[le of se-curing the prosperity of the tax-payer. करदात्यांची भरभराट हेच त्यांच्या महसूल पध्दतीचे मुख्य सूत्र होते. यावरून त्यांच्या शेतकऱ्यांच्याबद्दल धोरणांची दूरदृष्टी व तळमळ दिसून येते. वरील धोरणावरून आपल्याला असे जाणवते की शिवरायांचा शेतकऱ्यांबद्दलचा दृष्टीकोन भाजीच्या देठालाही कोणी हात लावू नये, हीच आठवण नानासाहेबांच्या महसूल धोरणातून स्पष्ट होते. शिवरायांच्या खालोखाल राज्यव्यवस्थेत सुधारणा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या नानासाहेब पेशव्यांनी केले, असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे नानासाहेबांच्या एकूणच अर्थ व्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या, शेती, उद्योग, व्यापार, सावकारी वर्ग, वतनदारी पध्दती, पेढी व्यवहार इत्यादींची इत्यंभूत माहिती इतिहासाच्या अभ्यासकासमोर संशोधकाने आणली आहे. याशिवाय खालील फायदाही संदर्भ साहित्यामुळे झालेला दिसतो.

१) संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला निवडलेल्या समस्येचे योग्य प्रकारे मूल्यमापन करता आले.

२) दुसऱ्या संशोधकाने यासारखाच प्रश्न कसा हाताळला आहे, याचा पडताळा करता येतो.

३) दुसऱ्या संशोधकाने या समस्येसारखाच प्रश्न कसा सोडवला हे समजून येते.

४) संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे समस्या कशी सोडवावी, कोणत्या पध्दती व कोणती तंत्रे वापरावीत, याची माहिती मिळाली.

५) संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला माहित नसलेली नवीन आधारसामग्री उपलब्ध झाली.

६) संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला स्वतःच्या अभ्यासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजते व तत्सम प्रश्न सोडवण्यासाठी मदत झाली.

७) संदर्भ साहित्यामुळे संशोधकाला त्याच समस्येच्या क्षेत्रात किंवा संदर्भात नवीन काय करण्याची गरज आहे, हे समजले.

८) संदर्भ साहित्यामुळे स्वतःच्या संशोधन प्रबंधाचे मूल्यमापन इतरांच्या कार्याशी त्याची तुलना करता आली.

९) संदर्भ साहित्यामुळे पूर्वी झालेल्या संशोधन साहित्याच्या अभ्यासामुळे समस्येचे सुसूत्रीकरण करता आले.

१०) संदर्भ साहित्याच्या अभ्यासामुळे संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग झाला. अशा रितीने संशोधकाने संदर्भ साहित्याच्या अभ्यासातून तसेच वेगवेगळ्या साहित्यातून आढावा घेऊन नानासाहेब पेशव्यांचे आर्थिक धोरण कसे उत्तम होते, हे स्पष्ट केले आहे.

## २.७ प्रस्तूत संशोधनाचे वेगळेपण -

प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास करत असताना संशोधकाने मराठ्यांच्या इतिहासामधील पेशवे कालखंडातील आर्थिक घडामोडीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. पेशवे कालखंडामध्ये बाळाजी विश्वनाथपासून ते बाजीराव पहिला आणि पेशवा नानासाहेब या कर्तबगार पेशव्यांच्या कर्तृत्वाचा साकल्याने विचार केला आहे. यामध्ये बाळाजी विश्वनाथ यांची कारकीर्द पहिला पेशवा या दृष्टीने छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यामध्ये गेली. काही प्रमाणातच आर्थिक सुधारणा करण्याचा प्रयत्न

या पेशव्यांनी केला. या पेशव्यांचा जास्तीत जास्त वेळ छत्रपतींच्या शाहूंच्या राजकीय घडामोडीत गेला. परिणामी आर्थिक घडी बसवता आली आणि पुढील काळात ती टिकवता आली नाही. बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये एक लढवय्या पेशवा यादृष्टीने बाजीराव पेशवे पुढे आले. मोठी राजकीय सत्ता निर्माण झाली. दक्षिण व उत्तर हिंद या दोन्ही भागामध्ये जवळजवळ सर्व भारतभर मराठी सत्तेचा दबदबा निर्माण झाला. यासाठी बाजीराव पेशव्यांना आपली संपूर्ण हयात युध्द मोहिमा आणि लढाया यामध्ये घालवावी लागली. यासाठी ही प्रचंड आर्थिक ताण सोसावा लागला. स्थिरतेच्या दृष्टीने त्यांची कारकीर्द दिसून आली नाही. मात्र त्यांच्यानंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये साधारणपणे त्यांच्या कर्तबगारीचे दोन कालखंड पडतात. १) १७४० ते १७४८ हा पहिला कालखंड तर २) १७४९ ते १७६१ हा दुसरा कालखंड. या दोन्ही कालखंडामध्ये नानासाहेब पेशव्यांची प्रारंभिक कर्तबगारी दिसून येते. या दुसऱ्या कालखंडामध्ये छ. शाहूंचा १५ डिसेंबर १७४९ मध्ये मृत्यू झाल्यामुळे नानासाहेब पेशव्यांना सर्वाधिकार प्राप्त झाले. परिणामी सातारा ऐवजी पुणे या शहराला राजधानीचे स्वरूप प्राप्त झाले. संपूर्ण देशाचे राजकारण पुण्यामधून होऊ लागले. या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी सरदारकीने काम करावे या तत्त्वाचा वापर करून उत्तर भारतामध्ये, दक्षिण भारतामध्ये मराठ्यांची अजोड सत्ता निर्माण केली. एवढेच नव्हे तर मराठे किंगमेकर बनले असे म्हटले तर वावगे ठरू नये. नानासाहेब पेशवे यांची कारकीर्द स्थिर स्वरूपाची व दीर्घ स्वरूपाची लाभल्यामुळेच शिवाय पहिल्या दोन पेशव्यांनी त्यांच्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेचा मूलभूत पाया रचल्यामुळे नानासाहेब पेशव्यांच्या कर्तबगारीमुळे सर्व भारतभर मराठी सत्तेचा बोलबोला झाला. नानासाहेब पेशव्यांनी पहिल्या कालखंडामध्ये प्रामाणिकपणे छ. शाहूंच्या राज्याची आर्थिक भरभराट केली. यासाठी नानासाहेब पेशव्यानी राबविलेली आर्थिक धोरणे महत्त्वपूर्ण ठरतात. नानासाहेब पेशवे यांच्याजवळचा मुत्सद्दीपणा, धोरणे ओळखून राबविण्याची पध्दत, दूरदृष्टीपणा तसेच प्रशासकीय बाणा यादृष्टीने त्यांची कारकीर्द सरस ठरली. पुणे आणि पुणे परिसराची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे. नानासाहेब पेशवे यांच्या शेती, उद्योग, व्यापार, महसूल व्यवस्था, वतनदार वर्ग या सर्व घटकांशी हे संशोधन निगडीत आहे. या सर्व घटकांशी त्यांचे धोरण, त्यांच्या योजना समजून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने या

प्रस्तूत संशोधनात त्यांच्या आर्थिक धोरणांचे वेगळेपण दिसून येत आहे. त्यांच्या कालखंडातील सर्वात दुर्दैवी घटना म्हणजे १४ जानेवारी १७६१ रोजी घडलेली पानिपतची घडलेली तिसरी लढाई एक पेशवा व सर्वांचा सर्वेसर्वा म्हणून त्यांना जबाबदार धरले जात असले तरी इतिहासाच्या अभ्यासकांना तत्कालीन परिस्थितीची जाणीव आहे ते समजून घेतील याबद्दल शंका नाही. रघुनाथरावांनी उत्तरेकडील राबवलेली धोरणे, त्यांच्या चुका या सर्वांचे खापर नानासाहेब पेशवे यांच्यावर फोडले जाते. पण पर्याय नाही. अशा या राजकीय कार्यातील पराभवाच्या दोषामुळे त्यांचे आर्थिक कार्य झाकोळले गेले होते. नानासाहेब पेशव्यांचा एका बाजूचा विचार करून चालणार नाही तर त्यांच्या कामगिरीच्या दुसऱ्या बाजूवर प्रकाश टाकला आहे, यातून संशोधनाचे वेगळेपण स्पष्ट होते.

## २.८ प्रकरण संदर्भ -


१) ओक डॉ. सुमन, शैक्षणिक तंत्र विज्ञान, विद्या प्रकाशन पुणे ३०

२) बापट भा. गो. : शैक्षणिक संशोधन, १९८३, नूतन प्रकाशन पुणे.

३) भिंताडे वी. रा. : संशोधन पध्दती, १९९९, नूतन प्रकाशन पुणे.

४) देशपांडे डॉ. प्रकाश, शिक्षणातील संज्ञापन व प्रकार

५) देशपांडे डॉ. प्रकाश व पाटोळे, डॉ. एन. के. १९९४, संशोधन पध्दती

६) गुढ सी. व्ही., डिक्शनरी ऑफ एज्युकेशन, एम.सी. गोएल कंपनी, न्यूयॉर्क

७) जोशी अनंत न., 'स्वरूप व आराखडा' संप्रेषण संशोधनाची प्रक्रिया

८) कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास, साधना परिचय,
कुलकर्णी म. रा. , डॉ. कुलकर्णी मा. रा., २००९ डायमंड प्रकाशन

९) एम. बी. बुश (व्हल्यूम १, २, ३, ४)

१०) मुळे रा. शं. व उमाटे वि. तु., शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, १९७७, नूतन प्रकाशन, पुणे.

११) पद्माकर प्रभुणे, महाराष्ट्रातील चलनांचा इतिहास

१२) पारसनीस द. ब., अनुवाद डॉ. देशपांडे सुरेश र., पेशवेकालीन पुणे,

१३) शेजवलकर त्र्यं. शं., (आ. स. १९६३) पेशवे निजाम संबंध

१४) सरदेसाई गो. स., १९४०, ऐतिहासिक लेखमाला भाग २

१५) सरदेसाई गो. स., नानासाहेब पेशवे चरित्र, (आ. स. १९२६)

१६) सरदेसाई गो. स., ऐतिहासिक पत्रबोध, १९३९

१७) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, मध्यभाग २, ३, ४ उतरविभाग १, २, ३

१८) सरदेसाई गो. स.-काळे या. मा., वाकसकर वि. स., काव्ये इतिहास संग्रह, ऐतिहासिक पत्रे

19) Aditham, Bhwangarao, Research methodology, txcal Book Pubication.

20) Goode W. and Hatt P. (1953) Methods in Scocial Research, Mc. Graw Hill Book Co.

21) Gupta Dr. Bhagwandas, Maharaja Chatrasal & his times.

22) Kothari C. R., Research methodology New Edge International Publication.

23) Lal-Jain & Vashistha, K. C. (2008) Teaching & Research Aptitude, Upkar Prakashan, Agra.

24) NCERT Research in Education, 1966, New Delhi.

प्रकरण ३

# संशोधनाची कार्यपध्दती

३.१ प्रस्तावना

३.२ शैक्षणिक संशोधनाच्या पध्दती

३.३ संशोधन पध्दतीचे वर्गीकरण

३.४ ऐतिहासिक संशोधनाचे स्वरूप व महत्त्व

३.५ ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या

३.६ ऐतिहासिक संशोधनाचे वर्गीकरण

३.७ वर्णनात्मक संशोधन पध्दती

३.८ नमुना निवड

३.९ साधन निवडीचे समर्थन

३.१० संबंधित संशोधनाची पूर्वपिठीका

३.११ प्रकरण संदर्भ

प्रकरण ३

# संशोधनाची कार्यपध्दती

## संशोधनाचा उपागम समर्थन व स्पष्टीकरण

## ३.१ प्रस्तावना -

संशोधनाला इंग्रजीमध्ये Research असे म्हणतात.

Research म्हणजे पुन्हा पुन्हा शोधणे

''अगोदर अस्तित्वात असलेल्या गोष्टी जगापुढे आणणे म्हणजेही संशोधन होय.''

दैनंदिन जीवनात आपण संशोधन करत असतो. उदा. एखादी वस्तू कोठे मिळेल, सर्वात स्वस्त कोठे मिळेल इ. बाबतीत आपण संशोधन करत असतो. शैक्षणिक क्षेत्रातही संशोधनाचा वापर आपण प्रभावी केला जातो. शैक्षणिक क्षेत्रातही समस्या सोडविण्यासाठी आपण संशोधन करतो.

**शैक्षणिक संशोधन**

**व्याख्या**

''शैक्षणिक क्षेत्रातील किंवा परिस्थितीमधील वर्तनाचे शास्त्र विकसित करण्याच्या हेतूने किंवा समस्या सोडविण्याच्या दृष्टीने वैज्ञानिक विचार पध्दतीने केलेले उपयोजन म्हणजे शैक्षणिक संशोधन होय.''

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात शैक्षणिक संशोधनाचा प्रारंभ झाला. प्रथम मानसशास्त्र, नंतर तत्त्वज्ञान व त्यानंतर समाजशास्त्राचा प्रभाव शैक्षणिक संशोधनावर पडलेला दिसून येतो.

## ३.२ शैक्षणिक संशोधनाच्या पध्दती-

शैक्षणिक संशोधन हे गरजाधिष्ठीत संशोधन आहे. संशोधन हे शास्त्रशुध्द पध्दतीने केले जाणे अपेक्षित आहे. संशोधनाची पध्दती कोणती असावी हे समस्येचे स्वरूप परिस्थिती यावर अवलंबून असते.

**शैक्षणिक संशोधन पध्दती**

**अ) ऐतिहासिक संशोधन पध्दती** | **ब) वर्णनात्मक संशोधन पध्दती** | **क) प्रायोगिक पध्दती**

१. जीवनचरित्रे

२. शैक्षणिक विचार प्रवाहांचा अभ्यास

३. वैज्ञानिक संशोधन

४. संदर्भ संशोधन ग्रंथ संशोधन

१. सर्व्हेक्षण

२. व्यक्तिअभ्यास

३. तौलनिक कार्यकारण

४. तीर्थक संस्कृती व तौलनिक अभ्यास

५. वांशिक अभ्यास

६. सहसंबंध व पूर्वानुभव

७. दस्तऐवज पृथ्थकरण

## ३.३ संशोधन पध्दतीचे वर्गीकरण-

संशोधनाची उद्दिष्ट्ये, माहिती संकलनाचे तंत्र, नियंत्रण तंत्र, साधने, क्षेत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात येते. खालील तीन गटात केलेले वर्गीकरण सर्वमान्य आहे. प्रामुख्याने

अ ) प्रायोगिक संशोधन पध्दती -

ब) सर्वेक्षण संशोधन पध्दती -

क) ऐतिहासिक संशोधन पध्दती -

अ) प्रायोगिक पध्दती -

प्रायोगिक संशोधनात प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला जातो. ही पध्दत वैज्ञानिक असून तिचा संशोधनात उपयोग होतो. वैज्ञानिक पध्दतीवर ती आधारित जरी असली तरी तिचे वैशिष्ट्य प्रयोग हे आहे. विशिष्ट घटकांचा उपयोग केला असता विशिष्ट

परिणाम दिसतात, या परिकल्पनेचे निव्वळ परिक्षण येथे अपेक्षित नसून इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगाने कोणता बदल घडून येतो हे पाहण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर आवश्यक मानला जातो. जॉन स्टुअर्ट मिल यांचा एकचल सिध्दांत हा प्रायोगिक पध्दतीचा पाया आहे. त्यांच्या मते ''दोन परिस्थितीमध्ये सर्व बाबतीत साम्य आहे अशा वेळेस त्यापैकी एका परिस्थितीमध्ये एक घटक वाढविला किंवा एक घटक कमी केला असता व दुसरी परिस्थिती तशीच ठेवली तर जो फरक दिसून येतो त्यास तो वाढलेला किंवा कमी झालेला घटक जबाबदार असतो.''

ब) सर्वेक्षण पध्दती-

चिकित्सा सर्वेक्षण पध्दती- शैक्षणिक संशोधन संशोधनात अत्यंत महत्त्वाची सर्वेक्षण पध्दती असून या पध्दतीचा विशेष प्रमाणात उपयोग करून घेण्यात आला आहे. सर्वेक्षण म्हणजे चिकित्सक पाहणी होय. Sur म्हणजे वरून व Veoir म्हणजे पाहणे. तटस्थपणे पाहणे, बारकाईने पाहणे म्हणजे सर्वेक्षण होय.

वेबस्टर विश्वकोष -

''अचूक माहिती देणारी चिकित्सक पाहणी म्हणजे सर्वेक्षण होय''

''विशिष्ट ठिकाणच्या परिस्थितीचा केलेला अभ्यास म्हणजे सर्वेक्षण होय''

सर्वेक्षणाचे प्रकार-

१) शालेय सर्वेक्षण

२) लोकमत सर्वेक्षण

३) सामाजिक सर्वेक्षण

या संशोधनाच्या काही पध्दती असून ऐतिहासिक पध्दतीचे संशोधन करत असताना होवून गेलेल्या घटकांचा अभ्यास करणे हेच तत्त्व ऐतिहासिक संशोधन पध्दतीत लागू पडते.

अ) ऐतिहासिक संशोधन पध्दती-

ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्ट, वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ

म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय. ऐतिहासिक संशोधन भूतकाळाचा विचार करते. इतिहासाच्या अभ्यासक संशोधकांना घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती उपयुक्त ठरते.

## ३.४ ऐतिहासिक संशोधनाचे स्वरूप आणि महत्त्व-

इतिहास हा शब्द भूतकाळात घडलेल्या घटनांचा संदर्भात उपयोगात आणला जातो. भूतकाळाचे यथार्थ ज्ञान म्हणजे इतिहास होय. इतिहास लेखक गतकालीन घटनांचा मागोवा घेत असतात. त्यांचे सम्यक्‌दर्शन घडवीत असतो. त्यामुळे ऐतिहासिक संशोधनामध्ये भूतकाळातील घटनांचे यथार्थ दर्शन होत असते. *भूतकालीन घटनांचे वर्णन, विश्लेषण आणि पृथ्थकरण करण्याकरिता शास्त्रीय पध्दतीचे उपयोग करणे म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय.*

मानवी जीवन विकसनशील असून आजचा मानव शतकानुशतके विकसनाचा, उत्क्रांतीचा परिपाक आहे. मानवाची आजची स्थिती समजून घेण्याकरिता ज्या स्थित्यंतरातून त्याला जावे लागते, ती स्थित्यंतरे समजून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय आजचा मानव समजून घेता येणार नाही. राष्ट्र समाज, संस्था, मतप्रणाली आणि व्यक्ती या सर्वांच्या बाबतीत हे खरे आहे. भिन्न भिन्न परिस्थितीत झालेले बदल थोर विचारवंतांच्या विचारांचा त्यावर पडलेला प्रभाव जनतेच्या आकांक्षांचे उठलेले प्रतिबिंब समजून घेतल्याशिवाय आजची शिक्षण प्रणाली कशी उत्क्रांत होत गेली, हे समजणार नाही. त्यासाठी भूतकाळाकडेच धाव घ्यावी लागेल.

इतिहास म्हणजे नुसती घटनांची जंत्री नव्हे तर इतिहासात जिवंतपणा व चैतन्य असते. वर्तमान घटनांचे धागे इतिहासात गुरफटलेले असतात. इतिहास म्हणजे निव्वळ राजकीय इतिहास नव्हे तर राजांची चरित्रे, त्यांनी केलेल्या लढाया, त्या काळातील घटना म्हणजे इतिहास नव्हे. इतिहासामध्ये याशिवाय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक अशा अनेक बाबींचा समावेश असतो. समाजाच्या वर्तमान चालीरिती, आचार, व्यवहार, रुढीसंकेत समजून घ्यायच्या असतील तर त्यांचा भूतकालीन इतिहास समजून घेणे आवश्यक असते. वर्तमान समजून घेणे एवढाच इतिहासाचा हेतू नाही. वर्तमान स्थितीवरून भविष्यकालीन स्थितीचे पूर्वज्ञान मिळण्याकरिता इतिहासाची गरज असते. भूतकालीन अनुभव, भविष्यकाळासंबंधी अनुमान करत

असताना मार्गदर्शन ठरत असतो. वर्तमानाचा अर्थ लावण्याकरिता आणि भविष्याचा अंदाज घेण्याकरिता इतिहास उपयुक्त आहे. म्हणून इतिहासाची यथार्थता ओळखण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती महत्त्वाची ठरते.

ऐतिहासिक संशोधनाचे महत्त्व -

विविध वर्तमान समस्यांची उकल करण्याकरिता त्याची पार्श्वभूमी स्पष्ट होण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक संशोधन महत्वाचे आहे. तत्त्वज्ञान, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, शैक्षणिक प्रशासन, प्रौढ शिक्षण, ग्रामीण शिक्षण अशा अनेक क्षेत्रात इतिहासाशिवाय वर्तमान स्थिती समजू शकणार नाही. म्हणूनच इतिहासामध्ये ऐतिहासिक संशोधनाला महत्त्वाचा स्थान आहे.

नाईट या विचारवंताने स्पष्ट केलेले शैक्षणिक इतिहास संशोधनाचे महत्व अधिक सुस्पष्ट व यथार्थ आहे. गुड, बार आणि स्केट्स या विचारवंतांनीही आपल्या ग्रंथात ऐतिहासिक संशोधनाचे महत्व स्पष्ट केले आहे. त्याचा खालीलप्रमाणे -

१) शाळा आणि शैक्षणिक संस्थांच्या इतिहासाचे ज्ञान हा शिक्षक आणि प्रशासक यांच्या व्यवसाईक शिक्षणाचा एक मुख्य भाग आहे.

२) शाळेचे कार्य परंपरागत असते. शिक्षक, प्रशासक यांच्या कार्याचे स्वरूप प्रतिबंधात्मक आणि परिचित पध्दतीच्या बाबतीत गैरसमज वाढविणारे असू शकते. अशा वेळी गैरसमज दूर करण्याकरिता ऐतिहासिक संशोधन हे त्यावरील प्रभावी उत्तर आहे.

३) ऐतिहासिक शिक्षणामुळे विविध प्रकारचे अवडंबर, चमत्कारिक पध्दती समजून येतात. समस्यांची वाढ कशी झाली हे स्पष्ट होते. एवढेच नव्हे तर सामाजिक संस्थांची कार्ये कशी बदलत गेली, शिक्षणाचा आधार आणि नियंत्रण साध्य व स्थानिक व्यवस्थेतून केंद्रीत पध्दतीने कसे बदलत गेले हे स्पष्ट होते. शास्त्रीय अध्ययनासाठी ऐतिहासिक संशोधन अत्यंत महत्वाचे आहे. म्हणूनच असे म्हणतात ऐतिहासिक संशोधन ही विद्वत्तेविषयी आदर आणि थोर गुरुविषयी श्रध्दा निर्माण करणारे माध्यम आहे.

## ३.५ ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या -

१) समस्येचे स्वरूप स्पष्ट करणे

२) माहिती संकलन करणे

३) संकलित माहितीची बाह्य व आंतरिक मीमांसा करणे

४) संकलित माहितीचे संयोजन व अर्थनिर्वचन करणे

५) अहवाल लेखन

**१) समस्येचे स्वरूप स्पष्ट करणे -**

ऐतिहासिक संशोधनाचा प्रारंभ समस्येच्या योग्य निवडीपासून होतो. समस्येची निवड काळजीपूर्व करणे आवश्यक आहे. समस्येचे महत्त्व पाहून चालत नाही तर समस्येविषयी पुरेशी माहिती मिळू शकेल काय? याचा विचार होणे आवश्यक आहे. समस्या पूर्व संशोधनाचा अहवाल, संशोधन पत्रिका यांचे वाचन आणि चिंतन अनुभव यातून सुचते. पूर्वी झालेल्या संशोधनाच्या परिचयामुळे नवीन समस्या सुचून संशोधनाची दिशा स्पष्ट होते. समस्या निवडीमध्ये शब्दांकनाला महत्व आहे. म्हणजे समस्या मोजक्या व नेमक्या शब्दात स्पष्ट करणे होय. त्यामुळे संशोधनाचे कार्य सुकर होते.

**माहिती संकलन करणे -**

प्रायोगिक संशोधनात निष्कर्ष काढण्याकरिता निवडक निरीक्षणे पुरेशी असतात. तसे ऐतिहासिक संशोधनात नसते. ऐतिहासिक संशोधनामध्ये संबंधित विषयाशी निगडीत असलेल्या साधनांचा उपयोग करून घ्यावा लागतो. अशा साधनांचे प्रामुख्याने दोन प्रकार दिसून येतात.

**१) प्राथमिक स्रोत्र (साधने) -**

प्राथमिक साधने म्हणजे घटनेला साक्षी असलेल्या व्यक्तींनी लिहून ठेवलेल्या किंवा निर्माण केलेल्या तत्सम अन्य प्रकारच्या साधनांना प्राथमिक साधने म्हणतात. ती साधने मूलभूत स्वरूपाची असतात. यामध्ये मौखिक व लेखी अभिलेख यांचा समावेश होतो. ऐतिहासिक संशोधनामध्ये अवशेषांचा किंवा जुन्या स्मारकांचा उपयोग होतो. जुने सांगाडे, शस्त्रे, खाद्यपदार्थ, भांडी, इमारती, चित्रे, नाणी, कलावस्तू, वस्त्र इत्यादींचा

यामध्ये समावेश होतो. ही साधने ऐतिहासिक संशोधनात महत्त्वाची ठरतात. घटनेमध्ये सहभागी असलेल्या किंवा साक्षी असलेल्या व्यक्ती घटनेचा पुढे पुरावा रहावा म्हणून मौखिक अगर लेखी नोंदी करून ठेवतात. त्यामध्ये निर्णयपत्रे, आत्मचरित्रे, दैनंदिनी, पत्रे, पुस्तिका, चित्र, शासकीय अहवाल, मृत्यूपत्रे, प्रमाणपत्रे, घोषणापत्रे, दानपत्रे, पावत्या, शिलालेख, ताम्रपत्र, जाहीरनामे, ग्रंथ इत्यादी अनेक प्राथमिक साधनांचा समावेश होत असतो.

२) दुय्यम स्त्रोत -

दुय्यम साधन म्हणजे घटनेला साक्षी नसलेल्या व्यक्तींनी प्रत्यक्ष घटनेत सहभागी व साक्षी असलेल्या व्यक्तीकडून ऐकलेल्या माहितीच्या आधारे अहवाल तयार करणे म्हणजे दुय्यम साधने होय. यामध्ये लेखक घटनेचा साक्षीदार नसतो. ऐकिव माहितीच्या आधारे लिखाण केले जाते. ही साधने विश्वासार्ह्य असतातच असे नाही. घटनेला सहभागी असणाऱ्या व्यक्तीच्या अहवालात सुध्दा मतभेद आढळून येतात. यामध्ये बकरी, क्रमिक पुस्तके, ज्ञानकोष अशा साधनांचा समावेश होतो. संशोधकाला काळानुसार व गरजेनुसार वेगवेगळ्या साधनांचा आधार घ्यावा लागतो.

३) संकलित माहिती मिमांसा -

ऐतिहासिक संशोधनामध्ये कारणमिमांसेला अनन्यसाधारण महत्व आहे. ऐतिहासिक संशोधनामध्ये घटना कित्येक वर्षापूर्वी घडून गेलेली असते. त्यामुळे घडलेल्या घटनेची यथार्थ माहिती मिळविण्यासाठी अनेक साधनांचा आधार घ्यावा लागतो. साधनांच्या सत्यतेवर माहितीची सत्यता अवलंबून असते. ज्या पुराव्याच्या आधारे सत्याचा शोध घेतला जातो, ते पुरावे काळजीपूर्वक तपासणे गरजेचे असते. प्राप्त माहितींची मिमांसा केल्यावरच तिचा ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयोग करणे योग्य असते. ही मिमांसा दोन प्रकारे केली जाते. अ) बाह्य मिमांसा, ब) आंतरिक मिंमासा

अ) बाह्य मिमांसा -

''प्राप्त माहितीच्या प्रामाण्याचा शोध घेण्याच्या चिकित्सेला बाह्य मिमांसा म्हणतात.'' मिळालेले अवशेष किंवा अभिलेख खरे की खोटे याचा शोध घेणे महत्वाचे ठरते. चुकीची माहिती असेल तर तिच्या आधारावर घेतलेले निर्णय चुकीचे ठरतात.

अभिलेखाचा लेखक किंवा काळ निश्चित करताना स्वाक्षरी, हस्ताक्षर, लिपी, शुध्दलेखन, भाषा शैली आदींच्या आधारे निर्णय घ्यावा लागतो. त्याशिवाय रासायनिक परीक्षणेही करावे लागतात. त्यामध्ये रंग, कागद, वस्त्र, धातू, लाकूड वगैरे.

बाह्य मिमांसेचे मूळ प्राप्त माहितीतील फसवेपणा दूर करणे हा असला तरी प्राप्त माहितीचा मुख्य हेतू माहिती कितपत अधिकृत आहे हे तपासणे हाच असतो. यासाठी ऐतिहासिक संशोधनात बाह्य मिमांसा महत्त्वाची ठरते.

आंतरिक मिमांसा -

''प्राप्त माहितीच्या वैधतेचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेला आंतरिक मिमांसा म्हणतात.'' प्राप्त माहिती अधिक असूनही वैध नसण्याची शक्यता असते. प्राप्त माहितीची अचूकता व गुणवत्ता तपासणे हाच आंतरिक मिमांसेचा हेतू असतो. मूळ लेखात अनेक बदल घडून येत असतात. शब्दात बदल करणे, माहिती काढून टाकणे, नवीन माहितीची भर घालणे, मूळ लेखातील क्रम बदलणे, जीर्ण झालेली प्रत बदलताना नवीन प्रत तयार करणे व त्यामध्ये बदल करणे किंवा काही भाग नष्ट करणे तसेच जीर्णमधील काही भाग नष्ट किंवा पुसट होण्याची शक्यता असते. वारंवारच्या बदलामुळे मूळ प्रत बदलण्याची शक्यता असते. त्यामुळे लेखातील मूळ भाग कोणता व प्रक्षिप्त भाग कोणता याची काळजीपूर्वक मिमांसा करणे क्रमप्राप्त ठरते.

प्राप्त माहितीची वैधता तपासून पाहण्याकरिता तात्कालीन अधिकृत पुराव्याशी तिची तुलना करणे श्रेयस्कर ठरते. ऐतिहासिक घटनांचा तपशिलात अनेक प्रकारचे फरक आढळून येतात. संशोधकाला त्यातून सत्य घटना व तपशील शोधायचा असतो. त्यामुळेच ऐतिहासिक संशोधन कर्त्याचे काम महत्त्वाचे व जिकीरीचे असते.

४) संकलित माहितीचे संयोजन व अर्थनिर्वचन करणे -

प्राप्त माहितीची काळजीपूर्वक तपासणी केल्यावर तिचे संयोजन करून तिच्या आधारे स्पष्ट होणाऱ्या गोष्टी समोर ठेवणे आवश्यक आहे. हे स्पष्टीकरण करताना अभ्यासकाने स्वत:ची मते, दृष्टीकोन, आवडीनिवडी, पूर्वग्रह बाजूला ठेवणे आवश्यक आहे. पुराव्यातून निघणारा अर्थ पुराव्याच्या आधारे वस्तुनिष्ठ पध्दतीने स्पष्ट केला पाहिजे. प्राप्त माहितीच्या आधारे त्यातील सर्वसामान्य तत्त्वांचा शोध घेतला पाहिजे

आणि माहितीचे अर्थनिर्वचन केले पाहिजे. संकलित माहितीचे योग्य वर्गीकरण, विश्लेषण व घटनांचे अर्थ लावले पाहिजेत.

५) अहवाल लेखन -

ऐतिहासिक संशोधनामध्ये अहवाल लेखनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लेखनशैली, भाषा, रचना, मांडणी इत्यादी बाबींचा त्यात अधिक महत्व आहे. अहवाल लेखन करताना सत्य लपता कामा नये, तीक्ष्ण दृष्टी, स्पष्टता, अचूकता, नेमकेपणा ही अहवाल लेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये असावीत. चित्रे, तारीख, आरेखने, पत्रके, आलेख, कालदर्शिका सुस्पष्ट आणि बोलक्या असाव्यात. 'मी' चा प्रयोग टाळून त्रयस्थांच्या वस्तूनिष्ठ भूमिकेतून प्रतिपादन करावे लागते.

ऐतिहासिक संशोधनात टाळावयाचे दोष -

१) समस्येचे अतिशय स्थूल स्वरूप

२) दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्याची प्रवृत्ती

३) संकलित माहितीची अपुरी माहिती

४) आवश्यकतेपेक्षा अधिक सरलीकरण, सामान्यीकरण, अकारण उदारता, अकारण चिकित्सा

५) अयोग्य लेखनशैली, रुक्षता, कृत्रिम व आग्रही लेखन, शब्दांचा अयोग्य वापर

या गोष्टी ऐतिहासिक संशोधन संशोधकाने टाळाव्यात.

## ३.६ ऐतिहासिक संशोधनाचे वर्गीकरण-

१) जीवन चरित्रे

२) संस्था आणि घटनांचा इतिहास

३) शैक्षणिक विचार प्रवाहाचा इतिहास

४) प्राथमिक व दुय्यम स्त्रोत

५) वैज्ञानिक संशोधन

६) संदर्भसूची व सारांश लेखन

ऐतिहासिक घटनांवर प्रभाव टाकणारे घटक-

१) थोर व्यक्ती

२) शासन

३) शिक्षणाचे तत्त्वज्ञान

४) वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती

५) आर्थिक स्थिती, समाजशास्त्रीय व भौगोलिक घटक.

समारोप -

ऐतिहासिक संशोधनामध्ये बाह्य मिमांसा व अंतर्गत मिमांसा महत्त्वपूर्ण ठरते. वर्तमान काळातील घटनांचे स्वरूप समजून घेण्यासाठी व भविष्यकाळाचे पूर्वज्ञान होण्यासाठी भूतकालीन  घटनांचा अभ्यास इतिहासाच्या अभ्यासकाला करावा लागतो. गतकालीन घटनांचे सुसंगत, यथार्थ आणि वस्तुनिष्ठ वर्णन, पृथ्थकरण करण्याकरिता उपयुक्त असलेली शास्त्रीय पध्दती म्हणजेच ऐतिहासिक संशोधन पध्दती होय.

## ३.७ वर्णनात्मक संशोधन पध्दती -

संशोधन हे प्रामुख्याने वर्तमानकालीन समस्यावर उत्तर शोधण्यासाठी केलेले असल्याने ऐतिहासिक संशोधन पध्दतीसाठी फारसा उपयोग होत नाही. वर्तमान स्थितीचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरली जाते.

## ३.८ नमुना निवड -

संशोधनामध्ये समस्येचा अभ्यास करत असताना अध्ययन विषयाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक घटकाचा समावेश करून केव्हाही आदर्श ठरते. पण जेव्हा अभ्यास विषय मोठा असेल, तेव्हा आपण सर्वच्या सर्व घटकांचा अभ्यास करू शकत नाही. अशा वेळी नमुना निवड ही महत्त्वाची ठरते.

व्याख्या -

जॉर्ज हॅट : 'नमुना याचा अर्थ मोठ्या गटातून काढलेला प्रातिनिधीक स्वरूपाचा गट होय.'

बोगार्डस् यांच्या मते 'पूर्वनिर्धारित योजनेप्रमाणे कोणत्याही एककाच्या एका समुहातील एक निश्चित प्रतिशत म्हणजे नमुना निवड होय.'

नमुना निवडीची गरज -

१) नमुना निवडल्याने वेळेचे बचत करता येते.

२) श्रमाची बचत करता येते.

३) पैशाची बचत करता येते.

४) मर्यादित प्रतिसादक असल्याने संशोधन प्रक्रिया अधिक सखोल होते.

५) आयोजन करणे सुलभ होते.

नमुना निवडीच्या पध्दती

संभाव्यतेवर आधारित

१. सुगम यादृच्छिक पध्दती

अ) लॉटरी पध्दती

ब) सारणी

क) ग्रीड

२. कमबध्द नमुना निवड

३. स्तरीय यादृच्छिक पध्दती

४. बहुस्तरीय यादृच्छिक पध्दती

असंभाव्यतेवर आधारित

१. प्रासंगिक निवड

२. हिस्सेवार पध्दती

३. सहेतूक नमुना

प्रस्तूत संशोधनाकरिता खालील प्रमाणे सेहतूक नमुना निवड केली आहे.

नानासाहेब पेशवे यांची आर्थिक धोरण-

पुणे व परिसर

| शेती | व्यापार, उद्योगधंदे | वतनदार | सावकार |
| --- | --- | --- | --- |
| सुधारणा | चालना | चौथाई | हुंडीपध्दत |
| धोरण | सवलती | सरदेशमुखी | कर्जव्यवहार |
| महसूल | करपध्दती | | पेढीव्यवहार |

## ३.९ साधन निवडीचे समर्थन -

आधार सामग्रीवर संशोधकाचे यशापयश अवलंबून असते. हे लक्षात आल्यास साधनसामग्री गोळा करणे हे किती आवश्यक आहे, हे समजते. आंतरिक व बाह्य मिमांसेद्वारे आधारसामग्री गोळा करावी लागते.

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधनकर्त्याने माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्तोत्र यांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन संशोधन पूर्ण केले आहे.

## ३.१० संबंधित विषयाची पूर्वपीठिका

१) छ. शाहू राजे

छ. शाहू संभाजीचा मुलगा होय. त्याचा जन्म रायगडाखाली माणगावजवळ गांगवली येथे १८ मे १६८२ रोजी झाला. त्यावेळी संभाजी व औरंगजेब संघर्ष सुरू होता. हळूहळू हा संघर्ष तीव्र होत गेला आणि अखेर १६८९ मध्ये छ. संभाजी मोघलांच्या हातात सापडला, त्याला औरंगजेबाने अतिशय क्रूरपणे ठार केले. याच सुमारास मराठा राज्याची राजधानी असलेला रायगड मोघलांच्या ताब्यात आला. अनेक महत्वाची माणसे कैद करण्यात आली. त्यात छ. शाहू व त्याची आई येसूबाई या अती महत्वाच्या व्यक्ती होत्या. छ. संभाजी मारला गेल्यावर त्याचा लहान भाऊ राजाराम छत्रपती बनला. राजारामच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शिवाजी द्वितीय छत्रपती बनला. तो अल्पवयीन असल्याने राज्याची पूर्ण सूत्रे त्याची आई ताराबाईच्या हाती होती. ताराबाईने स्वातंत्र्य लढ्याचे समर्थ नेतृत्व करून मोघलांच्या तोंडचे पाणी पळविले.

या सर्व काळात छ. शाहू औरंगजेबाचा कैदी होता. त्याला आपल्या स्वभावाप्रमाणे औरंगजेबाने ठार केले नाही. कदाचित छ. शाहूला जिवंत ठेवून औरंगजेबाला काही खेळी खेळावयाची असेल. अशा स्थितीत २० फेब्रुवारी १७०७ रोजी निराश अवस्थेत अहमदनगर येथे औरंगजेबचा मृत्यू झाला. ताबडतोब त्याचा द्वितीय पुत्र आजमशहाने स्वत:ला सम्राट घोषित केले व वारसा युद्ध जिंकण्याच्या तयारीने तो दिल्लीकडे जाण्यास निघाला. जाताना छ. शाहू व येसूबाई इ. ना. बरोबर घेतले. मोघल सैन्य दिल्लीच्या मार्गावर असता भोपाळजवळ आजमशहाने छ. शाहूला सोडून दिले. (८ मे १७०७) कदाचित मराठ्यांमध्ये फुटीचे बीज पेरण्याचा त्याचा इरादा असावा. आपल्या

परिस्थितीची पूर्ण कल्पना असलेला छ. शाहू हळूहळू दक्षिणेकडे आला.

दक्षिणेकडे येत असताना आपला छत्रपतीचा न्याय हक्क मिळावा यासाठी आपणास मदत करावी अशी पत्रे त्याने मराठा सरदारांना लिहीली त्याप्रमाणे पुरंदरे, बोकील, शिंदे, भोसले, निंबाळकर, जाधव, मोहनसिंग रावळ इ. सरदारांनी छ. शाहूंचे समर्थन केले. ताराबाईने मात्र छ. शाहूच्या या मागणीला कडाडून विरोध केला. एवढेच नव्हे तर प्रसंग पडल्यास संघर्षाची तयारी चालविली. ताराबाईजवळ धनाजी जाधवसारखा पराक्रमी, मुरब्बी व गनिमी काव्याचा तज्ञ सेनापती असल्याने तिची बाजू अतिशय भक्कम होती. अशा या अडचणीच्या प्रसंगी छ. शाहूला ज्यांनी मदत केली त्यात बाळाजी विश्वनाथचे नाव महत्वाचे आहे.

## २) बाळाजी विश्वनाथ (पहिला पेशवा) -

बाळाजी विश्वनाथचे भट घराणे महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील श्रीवर्धनचे होय. हा प्रदेश जंजिऱ्याच्या सिद्दिच्या अधिकारात होता. सिद्दी हे मूळचे आफ्रिकेतील ॲबिसिनियाचे हबशी जमातीचे होते. अनेक वर्षापूर्वी त्यांनी अहमदनगर राज्यात चाकरी पत्करली. पण ते राज्य मोघलांनी घेतल्यावर सिद्दींनी पश्चिम किनाऱ्यावर आपली सत्ता निर्माण केली. जंजिऱ्याचा अभेद्य किल्ला त्यांचे मुख्य केंद्र होते. शक्तीशाली आरमारच्या सहाय्याने ते समुद्रात चाचेगिरी करीत तसेच किनाऱ्यावरील प्रदेशात घुसून नाना प्रकारचे अत्याचार करीत. सिद्दींना लगाम घालण्याचे काम मराठा आरमार प्रमुख आंग्रे करीत होते. त्यांचे मुख्य केंद्र कुलाबा होते. सिद्दींच्या जाचामुळे बाळाजी मराठा प्रदेशात आला. छ. शिवरायांच्या कालखंडातील बाळाजीच्या कामगिरीची निश्चित माहिती मिळत नाही. रामचंद्रपंत अमात्याकडे काही काळ बाळाजी विश्वनाथने हिशोबाचे कार्य केले तसेच धनाजी जाधवकडेही काही काळ नोकरी केली. साधारणतः १६९५ नंतर बाळाजी पुण्याचा अधिकारी बनला. पुढे त्याच्याकडे दौलतबादचीही जबाबदारी सोपविण्यात आली. याच सुमारास औरंगजेबाच्या ताब्यातील छ. शाहूशी बाळाजी विश्वनाथचा संपर्क आला असावा.

## ३) छ. शाहूला छत्रपतीपद-

छ. शाहू व ताराबाई यांच्यात संघर्ष होणार अशी चिन्हे दिसताच छ. शाहूचा समर्थक बनलेल्या बाळाजी विश्वनाथने फार महत्वाची कामगिरी बजाविली. त्याने ताराबाईचा सेनापती धनाजी जाधव व एक शूर सरदार खंडोबल्लाळ यांना गुप्तपणे छ.

शाहूच्या पक्षात आणले. परिणामी पुण्याजवळ भीमा नदीच्या काठी छ. शाहू व ताराबाई यांच्यात झालेल्या खेडच्या लढाईत (१२ ऑक्टोबर १७०७) छ. शाहूला जय मिळाला. त्यामुळे छ. शाहूने राजधानी सातारा येथे स्वतःला छत्रपती म्हणून राज्याभिषेक केला. (१२ जानेवारी १७०८) मात्र ताराबाईने कोल्हापूर येथे दुसऱ्या गादीची स्थापना करून शिवाजी द्वितीय हाच छत्रपती आहे असे घोषित केले.

### ४) बाळाजी विश्वनाथने बंडखोरांचा बिमोड

जून १७०८ मध्ये धनाजी जाधवचा मृत्यू झाल्यावर त्याचा मुलगा चंद्रसेनला छ. शाहूने सेनापती बनविले. पण चंद्रसेन आतून ताराबाईचा समर्थक होता. म्हणून त्याच्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी छ. शाहूने सैन्यात 'सेनाकर्ते' नावाचे नवे पद निर्माण केले व त्यावर बाळाजी विश्वनाथची नियुक्ती केली. परिणामी संतप्त झालेल्या चंद्रसेन जाधवने छ. शाहूविरूद्ध बंड पुकारले व इतरही सरदारांना तसे करण्यास चिथावणी दिली. त्यामुळे एकाच वेळी चंद्रसेन जाधव, कृष्णराव खटावकर, उदाजी चव्हाण, दमाजी थोरात इ. सरदारांची बंडे सुरू होऊन छ. शाहूचे आसन डळमळीत झाले. पण या कठीण परिस्थितीत बाळाजी विश्वनाथने शांतपणे आपले कार्य केले. त्याने नवे सैन्य उभारले व एकेका बंडखोर सरदाराला वेगळे गाठून त्याचा पाडाव केला. अशा प्रकारे चंद्रसेन जाधवचे विरोधी कारस्थान हाणून पाडून बाळाजीने छ. शाहूचे पद सुरक्षित ठेवले.

### ५) बाळाजीला विश्वनाथ व पेशवेपद प्राप्ती -

चंद्रसेन जाधवाच्या चिथावणीमुळे मराठा नौदल प्रमुख कान्होजी आंग्रे यानेही छ. शाहूविरूद्ध बंड केले. कान्होजी म्हणजे जबरदस्त आसामी होती. डोळ्यात तेल घालून तो पश्चिम किनारपट्टीचे संरक्षण करीत असे. सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज या परकीय सत्ता कान्होजीला वचकून होत्या. म्हणून त्यांच्या बंदोबस्ताची जबाबदारी छ. शाहूने पेशवा बहिरोपंत पिंगळे याच्याकडे सोपविली. परंतु पेशवा स्वतःच पराभूत झाला. याच सुमारास मराठ्यांचा शत्रू निजाम-उल-मुल्क सुभेदार म्हणून दक्षिणेत आला. अशा प्रकारे १७११ ते १७१३ हा काळ छ. शाहूकरिता अत्यंत संकटाचा व आणिबाणीचा ठरला. शेवटी छ. शाहूने बाळाजी विश्वनाथला पेशवाईची वस्त्रे देवून (१७ नोव्हेंबर १७१३) त्याच्याकडे कान्होजीचा बंदोबस्त करण्याची कामगिरी सोपविली. तेव्हा बाळाजीने मुत्सद्दीपणाने कान्होजीच्या राजनिष्ठेला आवाहन करून, शत्रूकडून

असलेल्या धोक्याची कल्पना देऊन, पुन्हा कान्होजीला रक्तपात न करता, शांततेने छ. शाहूच्या पक्षात आणले. याच सुमारास कोल्हापूरला एक छोटीशी क्रांती होऊन राजारामची द्वितीय पत्नी राजसबाईने ताराबाई व शिवाजी द्वितीयला कैदेत टाकले व आपला मुलगा संभाजी द्वितीयला छत्रपती बनविले. या घटनेला कोल्हापूरची क्रांती असे म्हणतात.

### ६) उत्तर भारतातील बाळाजी विश्वनाथचे कार्य -

दिल्लीच्या राजकारणात उलथापालथ सुरू झाली. सम्राट फर्रूखसियर व सय्यद बंधूचे संबंध बिघडू लागले. म्हणून सम्राटाने निजामाला उत्तरेत बोलावून त्याच्या जागी दक्षिणेचा सुभेदार म्हणून सय्यद हुसेनअलीची नियुक्ती केली (१७१५). एवढेच नव्हे तर हुसेनअलीस मार्गातच ठार करण्याचा आदेश गुजरातचा सुभेदार दाऊदखान पत्री यास दिला. मात्र झालेल्या संघर्षात हुसेन अलीकडून दाऊदखान मारला गेला. पण यामुळे सम्राट व सय्यद बंधूमधील संघर्ष अधिकच पेटला. सय्यद अब्दुल्ला दिल्लीला एकटाच असल्याने स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी वाटून त्याने लहान भाऊ हुसेन अलीस दिल्लीला येण्यास सांगितले. त्याप्रमाणे हुसेनअली उत्तरेत जाण्याची तयारी करू लागला. मात्र त्याला मराठ्यांकडून भिती वाटत होती. उत्तरेत जाताना सम्राट व मराठे यांच्या तावडीत आपण सापडू अशी शंका त्याला येवू लागल्यामुळे हुसेनअलीने मराठ्यांशी मैत्री करावयाचे ठरविले. हुसेन व मराठे यांच्यात खालील प्रमाणे मैत्रीतह करण्यात आला (१७१८).

१) छ. शाहूला शिवरायांच्या स्वराज्याचे पूर्ण अधिकार मिळावे.
२) खानदेश, वऱ्हाड, गोंडवना, हैद्राबाद व कर्नाटक या भागातील जिंकलेले प्रदेश मराठ्यांकडेच राहतील.
३) बऱ्हाणपूर, वऱ्हाड, विजापूर, बीदर, हैद्राबाद व कर्नाटक या दक्षिणच्या सहा मोघल सुभ्यातील चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांना मिळावे.
४) १५ हजार सैन्यासह मराठे सम्राटाचे रक्षण करतील.
५) छ. शाहूने कोल्हापूरच्या संभाजी द्वितीयला त्रास देऊ नये.
६) छ. शाहू सम्राटाला दरवर्षी १० लक्ष रू. कर (खिराज) देईल.
७) दिल्लीला असलेल्या छ. शाहूंची आई येसूबाई व इतर राजकुटुंबातील व्यक्तींची सुटका करण्यात येईल.

वरील करारानुसार हुसेनअलीसोबत १५ हजार मराठा फौज दिल्लीला जाण्यास निघाली. सैन्याबरोबर स्वत: बाळाजी विश्वनाथ, त्याचा मुलगा बाजीराव व सेनापती खंडेराव दाभाडे, खंडोबल्लाळ इत्यादी पराक्रमी सरदार होते. ही हकीकत कळताच सम्राट फर्रूखसियरनेही प्रसंगाला तोंड देण्याकरिता सैन्याची जमवाजमव केली. निजाम उल्मुल्कला दिल्लीला बोलावून घेतले. तसेच बुलंदखाँ, अजितसिंह इ. महत्वाच्या सरदारांनाही ताबडतोब दिल्लीला येण्याचे फर्मान सुनावले

१६ फेब्रुवारी १७१९ रोजी मराठा सैन्य दिल्लीला पोहचले त्यावेळी राजकीय वातावरण अतिशय तापले होते. त्यातच सय्यद बंधूंची समजूत घालण्याचे सम्राटाचे सर्व प्रयत्न वाया गेले. शेवटी आपल्या विरोधकांना ठार करून सय्यद बंधूंनी सम्राट फर्रूखसियरला पकडले व तुरूंगात टाकले. त्यानंतर एकामागोमाग एक असे सम्राट बनवले जणू सय्यदबंधू किंगमेकर बनले. नवीन बादशहा रफीउदराजन याच्याकडून सनदा मिळविल्या.

दिल्लीच्या तख्ताला बदल नवे नव्हते. पण या वेळच्या घटनेला अनन्यसाधारण महत्व दिले जाते. कारण मराठ्यांच्या मदतीने दिल्लीचे तख्त पालथे झाला. यानंतर मार्च १७१९ मध्ये चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्याच्या सनदा मराठ्यांना देण्यात आल्या. येसूबाई वगैरेंची सुटका झाली. कार्यसिद्धी झाल्याने मराठे दक्षिणेत यावयास निघाले. मराठ्यांना मिळालेल्या सनदा म्हणजे मराठा राज्याचे जणू मॅग्नाचार्टा (मोठी सनद) होत असे उद्‌गार सर रिचर्ड टेंपलने काढले.

### ७) बाळाजी विश्वनाथच्या कार्याचे मूल्यमापन -

बाळाजीची शेवटची मोहीम कोल्हापूर विरूद्धची होती. २ एप्रिल १७२० रोजी पुण्याजवळ असलेल्या पुरंदरच्या पायथ्याशी सासवड येथे वयाच्या ६० व्या वर्षी बाळाजी विश्वनाथचा मृत्यू झाला.

मिठाच्या कारखान्यात काम करणारा एक कारकून तो मराठा राज्याचा कर्ता सवरता पेशवा असे बाळाजीचे इतिहासात स्थान आहे. छ. शाहूचा पक्ष न्याय्य आहे. अशी खात्री पटल्यावर बाळाजी विश्वनाथने आजन्म छ. शाहूशी एकनिष्ठता जोपासली. बाळाजी लढवय्या वीर नव्हता तर तो कलमबहाद्दर होता. त्याची ताकद त्याच्या बुद्धित होती स्वत:च्या मुत्सद्दीपणावर त्याचा भरवसा होता. त्यामुळेच धनाजी, खंडो, बल्लाळ, कान्होजी आंग्रे यांच्यासारख्या कर्तृत्वसंपन्न सेनानींना बाळाजीने केवळ युक्तीचा

वापर करून छ. शाहूच्या पक्षात आणले. प्रसंगी बळाचाही वापर केला. चंद्रसेन जाधव व इतर सरदारांचे बंड मोडून काढले. या त्याच्या हुशारीमुळेच छत्रपती खालोखाल महत्वाचे असे पेशवापद छ. शाहूने बाळाजीला दिले. त्याचे सार्थकही बाळाजीने केले. बाळाजीच्या कर्तृत्वाचे यशोशिखर म्हणजे त्याची उत्तरेकडील कामगिरी होय. याबाबतीत मिळालेल्या संधीचे बाळाजीने सोने केले असे म्हणता येईल. मराठे सांप्रत गृहयुद्धाच्या दुष्टचक्रात अडकले होते. त्यातून त्यांना बाहेर काढणे व त्यांच्या पराक्रमाला वाव मिळवून देणे हा उत्तरेच्या राजकारणात भाग घेण्यामागील बाळाजीचा एक प्रमुख उद्देश होता. तो पूर्णतः सफल झाला असे म्हणावे लागेल. उत्तरेच्या या मोहिमेमुळे मराठ्यांच्यात राज्यविस्ताराची आकांक्षा निर्माण झाली. दक्षिणेच्या सहा सुभ्यातील चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांना आर्थिकपेक्षा राजकीयदृष्ट्या अधिक लाभप्रद ठरले. पुढील काळात याच मार्गाचा अवलंब करून मराठ्यांनी भारतात सर्वदूर आपल्या सत्तेचा विस्तार केला. अशा प्रकारे छ. शाहूला छत्रपती बनविणे, छ. शाहूच्या मार्गातील अडसर दूर करणे, छ. शाहूला राजकीय दर्जा मिळवून देणे व मराठा सत्तेच्या विस्ताराचा पाया घालणे या बाळाजी विश्वनाथच्या ऐतिहासिक मोलाच्या भरीव कामगिरीमुळेच त्याच्या मृत्यूनंतरही पेशवेपद भट घराण्यातच कायम राहिले.

**सर रिचर्ड टेंपल -**

आपल्या वारसांपेक्षा बाळाजी विश्वनाथ अधिक कट्टर ब्राम्हण होता. तो शांत स्वभावाचा व अत्यंत बुद्धिमान होता. दुसऱ्याच्या कोरड्या व्यवहाराला तो स्वतःच्या गोड व्यवहाराने जिंकत असे. हिशेब व मुत्सद्दीपणात बाळाजी अद्वितीय होता. स्वतःच्या राजकीय भाग्याने तो अनेकदा संकटाच्या खाईत सापडला, मृत्यूच्या छायेत वावरला पण लगेच भाग्यचक्र अनुकूल बनून त्याला पाहिजे तशी संधी मिळत गेली. शक्ती व युक्तीचा योग्य समन्वय साधून, वापर करून त्याने मोघलांकडून मराठ्यांसाठी राजमान्यता मिळविली. स्वतःच्या मुत्सद्दीपणात तो यशस्वी ठरला आणि आपल्या आयुष्याच्या शेवटी त्याला पक्की जाणीव होती की, मुस्लिम राज्याच्या अवशेषांवर आपण एका हिंदू राज्याची प्रतिष्ठापना केली आहे व या राज्याची सत्ता वंशपरंपरागत आपल्याकडे आली आहे. (He Carried victoriously all his diplomatic points and sank into premature death with the conciousness that a Hindu

Empire had been created over the ruins of the Muhmmadan power and of this empire, the herediary chiefship had been secured for his family.) (Oriental Experience, p. 389-90)

**किंकडे व पारसनीस-**

बाळाजी विश्वनाथचे कार्य त्याच्या प्रसिद्ध मुलाच्या (बाजीराव प्रथम) कामगिरीपेक्षा कमी तेजस्वी भासत असले तरी त्या कार्याचा श्रीगणेशा बाळाजीने केला होता हे विसरता येत नाही. बाळाजीचेच धोरण पहिल्या बाजीरावाने यशस्वीरित्या पुढे चालविली. वेतनाऐवजी भूमी देण्याची प्रथा छ. शिवाजी राजांच्या धोरणाविरूद्ध होती पण त्याचा दोष बाळाजीचा नसून छ. शाहूचा होता. म्हणूनच प्राप्त परिस्थितीत बाळाजीने मराठा मंडळाची स्थापना केली. त्याच्या आधाराने मराठी सत्ता संपूर्ण भारतात निर्माण झाली व पुढील १०० वर्ष टिकली.

**एच. एन. सिन्हा-**

मराठ्यांचे प्रभावक्षेत्र वाढविणे ही बाळाजीची एकमेव योजना होती. मोघल साम्राज्याच्या अवशेषांवर विजयकार्य करून राज्य स्थापन करण्याची ही योजना नव्हती. (Balaji Vishwanath had ho other plans than creating a sphere of influence for the Marathas. He had certainly no scheme for the establishment of anEmpire on the ruins of the Mughal Empire by means of conquest.) कारण त्याकरिता आवश्यक साधनसामग्री त्याच्याजवळ नव्हती. बाळाजीने ही योजना १७१९ मध्ये कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला असता तर त्याला मुत्सद्दी म्हणता आले नसते. तशी त्याची योजनाही नव्हती. अनेक देशप्रेमी इतिहासकारांनी त्याला तसे श्रेय देण्याचा प्रयत्न केला ही खेदाची गोष्ट आहे. खरे तर मोघल साम्राज्याचे होऊ घातलेले पतन त्याला स्पष्ट दिसत होते. पण त्यामुळे बाळाजीचा विवेक डळमळीत झाला नाही. लहान लहान यशांवरच तो समाधानी होता आणि अधिक महत्वाचे कार्य त्याने आपल्या पुढील पिढीकडे सोपवून दिले. (Rise of the peshwas, p. 81-82)

## पेशवा बाजीराव पहिला (१७२०-४०)

प्रस्तावना -

पेशवा बाळाजी विश्वनाथच्या मृत्यूनंतर छ. शाहूने बाळाजीचा मोठा मुलगा विसाजी उर्फ बाजीराव यास पेशवा बनविले. (१७ एप्रिल १७२०). हाच इतिहासात बाजीराव पहिला किंवा थोरला बाजीराव म्हणून प्रसिद्ध आहे. पेशवेपद मिळाले त्यावेळी बाजीरावाचे वय १९ वर्षे होते. मात्र त्याच्यासमोर अनेक आव्हाने होती. त्याच वर्षीही दक्षिणेत पुन्हा आलेला निजाम मराठ्यांना डोकेदुखी ठरला. त्याने दक्षिण सुभ्याचे मराठ्यांना मिळालेले चौथाई. सरदेशमुखीचे अधिकार छ. शाहूला देण्याचे नाकारले. उलट मराठ्यांमध्ये फूट पाडण्यासाठी कोल्हापूरच्या संभाजी दुसरा याचे समर्थन केले. पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी पोर्तुगीज मराठ्यांचे शत्रू होते. या शत्रूंचा बंदोबस्त करून, संपूर्ण भारतात मराठा सत्तेचा प्रसार करणे बाजीरावचे ध्येय होते. वय कमी असले तरी बाजीराव तीव्र बुद्धीमत्तेचा होता. अद्वितीय घोडेस्वार म्हणून त्याचा नावलौकीक होता. नेतृत्वाचे गुण त्याच्यात जन्मजात होते. ''परकीयांना भारतातून हाकलून देण्याची वेळ आलेली आहे. मोघल साम्राज्याच्या वठलेल्या वृक्षाच्या बुंध्यावर आघात केला म्हणजे फांद्या आपोआप पडतील व मराठ्यांचे राज्य कृष्णा ते अटकेपर्यंत पसरेल'' या आपल्या विचाराने बाजीरावने छ. शाहूला आपल्या प्रभावीत केले. आपली निवड अचूक ठरली याचा छ. शाहूला याचा आनंद झाला. बोलल्याप्रमाणे बाजीराव कर्तृत्व गाजविल्याशिवाय रहाणार नाही याबद्दल छ. शाहूला तिळमात्र संशय नव्हता. म्हणूनच त्याने बाजीरावचे समर्थन करून त्याच्या वीरवृत्तीला उत्तेजन दिले. जुन्या सरदारांचा आपल्याला विरोध आहे याची पूर्ण कल्पना असलेल्या बाजीरावने शिंदे, होळकर, पुरंदरे, पवार अशी नवी तरूण रक्ताची सरदार मंडळी तयार केली. समोरासमोर लढण्यापेक्षा बाजीरावाने गनिमी कावा पद्धती स्वीकारली. कारण मराठा तोफखाना कमकुवत आहे आणि मोघलांसमोर तो टिकणार नाही याची त्याला जाणीव होती. बाजीरावला त्याच्या प्रत्येक कार्यात त्याचा लहान भाऊ चिमाजी आप्पाची पूर्ण साथ होती. बाजीरावचे आणखी एक मुत्सद्दीपणाचे धोरण म्हणजे हिंदूपदपातशाहीचा केलेला पुरस्कार होय. त्यामुळे भारतातील इतर हिंदू राजे आपल्याला मदत करतील, निदान आपल्या कार्यात अडथळा आणणार नाहीत, अशी बाजीरावची धारणा होती.

### १) निजामाला धडा शिकवला-

१७२० मध्येच निजाम पुन्हा दक्षिणेच्या सुभेदारीवर आला. आल्याबरोबर त्याने एका बाजूला कोल्हापूरच्या संभाजी दुसऱ्याला चिथावणी दिली. त्यामुळे संभाजीने स्वत:ला छत्रपती घोषित केले. दुसऱ्या बाजूने निजामाने घोषणा केली की मराठ्यांमध्ये दोन छत्रपती आहेत. त्यामुळे दक्षिण सुभ्यातील चौथाई, सरदेशमुखीचे अधिकार कोणाला द्यावे? अशा स्थितीत निजामाची भेट घेऊन त्याला समजविण्याचा बाजरावने प्रयत्न केला. पण या कार्यात त्याला यश मिळाले नाही. उलट १७२५-१७२६ मध्ये बाजीराव कर्नाटकात असता निजाम-संभाजी जोडीने छ. शाहूला त्रस्त करणे सुरू केले. त्यांना साथ देण्यासाठी चंद्रसेन जाधव, त्रिंबकराव दाभाडे, उदाजी चव्हाण इ. मंडळी होती. संभाजी तर पुणे प्रदेशात सनदाही वाटू लागला. परिस्थिती चिघळू लागल्याचे पाहून छ. शाहूने बाजीरावास कर्नाटकातून बोलावून घेतले. यावेळी मात्र बाजीरावने समझोत्याचे धोरण न ठेवता मनगटाच्या बळावर निजामाला धडा शिकविण्याचे ठरविले. त्यामुळे परस्पर संघर्ष सुरू झाला. अखेर औरंगाबादजवळ पालखेड येथे बाजीरावने निजामाला कोंडीत पकडले. निजामाने शरणागती पत्करून बाजीराव बरोबर पुढीलप्रमाणे मुंगी शेवगावचा तह केला. (६ मार्च १७२८).

१) दक्षिणच्या सहा सुभ्यातील चौथाई, सरदेशमुखीचे अधिकार छ. शाहूला देण्यास निजामाने मान्यता दिली.

२) निजाम संभाजीचे समर्थन करणार नाही.

३) निजामाने जिंकलेले प्रदेश मराठ्यांना परत करावेत.

४) युद्धकैद्यांची मुक्तता करावी.

बाजीरावचा निजामावरील विजय अतिशय महत्वाचा ठरला. त्यामुळे दक्षिण भारतात मराठे नि:संशय श्रेष्ठ व शक्तीशाली बनले. आता उत्तरेच्या राजकारणात भाग घेण्याची मोकळीक बाजीरावला मिळाली. निजामासारख्या मोघल साम्राज्यातील सर्वात बलाढ्य शत्रूला सहज नमविल्याने सर्वत्र बाजीरावची प्रतिष्ठा वाढली. समझौत्यापेक्षा तलवारीचेच धोरण योग्य हे सिद्ध झाले. महत्वाची गोष्ट म्हणजे निजामच पराभूत झाल्याने संभाजी एकाकी पडला. अखेर त्याने वारणेचा तह करून (१७३१) छ. शाहूच्या मांडलिकत्वाखाली रहाण्याचे मान्य केले. छ. शाहूने त्याला उदार अंत:करणाने क्षमा करून वारणेचे खोरे, त्याच्या दक्षिणेकडील काही प्रदेश व कर्नाटकातील काही

प्रदेश जहागीर म्हणून दिला. छ. शाहूची फार मोठी समस्या दूर झाली.

### २) गुजरात, माळवा व बुंदेलखंड विजय-

भारताचा युरोप व आफ्रिकेशी होणार व्यापार गुजरात मधून होत असे. गुजरात त्यावेळी समृद्ध प्रदेश होता. औरंगजेबाला प्रतिशह देण्यासाठी मराठ्यांनी मोघल प्रदेशांवर हल्ले सुरू केले त्यात गुजरातही होता. पुढे मराठ्यांनी तेथून चौथाई वसूल करणे सुरू केले. पण त्याला गुजरातचे मोघल सुभेदार विरोध करीत. म्हणूनच बाजीरावने गुजरातमध्ये फौजा पाठविल्या. त्यात झालेल्या संघर्षात मोघल सुभेदार सरबुलंदखान पराभूत झाला. त्याने मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार मान्य केले. (१७२७) मात्र या गुजरात प्रकरणामुळे पेशवा व सेनापती संघर्ष निर्माण झाला. सेनापती खंडेराव दाभाडेकडे गुजरातची व्यवस्था होती. त्याला वरील घटना आपल्या अधिकार क्षेत्रात अतिक्रमण वाटले. दरम्यान १७२९ मध्ये खंडेरावचा मृत्यू झाला. त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे यास सेनापती बनविण्यात आले. पण त्रिंबकरावने निजाम, महंमद बंगश यांच्या सहाय्याने बाजीरावच्या विरोधकांशी संधान बांधून पेशव्यांविरूद्ध फार मोठे कारस्थान चालविले. त्याची ही राज्यहितविरोधी प्रवृत्ती पाहून बाजीरावने शस्त्र उपसले. झालेल्या लढाईला दबईची लढत असे म्हणतात. या लढाईत (१७३१) सेनापती त्रिंबकराव दाभाडे मारला गेला. पेशव्यानेच सेनापतीला पराभूत करणे व ठार मारणे या गोष्टी अनाकलनीय वाटत असल्या तरी राज्यहितासमोर कोणतीही व्यक्ती गौण ठरते. यानंतर बाजीरावला कोणीही अंतर्गत प्रतिस्पर्धी उरला नाही.

उत्तर व दक्षिण भारतातील येण्याचा मार्ग माळव्यातून जात असल्याने सर्व दृष्टींनी माळव्याला अनन्यसाधारण महत्वाचे होते. औरंगजेबाच्या काळापासूनच मराठ्यांचा माळव्यावर डोळा होता. उत्तर भारतात राज्यविस्तार करण्यासाठी लष्करी दृष्टीने माळव्यावर नियंत्रण अत्यावश्यक होते. शिवाय त्यामुळे निजामाचा दिल्लीशी संबंध तोडता येणार होता. म्हणूनच शिंदे, होळकर, पवार या बाजीरावच्या सरदारांनी माळव्यात शिरून चौथाई वसूल करणे सुरू केले. मराठ्यांच्या या प्रयत्नाला राजपूतांचे विशेषतः जयपूर शासक सवाई जयसिंहाचे सहकार्य होते. म्हणून बाजीरावने चिमाजी आप्पास माळव्याला पाठविले. स्वतः दुसऱ्या बाजूने माळव्याकडे कूच केली. १७२८ मध्ये निजामाने अमझेराच्या लढाईत माळव्याच्या मोघल सुभेदाराला ठार केले. त्यामुळे माळव्यावर

मराठा नियंत्रण प्रस्थापित झाले.

याच सुमारास बुंदेलखंडमध्ये समस्या निर्माण झाली. शूर बुंदेल्यांनी औरंगजेबाला जबरदस्त टक्कर दिली होती. बुंदेलखंड अलाहाबादच्या मोघल सुभ्यात असला तरी प्रत्यक्षात तेथे छत्रसाल बुंदेला शासन करीत होता. मात्र १७२८ मध्ये अलाहाबादचा सुभेदार झालेल्या महंमद बंगशने बुंदेलखंडावर हल्ला चढविला. छत्रसाल पराभूत होऊन जैतपूरच्या किल्ल्यात अडकला तेव्हा त्याने बाजीरावला मदत मागितली. त्यानुसार बाजीरावने बुंदेलखंडात धाव घेऊन महंमद बंगशची रसद तोडली व त्याला शरणागती पत्करावयास लावले. परिणामी छत्रसालची मुक्तता झाली. या कामगिरीवर खूष होऊन छत्रसालने बाजीरावला बुंदेलखंडातील सागर, झांशी, काल्पी इ. प्रदेश दिले. बुंदेलखंड दिल्लीला जवळ असल्याने बाजीरावने आपल्याला मिळालेल्या प्रदेशात मराठ्यांची शक्तीशाली लष्करी केंद्रे उभारली. तेथून चहूबाजूला नजर ठेवणे सोईचे होते.

### ३) दिल्लीवर मोहीम -

निजामाला वठणीवर आणले. तसेच माळवा व बुंदेलखंड जिंकले. त्यामुळे मराठी सत्तेचा विस्तार जोरात सुरू झाला. फांद्या तोडीत बसण्यापेक्षा बुंध्यावर आघात करणे या आपल्या धोरणानुसार त्याने दिल्लीलाच शह देण्याचे ठरविले. त्या आधी बाजीरावने निजामाची भेट घेऊन त्याच्याकडून आश्वासन घेतले की बाजीरावच्या उत्तर मोहीमेत निजाम तटस्थ राहील. नंतर बाजीरावने राजपूत राजाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून उत्तर स्वारीत त्यांचा अडथळा होणार नाही याची काळजी घेतली. पहाता पहाता मराठा फौजा चंबळपर्यंत जाऊन पोहोचल्या. तेथून बाजीरावने काही सैन्य मल्हारराव होळकरांच्या नेतृत्वात दुआबमध्ये पाठविले. अवधचा सुभेदार सादतखान याला चर्चेत गुंतवून ठेवणे, बाजीरावचे उद्दिष्ट होते. परंतु यावेळी झालेल्या संघर्षात सादतखानकडून होळकरच पराभूत झाले. दरम्यान बाजीरावाने एकदम दिल्लीला जाऊन धडक दिली. मराठ्यांनी मुगल सरदार अमीरखानचा धुव्वा उडविला. त्यामुळे दिल्ली शहरात सर्वत्र घबराट पसरली. ही घटना २९ मार्च १७३७ रोजी घडली. दिल्ली सम्राट दिल्ली सोडून जाण्याच्या तयारीत होता. त्याच सुमारास सादतखान इ. सरदार दिल्लीला धावून आला. तोपर्यंत आपले कार्य सिध्दीस गेल्याने बाजीराव माघारी परतला. त्याच्या या कृतीवर शेजवलकरांनी टीका केली आहे. पण बाजीरावला

दिल्लीत फक्त स्वत:चा धाक निर्माण करावयाचा होता.

आपली अडचणीची स्थिती पाहून सम्राटाने निजामाला दिल्लीला बोलावून घेतले. निजामाचा सत्कार केला व त्याला आसफजहाँ असा किताब दिला. बाजीरावने मात्र निजामाला धक्का देण्याचे ठरविले. उत्तरेतून परतणाऱ्या निजामाला कल्पनाही न येऊ देता बाजीरावने भोपाळजवळ कोंडीत पकडले. भोपाळच्या लढाईत टिकाव न लागल्याने निजामाने बाजीरावसमोर शरणागती पत्करून त्याच्याशी तह केला. (७ जानेवारी १७३८) त्यानुसार मराठ्यांना माळव्याचे अधिकार सम्राटाकडून मिळवून देण्याचे निजामाने कबूल केले. नर्मदा ते यमुना प्रदेशावर मराठ्यांचे नियंत्रण मान्य केले. शिवाय युद्धखंडणी म्हणून ५० लक्ष रू. मराठ्यांना देण्याचेही कबूल केले.

### ४) सिद्दी व पोर्तुगीजांशी संघर्ष-

मराठ्यांच्या शक्तीशाली आरमारामुळे जंजिऱ्याचा सिद्दी मराठ्यांचा द्वेष करीत असे. प्रामुख्याने नौदलप्रमुख कान्होजी आंग्रे सिद्धीच्या डोळ्यात खूपत होता. कारण कान्होजीमुळेच सिद्दीचे मनसुबे यशस्वी होत नव्हते. बाजीराव निजामाशी संघर्ष करण्यात गुंतलेला पाहून सिद्दीने कोकण किनारपट्टीत बराच गोंधळ माजविला. ब्रम्हेंद्रस्वामी नावाचा छ. शाहूंच्या गुरुला त्रास देऊन चिपळूणचे परशुराम मंदिराचा विध्वंस केला म्हणून बाजीराव व चिमाजी आप्पाने सिद्दींबरोबर मोहीम सुरू केली. मात्र जंजिऱ्याच्या सिद्दीला पराभूत करण्यात बाजीरावला म्हणावे तसे यश मिळाले नाही.

सिद्दींप्रमाणेच पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीजही मराठ्यांना त्रास देत. हिंदूंवर अत्याचार करून त्यांना जबरदस्तीने ख्रिश्चन बनवीत. कान्होजी आंग्रेच्या मृत्यूनंतर आंग्रे घराण्यात निर्माण झालेल्या भाऊबंदकीचा फायदा घेऊन पोर्तुगीजांनी मराठ्यांमध्ये फूट पाहण्याचा उद्योग सुरू केला. तेव्हा पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्याचे कार्य बाजीरावने चिमाजी अप्पाकडे सोपविले. त्याप्रमाणे चिमाजीने पोर्तुगीज केंद्र असलेले ठाणे साष्टी जिंकले. मात्र वसई जिंकायला चिमाजीला बरेच परिश्रम घ्यावे लागले (१७३९).

### ५) बाजीरावच्या कामगिरीचे मूल्यमापन-

नर्मदातिरी रावेरखेडी (जिल्हा खरगोण) येथे २८ एप्रिल १७४० रोजी बाजीरावचा अकस्मात मृत्यू झाला. बाजीराव जन्मजात योद्धा होता. गतिशीलता व तीव्र गती

त्याच्या व्यक्तीमत्वाची वैशिष्ट्ये होती. आपल्या २० वर्षाच्या कारकीर्दीत त्याने कितीतरी लढाया जिंकल्या. मराठा तोफखान्याची कमजोरी माहीत असल्यामुळे तो शत्रूला समोरामसोर टक्कर देण्याऐवजी, अडचणीत पकडणे, रसद मारणे अशा गनिमी काव्याचा अवलंब करीत असे. अचानक हल्ला करून शत्रूची भंबेरी उडवून देण्यात बाजीराव वाक्‌बगार होता. दूरदर्शी असलेला बाजीराव आपला कार्यक्रम योजनाबद्ध पार पाडीत असे. त्याची उत्तर मोहीम त्याचे खास उदाहरण आहे. अत्यंत मुत्सद्दीपणाने बाजीरावने तत्कालीन राजपूत राजे, बुंदेले, हिंदू राजे यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. आपल्या राज्यवर्धिष्णू कार्यासाठी नवी तरूण तडफदार सरदारमंडळी तयार केली व त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकून स्वतंत्र जबाबदारी सोपविली. महाराष्ट्राबाहेर मराठा सत्तेवर प्रसार करण्याचे श्रेय बाजीरावकडेच आहे. निजाम संभाजी दुसरा, त्रिंबकराव दाभाडे, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, मोघल सुभेदार व सरदार अशा अनेक अडचणींवर मात करून बाजीरावने हिंदूपदपातशाहीच्या दृष्टीने मोलाचे ऐतिहासिक कार्य केले.

रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''आपल्या पित्याच्या अथवा आजोबाच्या काळाप्रमाणे छ. शाहू एकभाषिक लोकांच्या छोट्याशा राज्याचा राजा नव्हता. आता तो भिन्न भिन्न प्रदेश वर्चस्वाखाली असलेल्या विस्तृत, दूरपर्यंत पसरलेल्या राज्याचा स्वामी होता.'' मराठ्यांचे राज्य अरबी सागरापासून बंगालच्या खाडीपर्यंत पसरले होते आणि भारतीय नकाशात जागोजागी मराठ्यांची शक्तीकेंद्रे निर्माण झाली होती. भारतीय सत्तेचा केंद्रबिंदू दिल्लीवरून पुण्याला आला होता. बाजीराव व मराठा सत्तेचा प्रसार या विषयाचे अध्ययन करणारे व्ही. जी. दीघे बाजीरावसंबंधी म्हणतात, ''जनतेला लाभदायक ठरेल अशा पद्धतीने राजकीय संस्थांमध्ये सुधारणा करण्याचा कोणताही प्रयत्न बाजीरावने केला नाही. छ. शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांची वतनदारी निर्माण झाली. त्याला बाजीराव रोखू शकला नाही. उलट तोच स्वतः सर्वात मोठा सरंजामदार बनला. मराठा सत्ता भारतात दूरदूरपर्यंत पसरली तेव्हा या पद्धतीचे दोष दिसू लागले.'' मात्र यदुनाथ सरकार बाजीरावला रचनात्मक प्रतिभेचा मानतात. ते म्हणतात, ''इंग्लंडचे प्रधानमंत्रीपद सर रॉबर्ट वॉलपोलने अत्यंत शक्तीशाली बनवले त्याचकाळात बाजीरावने मराठा राज्यात एक शक्तीशाली सत्ताकेंद्र निर्माण केले.''

**रिचर्ड टेम्पल-**

घोडेस्वारीत बाजीराव अजोड होता आणि युद्धातील कठीण प्रसंगी तो स्वत:ला आघाडीवर ठेवत होता. तो आपल्या सैनिकांच्या दु:खात सहभागी होत असे. थकवा नावाची गोष्ट त्याला माहीत नव्हती. सैनिकांना मिळणारे भोजन तो स्वतः घेत असे. मुसलमान व युरोपियन या विदेशी शक्तीविरूद्ध लढण्यात बाजीराव हिंदूचे प्रेरणास्थान बनला होता. आपल्या कारकीर्दीत बाजीरावने अरबी समुद्रापासून बंगालच्या खाडीपर्यंत मराठा सत्तेची दहशत निर्माण केली. तो जन्मजात लष्करी नेता असल्याने जीवनभर लष्करी छावणीत राहिला आणि त्याचा मृत्यूही लष्करी छावणीतच झाला. आजही लोक बाजीरावला लढाऊ पेशवा आणि हिंदू उत्साहाचे प्रतिक मानतात. (He diedas he had lived in camp, under canvas among his men, and he is remembered to this day among the Marathas as the fighting peshwa, and an incaranation of Hindu energy.)

(Oriented Experience, p. 390)

**किंकडे व पारसनीस-**

कोणत्याही दृष्टीकोनातून तपासले तर हे मान्य करावे लागेल की, बाजीराव महान होता. (Judged by any standard, it can hardly be denied that the Bajirao was a great man.) तो प्रभावी, गोरा व अतिशय सुंदर व्यक्तीमत्वाचा होता. एकदा मुहमदशाहने आपल्या साम्राज्याला हादरवून टाकणाऱ्या व्यक्तीचे चित्र काढण्यास चित्रकाराला सांगितले. तेव्हा त्या चित्रकाराने बाजीरावचे लष्करी वेषातील चित्र सम्राटासमोर ठेवले. त्यात घोड्याचा लगाम घोड्याच्या पाठीवर ठेवलेला व त्या व्यक्तीच्या खांद्यावर शस्त्र होते. तसेच घोडा चालत असता ती व्यक्ती आपल्या हातावर कोवळा गहू रगडून खात होती. चित्र पाहून सम्राट भयभीत झाला व निजामाला म्हणाला की हे तर भूत आहे. याच्याशी तह करून टाकावा. अर्थात ही एक कथा आहे. बाजीरावची वृत्ती व वागणे कठोर होते. आपल्या वंशजाप्रमाणे त्याच्या स्वभावात माधुर्य नव्हते. (Bajirao lacked attractive courtesy for wich other members of his house were noted. His manners were over bearing.) आपल्या पत्रांमधून तो सहसा कोणाची स्तुती करीत नसे. अनेक गुण असूनही बाजीराव छत्रपतीचा लाडका नव्हता. दक्षिणचे

सरदार त्याचा तिरस्कार करीत. त्याची मुलेही त्याला घाबरत.

(A History of the Maratha people, P.271-72)

**एच. एन. सिन्हा-**

सेनापती या नात्याने बाजीराव अद्वितीय होता. त्याच्या योजना अद्‌भुत होत्या. योजनांची अंमलबजावणी करण्यात तो कठोर होता. मुत्सद्दीपणात तो काटेकोर होता. छ. शाहूचा पेशवा म्हणून विषयाचे मर्म जाणून घेणे, कठीण प्रसंगाला तोंड देण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य उपयोग करून घेणे, यात त्याचा हात धरणारा दुसरा कोणी नव्हता. मराठा विस्ताराचे त्याचे धोरण व विदेशी नीती अत्यंत मौलीक व दूरदर्शित्वाची साक्ष होती. म्हणूनच हे योग्य म्हटले आहे की, योजना बनविण्यासाठी बाजीरावाजवळ सुपीक मेंदू होता तसेच योजनांच्या अंमलबजावणीसाठी शक्तीशाली बाहू होते. (Therefore it has been rightly remarked that BaJirao had the head to plan and the hand to Execute.)

(Rise of the peshwas, p.211)

## ३.११ प्रकरण संदर्भ -


१) ओक डॉ. सुमन
शैक्षणिक तंत्र विज्ञान, विद्या प्रकाशन पुणे ३०

२) बापट भा. गो. : शैक्षणिक संशोधन, १९८३,
नूतन प्रकाशन पुणे.

३) भिंताडे वी. रा. : संशोधन पध्दती, १९९९,
नूतन प्रकाशन पुणे.

४) बेहरे ना. के., थोरले बाजीराव पेशवे.

५) देशपांडे डॉ. प्रकाश
शिक्षणातील संज्ञापन व प्रकार, २००२.

६) देशपांडे डॉ. प्रकाश व पाटोळे, डॉ. एन. के. १९९४
संशोधन पध्दती

६) धुरी निलम, (२००८) संशोधन पध्दती, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर,
फडके प्रकाशन३) जोशी अनंत न.
'स्वरूप व आराखडा' संप्रेषण संशोधनाची प्रक्रिया

७) गुढ सी. व्ही., डिक्शनरी ऑफ एज्युकेशन
एम.सी. गोएल कंपनी, न्यूयॉर्क

८) गुंडेवार एस. एन. समाजशास्त्रीय संशोधन पध्दती लातूर विद्याभारती प्रकाशन

९) मुळे रा. शं. व उमाटे वि. तु.,
शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, १९७७, नूतन प्रकाशन पुणे.

१०) पारसनीस द. ब., श्री छत्रपती शाहू महाराज यांची रोजनिशी, भाग १,
१८०९ ते १७६६, पेशवे दप्तर, रोजकीर्द.

११) पुराणिक शं. श्री. पहिला बाजीराव १९९९, मुकुंद शंकर दाते,
मुद्रणालय पुणे.

१२) सरदेसाई गो. स., पेशवा बाळाजी विश्वनाथ, मराठी रियासत, १, २, ३
मध्यभाग, जुनी आवृत्ती.

१३) Best J. W. Research in Education', (1996), New Delhi : Prentice Hall of India.

१४) Buch M. B. 4th and 5th Survey of research in Education', (1983-88) Vol 1. New Delhi : NCTE.

१५) Buch M. B., 4th and 5th Survey of research in Education', (1988-1992) Vol 2, New Delhi : NCTE.

१६) Goode W. and Hatt P., Methods in Scocial Research, (1953)

१७) Gupta Dr. Bhagwandas Maharaja Chatrasala and His Times.

१८) Mc. Graw Hill Book Co.

१९) Lal-Jain & K. C., Teaching & Research Aptitude, (2008) Vashistha, Upkar Prakashan, Agra.

२०) NCERT Research in Education, 1966, New Delhi.

प्रकरण ४

# नानासाहेब पेशवे सत्ता स्थापनेची पार्श्वभूमी

४.१ प्रस्तावना

४.२ सामान्य कारभाराचे स्वरूप

४.३ रघुजी भोसल्याशी समेट

४.४ मराठे मोघल बादशहा सनदा स्वरूप

४.५ पेशव्यांच्या कालखंडातील दक्षिण उत्तर भारतातील प्रमुख घटना

४.६ नानासाहेबांचे पेशवे पदावरून निलंबन

४.७ प्रकरण संदर्भ

प्रकरण ४

# नानासाहेब पेशवे सत्ता स्थापनेची पार्श्वभूमी

## ४.१ प्रस्तावना -

मराठेशाहीचा सूर्य ज्याच्या कालखंडात डोक्यावर आला, मराठ्याच्या सेनासागराच्या लाटा ज्याच्या कारकिर्दीत भरतखंडाच्या सीमेवर जाऊन आदळल्या, भीमथडीच्या घोड्यांनी ज्या काळात गंगा -सिंधु -कावेरीच्या जलांनी आपली तृषा शांत केली, त्या भाग्यशाली काळाचा सूत्रधार बाळाजी बाजीराव भट उर्फ नानासाहेब पेशवा होय. मराठ्यांच्या कर्तबगारीची खरी पराकाष्ठा यांच्याच सूत्रसंचलनेने प्रगट झाली. अशा या नानासाहेब पेशवे यांच्या पूर्वजीवनाची माहिती खालीलप्रमाणे-

सध्याच्या रत्नागिरी व कुलाबा या जिल्यांच्या मध्य समुद्रकाठी जंजिरा हे लहान संस्थान आहे. येथील संस्थानिक जातीने सिद्दी ऊर्फ हबशी मुसलमान होते. त्यांचा पूर्वज विजापूरच्या आदिलशाहीचा आरमारी सुभेदार होता. औरंगजेबाने महाराष्ट्र जिंकल्यानंतर त्याने सिद्दीला पश्चिम किनाऱ्यावरील मोंगल आरमाराचे अधिपत्य दिले. सुरतेपासून सारी कोकणपट्टी एवढेच नव्हे तर मराठ्यांची राजधानी रायगड ही सिद्दीच्यासुध्दा अंमलाखाली आली. सिद्दी मराठ्यांना शेवटपर्यंत पुरून उरला. मोगल बादशाहीचा हा अवशेष अजूनही शिल्लक आहे. या संस्थानात समुद्रतीरी श्रीवर्धन म्हणून मोठे गाव आहे. समुद्रातून पाहिले असता हा गाव नारळ व पोफळ यांच्या बागांनी नुसता भरगच्च दिसतो. श्रीवर्धनी रोटी, सुपारी प्रख्यात आहे. हेच सुपीक व सुंदर गाव भट घराण्याचे मूलस्थान होय. या प्रांताला पूर्वी दंडाराजापुरी हे नाव होते. भट घराणे मुसलमानी अंमलाच्या प्रारंभापासून या प्रांताचे देशमुख म्हणून अधिकारावर होते. त्या काळचे देशमुख म्हणजे लष्करी, फौजदारी व मुलकी या सर्व अधिकारांनी युक्त असत. बाळाजी विश्वनाथाचे पणजोबा महादजी हे इ. स. १५७५ च्या सुमारास देशमुख असल्याचा उल्लेख सापडतो. पुढे औरंगजेबाने संभाजीस मारून महाराष्ट्र पादाक्रांत करण्याच्या सुमारास, कोणत्याही कारणाने असो, कदाचित मराठ्यांच्या पक्षपातित्वाबद्दल असेल, भट घराण्याचे व सिद्दी सुभेदाराचे इतके वाकडे आले की, बाळाजी विश्वनाथला श्रीवर्धन सोडून मराठी राज्यात जावे लागले. ही घटना इ. स. १६९७ च्या सुमारास घडली.

कारण १६९६ मध्ये बाळाजी विश्वनाथ दंडाराजपुरीचा देशमुख, श्रीवर्धनचा अधिकारी व दाभोळचा सभासद म्हणजे सुभेदारास सल्ला देणारा होता, अशा उल्लेखाची पत्रे सापडली आहेत. देशावर आल्यावर तो पुणे व दौलताबाद या दोन प्रांताचा सरसुभेदार असल्याची पत्रेही सापडली आहेत. यावेळी छ. शाहू व त्याची आई येसूबाई ही अहमदनगर येथे बादशाही कैदेत होती. त्यांची योग्य व्यवस्था रहावी म्हणून बाळाजीपंत नानाने खटपट केली असाही एक उल्लेख सापडतो. म्हणजे बाळाजी विश्वनाथ हा कोकणातून पोट भरण्यास आलेला एक कारकून होता, ही आजपर्यंत ग्रांट डफने लिहिलेली कहाणी साफ खोटी ठरते. तसे काही नसून, छ. शाहूने पेशवाईपदास लायक ठरविलेली बाळाजी विश्वनाथ हे कुलीन, घरंदाज, अनुभवी व पराक्रमी असा तत्कालीन छ. शाहूच्या सरदारात श्रेष्ठ पुरूष होता. त्याच्या कार्याशिवाय छ. शाहूचे पाऊल टिकणे शक्यच नव्हते. म्हणूनच आपला पाय पूर्ण रूतल्यावर व बाळाजीची कसोटी लागल्यानंतर छ. शाहूने, एका घराण्यांकडून दुसऱ्या घराण्याकडे प्रधानपदे बदलण्याचे काम त्यांनी केले नाही. तरी, बाळाजी विश्वनाथ यांना १७१३ मध्ये प्रधानपद (पेशवा) दिले. यानंतर बाळाजी विश्वनाथने मोघलांच्या कैदेत असणारी त्याची आई व राज कुटुंबातील मंडळींची सुटका केली. आणि चौथाई सरदेशमुखीच्या पातशाही सनदाही आणल्या. अशी कामे करून १७२० मध्ये छ. शाहूचा हा पहिला पेशवा दिवंगत झाला. हेच नानासाहेबांचे आजोबा असून त्यांचे बाळाजी हे नाव नातवास ठेवण्यात आले.

बाळाजी विश्वनाथला दोन मुले होती. मोठा बाजीराव व धाकटा चिमाजी आप्पा. बाळाजीनंतर बाजीरावास छ. शाहूने पेशवाईची वस्त्रे दिली. बाजीरावाची आई राधाबाई ही मोठी शहाणी व पराक्रमी बाई होती. घरचा सगळा कारभार तिच्या सल्ल्याने होत असे. बाजीराव हा शुद्ध शिपाई बाण्याचा लढवय्या पुरूष होता. त्याचे संसाराकडे फारसे लक्ष नसे. त्यामुळे राधाबाई व चिमाजीआपा यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी होती. बाजीरावाचे लग्न बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळण्यापूर्वीच महादजी कृष्ण जोशी चासकर, छत्रपतींचे पोतदार व सावकार, यांची कन्या काशीबाई याच्याशी झाले होते. काशीबाई स्वभावाने गरीब असून घरंदाज व सोज्वळ स्वभावाची होती. हिच्या पोटी बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांचा जन्म १२ डिसेंबर १७२१ रोजी पुणे जिल्यातील नाणे मावळ येथे साते

मुक्कामी झाला. बाळाजीचे बालपण बहुतेक सातारा व पुणे या ठिकाणी गेले. बाप बाजीराव बहुतेक बाहेर सतत स्वारीवर असे. त्यामुळे मुलास बापाचा सहवास फारसा मिळाला नाही. चुलते चिमाजीआपा हेच घरच्या कारभारावर लक्ष ठेवीत असत. बाळाजीचे शिक्षण आजी राधाबाई, चुलता चिमाजीआप्पा व कारभारी अंबाजीपंत पुरंदरे यांच्या सहवासात झाले. गृहशिक्षण व बाहेरचा अनुभव या संबधाने पेशव्यांच्या घराण्यातील दक्षता त्या काळच्या इतर प्रमुख घराण्यातही क्वचितच आढळली असती. बुद्धिमत्ता, उद्योग व शिस्त हे चित्पावन ब्राम्हणांचे मुख्य गुण पेशव्यांच्या घराण्यात प्रथमपासून दिसतात; व याच गुणांच्या बळावर कोकणातील ब्राम्हणांनी देशावरच्या वतनदार घराण्यांवर आपली छाप बसविली. पेशव्यांच्या घराण्यात वैभवामुळे मुलांच्या शिक्षणाची हयगय कधीही झाली नाही.

संदर्भ- सरदेसाई गो. स. मराठी रियासत, मध्यविभाग २, पृष्ठ १०

त्या काळचे कर्तबगार घराण्यांचे शिक्षण म्हणजे मोडी, बालबोध लेखन वाचन, हिशेबाची पूर्ण माहिती, संस्कृत वाचता येणे, घोड्यावर बसणे व शस्त्र-शास्त्रात प्राविण्य संपादणे या विषयांचे दिले जाई. दहाबारा वर्षाच्या वयातच मुलास बाहेरील व्यवहारांचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असे. पुस्तकी शिक्षणापेक्षा त्या वेळी व्यावहारिक बाबींवर विशेष भिस्त असे. रामायण व महाभारत हे ग्रंथ म्हणजे सर्व हिंदूंच्या शिक्षणाचा, स्फूर्तीचा व पराक्रमाचा आधार होता. नानासाहेबास संस्कृत चांगले येत असून महाभारतातील निवडक भाग, पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनिति इत्यादी नीतिग्रंथ, यांचा त्यास व्यासंग होता. अंबाजीपंत पुरंदरे, गोविंदराव चिटणीस व रामचंद्रबाबा शेणवी यांच्या सहवासात त्याने पत्रव्यवहार व हिशेबाचे धडे घेतले. या कामात पेशव्यांच्या घराण्याचा शेवटपर्यंत हातखंडा होता. घोड्यावर बसणे वगैरे लष्करी शिक्षण त्या वेळच्या दरबारात वागणाऱ्या सर्व मराठ्यास उपजतच मिळत असे. युद्धाचे प्रत्यक्ष ज्ञान मात्र बाळाजीस लहानपणी मिळाले नाही. कारण त्याला एक कौटुंबिक गोष्ट आडवी आली. बाळाजी स्वत:च्या जबाबदारीवर स्वारीत जाण्याइतका मोठा होण्यापूर्वीच बाजीराव पेशव्यांची मस्तानीशी गाठ पडली, त्यामुळे बाजीरावांचे घरातल्या मंडळीशी आपुलकी नाहिशी झाली. विशेषत: या बाबतीत बाळाजीचे मन बापाविषयी बरेच कलुषित झाले असावे. या कारणामुळे बाळाजी कधी बापाबरोबर स्वारीस गेल्याचे नमूद नाही. चुलते

चिमाजीआप्पा बरोबर जावयाची त्यास संधी होती, पण छत्रपतीच्या दरबारी घरचा असा एक तरी माणूस तेथील नानाविध व्यवहारांवर व निरनिराळ्या व्यक्तींच्या खटपटीवर देखरेख ठेवण्यासाठी सातारा येथे रहावे लागत असे. अर्थातच ते काम बाळाजीवर येऊन पडले. साताऱ्याला राहून छत्रपतीच्या दरबारातील मराठशाहीची सर्व कारस्थाने व घडामोडी अनेक वर्षे सतत डोळ्यांपुढे असल्यामुळे, बाळाजीस मराठीशाहीच्या घटनेचे मात्र उत्तम ज्ञान झाले. छ. शाहूच्या सर्व मराठे सरदारांशी व राजेरजवाड्यांशी जो पत्रव्यवहार चाले तो गोविंदराव चिटणीसाच्या सहवासात बाळाजीस सहजच वाचावयास मिळत असे; तसेच अनेक कारस्थाने व गुप्त खलबत्ते हीही त्यच्या कानावरून जात. यामुळे मराठशाहीतील वेगवेगळ्या माणसांच्या स्वभावाची व कर्तबगारीची त्यास प्रत्यक्ष माहिती झाली. छ. शाहूच्या मृत्यूनंतर मराठेशाहीची व्यवस्था लावताना या सर्व अनुभवाचा बाळाजीस चांगला उपयोग झाला. पण त्याबराबेरच, स्वारीत फिरण्याने जो हालचालींचा उत्साह, काटकपणा व युद्धाची आवड उत्पन्न होते, ती त्यास न झाल्यामुळे पुढेही पेशवा झाल्यावर बहुतेक स्वाऱ्या त्यास सरदारांमार्फत चालवाव्या लागल्या. स्वतः त्याच्या आंगी कारस्थानांचे व व्यवहाराचे डावपेच चांगल्या प्रकारचे असल्यामुळे, बापाच्या शिपाईगिरीची जोड त्यास असती तर मराठशाहीचे पुढील स्वरूप कदाचित वेगळे झाले असते व सरदारांच्या एककल्ली स्वैर वर्तनास आळा बसला असता आणि पुढील काळात मराठशाही विस्कळीत न रहाता सुदृढ बनली असती.

आजोबाचे नाव नातवास ठेवण्याचा प्रघात महाराष्ट्रात बराच आहे. पण प्रत्यक्ष बापाच्या नावाने आपल्या मुलाला हाक मारणे गैर वाटत असल्याने साहजिकच नातवास टोपणनाव प्राप्त होते. त्याप्रमाणे बाळाजीस घरात नाना म्हणत व बाहेर नानासाहेब हे त्याचे नाव रूढ झाले. आजोबासही बाळाजीपंतनाना असे म्हणत. नानासाहेबास रामचंद्र, रघुनाथ व जनार्दन असे तीन धाकटे भाऊ झाले. पैकी पहिला लहानपणीच वारला. दुसरा प्रख्यात राघोबादादा हा नानासाहेबांपेक्षा तेरा वर्षांनी लहान होता व त्याहूनही लहान जनार्दनबाबा. हाही पुढे लग्न होऊन नंतर अल्पवयातच त्याचे निधन झाले.

नानासाहेबाने पेशवा झाल्यावर आपल्या एकविसाव्या वर्षी आठ वर्षाच्या रघुनाथास स्वारीतून एक पत्र लिहीलेले उपलब्ध आहे. ते वाचल्याने तत्कालीन

शिक्षणासंबंधी नानासाहेबाचा अभिप्राय कळून येतो. ते पत्र असे-

''येथून जाते समयीजे सुचले ते तुम्हास सांगितले आहे. त्यांचे निरंतर स्मरण मनात असू देणे. रघुवंश, विदुरनीती, चाणक्य व जे तुम्हास येत असेल, त्याची नेमपूर्वक चिंतानिका करून थोडेबहुत शास्त्री याजवळ नित्य म्हणत जाणे. विराटपर्वापासून पुढे भारत रिकामपणी वाचीत जाणे. केवळ घोडी फिरवायचे छंदास न लागणे. वजनी, कैली, बेरीज करावयाचा सराव बहुत करणे. चिरंजीव भाऊची मर्जी बहुत प्रकारे रक्षण करीत जाणे. घोडी वेगळी बांधीत न जाणे. क्षुद्र मनुष्याशी सहवास कोणी प्रकारेहीन करणे. मातुश्रीबाई (आजी), ताई (काशीताई), अनुबाई (आते), यांशी एक दोन दिवशी अर्धघटकाभर जाऊन बसत जाणे. शरीरप्रकृत नीट नाही यास्तव औषध काही नेमे करून घेत जाणे. भाऊ समागमें घोडी फेरावयास जात जाणे. सातारियास जर जावयाची आज्ञा केली, तर चिमणगिरी गंगाधरभटास, भाऊजवळ विनंती करून, बरोबर दिल्हे तर घेऊन जाणे. सातारियास गेल्यावर दोनही बाईकडे (छ. शाहूच्या राण्या) विना बोलल्यावाचून, अथवा गोविंदराव यांनी आपण सांगितल्या वाचून न जाणे. कालानुरूप, वयास उचित, योग्य वेष करीत असावे. देवपध्यो थोडी परंतु एकांती, न बोलता करीत जाणे. इतकेही नेमेकरून करावे आणि गर्व न करावा. निरक्षर साधनवृत्तीने वडिलांची आज्ञा प्रसन्नतेने मानावी. सावध वर्तावे. सर्व जे मनेकरून समजेल ते समजावे. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावे. शिष्यधर्मे असलिया उपयोग आहे. चिरंजीव जनार्दन (कनिष्ठभाऊ) बहुत कामही करून पढतात. हे हर एक गोष्टीत अधिक झाल्यास तुम्ही त्यास मान्य पुरूष कसे व्हाल?''

या पत्रावरून नानासाहेबाचे तत्कालीन शिक्षणाचे विचार कळतात. आठ वर्षाच्या मुलास हे पत्र समजत होते असे मानले तर आजही इतका समज असलेली मुले क्वचितच आढळतील! नानासाहेबाचा ओढा शिपाई पेशाकडे नव्हता हेही यावरून दिसते. देवपध्यो, वेश वगैरे संबंधीची त्याची मते यात दिग्दर्शित झाली आहेत.

नानासाहेबाचे लग्न गोपिकाबाईशी झाले. गोपिकाबाई ही भिकाजी नाईक रास्ते सावकार (वाई) यांची कन्या. या संबंधामुळे रास्ते घराण्याचा उदय झाला. छ. शाहूनच्या पुढाकाराने हा विवाह झाला. नानासाहेबांच्या कर्तेपणाचा छ. शाहूला अनुभव आला. नानासाहेब चिमाजीआप्पा बरोबर मानाजी आंग्रे याच्यावर स्वारी

करणाऱ्या संभाजी आंग्रे याचे पारिपत्य करण्यासाठी नानासाहेब कुलाबा येथे गेले. तेव्हा त्यांचे कर्तृत्व पाहून शाहूने त्याला पेशवाईची वस्त्रे दिली व सहकाऱ्यांना शाहू म्हणाले, ''बाळाजी पंत लहान आहे. मसलत उभी करील, जाईल, हूडपणा करील, पत घेतली असें होऊ न देतां याजला सांभाळून, मसलतीस एकदील होऊन, याचा लौकिक होईल असे तुम्ही करून दाखवा, हे मागणे आहे.''

संदर्भ- सरदेसाई गो. स. मराठी रियासत, मध्य विभाग २, पृष्ठ १०

नानासाहेब स्वत:च्या बुध्दीने पत्र लेखन करीत असे. साताऱ्यास राहून छत्रपतीच्या दरबाराची माहिती, तो वडील व चुलते चिमाजीआप्पा यांना कळवत असे. त्याने आपल्या वर्तनाने व शहाणपणाने छ. शाहूची मर्जी फार चांगली संपादन केली. सन १७३७ पासून दोन-तीन वर्षे तो छ. शाहूबरोबर मिरजेच्या स्वारीत होता. हाच त्याचा युद्धाचा पहिला अनुभव असावा. सन १७३९ मध्ये चिमाजीआप्पाने वसई ताब्यात घेतली. तेव्हा इंग्रजास दहशत वाटून त्यांनी आपला वकील गॉर्डन यास मुंबईहून छ. शाहूकडे पाठविले. त्या वेळी बाजीराव व आप्पा दोघेही बाहेर स्वारीत होते, म्हणून गॉर्डनने नानासाहेबाची भेट घेतली. त्यावेळी नानासाहेबांच्या धूर्ततेबद्दल व सलगी न दाखवता बेतशीर वागण्याबद्दल गॉर्डनची चांगलीच खात्री पटली. त्याने आपल्या रोजनिशीत या गोष्टीची मुद्दाम नोंद केली आहे. नानासाहेबाने साहेब मजकुरांच्या आगमनाबद्दल नापसंती दर्शविली. आप्पाला वसईस न भेटता खुद्द छ. शाहूकडे येण्याचे कारण काय असे नानासाहेबाने त्यास विचारले. त्याचे समाधानकारक कारण गॉर्डनला सांगता आले नाही. पेशव्यास दूर ठेवून त्यांच्या माघारी छत्रपतीशी तह करण्याचा इंग्रजांचा विचार होतो, तो नानासाहेबास कळल्याशिवाय कसा राहणार? अर्थात त्याने वकिलाशी वागताना साशंक वृत्तीने रहावे हे योग्यच होते.

सन १७४० मध्ये फेब्रुवारीमध्ये सदाशिवरावांचे लग्न व रघुनाथरावाची मुंज ही दोन कार्ये पुण्यास झाली. बाजीराव या वेळी स्वारीत होता. तरीही नानासाहेबाच्या आग्रहावरून खुद्द छ. शाहू या प्रसंगासाठी मुद्दाम एकवेळ पुण्यास आले होते. नानासाहेबाने साताऱ्यास राहून छ. शाहूची मर्जी कशी संभाळली होती, याचे हे एक उदाहरण आहे. या प्रसंगाखेरीज छ. शाहू महाराज पुण्यास कधी आल्याचे दिसत नाही. ही कार्ये आटोपून नानासाहेब चिमाजीआपाबरोबर कोकणात मानाजी

आंग्र्याच्या मदतीस गेले. कान्होजी आंग्याच्या वेळेपासून कोकणपट्टीत आंग्रेच सत्ताधीश होते. बाळाजी विश्वनाथलाही कान्होजीशी गोडीच करावी लागली होती. तेव्हापासून आंग्र्यांचे पारडे हलके करून, कोकणस्थांची मायभूमी आपल्या स्वतःच्या अंमलाखाली आणावी असा पेशव्यांचा विचार होता. शिवाय आंग्रे पेशव्यांची हुकुमत मानत नसत. तेव्हा त्यांना संभाजी व मानाजी या बंधूच्या भांडणात लक्ष घालावे लागले. संभाजी आंग्र्याने आपले आरमार पाठवून मानाजीस वेढले होते, सबब मानाजीला मदत करण्यासाठी नानासाहेब कोंकणात गेले व त्याने मानाजीला सोडविले. हे काम आटोपते आहे तोच बाजीराव मृत्यू नर्मदातीरी झाल्याचे (२८ एप्रिल १७४०) त्यास कुलाबा येथे समजले. तेव्हा तेथेच उत्तरक्रिया आटोपून नानासाहेब लगेच पुण्यास आले. नंतर आठ दिवसांनी आई काशीताई बाजीरावाच्या स्वारीतून परत येऊन पोहोचली. अशा रीतीने वयाच्या एकोणीसाव्या वर्षी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जबाबदारी तरूण नानासाहेबांवर येऊन पडली. ती त्याने पुढील काळात कौशल्याने व युक्तीने पार पाडल्याचे दिसून येते.

## नानासाहेब पेशवे सत्तारोहण व कारकीर्द

पेशवा बाजीरावचा मृत्यू २८ एप्रिल १७४० रोजी झाला. त्यानंतर नानासाहेबास पेशवाईची वस्त्रे मिळाली. याच सुमारास छ. शाहूकडून नारो राम मंत्री व जिवाजी खंडो चिटणीस हे सरदार नानासाहेबास साताऱ्यास नेण्यासाठी पुण्यास आले. या एकाच गोष्टीवरून छ. शाहू महाराजांचा कल स्पष्ट दिसतो. १३ जून रोजी साताऱ्यास पोहोचल्या वर बारा दिवसातच नानासाहेबास पेशवाईची वस्त्रे समारंभाने देण्यात आली. या वस्त्राची किंमत २३० रूपये होती. खेरीज मोत्यांचा तुरा, निमचा व कट्यार हे जिन्नसही त्यास देण्यात आले. याच वेळी पेशव्याच्या गैरहजेरीत साताऱ्यास त्यांच्यातर्फे काम पहाण्यासाठी महादाजीपंत पुरंदरे यास छ. शाहूने पेशव्याचा मुतालिक म्हणून नेमणूक केली.

भट घराण्यातच पेशवाई कायम होऊ नये म्हणून खटपट करणारा रघुजी भोसले हा प्रमुख होता. तो आपणास छत्रपतींचा आप्त समजत असे. बाजीरावाच्या मृत्यूची बातमी त्यास कर्नाटकच्या स्वारीत समजली, तेव्हा तो तसाच सैन्य मागे ठेवून सड्या स्वारीनिशी पेशवाईच्या खटपटीसाठी लगोलग साताऱ्यास आला. सावकार बाबुजी नाईक पेशव्यांचा आप्त, त्याचे भावास बाळाजी विश्वनाथाची मुलगी भिऊबाई

दिलेली होती व तो रघुजीचा मित्र होता, तेव्हा बाबुजीस पेशवाईचे पद द्यावे असे रघुजीने सुचविले. आपल्या स्नेहास हे पद मिळवून देण्याची खटपट करून प्रतिपक्षाचे पारडे हलके करण्यात रघुजीचे दोन हेतू दिसतात. एक त्यामुळे पेशव्यांशी फारसे स्नेहभावात नसलेले प्रतिनिधी, सचिव प्रभृती कित्येक पुरातन अधिकारी आपोआप आपल्या पक्षास मिळून मराठशाहीत आपणास प्रमुखपणा मिळेल आणि त्यामुळे स्वतःचा पक्ष मजबूत होऊन पुढेमागे छ. शाहूच्या मृत्यूनंतर छत्रपतीची गादी आपल्या घरात येण्यास मदत होईल. परंतु हा त्याचा प्रयत्न अनेक कारणांमुळे सिद्धीस गेला नाही. प्रधानाची किंवा इतर पदे विशेष कारण असल्याशिवाय एका घराण्यातून काढून दुसऱ्यास देऊ नयेत, अशी छ. शाहूची स्वतःची मनोभावना होती. नानासाहेब लहानपणापासून छ. शाहूच्या नजरेत वाढलेला असल्यामुळे, त्याच्या गुणदोषांची पूर्ण पारख इतरांच्या मानाने छ. शाहूसारख्या गुणपरीक्षकास भरपूर झालेली होती. आपल्या गोड व विचारी स्वभावाने आणि कर्तबगारीने नानासाहेबाने छ. शाहूचेच काय, पण प्रतिनिधीप्रभृती प्रतिपक्षी यांचेही प्रेम लहान वयातच संपादन केले होते. दरबारातील बहुतेक लोकास बाळाजी विश्वनाथाचा नातू व बाजीरावाचा पुत्र नाना हाच छत्रपतींच्या उतार वयात राज्याचा भार वाहू शकेल असे साहजिकच वाटत होते. दुसरी गोष्ट, नानासाहेबास प्रतिस्पर्धी म्हणून उभा केलेला बाबुजी नाईक याची काहीच मोठी म्हणण्यासारखी कर्तबगारी छ. शाहूपुढे झळकली नव्हती. मात्र तो सावकार व पैसेवाला असल्याने त्याची गरज सर्वास लागे; पण पैशाचा पाठिंबा एवढीच काही प्रधानपदास पुरेशी लायकी नव्हती. पेशवेपदाचे ओझे झेपण्यासारखे अष्टपैलू व्यक्तिमत्व यावेळी बाळाजी बाजीरावशिवाय कोणीच नव्हते. बहुतेक मराठे सरदार केवळ रणपटु व ब्राम्हण लेखणीबहाद्दर होते. पेशव्यांच्या घराण्यात मात्र या दोनही गुणांचा मिलाफ झाला होता. या सर्व गोष्टीचा विचार करता एखाद्या वृद्ध सावकाराकडे हे पद न सोपविता नानासाहेबासारख्या तरूण, तरतरीत व होतकरू माणसास कर्तबगारी संपादण्यास क्षेत्र देऊन अनुभव पहाणेच छ. शाहूला योग्य वाटले. बाकीच्या माणसांची पुढील आयुष्यातील कामगिरी नानासाहेबाशी तपासून पाहिल्यास छत्रपतींची निवड बरोबर होती असे म्हणणे उचित ठरते.

नानासाहेबास पेशवाई मिळू नये अशी खटपट करणाराच विरोध राज्यास अपायकारक न व्हावा, याविषयी काळजी घेण्यासही छ. शाहू विसरला नाही, हे

गोविंदराव चिटणीसाने लिहीलेली छ. शाहूची बखर वाचल्यास कळून येते. पेशवाईची वस्त्रे देण्याच्या दरबारातच छ. शाहूने सर्व लोकांजवळ शपथपूर्वक असे मागणे मागितले की, ''बाळाजीपंत लहान आहे, मसलत उभी करील, जाईल हूडपणा करील, तर पत घेतली असे होऊ न देता, याजला संभाळून, मसलतीस एकदील होऊन याचा लौकीक होईल, असे तुम्ही करून दाखवा.'' छ. शाहूचे हे मागणे दरबाऱ्यांनी मन:पूर्वक कबूल केले. पेशवा कितीही हुशार असला तरी हा वीस वर्षाचा पोर आम्हास कोण शिकवणार, असे सर्व वयोवृद्ध व अनुभवी माणसास वाटणे साहजिकच होते. हा मनुष्यस्वभाव छ. शाहू ओळखून होता म्हणूनच त्याने स्वत:ची भीड खर्च करून या प्रवृत्तीचे शक्य ते निराकरण करण्याचा प्रयत्न केला. तरीही या मंडळीस ताब्यात ठेवणे बराच काळ नानासाहेबास जड गेले. पण शेवटी त्याने आपली प्रधानकी चिरस्मरणीय केलेली पाहून इंग्लंडच्या इतिहासातील धाकट्या पिट्टचे उदाहरण मनात येते. छ. शाहूने नवीन पेशव्यास एकंदर तीस गावे मुकासे नेमून दिले; व आज्ञा केली की, ''बाजीरावाने थोरले बाळाजीपंत यांचे मागे बहुत सेवा निष्ठेने करून मोठमोठी कार्ये करून दाखविली. शेवटी इराणीचे पारिपत्य करून बादशाही स्थापावी म्हणून रवाना केले. तेथे आयुष्य थोडे झाले. त्यास त्यांचे पुत्र तुम्ही, पातशाही रक्षून सर्व हिंदुस्थान आपले करावे ऐसा बेत त्याही केला, तो तुम्ही सिद्धीस न्यावा. अटकेपार घोडे चालवावे.'' पातशाही रक्षून हिंदुस्थान आपले करावे, या छ. शाहूच्या अशक्य आज्ञेत छ. शाहूची भावना व राजकारणाची ओळख किती होती ते स्पष्ट दिसून येते. छ. शाहूच्या या मनोवृत्ती संभाळाव्या लागल्यामुळे नानासाहेबाचा हात नेहमी आखडलेला राहिला आणि मराठेशाहीच्या घटनेस एक विचित्र स्वरूप प्राप्त झाले. पेशवाईची प्राप्ती नानासाहेबास बाजीरावाच्या आकस्मिक मरणामुळे अनपेक्षित लौकर झाली, तरी ही जबाबदारी आपणावर पुढेमागे येणार या विचाराने एकंदर परिस्थितीचा नकाशा त्याने आपल्या डोळ्यासमोर अगोदरपासूनच ठेवला होता. राज्यातील सर्व प्रमुख व्यक्ती व त्यांच्या हालचाली याची त्यास चांगली माहिती झालेली होती. त्यामुळे वडिलांच्या वेळच्या चुका टाळून पुढील कारभार कसा करावा हे त्याच्या पूर्ण लक्षात होते. ही गोष्ट पदप्राप्तीनंतरच्या त्याच्या पहिल्याच उपक्रमात दृष्टोत्पत्तीस येते. शिवशाहीची वारणेचा तहाने झालेली दोन छकले मराठ्यांच्या उत्कर्षास फार जाचक होतात, हे ओळखून व पुढे प्राप्त होणाऱ्या

प्रसंगाचा होरा वर्तवून, छकले एकत्र साधण्याचा दूर दृष्टीचा विचार त्याने योजिला. नानासाहेबास पेशवाई मिळाल्यावर दोन महिन्यांनी कोल्हापूरकर छ. संभाजी छ. शाहूच्या भेटीस साताऱ्यास आला, तेव्हा एक प्रकारे मोठे धाडस करून छ. शाहूच्या पश्चात राज्यव्यवस्था काय करावी याबद्दल एक गुप्त करार त्याने संभाजीशी केला. धाडस म्हणण्याचे कारण, असले नसते कारभार केवळ स्वत:च्या मुखत्यारीवर हा एकोणीस वर्षाचा पोर करतो हे जर छ. शाहूस समजते, तर त्याची इतराजी होऊन नानासाहेबावर कठीण प्रसंग ओढवला असता. पण असे धाडस केल्याशिवाय राजकारणात पाऊल पुढे पडावयाचे नाही. तसेच हा गुप्त करार छ. शाहूच्या हयातीत बाहेर फुटला नाही, यावरून नानासाहेबाने घेतलेली खबरदारी चांगलीच असावी हे उघड आहे. या गोष्टीत चुलता चिमाजी आप्पा याचाही पाठिंबा होता, किंबहुना आपली पुढील कामगिरी मजबूत पायावर उभी करण्याची त्याचीच ही कल्पना असेल. असा करार नानासाहेब व चिमाजी आप्पा या उभयतांनी संभाजीस लिहून दिला. त्यातील मतलब असा होता की, 'सातारचे राज्य स्वामींचे, आणि एकछत्री शिक्का महाराजांचा' म्हणजेच संभाजीचा चालावा. छ. शाहूमहाराजांचा जीवात्मा आहे तो बाह्यात्कारी आम्ही त्यांचे सेवक, परंतु अंतर्यामी स्वामींचे. छ. शाहू महाराज यांनी कैलासवास केल्यावर दोन्ही राज्ये स्वामींची व आम्ही सेवक स्वामींचे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणे वर्तणूक करू, अशी शपथ दिली होती. त्याप्रमाणे दोन्ही राज्ये एक करून स्वामींचा शिक्का चालावा आणि आम्ही छ. शाहूंचे कारकिर्दीप्रमाणे सेवा करून असावे हे प्रमाण, यासी अंतर करणार नाही, अशी विनंती सेवकांनी किल्ले सातारचे मुकामी केली होती.' छ. शाहूच्या मृत्यूनंतर तो पेशव्याने पुन: ताजा करून दिला. पुढे नवीन परिस्थिती निर्माण होऊन या कराराची अंमलबजावणी कधीच झाली नाही. परंतु असा उपक्रम प्रथमारंभीच नानासाहेबाने केला होता, यावरून राज्याच्या हितासाठी जरूर वाटणारी गोष्ट आपणावर संकट झुलत ठेवून व छ. शाहूच्या मर्जीची केवळ पर्वा न धरिता, नानासाहेब कशी करीत असावा ते दिसून येते.

''बाह्यात्कारी त्यांचे सेवक'' हे कपटवाक्य लिहून देण्यात पेशव्याने राजद्रोह केला असा वाद कित्येकांनी माजविला आहे त्यात अर्थ नाही. या कराराने छ. शाहू हयात असेपर्यंत त्याचा कोणताही हक्क जात नव्हता, इतकेच नव्हे तर मृत्यूनंतरही हा

करार बाजूस ठेवून नानासाहेबाने छ. शाहूच्या इच्छेसही या कराराने कराराचा हेतु फक्त राज्याच्या हितासाठी संभाजीशी गोडी करून छ. शाहूच्या इच्छेस बाध न येईल तर दोनही गाद्या एक करण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता; आणि वास्तविक मरणसमयी छ. शाहूने रामराजाऐवजी संभाजीसच सातार्‍यास आणण्याची व्यवस्था केली असती, तर तीच गोष्ट राज्याच्या दृष्टीने फायदेशीर झाली असती. या गोष्टीचा विचार पुढे योग्य ठिकाणी येणारच आहे. येथे फक्त पेशवाई प्राप्त होताच नानासाहेबाने केवढे कारस्थान अंगावर घेतले, हे दाखविण्यासाठी मुद्दाम त्याचा उल्लेख केला आहे.

चिमाजीआप्पा, महादोबा पुरंदरे वगैरेंच्या खटपटीने नानासाहेबास पेशवाईची वस्त्रे मिळाली. पण ही वस्त्रे सुखदायक नसून त्रासदायक होती. त्यातील पहिली अडचण म्हणजे पेशवाईस मोठे कर्ज होते. बाजीराव जन्मभर कर्जाने गांजून त्यातच मरण पावला. त्याचे देणे सुमारे १४ लाख असून देणेदार सावकरांची संख्या तीस होती. रघुनाथभट, पटवर्धन, ब्रम्हेंद्रस्वामी, बाबुजी नाईक बारामतीकर, प्रभृती नावे या देणेदारात आढळतात. व्याजाचा दर १२ टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत होता. बाबुजी नायकास पेशवाई न मिळाल्यामुळे त्याने आपल्या कर्जाबद्दल निकडीचा तगादा लावला, त्याचे ३६ हजार रूपयेकर्ज देऊन महादजी पुरंदऱ्याने पेशव्याची या संकटातून सुटका केली. या एका सावकाराच्या तगाद्याने सावध होऊन व बापाची तारांबळ लक्षात घेवून नानासाहेबाने प्रथमपासून राज्याच्या हिशेबी व्यवस्थेकडे विशेष लक्ष पुरविले आणि कोणतीही उलाढाल झाली तरी त्यापासून सरकारात काही तरी रोख पैसे यावा, अशी योजना केली. बाजीरावाच्या हलगर्जीपणाचा फायदा घेऊन सरदारांनी खजिने भरावे, मुलूख हाताखाली घालावा व इकडे पेशव्याने मात्र कर्जात बुडावे, असा प्रकार पूर्वी झाला होता. तो नानासाहेबाने थांबविण्याचा क्रम आरंभिला. पोर्तुगीजांकडून मिळालेला साष्टी, वसई वगैरे मुलूख, गुजरात, नर्मदेच्या उत्तरेकडील मुलखाची खंडणी, वगैरे पेशव्याने छत्रपतींकडून आरंभीच आपल्या नावे करून घेतली. हिंदुस्थानातील द्रव्य नद्यांच्या प्रवाहाचा ओघ सदैव महाराष्ट्राकडे वळावा असे त्याचे धोरण होते.

नानासाहेबांच्या रोजनिशींतील स्वारीचे मुक्काम पाहिले म्हणजे त्याच्या राज्यकारभाराचे रहस्य समजते. बापाने केलेल्या व्यवहारांची तड पोचविणे आणि मुलखाची व वसुलाची व्यवस्था बांधून देणे हे दोन उद्देश आरंभी नानासाहेबापुढे

होते. त्यातूनच पुढे हिंदुपद-पातशाहीचा शिवरायांचा हेतू पार पाडावयाचा, हे ध्येय नानासाहेबांपुढे आले. बाजीराव व त्याचे सरदार यांनी महाराष्ट्राभोवतीच्या प्रदेशात आपला संचार यापूर्वीच केला होता. परंतु त्यांच्या उद्योगात व्यवस्था मुळीच नव्हती. घेतलेल्या मुलखांत नवीन राज्यकारभार सुरू करून त्यास मराठशाहीचे घटक बनविणे व पुढे त्याच प्रदेशास पाया रोवून, तेथून पुढे पाऊल टाकीत रहाणे, ही कामे केवळ भालाईत शिलेदारांकडून वठण्यासारखी नव्हती. नानासाहेबाने पुण्याचे फडणिशी खाते मराठी राज्याचे केंद्र करून फडाच्या यःकश्चित कारकुनासही कोट्याधीश जहागिरदार सरदारांवर दहशत राखता येईल, अशी व्यवस्था सुरू केली. या फडाच्या शाळेतच रामचंद्रबाबासारख्यांच्या हाताखाली सदाशिवराव, माधवराव, सखाराम बापू, नाना फडणीस, वगैरे कारभारी व माणसे भराभर तयार होऊ लागली. हे कारकून काशीपासून रामेश्वरापर्यंत महाशूर झाले. पुढील रावबाजीसारखे पराक्रमहीन पुरूषसुद्धा पेशवाईत कारकूनी कामात बांके असत, ते या फडातील शिक्षणामुळे होत. यावरून नानासाहेब म्हणजे माणसे तयार करणारी शाळा होती.

रोजनिशीवरून उघड दिसते की, नानासाहेब आरंभी सारखा हिंडत होता. चार दोन दिवसांपेक्षा त्याचा जास्त मुक्काम सहसा एक एके जागी नसे, लग्न, कार्य, जन्म, मृत्यू इत्यादी प्रसंगाची आडकाठी मनात न आणता तो सारखा अहोरात्र राज्याच्या कामात मग्न असे. हल्लीच्या शांततेच्या काळात त्या वेळच्या उद्योगाची कल्पना यथायोग्य होऊ शकणार नाही. रोज नवीन कामे, नवीन स्वारी, नवीन उपक्रम व नवीन अडचणी आणि त्यांचे निरसन, अशा कष्टमय राष्ट्रीय दंगलीत लहानपणापासून थोरापर्यंत प्रत्येकाचे आयुष्य त्यावेळी झिजत असे. उदयोन्मुख राष्ट्राची भावना अशाच प्रकारची असून ती नानासाहेबाच्या रोजनिशी वरून व्यक्त होते.

नानासाहेबाचे राज्यकौशल्य खुद्द पेशव्याच्या अमलांतील प्रदेशात दिसून येते. वेळच्या वेळी वसूल करणे, तंटे तोडणे, फौजेत चांगल्या लोकांची भरती करणे, देवस्थानेवगैरे धार्मिक बाबींकडे लक्ष पुरविणे व अनेक आश्रितांचा यथायोग्य परामर्ष घेणे, ही कामे तो महाराष्ट्रात फिरत राहून करीत असे. या फिरतीवर असतानाच सबंध मराठशाहीचे कारभाराचे त्याला ज्ञान झाले.

बाजीरावाच्या मृत्यूने हिदुस्थानभर लोकांची मने साशंक होऊन मराठ्यांचे उद्योग पुढे कसे चालणार या विषयीचे तर्कवितर्क चालले होते, तोच सर्व सरदारास

आपल्या कारभाराची चुणूक दाखवून बाजीरावाहूनही वस्ताद पेशवा कारभारावर आला आहे. अशी लोकांची त्याने खात्री पटविली, बाजीरावाने आरंभिलेले उद्योग तडीस पोहोचविण्यासाठी प्रथम उत्तरेकडे स्वाऱ्या करण्याची तयारी त्याने केली. रघुजी भोसले, दमाजी गायकवाड, प्रतिनिधीचा मुतालिक, यमाजी शिवदेव, वगैरे आपल्याशी काहींना काही कारणाने वितुष्ट ठेवून राज्यहितास बाध आणणाऱ्या इसमाचा त्याने जरबेने आटोप केला. राजकारणात साधनचतुष्टय असते त्यापैकी सामाचा मात्र उपयोग नानासाहेब बहुधा करीत असे. दंडापर्यंत पाळी न यावी अशी त्याची इच्छा असे; परंतु पाळीच आल्यास त्या अस्त्राचाही जरूर तेवढा उपयोग करण्यास तो मागेपुढे पहाणारा नव्हता. छत्रपतीच्या दरबाराचे नाजूक तंत्रही त्यास संभाळावे लागे. ही कामे त्याने कार्ये सुव्यवस्थितपणे पार पाडली.

## ४.२ कारभाराचे सामान्य स्वरूप

नानासाहेब पेशव्यांनी १७४० पासून ते १७६१ पर्यंत एकंदर एकवीस वर्षे पेशवाईचा कारभार केला. या काळाचे मुख्यतः दोन भाग पडतात. पहिल्या ९ वर्षाचा काळ म्हणजे डिसेंबर १७४९ छ. शाहूच्या निधनापर्यंतचा. या पूर्वार्धांत नानासाहेबांचे आचारस्वातंत्र्य फार संकुचित होते. किंबहुना काही वेळी तो केवळ छ. शाहूचा हस्तक या नात्याने वागत असे. या दृष्टीने पहाता या काळातील कारभाराच्या यशापयशाची जबाबदारी बरीचशी छ. शाहूवर टाकावी लागेल. नानासाहेबास केवळ स्वतःचे पद राखणे हा प्रधान हेतु मनात ठेवून या काळात वागत होते. कारण त्या एकाच गोष्टीच्या बळावर त्यास मराठमंडळात काही कार्य करून दाखविण्यास अधिकार येत होता. छ. शाहूच्या मृत्यूनंतरची नानासाहेबांची तीन वर्षे रामराजाची परीक्षा करण्यात गेली. त्यांच्या अंगी काही कर्तृत्व नाही अशी खात्री झाल्यावर नानासाहेबाने स्वतःच्या बुध्दीनेच मराठशाहीचा कारभार करण्याचा प्रयत्न केला. १७५२ नंतरच्या या उत्तरार्धातील कारभाराची जोखीम सर्वथा त्यांच्यावरच येते. छ. शाहू जिवंत असेपर्यंत वर्षानुवर्षे साताऱ्यास जाऊन केल्या कामाचा पाढा छ. शाहूस देऊन त्याची मर्जी राखणे व आपणांविरूद्ध चाललेल्या इतर पक्षांच्या खटाटोपास तोंड देणे, ही कामे त्यास करावी लागत होती. या गोष्टींची राज्यहितास काहीही जरूर नव्हती. त्यात केवळ काळाचा अपव्यय झाला. पण मराठशाहीच्या विशिष्ट घटनेमुळे या गोष्टी न करूनही चालण्यासारखे नव्हते. इतर सरदारांप्रमाणे आपले पद हे एक स्वतः साठी

जहागीर कमावण्याचे साधन एवढाच पेशव्याचा हेतु असता, तर त्यास भोसले गायकवाड इ. सरदाराप्रमाणे बाहेरचे क्षेत्र संपादून सहज तसे करता आले असते. पण त्यापेक्षा उच्च दृष्टी ठेवून, पेशव्याचे पद म्हणजे सर्व सरदार व अष्टप्रधान या सर्वांची मोट बांधून एकरूपतेने मराठेशाही हाकण्याची जबाबदारी असा अर्थ मनात घेवून, तदनुरूप इष्टकार्यसिद्ध्यर्थ अविश्रांत उद्योग करणे, हे नानासाहेबांचे ध्येय होते. छ. शाहूच्या हयातीत या ध्येयाप्रमाणे वागण्यास मोकळीक नव्हती उत्तरार्धात ती अंशतः तरी त्यास मिळाली, हा या दोन भागांतील फरक लक्षात ठेवणे जरूर आहे. पूर्वार्धांत सातारा ही मराठशाहीच्या म्हणजे दिवसेंदिवस वृद्धि पावणाऱ्या पेशव्याच्या कारभाराचे केंद्र होते, तर उत्तरार्धात ते स्थान पुण्यास प्राप्त झाले, ही गोष्टही लक्षात ठेवली पाहिजे.

नानासाहेबाच्या कारभाराचे रहस्य समजण्यास हिंदुस्थानची तत्कालीन परिस्थिती डोळ्यांसमोर आणणे आवश्यक आहे. मुलुखगिरी हा मराठ्यांच्या साम्राज्याचा एक कायमचा विशिष्ट उद्योग होता आणि असे असणे हे त्या साम्राज्याच्या अस्तित्वाचा जो प्रधान हेतु म्हणजे यवनाक्रांत हिंदुस्थान सोडवणे, त्यास पोषक बनवणे. अर्थात हिंदुस्थानातील सर्व सत्ताधीशांशी मराठ्यांचा साहजिकच संबंध येत असे. हे संबंध समजण्यासाठी अठराव्या शतकाच्या मध्यातील राजकीय पट कसा होता ते पाहिले पाहिजे. मुघल बादशाहीला नादिरशहाने शेवटचा धक्का देऊन पुरे खिळखिळे केले. तो स्वतःच त्या साम्राज्याचा अधिपति बनला असता तर हिंदुस्थानात एका नव्या बादशाही वंशाची स्थापना होऊन राज्यकारभारात काही जोम शिरला असता. परंतु नादिरशहाने येथील बादशाहीचा लोभ सोडून परत इराणास प्रयाण केले. त्याच्या खुनानंतर त्याचाच शिष्य अहमदशहा अब्दाली याने त्याचेच अनुकरण केले. म्हणजे हिंदुस्थानात राज्य न स्थापता वारंवार स्वाऱ्या करून केवळ द्रव्यहरणाचे काम त्याने पुढे चालविले. त्यामुळे मोगलांच्या राज्यात नवीन पक्षभेद उत्पन्न झाले. कोणतेही राज्य दुसऱ्यास वर्षानुवर्षे डोईजड खंडणी देऊन टिकू शकणार नाही. मग आधीच सुभेदारांनी विभागलेले मोगली साम्राज्य कसा टिकाव धरणार! बादशहास न जुमानणारे सुभेदार साहजिकच एक तर पूर्ण स्वतंत्र झाले किंवा या नव्या जेत्यास मिळाले आणि अशा या मोघल बादशाहीपासून हिंदुस्थान सोडवणे हा मराठ्यांचा हेतु होता. अर्थात या उद्योगाने पुढे मराठ्यांचा अहमदशहा अब्दालीबरोबरचा संघर्ष अपरिहार्य बनला.

मोगलापासून हिंदुस्थान सोडवणे हे या बाहेरच्या कारणांमुळे दुष्कर झाले, पण घरच्या एका कारणामुळेही ते कठीण झाले होते. ते कारण म्हणजे छ. शाहूकालीन मराठेशाहीची घटना होय. ''पातशाही रक्षून हिंदुस्थान आपले करावे'', अशी छ. शाहूची अशक्य इच्छा. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनी हिंदुस्थानात केलेले करार छ. शाहूच्या या इच्छेशी निगडीत झाले होते. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याचप्रमाणे एका प्रदेशात दोन सत्ताधीश नांदू शकणार नाहीत. नांदावयाचे तर त्यातला एक केवळ नामधारी असला पाहिजे. मराठ्यांनी यवनाक्रांत हिंदुस्थान सोडवावयाचे तर बादशहा नामधारी झाला पाहिजे होता. पण तो नामधारी म्हणून तरी राखावयाचा म्हणजे त्यामुळे होणारा निष्कारण खर्च व त्रास सोसणे भाग होते. असा पेच मराठेशाहीचा कारभार करणाऱ्यांवर येऊन पडे. हिंदुस्थानातील मोघल बादशाहीचा अभिमान धरणाऱ्या मुसलमानांशी जरा नरमाईने घेऊन राजकारण सुलभ करणे हा या दंडकाचा व्यवहारीक उपयोग असला, तरी त्यामुळे मराठ्यांच्या साम्राज्यास कमीपणा येत असे व कित्येक वेळा तर या दांभिकतेमुळे राजकारण करणे अवघड जात असे. ते कसेही असले तरी नानासाहेबास हा जुना दंडक सोडणे शक्य नव्हते. महाराष्ट्राची मनोरचना त्या काळी एकदम जुने मोडून नवे करण्यासारखी नव्हती. खरे शास्त्री म्हणतात, पेशव्याच्या अधिकारासारखा दुसरा अधिकार दुनियेत कधी कोणी चालविला नसेल. दिल्लीपती बादशहा आपणास अखिल भरतखंडाचे सार्वभौम समजत असे व लोकमतही तसेच होते. छत्रपतींची गादी या सार्वभौमास पराभूत करून उभारलेली होती. अर्थात ती स्वतंत्र म्हणजेच सार्वभौम ठरली. पेशवे हे या छत्रपतीचे प्रधान. मोगल हे मराठ्यांचे शत्रु म्हणजे पेशव्यासही तसेच. परंतु छत्रपतीची इच्छा दिल्लीपती राखण्याची व हे दिल्लीपती तर राजा छ. शाहूला आपला अंकित समजत असे. इकडे पेशवा छत्रपतींचा प्रधान म्हणून मोघलांच्या सुभ्यावर स्वारी करीत असे, तर लगेच तो दिल्लीपतीकडून सुभेदारांची वस्त्रे मिळविण्यात भूषण मानीत असे. दिल्लीपतीचा सुभेदार या नात्याने इतर सुभेदार त्यास आपल्याशी समान दर्जाचा मानीत व छत्रपतींनी निर्मिलेले सरदारही त्यास बरोबरीचाच समजत. अशा विलक्षण घोटाळ्यांचा अधिकार संभाळून पेशव्यास कारभार करावा लागत असे.

आपणच अधिकार दिलेले सुभेदार आपल्या ठायी स्वतंत्र होऊ लागले, तेव्हा कमकुवत बादशहास त्यांची खोड मोडण्याकरिता मराठ्यांची मदत घेणे जरूरीचे वाटू

लागले. उलट मराठ्यांची स्वारी आली हे निमित्त सांगून त्यामुळे आपणास दिल्लीस काही पाठविता येत नाही असा बहाणा हे सुभदार करीत. बादशहास तरी मनातून हे मराठे कोठे पाहिजे होते? त्यामुळे पुष्कळ वेळा संधी पाहून बादशहा सुभेदारास मराठ्यांविरूद्ध उत्तेजन देत असे. मराठे विजयी होऊन दिल्लीस आले तर 'बरी शिरजोर सुभेदाराची खोड मोडलीत', म्हणून बादशहा त्यास शाबासकी देई; सुभेदारांनी त्यांचा पराभव केला, तर 'बरा गनिमांचा सूड घेतलात' म्हणून बादशहा सुभेदारास खिलाती पाठवीत असे. छत्रपतीच्या सनदांच्या बळावर नागपूरकर भोसले बंगालवर स्वारी करीत, तर त्याच छत्रपतीचे मुख्य प्रधान दिल्ली पतीच्या सुभेदाराची कुमक करण्याच्या निमित्ताने त्याच भोसल्यावर हल्ला करीत, पण स्वत: मात्र ते मावळ्यांच्या सुभ्यावर स्वारी करण्यात मागे नसत. सारांश अठराव्या शतकात हिंदुस्थानात एका दृष्टीने केवळ अराजक स्थिती माजली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नव्हता. ज्याला, ज्या रीतीने, जेव्हा जेथे जितके, साधेल, तितके त्याने घ्यावे, हा एकच प्रयोग सर्वांनी उचलिला होता. अशा या धामधुमीच्या काळात ''आम्ही शिवाजी महाराजांचे शिष्य आहोत'' ही आठवण जागृत ठेवून नानासाहेबाने शक्य त्या रीतीने कारभार चालवला, यातच त्याच्या कामगिरीचे रहस्य दिसून येते.

संदर्भ- सरदेसाई गो. स., पे. द. २, ३, ४, ३१

हिंदुस्थानात या वेळी कोण कोणते सत्ताधीश होते ते पाहणे आवश्यक आहे. पहिला दिल्लीचा बादशहा त्याचा अधिकार जवळजवळ संपुष्टात आलेला असून वजीर सफदरजंग, रोहिले, बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान, दक्षिणेत निजाम उलमुल्क वगैरे बलाढ्य सरदार आपापल्या जागी स्वतंत्र होऊ पहात होते. यापैकी निजाम हा तर मराठ्यांचा दक्षिणेकडील धूमकेतूच होता. दक्षिणेत मराठ्यांच्या सत्तेस तोंड देऊन आळा घालणारा निजाम हा पुरूष या वेळी झाला नसता तर या देशाचा इतिहास कदाचित बदलला असता, इतके या निजामाचे महत्व हिंदुस्थानच्या इतिहासात त्या वेळी होते. हा घराजवळचा शत्रु कायमचा असल्याने मराठ्यांच्या बाहेरील उद्योगास खीळ बसत असे. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव या दोहोंच्या काळाला पुरून पुढे नानासाहेबासही तो त्रासदायक ठरला. त्याच्याच सारखा हुशार बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान हा नुकताच स्वतंत्र होऊ पहात होता. त्याच्या हुशारीमुळे मराठ्यांचे पाऊल बंगालमध्ये मराठ्यांना ठेवणे शक्य झाले नाही. त्यामुळे इंग्रजांना बंगालमध्ये

आपले वर्चस्व निर्माण करण्यात यश आले. वजीर सफदरजंगाने मराठ्यास गंगेपार ठेविले व हिंदूची पुण्यक्षेत्रे आपल्या ताब्यात राखून त्यांचे नाक सदैव आपल्या हातात राखले. रोहिल्यांनी अफगाणिस्तानांतून अहमदशहा अब्दालीस आणून मराठ्यास कुरघोडी केली. एवढेच नव्हे तर जाट व रजपूत यांच्यात वितुष्ट निर्माण करून आपसातील भांडणांनी त्यांना कमकुवत केले. मराठ्यांची पडती बाजू पाहून परकीय इंग्रज किनाऱ्यावर दबा धरून होते. त्यांनी आपला पसारा वाढविण्यास सुरुवात केली. इतक्या सर्व परकीयांशी नानासाहेबास तोंड द्यावयाचे होते. पण घरातही ताराबाई, रघुजी भोसले, प्रतिनिधी बाबुजी नाईक, दमाजी गायकवाड इत्यादी सरदारांना वचक बसविणे व शिंदे होळकरांकडून कामे करून घेऊन नानासाहेबास पेशवाई चालवायची होती. या वरील सर्व संकटावर त्याने आपल्या मुत्सदगिरीने मात केली.

## ४.३ रघुजी भोसल्यांशी समेट

छ. शाहू गादीवर आल्यापासून मराठशाहीत पक्षभेद निर्माण झाले. प्रतिनिधी, सेनापती, भोसले, आंग्रे वगैरे सरदार आपणास पुरातन समजत, आणि नवीन पेशव्यास बाहेरचे मानून त्याजशी विरोधाची भावना ठेवीत. त्यामुळे पेशव्याला शिंदे, होळकर, बुंदेले, प्रभृती असे आपल्या भरवशाचे नवे सरदार निर्माण करावे लागले. जुन्यांपैकी ज्यास सामर्थ्य होते, त्यास छ. शाहूने स्वतंत्र उद्योगाचे क्षेत्र नेमून दिले. यामुळे जुने सरदार व पूर्वीचे अष्टप्रधान बहुतेक पेशव्यांचे विरोधी बनले. नानासाहेब पेशवाई मिळाल्यावर सेनापती दाभाडे व प्रतिनिधी यांचे महत्व कमी झाले. या दुहीचा एक परिणाम असा झाला होता की, बाजीरावाने दक्षिणेतील कारभारातून आपले लक्ष काढून उत्तरेकडे दृष्टी ठेवली. प्रतिनिधी, फत्तेसिंग भोसले वगैरे सरदारांनी कर्नाटकात दोन तीन वेळ स्वाऱ्या केल्या तरी सावनूर, ककडपे, शिरे, कर्नूळ, अर्काट, म्हैसूर, बिदनूर, सोधे व इतर अनेक लहानमोठी जी संस्थाने त्या प्रदेशात वाढली होती, त्यांचे शासन होण्याइतके मोठे सैन्य किंवा तितके पराक्रमी सरदार त्या बाजूस कधीच गेले नव्हते. या प्रदेशाच्या अगदी दक्षिणेस मराठ्यांच्या स्वराज्याचा एक अंश म्हणून तंजावरचे संस्थान व्यंकोजीच्या वंशाकडे चालत होते. त्याठिकाणी १७४० मध्ये राजा प्रतापसिंह गादीवर होता. याच वेळी अर्काटच्या नबाबाचा जावई चंदासाहेब हा त्रिचनापल्लीचा विख्यात किल्ला जिंकून फार प्रबळ बनला व त्याने तंजावरचे सुपीक राज्य हस्तगत करण्याचा उद्योग चालविला. या प्रबल शत्रूंशी तोंड देण्याचे

आपले सामर्थ्य नाही हे जाणून प्रतापसिंहाने साताऱ्यास छ. शाहूची मदत मागितली. छ. शाहूला आपल्या या आप्त घराण्याबद्दल फार आपुलकी भावना असल्यामुळे त्याने प्रतापसिंहास मदत पाठविण्याचा निश्चय केला. या उपक्रमाने दक्षिणेच्या सहा सुभ्यात चौथाईचा अंमल बसविणे हा जो बाळाजी विश्वनाथाने आणलेल्या सनदांचा उद्देश त्याचीही पूर्तता सहजच होणार होती. कारण कर्नाटक वगैरे मुलूख विजापूर व गोवळकोंडे या दोन सुभ्यांच्या भागातील होता. या कर्नाटकाच्या स्वारीवर छ. शाहूने फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर याची योजना केली आणि रघुजीस त्याचा मदतनीस म्हणून नेमले. यावेळी बाजीराव उत्तरेस नादिरशहाविरूद्ध बादशहास मदत करण्यास गेला होता. उभयता भोसल्यांची फौज १७४० मध्ये एप्रिल महिन्यात कर्नाटकात उतरली. कडप्पा व अर्काट या जिल्यांच्या दरम्यान दमलचेरीचा घाट आहे. तेथे मराठ्यांस अडविण्यासाठी नबाब दोस्तअली फौज घेऊन सज्ज राहिला. प्रथम मराठ्यांनी त्याच्याशी सामोपचाराची बोलणी केली; पण नबाबाकडून त्यांची उडवाउडवींची उत्तरे आलेली पाहून मराठ्यांच्या निवडक दहा हजार स्वारांनी दुसऱ्या मार्गांने जाऊन दोस्तअल्लीस वळसा देऊन वेढले. तेव्हा मोठे घनघोर युद्ध होऊन नबाब दोस्तअली, त्याचा धाकटा मुलगा हसनअली व दुसरे कित्येक नामांकित सरदार मारले गेले. त्याचा दिवाण मीर आसद कैद झाला आणि मराठ्यास मोठा जय मिळाला. ही लढाई २० मे १७४० रोजी झाली.

कर्नाटकातील या मुख्य संस्थानिकाच्या पराभवाने मराठ्यांचा दरारा वाढला. अनेक संस्थानिक गलितगात्र झाले. नबाबाचा मुलगा सफदरअली बापाच्या मदतीस येत होता. तो वेलूरच्या किल्ल्याच्या आश्रयास गेला. मयत नबाबाचा जावई चंदासाहेब यास स्वतः नबाब होण्याची महत्वाकांक्षा असल्याने तोही त्रिचनापल्ली सोडून नबाबाच्या मदतीस आला नाही. मात्र त्याने व सफदरअलीने मयत नबाबाचे कुटुंब, उभयतांची बायका-मुले व एकंदर जडजवाहीर ही मराठ्यांच्या हाती लागू नयेत, म्हणून पांडेचेरीस फ्रेंचांच्या ताब्यात ठेवले. याच सुमारास बाजीरावाच्या मृत्यूची खबर ऐकून पेशवेपदाबद्दल खटपट करण्यासाठी रघुजी स्वारींतून तसाच साताऱ्यास त्वरित परत आला, पण बाबुजी नायकास पेशवाई न मिळाल्यामुळे तो तसाच कर्नाटकात परत गेला. तेथे एक कोट रूपये घेऊन मराठ्यांनी सफदरअलीस अर्काटचा नबाब केले; आणि त्याचा प्रतिस्पर्धी फ्रेंचांच्या मदतीमुळे बळावलेला चंदासाहेब यास त्रिचनापल्लीच्या किल्ल्यामध्ये

वेढले. या वेढ्यांत मुरारराव घोरपडे गुत्तीकर याने मर्दुमकी दाखवून चंदासाहेबाला आणि त्याच्या मुलाला कैद केले. नंतर रघुजी १७४१ मध्ये चंदासाहेब वगैरे कैद्यास बरोबर घेऊन साताऱ्यास परत आला. या यशस्वी स्वारीमुळे रघुजीचा पराक्रम व शहाणपण कसोटीस लागून त्याच्यावर छ. शाहूची मर्जी बसली, त्यामुळे रघुजीचे महत्व वाढले. छ. शाहूने त्रिचनापल्लीचे ठिकाण मुरारराव घोरपड्यांचे स्वाधीन केले, आणि चंदासाहेबास सातारचे किल्ल्यात कैदत ठेवले. तेथे तो आठ वर्षे कैदेत राहिला. तसेच वऱ्हाड, गोडवण वगैरे पूर्व हिंदुस्थानातील प्रदेश हस्तगत करण्याची कामगिरी रघुजीस सांगून त्या प्रदेशांच्या सनदा त्यास दिल्या.

बाजीराव मरण पावल्यावर शिंदे, होळकर, आवजी कवडे, पिलाजी जाधव प्रभृती इत्यादी त्याचे सरदार साताऱ्यास परत आले. पेशवाई मिळाल्यावर नानासाहेबाने त्यांच्या विचाराने व छ. शाहूच्या अनुमतीने उत्तरेकडे स्वारीवर जाण्याचा बेत ठरविला. स्वारीचा उद्देश माळव्याच्या सनदा बादशहाकडून निजामामार्फत मिळवणे हा होता. बाजीरावाने १७३८ मध्ये निजामाचा भोपाळ येथे जो मोठा पराभव केला, तेव्हा निजामाने माळव्याच्या सनदा बादशहाकडून घेऊन बाजीरावास द्याव्या असे ठरले होते. पण निजामाच्या मनातून हातात असलेला हा सुभा सोडावा असे वाटत नव्हते. पुढे पेशव्यांच्या सरदारांनी तो प्रांत व्यापला व दिल्लीस नादिरशहाच्या पश्चात उडालेल्या धामधुमीमुळे तिकडूनही मराठ्यास पायबंद घालणे दुरापास्त झाले. तरीही निजाम काही आपले वचन पूर्ण करीना. तेव्हा त्यास खूष करून काम साधण्याच्या हेतूने नानासाहेबाने ही स्वारी प्रथमच हाती घेतली. तो वऱ्हाडात पोचला. तेव्हा पुण्यास चुलता चिमाजी आप्पा १७ डिसेंबर १७४० रोजी मरण पावल्याची खबर त्यास मिळाली. बाजीरावाच्या हयातीत चिमाजीच सर्व व्यवहार पहात असे. बाजीराव फक्त बाहेरील धोरणे सांभाळत असे. छ. शाहूशीं चिमाजीचें संबंध चांगले होते. म्हणूनच नानासाहेबास पेशवाई मिळाली. तो आणखी जगला असता तर नानासाहेब सरदारकीवर जाण्यास मोकळा झाला असता, मागची चिंता त्यास राहिली नसती. तो गेल्यामुळे मागची पुढची सर्व चिंता नानासाहेबांवर येऊन पडली.

या वेळी निजाम दिल्लीस होता. ही संधी पाहून त्याचा मुलगा नासिरजंग याने दक्षिणेत त्याच्या विरूद्ध बंड केले. तेव्हा आपले कार्य साधण्यासाठी नानासाहेबाने मुलाविरूद्ध बापास मदत करण्याचे ठरविले. मुलाच्या बंडाची बातमी निजामास

समजताच, तेव्हा तो ताबडतोब दक्षिणेत आला. येताना त्याने आपला वडील मुलगा गाजीउद्दीन यास बादशहाकडून अमीरउमराव हे पद देवून आपले महत्व दरबारी कायम रहावे म्हणून दिल्लीस बोलावून घेतले. निजाम वऱ्हाडात येऊन पोहोचला तेव्हा नानासाहेबाने त्याची एदलाबाद येथे भेट घेतली. पण वृद्ध निजाम पुरा धूर्त त्याने नानासाहेबाचा बहुमान केला, मेजवान्या केल्या, भेट घेतली. पण सैन्याच्या मदतीबद्दल १५ लाख रूपये मिळण्यापलीकडे पेशव्यास दुसरी काही प्राप्ती या भेटीत झाली नाही. माळव्याची सुभेदारी आपली आहे, परंतु पेशवे आपल्या आदेशाने वागतील तर त्यास आपण नायब नेमू असे निजामाने नानासाहेबास कळविले यावेळी छ. शाहूचा वकील आनंदराव सुमंत त्याजवळ होता. त्याच्यामार्फत त्याने टाळाटाळीचे राजकारण चालविले. रघुजी भोसले व बाबुजी नाईक यांच्या मदतीने पेशव्याच्या उद्योगास आळा घालण्याचा निजामाचा बेत होता. इकडे फौजेच्या बळाशिवाय कोणतेही करार पुरे केले जात नाहीत, हे ओळखून नानासाहेबाने फौज घेऊन माळवा प्रांतावर चढाई केली. या वेळी धारचा यशवंतराव पवार जवळचा मुलूख दडपून पेशव्यांच्याविरूद्ध वागत असे. तेव्हा मल्हारराव होळकराने धारचा किल्ला घेऊन त्यास नरम केले. त्याबरोबर पवाराचे डोळे उघडून त्याने दाभाडे गायकवाडना वगळून पेशव्यांची हुकमत स्वीकारली. त्याबद्दल माळव्याच्या सुभ्यातील दहा टक्के वाटणी पवाराची म्हणून नानासाहेबाने ठरवून दिली. इकडे त्रिंबक हरी पटवर्धनाने नेमाड प्रांतातील बांड्याचे ठाणे घेतले. आवजी कवड्याने देवरी हस्तगत केली. अशा रीतीने सनदाआधीच माळव्यातील मुलूख हस्तगत करण्याचा उद्योग नानासाहेबाने चालविला.

एदलाबादेहून नानासाहेबाने पुढे माळव्यात जाऊन जयपूरचा राजा जयसिंग याची भेट ११ मे १७४१ रोजी धोलपूर येथे घेतली. पूर्वीच बाजीरावाने उदेपूर व जोधपूर ही राज्ये चौथाईखाली आणली होती, पण दिल्लीच्या दरबारात आपला कोणी तरी दोस्त असावा या हेतूने जयसिंगाशीं त्याने सख्य जोडले होते. माळव्याचा सुभा निजामास मिळण्यापूर्वी तो जयसिंगाकडे होता. सबब तो त्याच्या मार्फतच मिळविण्याचा मराठ्यांचा हेतु होता. एकमेकांनी एकमेकांस मदत करावी असे जयसिंगाने बादशहास सांगून माळव्याच्या सनदा पेशव्याच्या नावे करून द्याव्या, असे ठरले होते. कदाचित काही पैशाची प्राप्तीही या माळव्याच्या स्वारीत पेशव्यास झाली असावी. कारण स्वारीतून परत आल्यावर नानासाहेबाने बाबुजी नायकाच्या कर्जाची फेड करून त्यास

पुण्यांतून हाकलून दिले; तेव्हा बाबुजीने चिडून रघुजी भोसले व दमाजी गायकवाड यांचे सहाय्य घेऊन स्वतःच माळव्यावर स्वारी केली. त्यामुळे छ. शाहूची मर्जी प्रसन्न होऊन त्याने नायकास बारामतीची नवीन जहागीरी दिली. तेथेच पुढे या नाईक घराण्यांचे वास्तव्य झाले.

सन १७४१ मध्ये स्वारीतून परत आल्यावर त्या वर्षाचा पावसाळा नानासाहेबाने सातारा येथे घालविला. पेशव्याचे भाऊ रघुनाथराव व सदाशिवराव हे नेहमी साताऱ्यास जात येत असतच. त्यांच्याकडून दरबाराची माहिती पेशव्याला स्वारीत असताना समजत असे. छ. शाहूकडे त्याचे महत्व होते. मागील स्वारीत कर्जाचा भार हलका करून उत्तरेत बाजीरावाने बसविलेला दरारा त्याने कायम राखला आणि नवीन पेशवा कशा करामतीचा आहे. याची त्याने निजामास ओळख दिली. यापुढे आता उत्तरेकडील राजकारणे कशी उलगडावी हे कार्य नानासाहेबास ठरवावयाचे होते. याच वेळी रघुजी भोसले कर्नाटकच्या स्वारीत यश घेऊन परत साताऱ्यास आला. तेव्हा त्याची साहजिकच छ. शाहूवर छाप पडली. रघुजी जोरदार शिपाईगडी असून सुरुवातीपासून पेशव्यांशी फटकून वागत असे. छत्रपतींकडे वसूल पाठविण्यासही तो टाळाटाळ करीत असे. बाबुजी नाईक, प्रतिनिधी, गायकवाड वगैरे पेशव्याशीं बरे नसणाऱ्या मंडळींशी त्याची जवळीकता असे. छ. शाहूची धाकटी राणी व रघुजीची बायको या चुलत बहिणी होत्या. रघुजीचा मुलगा मुधोजी हा छ. शाहूने दत्तक घ्यावा अशी या राणीची इच्छा होती. अशा संबंधामुळे नानासाहेबाला रघुजीचे पारिपत्य करणे कठिण होते. रघुजीचे बाजीरावाचे काळात कधीच काही चालले नाही. उलट बाजीरावनेच प्रयागपर्यंत स्वाऱ्या करून मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. निजाम कित्येक वर्षे दिल्लीस होता. याही गोष्टीचा फायदा घेऊन, गोंडवणात आपला जम त्याने बसविला. परंतु आता निजाम परत आल्याकारणाने व पेशव्याने उत्तरेकडे नजर फिरविल्याने रघुजीस पुन्हा आपल्या मुलखाची काळजी निर्माण झाली. म्हणूनच कर्नाटकचा सुभा फत्तेसिंग भोसले व बाबुजी नाईक याजकडे सोपवून तो त्वरेने छ. शाहूची रजा घेऊन वऱ्हाड प्रांतात परत गेला.

रघुजी जातिवंत मराठा असून त्याच्याकडे विशिष्ट गुण होते. ऐषआरामाचा तिटकारा, घोड्यावर भाकरी खाऊन स्वाऱ्या करणे, बरोबरीच्या नात्याने व ममतेने वागून शिपायास राजी राखणे, सावधगिरी ठेवून उद्योग फैलावणे वगैरे त्याच्या

गुणांबरोबर सवत्या सुभ्याची आवड, फटकून वागण्याचा स्वभाव, नियंत्रणाचा तिटकारा, आपमतलबीपणा हे मराठ्यांचे गुण व दुर्गण त्याच्या ठिकाणी भरपूर होते. रघुजीची इच्छा उत्तरेत वर्चस्व निर्माण करणे ही होती, याउलट पेशव्याचा उत्तरेकडे एकछत्री अंमल सुरू करण्याचा असल्याने दोघांची कार्यक्षेत्रे सहजच परस्परांस आड येऊ लागली. माळवा ताब्यात घेणे हा नानासाहेबाचा मुख्य हेतु. तो पुरा ताब्यात येण्यासाठी प्रत्येक गाव जिंकत जाण्यापेक्षा वेगळीच युक्ती त्याने योजली. माळव्यापलीकडे बुंदेलखंडात बाजीराव पेशव्यास छत्रसालाने राज्याचा तिसरा हिस्सा दिला होता. पण तो ताब्यात घेतलेला नसल्यामुळे तो ताब्यात घेणे आवश्यक होते. हे ओळखून नानासाहेबाने सन १७४१ मध्ये बुंदेलखंडावर स्वारी केली. त्यामुळे प्रयाग, काशी, गंगा यमुनांचा दुआब व बंगाल या प्रदेशांना आपोआपच शह बसला. असा बेत करून शिंदे, होळकर, जाधव, पटवर्धन, पुरंदरे, रेठरेकर वगैरे सरदार त्याने बरोबर घेतले. आपली बायको गोपिकाबाई हिलाही नानासाहेबाने बरोबर घेतले होते.

नानासाहेब प्रथम नेमावर प्रांतातून पुढे उत्तर गोंडावणात गेला आणि नर्मदेच्या उगमाजवळील गढा व मंडले ही दोन राज्ये त्याने जिंकली. तेव्हा रघुजीस त्याबद्दल मोठे वैषम्य वाटले. हा सर्व प्रदेश आपल्या कक्षेतील असताना असे नाना पेशव्याने येथे अतिक्रमण करणे यामुळे रघुजी चिडला. त्याने पेशव्यांना शह देण्याची तयारी केली. नानासाहेबाच्या मनात पेशवाई प्रकरणापासून रघुजीविषयी वाकडे होतेच. तेव्हा प्रसंगी विशेष शाहूसही दुर्दम अशा या मराठेशाहीतून फटकून राहणाऱ्या सरदारास या निमित्ताने नरम करण्याचाच नानासाहेबाने विचार योजला. या त्याच्या विचारास बळकटी आणण्यास आणखी एक कारण या प्रसंगी घडले. नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशात म्हणजे गुजरात, माळवा वगैरे सर्व भागात पेशव्याचा संबंध नाही असे दाभाडे, गायकवाड, पवार, बांडे व प्रभूतींचे म्हणणे होते. त्यापैकी यशंतराव पवारास मल्हारराव होळकराने ताळ्यावर आणून पेशव्याचा अंकित बनविले. पुढे पेशवा बुंदेलखंडात गुंतल्याची संधी पाहून दमाजी गायकवाड व बाबुजी नाईक यांनी रघुजीच्या प्रोत्साहनाने माळव्यावर स्वारी केली व काही खंडणी वसूल केली. जणू पेशव्यांच्या माळव्यावरील हक्कास खो देण्याचा हा प्रकार होता. अर्थात रघुजीचा या प्रकरणांतील भाग मनात ठेवून, संधी साधून त्यास पेचात आणणे पेशव्यास जरूरीचे वाटले. सुदैवाने या स्वारीत असताच रघुजीला बंगालमध्ये शह देण्याची संधीही पेशव्याला चालून आली.

दरम्यान बंगालचा नबाब अलिवर्दीखान बनला. बंगालच्या सुभेदाराच्या हाताखालीच बिहार व ओढ्या हे दोन पोटसुभे होते. ओढ्याप्रांतावर मीर हबीब म्हणून नायब होता. त्याचे व अलिवर्दींचे वैर होते. त्यामुळे हबीबने भोसल्यांची मदत मागितली. रघुजीचा डोळा आधीच या सुपीक प्रांतावर होता, त्यात त्याने १७४२ च्या सुरुवातीस आपला सरदार भास्कर राम कोल्हटकर यास बंगालच्या स्वारीवर पाठविले. याच सुमारास वार्षिक वसुलीसाठी बादशहाचे अंमलदार बंगालमध्ये आले. अलिवर्दीखानास अजून बादशहाने सुभेदारीची वस्त्रे पाठविली नव्हती. तेव्हा खानाने त्या अंमलदारास सांगितले 'प्रांतावर मराठे चालून आले आहेत. त्यांच्या बंदोबस्तासाठी लौकर मोठी फौज मदतीस पाठवा. नाही तर सुभा हातांतून गेला असे समजा. तसेच मला सुभेदार नेमलेले नाही, तेव्हा माझे ऐकतो कोण व मला वसूल देतो कोण?' याच वेळी नानासाहेबास माळव्याच्या सनदा द्याव्यात असे बोलणे जयसिंगाने बादशहाजवळ काढले होते. त्यास बादशहाने कळविले की, आधी पेशव्याने बंगालमधील संकट दूर करून आपली बादशाही तख्ताबद्दलची राजनिष्ठा पटवून द्यावी, म्हणजे मग त्यास सनदा देऊ. तसेच अलिवर्दी खानासही त्याने कळविले की तू रघुजी भोसल्यास हुसकावून बंगाल प्रांताची राखण कर म्हणजे तुझ्याकडे सुभेदाराची वस्त्रे पाठवितो. अशा रीतीने खानास दिल्लीहून आपल्या पारिपत्यास कोणी येते की काय याची जी प्रथम भीती वाटत होती ती नाहिशी होऊन, उलट नवीन बळकावलेल्या प्रांताच्या रक्षणासाठी त्यास पेशव्याची मदत आयती मिळाली. नानासाहेबास बादशहाची मर्जी संपादन करण्यासाठी बंगालमध्ये जाणे भाग पडले. एवढेच नव्हे तर रघुजीची खोड मोडण्याची संधीही मिळाली. एरवी पेशव्याने रघुजीवर मुद्दाम स्वारी करणे गैर दिसले असते. बादशहाने अलिवर्दीखानला पाटण्याच्या चौथाईची रक्कम नानासाहेब पेशव्यास देण्याबद्दल हुकूम पाठविला. नानासाहेब बंगालमध्ये जाणार तोच आधी अलीवर्दी खानाने भास्कर रामाचा पराभव करून त्यास परत हाकलून लावले. भास्कर राम परत आल्यावर पुनः त्यास बंगालवर पाठवायचे रघुजीच्या मनात होते. पण तिकडे तो गेल्यास पेशवा ही तिकडे जाणार हे त्यास कळले होते. तेव्हा पेशव्यास बंगालकडे जाता येऊ नये म्हणून रघुजीने इकडेच पेशव्याच्या सैन्यावर स्वारी केली. तेव्हा नानासाहेबाने रघुजीचा भडाले मुक्कामी पराभव केला. पुढे रघुजीने १७४३ मध्ये बंगालवर दुसऱ्यांदा स्वारी केली, ही बातमी ऐकून पेशवा एकदम प्रयाग, काशी,

गयामार्गे बंगालमध्ये गेला व त्याने रघुजीचा पराभव करून त्यास पळवून लावले. रघुजीवरील या स्वारीचा प्रत्यक्ष उल्लेख आजपर्यंत मराठी कागदपत्रात सापडत नव्हता. पण नुकताच कोटा येथील सारस्वत पंडित घराण्याच्या दप्तरात तो मिळाला आहे. राणोजी शिंदेने बाळाजी यशवंतास २० जून १७४३ रोजी लिहीलेल्या पत्रात मकसुदाबादेवरील स्वारीची व रघुजीच्या पराभवाची हकीकत स्पष्ट दिली आहे.

या योग्य वेळी केलेल्या मदतीमुळे बादशहा व खान यांच्यापासून नानासाहेबास पैसा मिळाला आणि बादशहाची त्याच्या निष्ठेबद्दल खात्री झाली; तेणेकरून माळव्याची सनद मिळणे सुलभ झाले. या घडामोडी १७४२-४८ मध्ये घडलेल्या दिसून येतात.

या स्वारीत नानासाहेबाने काशी, प्रयाग व गया या तीन क्षेत्रांची यात्रा जाता येता पूर्ण केली. आपण प्रदेश लुटण्यासाठी आलो नसून आपली तीर्थस्थळे यवनांच्या हातातून सोडविण्यासाठी आलो आहोत, अशा प्रकारचा तिकडील लोकांचा समज करून देण्याचा उद्योग या प्रसंगी नानासाहेबाने केला, यात त्याचे राज्यकौशल्य दिसून येते. प्रत्येक तीर्थाचे जागी त्याने सर्व विधी यथासांग केले. तेथील देवब्राम्हणांची उपासना व सद्‌भावना केली. त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि अशा रीतीने आपल्याविषयी एक जातीचा पूज्यभाव लोकांचे ठिकाणी त्याने उत्पन्न केला. प्रयाग, काशी वगैरे क्षेत्रे वजिराकडून आपल्या ताब्यात घ्यावी अशी पेशव्यांची फार इच्छा होती व ती त्याने वेळोवेळी अनेक पत्रातून सरदारांना कळविल्याचे दिसून येते.

सैन्याच्या बळावर रघुजीस ताळ्यावर आणण्याचा हेतू या स्वारीत पेशव्याने पूर्ण केला. मुख्य कार्य बुंदेलखंड जिंकून व तेथे तळ देऊन बादशाहीस शह देणे हे होते. सन १७३४ मध्ये बाजीरावाला छत्रसालाने मदतीबद्दल राज्याचा तिसरा हिस्सा दिला. तो दूरचा प्रदेश त्यावेळी पेशव्याला पूर्णपणे ताब्यात घेता आला नाही. या प्रदेशाबद्दल पेशव्याला सालिना फक्त सात लाख रूपये स्वामित्व म्हणून मिळत असे. याप्रमाणे वहिवाट चालली असता सन १७४२ मध्ये नानासाहेबाने मल्हार कृष्ण व राणोजी शिंदे या सरदार खंडणीच्या वसुलीस पाठवले. त्यांनी झाशीत मुक्काम केला असता त्या रात्री ओर्च्छेकर बुंदेल्यांनी त्यावर छापा घातला व मल्हार कृष्णाचे व राणोजीचा मुलगा ज्योत्याचे शीर कापून नेले. हे समजताच नानासाहेबाने नारो शंकर राजेबहाद्दर यास बुंदेल्यांवर पाठविले. त्याने मोठ्या पराक्रमाने ओर्च्छा शहर जिंकून तेथे गाढवाचा नांगर फिरविला आणि तेथील राजास कैद केले. तेव्हा राजाने मराठ्यांचा हिस्सा व

शिवाय डोईकापणीबद्दल मल्हार कृष्ण प्रभृतींच्या वंशजास बरूवासागर वगैरे मुलूख कायमचा तोडून दिला. ओर्च्छाच्या राजाने तदुत्तर आपली राजधानी तेहरी येथे नेली. नारो शंकराने या वेळी झांशी शहर मराठ्यांची राजधानी केली आणि तेथे जुन्या ओर्च्छांतील कारागीर सक्तीने आणवून शहराची भरभराट केली. तसेच दक्षिणेतील अनेक कुटुंबे झाशीत आणून तेथे दक्षिणेतील लोकांची वसाहत केली. झाशी हे दक्षिणेस जाणाऱ्या हमरस्त्यावर असल्यामुळे वरील उपक्रमाने तेथील व्यापार वाढून ते लवकरच सधन झाले. या भागात मराठ्यांचा मोठा भरणा अद्यापपर्यंत आहे. त्याचा मूळ उगम नानासाहेब पेशव्याने केला.

संदर्भ- गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, पृष्ठ क्र. ८१

नानासाहेब बंगालकडे जाताना येताना ओर्च्छांतच तळ देऊन राहत असे. आणि तेथूनच तो चहूकडील योजना तयार करीत असे. अशा रीतीने बुंदेलखंडात पेशव्याचा अंमल बसला तेव्हा बादशहास माळव्याच्या सनदा देतो न देतो म्हणण्याची सोय राहिली नाही. त्यातूनही रघुजीकडून पेशव्याचा पराभव झाला असता तर बादशहास पळवाटा तरी सापडली असती. पण झाले नाही. इतके झाले तरी मराठ्यास सुभा देणे हा बादशहास अपमानच वाटला. म्हणून त्याच्या समजुतीखातर जयसिंग व निजाम यांनी अशी अक्कल लढवली की, शहजादा अहंमद याच्या नावे सुभेदारी करून पेशव्यास त्याचा नायब म्हणावे. हा मार्ग तात्पुरता उभयपक्षांना मान्य झाला. जुन्या बादशाही सनदांचे स्वरूप नेहमी असे की, नोकराने लेखी अर्ज करून बादशहाने तो मंजूर करावयाचा. या सनदांचे स्वरूप समजण्यासाठी पुढे त्यातील काही अटी दिल्या आहेत.

संदर्भ- सरदेसाई गो. स., मराठी रियासत, मध्यविभाग २, पृष्ठ क्र. ३१

खरे ग. ह., हिंगणे दप्तर, खंड १, पृष्ठ १७

## ४.४ मराठे व मोघल बादशहा यांच्यातील सनदा

१. मराठ्यांनी माळवा प्रांत सोडून दुसऱ्या प्रांतावर स्वाऱ्या करू नयेत.

२. इतर प्रांतांत सरदार गेल्यास त्यांचा बंदोबस्त पेशव्याने करावा.

३. पेशव्यांनी पाचशे स्वारांनिशी आपला एक सरदार बादशहाच्या चाकरीस ठेवावा.

४. बादशहाला जरूर पडेल तेव्हा चार हजार मराठी फौज त्याच्या मदतीस पेशव्याने पाठवावी. जास्त फौज मागितल्यास त्याचा खर्च बादशाहाकडून केला जाईल.

५. बादशहाने दिलेल्या मागणीपेक्षा जास्त मागणी पेशव्याने करू नये.

६. माळवा प्रांतांत बादशहांनी दिलेली इनामे, जहागिरी, धर्मादाय वगैरे यांच्याबाबतीत कामकाज पेशव्यांनी चालविले पाहिजेत.

७. जमीनदार लोकांकडून कर वगैरे घेणे ते ठरलेल्या करारापेक्षा जास्त घेऊ नयेत.

या शर्तीवर पेशव्यास माळव्याची नायब सुभेदारी देण्यात येत आहे.

प्रत्येक अटीपुढे पेशव्याने कबुली लिहावयाची होती. या करारास राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर, यशवंतराव पवार व पिलाजी जाधव यांनी पेशव्याचे जामिनदार म्हणून बादशहास साक्ष लिहून दिली की, बाळाजीरावाने करार न पाळल्यास आम्ही त्याची नोकरी सोडून देऊ. ही साक्षीदारी लिहून गेल्यानंतर बादशाही सनदा सहीशिक्यानिशी पेशव्याला मिळाल्या. नानासाहेब या स्वारीत डिसेंबर सन १७४१ पासून १७४३ च्या जूनपर्यंत दीडवर्ष बाहेर होता. दरम्यान छ. शाहू छत्रपती आजारी आहेत असे समजल्यामुळे ते तातडीने साताऱ्यास परत आले. दरबारी काय होईल याची धास्ती त्यांना नेहमीच असल्याने एकाच ठिकाणी तळ देऊन कधीच जास्त रहाता आले नाही. या कारणामुळे त्याच्या प्रत्येक स्वारीत उणेपणा रहात गेला. १७४३ मध्ये छ. शाहू बरा झाल्याचे त्यास समजले. म्हणजे घाईने येण्यात त्याचा विनाकारण वेळ वाया गेला. त्या काळी जाण्यायेण्यातच तसा पुष्कळ वेळ फुकट जात असे. रघुजी व पेशवा यांच्या युद्धप्रसंगाचे वर्तमान साताऱ्यास छ. शाहूंच्या कानावर आले होते. दोघातील तेढ पेशवाई मिळण्यापासून होती, हे छ. शाहू जाणून होते. दोन पक्ष निकरावर येऊन आपले न ऐकता वागू लागत, तेव्हा त्यास ताळ्यावर आणण्याचा छ. शाहूचा मार्ग ठरलेला होता. दोघास परस्पर झुंझावयास लावून एकाचा पाडाव झाल्यानंतर मग शिष्टाचाराच्या गोष्टी सांगून त्यांची समजूत घालावयाची असा छ. शाहूचा प्रघात असे. पराभवामुळे रघुजीचा हिरमोड झालाच होता, तेव्हा त्यासही छ. शाहूने साताऱ्यास बोलावून घेतले. बंगालमध्ये पराभव झाल्यावरसुद्धा रघुजी साशंक वृत्तीने पेशव्यांकडे पहात असे. पेशव्याने नागपुराकडे मोर्चा वळविल्यास त्यास अडविता यावे हा त्याचा हेतू होता. तेथे छ. शाहूने दोघांच्या कार्यक्षेत्राच्या

मर्यादा ठरवून दिल्या आणि कराराप्रमाणे वागू असे दोघांकडूनही लेखी लिहून घेतले ते खालीलप्रमाणे-

संदर्भ- साने का. ना., काव्ये इतिहास संग्रह, पत्रे, यादी लेखांक पृष्ठ क्र. ६८

१. पेशव्यांनी पूर्वी संपादिलेला मोकासा व जहागिरी; कोकण व माळवा प्रांताचा कारभार आग्रा, प्रयाग, व अजमीर प्रांताची खंडणी, पाटणा प्रांतातील तीन तालुके, कर्नाटकचे हद्दीत २० हजारांपेक्षा रघुजीच्या हद्दीत पेशव्यास दिलेले इनाम गाव, इतक्या बाबी पेशव्याच्या असाव्यात. त्यास इतरांनी हस्तक्षेप करू नये.

२. लखनौ, बिहार व पैन बंगाल, तसेच वऱ्हाडपासून कटकपर्यंतचा प्रदेश एवढ्या भागातील खंडणीचा सर्व हक्क रघुजीचा असेल, त्याला पेशव्याने किंवा इतरांनी हरकत करू नये.

याप्रमाणे आपापल्या प्रांतात रहावे. परस्परांच्या प्रांतात कोणाशीही अडथळा करू नये.

याप्रमाणे नानासाहेबाच्या पहिल्या तीन वर्षाच्या कामाचा आढावा घेता या तरूण पेशव्याने केवढी तडफ दाखविली व किती प्रकरणे युक्तीने तडीस लावली याची कल्पना येते. आले तेवढे पदरात पाडून घऊन पुढे जास्त मिळण्याची सोय त्याने करून ठेवली. बादशहा, निजाम, रजपूत राजे, बुंदेल या सर्वांवर त्याने आपला शह बसविला. इतकेच नव्हे तर प्रतिनिधी रघुजी, दमाजी प्रभृति या स्वकीय विरोधकांवर सुद्धा त्यांनी मात केली. यामुळेच छ. शाहूलाही राज्याचा गाडा पुढे नेणारा नानासाहेब पेशव्याइतका दुसरा लायक पुरूष नाही अशी खात्री झाली. बाजीरावाचे सर्व कर्ज शिवाय छ. शाहूंचेही सर्व कर्ज फेडून पुढील खर्चाची सोय पेशव्याने करून ठेवली. तिच्या बळावर पुढील काळातील समस्या व अडचणींचे निरसन केले. मात्र या पहिल्या दोन तीन स्वाऱ्यांतील उत्साह व तडफ छ. शाहूच्या पश्चात मात्र त्याने कायम ठेवलेली दिसत नाही.

पुढील काळात रघुजी व नानासाहेब यांचे मुलुखगिरीच्या क्षेत्राबद्दल पुनः कधी वाकडे आले नाही. रघुजीने बंगालकडील आपला उद्योग जोराने चालवून तो प्रदेश चौथाईखाली आणला, त्यासंबंधी हकीकत पुढे येईल. आपसातील भांडणापुरता या कराराचा चांगला परिणाम झाला, तरी मराठ्यांच्या आपापसातील बेकीचा समन्वयीत राजकारणाच्या कार्यक्षेत्राच्या या वाटणीमुळे कमीपणा आला. परिणामी बंगाल व

अयोध्या या भोसल्यांच्या क्षेत्रातील प्रांत परकीय इंग्रजांच्या वर्चस्वाखाली गेला.

## ४.५ नानासाहेबांच्या कालखंडातील दक्षिण व उत्तर भारतातील काही प्रमुख घटना -

नानासाहेबांच्या कारकिर्दीतील मराठ्यांच्या राज्यविस्ताराचे धोरण समजण्यास एकंदर हिंदुस्थानच्या राजकीय घटनेचे स्वरूप पहाणे आवश्यक आहे.

मोगल बादशहा हिंदुस्थानचा बादशहा म्हणवीत. ही त्यांची बादशाही अनेक सुभ्यात विभागलेली होती. रजपूत राजांसारख्या राज्याची राज्ये गोंडवणासारखे जंगली भाग व हिंदुस्थानातील न जिंकलेला प्रदेश या सर्वांचाच कोणत्या ना कोणत्या सुभ्यांत समावेश होत असे. मोगलांनी दक्षिणेत प्रवेश करून अकबरापासून औरंगजेबापर्यंतच्या कालखंडात तेथील सहा राज्ये जिंकून त्याचे सहा सुभे केले. परंतु या सहा राज्यात वस्तुतः तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील मुलूख बहुधा कधीच समाविष्ट नव्हता. विजापूर व गोवळकोंडे येथील सुलतानांनी विजयनगर धुळीस मिळविल्यानंतर त्या राज्यातील काही मुलूख पूर्ण जिंकला, परंतु म्हैसूर प्रभृति पाळेगारांच्याच ताब्यात होता. औरंगजेबाने कावेरीपर्यंत मजल मारली तेव्हा हा सर्व मुलूख त्याने या दोन सुभ्यांच्या कक्षेतील ठरविला. तरीही मदुरा, मलबार सारखी संस्थाने किंवा दोन राज्ये स्वतंत्रच होती. बाळाजी विश्वनाथाने दक्षिणच्या सहा सुभ्यांची म्हणजे विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशाची चौथाई बादशहाकडून करार करून घेतली, तेव्हा नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत संचार करण्यास मराठ्यांना बादशाहीची परवानगी मिळाली. खरोखरी पहाता चौथाई सरदेशमुखीचा हक्क मोघल सुभेदाराने आपल्याकडे होणाऱ्या रक्कमेतून द्यावयाचा होता. परंतु हे सहा सुभे निजामाच्या ताब्यात असल्याने बादशहाच्या हुकूमास मानण्याची नसल्याने, मराठ्यांना त्यांच्या हक्काबद्दल शक्य तितका मुलूख जिंकणे व खंडणी गोळा करणे याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. पुढे बाजीराव पेशवे, दाभाडे, पवार, भोसले, कदम, बांडे प्रभृतींनी नर्मदा नदी ओलांडून उत्तरेकडील बादशाही सुभ्यात संचारास सुरुवात केली व गंगेपर्यंत मजल मारली. त्याचा परिणाम असा झाला, की या प्रदेशातही मराठे चौथाईचे हक्क गाजवू लागले. सरदारांच्या आपापसातील चुरशीमुळे छत्रपतीसही या नवीन कार्यक्षेत्राची वाटणी करून देणे भाग पडले. गुजरातमध्ये दाभाडे, कदम, गायकवाड प्रभृती, माळवा व खानदेशात पेशवे,

वऱ्हाड गोंडवणात वगैरे भोसले, असे प्रदेश ठरविण्यात आले. त्यापैकी गुजरातचा सुभा दाभाड्याचा हस्तक म्हणून गायकवाड पहात असे. गोंडावणात तळ देऊन जवळच्या प्रदेशात भोसले खंडणी गोळा करीत, व बाजीरावाने तर माळव्याच्या सनदाच बादशहाकडून मिळविण्याचा प्रयत्न केला होता. छ. शाहूने नानासाहेब व रघुजी भोसले यांचे भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पेशव्यास माळव्यापलीकडील सुभ्यांचीही वाटणी द्यावी लागली. पश्चिम दिशा पेशव्याची व पूर्व भोसल्याची ठरली. अशी वाटणी ठरण्याचे कारण, अगोदरपासूनच त्या त्या प्रदेशात दोघांचा संचार झालेला होता. बाजीरावाने उदेपूर व जोधपूर या रजपूत संस्थानांकडून खंडणी वसूल करण्याचा पायंडा घातला, तेव्हा ही संस्थाने ज्या अजमेर सुभ्याखाली होती तो सुभा पेशव्याचा ठरला. बुंदेलखंडात तिसरा हिस्सा वाटणी छत्रसालाने पेशव्यास दिली तो प्रदेश मोगलांच्या अलाहाबाद उर्फ प्रयाग या सुभ्याच्या हद्दीत मोडत असल्यामुळे तोही प्रदेश पेशव्यांच्या कक्षेत आला. दक्षिणेकडील माळवा बाजीरावाने निजामाचा पराभव करून हक्काने आपला केला होता. अर्थात या तीन सुभ्यांच्या मध्ये राहिलेला, जाट, प्रभृति नवीन जेत्यांनी व्यापलेला आगऱ्याचा सुभाही पेशव्याचा ठरणे अपरिहार्य झाले. त्याप्रमाणेच वऱ्हाडच्या माथाडीवर नागपूरास तळ देऊन व सभोवारच्या गोंड राजास जिंकून रघुजी बसला असल्यामुळे, ते सुभे, प्रांत रघुजीचे कार्यक्षेत्र बनले. बंगाल, बिहार, ओढ्या वगैरे त्याच्या पूर्वेकडील सुभे व उत्तरेस वजिराचा अयोध्येचा सुभा हे ही सर्व सुभे छ. शाहूने रघुजीकडे सोपविले. गंगेच्या दक्षिणेकडील शेण नदीच्या पश्चिमेकडील व नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश, छ. शाहूच्या वाटणीप्रमाणे पेशव्याकडे गेला. या सुभ्याखेरीज उत्तरेकडे बादशाही सुभे पाच; दिल्ली, लाहोर, मुलतान, ठठ्ठा (सिंध) व काबूल (काश्मिर) यापैकी काबूल व सिंध हे नादिरशहाने या पूर्वीच घेतले होते. मुलतान, लाहोर, दिल्ली व आग्रा या चार सुभ्यावर काय तो बादशाही अंमल काहीसा चालू होता. अयोध्या व प्रयाग हे सुभे वजीर, बुंदेल, रोहिले वगैरेंनी व्यापले होते. बिहार, बंगाल व ओढ्या हे प्रांत अलिवर्दीखान बळकावले होते. अशी ही सर्व हिंदुस्थानची वाटणी त्या वेळी झालेली होती.

दक्षिणची परिस्थितीही त्याहून फारशी भिन्न नव्हती. सहासुभ्यांचा नाझीम निजामुल्मुल्क मोडत्या बादशाहीचा अभिमान धरून ठासून बसला होता. बाळाजी

विश्वनाथाने सय्यदांस मदत करून सहा सुभ्यांचीचौथाई व सरदेशमुखी मिळविलीत्याचा अर्थ इ, इतकाच ,की शिवाजीच्यास्वराज्या पुरता मराठ्यांचा प्रत्यक्ष अंमल व बाकीच्या दक्षिणेत ते बादशाहीचे संरक्षक. शिवाजीचे स्वराज्य म्हणजे महाराष्ट्राचा उणापुरा अर्धाभाग. हा करार अक्षरशः पाळावयाचा तर बाकीचा महाराष्ट्र मोगलाई अंमलाखाली चिरंतन रहाणारा होता. या कराराची बजावणी शक्य तर मुळीच होऊ द्यावयाची नाही हा डाव निजामाचा होता. परशत्रूंस परते ठेवून व अंतस्थ बंडखोरांचा बीमोड करून बादशाही सुभ्यात शांतता राखण्याची हमी मराठ्यांनी घेतली होती. हे काम करावयाचे तर मराठ्यांचा घोडा साऱ्या दक्षिणेत अडवल्याशिवाय फिरला पाहिजे. असा संचार होऊ देऊन आपल्या संरक्षाची जबाबदारी दुसऱ्याच्या हातात देणे म्हणजे आपलीच कबर आपण बांधणे होय, हे निजाम पुरेपुरे ओळखून होता. तेव्हा तुमची मदतही नको व संचार तर नकोच नको, असे त्याचे मराठ्यांना सांगणे होते. पण मराठे ते का ऐकतील? मोगली मोजणीप्रमाणे सहा सुभ्यांचा वसूल १८ कोटींचा त्यातील चौथाईचे २५ टक्के व सरदेशमुखीच १० टक्के मराठ्यास दयावयाचे तर सहा कोटींवर रक्कम होते. पण त्याचा चतुर्थांश तरी निजामास मिळत होता की नाही याची वानवा आहे. बाकी सर्व हिशेब कागदावर होता. पण मराठ्यांस हिशेब पटवावयाचा तर प्रत्येक तर्फेच्या सुलात त्यास होईल त्या ऐन वसुलाचा हिस्सा देणे जरूर होते. म्हणजे मराठ्यांच्या कामविसदारांचा सहा सुभ्यात दुतर्फी अंमलजरूर होते. असा साराच पेंच निजामास होता. तेव्हा आपणास राखता येईल ते राखावे हा एकच पक्ष निजामास शिल्लक राहिला. उलट पक्षी जेवढे मिळवता येईल तेवढे घेणे हे मराठ्यांचे कर्तव्य ठरले. निजाम आपणास बादशाहीचा रक्षक म्हणवून घेत असे, तर मराठे त्यास दक्षिण बळकावून बसणारा शिरजोर सुभेदार समजत होते.

निजामाचे मराठ्यांविषयीचे मत त्याने आपल्या मुलास मृत्यूसमयी केलेल्या उपदेशात नमूद आहे. राजनीतीच्या उपायांपैकी दाम व भेद यांचा उपयोग करून त्याने आपले अस्तित्व कायम राखले, इतकेच नव्हे, तर मराठ्यांच्या साम्राज्यविषयक भरारीस आळा घालण्याचा त्याने विडाच उचलला होता. सारे हिंदुस्थान मोघलांचे हा महामंत्र त्याने कधीही सोडला नाही. त्याच्याच रक्षणार्थ त्याने मराठ्यांवर शस्त्र उचलले व रघुजी भोसल्याने कावेरीतीरापर्यंत पसरविलेला मराठ्यांचा साम्राज्यविस्तार चुटकीसरशी उडवून दिला.

रघुजीने त्रिचनापल्ली जिंकून मुरारराव घोरपड्यांच्या ताब्यात दिली आणि कर्नाटकची नबाबी एक कोट रूपये घेवून सफदरअल्लीस दिली. या हकीकती घडल्या तेव्हा निजाम उत्तरेस दिल्ली येथे होता; त्यामुळे त्या वेळी मराठ्यांना पायबंद घालणे त्यास शक्य झाले नाही. रघुजी दक्षिणेत असताना निजाम कर्नाटकावर आला असता तर त्याचाच धुव्वा उडाला असता. परंतु रघुजी उत्तरेत जाईपर्यंत त्याने वाट पाहिली. याचवेळी नानासाहेबही उत्तरेत गेला होता. मराठ्यांचे हे दोन मातबर सरदार उत्तरेत गुंतले आहेत. ही संधी साधून आपली सर्व फौज गोळा करून निजामाने १७४३ मध्ये कर्नाटकामध्ये पोहोचला. नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व मोघली मुलखाचे निझामी आपल्या परवानगी शिवाय या मुलखांतील कोणतेही राजकारण न्याय्य नव्हे. अर्काटचे नबाब हे औरंगजेबाने त्या प्रांतात जिंकलेल्या मुलखाचे सुभेदार होते पण तो सुभाच गोवळकोंड्याचा पोटभाग असल्यामुळे तेथील सुभेदार नेमणे अथवा बदलणे, काढून टाकणे वगैरे सर्व कामे आपल्या अधिकारातील असून मराठ्यांना त्यात हस्तक्षेप करता येणार नाही असा निजामाचा बहाणा होता. वास्तविक स्वतः निजाम जसा मोघलाईचा काही भाग बळकावून बसलेला अंमलदार, तसाच अर्काटचा नबाबही होय. जर निजाम दिल्लीस जुमानीत नाही तर अर्काटच्या नबाबाने निजामास का मानावे? हा प्रश्न त्या वेळी न्याय-अन्यायाच्या बाहेर गेला असून, जो जितका बलिष्ठ तितका त्याचा अधिकार, एवढाच त्याचा अर्थ होता.

आपण खुद्द दिल्लीच्या बादशहाचे प्रत्यक्ष सुभेदार, निजामाचे दुय्यम नव्हे, या सबबीवर दोस्त अली निजामास कधीच खंडणी देत नसे. पुढे मराठ्यांनी सफदरअलीस नबाब केले तेव्हा त्याच्याकडे निजामाने खंडणीची मागणी केली. सफदरअलीने खंडणीच्या सबबीवर आपल्या रयतेकडून मात्र पैसा पिळून काढला, पण निजामास त्यातले काही दिले नाही. रयत नाखूष आहे ही संधी साधून व आपण निजामाचा अंकित आहे असे जाहीर करून नबाब घराण्यातील मुर्तजाअलीने सफदरचा खून केला आणि स्वतः नबाब बनला. या बंडाळीचा फायदा घेऊन व पेशवा उत्तरेत आहे ही संधी साधून निजामाने १७४३ मध्ये अर्काटवर हल्ला केला. त्याच्या प्रचंड सैन्यास घाबरून त्या प्रांतामधील लहान मोठे नबाब, पाळेगार व पुंडांनी लढाईत भाग घेतला नाही. निजामाने अन्वरूद्दीन यास अकार्टचा नबाब केले. त्यानंतर निजामाने त्रिचनापल्लीवर हल्ला करून मुरारराव घोरपड्यापासून त्रिचनापल्ली जिंकले असले तरी

आपली गुतीची जहागिरी कायम करून घेण्यात मुरार घोरपडे यशस्वी झाला. अशा रीतीने मराठ्यांचा दोन वर्षाचा उद्योग एका क्षणात वाया गेला. अर्काटप्रमाणेच सावनूर, शिरे, कडपे, कर्नूळ वगैरे ठिकाणचे नबाब आपणांस स्वतंत्र समजू लागले होते, त्यासही निजामाने लगेचच आपल्या वर्चस्वाखाली आणले आणि दक्षिणेकडील सर्व मुलूख मोघलाईचाच भाग होय, हे सूत्र खरे करून त्यानी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. कर्नाटक बलाघाटचा कारभार त्याने आपला नातू मुझफरजंग याकडे सोपविला.

छ. शाहूने कर्नाटकचा सुभा फत्तेसिंग भोसले व त्यांचा स्नेही बाबुजी नाईक याजकडे सोपविला होता. पेशव्याच्या अखत्यारीत तो मुलूख नव्हता. त्या दोघांनी या प्रसंगी कर्नाटकांत जाऊन मराठ्यांचा त्या प्रांतावरील अंमल कायम ठेवावा, पण ते दोघेही दुर्बल, सुखासीन व लोभी होते. त्या प्रांतीचा मराठ्यांचा अंमल म्हणजे तेथील देसाई, राजे, पाळेगार, नाईक, नबाब या सर्व लहानमोठ्या आपापल्या स्वतंत्र्य होऊन बसलेल्या पुंडाकडून खंडणी वसूल करण्याचा हक्क दारात फौज आल्याशिवाय यातील कोणीही बिनबोभाट खंडणी कधीच पाठविली नाही. रयत प्रत्यक्ष आपल्या वर्चस्वाखाली आणून, स्थानिक पुंडांचे उच्चाटन करून तेथील बेकायदेशीर कारभाराचा शेवट करावा, असे मराठ्यांना वाटले नाही. नानासाहेब पेशव्याने १७४१ मध्ये बाबुजी नायकास पुण्यातून हाकलून दिल्यानंतर रघुजी व फत्तेसिंग यांच्या मदतीने त्याने छ. शाहूकडून बारामतीची जहागीरी मिळविली आणि कर्नाटकचा सुभा फत्तेसिंग भोसल्याच्या संगनमताने आपल्या वहिवाटीस घेतला. त्याचा उद्देश केवळ पैसे करण्याचा सावकारी बाण्याचा असे. तेवढ्यापुरताच त्याचा खटाटोप असता तर नानासाहेबास त्याच्याकडे लक्ष पुरविण्याची जरूरी नव्हती. परंतु तो नेहमी रघुजी व प्रभृति यांच्यात सामील होवून पेशव्यांना त्रास देत असे. नानासाहेबाची पेशवाई काढून आपण ती मिळवावी असा त्याचा हेतू होता. त्यामुळे नानासाहेबास त्याच्यावर नेहमीच करडी नजर ठेवावी लागत असे. पेशव्याची नालस्ती करणे, भट घराण्यांतून पेशवाई काढून घेणे असा विरोधी पक्षाचे उद्योग छ. शाहूच्या मृत्यूपर्यंत व नंतरही चालूच होते. अर्थात आपले अस्तित्व टिकवणे नानासाहेबासही अपरिहार्यच झाले. त्यामुळे नायकाच्या कर्नाटकातील उद्योगास पेशव्याचा कधीच पाठिंबा किंवा सहानुभूति मिळाली नाही. नायकाचे कर्नाटकात बस्तान बसणे म्हणजे तिकडील क्षेत्र पेशव्याच्या उद्योगाच्या क्षेत्रांतून

नाहीसे होणे असा अर्थ होता. शिवाय अशा मुलुखगिरीस काय तयारी पाहिजे व त्यात काय अडचणी असतात, त्याची जाणीव पेशवा इतकी बाबुजी नायकाला नव्हती. या आपसांतील चुरशीचा परिणाम असा झाला की, त्या प्रदेशात मराठ्यांचे पाऊल योग्य वेळी बसले नाही म्हणून पुढील काळात हे प्रांत हैदर व इंग्रज यांच्या ताब्यात गेला.

कर्नाटकचा कारभार आपणाकडे घेतला तेव्हा नायकाची कल्पना होती की, आपण नुसते तिकडे जाताच तिकडील देसाई आपणास वार्षिक खंडणी देतील. पण त्या देसायांनी जेव्हा नायकाजवळ फारशी फौज नाही हे पाहिले तेव्हा त्यांनी खंडणी देण्याचे टाळाटाळ केले. अर्थात या पुंड देसायास काबूत आणण्यासाठी नायकाने ठिकठिकाणी शिबंदी फौज ठेवली. पण यामुळे खर्च बेसुमार वाढला. नायकाच्या मित्रांपैकी फत्तेसिंग भोसले केवळ दुबळा होता. रघुजीला तर स्वत:चा उत्तरेतील उद्योगातून पुरेसा वेळ मिळत नव्हता. त्याने आपला दिवाण कोन्हेर राम कोल्हटकर याच्या मार्फत साताऱ्यास शक्य ती खटपट नायकातर्फे केली; पण पैसा व फौज यांच्या अभावी ती लंगडी पडली. राणी सकवारबाईकडून जेव्हा बाबूजीकडे कर्जाचा फारच तगादा लागला, तेव्हा बाबुजीने छत्रपतींच्याच दाराशी धरणे घेतले व उपोषण सुरू केले. त्यामुळे छ. शाहू फारच चिडला. परिणामी बाबुजी व छ. शाहू तणाव वाढत गेला. खूप प्रयत्न करूनही छ. शाहूच्या हातून पेच निवारेना, तेव्हा नाईक थकला. पेशव्याचे म्हणणे असे होते की, नायकाने कर्नाटकावरील हक्क सोडून द्यावा तरच आपण त्या प्रांताचा बंदोबस्त करू. नायकास असे करण्यास भाग पाडण्याची आणखी एक किल्ली पेशव्याजवळ होती. पेशवा व कोल्हापूरचा छ. संभाजी यांचे सूत असे. वारणेच्या तहाने वास्तविक वारणा व तुंगभद्र या नद्यांमधला मुलूख हा कोल्हापूरकरांच्या मुलुखगिरीच्या क्षेत्रातला ठरला होता. पण त्यांच्याकडून हे मुलुखगिरीचे काम कधीच अंगावर घेतले गेले नाही. तरीही भितीमुळे सोधें, बिदनूर वगैरे संस्थाने कोल्हापूरकरास नाममात्र मानीत. पुढे सातारकर छत्रपतींचे सैन्य दक्षिणेकडे गेले, तेव्हा त्यास वाटेतील या संस्थानांकडून खंडणी वसूल करणे प्राप्त झाले. पण संभाजीस ही गोष्ट तहाविरूद्ध आपल्या हक्कावर गदा आहे असे वाटत असे. आपल्या स्वत:च्या अंगात ही खंडणी वसूल करण्याचे सामर्थ्य नाही हे तो ओळखीत होता, पण त्याचा हेतु एवढाच की जो हे काम करील त्याने ते आपल्या नावे करून आपणास काही

त्यातील हिस्सा पोचवावा. हे काम संभाजीतर्फे करण्याचे नानासाहेबाने अंगावर घेतले. एखाद्या घराण्याचा पूर्वी चालत आलेला हक्क दुसऱ्यास देण्यास छ. शाहू सदैव नाखूष असे. तेव्हा बाबुजीचा भाऊ आबाजी नाईक याने हे काम अंगावर घ्यावे असे छ. शाहूने सुचविले. पण आबाजीही रघुजीच्याच स्वाधीन. तेव्हा पर्यायाने कर्नाटकात रघुजीचे वर्चस्व राहणार हे पेशव्यास पसंत नव्हते. त्यापेक्षा स्वत:चे हे काम फत्तेसिंह भोसल्याच्या नावाने स्वीकारून ते त्याजकडून आपणाकडे वहिवाटीस घेणे पेशव्यास जास्त सोईस्कर होते. पेशवे नायकांच्या या संघर्ष १७४५-४६ मध्ये सातारा येथे चालला होता. त्यातील उत्तरभाग देण्यापूर्वी नानासाहेबांची या वेळी काय स्थिती होती ते प्रथम पाहणे आवश्यक आहे.

बंगालच्या स्वारीतून परत आल्यावर नानासाहेबाने १७४४ हे वर्ष महाराष्ट्रातच काढले. चिमाजीआप्पाने १७३९ मध्ये वसई जिंकली व उत्तर कोकणही जिंकले, तरी पोर्तुगीज लोकांचा त्रास संपला नव्हता. पेशव्याजवळ चांगले आरमार नव्हते. जे थोडे होते त्याचाही इतरत्र उपयोग नसल्यामुळे त्या त्यासाठी होणारा खर्च पेशव्यास फुकट गेला असे वाटत असे. ''आरमाराची मिळकत थोडी व खर्च फार आहे यास्तव आरमार (किनाऱ्या) जवळच ठेवावे. म्हणजे आरनाळ्यात लोक उत्तम राहतील.'' असे नानासाहेबाने पिलाजी जाधवास वसईप्रांतीचा बंदोबस्त राखण्यास सांगताना कळविले. यावरून आरमारीचे राष्ट्रीय महत्व त्यास कळले नव्हते असे म्हणणे चुकीचे ठरेल. मराठ्यांचे असे पंपरागत अनुभवाने पाश्चात्यांशी टक्कर देण्याजोगे खरे आरमार फक्त आंग्र्यांजवळ होते. परंतु आपली मातृभूमि आपल्या स्वताच्या अंमलाखाली आणण्याच्या इर्ष्येत राष्ट्रहिताचे स्मरण पेशव्यास राहिले नाही. शक्य त्या बऱ्यावाईट उपायांनी नानासाहेबाने आंग्र्यांचे वैभव व सत्ता मोडण्याचा क्रम ठेवला होता. वास्तविक पाहता वसईची मोहीम व पोर्तुगीजांचा पाडाव ही कामे आंग्र्याच्या अधिकारक्षेत्रातील होती. परंतु आंग्र्यांना पोर्तुगीज व सिद्दींना ताब्यात ठेवणे शक्य नव्हते. मराठ्यांच्या इतर प्रांताच्या उत्पन्नातून सतत मदत पाहिजे होती. परंतु छ. शाहूकालीन कारभारात प्रत्येक सरदाराने आपला खर्च आपण भागवावा अशीच पद्धत असल्यामुळे शूर आंग्र्यांस मुख्य राज्यांतून फारशी मदत होत नसे. त्यातही कान्होजी आंग्रे ताराबाईच्या पक्षाचा होता तेव्हापासून पेशव्यांचे व त्यांचे संबंध कधीच जमत नसे. त्याची मुलेसुद्धा पेशव्याची हुकुमत मानत नसत. त्यामुळे वसईची मोहीम, हबशावरील

मोहीम वगैरे कामे मुख्यत: पेशव्यांनीच स्वत:च्या अंगावर घेऊन पार पाडली. हेतु हा की, या मार्गाने परस्पर आंग्य्रांचे महत्व नष्ट व्हावे. पुढे उत्तर कोकण जिंकल्यावर पेशव्याने तो प्रांत स्वत:च्याच नावे करून घेतला. पण त्याच्या संरक्षणासाठी अवश्य असणारे आरमार मात्र त्याच्याजवळ नव्हते. ते पेशव्यास ठेवावे लागले. वास्तविक मराठ्यांचे सर्व आरमार एकट्या आंग्य्रांच्या हुकुमाखाली जय्यत राखून पेशव्याने त्याकडे सर्व बंदोबस्ताचे काम ठेवणे गरजेचे होते. पण असे करून आपल्या विरूद्ध काम करणाऱ्या आंग्य्रास मोठे करणे पेशव्यांच्या मनात बिलकूल नव्हते. उलट संभाजी आंग्रे १७४१ मध्ये मरण पावल्यावर मानाजी व तुळाजी या दोघां भावात भांडणे सुरू झाली असतां, दुर्बल मानाजीचा पक्ष घेऊन पेशव्याने आंग्य्रांचाच काही मुलूख बळकावला. नानासाहेबाचा हेतु आंग्य्रांचे समूळ उच्चाटन करण्याचा होता. परंतु छ. शाहू परंपरागत सरदार तोडण्याच्या अगदी विरूद्ध असल्यामुळे हा प्रकार पेशव्यास पूर्णपणे साध्य झाला नाही. आंग्रेकडून साताऱ्यास तक्रार गेली तेव्हा छ. शाहूने खरमरीत आज्ञापत्र लिहून माणिकगड वगैरे प्रांत पेशव्याने घेतला होता, तो सोडून देण्याविषयी सदाशिवरावास आज्ञा केली. ही गोष्ट मानाजीच्या मुलखाची झाली. मानाजी पेशव्यास धरून असल्यामुळे तुळाजी आंग्रे मानाजीवर फारच चिडला होता. बाणकोटच्या दक्षिणेकडील कोकण किनारा त्याच्या ताब्यात होता. त्याने सर्वानाच लुटून आपण बलिष्ठ होण्याचा उपक्रम चालविला होता. त्याचे व पेशव्यांचे भांडण छ. शाहूच्या निधनानंतर विकोपास गेले.

नानासाहेबांनी १७४५ च्या प्रारंभी उत्तरेत पुन: माळव्यावर स्वारी केली. फैझमहंमदखान रोहिले याने भोपाळ व जवळचा प्रदेश बळकावला होता. त्यास ताब्यात आणणे हा या स्वारीचा उद्देश होता. स्वारीचा मुख्य तळ भेलसा शहरी असल्यामुळे या स्वारीला भेलशाची स्वारी म्हणतात. मोहिमेचे मुख्य काम पिलाजी जाधवाकडे होते. २२ मार्च १७४५ रोजी भेलसा हस्तगत झाले, तेव्हा फैझमहंमदखान शरण येऊन त्याने निम्मे राज्य पेशव्यास दिले. बाकीचे निम्मे त्याच्या वंशजाकडे राहिले. या खेरीज माळव्यातील वसुलीची व्यवस्था बांधून देणे, तिकडील परगणे निरनिराळ्या सरदारास वाटून देणे, चंदेरीची व्यवस्था लावणे, सभासिंग बुंदेल्याशी करार करणे, वगैरे कामे पेशव्याने या स्वारीत पूर्ण केली, आणि तो पावसाळ्याच्या सुरूवातीस परत साताऱ्यास पोचला. १७४६ मध्ये उत्तरेस शिंदे, होळकर बुंदेलखंडात

मराठ्यांचा अंमल बसवीत होते. त्या स्वारीबद्दलचा सर्व व्यवहार नानासाहेबास सातारा येथे राहूनच करावा लागला. यापूर्वीच १७४५ मध्ये राणोजी शिंदे सुजावलपूर येथे मरण पावला. याची माहिती कोटेकर पंडितांच्या दप्तरांतील पत्रावरून स्पष्ट झाली आहे. राणोजी शिंदे यांची चार मुले जयाप्पा, दत्ताजी, जोत्याची, व तुकोजी आणि रक्षा चिमाबाईच्या पोटी महादजी झाला. राणोजीच्या पश्चात त्याचा वडील मुलगा जयाप्पा याची सरदारकीवर नेमणूक झाली. नानासाहेब प्रथम बुंदेलखंडात गेला, तेव्हा तेथील राजा अर्जुनसिंग हा पेशव्याचा अंकित झाला. तो पुढे नेहमी मराठ्यांबरोबर एकनिष्ठ राहिला. त्यामुळे सभासिंग वगैरे इतर राजे लोकांनी त्याचे राज्य जिंकून त्यास परत देण्याबद्दल पेशव्याने शिंद्याना १७४६ मध्ये सूचना केली. पुढे शिंदे होळकरांनी बुंदेल्यांचा पराभव करून जैतपूरचे मजबूत ठाणे मोठ्या शौर्याने हस्तगत केले. ही बातमी ऐकून नानासाहेबाने पुढील शाबासकीचे पत्र त्यास लिहिले. त्यावरून सरदारास नावाजून त्याकडून कामे करून घेण्याची नानासाहेबाची हातोटी निदर्शनास येते. ''बुंदेल्यांनी जैतपुरास तोफा, जेजाला, वर्कदाज, दारूगोळा वगैरे विपुल सामान ठेवले होते. रेवणीतून हमेशा झुंझत. आपलेकडील हजार माणूस गेले. चार हजार जखमी झाले. तथापि सुरूंगानी भिताड पडले, तेणेकरून किल्ला सर केला, म्हणोनी विस्तारे लिहीले ते श्रवण होऊन संतोष झाला. जैतपूर बाकी जागा. बाजे सरदारांनी व लोकांनी श्रमसाहस करून फत्ते केली. शाबास तुमची व शाबास लोकांची. मोठी गोष्ट जाहली. तुम्हांसारखे उमदे सरदार इरेस पडल्यावर जैतपूरची कथा काय! याहूनही बिकट जागा हस्तगत कराल. याउपरी तिकडील कर्तव्य मनसुबा उल्लेख पुरःसर लिहीत जाणे.'' बुंदेल हे मराठ्यांसारखेच कणखर लोक असून फार शूर होते; त्यांच्या इतके कडवे शत्रू मराठ्यांस थोडेच भेटले. पुढे बुंदेल्यांशी तह होऊन जैतपूर बुंदेल्यास देण्यात आले व पेशव्यांच्या महालांची वाटणी व व्यवस्था गोविंदपंत बुंदेले व लक्ष्मण शंकर यांच्यामध्ये नानासाहेबाने करून दिली.

पेशवा साताऱ्यास असल्यामुळे उत्तरेतील सर्व कारभार या वेळी शिंद्यांचा दिवाण प्रसिद्ध रामचंद्रपंत बाबा करीत होता. रामचंद्र मल्हार ऊर्फ रामचंद्रबाबा हा मालवणाकडील आरवली गावचा कुलकर्णी निर्वाहासाठी साताऱ्याला आला. येथे हे लक्षात ठेवणे जरूर आहे की, हिशेबी लिहीणे व जमाखर्चाची आखणी ठरवून देणे ही दोन कामे त्यावेळी इतरांपेक्षा त्याने चांगली केली होती. त्यामुळेच पुढील काळात

नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ हे प्रशासकीय कामकाजात तरबेज करण्याचे काम रामचंद्रबाबानेच केले. पेशव्यांच्या फडाची म्हणजे हिशेबी कचेरीची स्थापना नानासाहेबांच्या वेळी रामचंद्रबाबाने केली. या रामचंद्रबाबाविषयी नानासाहेबांनी आपल्या पत्रांतून मोठा आदर व्यक्त होतो. उत्तर हिंदुस्थानात प्रथम शिंदे होळकर यांच्याकडून जबाबदारी होती. त्यावेळी रामचंद्रबाबाच तिकडील कारभार पहात असे.

## ४.६ नानासाहेबांचे पेशवाई पदावरून निलंबन

बाबुजी नायकांच्या संघर्षात छ. शाहूच्या दरबारातील कारस्थानांचा उल्लेख आलाच आहे. १७४३ पासून छ. शाहूची प्रकृति ढासळू लागली. तेव्हा पुढे राज्यांचे काय होणार याची त्यास उत्तरोत्तर फारच काळजी लागली. तेव्हा त्यातच त्याच्या राण्यांच्या घरगुती भांडणांची व कारस्थानांची भर पडली. रघुजी, प्रतिनिधी, नाईक वगैरे सरदारांची भांडणे व राजकारणे सोडविताना त्याच्या नाकी नऊ येत असे. छ. शाहू स्वतः मोठ्या मनाचा होता. आपल्यावर यत्किंचित उपकार कोणी केला किंवा राज्याचे कार्य उरकले तर त्यास तो इनामे, जहागिरी, नेमणूका वगैरे भरपूर देत असे. अशा उदार भावनेचा छ. शाहू होता. बापाने सर्वांस दुखविले त्याचा परिणाम सदैव त्याच्या डोळ्यांसमोर असल्याने, मनुष्य तोडण्यास तो अत्यंत नाखूष असे. देवब्राम्हणांवर छ. शाहूची विशेष निष्ठा होती. जयपुरच्या सवाई जयसिंगास स्वतःच्या धार्मिकतेचा व दानशूरपणाचा अभिमान होता. तेव्हा आपली प्रौढी मिरविण्यासाठी ''आपण देवब्राम्हणांसाठी काय करतां'' असे जयसिंगाने जेव्हा छ. शाहूस विचारले तेव्हा त्यास छ. शाहूने प्रत्युत्तर दिले की, ''माझे सर्व राज्यच मी ब्राम्हणांच्या हवाली केले आहे. तेथे अन्य देण्यास काय राहिले?'' अशी छ. शाहूसंबंधी अख्यायिका आहे. छ. शाहूच्या उदार धोरणामुळे त्याचे उत्पन्न त्यास पुरत नसे. त्यातच राण्यांच्या उधळपट्टी. बाबुजी नाईक या सावकाराचे कर्ज छ. शाहूस प्रचंड झाले. त्या वेळी मराठ्यांचे राज्य राजकीय सत्तेच्या दृष्टीने वर्धिष्णु होते, तरी उत्पन्नाच्या दृष्टीने तो एक तोट्याचाच व्यवहार होता. मोठमोठ्या फौजा, मोठे सावकार व व्यापारी, लोभी सरदार, दरखदार हे सर्व येणारे उत्पन्न हडप करीत. त्यामुळे मोहिमांचा खर्च भागवून साताऱ्यास काही पाठविण्याऐवजी हे सरदार उलट राजधानीतूनच कर्जाची मागणी करीत. अशा चिंतेत असतानाच अनेक बरोबरीची चांगली माणसें छ. शाहूच्या डोळ्यांदेखत मरण पावली. तेव्हा तर तो विशेष उद्विग्न झाला. श्रीपतराव प्रतिनिधी,

नारो राम मंत्री, शिवाजी खंडो चिटणीस, ब्रम्हेंद्र स्वामी, गंगाधर स्वामी चाफळकर वगैरे छ. शाहूचे बरोबरीचे नोकरवजा मित्र याच सुमारास दिवंगत झाल्याने, त्याच्या चित्तास अत्यंत उदासिनता आली. आपला नोकरच काय, गण मदारी हत्ती किंवा खंड्या कुत्रा मेला तरी ती गोष्ट छ. शाहूच्या जिवास फार लागून राहिली.

अशा प्रकारे छत्रपती छ. शाहू उद्विग्न स्थितीत असल्यामुळे नानासाहेबास अनेक भानगडीचे निकाल लावणे कठीण पडू लागले. राज्यातील सरदार निरनिराळ्या दिशांनी वरचढ ठरू लागले, तर तत्काळ निश्चयाने एक हुकूम करून ती ओढाताण थांबविण्याचे मनोबल छ. शाहूच्या ठिकाणी आधीच फार थोडे होते. त्यातून आता तर या दौर्बल्याची कमाल झाली. म्हणूनच बाजीराव व दाभाडे, रघुजी व नानासाहेब यांची प्रकरणे विकोपास जाऊन एकाच धन्याचे नोकर आपसात लढू लागले. गुन्हेगारालाही कडक शासन करणे छ. शाहूस पसंत नव्हते. मनुष्य प्राणी जात्याच दुर्बल म्हणून किव करण्यासारखा आहे असे त्याच्या दयाळू व क्षमाशील अंतःकरणास वाटत असे. छ. शाहू कोणाच्या चुगल्यांवर विश्वास ठेवणारा नव्हता. एखाद्याबद्दल कोणी कितीही वाईट सांगितले तरी त्याची सत्यता त्यास पटणे दुष्कर होते. या छ. शाहूच्या मनोदौर्बल्याची ओळख असल्याने बंडखोर सरदारांलाही आपले कधी डोचके उडेल किंवा अन्य नुकसान होईल अशी दहशत राहिली नाही. या प्रकारामुळे कोणत्याही बाबीचा त्वरीत योग्य निकाल झाला असे घडत नसे. यामुळे राजकारण बिघडत गेले. प्रत्येक भानगडीचे काहींना काही शेपूट मागे राहीले व त्यामुळे आपसांत कायम द्वेष व वैर मात्र मागे शिल्लक रहात असे. तडजोडीने गोडी करण्याची हातोटी छ. शाहूंच्या मध्ये होती, पण ती आता मनाच्या व्यग्रतेमुळे व वयोमानाने सर्वथा संपून गेली.

पेशव्याचा सर्व अधिकार केवळ छ. शाहूच्या इच्छेवर अवलंबून असल्याने नानासाहेबास सहजच दरबारच्या तमाम कारस्थानांवर बारीक लक्ष ठेवणे भाग होते. राज्याची धुरा आपण सांभाळायची तर आधी आपले पद सुरक्षित करणे हे पेशव्यांचे कर्तव्य झाले. त्या काळी दळणवळण करणे जिकिरीचे होते. त्यामुळे पेशव्यास सातारा सोडून फार लांब रहाणे शक्य नव्हते. असल्या काळजीत नानासाहेबाची १७४६ व १७४७ ही दोन वर्षे प्रारंभीची फुकट गेली व त्यामुळे मराठशाहीच्या बाहेरच्या उद्योगास उणेपणा आला. ही गोष्ट त्याने उत्तरेत रामचंद्रबाबास पत्र पाठविले त्यावरून स्पष्ट कळते. तो लिहीतो, ‘‘दरबारचा मजकुर विस्ताराने सरदारांस लिहीला

आहे त्यावरून कळेल. आमचा गुंता आजपर्यंत दरबारांत व्हावयास कारण, रा. स्वामींचे सरकार कर्जदार झाले; महालाचे (राण्यांचे) खर्च अनिवार, नित्य कथळे, यास्तव राजश्रींनी आपले कारभाऱ्यांस ताकीद करून बंदोबस्त करतात. घरच्याच कारभारात राजश्री स्वामी दंग आहेत. त्याही होऊन आम्हांस निरोप द्यावा तर ते आपल्या कारभारांत निमग्न. आम्ही विनंती करावी तर त्यांची मर्जी दिक्क पाहून आजपावेतो चर्चा न केली. राहत राहत गोष्ट राहिली.

सारांश उभयता महालाचे अतिप्राबल्य झाले आहे. रघुजी भोसले वऱ्हाडातून माहूर प्रांते आले. त्यांच्या चित्तात आमच्या मुलुखात घासदाणे घ्यावे ऐसा विचार आहे. जागजागांहून महालकरी यांची पत्रे येतात. तथापि त्यांचा प्रकार कपटी आहे. तो तुम्ही जाणतच आहात. आम्हीही कागदोपत्री स्नेहयुक्तच लिहीत असतो. येथे येणार ऐसाही वर्तमान आहे,'' असे दुसऱ्या पत्रांत पेशवा लिहीतो. त्यावरून दरबारच्या व नानासाहेबाच्या व्यग्रतेची कल्पना होईल.

बाबुजी नायकास पुढे करून पेशव्यास नामोहरम करण्याचा रघुजी, प्रतिनिधी व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव, सकवारबाई प्रभृतींचा उद्योग सारखा चालूच होता. त्यावेळचे मराठ्यांचे सरदार आपसांतील भांडणात निजामासारख्या परक्यांची मदत घेण्यास मागे पुढे पहात नसत. उलट मोघलाई टिकवू इच्छिणारा वृद्ध निजाम शक्य तितक्या मराठ्यांना वाटेल ती लालूच दाखवून आपणांकडे वळविण्यास टपून बसलाच होता. बाबुजी नायकास ज्या उत्तर कर्नाटकाची सुभेदारी मिळाली होती, तो प्रदेश निजामाच्या सहा सुभ्यांपैकी विजापूरच्या प्रांतात मोडत असे. तेव्हा शक्य तर त्या प्रदेशात मराठ्यांचे पाऊल पडूच नये असे त्यास वाटत होते. मराठ्यांचा सुभेदारच अशा प्रकरणात आपणास मिळाला तर त्याहून निजामास दुसरे इष्ट काय असणार! वेगवेगळ्या मराठे सरदारांची निजामाशी काय कारस्थाने चालली होती ते खुलासेवार समजण्यास आज साधन नाही; कदाचित निजामाच्या दप्तरांतील पारशी पत्रव्यवहारांत असा पुरावा पुढे मागे सापडेल. पण आज एखाद्या मराठी पत्रावरूनच त्याचे अनुमान करणे भाग आहे.

पेशव्याच्या मुलुखांतून रसद या नावाखाली खंडणी उकळण्याची रघुजीची तयारी वरील नानासाहेबाच्या पत्रात आलीच आहे. वास्तविक ती बाबुजी वरील पेशव्याच्या शहास शह देण्याची होती हे उघड आहे. विरोधी पक्षाने पेशव्याबद्दल छ. शाहूचे मन

अति कलुषित केले होते. नानासाहेब पेशवाई पदावर राहिला तर छ. शाहूचे पश्चात दुसरा कोणीही राजा झाला, किंवा दुसरी कोणतीही व्यवस्था झाली, तरी पेशव्याचे हातात सत्ता जाणार, ही गोष्ट सर्वास उघड दिसत होती. अशा प्रसंगी सामान्य जनसमूहाचे मनावर विचारांपेक्षा विकाराचाच असर जास्त होत असतो. हा प्रश्न हुशारीचा किंवा कर्तबगारीचा नव्हता. सर्व सरदार व प्रधान मंडळी छ. शाहूच्या आज्ञेत वागण्यास तत्पर होती, परंतु ती आज्ञाधारकता त्यांनी पंचवीस वर्षाच्या पोरास काय म्हणून दाखवावी! आजपर्यंत पेशव्यांशी विरोध करीत आल्यामुळे, पेशव्याकडेच सगळी सत्ता आली म्हणजे तो आपली वाट लावल्याशिवाय राहणार नाही, अशी भिती राण्यांच्या व इतर मंडळींच्या मनात निःसंशय येत होती. ही भिती नष्ट करण्याची पहिली युक्ती म्हणजे पेशव्यास भिकारी करून सोडणे असे या मंडळीस वाटले. छ. शाहू कर्जाच्या पेचात होता. बाबुजी नायकास दिलेले पैसे परत येतील, अशी आशा राहिली नाही. खर्च मोठा होता. पेशव्याने उत्तरेत चांगला धनसंचय केला आहे पण छ. शाहूस तो पैसा देणार नाही, अशी सर्वांची समजूत होती. दरम्यान बाबुजी नाईक याचे प्रकरण हातघाईवर आलेले होते. कर्नाटकातील संभाजीच्या कक्षेतील प्रदेशाची खंडणी वसूल करण्याचे काम नानासाहेबाने कोल्हापुरशी संधान जोडून आपणाकडे घेतले. अर्थात नाईक तिकडे जाऊ म्हणेल तर त्यास हा शह आयताच होता. नायकास स्वतःच्या बळावर स्वारी करण्याची ऐपत नव्हती व दुसऱ्यास सुभेदारी देण्यास तर तो नाखूष होता. छ. शाहूने निक्षून सांगून त्याची सुभेदारी काढावी तर त्यास छ. शाहूची उदार मनोवृत्ती आड येत असे. राज्यांचे काम व व्यक्तीच्या हक्काचे संरक्षण यांचा छ. शाहूच्या मनात नेहमीच गोंधळ होत असे. काम न करणाऱ्या नोकरास कामावरून काढणे हे राजाचे आद्य कर्तव्य होय. पण एखादी नोकरीची जागा म्हणजे ती एकदा नेमलेल्या व्यक्तीची, असे छ. शाहूस वाटे. तशात छ. शाहूच्या मोठ्या राणीने नायकास मागील स्वारीच्या वेळी कर्ज दिले होते ते परत द्यावयास पाहिजे नाही तर पुन्हा माझी नेमणूक करून मला कर्नाटकात पाठवा, असे नायकाचे म्हणणे होते. छ. शाहुची दुसरी राणी सगुणाबाई ही रघुजीच्या बायकोची बहिण असून त्या बहिणीचा मुलगा मुधोजी यास छ. शाहूने दत्तक घ्यावे असे तिचे कारस्थान चालू होते. अर्थात त्यास पोषक असे जे रघुजीचे बाबुजी प्रभृति स्नेही होते त्यांच्या विरूद्ध जाणे तिला शक्य नव्हते. कारण पेशवा रघुजीच्या

मुलाच्या विरूद्ध राहणार हे तिला कळत होते. कर्नाटक प्रकरणी छ. शाहूचा निश्चय होत नाही असे नानासाहेबाने पाहिले तेव्हा स्वत:च्या जबाबदारीवर तिकडे स्वारी करून कर्नाटक राखण्याचा त्याने विचार केला. हा प्रांत आपल्या अंमलाखाली आणण्याचा या वेळी निजामाचा विचार चालला होता. संस्थानिक स्वतंत्र होण्याच्या बेतात होते. याच वेळी गोव्याच्या हद्दीवर पोर्तुगीजांनी मराठ्यांविरूद्ध उचल केली होती. सोंधे, बिदनूर वगैरे संस्थानिकास त्यांची मदत होती. त्यांनी सावंतवाडीकरांच्या मुलुखावर हल्ला करून त्यांची ठाणी जिंकली. वेळीच तिकडे मोठे सैन्य न गेले, तर मराठ्यांचा त्या प्रांतातील अंमल पार संपुष्टात आला असता. नानासाहेबाने तिकडे सदाशिवरावास पाठविण्याचे ठरविले. हे नायकाने पाहिले तेव्हा त्याची फारच गाळण उडाली. सुभा हातचा जातोय हे त्याने पाहिले तेव्हा, नानासाहेब रामचंद्रबाबास कळवतो, ''दर्शनास बाबुजी नाईक आले. भेटी झाली. संभाजी महाराजांचे सौंधें, बिदनूर इत्यादी तालुक्यास उपद्रव न द्यावा येविशी नाइकांनी संभाजी महाराजांचे गळ्यावर हात ठेवला. संभाजी महाराज पाच सहा महिने अडले होते. स्वामिंनी आम्हास जामीन व्हावयास आज्ञा केली. आम्ही झालो. नाईकांनी येथील ताळतंत्र आठ रोज पाहिले. उपरांतिक स्वामींच्या दारी बसून उपोषणे करतात. उपास केल्यामुळे स्वामी सक्रोध झाले. नानासाहेबांच्या या लिहीण्यावरून नायकाची तारांबळ व आतताईपणा नजरेस येतो. १ डिसेंबर १७४६ रोजी पेशव्याने पिलाजी जाधवास पत्र लिहीले, त्यात या सदाशिवरावभाऊच्या पहिल्या स्वारीचा उद्देश स्पष्ट लिहीला आहे, ते पत्र पुढीलप्रमाणे ''रा. संभाजी महाराजांचा तालुका सोंधे, बिदनूर, सावनूर, बंकापूर ही संस्थाने स्वामीनें आमच्या स्वाधीन केली. तिकडे रा. बाबुजी नाईक यांनी तालुक्यांत न जावे ऐसा करार केला आहे. त्यास सदरहू तालुक्यांचा पैका आला पहिजे. विना फौज सुप्रयुक्ताने हे लोक पैका देतील न देतील हा अर्थ तुम्हांस न कळेसा नाही. यास्तव तिकडे फौज गेली पाहिजे. दुसरे, सावंताशी फिरंग्यांनी कलह मांडला आहे. सावंताची दोन तीन ठाणी फिरंग्यांनी घेतली. यास्तव फौज रवाना करावयाची तजवीज केली आहे. चिरंजीव राजश्री सदोबा यास निरोप देऊन त्या प्रांते रवाना करावे ऐसा विचार केला.

या पत्रात लिहील्याप्रमाणे छ. शाहूची परवानगी या स्वारीस होती की नाही कळत नाही, पण बहुधा मौनपणाची संमती असावी. छ. शाहू या वेळी नानासाहेबाच्या

हेतूसंबंधी साशंक होता. छ. शाहूंच्या पूर्ण मनाप्रमाणे वागावयाचे म्हणजे नायकास फुकट मदत करून त्याच्यासाठी कर्नाटकचा वसूल करून देणे व त्या पैशात छ. शाहूचे कर्ज फेडणे. पण स्वत:ची फौज पाठवावयाची तर आपल्याविरूद्ध असलेल्या नायकाचे कर्ज नानासाहेबाने काय म्हणून फेडून द्यावे! त्याने खुशाल छ. शाहूच्या दाराशी उपास करून आपल्या कर्जाची माफी मिळवावी! छ. शाहूने अशी माफीही दिली असती, पण त्यास स्वत:सच इतके कर्ज झाले होते की, महालाचे खर्च चालणेही कठीण झाले होते. नानासाहेबाने वरील पत्रानंतर पिलाजी जाधवास कर्नाटकात पाठविण्याचा आपला बेत रद्द केला. कारण पोर्तुगीजांनी सावंतावर स्वारी केली, तेव्हा त्यास ताबडतोब शह मिळावा म्हणून पिलाजीने उत्तर कोकणात राहून तिकडेच पोर्तुगीजास डांबून ठेवावे, म्हणजे तिकडून गोव्यास मदत होऊ शकणार नाही, असे पेशवा नानासाहेबाने ठरविले.

संदर्भ- पिरसुर्लेकरांचा गोवा पोर्तुगीज संबंध

१७४७ मध्ये पेशव्याने उत्तरेस रामचंद्रबाबास पत्र लिहीले. त्यात या स्वारीची पुढील हकीकत येते. ''बाबुजी नाईक यांनी कर्नाटक प्रांती न जावे, गेले तरी धुडकावून काढावे, याजकरिता चिरंजीवाची रवानगी कर्नाटक प्रांती केली. प्रस्तुत नाईक यांनी राजश्री स्वामींस दोन लाख रूपये रोख द्यावे ऐसे केले होते. बाकी राहिले ऐवजाचे हप्ते करून येसाजी भोसले याच्याकडे दिले. बेदनूरचा साडेतीन लक्षांचा प्रदेश होता, तो मशार निल्हेजवळ देऊन निरोप घेऊन गेले. पुढे नबाबास भेटून नबाब म्हणतील ते द्यावे आणि तेवढ्यावरी ठाकुरकी वाढवून कर्नाटक प्रांती जावे ऐसे आहे. नबाबाच्या विचार पाहता दोनी दगडीवर हात आहेत. नाईकाची प्रतीक्षा करीत आहेत; व आमची फौज सोंधे बिदनूर प्रांती गेली आहे. त्यांसही पैका न मिळावा याही उद्योगात आहेत. श्री इच्छेने इतक्याही गोष्टीचे निराकरण होऊन उत्तमच होईल. मनसुब्याचे मजकूर किरकोळ फार आहेत. पत्री काय लिहावे, दर्शनोत्तर कळतील.'' पुढील पत्रांत ''चिरंजीव भाऊ निरोप घेऊन गेल्यावर कित्तुर ठाणे नारायणराव घोरपड्यांचे गेले होते. ते घेऊन दिले. पुढे मजल दर मजल सोंधेजवळ गेले आहेत. सावनूरकरांचा तह रद्द होणे तो होत आहे. असे पेशवा कळवितो. यावरून तिकडील भानगडींची चांगली कल्पना होते. नायकांचे निजाम, सावनूरकर नबाब वगैरेंशी चाललेले सूत मोडून काढून, सर्वांवर मराठ्यांचा दरारा राखणे हे पेशव्याच्या स्वारीचे

मुख्य कार्य. ते सदाशिवरावाने या स्वारीत पूर्ण केले. सावनूरकराने आपला उत्तरेकडील हक्क सोडून दिला. याचा अर्थ सर्व प्रदेश मराठ्यांनी या वेळी ताब्यात घेतला असा नव्हे, तर त्या त्या प्रांतातील देसायाला सावनूरकरांचे ताब्यातून सोडविले. त्यांनी नबाबास खंडणी देण्याची जरूर राहिली नाही. सावनूरकराचे बिदनूर, सोंधे या संस्थानावरील हक्कही रद्द करून त्यास मराठ्यांचे अंकित करण्यात आले. या स्वारीत पेशव्यास पैशाची फारशी प्राप्ती झाली नाही. सैन्य घर बसले रहावयाचे ते कामावर राहून सदाशिवराव भाऊस स्वारीचा अनुभव मिळाला एवढेच या स्वारीचे फलित होय.

सदाशिवरावाची ही स्वारी चालू असताच नानासाहेबाविरूद्ध साताऱ्यास चाललेल्या कारस्थानास ऊत आला. छ. शाहूंच्या दोन राण्यांत चुरस चालूच होती. प्रत्येकाला वेगवेगळा सरंजाम व स्वतंत्र कारभार पाहिजे होता. एकीला काही जास्त मिळाले तर ताबडतोब दुसरीने रागवावे. शहरातील फिर्यादी वगैरे मनसुबे तोडणे हे राण्यांचे काम नसताही या राण्या आपल्या नोकरामार्फत असल्या उठाठेव करू लागल्या. बाहेर गावची वतने विकत घेऊन तिकडे सावकारीचा व्यवहारही या राण्या करीत. त्यामुळे अनेक तक्रार अधिकाऱ्यांकडून छ. शाहूकडे येऊ लागल्या. त्यांनी छ. शाहूचे डोके त्रासून गेले. याच वेळी छ. शाहूच्या सावकारांनी व जिन्नस पुरवणाऱ्या व्यापाऱ्यांनी ओरड केली. त्यांतच नानासाहेबाचा हेतु कर्नाटकच्या स्वारीवर जाऊन बाबुजी नायकास त्रास देण्याचा आहे, अशी वार्ता छ. शाहूच्या कानी आली. तेव्हा पेशव्यास अधिकारावरून दूर केले तर तो नरम येऊन छ. शाहूस नजराणाही मिळेल असे जवळच्या कोणी त्यास सुचविले. या सर्वांचा परिणाम असा झाला, की नानासाहेब साताऱ्याजवळ छावणी करून असतां ''छ. शाहूने चिटणीला बोलावून आज्ञा केली की, प्रधान यास चिठ्ठी लिहावी जे, 'तुमचे प्रधानपद दूर केले आहे, तरी शिक्के कट्यार व जरीपटका हुजरे पाठविले याजबरोबर जमादारखान्यात दाखल करणे.'' प्रधानपंतांनी चिठ्ठी वाचून, तसेच उठोन शिक्केकटार व जरीपटका हुजरे यांचे स्वाधीन करून रवाना केले आणि लष्करापासून दूर एक राहुटी देऊन स्वयंपाक करविला. नंतर महाराजांस चिठ्ठी लिहीली की, सरकारी कारखाना व फौज सरकारची आहे. ती कोणाचे हवाली करावी ते लिहून यावे, त्याप्रमाणे करून पायांपाशी दर्शनास येतो.' त्यावर छ. शाहूने जबाब पाठविला की, 'सरकारकडून पाठवितो तोपर्यंत तेथेच राहवे' याप्रमाणे आठदहा दिवस गेले. मुत्सद्दी मंडळींनी महाराजांस विचारले,' पुढे विचार

काय? हिंदुस्थान प्रांती ही बातमी गेली व जाईल. चहूकडे सरदार पेशव्यांचे विद्यमान आहेत त्यात बखेडे होतील. यास्तव याजवर कृपा करणे किंवा दुसऱ्यास पद सांगून आधी बंदोबस्त व्हावा.' इकडे नानासाहेबाने चिटणीस व मंत्री याजपासून महाराजास विनंती करविली की, 'आम्ही एका राहुटीने बाहेर राहिलो, चरणापाशी येण्याची आज्ञा व्हावी, किंवा दुसरी सेवा काही सांगावी.' तेव्हा उत्तर आले की, 'नजर काय देतां बोलावे.' त्यावर सांगून पाठविले जे, 'आम्ही एकटे येथे आहो, सलतनत सरकारची सरकारात आली. घर व सर्व जे आहे ते सरकारात नजर आहे, आणवावे.' याजवर 'प्रधानपद दुसरीकडे सांगायचे' इतकेच महाराजांनी उत्तर केले.''

याप्रमाणे १७४७ च्या आरंभी नानासाहेब तात्पुरता अधिकारभ्रष्ट होऊन काळजी करीत स्वस्थ बसला होता. ही अधिकारभ्रष्टता किती दिवस होती हे नमूद नाही, पण निदान दोन महिने या प्रकरणात गेले असावे. विरूद्ध पक्षाची अटकळ पेशवा भरपूर नजराणा भरून पदप्राप्तीसाठी गयावया करील अशी होती, ती साफ खोटी ठरली. छ. शाहूची आज्ञा मान्य न करिता पेशवा बंडावा पुकारून स्वतंत्र होण्याची खटपट करील अशी कित्येकांची समजूत असल्यास तीही खोटी ठरली. त्या वेळच्या सरदारांपैकी कितीजण पेशव्याप्रमाणे ताबडतोब जवळचे सैन्य हुजरातीचे समजून हुजुरच्या स्वाधीन जसेच्या तसे करण्यास तयार झाले असते, याबद्दल अनुमानावर स्वस्थ बसणे भाग आहे. परंतु बऱ्याच जणांनी बऱ्या बोलाने अधिकार न्यास केला असता असे खास वाटत नाही. परंतु नानासाहेब पुरा धोरणी होता. छ. शाहूचा स्वभाव व दरबारची परिस्थिती त्यास पूर्णपणे माहिती असून कसे वागल्याने त्याची मर्जी राखता येईल याचीही त्यास जाणीव होती. म्हणून त्याने अगदी पडते घेऊन नम्रपणे उद्योग चालविला. दोन महिने या भलत्याच विवंचनेत गेले तरी छ. शाहूचा निश्चय होईना, तेव्हा त्याने निर्वाणीचा म्हणून पुढील खलिता महाराजांस सादर करण्यासाठी चिटणीसाकडे पाठविला. तो असा- ''आशिर्वाद उपरी, रात्री राजश्री स्वामींची गाठ पडली नाही म्हणून लिहीले, ऐशास ईश्वरी इच्छेस तुमचा इलाज काय? या उपरी तरी खामखाय गाठ दुपारी घालून येणेप्रमाणे (महाराजास) विनंती करणे-

कलम १- दोनही महालांतील गुंते फार करून दूर केले. रोज नवे निघतात त्यास मात्र आमचा इलाज नाही. सांप्रत महालातील गुंता नाही. मोघम बोलले चालले असते, महाराजांचे कर्जाचे मजकुराचा गुंता तो, महाराज सर्व विचार ध्यानांत

आणून आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तणूक, जेथे असू तेथे करूं हुजुर असल्यास आज्ञा मान्य करूं, बाहेर गेल्यास न करूं ही सबब होणार नाही. परंतु निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे. सांप्रत मनसबा होऊन खचित जहाला आहे. मनसब्याचा कळस रक्षण करावयाचे दिवस थोडे असतात. यास्तव दोन्ही वाड्यांत समजून सेवकास निरोप द्यावा. एक दोन दिवसांत हा अर्थ उत्तम. असे महाराजांनी कृपा करून करावे.

क.२ - महाराजांचे कर्जाचा उरक करावा तेव्हाच जावे ऐशीच मर्जी असली तर पुण्यास न जातांच, इकडून फिरून सेवेशी येऊं. सावकाशीने महाराजकृपा करून पुण्यास व वसईस जावयास आज्ञा देतील तेव्हा जाऊं. या मनसुब्याचा डौल पंधरा दिवसा अलीकडे आहे. तेव्हा महिन्यांचा निरोप द्यावा. फिरोन सावकाशीने सुमुहूर्त महाराजांनी देणे तर द्यावा.

क.३- नायकाशी कज्जा करावयासी जातां ऐसा संदेह जनतेवरून मनात वाटला असला, तर त्याविषयी खात्री करून घ्यावी. जो तालुका महाराजांनी नायकास करार केला त्यांत त्यांनी जावे. कज्जा करावा ही गोष्ट महाराजांचे हुकुमावांचून सहसा होणार नाही.

क.४- चिरंजीव भाऊ तिकडे गेले आहेत. नबाब (निजाम) ही तिकडे गेले म्हणजे गोव्याच्या शहास अंतर होऊन, आणखी किरकोळ गुंते तसेच अडकून पडतील. तेव्हा त्याचा लौकीक एक प्रकारे होऊन येईल, हा अर्थ महाराजांनी ध्यानात आणावा. सरकारांत भर करूं द्यावा तो उगवला (वसूल केला) पाहिजे. सर्वाही गोष्टीत आम्हांवर तोटा पडे असे करावे की काय? निदान येथून दो मजलीवर जाण्यास आज्ञा करावी. सर्व फौज व पिलाजी जाधव यांस चिरंजीवाकडे रवाना करितों आणि सेवेशीं फिरोन येतो.

क.५- महाराज निरोप देतात हा लौकीक जनांत जाहला. नबाबापावेतो बातमी जाईल. फिरोन दिल्हे हेहीवर्तमान जाईल, तेव्हा सर्व प्रकारे आम्ही इतराजींत हा लौकीक जाहला आहे व बाकी राहिला आहे. हाही होईल.

इतके प्रकार निखालसतेंने विनंती केली असतां (ही) महाराज ध्यानात न आणता आणीत तर ईश्वरें या दौलतीवर (राज्यावर) इतराजी केली अशी जाणावी. मग बाहेरीलही इज्जतीचा दरकार सोडून बसू सर्व मजकूर, वरल्याप्रमाणे विनंती करून, उत्तर घेऊन येणे.

या अत्यंत महत्वाच्या पत्रावरून नानासाहेबाची प्रामाणिकता, नम्रता बाजू उत्तम समजते. आपण आज्ञा मानण्यास तर तयार, पण धन्यानेंही 'निभावे ऐशी आज्ञा केली पाहिजे.' परिस्थिती न जाणतां धन्याने आज्ञा केली तर ती चाकराने कशी पाळावयाची? आपणाजवळ पैसा नाही, मग छ. शाहूने आज्ञा केली म्हणजे काय पैशाचा झरा लगतो असे थोडेच आहे. मुलुखगिरीस परवानगी दिली तर मिळेल त्याप्रमाणे देण्याचा प्रयत्न करूं. पण सैन्य जागेवर बसवून ठेवले तर पैसा कोठून मिळणार? नायकाशी कारणावाचून तंटा करण्याची आपली इच्छा नाही, पण निजाम मध्ये यावयास लागला तर राज्याची जोखीम घेणाऱ्यास स्वस्थ कसे बसतां येईल? तसेच चुगलखोरांवर विश्वास ठेवून मुख्य प्रधानास बडतर्फ करावे अशी जेथील राज्यनिती तेथे प्रधानाने कारभार तरी कसा चालवावा? तेव्हा वेळीच चुकीची दुरूस्ती छ. शाहूने केली तर उत्तम, नाही तर या चुकीमुळे दौलतीवरच घाला येईल. मग आपणांस अब्रूसाठी गप्प बसण्याचीही जरूरी रहाणार नाही, असा पेशव्याने स्पष्ट इषारा वरील पत्रात छ. शाहूस दिला आहे.

या वेळी पेशव्याची व छ. शाहूची भेट होत नव्हती. सर्व बोलणे गोविंदराव चिटणीसामार्फत चालत असे. छ. शाहूच्या कर्जाची फेड सवडीनुसार आपण करू म्हणून पेशवा सांगतो, पण त्या केवळ तोंडच्या गप्पा, पोकळ वायदे करून पेशवा वेळ मारून नेतो इतकेच, असे छ. शाहूस त्यांच्याच राण्यांचे सांगणे होते. तसेच तुमच्या डोळ्यांदेखत तो बाबुजी नायकास त्रास देतो तर सर्वाधिकार दिल्यास पुढे काय करणार नाही असेही चुगलखोरांनी त्यास भासविले असावे. छ. शाहूचे मन या परस्पराविरोधी विचारांमुळे गोंधळून जाऊन त्याचा निश्चय होईना. वास्तविक सदाशिवराव भाऊस कर्नाटकमध्ये पाठविण्याचा हेतु छ. शाहूच्या कर्जफेडीसाठी पैसा गोळा करण्याचाच होता. याचसाठी नानासाहेबाने उत्तरेत रजपुतांशी संधान जोडून पैसा पाठविण्यासाठी शिंदे होळकराकडे मागणी केली होती. पण सैन्यखर्च भागून पैसा उरत नसे. वरील पत्र पाठवूनही छ. शाहू निकाल करीना, तेव्हा नानासाहेब बाहेर पडतो हे जेव्हा छ. शाहूने पाहिले तेव्हा हा भलतेच काही तरी करेल अशी त्यास भीती वाटली. परिणामी याच्यावाचून राज्यधुरा वाहणारा दुसरा लायक कोणी नाही, टीका करणारे मात्र सगळेजण आहेत हा विचार करून त्याने पेशव्यास मागे बोलावले व पुनः अधिकाराचीं वस्त्रे दिली, हत्ती दिला व स्वारीवर जाण्यास निरोप दिला.

'श्रीकृपेने उत्तम प्रकारे रंग उतरला' असे पेशव्याने १५ एप्रिल १७४७ रोजी पिलाजीस कळविले. याच सुमारास सदाशिवराव कर्नाटकच्या स्वारीतून परत आला व नंतरच्या कागद पत्रातून कर्जाचा उल्लेख नाही. त्यावरून नानासाहेबांने छ. शाहूच्या कर्जाचा निकाल केला असला पाहिजे असे मानता येते.

नानासाहेब साताऱ्याहून पंढरपुरास जाऊन परत येताना जेजुरी येथे सदाशिवरावला भेटले व दोघेजण २४ मे १७४७ रोजी पुण्यास दाखल झाले. अधिकार भ्रष्टतेच्या या प्रकरणात पेशव्याचे बरेच दिवस वाया गेले, पण एका अर्थी हालवून खुंटी घट्ट केल्यासारखे झाले. यानंतर मात्र राज्याचा येथून पुढे सर्वाधिकार नानासाहेब पेशव्याकडेच येणार ही गोष्ट या प्रसंगाने निश्चित झाली.

## ४.७ प्रकरण संदर्भ -


१) आठल्ये श्रीकृष्ण वि.- रिंगणगावकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपतची बखर व पत्रे, सर्व अप्रकाशित.

२) अंधारे भा. रा., गढा मंडळा, भोसले आणि पेशवे, विदर्भ संशोधन ८२

३) भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल व इतिवृत्ते.

४) भावे वि. ल., मराठी दप्तर रुमाल भाग २ व ३

५) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र १९७६

६) भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे यांची प्रकाशने - इतिवृत्ते १८३२, ३३, ३५

७) भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल व इतिवृत्ते.

८) बेंद्रे वा. सी., मराठा इतिहासाची साधने

९) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र

१०) चिटणीस कृ. ना. सोशिओ इकॉनॉमिक अस्पेक्टस् ऑफ मिडव्हल इंडिया

११) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत.

१२) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, १९३७

१३) डिके चि. भि., पर्वती संस्थानाचे वर्णन १९१४

१४) गोगटे चि. ग., नानासाहेब पेशवे चरित्र १९०८

१५) गोडसे द. ग., 'दप्तनी' १९९२

१६) गर्गे स. मा., मराठी रियासत, खंड ४, पृष्ठ ६३, ६६, ६७-३८, ६९-७०, २८९-९०, ९१, ९२, ९६-९७, ९९, ३६६,

१७) गाठाळ साहेबराव, मराठ्यांचा इतिहास.

१८) इतिहास संशोधन प्रदिप त्रैमासिक, इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक, सप्टें. १९८७

१९) जोशी ना. वि., पुणे वर्णन (आ. स. १९७१ मुनर्मुद्रण)

२०) खरे- ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १, इचलकरंजीचा इतिहास

२१) खरे ग. ह., कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास भाग १, २, ३.

२२) खोबरेकर वि. गो., मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम (आ. स. १९७७)

२३) खोबरेकर वि. गो., शिंदे श. सं., कोकणच्या इतिहासाची साधने १६९२ ते

१८२९ खंड १ (आ. स. १९७१)
२४) खरे ग. ह., जोशी श. ना., ऐतिहासिक मराठी साधने (आ. स. १९८३)
२५) खरे ग. ह., शनिवारवाडा (आ. स. १९५८)
२६) खरे वा. वा., ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १ ते १५
२७) काव्येतिहाससंग्रह - (साने) पत्रे, यादी वगैरे, छ. शाहू महाराजांचे चरित्र, रामराजांचे चरित्र, पेशव्यांची खबर, रघुनाथ यादवांची पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर व कैफियत.
२८) नागपूर अफेअर्स- खंड १, पृष्ठ क्र. २०२
२९) नियतकालिके/वृत्तपत्रे - इतिहास संशोधन पत्रिका
३०) पारसनीस- इतिहाससंग्राहातील प्रकरणे, भारतवर्ष, वर्ष १, २; बुंदेलखंडाची त्रुटित बखर, बुंदेल्यांची बखर;, रामचंद्रबाबाबी अप्रकाशित पत्रे, तह व करामदार.
३१) पारसनीस द. ब., इतिहास लेखसंग्रह
३२) पारसनीस द. ब., ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर यांचे चरित्र (आ. स. १९००)
३३) पिसुर्लेकर पां. सं., पोर्तुगीज मराठे संबंध १९६७
३४) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर, भाग १ ते ३ (आ. स. १९२९/२९/३४)
३५) पारसनीस द. ब., पेशवे दप्तरातील माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे भाग १ ते ७
३६) पाठक महाले, मराठी सत्तेचा इतिहास
३७) राजवाडे- खंड १, ४, ६.
३८) राजवाडे वि. का., मराठ्याच्या इतिहासाची साधने खंड २२
३९) रा. ब. वाड- नानासाहेबांच्या रोजनिशा- कैफियती व यादी (भाग १-३)
४०) रानडे एम. के., राईज ऑफ मराठा पॉवर
४१) शेजवलकर त्र्यं. शं., पेशवे निजाम संबंध (आ. स. १९६३)
४२) सरदेसाई गो. स.-काळे या. मा., वाकसकर वि. स., काव्ये इतिहास संग्रह, ऐतिहासिक पत्रे
४३) साने का. ना., पेशव्यांची बखर (आ. स. १९२५)
४४) सरदेसाई गो. स. मराठी रियासत, नवीन आवृत्ती खंड १ ते ४, मुंबई

१९९२-९३, मराठी रियासत मध्य विभाग २, पृष्ठ क्र. ३८,

४५) सेतू माधवराव पगडी, मराठी निजाम संबंध

४६) श्रीकृष्ण वि. आठल्ये- रिंगणगावकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपतची बखर व पत्रे, सर्व अप्रकाशित.

४७) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड २, ३, ४, ३१, ४५

४८) सासवडकर, आठवले - मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास

४९) वाड रा. ब. - नानासाहेबांच्या रोजनिशा- कैफियती व यादी (भाग १-३)

५०) वाकसकर- कोटेकर पंडितांची पत्रे (अप्रकाशित)

५१) वाड, रा. ब. ग. चि., छ. शाहू रोजनिशी १

५२) वाड, रा. ब. ग. चि., बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी २-३ (आ. स. १९०६)

५३) वाकसकर- कोटेकर पंडितांची पत्रे (अप्रकाशित)

54) B. Baten-Powel - Study of the Dekkan Villages, their origin and development (J.R.A.S. 1987)

55) Duf. Grant 1. - 'History of the Mahratts' Vol. I & II (Ed. 1963)

56) Duff Grand J. S., - A History of the Maratha's 1921 London

57) Elloit & Dowson - Hisotry of India - Vol. S., Asiatic Researches - Vol 3.

58) Gadgil P. - Poona : A socio, Economic survey.

59) Joshi P. M., 'Expansion of the Maratha Power (1707-1761)' (Ed.1957)

60) Kincaid C. and Parasnis D., A History of Maratha people, 1918 London

61) Mahajan T. T., Trade and Commerce during the Peshwa

62) Sardesai G. S.- 'Selections from the Peshwa Daftar' Vol. 1 to 45 (Ed. 1930-34). (In Marathi).

63) Sardesai G. S., Vol.- 7 : Poona Affairs (Ed. 1940)

64) Sardesai G. S., Vol.- 12 : Poona Affiars- (Pt.I) (Ed. 1950)

65) Sardesai G. S., Vol.- 13 : Poona Affairs (Pt.II) (Ed. 1950)

## प्रकरण ५

# सामग्री विश्लेषण संकलित माहितीची मिमांसा

## अ) नानासोहब पेशवे पूर्व महसूल व्यवस्थेची माहिती व रचना

५.१ प्रस्तावना

५.२ जमीन महसूल सुधारणा

५.३ कोकण विभागाशी असणारी महसूल व्यवस्था

५.४ कोकण विभाग पडीक जमीन धोरण

५.५ सारा सवलत धोरण

५.६ कर, पाटबंधारे, तगाई धोरण

५.७ आर्थिक व्यवस्था घटक

५.८ पेशवेकालीन महसूल अधिकारी

५.९ शेती व महसुलातील सुधारणा

५.१० जमीन महसुलातील प्रमुख घटक

५.११ महसूल आकारणी पध्दत

५.१२ जमीन प्रतवारी धोरण (वर्गवारी)

५.१३ इतर सारा सवलत धोरण

५.१४ पडीक जमिनीबाबतचे धोरण

५.१५ तगाई व लिलाव पध्दती धोरण

५.१६ जमीन दान करण्यासंबंधी धोरण

५.१७ आर्थिक धोरणांचे महत्त्व आणि गरज

५.१८ आर्थिक धोरणांचा पुरस्कर्ता

५.१९ प्रकरण संदर्भ

## ब) सार्वजनिक खर्च व इतर बाबी

५.१ प्रस्तावना

५.२ सार्वजनिक उत्पन्नाची साधने

५.३ उत्पन्नाचे साधन या दृष्टीने चौथाई सरदेशमुखी

५.४ प्रकरण संदर्भ

## क) परराष्ट्र व्यापारविषयक धोरण

५.१ प्रस्तावना

५.२ व्यापार उद्योग विषयक धोरण

५.३ नानासाहेबांचे परराष्ट्र व्यापारविषयक धोरण

५.४ नानासाहेब पेशवे कालखंडातील व्यापार

५.५ अंतर्गत व्यापार

५.६ वाहतुकीची साधने, व्यापारी जमाती

५.७ अंतर्गत बाजारपेठा, व्यापारी वस्तू

५.८ नानासाहेब पेशवे व आर्थिक प्रशासन

५.९ व्यापारी व सावकारी वर्गाचा उदय

५.१० पेशवे व चलन व्यवस्था

## ड) नानासाहेब पेशवे यांचे वतनदार व सावकारविषयक धोरण

५.१ प्रस्तावना

५.२ पेशवे व मराठा काळातील प्रशासन

५.३ अर्थव्यवस्थेचे खांब (पिलर्स)

५.४ प्रकरण संदर्भ

## प्रकरण ५

# सामग्री विश्लेषण संकलित माहितीची मिमांसा

## अ) नानासाहेब पेशवे पूर्व शेती व महसूल व्यवस्थेची माहिती व रचना

### ५.१ प्रस्तावना -

प्रकरण ३ मध्ये संशोधनाच्या कार्यपध्दतीचे विवेचन केले आहे. सदर संशोधनासाठी संशोधकाने नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करण्याकरिता पुणे व पुणे परिसराची निवड केली आहे. प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. या ठिकाणी संशोधकाने प्रत्यक्ष व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

मराठ्याच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवरायांच्या कार्याला अनन्य साधारण महत्व आहे. शिवरायांनी आदर्श प्रशासन व्यवस्था निर्माण केली. लष्कर, पायदळ, घोडदळ, आरमार या सर्व क्षेत्रामध्ये शिवरायांनी दैदिप्यमान प्रगती केली. याबद्दल दुमत नाही. या सर्व क्षेत्रामध्ये गुणवत्तेचा विचार करून प्रत्येक मावळ्याला त्याच्या गुणवत्तेला अनुकूल असे काम दिले. आणि स्वराज्याच्या कामगिरीमध्ये सामावून घेतले. असा आदर्श छ. शिवरायांच्या राज्यव्यवस्थेमध्ये दिसून येतो. राज्य व्यवस्थेमधील अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे अष्टप्रधान मंडळ होय. या अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक विभागाच्या प्रमुखांना कामाची जबाबदारी दिली गेली. या विभाग प्रमुखांनी आपआपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली. या अष्टप्रधान मंडळातील सर्वात पहिले पद म्हणजे प्रधान होय. छ. शिवरायांचा पहिला प्रधान (पेशवा) शामराज निळकंठ उर्फ शामराज पंत हा होता याबद्दल चा उल्लेख शिवरायांच्या राजमुद्रेत दिसून येतो. त्यानंतर मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली या प्रधान पदाला मोरोपंतांनी नावलौकीक मिळवून दिला अशारितीने पिंगळे घराण्याने प्रधान या पदाचे महत्व काय आहे याचा आदर्श पुढील पिढीस दिपस्तंभासारखा घालून दिला. मोरोपंत पिंगळे अत्यंत पराक्रमी असून त्याने नाशिक जवळील साल्हेर -मुल्हेरच्या लढाईत मोठा पराक्रम केला. त्र्यंबक, बागलान पर्यंत मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. वणीदिंडोरापर्यंत मराठ्यांची मजल गेली. यासंदर्भात मोरोपंत पेशव्यांच्या पराक्रमाचे खालीलप्रमाणे आलेले दिसून येते.

''पुण्याच्या कप्प्या गर्जता ते शिवाजी, तेथे नांदतो तो पेशवा मर्जगाजी
जैसे मारिले अर्जुनाने कौरवे, तैसे मारिले मोघले पेशव्याने''

अशारितीने १६६६ ते १६७४ या काळामध्ये पेशवे पदाला मोठा दर्जा मिळाला. छ. शिवरायांच्या राज्याभिषेकावेळी तर मोरोपंत पिंगळे हा सर्वेसर्वा पेशवा होता असेच निदर्शनास येते.

पेशवा हा पर्सियन शब्द असून त्याचा मराठीत व संस्कृतमध्ये मुख्य प्रधान असा अर्थ आहे. छत्रपतींच्या खालोखालचे हे दुसऱ्या क्रमांकाचे पद होय.

या आदर्शाचा वारसा पिंगळे घराण्यातील मोरोपंता नंतर त्यांचा मुलगा बहिरोपंत पिंगळे याने चालविला. पुढे छ. शिवरायांच्या नंतर छ. शाहूंच्या काळामध्ये ही बहिरोपंत पिंगळेनेच मोठ्या कर्तबगारीने या पदाला महत्व प्राप्त करून दिले. म्हणून बहिरोपंत पिंगळे यांना पेशवा म्हटले जाते. छ. शाहू यांची १७०७ मध्ये मोगलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर अनेक सरदार शाहुला मिळू लागले. यावेळी महाराष्ट्रामध्ये महाराणी ताराबाईने हा छ. शाहू तोतया आहे अशी अफवा पसरविली. तिने आपला मुलगा शिवाजी दुसरा यास छत्रपती बनवून छ. शाहूचा छत्रपती पदाचा हक्क अमान्य केला. अशारितीने छ. शाहू व ताराबाई यांच्यात यादवी युद्धाला सुरूवात झाली. महाराणी ताराबाईने अनेक सरदारांना दूध -भाताच्या शपथा देवून आपल्या बाजूस वळविले. कोकण किनारपट्टीवर मराठ्यांचा आरमार प्रमुख म्हणून आंग्रे घराणे नावारूपाला आलेले होते. आंग्रे घराण्यातील कर्तबगार पुरूष कान्होजी आंग्रे हे मराठा आरमार प्रमुख (सरखेल) असतात. ताराबाईच्या सांगण्यावरून कान्होजी आंग्रेने छ. शाहूला विरोध केला. तेव्हा कान्होजी आंग्रेचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. छ. शाहू कडून बहिरोपंत पिंगळेने कान्होजी आंग्रेचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी स्विकारली. आणि सैन्यासह तो कान्होजीचा बंदोबस्त करण्यासाठी कोकण किनारपट्टीवर रवाना झाला. कान्होजी आंग्रे म्हणजे सामान्य व्यक्ती नव्हती. ते मराठ्यांचे आरमार प्रमुख होते. संपूर्ण कोकण किनारपट्टीवर त्यांचा दबदबा होता. परकिय सत्ता प्रामुख्याने सिद्धी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्यावर तर कान्होजीची दहशत दिसून येते. अशा या दर्याराज कान्होजी आंग्रेचा बंदोबस्त करण्यासाठी बहिरोपंत पिंगळे कोकणात येतो. मात्र त्याची फसगत होवून कान्होजी आंग्रे कडून कैद झाला. बरेच सरदार ताराबाईच्या गोटात जातात. अशा अनेक संकटांच्या मालिकाच छ. शाहू समोर उभ्या राहिल्या.

तेव्हा या संकटावर कशी मात करावी. ही समस्या आवासून छ. शाहू समोर उभी राहिली. याप्रसंगी छ. शाहूला एकच आशेचा किरण दिसला, तो म्हणजे बाळाजी विश्वनाथ होय. यापूर्वी बाळाजीने छ. शाहू हा तोतया नाही, तर तो खराच आहे. स्वराज्याचा तोच खरा छत्रपती असून आपण सत्याची, न्यायाची बाजू घेतली पाहिजे असे सेनापती धनाजी जाधवाला पटवून सांगण्याचे कार्य खेडच्या युद्धामध्ये सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथने केलेले असते. म्हणूनच धनाजी जाधवासारखा रणझुंजार सेनापती छ. शाहूंच्या पक्षात आला. यावरून बाळाजी विश्वनाथचे कौशल्य मुत्सदगीरी दिसून येते. तेव्हा छ. शाहूने बाळाजी समोर बहिरोपंत पिंगळे कैद झाला हे शब्द उच्चारताच बाळाजी अस्वस्थ झाले. छ. शाहूने कान्होजीचा समाचार घेण्यासाठी बाळाजी विश्वनाथकडे जबाबदारी सोपविली. तेव्हा बाळाजीने छ. शाहूस म्हणाले मी कोणत्या अधिकाराने आरमार प्रमुखाला आपल्या बाजूला वळविणार तेव्हा तुम्ही मला काहीतरी कायदेशीर अधिकार द्या. तरच मला कान्होजी आंग्रेचा समाचार घेणे किंवा आपल्या बाजूला वळविणे सोयीचे होईल. छ. शाहूला बाळाजी विश्वनाथ यांचे म्हणणे पटले आणि म्हणूनच छ. शाहूने पुण्याजवळील मांजरी या गावी बाळाजी विश्वनाथला १७१३ मध्ये पेशवाईची वस्त्रे दिली. अशाप्रकारे १७१३ पासून पेशवाईची सुरूवात झाली. ही एक महान क्रांतीच मानावी लागेल. कारण पिंगळे घराण्याकडून भट घराण्याकडे पेशवाई आली. बाळाजी विश्वनाथने पेशवाई मिळताच कान्होजीचा समाचार घेण्यासाठी ते कोकणात गेले. बाळाजी विश्वनाथ हे लढवय्ये नव्हते तर ते कलम बहाद्दर होते. त्यांनी ओळखले की कान्होजी आंग्रे सारख्या आरमार प्रमुखासमोर परकिय सत्ता ही नतमस्तक होतात तेथे आपली काय भिषाद! तेव्हा ताकतीचा, तलवारीचा वापर करून उपयोग होणार नाही हे ओळखून त्यांनी सुरवातीस कान्होजी आंग्रे बरोबर पत्रव्यवहार केला. आपण महान आहात. छ. शिवरायांच्या पासून आपल्या घराण्याने मराठा आरमाराची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. तसेच आपल्यालाही इंग्रज, पोर्तुगीज, सिद्धी या परकीय सत्तेपासून धोका आहे. तेव्हा आपला प्रामाणिकपणाचा आदर्श नेहमीच सत्याच्या बाजूकडील आहे. आपण स्वराज्याचा खरा वारस छ. शाहूच आहे. हे सत्य जाणत आहात. तेव्हा आपण सत्याच्या न्यायाच्या बाजूला या. छ. शाहू कडून तुमचे सरलेखपद मान्य करून घेतो. आणि जी काही मदत असेल ती करण्यास आम्ही तत्पर सेवेशी आहोत.

ताराबाईच्या पक्षात जाणे म्हणजे बुडत्या जहाजाचा कप्तान होण्यासारखे आहे. अशा प्रकारचा पत्र व्यवहार बाळाजीने कान्होजी आंग्रेबराबेर केलेला दिसून येतो. कान्होजी आंग्रेला हे पटले. आणि त्याने छ. शाहूंचे स्वामीत्व मान्य केले. या घटनेचे इतिहासकार गो. स. सरदेसाई बळाजीचे कौतुक पुढील शब्दात करतात. गोळी वाजल्याविना कान्होजी आंग्रेसारखा मातब्बर सेनापती छ. शाहूच्या पक्षात आणण्याचे काम बाळाजीने केले. त्यामुळे छ. शाहूचा बाळाजी विश्वनाथ वर पूर्ण विश्वास बसला. असा हा बाळाजी विश्वनाथ म्हणजे छ. शाहूचा अतुल पराक्रमी सेवक होता.

अशारितीने बाळाजी विश्वनाथच्या भट घराण्याने प्रधान म्हणजे पेशवे या पदाची पुढील कालखंडामध्ये महती वाढविली. छ. शाहूंचा पूर्ण विश्वास संपादन केला. बाळाजी विश्वनाथ नंतर त्यांचा मुलगा बाजीराव पहिला यांनाही पेशवे पदाला आपल्या कर्तबगारीने उजाळा दिला. यादृष्टीने पेशवे कालखंड एक महत्वपूर्ण कालखंड होता असेच म्हणावे लागते.

पेशव्यांनी मराठ्यांची राजधानी पुणे या शहराचा मुलभूत पाया तयार केला. आज पुण्याला महाराष्ट्रात व देशात जे महत्वाचे स्थान आहे. याचे सर्व श्रेय पेशव्यांना देणे उचित ठरेल! पुण्याचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात जो विकास झाला. त्याचे कारण पेशव्यांनी राबविलेल्या ध्येयधोरणांनाच द्यावे लागेल. पेशव्यांच्या आर्थिक, सामजिक, राजकीय व धार्मिक निर्णयांचा एकूणच महाराष्ट्राच्या समाज जनजीवनावर परिणाम झाला. त्याचा अभ्यास होणे महत्वाचे आहे. साधारणपणे १७१३ ते १८१८ हा पेशवाईचा कालखंड मानला जातो. या काळामध्ये अनेक पेशव्यांनी आपली कर्तबगारी दाखवली. मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. मराठ्यांचे वर्चस्व दक्षिण व उत्तर भारतात निर्माण केले. या दृष्टीने पेशव्यांनी राबविलेल्या धोरणांचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. मराठ्यांची राजधानी पुणे म्हणजे महाराष्ट्राचे भूषण मानावे लागेल. नानासाहेब पेशव्यांनी मनगटी बळाचा वापर करण्यापेक्षा बुद्धीचातुर्याच्या जोरावर आपली राजवट दैदिप्यमान केली.

पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करीत असताना प्रामाणिकपणा, सचोटी लढवय्येपणा, जिद्द, चिकाटी, आत्मविवासाच्या जोरावर नवीन सरदार घराणे उदयास

आणली. या सरदार घराण्यांचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सुरक्षिततेसाठी उपयोग करून घेतला व मराठी सत्तेचा जरी पटका अटकेपार पोचवला. दक्षिणेकडील शत्रू प्रामुख्याने निजाम, हैदरअली व नवाबांचा बंदोबस्त केला. त्यांच्याकडून चौथाई, सरदेशमुखी वसूल केली. याचा उपयोग आपल्या राज्यातील विविध सुधारणा, लष्कर खर्च व सुरक्षितता यावर केला. याचबरोबर उत्तरेकडील मोघल असोत. राहिले असोत अथवा इतर जाट, रजपूत या विरोधकांचाही त्यांनी बंदोबस्त केला व मराठी सत्तेला नावारूपाला आणले. या दृष्टीने पेशवे कालखंड म्हणजे एक महत्वपूर्ण कालखंड होता असेच म्हणावे लागेल. अशा या कालखंडातील एक महान पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब! यांच्या व्यक्तीमत्वाच्या विविध पैलूंचा विचार होणे आवश्यक आहे. असे माझे प्रामाणिक मत आहे. हा पेशवा लढवय्या पेक्षा उत्तम प्रशासक असून मराठ्यांच्या इतिहासामध्ये राजकारण धुरंधर म्हणून ओळखला जाणारा पेशवा म्हणजे नानासाहेब होय. नानासाहेब पेशव्यांचा कालखंड १७४० ते १७६१ असा दीर्घ २१ वर्षाचा होता. या २१ वर्षाच्या कालामध्ये नानासाहेबांनी छत्रपती छ. शाहूंचा विश्वास संपादन केला. १७४० ते १७४८ या काळामध्ये नानासाहेबांनी उत्तरेकडे एकूण चार स्वाऱ्या केल्या. एक माळवा स्वारी, दुसरी भेलसा स्वारी, तिसरी नेवाईची स्वारी तर चौथी बंगालची स्वारी. त्यानंतर १७४८ ते १७६१ पर्यंत हा नानासाहेब पेशवा उत्तरेच्या स्वारीवर गेला नाही. उत्तरेच्या स्वारीची संपूर्ण जबाबदारी आपला लहान बंधू रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा यांच्याकडे सोपविली. रघुनाथरावांच्या मदतीला शिंदे आणि होळकर हे मराठ्यांचे मातब्बर सरदार दिले होते. १७४० ते १७४८ या दुसऱ्या कालखंडामध्ये सातारच्या छ. शाहूकडे महाराणी व दाभाडे घराण्यातील उमाबाई दाभाडे यांनी छ. शाहूकडे नानासाहेब पेशव्यांबद्दल तक्रारी केल्या. तेव्हा छ. शाहूने नानासाहेबांना ‘पेशवे’ पदावरून निलंबित केले. नानासाहेबांनी प्रामाणिकपणे पेशवेपदाची वस्त्रे परत केली. बंडखोरी केली नाही. त्याचा हा प्रामाणिकपणा पाहून छ. शाहूंचा नानासाहेबांवर विश्वास बसला आणि पुन्हा त्यांना सन्मानपूर्वक पेशवाईची वस्त्रे दिली. अशा या नानासाहेबांच्या हातून कळत न कळत काही चुकाही झाल्या असतील. त्यामध्ये त्यांनी आंग्रेंचे आरमार नष्ट करणे, रघुजी भोसले या मराठी सरदाराला मदत न करणे. परिणामी उत्तर भारतात प्रबळ इंग्रजी सत्ता उदयास आली. त्याच्या काळातील अत्यंत महत्वाची घटना म्हणजे पानिपतची तिसरी लढाई होय.

(दि. १४ जानेवारी १७६१) या लढाईत मराठ्यांची सव्वालाख बांगडी फुटली असे म्हटले जाते. यावेळी मोठी जिवितहानी झाली. अशा या नानासाहेबांजवळ त्यांच्या आजोबांचे मुत्सद्दीपणाचे गुण होते. वडिलांचे लढवय्येपणाचे फार गुण दिसत नाहीत. मात्र त्यांच्याजवळ राजकारण चातुर्य, मनुष्य स्वभावाची पारख करण्याची विद्या आणि स्वभावाचे माधुर्य यामुळे नानासाहेबांनी मराठी राज्याचा विस्तार दिल्लीपासून श्रीरंगपट्टणपर्यंत आणि बंगालपासून गुजरातपर्यंत केला. असा हा नानासाहेब बैठा व मुत्सद्दी पेशवा होता. म्हणजे ''सरदारकीने काम करावे जातीनिशी जाया होऊ नये'' नानासाहेबांनी कोल्हापूरच्या दुसऱ्या संभाजीबरोबर छ. शाहूंच्या अपरोक्ष सहा कलमी करार केला होता. कारण या दोघांनाही मूलबाळ झाले नाही. तेव्हा छत्रपती छ. शाहूंचे 'दत्तक वारस' या दृष्टीने या कराराला महत्वाचे स्थान आहे. अशा या नानासाहेब पेशव्यांच्या राजकीय, सामाजिक कार्यापेक्षा त्याने केलेल्या आर्थिक कार्याचा, सुधारणांचा चिकित्सक विचार होणे आवश्यक आहे असे वाटते.

प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास करत असताना संशोधकाने मराठ्यांच्या इतिहासामधील पेशवे कालखंडातील आर्थिक घडामोडीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. पेशवे कालखंडामध्ये बाळाजी विश्वनाथपासून ते बाजीराव पहिला आणि पेशवा नानासाहेब या कर्तबगार पेशव्यांच्या कर्तृत्वाचा साकल्याने विचार केला आहे. यामध्ये बाळाजी विश्वनाथ यांची कारकीर्द पहिला पेशवा या दृष्टीने छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यामध्ये गेली. काही प्रमाणातच आर्थिक सुधारणा करण्याचा प्रयत्न या पेशव्यांनी केला. या पेशव्यांचा जास्तीत जास्त वेळ छत्रपतींच्या छ. शाहूंच्या राजकीय घडामोडीत गेला. परिणामी आर्थिक घडी बसवता आली मात्र पुढील काळात ती टिकवता आली नाही. बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये एक लढवय्या पेशवा यादृष्टीने बाजीराव पेशवे पुढे आले. मोठी राजकीय सत्ता निर्माण झाली. दक्षिण व उत्तर हिंद या दोन्ही भागामध्ये जवळजवळ सर्व भारतभर मराठी सत्तेचा दबदबा निर्माण झाला. यासाठी बाजीराव पेशव्यांना आपली संपूर्ण हयात युध्द मोहिमा आणि लढाया यामध्ये घालवावी लागली. त्यामुळे ही मराठी राज्याला प्रचंड आर्थिक ताण सोसावा लागला. स्थिरतेच्या दृष्टीने त्यांची कारकीर्द दिसून आली नाही. मात्र त्यांच्यानंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये मात्र मराठी राज्याला स्थिरता मिळाली. साधारणपणे त्यांच्या कर्तबगारीचे दोन कालखंड

पडतात. १) १७४० ते १७४८ हा पहिला कालखंड तर २) १७४९ ते १७६१ हा दुसरा कालखंड. या दोन्ही कालखंडामध्ये नानासाहेब पेशव्यांची प्रारंभिक कर्तबगारी दिसून येते. या दुसऱ्या कालखंडामध्ये छ. शाहूंचा १५ डिसेंबर १७४९ मध्ये मृत्यू झाल्यामुळे नानासाहेब पेशव्यांना सर्वाधिकार प्राप्त झाले. परिणामी सातारा ऐवजी पुणे या शहराला राजधानीचे स्वरूप प्राप्त झाले. संपूर्ण देशाचे राजकारण पुण्यामधून होऊ लागले. या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी सरदारकीने काम करावे या तत्त्वाचा वापर करून उत्तर भारतामध्ये, दक्षिण भारतामध्ये मराठ्यांची प्रचळ सत्ता निर्माण केली. एवढेच नव्हे तर मराठ्यांना किंगमेकर बनवले.

नानासाहेब पेशवे यांची कारकीर्द स्थिर स्वरूपाची व दीर्घ स्वरूपाची लाभल्यामुळेच शिवाय पहिल्या दोन पेशव्यांनी त्यांच्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेचा मूलभूत पाया रचल्यामुळे नानासाहेब पेशव्यांच्या कर्तबगारीमुळे सर्व भारतभर मराठी सत्तेचा बोलबोला झाला. नानासाहेब पेशव्यांनी पहिल्या कालखंडामध्ये प्रामाणिकपणे छ. शाहूंचेच नव्हे तर सततच्या युध्द मोहिमामुळे झालेले वडील बाजीराव पेशव्यांच्याही कर्जाची परतफेड केली. सावकारांची देणी देऊन टाकली. छ. शाहूंना कर्जमुक्त केले. यासाठी नानासाहेब पेशव्यानी राबविलेली आर्थिक धोरणे महत्त्वपूर्ण ठरतात. नानासाहेब पेशवे यांच्याजवळचा मुत्सद्दीपणा, धोरणे ओळखून वागण्याची पध्दती, दूरदृष्टीपणा तसेच प्रशासकीय बाणा यादृष्टीने त्यांची कारकीर्द सरस ठरली. पुणे आणि पुणे परिसराची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे. नानासाहेब पेशवे यांच्या शेती, उद्योग, व्यापार, महसूल व्यवस्था, वतनदार वर्ग या सर्व घटकांशी हे संशोधन निगडीत आहे. या सर्व घटकांशी त्यांचे अनुकूल धोरण, त्यांच्या योजना समजून घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने या प्रस्तूत संशोधनात त्यांच्या आर्थिक धोरणांचे वेगळेपण दिसून येत आहे. त्यांच्या कालखंडातील सर्वात दुर्दैवी घटना म्हणजे १४ जानेवारी १७६१ रोजी घडलेली पानिपतची घडलेली तिसरी लढाई. एक पेशवा म्हणून त्यांना जबाबदार धरले जाते. आज या घटनेला दि. १४ जानेवारी २०११ रोजी जवळजवळ अडीचशे वर्षे पूर्ण होत आहेत. नानासाहेबांनी राबविलेल्या राजकीय धोरणामुळे या युध्दात मराठ्यांना पराभूत व्हावे लागले. हे सत्य असले तरी या राजकीय पराभवाच्या दोषामुळे त्यांचे आर्थिक कार्य झाकोळले गेले होते. प्रस्तूत संशोधनामध्ये त्यांच्या आर्थिक कार्याच्या बाजूवर प्रकाश टाकून प्रस्तूत

संशोधनाचे वेगळेपण या संशोधनातून निदर्शनास आणण्यात आले आहे.

मध्ययुगीन भारताच्या महसूल व्यवस्थेचा अभ्यास करताना मलिकअंबरची महसूल व्यवस्थेचा विचार करावा लागतो. छत्रपती शिवरायांच्याही महसूल व्यवस्थेवर मलिकअंबरच्या महसूल व्यवस्थेचा प्रभाव होता. मलिकअंबरने जमीन महसूल एकदा निश्चित केल्यावर तो गोळा कसा करावा मध्यस्थ दलालांचे महत्व कमी करणे, शेती मालाच्या किंमती ठरवून देणे महसूलाचा दर निश्चित करणे यादृष्टीने पाटील, कुलकर्णी यांना महसूल व्यवस्थेचे हक्क वंश परंपरेने बहाल केले. छ. शिवरायांनी महसूलाच्या सोयीसाठी आपल्या राज्याचे एकूण १६ प्रांत केलेले दिसून येतात. प्रामुख्याने मावळ, वाई, सातारा, कराड, पन्हाळा, दक्षिण कोकण, ठाणे, त्र्यंबक, बागलाण, वनगड, बिदनूर, श्रीरंगपट्टण, कर्नाटक, वेलोर, तंजावर इत्यादी. या काळात त्यांनी पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे यांची वतने चालू ठेवली. मात्र वतनदार वरचढ होणार होणार नाही याकडे लक्ष दिले. या काळात त्यांनी वतनदारांना वेतनदार बनविले. मुस्लिम कालखंडात मौजे परगाना, सरकार व सुभे असे महसुलाचे विभाग होते. महसूल प्रशासनामध्ये प्रामुख्याने प्रांताच्या ठिकाणी सुभेदार हा मुख्य अधिकारी असून त्याला चारशे होन पगार व पालखीचा मान असे त्याच्या हाताखाली एकूण ८ अधिकारी असत. यामध्ये दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जमादार, पोतनीस यापैकी तर्फ वरील हवालदाराला सर्वात कमी पगार असे. डॉ. सेन च्या मते वार्षिक ५ होन इतका असावा. अशा प्रकारे नानासाहेब पेशवे पूर्व काळातील महसूल व्यवस्था दिसून येते.

१७०७ नंतर छ. शाहुंची मोघलांच्या कैदेतून सुटका होवून छ. शाहू महाराष्ट्रात परत आले. परिणामी मराठी राज्याचे सारे स्वरूपच पालटले गेले. या काळामध्ये छत्रपतींना मदत करण्यासाठी १० मंत्री नियुक्त केले. हे मंत्री म्हणजेच प्रामुख्याने पेशवा, सेनापती, सचिव, सुमंत, मंत्री, अमात्य, न्यायाधिश, पंडितराव, सरलष्कर आणि प्रतिनिधी या १० मंत्री मंडळाच्या सहाय्याने छ. शाहूंनी आपले आसन स्थिर केले. या सर्वांमध्ये पेशवे या पदाला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण १७१३ ते १७२० या काळातील छ. शाहूचा भट घराण्यातील पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ याने छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यामध्ये प्रामाणिकपणे काम केले. छ. शाहू विरोधकांचा बंदोबस्त केला. मराठा मंडळ स्थापन करून सैन्य व इतर छ. शाहूंच्या

आर्थिक समस्या सोडविल्या. एवढेच नव्हेतर दिल्लीच्या राजकीय उठावात सय्यद बंधूंना मदत करून मुघल बादशहा कडून स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी या सनदा मिळविल्या. मराठी सत्तेचे महत्व दिल्लीच्या राजकारणात वाढविले. छ. शाहू हाच स्वराज्याचा खरा वारसदार हे सेनापती धनाजी जाधवाला सांगून त्याला छ. शाहूंच्या पक्षात आणले. छ. शाहूंची आई व इतर राज कुटुंबातील मंडळींची मुघल कैदेतून सुटका केली. बाळाजी विश्वनाथचा मुलगा पेशवे बाजीराव पहिला यांनी पेशवाईचा हाच वारसा पुढे चालू ठेवला.

छ. शाहूंच्या राज्याची आर्थिक भरभराट बाजीराव पेशव्याने आपल्या कर्तबगारीने केली. मराठ्यांचे शत्रू निजाम, मुघल यांचा बंदोबस्त केला. मराठी सत्तेचा मोठा साम्राज्य विस्तार केला. माळवा, बुंदेलखंड, गुजरात, दिल्ली पर्यंत मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. कर्नाटकातून चौथाई, सरदेशमुखी गोळा केली. पेशव्यांच्या मालिकेमधील हा सर्वात पराक्रमी पेशवा दिसून येतो. लढाया करणे हा त्यांचा पिंड होता. अशारितीने १७२० ते १७४० या कालखंडामध्ये बाजीराव पहिल्याने पेशवेपदाचा महत्व वाढविले. एवढेच नव्हे तर मराठ्यांचा दबदबा शत्रूंच्या मनात निर्माण केला. या शिवाय सिद्धी, पोर्तुगीज यासारख्या परकीय सत्तेलाही बाजीराव पेशव्याने नमविले. वरील दोन्ही पेशव्यांनी मराठ्यांचे राज्य वाढविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. छ. शाहूंच्या मृत्यूनंतर (१७४९) रामराजा हा मराठ्यांचा छत्रपती बनला. पण तो दुबळा नाममात्र होता. या काळात फक्त तीन मंत्री शिल्लक राहिले. १. प्रतिनिधी २. सचिव आणि ३. सेनापती या सर्वांमध्ये छत्रपती हे प्रमुख असले तरी रामराजे छ. शाहूंसारखे खंबीर दिसत नाहीत. ते दुबळे निघाले. याचा फायदा पेशव्यांना पुढील काळात घेतला. मराठ्यांची राजधानी सातारा होती. परंतु रामराजे दुबळे असल्यामुळे साताऱ्याचे महत्व कमी होवून पुढील काळात नानासाहेब पेशव्याने पुण्याला राजधानी ठिकाण बनविले. पेशव्यांनी प्रशासकीय विभागामध्ये काही बदल केलेले दिसून येतात. कारण या काळात पेशवेचे सर्वेसर्वा होते. सुभा, परगाणा, महाल, तर्फ व मौजे असे भाग केले. शिवकाळामध्ये प्रांताला सुभा म्हटले जात असे. सुभ्याची विभागणी परगाण्यामध्ये केली जात असे. परगाण्यांना काही वेळा महाल असे म्हटले जात असे.

## ५.२ नानासाहेब पेशवे व जमीन महसूल सुधारणा

पेशवे कालखंडामध्ये जमीनीपासून येणारे उत्पन्न हे सर्वात जास्त येत असल्यामुळे सर्वच पेशवे याबाबतीत दक्ष होते. पेशवे काळामध्ये छत्रपती छ. शाहूंच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याकडे राज्याचे सर्व अधिकार आले. तह शत्रू पक्षाबरोबर युद्ध आणि जमीन महसूल या संबंधातले सर्व आर्थिक अधिकार नानासाहेब पेशव्यांच्याकडे आले. राज्यकारभाराची आर्थिक घडी सुव्यवस्थित बसवण्यासाठी नानासाहेबांनी आपले लक्ष जमीन महसूल पद्धतीकडे दिले. १७५८ मध्ये जमीन महसूल व्यवस्थेतील दोष नष्ट केले. आणि नियोजीत आराखडा तयार करून जमीन महसूल व्यवस्थेला पूर्णत्व दिले. जमीन महसूलाचे पुढील भाग केले.

१. शेतजमीन- प्रामुख्याने ही जमीन लागवडीखाली असे. यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या.
२. कुरण जमीन- हा महसूलाचा दुसरा भाग. ही चरावू जमीन होती.
३. बाग जमीन- बागेसाठी किंवा आपल्या राज्यामध्ये सुशोभिकरण करण्यासाठी याप्रकारची जमीन महसूलाची विभागणी केली.
४. आमराई जमीन- ही जमीन खाजगी माणसाकडे असे किंवा स्वत: पेशव्यांच्या ताब्यात असत. वरील प्रकारे या जमीन महसूल व्यवस्थेचे टप्पे आढळत नाहीत. महसूल विषयी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय नानासाहेब पेशवे यांनी आपल्या मामलेदार, कमाविसदार आणि सुभेदार यांना केलेल्या आज्ञेवरून दिसून येतात. डॉ. सेन यांनी नानासाहेब पेशव्यांच्या या शेतीविषय धोरणांचे कौतुक करताना पेशव्यांनी या महसूल व्यवस्थेत लोकाभिमुख व लोककल्याण ही जाणीव जपली असे नमूद केले आहे.

## ५.३ कोकण विभागाशी असणारी महसूल व्यवस्था

ननासाहेब पेशवे यांनी कोकण विभागाकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. कारण कोकण विभागातून मिळणारा महसूल हा मोठ्या प्रमाणात होता. कोकण विभागामध्ये नारळ व इतर झाडे यांचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न निघत असे. विशेष करून नानासाहेबांनी कोकणातील समुद्र किनाऱ्याला नारळाची झाडे लावण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निदर्शनास येते. या संदर्भात डॉ. सेन यांच्या **ॲडमिनीस्ट्रेटिव्ह**

**सिस्टीम ऑफ द मराठाज** या ग्रंथामध्ये त्यांनी नानासाहेब पेशव्यांच्या कोकण भागातील नारळाची लागवड ही पेशव्यांना अधिक किफायतशीर होती त्यामुळे पेशव्यांच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडत असे. असे विधान डॉ. सेन यांनी वरील ग्रंथात केल्याचे दिसून येते. (पान. नं. ५५)

भंडारी लोकांना माडापासून दारू गाळण्यासाठीही प्रोत्साहन दिले जात असे. नारळाची झाडे लावण्यापासून १८ ते २० वर्षे सारा वसूल केला जात नसे. मात्र त्यानंतर सारा निश्चित केला जात असे. नारळाच्या प्रत्येक झाडाला दरवर्षी चार आणे सारा घेतला जात असे. सुपारीच्या झाडाला एक आणे सारा घेतला जात असे. भंडारी लोकांकडून ताडा-माडाच्या झाडाकडून प्रत्येकी रू. १ इतका सारा वसूल केला जात असे. नानासाहेबांनी विशेष करून कोकणातील सुवर्णदुर्ग भागातील शेतकऱ्यांनांही प्रोत्साहन देऊन कौलनामे दिल्याचे दिसून येते. या बरोबर सुपारी, फणस इ. वेगवेगळ्या झाडांवर वेगवेगळ्याप्रकारचा सारा आकारला जात असे.

## ५.४ नानासाहेब पेशवे यांचे पडीक जमिनीबद्दलचे धोरण (कोकण प्रांत)

नानासाहेबांनी कोकण विभागातील पडीक जमिनीबद्दलचे एक स्वतंत्र धोरण आखल्याचे दिसून येते. या पड जमिनीबाबत त्यांनी लोकांभिमुख धोरण आखल्याचे दिसून येते. जवळजवळ सर्वच पेशव्यांनी पडीक जमिनीबाबत सहानुभूतीपूर्वक धोरणांचा अवलंब केला. त्या त्या भागातील विविध अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या सूचना दिल्या. पडजमिन लागवडीखाली आणण्यासाठी पेशवे दरबारातून प्रोत्साहन दिले. कोकणातील अंजनवेल आणि सुवर्णदुर्ग या दोन भागातील मोठ्या प्रमाणात पडजमिनी लागवडीखाली आणण्यासाठी विशेष प्रोत्साहन देऊन लोकांची मने तयार केली. यासंदर्भात खालील सुधारणात्मक उपाय योजल्याचे दिसून येते.

१) जी व्यक्ती डोंगर फोंडून जमिन तयार करील त्या व्यक्तीला निम्मी जमिन इनाम दिली जात असे. व उरलेल्या निम्या जमिनीवर वीस वर्षे सारा आकारला जाणार नाही.

२) जी व्यक्ती समुद्र किनाऱ्याला बांधबांधोरा करून जमिन तयार करीत असे त्या व्यक्तीकडून नाममात्र सारा घेतला जात असे.

३) नानासाहेब पेशव्यांकडे गुहागर येथील नारो अनंत परचुरे या शेतकऱ्याने त्याभागातील रयतेच्या शेतकऱ्यांच्या अडचणी सांगितल्या निसर्गातील संकटांमुळे

बागायत जमिनी पिकत नाहीत. साऱ्यात सवलत मिळत नाही. तेव्हा पडजमिनी लागवडीखाली आणण्यासाठी मदत करावी ही सामान्य शेतकऱ्यांची विनंती नानासाहेब पेशव्यांनी मान्य केल्याचे दिसून आले. एवढेच नव्हेतर अशा व्यक्तींच्याकडून २० वर्षे सारा आकारला जाऊ नये याविषयीच्या सूचना नानासाहेबांनी कोकण विभागातील आपल्या अधिकाऱ्यांना दिल्याचे निदर्शनास येते.

## ५.५ नानासाहेब पेशवे व सारा सवलत धोरण

नानासाहेब पेशव्यांचे शेती व शेतजमिनीच्या संदर्भातील धोरणांचा साकल्याने विचार केला तर त्यांचे धोरण रयतेच्या कल्याणाचे निदर्शनास येते. त्यांचे शेतीसंदर्भातील अथवा उत्पन्न संदर्भातील अथवा जिरायत बागायत त्याचबरोबर पडजमिन संदर्भात त्याचें धोरण हे लोककल्याणाचे असल्याचे दिसून येते. पेशव्यांनी पडजमिनीसंदर्भात अत्यंत दक्षतेने धोरणात्म धोरण राबविले दुष्काळ पडला असेल, शत्रूने लूटमार केली असेल, रोगराईमुळे पिक कमी झाले असेल किंवा दुष्काळ अवर्षण या संकटकाळामध्ये जवळजवळ सर्वच पेशव्यांनी सारा आकारणीमध्ये सुट दिल्याचे निदर्शनास येते. १७४५ते १७४६ याकाळामध्ये नानासाहेब पेशव्यांनी कोकणामधील कानू हे गाव आगीत भस्मसात झाले तेव्हा अशाप्रसंगी संपूर्ण गावाचा सारा त्यांनी माफ केला. एवढेच नव्हेतर येथील लोकांचे पुनर्वसन केले. १७४७ते १७४८ या त्यांच्या पहिल्या कालखंडामध्ये कोकणामधील बावडा परगण्यामधील रामचंद्र बल्लाळ या अधिकाऱ्याने येथील दुष्काळाची व्यथा मांडली तेव्हा पेशव्यांनी चार वर्षे या परगाण्यावरील सारा रद्द केला. नानासाहेब पेशव्याच्या कालखंडामध्येच प्रामुख्याने १७५० ते १७५१ कोकणातील पाचोऱ्या या गावातील गावकऱ्यांनी पिक न आल्याबद्दल विनंती अर्ज केला. गावाचा एकंदर सारा २६१३ रू. होता. परंतु नानासाहेबांनी लोकविनंतीला मान देऊन १३१३ रू. साऱ्यामध्ये सूट दिली. साऱ्यामध्ये सूट देण्यासाठी खालील तत्वांचा स्विकार केल्याचे दिसून येते.

१) एखादे गाव पूर्ण जळलेले असेल किंवा ज्यागावातील जनावरे चारा लुटून नेण्यात आला असेल त्या गावाला एक वर्षभर पूर्ण सारा सवलत दिली जात असे.

२) एखादे गाव लुटले असेल त्या गावाला एक वर्ष सुट दिली जात असे.

३) एखाद्या गावाने बचाव करण्यासाठी शत्रूला सामुदायिक पैसा दिला असेल तेव्हा त्यागावाला साऱ्यामध्ये ५०% सवलत दिली जात असे.

४) प्रत्यक्ष गावाची पहाणी करूनच सारा ठरवला जात असे. अशारितीने कोकण आणि कोकण च्या परिसरातील जमीन महसूल व सारा सवलतीचे पेशव्यांचे धोरण लोकाभिमुख दिसून येते.

## ५.६ करविषयक, पाटबंधारे व तगाई बाबतीतील धोरण -

नानासाहेब पेशव्यांच्या करविषयक धोरणांचा विचार करत असताना एक गोष्ट निश्चित जाणवते. प्रत्येक व्यक्तीला तिच्या उत्पन्नाच्या समप्रमाणात कर द्यावा लागत असे. कोणत्याही व्यक्तीस तिच्या उत्पन्नापेक्षा जास्त पैसा द्यावा लागू नये. एखाद्या व्यक्तीने तक्रार केली तर पुन्हा मोजणी आणि त्यानुसार करआकारणी केली जात असे. बऱ्याचवेळा पेशव्यांचे नोकर पेशव्यांच्या अपरोक्ष दुराचार करीत मात्र पेशवे याबाबतीत फार दक्ष होते. दुराचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर पेशव्यांची करडी नजर असे. तेव्हा वरील करविषयक धोरणावरून नानासाहेबांचे धोरण जनतेच्या कल्याणाचे दिसून येते. नानासाहेबांनी पाटबंधारे या विभागाकडे बारकाईने लक्ष दिले. पाटाचे पाणी शेतीला पुरविणे पाटाशिवाय विहीर खोदून मोटेने पिकांना पाणी दिले जात असे. पाण्याची साठवण करणे, तळी खोदणे, धरणे बांधणे याबांधकामासाठी येणारा खर्च सरकार देत असे. पाटबंधाऱ्याच्या व्यव्सथेवर प्रकाश टाकणारी दोन पत्रे पेशवे दप्तरात सातव्या खंडामध्ये निदर्शनास आली आहेत. कोकणातील कोपल यागावातील गोविंदराव यादव याने धरण नादुरूस्त झाल्याबद्दल पेशव्यांकडे अर्ज सादर केला तेव्हा धरण दुरूस्तीसाठी पेशव्यांनी दोनहजार होन इतके मदत केल्याचे दिसून येते. पेशवे दप्तरातीलदुसऱ्या पत्रामध्ये मौजे नसरापूर या गावातील धरणासंबंधी लक्ष्मण या अधिकाऱ्याला धरण दुरूस्तीसाठी आठशे रू. खर्च आला त्यापैकी चारशे रू. नानासाहेब पेशवे यांनी दिले. यावरून नानासाहेब पेशवे यांचे कर आणि पाटबंधारे विषयक धोरण लक्षात येते.

## ५.७ नानासाहेब पेशवे आणि आर्थिक व्यवस्था व घटक

अठराव्या शतकाच्या सुरूवातीस महाराष्ट्रातील शेतीची अर्थव्यवस्था सर्वसामान्यपणे जशी होती तशीच ती त्या सबंध शतकात पुढेही चालू राहिली. शेती मालाचे उत्पादन हे मुख्यता वेगवेगळ्या पिकांना लागवडीस योग्य अशी उपलब्ध जमीन जमिनीचा कस व तिचे घटक, जमिनीचा मगदूर, प्रदेशाचा उंच सखलपणा, हवामान, पावसाचे प्रमाण सिंचित क्षेत्र, दुष्काळ, उपलब्ध अवजारांची उत्पादन, क्षमता, पीक घेण्याच्या पद्धती, खते, सैन्याच्या किंवा चोरट्यांच्या धाडी इत्यादींवर अवलंबून असे. यातील कोणत्याच घटकात पूर्वीपेक्षा फारसा फरक अठराव्या शतकात पडल्याचे दिसत नाही. कोकणात भात देशावर जोंधळा व बाजरी ही मुख्य पारंपारिक पिके होती. कापूस, नीळ तंबाखू, भुईमूग अशा एक किंवा अधिक नगदी पिकांच्या उत्पादनाला व्यवसाय योग्य प्रमाणात नव्याने कुठे सुरूवात झाली असेही घडले नाही. कोणत्याही पिकाच्या दर एकरी उत्पादनात फारशी वाढ झाल्याचेही कुठे उल्लेख आढळत नाहीत. तथापि इतर देशांच्या उदाहरणार्थ इंग्लंडच्या तुलनेने महाराष्ट्रातील दर एकरी उत्पादन अठराव्या शतकाच्या अखेरी पर्यंत तरी कमी नव्हते असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसते. शेतीशी संबंधित अशा मिरासदारी उपरी वेठबिगारी इत्यादी घटकात पूर्वीपेक्षाही फारसा फरक दिसत नव्हता. गाव-पंचायतीऐवजी जात. पंचायतीचे महत्व वाढत होते. वतने, बलुतेदारी इ. पद्धती जुन्याच होत्या. गावकर्जाचे प्रमाण मात्र पूर्वीपेक्षा वाढू लागले. शेतकऱ्यांवर अनेक तऱ्हेच्या पट्ट्या पूर्वी होत्या तशाच त्या अठराव्या शतकातही चालू राहिल्या. काही वेळा त्यात बदल झाले किंवा वाढही झाली. शेतांची खरेदी -विक्री व इतर हस्तांतर रूढ पद्धतीने चालू होते. अर्थात हे व्यवहार गावकऱ्यांच्या संबतीनेच होत. शेताची खरेदी होई किंवा एखाद्या वाणी -सावकाराकडे किंवा नगरवासियाकडे शेताची मालकी येई. परंतु शेतीत भांडवली पद्धतीने पैसा घातला गेला नाही. तसे होण्यासारखी आर्थिक- सामाजिक परिस्थितीही या काळात उपलब्ध नव्हती.

अशा प्रकारे अठराव्या शतकात महाराष्ट्रातील शेतीचे क्षेत्र विस्तारित होते. पुणे पुराभिलेख विभागातील दप्तरामध्ये उपलब्ध असलेल्या विविध ठिकाणच्या खेड्यासंबंधीच्या कागदपत्रातील आकडेवारीवरूनही हे दिसून येते. शासनाकडून मिळणारे हरतऱ्हेचे प्रोत्साहन, अभयदर्शक, कौलनामे देणे, वतने इनामे देणे, शेतसाऱ्यात सवलती

किंवा काही प्रसंगी सूट देणे, तगाई देणे, इत्यादी प्रकारच्या तरतुदीमुळे नांगरटीखालील क्षेत्रफळ वाढत होते. त्यामुळे शेतीमालाचे एकंदर उत्पादनही वाढत होते. तत्कालीन लोकसंख्येच्या वाढीबद्दल काही निश्चितपणे सांगता येत नसल्याने दरडोई शेतीमालाच्या उपलब्धतेबद्दल त्यातील वार्षिक चढ उताराबद्दल अंदाज बांधणे कठीण आहे.

अठराव्या शतकाच्या मध्यापासून शेतीमालाच्या किंमतींच्या उपलब्ध आकड्यावरून असे दिसते की, किंमती सर्वसाधारणपणे वाढत असल्याचे दिसत होत्या. अर्थात संपर्क साधने, जलद वाहतुकीस योग्य असे बारमाही उपयोगी पडणारे रस्ते, वाहने स्पर्धात्मक बाजारपेठ इत्यादी सोईची बिकट अवस्था असल्याने निरनिराळ्या ठिकाणच्या व वेळच्या शेतीमालांच्या किंमतीत खूपच तफावत पडणे स्वाभाविक होते. लमाण, वंजारी लोक आपल्या मालवाहू बैलांचे तांडे घेऊन गावोगाव जात, परंतु दोन जवळच्या बाजारपेठांतही जलद व सततचा संपर्क साधता येत नसे. स्वतः शासनास वेगवेगळ्या कारणाने बाजारातून माल खरेदी करावा लागे व बाजारभावाने शासन तो घेत असे. सरकारी दुकानातून अतिरिक्त मालाची विक्रीही होई. परप्रांतातून महाराष्ट्रात पैसा येण्याचे मार्ग निर्माण झाले होते. नानाविध नोकऱ्या मक्ते व इतर व्यवसायांची क्षेत्रे वाढत होती. परप्रांतातून अधिकाधिक प्रमाणात परदेशी कारागीर महाराष्ट्रात येऊन स्थायिक होत होते. या सर्वांचा एकंदर परिणाम म्हणून शेतीमालास मागणी वाढू लागली व बाजारात शेतीमालाच्या किंमती सर्वसाधारणपणे वाढत राहिल्या असे दिसते. असे तत्कालीन परिस्थितीवरून स्पष्ट होते.

### शहरे व शहरांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ

खेड्यापाड्यातील, गावागावातील बलुतेदारी पद्धतीने शेतीची अवजारे, शेतकऱ्याला लागणाऱ्या वस्तूंचे त्या त्या खेड्यापुरते मर्यादित उत्पादन होत असे. पण त्यात भांडवल गुंतवणूक, श्रमाचे विभाजन, श्रमकौशल्य, कलाकुसर इत्यादींचा संबंध क्वचितच येत असे. शहरातून मात्र रोज विक्रीसाठी अनेक वस्तूंचे उत्पादन होई. अठराव्या शतकात त्यात वाढ होऊ लागली. तोफाचे गोळे व इतर शस्त्रास्त्रे, जिनगारी सामान, तंबूसामान, कापड, कागद, नाणी इत्यादी नानाविध वस्तूंचे उत्पादन ठिकठिकाणी स्वतंत्रपणे किंवा मक्त्यामुळे वाढत्या प्रमाणात होऊ लागले. आणि मुख्य म्हणजे या उत्पादन क्षेत्रात मराठी माणसे अधिकाधिक संख्येने भाग घेऊ लागली. तशीच बाहेरून जवळ-दूरच्या वेगवेगळ्या प्रांतातून कारागीर मंडळीही

अधिकाधिक संख्येने येवून महाराष्ट्रात स्थायिक होऊ लागली. अशा परदेशी कारागिरांच्या स्वतंत्र पेठा मोठ्या प्रमाणात शहरात वसू लागल्या. म्हणून शहरांची वाढ झपाट्याने होऊ लागली.

महाराष्ट्रात अनेक शहरे वेगवेगळ्या काळात उदयास व भरभराटीस आली. त्यातील काही लयास गेली. नगर, चौल, ठाणे, कल्याण, पैठण, जुन्नर, देवगिरी इत्यादींचे उल्लेख करता येतील. पण या शहरातील उत्पादन व्यवसाय त्या त्या काळी बहुतांशी परभाषिकांच्या- उदाहरणार्थ गुजराती, तेलगू, कन्नड, मुसलमान इत्यादींच्या हाती होते. अठराव्या शतकात मात्र महाराष्ट्रात हे चित्र बऱ्याच प्रमाणात पालटू लागले. परदेशी कारागीर महाराष्ट्रात पूर्वीप्रमाणेच पण वाढत्या संख्येने येऊ लागले. परंतु येथील राजकीय सत्ता या काळात मराठ्यांच्या हातात संपूर्णपणे आल्याने पूर्वीपेक्षा अठराव्या शतकातील व्यावसायिक परिस्थिती मराठ्यांना जास्त अनुकूल झाली. पुणे, सातारा, सोलापूर, वसईसारख्या शहरांच्या वाढीवर तर मराठी राज्यविस्ताराचा बराच अनुकूल परिणाम झाला. त्यातही अठराव्या शतकातील पुणे शहराची वाढ अनेक दृष्टीने लक्षणीय अशी झाली, त्याचे सर्व श्रेय नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणाला द्यावे लागते. एखाद्या देशातील सामाजिक सांस्कृतिक किंवा आर्थिक बदलांचे स्वरूप पाहावयाचे झाल्यास त्या देशातील शहरांची बदलती स्थिती पाहावी. विविध क्षेत्रातील उत्कृष्ट व निकृष्ट ते दोन्हीही शहरांकडे खेचले जाते. त्यामुळे शहरे त्या देशाच्या तत्कालीन ऐतिहासिक स्थितीची निदर्शक म्हणूनही मानली जात होती.

त्याचबरोबर भांडवल निर्मिती होण्याचे मुख्य संभाव्य केंद्रे म्हणजे शहरेच पण भांडवलनिर्मितीच्या अनुकूलतेच्या दृष्टीने सर्वच शहरे सारखी नसतात. काही शहरे आर्थिक कारणांमुळे निर्माण झालेली असतात, तर काही केवळ धार्मिक किंवा राजकीय कारणामुळेही निर्माण होतात. केवळ धार्मिक व्यवहारांवर अवलंबून असणारी शहरे दीर्घकाळ टिकतात पण अशा ठिकाणी नेहमीच मोठ्या प्रमाणावर उद्योगवाढ व भांडवल-निर्मिती होत नसे. आणि केवळ राजकीय आधाराने वाढणाऱ्या शहरांचे जीवन अनिश्चित असल्यमुळे तीही उद्योगपरंपरेच्या दृष्टीने फारशी उपयोगी ठरत नसे. मात्र आर्थिक कारणाने निर्माण झालेली किंवा वाढणारी शहरे भांडवल निर्मितीस बरीचशी पोषक असत. भांडवल निर्मितीला जशी सुरक्षिततेची तशी अनेक ठिकाणच्या

मोठ्या प्रमाणावरील उद्योगसातत्याची आवश्यकता असते. त्यामुळे उद्योगवाढ व भांडवलनिर्मीती यांचे परस्पर पूरक चक्र निर्माण होण्याची शक्यता आर्थिक पायावर उभ्या असणाऱ्या शहरांच्या बाबतीत जास्त प्रमाणात होत असे.

अठराव्या शतकात साधारणपणे युरोपमध्ये भांडवलप्रधान समाजव्यवस्था निर्माण होऊ लागली. तेव्हा युरोपीय शहरांच्या तुलनेने भारतीय शहरे कशा प्रकारची होती हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. त्यात उद्योगप्रधान शहरे किती होती, धार्मिक शहरे किती होती आणि अनिश्चित काळासाठी केवळ राजकीय कारणामुळे निर्माण झालेली, वाढलेली, लयाला गेलेली शहरे किती होती या सर्वांचा तपास घेणेही उपयोगी ठरेल. या सर्व शहरामध्ये पेशवेकालीन पुणे शहराच्या वाढीचे वाढीचे उदाहरण खालीलप्रमाणे देता येईल-

### २) पुणे शहराची झालेली वाढ व लोकसंख्येतील बदल

पुणे शहराच्या लाकेसंख्येसंबंधी सर्वात जुनी व विश्वसनीय आकडेवारी १७६४ -६५ या वर्षासंबंधी मिळते. १७६३ मधील निजामाची पुण्यावरील स्वारी झाल्यावर १७६४ मध्ये पुण्यातील घरांची मोजदाद करण्यात आली. त्यासंबंधीची यादी पुणे येथील पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. त्यानुसार त्यावर्षी शहराची लोकसंख्या सुमारे ४०.००० असावी असे दिसते. ही संख्या पुढे शीघ्र गतीने वाढत जाऊन १७८० च्या सुमारास ती चौपट, म्हणजे दीडलाखाएवढी झाली. दौलतराव शिंदे व होळकर यांनी पुणे लुटले. त्याचा परिणाम शहराची लोकसंख्या घटली. पेशवाई बुडाल्यानंतर ती आणखी सतत घटत गेली. एल्फिन्स्टनच्या अंदाजानुसार १८२० मध्ये शहराची लोकसंख्या १,१०,००० इतकी होती, असे पेशवे दप्तर नोंदीवरून स्पष्ट होते.

### ३) 'परदेशी' व्यावसायिकींची वर्दळ :

मराठी सत्ता वाढू लागली व बाहेरून अनेक प्रदेशातून निरनिराळे व्यावसायिक येऊन पुण्यात राहू लागले. त्यातील अनेकांना परदेशी म्हणून संबोधले जाऊ लागले. ज्या ज्या भागावर मराठी संघराज्याची सत्ता चाले तिथून व अन्य ठिकाणाहूनही लोक येत असत. उत्तर हिंदुस्थान, राजस्थान, गुजरात, तेलंगण, कर्नाटक, मराठवाडा, देश, कोकण इत्यादी जवळ-दूरच्या अनेक भागातून लोक आले. त्यात हरतऱ्हेचे कारागीर होते. व्यापारी होते, सैनिक, कारकून, हुजरे, भट भिक्षुक, शिक्षक, विद्यार्थी, कलावंत, वेश्या व्यवसायी असे सर्व प्रकारचे लोक महाराष्ट्रात येऊ लागले.

बाहेरून आलेल्या व्यावसायिकांचा कालानुसार क्रम साधारणपणे ढोबळ, मानाने सांगता येईल. शहरातील विशिष्ट प्रकारच्या मागण्यांचा, राज्यसत्तेच्या चढउतारांचा व बाहेरून येणाऱ्या व्यावसायिकांचा परस्परसंबंध असू शकतो. बोहरा जमातीचे व्यापारी प्रारंभी आलेले होते असे दिसून येते. अहमदाबाद, औरंगाबाद, अहमदनगर इत्यादी ठिकाणांहून ते सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात आले आणि रविवार पेठेत स्थायिक झाले. १७३० मध्ये त्यांनी आपल्या समाजासाठी त्या भागात एक जमातखाना बांधला होता आणि आपापल्या उदरनिर्वाहास सुरुवात केली.

अठराव्या शतकाच्या सुरूवातीस आलेले कारागीर व व्यापारी बरेचसे जवळपासच्या प्रदेशातून आले असे दिसते. सुवर्णकाराचा व्यवसाय करणारे रत्नागिरी जिल्ह्यातील दैवज्ञ ब्राम्हण या सुमारास पुण्यात उद्योगासाठी आले त्यानंतर थोड्याच काळात खानदेशी सोनार, लाड सोनार, अहेर सोनार, वैश्य सोनार, परदेशी सोनार असे इतर अनेक ठिकाणचे सोनार पुण्यात येऊन आपला व्यवसाय स्थिर-स्थावर करू लागले.

परिस्थितीनुसार व लोकसंख्येच्या मानाने शस्त्रास्त्रे व इतर लोखंडी वस्तूंची मागणी वाढू लागली. त्यामुळे ठिकठिकाणचे लोहार पुण्यात येऊ लागले. अहमदनगर, सोलापूर, खानदेशकडील मराठी लोहारांनी तसेच पांचाळ व घिसाठी ह्या ‘परदेशी’ लोहारांनी पुण्यात आपले भाते घातले याच सुमारास तांब्यापितळेच्या वस्तूंनाही मागणी येऊ लागली. पण तांब्यापितळेचे कारखाने सर्रास पुण्यात निघाले नाहीत. या सुमारास अनेक कासार कुटुंबे पुण्यात येऊन स्थायीक झाली. परंतु त्यांनी या धातूंच्या कारखान्याऐवजी त्यांच्या व्यापारातच जास्त लक्ष घातले असे दिसते. हैदराबादकडून काही मोमिन कुटुंबे येऊन गंजपेठेत स्थायिक झाली. त्याच्या भागाला मोमीनपुरा नाव पडले. शहरात लोकसंख्या वाढू लागली होती. त्यामुळे मोमीनप्रमाणेच इतर अनेक ठिकाणाहून बऱ्याच काळपर्यंत खत्री व कोष्टी नागपूरहून, स्वकुळ साळी पैठण व नारायण पेठ कडून, असे इतर विणकर समाज पुण्यात येऊन स्थायीक झाले. राजस्थानातून महेश्वरी वाणी येऊन पुण्यात भुसारी व्यवसाय करू लागले. ‘कापड गंज’, ‘दाणे आळी’ अशी त्यांच्या नवीन रस्त्यांची नावे पडली. या सुमारास गुजराती वाण्यांनी व जोधपूर व रिसोहीकडील मारवाडी वाण्यांनी पुण्यात येऊन आपली दुकाने उभी केली. गुजराती व मारवाडी मंडळी पुण्यात राहू लागली असली तरी त्यांचे आपल्या मूळ गावाशी संबंध अबाधित ठेवलेले दिसतात.

अठराव्या शतकाच्या अखेरीस पुण्यातील श्रीमंत मंडळीकडे पैसा साठू लागला. नानासाहेब पेशव्याने व इतर सरदारांनी, शेठसावकारांनी प्रशस्त व कलाकुसर असलेल्या कारागिरांकडून वाडे, देवळे इत्यादी बांधण्यास सुरूवात केली. स्थानिक कसबी गवंड्याची प्रभावशाली छाया पडली होती. तेव्हा आंध्रमधून तेलगू कामाठींना आणावे लागले. त्यांनी शुक्रवार व वेताळ पेठेत आपल्या वस्त्या केल्या व ते भाग कामाठीपुरा या नावाने ओळखण्यात येऊ लागले. आंध्रप्रमाणेच काठेवाड व कच्छिमधील कसबी गवंड्यांनीही पुण्यात येऊन आपल्या व्यवसायास सुरूवात केली. तसेच याच सुमारास उत्तर हिंदुस्थानातून बधाई जमातीचे कसबी सुतार पुण्यात उद्योगधंदा करण्यासाठी आले. अशा प्रकारे गरज पडत गेली, मागणी वाढत गेली तसतसे इतर अनेक व्यवसायांचे लोक वेगवेगळ्या भागांतून येऊन वस्ती करून राहू लागले. अशा या सर्वसामान्य लोकांच्या मूलभूत सुविधा देण्याचे काम नानासाहेब पेशवे यांनी केले.

### ४) पेठांची वसाहत व वाढ :

अनेक शहरात नवीन पेठ वसविण्यात येत असत. तेव्हा राज्यकर्ते योग्य त्या जबाबदार व्यक्तीस ती पेठ बसविण्यासंबंधी 'कौल' देत. त्यानुसार त्या इसमास काही अधिकार प्रधान होत व काही जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत. व्यापार-उदीम हरतऱ्हेची व आवश्यक कारागीर करणाऱ्यांना बाहेरून आणून त्यांना हर प्रकारच्या सवलती देऊन शहरात पेठा वसविणे ही प्रमुख कामगिरी पेठा वसविणाऱ्याची असे. त्यांना पेशवे सवलती देत असत.

सतराव्या शतकाच्या अखेरीस पुण्यात कसबा, रविवार, सोमवार, मंगळवार व शनिवार या पाच पेठा होत्या. त्यामध्ये १७०३ मध्ये बुधवार पेठ वसविण्यात आली. पहिल्या बाजीरावाच्या काळी पुणे ही पेशव्यांची राजधानी झाली. बाजीरावांनी १७२१ मध्ये बापूजी श्रीपत नावाच्या खास अधिकाऱ्यावर पुणे शहराची वाढ करण्याची कामगिरी सोपविली. १७३० च्या दशकात वाढत्या लष्करी मोहिमांमुळे शहराच्या बाहेरील भागातून सैनिकांसाठी व बाजारबुणग्यांसाठी राहण्याची सोय करावी लागली. त्यानुसार १७३४ मध्ये गावाबाहेर शुक्रवार पेठेची वसाहत झाली. सुमारे १७५० पासून अनेक ठिकाणांच्या व्यावसायिकांचा पुणे शहराकडे मोठा ओघ सुरू झाला, त्यामुळे त्या सर्वांसाठी नवीन पेठा वसविणे आवश्यक बनले. १७५० मध्ये नानासाहेब पेशव्यांनी वेताळ, गंज, गणेश, मजफर गंज व निहाल या पाच पेठांची वसाहत

केली. १७६१ च्या पानिपतच्या पराभवानंतर व १७६३ च्या वाढू लागली व उद्योगधंद्यासाठी बाहेरच्या लोकांची पुण्यात पुन्हा आवक सुरू झाली. त्यामुळे १७६७ मध्ये एका नव्या भवानी पेठेची वसाहत निर्माण करावी लागली व १७६९ मध्ये सदाशिवपेठ व नारायणपेठ या दोन पेठा वसवण्यात आल्या.

नाना फडणवीसांच्या उत्कर्षाच्या काळात, १७८० च्या दशकात, मुख्यत्वे बाहेरून आलेल्या लोकांसाठी नव्या तीन पेठा वसविण्यात आल्या. घोरपडेपेठ १७८१ मध्ये, रास्तापेठ १७८३ मध्ये तर नाना १७८९ मध्ये वसविण्यात आली.

**५) 'स्थानिक' व 'परदेशी' व्यावसायिक :**

पेठांच्या वसाहतीं वाढू लागल्या. त्यामुळे एका महत्वाच्या गोष्टीचा याठिकाणी स्वतंत्रपणे उल्लेख करणे आवश्यक ठरतो तो म्हणजे स्थानिक व परदेशी व्यावसायिकांचे शहरातील अलग वास्तव्य व त्यांचे अनिष्ट परिणाम होय.

देशाच्या वेगवेगळ्या भागांतून समव्यवसाय करणाऱ्या पण वेगवेगळ्या जमाती पुणे येथे रहावयास येत. खुद्द शहरात तो व्यवसाय जुजबी पद्धतीने करणारे स्थानिक लोक काही वेळा असत. परंतु बाहेरून येणारे लोक तुलनेने त्या व्यवसायात जास्त कुशल व वाक्‌बगार असत. स्थानिक लोक जुन्या पेठामध्ये वसती करीत, तर बाहेरून आलेले लोक नव्या पेठामध्ये वस्ती करीत, शिवाय प्रादेशिक जातिव्यवस्थेमुळेही त्यांचे अलग अलग वास्तव्य असे. एकच व्यवसाय असला तरी त्यांचे आपापसांत रोटीबेटी व्यवहार होत नसत. परिणामी तोच व्यवसाय करणाऱ्या स्थानिक आणि परदेशी कारागिरांचा व वेगवेगळ्या समव्यवसायी जमातींचा आपापसात यावा तेवढा जवळचा संबंध येऊ शकला नाही. उद्योगाचे स्वरूप घरगुती प्रकारचे असल्याने उद्योगातील विशिष्ट कसब वंशपरंपरेने शिकले जात असे. या सर्व परिस्थितीचा शहरातील त्या व्यवसायाच्या सर्वांगीण व सतत वाढीवर अनिष्ट परिणाम होत असत.

अठराव्या शतकाच्या मध्यास पुण्यातील मुळचे कुंभार कसबा पेठेत राहात. बाहेरून आलेले राजस्थानी 'परदेशी' कुंभार गावाच्या बाहेरील भागातील असलेल्या व नव्याने वसविलेल्या वेताळ व गंजपेठेत राहू लागले. जातिजमाती भेदामुळे निर्माण होणारा स्थानिक अलगपणा तर होताच; त्यामुळे परदेशी कुंभाराचे विशिष्ट तंत्रज्ञान व त्यांचे कसब शिकण्याची संधी स्थानिक कुंभारांना मिळू शकली नाही; त्यामुळे राजकीय उलथापालथ होऊन जेव्हा परदेशी कारागीर शहर सोडून

गेले तेव्हा स्थानिक जुजबी कारागीर मात्र शहरात शिल्लक राहिले. पेशवेकालीन पुण्याच्या शहरवाढीचा इतिहास हे भारतातील इतर 'राजकीय शहरांच्या' वाढीच्या इतिहासाचे एक नमुनेदार उदाहरण म्हणता येईल. पेशवाईनंतर पुणे जेव्हा राजकीय दृष्ट्या निष्प्रभ झाले तेव्हा कुशल कारागिरींना मागणी कमी झाली, शहराची लोकसंख्या घटू लागली व सैनिकपेशा, भटभिक्षुकी वगैरे करणाऱ्या वर्गांचेही नुकसान झाले. एकेकाळी वैभवात असलेल्या पुणे राजधानीचे एखाद्या क्षुद्र गावात रूपांतर होण्याची वेळ आली होती. पण इंग्रजांनी शहरात आपले लष्कर ठेवल्याने व त्याला इलाख्याची दुय्यम राजधानी केल्याने पुण्याचे महत्व पुन्हा वाढू लागले.

पुणे शहराची अठराव्या शतकातील भरभराट शहरांच्या भराभराटीची गोष्ट महाराष्ट्राच्या आर्थिक किंवा नागरी इतिहासात नवीन नव्हती. पूर्वी वेगवेगळ्या राजवटीत अनेक शहरांचे उदय नव्याने महाराष्ट्राने पाहिले होते. अठराव्या शतकात महाराष्ट्रात जर कोणता एक महत्वाचा आणि खास बदल आर्थिक व्यावसायिक क्षेत्रात घडून आला असेल तर तो म्हणजे उदयास आलेला एतद्देशीय, मराठी, व्यापारी सावकार वर्ग होय. या संदर्भात प्रा. ध. रा. गाडगीळांनी म्हणतात की, ''हिंदुस्थानच्या इतर सर्व प्रदेशात समाजरचनेचे एक अत्यंत महत्वाचे अंग समजला गेलेला वाणी समाज मुळात आपणाकडे (महाराष्ट्रात) नसावेत हे एक कोडेच वाटते. या कूट प्रश्नाकडे महाराष्ट्राचा वसाहतकाल व महाराष्ट्र समाजरचनेचा आदिकाल यांच्या अभ्यासकांनी लक्ष देणे जरूर आहे.'' त्यांचे दुसरे सूचक विधान असे होते की, अठराव्या शतकात महाराष्ट्रातील व्यापारी सावकार यांचा व्यवहार गुजराती वगैरे महाराष्ट्राबाहेरून नवीनच आलेल्या इतरांच्या मानाने मोठया प्रमाणावर वाढलेला होता, परंतु पुढील काळात मराठी व्यापार-सावकार टिकून राहू शकले नाहीत याची कारणमिमांसा करणे महत्वाचे आहे. प्राध्यापक गाडगीळांच्या वरील दोन महत्वाच्या विधानांच्या अनुषंगाने या विषयाची चर्चा करणे उपयुक्त ठरते.

### ६) मराठी व्यापारी-सावकार :

ब्रिटिशपूर्व महाराष्ट्र हा एक भौगोलिक दृष्ट्या डोंगराळ, खडकाळ अरण्य प्रदेश असून येथे एतद्देशीय असे नाग, भिल्ल, कोळी, मावळे इत्यादी लोक प्रामुख्याने राहत

असत. महाराष्ट्राच्या व मराठी भाषेच्या जडणघडणीला खरी सुरूवात प्रामुख्याने यादव काळातच झाली, असे म्हणावयास हरकत नाही. तेराव्या शतकातील उत्तरकालीन यादवांचा काळ सोडल्यास, सतराव्या शतकापर्यंत हा प्रदेश मुख्यत्वे आंध्र, कन्नड आणि तुर्क पठाण व इतर मुसलमान अशा परकीय राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालीच होता. परकीय राजवटीखाली वावरताना तत्कालीन मराठी समाजाची आर्थिक व व्यापारी व्यवहारांची पातळी एकंदरीने बेताचीच होती असे दिसते.

महाराष्ट्रामध्ये कन्नड राष्ट्रकूटांनी इ. स. ७६० ते ९७३ पर्यंत राज्य केले. त्यावेळी त्यांची राजधनी कर्नाटकातील मालखेट येथे होती. कन्नडिगांच्या स्वतःच्या मायभूमीत यावेळी जैन धर्माचा प्रसार झपाट्याने होत होता. तिकडे जैन धर्मात वज्रनंदीसारख्या आचार्यांनी केलेल्या उदारमतवादी मतप्रचारामुळे व्यापारी वृत्तीला प्रोत्साहन मिळाले. या काळात अनेक कन्नड जैन श्रेणी व व्यापारी संघ कर्नाटकात ठिकठिकाणी अस्तित्वात येत होते; परंतु कर्नाटकात लोकप्रिय झालेला जैन धर्म त्याच राष्ट्रकूटाच्या अंकित असलेल्या महाराष्ट्रात मात्र म्हणावा तसा पसरला नाही. नंतरचे कन्नड चालुक्य व कलचुरी इ. स. ९७३ ते ११९० च्या कालंखडामध्ये कर्नाटकात जैन धर्माची जागा लिंगायत धर्माने घेतली. लिंगायत धर्म अनेक बाबतीत जैन धर्माहूनही अधिक उदारमतवादी होता. त्याचा कन्नड व्यापारी वर्गाने पुढे होऊन स्वीकार केला. मात्र तत्कालीन महाराष्ट्र प्रदेश कन्नड राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली असूनही येथील एतद्देशीय जैन धर्माचा म्हणावा तसा प्रसार झाला नाही, किंवा लिंगायत धर्माचा प्रसार झाला नाही.

उत्तरकालीन यादव हे पहिले मराठी राज्यकर्ते असे म्हणता येईल. तथापि उत्तर यादवकालातसुद्धा मराठी लोकांची स्वतःची सामाजिक सांस्कृतिक स्थिती फारशी विकसित झालेली नसावी, महाराष्ट्रात व्यवहार करणाऱ्या तत्कालीन व्यापारी श्रेणी कन्नडिगांच्याच बनल्या होत्या. महाराष्ट्रात प्रचलित असलेली त्या काळची वजने, मापे, नाणी यांची नावेही कन्नड भाषेतीलच होती. एतउद्देशीय मराठा, नाग, कोळी, भिल्ल इत्यादी डोंगरी मराठी लोक त्यांच्या बलुते-सांस्कृतिप्रधान अलग, स्वयंशासित खेड्यातून बहुतेक त्याकाळी वास्तव्य करून राहात असावेत. बलुत्यातील बलुतेदारांप्रमाणेच जवळ जवळ एतउद्देशीय मराठी, वाणी आपल्या व्यवसाय वृत्तीची कामे करीत असावेत असे दिसते. यादवकालातसुद्धा देशावरील मोठ्या प्रमाणावरचा

व अंतर्गत व्यापार कन्नड, वैश्य व लिंगायत वाण्यांच्या हातात होता तर कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरील परदेशांशी व्यापार गुजराती, अरब इत्यादीकांच्या हातात होता, असे दिसते.

अल्लाउद्दीन खिलजीने इ. स. १२९४ मध्ये महाराष्ट्रावर स्वारी केली आणि येथूनच महाराष्ट्राच्या इतिहासाला पुन्हा परकीय अंमलाचे जुने वळण लागले. उत्तर यादवकालीन राज्याच्या कृपाछत्रामुळे येथील मराठी वाण्यांना व इतर मराठी छोट्या व्यापारी घटकांना व्यावसायिक संधी अधिक प्रमाणात मिळण्याची जी काही थोडीबहुत शक्यता निर्माण झाली होती, तीही नाहीशी होऊन यादवकाळानंतर मराठी समाजात एक दीर्घकालीन परकीय दास्यत्वाची व परागतीची परिस्थिती निर्माण झाली. महाराष्ट्राच्या बहुतेक भागात मुसलमान अंमल अव्याहतपणे सुमारे चारशे वर्षे चालू होता. त्याचा परिणाम म्हणून त्या काळात सर्व सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्रात मुसलमानी वर्चस्व टिकून राहिले. दख्खनी बहामनी' च्या काळात चेऊल, दाभोळ, जुन्नर, दौलताबाद, पैठण ही महाराष्ट्रातील महत्वाची व्यापरी केंद्रे परकीय मुसलमान व्यापाऱ्यांच्या हातात होती. पंधराव्या शतकाच्या अखेरीस नागोठणे, चेऊलसह कोकणचा समुद्रकिनारा गुजरातचा मुसलमान राजा महमूद बेगडा याच्या ताब्यात गेला आणि शेवटी इ. स. १५०९ मध्ये चेऊल व कोकण किनाऱ्यावरील अन्य व्यापारी केन्द्रावर पोर्तुगीजांचे वर्चस्व सुरू झाले.

सोळाव्या शतकात कोकण किनाऱ्यावरील बंदरात अनेक ठिकाणचे व्यापारी येत असत, त्यामध्ये प्रामुख्याने अरब, तुर्की, इराणी, हिंदी, मुसलमान, गुजराती, पोर्तुगीज हे असत. सतराव्या शतकाच्या सुरूवातीपासून यामध्ये इंग्रज, फ्रेंच, डच इत्यादी व्यावसायिकांची भर पडली. या दूरगामी व मोठ्या प्रमाणावरील व्यापारी घडामोडी पश्चिम किनाऱ्यावर घडत असता खुद्द तिथलाच भूमिपुत्र जो कोकणी मराठी माणूस त्याला यामध्ये कोठेच स्थान असल्याचे दिसत नाही. असलेच तर, व्यापारी गलबतांवर माल चढविणे आणि उतरविणे, असले हमालीचे काम तेथील भूमिपूत्राला करावे लागे किंवा फार छोट्या प्रमाणावर किनाऱ्यालगतचा व्यापार एवढ्यापुरते ते मर्यादित स्वरूपाचे असावे असे दिसून येते.

सतराव्या शतकात सुरू झालेला भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील युरोपीय व्यापार आणि त्याला अनुसरून होणारी भांडवली गुंतवणूक देशाच्या अर्थकारणात

प्रभावी ठरू लागली व या नव्या आर्थिक घडामोडीचा गुजराती व अन्य व्यापारी समाज फायदा घेऊ लागले. मराठी माणसे मात्र या युरोपीय व्यापारी घडामोडीपासून बरीचशी अलिप्त राहिली होती. त्यांच्या स्वतःच्या कोकण किनाऱ्यावर सुद्धा त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारी क्षेत्रात विशेष प्रवेश नव्हता, आणि तीच स्थिती देशावरील अंतर्गत व्यापाराचीही होती. युरोपियांशी त्यांनी व्यापार करण्यासारखी खास काही वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती देशावर त्याकाळी नव्हती. त्यामुळे युरोपियांच्या प्रवेशामुळे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारात जे एक ऐतिहासिक आर्थिक स्थित्यंतर घडून येऊ लागले होते. त्याच्याशी मराठ्यांचा फारच थोडा संबंध आला. त्या घडामोडीपासून प्रवृत्त होऊन आपणही अशा व्यापारी घडामोडीत भाग घ्यावा असे वाटण्याइतकी तत्कालीन मराठी समाजाची आर्थिक व्यवहारांची पातळी उंचावली नव्हती. इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांच्या भाषेत सांगावयाचे तर या वेळचा मराठी समाज म्हणजे बव्हंशी एक आडमुठ्यांचा गठ्ठा होता. अशा समाजात व्यापारी वृत्तीसंबंधी चेतना निर्माण करावयाची तर काही महत्वाचे मुलभूत सामाजिक बदल घडून येऊन समाज सर्वार्थाने ढवळून निघणे आणि आर्थिकदृष्ट्या त्याचे परिवर्तन होणे आवश्यक होते. स्वतःच्या प्रदेशात वाहतूक किंवा जलसिंचनास योग्य अशा मोठ्या नद्या नाहीत. प्रदेशाचा मुख्यभाग व समुद्रकिनारपट्टी यांना एकमेकांपासून अलग करणारा दक्षिणोत्तर पसरलेला सह्याद्री पर्वत, खडकाळ आणि शेतीच्या दृष्टीने दुय्यम किंवा तिसऱ्या दर्जाची जमीन, अशा तऱ्हेची आर्थिक भौगोलिक परिस्थिती असताना त्यामध्ये बदल घडून येणे अशक्यप्रायच होते. जर मूलभूत आणि मोठा आर्थिक सामाजिक बदल घडून यावयाचा असेल तर तो राजकीय स्थितंराच्या मार्गानेच घडून येणे शक्य होते. तशी अनुकूल परिस्थिती महाराष्ट्रात १६व्या, १७ व्या शतकात बनत चालली होती. आवश्यक तो बदल घडून यावयाचा तो मराठमोळ्या समाज मनाच्या ठेवणीला अनुरूप आणि त्या समाजातील अग्रगण्य घटकांना आकर्षित करील असणे आवश्यक होते.

मराठी लोकांना त्यांच्या स्वत्वाच्या नव्या जाणिवा करू न देणारा, त्यांना विविध क्षेत्रांत नव्या वाटा दाखविणारा मूलगामी क्रांतीकारक बदल सतराव्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्राच्या समाज जीवनात जोमाने घडून येऊ लागला होता. या वेळी महाराष्ट्रातील मावळे, नाग, कोळी भिल्ल यासारख्या परंपरागत लढाऊ डोंगरी जमातीतील

माणसे, तसेच खेड्यापाड्यांत डोंगरकपाऱ्यात राहून बेभरवशी आणि नुकसानीचा शेतीव्यवसाय करणारी कुणबी मराठी मंडळी निरनिराळ्या बहामनी राज्यातील सैन्यात मोठ्या संख्येने दाखल होऊ लागली होती. परकीय बहामनी आणि मुघली राज्यांच्या आश्रयाने पण त्यांच्या उपयोगासाठी व पर्यायाने त्यांच्या मदतीसाठी महाराष्ट्रात जहांगिरी व इतर रूपाने सामाजिक आणि राजकीय शक्ती केंद्रे निर्माण झाली होती. धार्मिक भेदभाव, सामान्य जनतेचे अपार दारिद्रय, सैन्य जमा करण्यास लढायाने अनुकूल अशी सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती, स्वतःचा मुलूख डोंगराळ असणे, अशा सर्व मिश्रणानिशी तत्कालीन महाराष्ट्रातील जीवन खदखदत होते. त्या खदखदण्याचा स्पोटक उद्रेक म्हणजे महाराष्ट्रात सतराव्या शतकात झालेली राज्यक्रांती होय.

मुख्यत्वे भौगोलिक कारणामुळे आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागास राहिलेल्या आपल्या स्वतःच्या प्रदेशात स्वराज्याची स्थापना करीत असता, मराठी लोकांनी बाहेरील प्रदेशात जाऊन तेथील संचित संपत्ती आपल्या प्रदेशात जमेल त्या मार्गाने आणणे अनिवार्य ठरले. तसेच स्वराज्य स्थापनेनंतर बाहेरील सुपीक आणि व्यापारीदृष्टया समृद्ध असे प्रदेश त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणणेही क्रमप्राप्तच होते. सतराव्या शतकाच्या अखेरपासून मुघली साम्राज्याने प्रस्थापिलेल्या एकछत्री अंमलविरूद्ध भारतातील वेगवेगळ्या प्रदेशात अशा तऱ्हेचे प्रादेशिक उठाव घडून येऊ लागले. त्या प्रयत्नाकडे त्या काळी भारतात ठिकठिकाणी सुरू झालेली ती राजकीय व आर्थिक विकेंद्रिकरणाची महत्वाची प्रक्रिया होती. अशा दृष्टीकोणातूनही पाहता येईल. वरवरचे तिचे स्वरूप मुघल साम्राज्याच्या केंद्रीकृत शक्तीविरूद्ध सशस्त्र प्रतिकार अशा राजकीय स्वरूपाचे होते, परंतु त्याच्या मुळाशी प्रादेशिक, आर्थिक असमतोलत्वाची महत्वाची कारणेही निगडीत असावीत असे दिसते. मुघलांसारख्या एकछत्री साम्राज्यशाही अंमलामुळे भारतात प्रादेशिक आर्थिक असमानता पोसली जाऊन वाढीस लागत होती. त्यामुळे नव्याने उदयास येऊ पाहणाऱ्या आर्थिक प्रादेशिक राष्ट्रीय घटकांना त्या एकछत्री सत्तेशी आपल्या कुवतीप्रमाणे आणि राष्ट्रप्रकृती धर्माप्रमाणे मुकाबला करणे आणि स्वतःच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणे आवश्यक बनले.

अशा प्रकारे वर उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्रात शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात परकीयांशी लढून मराठमोळ्या लोकांचे स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन केले. त्याचवेळी त्या लढ्यातून मराठ्यांचे आर्थिक, सांस्कृतिक, प्रादेशिक दृष्ट्या एकजिनसी

असे एक नवीन राष्ट्र उदयास आले आणि महाराष्ट्राच्या इतिहासाच्या एका नव्या कालखंडास सुरूवात झाली. या नवराज्याच्या संस्थापनेमुळे आणि त्याविषयीच्या आधीच्या आणि नंतरच्या खटपटीमुळे व अनेक समरप्रसंगामुळे महाराष्ट्रातील सामान्य माणसाचे जीवन अनेक प्रकारे व बऱ्याच प्रमाणात बदलले. महाराष्ट्रात घडून आलेल्या या राजकीय, सामाजिक क्रांतीमुळे मराठी माणसांना अनेकविध क्षेत्रांत पुढे सरसावण्यास नव्या संधी प्राप्त झाल्या. सावकारी आणि व्यापारी व्यवसाय क्षेत्रातील संधी ही त्यापैकीच एक होय. सतराव्या अठराव्या शतकात राजकीय क्रांती होऊन महाराष्ट्राच्या वाणिज्य इतिहासाला, एतद्देशीय मराठी लोकांना अनुकूल अशी जी नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली ती सर्वस्वी तत्कालीन राजकीय आणि युद्धमय परिस्थितीतूनच उद्‌भवलेली होती हे लक्षात घेतले पाहिजे. कारण त्यामुळे इथल्या वाणिज्य व्यवसायाच्या स्वरूपाला आणि प्रगतीला काही मर्यादाही पडणे स्वाभाविकच होते. मराठ्यांच्या राज्यविस्ताराबरोबर त्यांची व्यवसायक्षेत्रेही वाढणार होती. परंतु केवळ राजकीय आधारावर व्यवसायाची वाढ अवलंबून असल्यास राज्य संकोचाबरोबर किंवा नाशाबरोबर त्या व्यवसाय क्षेत्राचाही संकोच किंवा नाश होण्याचा धोका होता.

अशा महत्वाच्या जडणघडणीच्या त्या ऐतिहासिक काळात, म्हणजे १७ व्या, १८ व्या शतकात महाराष्ट्रात असे कोणते योग्य समाजघटक होते? की त्यातून एक नवा व्यापारी, सावकारवर्ग निर्माण होऊ शकला असता या शक्याशक्यतेच्या विषयाची चर्चा करताना महाराष्ट्रातील तत्कालीन विविध समाजघटक, त्यांचे सामाजिक स्थान, त्यांची कार्ये यांचा विचार करणे योग्य ठरते.

### ७) संबंधित समाज-घटक

महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागात शिवपूर्वकाळीही किंबहुना त्याच्याही बऱ्याच पूर्वीपासून लहान लहान प्रमाणावर वाणिज्य किंवा तत्सम व्यवसायावर उपजिविका करणारे लोक होते. हे तत्कालीन साहित्यावरून व उपलब्ध कोरीव लेखांवरून समजते. बलुतेदारांत सोनारासारखे घटक होते पण बलुतेदार सोनार जरी नाणी पारखताना किंवा दागिने करताना सोनेचांदी हाताळत असला तरी तो स्वत: मात्र सामान्यपणे गरीब व्यावसायिकच राहिला होता.

बलुतेदारी बाहेरील घटकात खेड्यातील वाणी मोडत असत. परंतु त्यांच्यात

द्रव्यसंचय करण्याची कुवत फारशी नसावी. एकतर खेड्यातील बहुजनसमाजाच्या वर्चस्वामुळे कर्जवसुलीच्या बाबतीत त्यांना फार कडकपणे वागता येण्यासारखे नव्हते. आणि दुसरे व त्याहून महत्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या बहुतेक भागात, एक वऱ्हाड प्रदेश सोडल्यास कापूस, नीळ तंबाखू, अफू यासारखी निर्यातक्षम व अधिक लाभदायक व्यापारी पिके, सहसा कुठे लागवडीखाली नसत. त्यामुळे शेतीतून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नाचे प्रमाणही मुळातच जेमतेम असे. तेव्हा शेतीच्या अतिरिक्त उत्पन्नातील फारसा मोठा वाटा व्यापाऱ्याच्या मार्फत संबंधित खेड्यातील वाण्यापर्यंत जाऊन पोहोचण्याची शक्यता मुळातच फार कमी होती.

यासंदर्भात समाजातील आणखी एक महत्वाचा उपलब्ध घटक म्हणजे शेटे व महाजन यांचा इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे मते यादवकालीन मराठी समाजात शेटे व महाजन याजसारखे एतद्देशीय वाणिज्य घटक अस्तित्वात होते; परंतु त्यांचा उद्योग नंतर गुजरात व मारवाडहून आलेल्या वाण्यांनी बळकाविला. म्हणजे, राजवाड्यांच्या मते गुजराती व मारवाडी बनिये महाराष्ट्रात मुसलमानी राजवटीत आले आणि त्यांच्या वर्चस्वामुळे मराठी शेट्यांना व महाजनांना आपले व्यवसाय गुंडाळून शेतकी व्यवसायाकडे वळावे लागले. राजवाडेंनी आपल्या या मताच्या पुष्ट्यर्थ ऐतिहासिक पुरावा कुठे दिलेला नाही. उलट पुणे दप्तरातील उपलब्ध पुराव्यावरून असे दिसते की गुजरात -मारवाडमधून बनिये महाराष्ट्रात विशेष प्रमाणात येऊ लागले ते अठराव्या शतकापासून, शिवाय शिलालेख, ताम्रपट इत्यादीतील उपलब्ध साहित्यातून दुसरे असे दिसते की तेराव्या ते सतराव्या शतकातही म्हणजे यादवोत्तर मुसलमान कालातही शेटे व महाजनांची संख्या महाराष्ट्रात सर्वत्र होतीच. उपलब्ध असलेल्या बाराव्या शतकापासूनच्या ठिकठिकाणच्या मराठी कोरीव लेखांत सेठी, महाजन, म्हातारा, सोवनी, कोठारी, वाणी इत्यादी संबंधाचे उल्लेख आढळतात. यावरून एकंदरीत असे दिसते की, यादवकालीन व नंतर मुसलमानकालातही महाराष्ट्रात मराठी समाजात शेटे व महाजन ही संस्था सर्वत्र अस्तित्वात होती. ती नष्ट झाली नव्हती. पण त्या संस्थेचे स्वरूप बलुतेदारी वतनदारी सारखे होते. त्या संस्थेच्या मर्यादांमुळे व निम्नस्तरीय आर्थिक उलाढालीमुळे मराठी शेटे-महाजन मंडळीतून मोठ्या प्रमाणात खास व्यापारी सावकार वर्ग निर्माण होण्याची शक्यता कमीच होती. सतराव्या शतकात महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना झाली. त्यापूर्वीही शेटे व महाजन हे गावातले देशक किंवा गाव

-अधिकारी मानण्यात येत व राजसत्तेचाही त्यांना तशी मान्यता असे. देशमुख, देशकुलकर्णी, पाटील, खोत, वर्तक इत्यादींप्रमाणे ते गावातले मिरासदार असत. पण त्यांचे जे मुख्य काम-बाजारपेठा वसविणे, वजने-मापे इत्यादींवर देखरेख ठेवणे हे होते.

एखादी विशिष्ट वस्तू किंवा सेवा गावात किंवा संबंधित प्रदेशात विकणे अशासाठी व्यावसायिक वतने असत. वतनदार विक्रेत्याला किंवा कारागिराला त्याच्या वतनपत्रात उल्लेखिल्याप्रमाणे गावातील इतर वतनदारांना व गावअधिकाऱ्यांना आपल्या वस्तू व सेवा नेमून दिलेल्या प्रमाणात विनामूल्य द्याव्या लागत. उदाहरणार्थ विड्याची पाने विकण्याचे वतन मिळविलेल्याने नेमून दिलेल्या विशिष्ट गावात तो व्यवसाय करावयाचा, त्याबद्दल सरकारला दरवर्षी ठराविक रक्कम द्यावयाची. रोज गावच्या पाटलाला पन्नास पाने, कुलकर्ण्याला तीस पाने इत्यादी विनामूल्य पुरवावयाची. म्हणजेच ज्याप्रमाणे बलुतेदारांची सेवा त्याप्रमाणे त्याचे बलुते गावकरी ठरवीत. याप्रमाणे व्यावसायिक वतनदाराच्या सेवा-सवलती वगैरे सरकारकडून सविस्तर ठरविल्या जात. व्यापार उदीमासाठी काही मर्यादेपर्यंत या वतनसंस्थेचा, यात शेटे-महाजनांची संस्थाही आली, उपयोग होई. पण त्यातील संकुचित कार्यक्षेत्र, चढाओढीचा अभाव, मालाच्या किंवा सेवेच्या गुणवत्तेला गौणस्थान इत्यादी अंगभूत मर्यादांमुळे संबंधित व्यवसायाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ शकत नसे किंवा त्याची गुणवत्तेत व कौशल्येत वाढ होत नसे.

सारांश, अशा प्रकारे बलुतेदारी पद्धतीतून काय किंवा शेटे महाजन व इतर वतनदारी व्यवसायी पद्धतीतून काय, व्यापारी, सावकारवर्गाचा नवीन प्रकार निर्माण होण्यासारखी परिस्थिती नव्हती. त्यासाठी जास्त स्वतंत्र व मोकळेपणाने व्यवहार करू शकणाऱ्या समाजघटकांची आवश्यकता होती.

गावातील वाण्यांना आपल्या व्यवसायाच्या बाबतीत त्यामानाने जास्त मोकळीक होती असे म्हटले पाहिजे. तथापि त्यांच्यातही गावकीच्या नियमांची मानपान व हक्क अधिकारांची काही ना काही बंधने असतच. मात्र वतनी व्यावसायिकांपेक्षा कमी म्हणावयाची. तत्कालीन शहरातील मराठी वाण्याचे सामाजिक स्थान मात्र बेताचेच होते. कोकण आणि देशावरील काही भागात वैश्य, वाणी असत. ते एक लक्षण होते. कोकणात प्रादेशिक वाणी जमाती होत्या. सावंतवाडीचे कुडाळी, संगमेश्वराचे

संगमेश्वरी, साताऱ्याकडून आलेल्या पाटणचे पाटणे इत्यादी. पण तेही गरीब वर्गात मोडत व त्यांचा सामाजिक दर्जाही बेताचाच होता. देशावरून पाटणे जे कोकणात गेले ते व्यापार उदीमासाठी नसून १३९६-१४०८ मधील दुर्गादेवी दुष्काळाच्या तडाख्यातून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी असे उल्लेख आहेत. वाणी मुळातच ते शेतकरी वर्गातील होते. थोर मराठी संतकवी तुकाराम महाराज १६०७ ते १६४९ या कालखंडातील, यांचा या संदर्भात उल्लेख करता येण्यासारखा आहे. ते कुणबी वाणी होते व वंशपरंपरेने त्यांच्याकडे महाजनपणही आले होते. असे असूनही आर्थिकदृष्ट्या ते गरीबच होते. दुष्काळामुळे त्यांच्यावर अनेक आपत्ती आल्या. दुष्काळात बायको मेली, गुरेढोरे मेली आणि इतर किडुक मिडूकही गेले. एकंदरीने मराठी वाणी -मग ते खेड्यातील असोत अथवा मोठ्या गावातील असोत, ते फारसे धनवान नव्हते असे दिसते.

या ठिकाणी ऐतिहासिक काळातील व्यापार-व्यवसायासंबंधीच्या दोन बाबींचा उल्लेख करणे उचित ठरेल. पहिली अशी की सर्वसामान्य किराणाभुसार व्यापारी जरी मराठी वाणी करीत तरी विक्री व  सेवेचा बराचसा व्यवहार-संबंधीत उत्पादक किंवा कारागीरच करीत, असे उपलब्ध ऐतिहासिक उल्लेखावरून आढळून येते. तत्कालीन अर्थव्यवस्थेसते धरूनच होते. उदाहरणार्थ स्वतः शिंपी कापड व कपडे विकत, कासार, तांब्या-पितळेची भांडी विकत, सणगर कांबळी विकीत, तर तेली तेल विकत. म्हणजेच उत्पादक किंवा कारागीर हे विक्रेत्यांचे जोडकामही करीत. तत्कालीन अर्थव्यवस्था अप्रगत अवस्थेत असल्याने उत्पादन व वितरण या दोन क्रिया वेगवेगळ्या व्यावसायिकांनी करण्याची जरूरी नसे एवढेच नव्हे तर तसे करणे किफायतशीरही झाले नसते. दुसरी महत्वाची बाब व जिचा थोडा सविस्तर विचार येथे करावयाचा आहे, ती म्हणजे, किराणा भुसारी व्यापार जातीने वाणी असलेले लोकच केवल करीत असे नव्हे. ब्राम्हणासारख्यां इतर जातीतीलही लोक हा व्यवसाय करीत, तसेच महाराष्ट्रात पूर्वीपासून शेटे व महाजन मंडळी हीसुद्धा वेगवेगळ्या जातीची असत हेही लक्षात घेण्यासारखे आहे. ब्रिटीशपूर्व कालात भारतातील जाती व्यवस्थेमुळे व्यवसायाची निवड किंवा बदल यांच्या बाबतीत सामाजिक स्वातंत्र्य नव्हते अशी एक मोघम कल्पना अनेकांच्या मनात दृढमूल झालेली असते. कदाचित मनुस्मृतिसारख्या ग्रंधातून प्रतिपादलेल्या आदर्श समाजरचनेच्या नियमांवरून अशी समजूत बलवत्तर होण्यास

मदत झाली असेल. याची ऐतिहासिक सत्यता पडताळून पहाण्याची मात्र आवश्यकता आहे असे वाटते. भारतात ऐतिहासिक कालात निरनिराळ्या व्यवसायात प्रदेशात, नगरात, व्यवसायाची निवड किंवा त्यात बदल होत असत का? होत असल्यास ते समाजातील कोणत्या स्तरात, किती प्रमाात होत असत, ते का व कसे होत असत? इत्यादी एक स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊ शकेल.

तथापि, यासंबंधीच्या महाराष्ट्रातील परिस्थितीबद्दल असे दिसते की येथे बऱ्याच जातीतील लोकांना विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असत. इतर जातीतील लोकांपेक्षा ब्राम्हण जातीतील मंडळी अधिक प्रमाणात अनेकविध व्यवसाय करू शकत बहुतेक ब्राम्हणांनीच लिहीलेल्या व अर्थ लावलेल्या स्मृती व्यवस्थेच्या अग्रभागी असल्याने, अस्वच्छ मानलेले व्यवसाय सोडल्यास, इतर व्यवसायाच्या बाबतीत त्यांना फारसा कुठे मज्जाव केला जात नसे. आळतेकरांनी 'राष्ट्रकूट आणि त्यांचा काल' या आपल्या इंग्रजी ग्रंथात यासंबंधी भरपूर ऐतिहासिक व धर्मशास्त्रीय दाखले दिले आहेत. सतराव्या -अठराव्या शतकातही हीच स्थिती अस्तित्वात होती असे दिसते.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी ब्राम्हण मंडळी खेडयातून बलुतेदार म्हणून भटाचे काम करीत. अनेकजण स्वत:ची शेती करीत व गुरेढोरे बाळगूनही रहात. वाचन, कारकूनी, हिशेब इत्यादीचे शिक्षण घेतलेले ब्राम्हण लेखनिक, फडणीस, मुत्सद्दी, व्यापारी, सावकारी इत्यादी व्यवसाय क्षेत्रांत वावरू शकत, महाराष्ट्रात ब्राम्हणांना मराठा, कायस्थ इत्यादी जातींप्रमाणे राजकीय दृष्ट्याही महत्वाचे स्थान होते. राजकीय, प्रशासकीय व सैनिकी क्षेत्रात दक्षिण भारतात तरी दीर्घ काळापासून, म्हणजे सातवाहनांच्या काळापासूनसुद्धा २५० ख्रि. पू. ते २५० इ. स. कालखंडातील महत्वाच्या पदावरून ब्राम्हण वर्गानी कामे केलेली आढळून येतात. या विषयाच्या आणखी एका महत्वाच्या अंगाचा या संदर्भात इथे उल्लेख करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक काळात ब्राम्हण वर्गानी जरी वेगवेगळे व्यवसाय अनुसरले तरी त्या त्या व्यवसायानुसार त्यांच्यात तितक्या उपजाती पडल्या नाहीत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ब्राम्हण कुटुंबात एका पिढीचा व्यवसाय आधीच्या पिढीच्या व्यवसायापेक्षा वेगळा असू शकतो. इतकेच काय, एकाच व्यक्तीच्या आयुष्यात आधी एक व्यवसाय तर नंतर दुसरा, भिन्न क्षेत्रातील व्यवसाय, असे घडू शकेल एकाच ब्राह्मण कुटुंबात एका व्यक्तीचा व्यवसाय एक तर दुसऱ्याचा आणखीन एखादा वेगळा, असेही घडत

असे.

सारांश - अशा प्रकारे सतरा-अठराव्या शतकात ज्या वेळी महाराष्ट्रात एतद्देशीय खास असा व्यापारी व सावकारवर्ग उदयास येण्याची शक्यता निर्माण झाली; त्यावेळी ज्यातून तो निर्माण व्हावयाचा त्यात, त्यातल्या त्यात योग्य असे, शेटे, महाजन, वाणी, वतनदारीवर व्यवसाय करणारे; विक्रेते, कारागीर, उत्पादकवजा विक्रेते, ब्राम्हण असे प्रमुख आर्थिक-सामाजिक घटक अस्तित्वात होते. यातील कोणते घटक अधिक यशस्वी ठरले व ते का हे कळण्यासाठी तत्कालीन मराठी राज्याची प्रशासकीय व आर्थिक कारभार पद्धती कशी होती, हेही पहाणे आवश्यक ठरते. अशा प्रकारे व्यापारी व सावकार वर्गांना व समाजातील सर्वसामान्य जाती उपजातीतील वर्गांना इतर घटकांना व्यापारी सोयी सवलती नानासाहेब पेशव्यांनी देऊन आर्थिक क्षेत्राला उभारी दिली.

## ५.८ पेशवेकालीन महसूल अधिकारी

### १. सुभा-

'सुभा म्हणजे प्रांत होय.' सुभ्याचे एकूणचार प्रकार दिसतात. १. सरसुभा, २ प्रांत, ३. कमाविसी प्रांत आणि ४. सरंजाम प्रांत होय. सुभ्याच्या अधिकाऱ्याला सुभेदार म्हणतात. प्रांताच्या अधिकाऱ्याला सरसुभेदार म्हणतात. तर कमाविसी प्रांतावर कमाविसदार असून सरंजाम प्रांतावर दरखदार नावाचे अधिकारी असत. अशा प्रकारची प्रशासकीय व्यवस्था दिसून येते. या महसूलाच्या /प्रशासनाच्या प्रशासकीय व्यवस्थेला नानासाहेब पेशव्यांनी सुत्र बद्ध पद्धतीने आकार दिलेला दिसून येतो. (The revenue policy of the peshwas was based on the principle of securing the prosperity of the tax-payer.)

वरील पेशवेकालीन महसूल व्यवस्थेचा विचार करीत असताना असे दिसून येते की, राज्याची भरभराट ही रयत व सरकार यांच्या चांगल्या संबंधावरच अवलंबून असते. याचा विचार नानासाहेब पेशव्यांनी महसूल व्यवस्थेबाबत केलेला दिसून येतो. महसूल व्यवस्था ही जास्तीत जास्त सुखकारक व लोकांना हिताची वाटेल अशा प्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

### १. पेशवेकालीन सुभेदारांचे अधिकार व कार्य-

सुभेदाराची नेमरूक प्रांताच्या प्रमुखपदी केलेली असते. महत्वाच्या आणि मोक्याच्या ठिकाणी नेमलेल्या सुभेदारांना सरसुभेदार असे म्हटले जाते. प्रामुख्याने कर्नाटक, गुजरात, खानदेश, माळवा, बुंदलखंड, कोकण या भागामध्ये सुभेदार आणि सरसुभेदारांना मोकासा महालाच्या प्रशासनामध्ये खूपच अधिकार असत. त्यामध्ये जमीन महसूलाचा हक्क सुभेदाराला असे. सुभेदार पेशव्यांची खास परवानगीने स्वत:च्या मालासाठी जकाम माफ करून घेत. सुभेदार हे आपल्या अधिकार क्षेत्रामध्ये मामलेदारांची नेमणूक करीत. महसूल गोळा करताना सुभेदारांकडून किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांकडून रयतेला त्रास होणार नाही अशा पद्धतीने महसूल गोळा करावा असे स्पष्ट आदेश नानासाहेब पेशव्यांने दिल्याचे निदर्शनास येते. महसूलाचा हिशोब तपासणी बाबतीत नानासाहेब पेशवेचे धोरण अत्यंत दक्षपणे दिसून येत. सर्व सुभ्याचा हिशोब ठेवण्याचे आणि तपासणी करण्याचे काम एवढेच नव्हेतर सुभे किंवा प्रांतामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम सुभेदाराला करावे लागे. सुभ्यामध्ये चोरी दरोडे पडणार नाहीत, रयतेला त्रास होणार नाही याबाबतीत त्याला खबरदारी घ्यावी लागे. सुभ्यातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे याशिवाय रयतेच्या मनात विश्वास व सुरक्षितपणा कसा वाढेल, सुभ्यामध्ये तंटा उपस्थित झाल्यास त्याचा निवाडा करणे. सुभ्यातील महालांची जमाबंदी ठरवणे, तीची वसुली करणे. परगाण्याचा प्रमुख कमाविसदारावर देखरेख ठेवणे, परगाण्यामध्ये महसूलात सुट देणे, कमाविसदारांचे व त्यांच्या नोकरांचे पगार ठरविणे, परगाण्यातील फडणीसांची नेमरूक करणे किंवा त्याला काढून टाकणे अशा कितीतरी जबाबदाऱ्या सुभेदाराला पार पाडाव्या लागत. यावरील जबाबदारी पार पाडीत असताना पुणे सरकारची मंजुरी घ्यावीच लागे. भ्रष्टाचार लाचलुचपत याकामीही मामलेदाराची चौकशी करण्याचा अधिकार सुभेदाराला होता. भ्रष्टाचार केलेल्या अधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करणे आणि पैसा वसूल करणे हाही हक्क सुभेदाराला होता. अशाप्रकारे सुभेदार हा राज्यव्यवस्था व राज्याच्या अर्थव्यवस्थेमधला एक महत्वाचा दुवा असून त्याच्याकडे मुलखी, लष्करी व न्याय विषयक अधिकारामुळे सुभेदार हा पेशव्यांचा खास मर्जितील असे. काही खास मर्जितील सुभेदार प्रामुख्याने मोराजी शिंदे, शंकररावजी केशव, विसाजी केशव, कर्नाजी शिंदे व महादजी

रघुनाथ इ. सुभेदार पेशव्यांच्या मर्जितले व अत्यंत विश्वासू होवून गेल्याचे दिसून येते.

## २. पेशवेकालखंडातील मामलेदारांचे अधिकार व कार्य-

सुभेदाराच्या खालोखाल अधिकाराच्या बाबतीत पेशवे कालखंडातील मामलेदार हाही महत्वाचा अधिकारी होता. परगाण्यामध्ये मामलेदार हा सुभेदाराला मदत म्हणून काम करीत असे. मात्र याची नोकरी कायमस्वरूपी नसे. नेमणूक होण्यापूर्वी मामलेदाराला सरकारकडे आगाऊ भरावी लागे अशा रकमेला रशद असे म्हणत. मामलत या शब्दाचा अर्थ महसूल गोळा करण्याचा अधिकार प्राप्त होत असे. मामलेदाराने प्रमाणीक काम केले तरच त्याला पुढील वर्षी मामलत म्हणजे महसूल गोळा करण्याचा अधिकार प्राप्त होई. मामलेदाराच्या हाताखाली कमाविसदार, मुजुमदार, फडणीस आणि कारकून हे अधिकारी असत. कमाविसदाराला पाचशे रूपये वार्षिक पगार, मुजुमदाराला दोनशे वार्षिक पगार, मुजुमदाराला दोनशे दोनशे वार्षिक पगार तर कारकूनाला एकशे पन्नास रूपये वार्षिक पगार असे. मामलेदाराकडे एकच परगाणा नसून अनेक परगाण्यांची जबाबदारी सोपविली जात असे. त्याचे कार्य व जबाबदारी खालीलप्रमाणे-

१. पेशव्यांनी दिलेल्या जबाबदाऱ्या कौलनामे यांचा मान राखणे.
२. सुभेदाराने दिलेल्या जबाबदाऱ्या प्रमाणिकपणे पार पाडणे.
३. परगाण्याचा महसूलवाढविण्यासाठी शेतीला प्रोत्साहन देणे.
४. जमीनी संबंधीचा सर्व हिशोब सुभेदाराला सादर करणे.
५. दुष्काळ, रोगराई, शत्रुंचा हल्ला तसेच संकट प्रसंगी महसूलात सुट देणे.
६. मामलेदाराने जमीनी खरेदी विक्री व गहाण खत याकडे लक्ष देणे.
७. मामलेदाराला हाताखशलील लोकांचा पगार ठरविणे. रसद प्रामाणिकपणे शासनास भरणे यात गैरकारभार होणार यांची दक्षता घेणे.

अशा प्रकारच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे मामलेदाराला पार पाडाव्या लागत. यामध्येकसूर केला तर पुढील वर्षी त्याला मामलेदार हे पद मिळत नसे. जमीन खरेदी खतावर मामलेदाराचा सही शिक्का आवश्यक असे. परगाण्यामधील महसूल विषयक खटले व धार्मिक बाबतीत त्याला निर्णय द्यावा लागे. डॉ. सेन यांनी नानासाहेब पेशवे यांच्या मामलेदारावरील नियंत्रण व प्रशासकीय व्यवस्थेबाबत

केलेल्या कौशल्यपूर्ण रचनेचे कौतुक केल्याचे निदर्शनास येते. अशाप्रकारे मामलेदाराला परगाण्याच्या जमाखर्चाचा सर्व हिशोब प्रामाणिकपणे सादर करावा लागत असे.

### ३. पेशवेकालीन कमाविसदाराचे अधिकार व कार्य-

कमाविसदार हा पेशव्यांच्या महसूल व्यवस्थेतील एक महत्वपूर्ण अधिकारी होता. परगाण्यामधील मामलेदार नंतरचा मुख्य अधिकारी कमावीसदार असे. डॉ. य. ना. कदम म्हणतात कमाविसदारांची नेमणूक जहागिरदार करीत असे. तर काहींच्या मते मामलेदार व कमाविसदार या दोन अधिकाऱ्यांची नेमणूक पेशवे करीत असत. कमाविसदाराला खालील कार्ये करावी लागत.

१. आपल्या अधिकार क्षेत्रात रयतेचे सुख पहाणे.
२. दिलेले काम चोख व प्रमाणिकपणे करणे.
३. कमाविसदाराला रसद म्हणून काही रक्कम सरकारला भरावी लागत असे.
४. मोठ्या कसब्याच्या ठिकाणी कमाविसदाराला महसूल गोळा करणे.
५. घरपट्टी, व्यवसायकर, उदीमपट्टीगोळा करणे.
६. गोळा केलेला महसूल सरकारी खजिन्यात प्रामाणिकपणे भरावा लागत असे.
७. अवर्षण, दुष्काळ, संकट प्रसंगी किंवा युद्ध प्रसंगी नुकसान झाल्यास रयतेला सुट देण्याचा अधिकारही कमाविसदाराला असे.
८. शेतीचा विकास करणे, जादा जमीन लागवडीखाली आणणे, शेतकऱ्यांना तगाई देवून ती टप्याटप्याने वसूल करणे.
९. आपल्या अधिकार क्षेत्रात उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे, बाजारभावावर नियंत्रण ठेवणे, टांकसळीवर लक्ष ठेवणे, खाजगी टांकसळी बंद करणे.
१०. आपल्या सोयीप्रमाणे प्राताच्या हितासाठी सैन्य बाळगणे, गुन्हेगारांना शासन करणे, घरातील भांडणे मिटवणे, कर्जप्रकरणात हस्तक्षेप करणे, खेड्यातील प्रश्न सोडविताना पंचायतीची मदत घेणे इ. अधिकार त्याला होते. यावरून तो पेशवे काळातील एक महत्वाचा अधिकारी होता हे सिद्ध होते.

कमाविसदाराला वार्षिक चार टक्के पगार असून कार्यक्षम कमाविसदारांना जास्त पगार मिळत असे. जेवढे परगाण्याला महत्व जास्त तेवढे कमाविसदाराला पगार जास्त पगार जास्त यावरून परागण्याचा मुल्यांवर त्याचा पगार ठरत असे. नानासाहेब पेशव्यांनी १७४० -१७४१ मध्ये वार्षिक एक हजार इतकी कमाविसी त्र्यंबक हरी या

सरदार दिल्याची नोंद पेशवे दप्तरात दिसून येते. वार्षिक एक हजार इतकी कमाविसी त्र्यंबक हरी या सरदार दिल्याची नोंद पेशवे दप्तरात दिसून येते. भूपाळीची कमाविसी रामचंद्र बल्लाळ यांना सात हजार रूपयावर तर बुंदेलखंडाची कमाविसी ज्या व्यक्तीला दिली त्याच्याकडून तीन लाख वीस हजार इतका ॲडव्हान्स घेतला आणि त्याला वार्षिक पगार बारा हजार आठशे दिल्याची नोंद आहे. त्र्यंबक बाबूराव कसबला पुणे तांब्याची कमाविसी पाच वर्षासाठी दिल्याचे निदर्शनास दिसून येते. नानासाहेब पेशव्याच्या काळामध्ये कमाविसी बाबतीत महसूल वाढ खालीलप्रमाणे अपेक्षित असल्याचे निदर्शनास येते.

| | |
|---|---|
| १७५९ | ४५,०००/- रूपये |
| १७६०-१७६१ | ४६,०००/- रूपये |
| १७६१-१७६२ | ४७,०००/- रूपये |

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर ही जबाबदारी माधवराव पेशव्यांच्याकडे आली. त्यांनी यामध्ये दक्षतेने कार्य केले. १७६२-१७६३ मध्ये अठ्ठेचाळीस हजार रूपये तर १७६३-१७६४ मध्ये एकोणपन्नास हजार रूपये. वरील तक्तयाचा विचार करता नानासाहेब पेशव्याच्या काळात म्हणजे १७५९-१७६० या कालखंडात कमाविसदाराचा पगार वार्षिक एक हजार आठशे रूपये होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात हा पगार दोनशे रूपये देण्यात आल्याचे निदर्शनात येते. अशारितीने कमाविसदाराने हा परगाण्यामधील मामलेदार नंतरचा पेशवेकालीन एक महत्वपूर्ण अधिकारी होता.

## ४. पेशवे कालखंडातील मुजुमदार, फडणीस व इतर अधिकार व कार्य

पेशवे कालखंडातील शेती महसूल हिशोब इत्यादी बाबतीमध्ये महत्वपूर्ण अधिकारी होते. त्यामध्ये मुजुमदार व फडणीस हे महत्वाचे अधिकारी होते. शेत सारा व महसूल आणि इतर अधिकाऱ्यांनी सरकारी दरबारी सारा यांचा हिशोब चोख ठेवण्याचे काम या अधिकाऱ्यांना करावे लागत असे. पेशव्यांच्याकडून मुजुमदार आणि फडणीस यांची नियुक्ती केली जात असे. कमाविसदार याशिवाय दिवाण, दप्तरदार, जमेनीस, पोतनीस, अमीन इत्यादी प्रकारचेही अधिकारी राज्याच्या महसूल व अर्थ व्यवस्थेमधील आधारस्तंभ मानले जातात. अशा प्रकारे या अधिकाऱ्यांच्या मार्फत गोळा होणारा शेतसारा यावरच राज्याची आर्थिक भरभराट व दैदिप्यमान प्रगती अवलंबून असते.

## ५.९ शेती व महसुलातील सुधारणा

नानासाहेब पेशव्यांच्या कालखंडाला प्रदिर्घ अशी एकवीस वर्षाची कारकिर्द मिळाल्याने मराठी राज्याला स्थिरता मिळाली. नानासाहेब पेशवे यांनी आर्थिक भरभराटच नव्हे तर मराठ्यांचे राज्याचा प्रचंड विस्तार केला. दक्षिण हिंद या भागातून मोठ्या खंडण्या वसूल केल्या. उत्तर हिंद या भागामध्ये मराठ्यांचे वर्चस्वच नव्हे तर मराठे किंगमेकर आहेत. अशी जाणीव शत्रुंच्या मनात निर्माण केली. न भूतो न भविष्यती एवढा मोठा विस्तार केला. आणि मराठी राज्याची आर्थिक भरभराट केली. उद्योग, व्यापार, शेती, जमीन महसूल व्यवस्था याबाबतीत दक्ष राहून मराठी राज्याला आर्थिकदृष्ट्या संपन्न बनविले. अर्थव्यवस्थेतील प्रमुख घटक शेती व महसूलाबाबतीत त्यांनी खालील सुधारणा केल्याचे दिसून येते.

१. नानासाहेब पेशव्यांनी मराठी राज्यामध्ये शेती व्यवसायावर वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून सुधारणा केल्या. शेतातील दोष नष्ट करून शेती व्यवसाय कसा फायदेशीर होईल जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल याकडे लक्ष दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर राज्य व अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीने खालोखाल काम नानासाहेब पेशवे यांनी केले असे इतिहासकार गो. स. सरदेसाई यांनी आपल्या ग्रंथात नमूद केले आहे. नानासाहेब पेशवे यांनी आर्थिक सुधारणा केल्यामुळेच लोकप्रिय झाले.

२. नानासाहेब पेशव्यांनी जमीन महसूलाबाबत प्रजेवर कधीच अन्याय केला नाही. संकट समयी किंवा दुष्काळ, अवर्षण प्रसंगी प्रजेकडून शेतसारा वसूल न करता त्यांना माफ केल्याचे दिसून येते.

३. जमीन महसूलामधील जाचक सारा आकारण्याची पद्धत नानासाहेब पेशव्यांनी बंद केली.

४. सारा आकारताना रयतेला मुख्य घटक करून अधिकारी व सुभेदारांना कर गोळा करताना प्रजेवर अन्याय अत्याचार होणार नाही. याबाबतीत नानासाहेब पेशवे स्वतः दक्ष रहात असत.

५. सतत होणाऱ्या युद्धांमुळे किंवा शत्रूपक्षाने एखाद्या गावावर हल्ला केला असेल तर गावे ओस पडली जात असत. तेथील जमीन ओसाड पडल्या जात असत. अशा वेळी त्या भागामध्ये पुन्हा जम बसविण्यासाठी सोयी सवलती

दिल्या जात असत. नवी गावे नव्या बाजारपेठा त्याठिकाणी बसाव्यात यासाठी नवे कारागीर सावकार, व्यापारी यांनाही विशेष सवलत देसवून या भागात ते कसे स्थायिक होतील याकडे लक्ष दिले जात असे. अशा भागातील या व्यक्तिंच्या मालमत्तेचे, त्यांच्या व्यवसायाचे रक्षण करणे आणि त्यांचा विकास कसा होईल एवढेच नव्हेतर शेतीला विशेष प्रोत्साहन देऊन शेतमालाचे उत्पादन वाढवले जात असे.

६. महसूल गोळा करण्यासाठी विश्वासू व प्रामाणिक अधिकारी नेमले जात असे. प्रामुख्याने सुभेदार, मामलेदार, कमाविसदार अशा विश्वासू अधिकाऱ्यांची नेमणूक नानासाहेब पेशवे स्वत; लक्ष घालून करीत असे.

७. समाजातील प्रतिष्ठीत लोकांना अनेक प्रकारचे इनामे, अधिकार व हक्क दिलेले असत. या अधिकारांमुळे त्यांच्याकहून सरकारच्या उत्पादनात कर रूपाने पैसा गोळा केला जात असे. सदरचे उत्पादन जमा करत असताना कोणत्याही प्रकारची सक्ती केली जात नसे.

८. शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी नवी अवजारे, शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टी, सुलभ कर्जपुरवठा सावकारांची सक्ती होणार नाही याकडे लक्ष दिल्याचे दिसून येते.

९. शेतीसाठी आवश्यक असणारे बी-बियाणे व औषधांची उपलब्धता करून देत असत.

१०. महसूल व्यवस्था ही राज्याच्या आर्थिक व्यवस्थेमधील व उत्पन्नातील महत्वाची बाब असल्यामुळे नानासाहेब पेशव्यांनी याबाबतीत दक्ष राहून सर्व समस्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

११. जमीन महसूलाच्या बाबतीत काही तंटे निर्माण झाले किंवा काही फौजदारी गुन्हे झाले तर ते निकाली काढण्यासाठी स्वतंत्र पद्धत सुरू केली. नि:पक्षपातीपणे न्याय मिळावा यासाठी पेशवे दक्ष होते.

१२. नानासाहेब पेशव्यांनी पुणे येथे फडणीसी खाते अधिक कार्यक्षम बनविले. फडणीसी हा कारकुनी फड अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा अंग बनविला. कारकुनी सरदार, वतनदार, जहागीरदार त्यांच्या आर्थिक व्यवहार आणि कारभारावर वचक बसवून गैर व भ्रष्टाचारी भाग कमी केला. रामचंद्र बाबा,

सदाशिवराव, सखारामबापू, नाना फडणीस अशी अव्वल माणसे या फडात सामील केली.

अशा रितीने पेशवे काळामध्ये नानासाहेब पेशव्यांनी जमीन महसूल ही राज्याच्या उत्पादनाची मुख्य बाब होती असे दिसते. नानासाहेब पेशवे यांच्या महसूल धोरणासंबंधात इतिहासकार वा. कृ. भावे म्हणतात पेशवाईत सरकारी वसूलाच्या पुष्कळ बाबी असल्या तरी जमीन ही मुख्य बाब होती. म्हणून जमीन महसूलावरती त्यांनी जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केले. डॉ. सेन यांनीही नानासाहेब पेशव्यांच्या महसूल व्यवस्थेचे कौतुक करताना म्हणतात (The revenue policy of the peshwas was based on the principle of securing the prosperity of the tax-payer.) राज्याची भरभराट ही सरकार व रयत यांच्या चांगल्या संबंधावर अवलंबून असते. दहशत निर्माण केली तर ती क्षण काळ टिकणारी असते. राज्याची खरी भरभराट रयतेला अधिक उत्पादन करण्यास प्रोत्साहित करणे यावरच अवलंबून असते. याविषयी दिव्यदृष्टी त्यांच्याकडे होती. म्हणून स्वाभाविकच त्यांनी शेतीकडे बारकाईने लक्ष दिले.

पेशवे कालखंडामध्ये जमीनीपासून येणारे उत्पन्न हे सर्वात जास्त येत असल्यामुळे सर्वच पेशवे याबाबतीत दक्ष होते. पेशवे काळामध्ये छत्रपती छ. शाहूंच्या मृत्यू नंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याकडे राज्याचे सर्व अधिकार आले. तह शत्रू पक्षाबरोबर युद्ध आणि जमीन महसूल या संबंधातले सर्व आर्थिक अधिकार नानासाहेब पेशव्यांच्याकडे आले. राज्यकारभाराची आर्थिक घडी नीट बसवण्यासाठी नानासाहेबांनी पेशव्यांच्याकडे आले. राज्यकारभाराची आर्थिक घडी नीट बसवण्यासाठी नानासाहेबांनी आपले लक्ष जमीन महसूल पद्धतीकडे दिले. १७५८ मध्ये जमीन महसूल व्यवस्थेतील दोष नष्ट केले. आणि नियोजीत आराखडा तयार करून जमीन महसूल व्यवस्थेला पूर्णत्व दिले. जमीन महसूलाचे पुढील भाग केले.

१. शेतजमीन- प्रामुख्याने ही जमीन लागवडीखाली असे. यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या.
२. कुरण जमीन- हा महसूलाचा दुसरा भाग. ही चरावू जमीन होती.
३. बाग जमीन- बागेसाठी किंवा आपल्या राज्यामध्ये सुशोभिकरण करण्यासाठी या प्रकारची जमीन महसूलाची विभागणी केली.

४. आमराई जमीन- ही जमीन खाजगी माणसाकडे असे किंवा स्वत: पेशव्यांच्या ताब्यात असत. वरील प्रकारे या जमीन महसूल व्यवस्थेचे टप्पे आढळत नाहीत. महसूल विषयी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय नानासाहेब पेशवे यांनी आपल्या मामलेदार, कमाविसदार आणि सुभेदार यांना केलेल्या आज्ञेवरून दिसून येतात. डॉ. सेन यांनी नानासाहेब पेशव्यांच्या या शेतीविषय धोरणांचे कौतुक करताना पेशव्यांनी या महसूल व्यवस्थेत लोकाभिमुख व लोककल्याण ही जाणीव जपली असे नमूद केले आहे.

## ५.१० जमीन महसूलातील प्रमुख घटक

पेशवे कालखंडात राज्य व्यवस्थेत मोठा बदल झाला. राज्य व्यवहाराची पद्धत बदलली. शिवकाळात मध्यवर्ती सत्ता प्रबळ असल्याने उत्पन्नाच्या बाबी छत्रपतींशी निगडीत असत. मात्र पेशवे काळामध्ये छत्रपतीच दुबळे बनले असल्याने उत्पन्नाच्या सर्व बाबतीत पेशवे व त्यांचे इतर सरदार यामध्ये जमीन महसूल विभागला गेला. यापूर्वीच्या अर्थकारणांमध्ये असणारा एकसूत्रीपणा नष्ट होवून अर्थकारणाचे विकेंद्रिकरण झाल्याचे निदर्शनास येते. हे अर्थकारणाचे विकेंद्रीकरण पाहण्यासाठी खालील संज्ञा अभ्यासणे आवश्यक आहे.

### अ) मोकासा व साहोत्रा-

जमीन महसुलातील मोकासा व साहोत्रा हा अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक होता. उत्पन्नाच्या बाबींशी त्याचा संबंध घनिष्ठा मानला जात असे. कारण शिवकाळामध्ये छत्रपती हे सर्वेसर्वा होते. त्यामुळे अर्थकारणाशी निगडीत असणाऱ्या या बाबींवर त्यांचे वर्चस्व होते. मात्र पेशवे काळामध्ये सुरुवातीचे पेशवे सोडले तर बाकीचे पेशवे दुबळे निघाले, त्यामुळे अर्थकारणाचा पूर्वीचा एकसूत्रीपणा जावून त्याचे स्वरूप बदलले आणि सरदारांमध्ये उत्पन्नाच्या बाबींचे विभागणीकरण होऊ लागले. ज्याप्रमाणे चौथाई ही शत्रूच्या प्रदेशातून गोळा केला जात असे. मात्र सरदेशमुखी ही स्वराज्यामधूनच वसूल केली जात असे. त्याचप्रमाणे चौथाईच्या हक्काव्यतिरिक्त ७५% रक्कम उत्पन्नाला 'मोकासा बाबती' साठी राखली जात असे. या मोकासामधून दोन प्रकारच्या घटकांचा उल्लेख होतो. त्यामध्ये साहोत्रा हा एक होय. आणि दुसरा म्हणजे नाडगौडा होता. साहोत्रा म्हणजे महसुलाच्या सहा टक्के इतके उत्पन्न होय. तर नाडगौडा म्हणजे तीन टक्के उत्पन्न होय. हे उत्पन्न बाजूला काढून

ठेवले जात असे. यावरून राजाला पंचवीस टक्के अधिक आणि नऊ टक्के इतके उत्पन्न स्वतःच्या खर्चासाठी मिळत असे. तर बाकीचे राहिलेले एकूण ६६ टक्के उत्पन्न सरदारांना वाटून दिले जात असे. या वरील व्यवस्थेला इतिहासकार डॉक्टर एच. एन. सिन्हा यांनी छत्रपतींना पेन्शनर छत्रपती या नावाने संबोधण्यात आले. मोकासामध्ये एकाच वेळी एखाद्या गावातील जमिनीबाबतीत वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या नावाने सनदा दिल्या जात असत. काही वेळा पूर्ण गाव किंवा गावातील जमीनही दिलेली असे. अडचणीच्या प्रसंगीसुध्दा गावातून सारा वसूल केला जात असे. डॉ. सेन यांनी सारा वसूल करण्याची पध्दत म्हणजे गुंतागुंतीची असल्याचे म्हटले आहे. कारण कोणत्याही सरदार वतनदाराच्या अधिकाराबाबत निश्चित माहिती ठरल्याचे दिसत नाही.

## ब) चौथाई-

चौथाई व सरदेशमुखीचा उदय हा पेशवे काळात झाला असे नव्हे तर यापूर्वीच्या शिवकाळातही या संज्ञेचा उदय झाला होता. मात्र शिवकाळात याचे स्वरूप वेगळे होते. चौथाई म्हणजे राष्ट्राच्या उत्पन्नातील चौथा हिस्सा किंवा १/४ भाग होय. चौथाई ही मोगली प्रदेशातून वसूल करण्याची पद्धत शिवरायांच्या काळापासून होती. याच चौथाई पैशाच्या जोरावर शिवरायांनी स्वराज्य उभे केले. चौथाईची ही पद्धत म्हणजे परकियांपासून घ्यावयाची संरक्षात्मक रक्कम होय. शिवकाळात चौथाई ही फक्त स्वराज्याच्या आसपासच्या प्रदेशासी निगडीत राहिली. पेशवेकाळात मात्र पेशव्यांनी पुण्याला राजधानी बनवले. छत्रपती दुबळे बनले. सातारची मराठ्यांची राजधानी पुण्याला सर्वप्रथम आणण्याचे काम छ. शाहूंच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशव्यांने केले. नानासाहेब पेशव्यांच्या वडिलांनी म्हणजे बाजीराव पेशव्यांनी सतत २० वर्षे लढाया करून मराठी सत्तेचा सर्वत्र बोलबाला केला. उत्तरहिंद दक्षिणहिंद संपूर्ण भारतात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. मात्र आकस्मात त्यांचे निधन झाले परिणामी सर्व जबाबदारी नानासाहेब पेशव्यांच्यावर आली. नानासाहेबांनी बाजीराव पेशव्यांचे राहिलेले काम पूर्ण करून मराठी राज्याला स्थिरता प्राप्त करून दिली. दक्षिणेकडे मोठा विस्तार करून ६ सुभ्यांतून चौथाई हक्क वसूल केला. एवढेच नव्हे तर दिल्लीच्या बादशहाने चौथाईची सनद दिली. आणि जवळ-जवळ संपूर्ण भारतभर मराठ्यांचे संबंध प्रस्थापित झाले. मराठ्यांची पत-प्रतिष्ठा वाढली. चौथाईच्या रूपाने मराठ्यांना

प्रचंड पैसा मिळू लागला मराठ्यांचे सरदारही चौथाई वसूल करू लागले अशा प्रकारे या महसूल व्यवस्थेला चौथाईच्या माध्यमातून मिळणाऱ्या साऱ्यामधून नानासाहेबांनी मराठी राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसवून छ. शाहूंचे तसेच बाजीराव पेशवे यांचे सततच्या मोहिमेमुळे झालेल्या कर्जांचे डोंगर नानासाहेबांने नाहिसे केले.

The Chauth was only a means of buying of one robber and not a subsidiary system for the maintenance of peace and order against all enemies. The lands subjects to Chauth, cannot, therefore be rightly called 'Spheres of influence.'

मात्र शिवकाळात याचे स्वरूप वेगळे होते. चौथाई म्हणजे राष्ट्राच्या उत्पन्नातील चौथा हिस्सा किंवा १/४ भाग होय. चौथाई ही मोघली प्रदेशातून वसूल करण्याची पद्धत शिवरायांच्या काळापासून होती. याच चौथाई पैशाच्या जोरावर शिवरायांनी स्वराज्य उभे केले. चौथाईची ही पद्धत म्हणजे परकियांपासून घ्यावयाची संरक्षात्मक रक्कम होय. शिवकाळात चौथाई ही फक्त स्वराज्याच्या आसपासच्या प्रदेशासी निगडीत राहिली. पेशवेकाळात मात्र पेशव्यांनी पुण्याला राजधानी बनविली. छत्रपती दुबळे बनले. सातारची मराठ्यांची राजधानी पुण्याला सर्वप्रथम आणण्याचे काम छ. शाहूंच्या मृत्यूनंतर नानासाहेब पेशव्यांने केले. नानासाहेब पेशव्यांच्या वडिलांनी म्हणजे बाजीराव पेशव्यांनी सतत २० वर्षे लढाया करून मराठी सत्तेचा सर्वत्र बोलबाला केला. उत्तरहिंद दक्षिणहिंद संपूर्ण भारतात मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. मात्र आकस्मात त्यांचे निधन झाले परिणामी सर्व जबाबदारी नानासाहेब पेशव्यांच्यावर आली. नानासाहेबांनी बाजीराव पेशव्यांचे राहिलेले काम पूर्ण करून मराठी राज्याला स्थिरता प्राप्त करून दिली. दक्षिणेकडे मोठा विस्तार करून ६ सुभ्यांतून चौथाई हक्क वसूल केला. एवढेच नव्हे तर दिल्लीच्या बादशहाने चौथाईची सनद दिली. आणि जवळ-जवळ संपूर्ण भारतभर मराठ्यांचे संबंध प्रस्थापित झाले. मराठ्यांची पत-प्रतिष्ठा वाढली. चौथाईच्या रूपाने मराठ्यांना प्रचंड पैसा मिळू लागला मराठ्यांचे सरदारही चौथाई वसूल करू लागले अशा प्रकारे या महसूल व्यवस्थेला चौथाईच्या माध्यमातून मिळणाऱ्या साऱ्यामधून नानासाहेबांनी मराठी राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसवून छ. शाहूंचे तसेच बाजीराव पेशवे यांचे सततच्या युध्द मोहिमेमुळे झालेल्या कर्जांचे डोंगर नानासाहेबांने नाहिसे केले.

### क. सरदेशमुखी-

पूर्वीच्या काळामध्ये महाराष्ट्रात जमिनी लागवडीखाली आणलेल्या नसून जमीन लागवडीसाठी देशमुखांकडे दिली जात असे. देशमुख हा वतनदार सारा गोळा करून तो सरकारला जमा करत असे. या बदल्यात देशमुखाला गोळा केलेल्या रक्कमेपैकी १० टक्के रक्कम स्वत:साठी ठेवून घेण्याचा हक्क असे. यास सरदेशमुखीचा हक्क असे म्हटले जाते. सरदेशमुखीचा हक्क हा स्वराज्यामधूनच वसूल केला जात असे. तेव्हा जमीन महसुलातील एक महत्त्वाचा घटक या दृष्टीने सरदेशमुखी हा उत्पन्नाचा दहावा हिस्सा एक महत्त्वपूर्ण घटक होता. पेशवे कालखंडामध्ये सरदेशमुख हा वतनदार प्रसिध्दीस दिसून येतो.

## ५.११ महसूल आकारण्याची पध्दती -

शिवकाळाप्रमाणेच पेशवे कालखंडामध्येही महसूल आकारण्याची पध्दत अंमलात होती. पेशव्यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या वेगवेगळ्या सूचना आणि उल्लेख यामधून पेशवे कालखंडातील महसूल आकारण्याची पध्दत निदर्शनास येते. महसूलही उत्पन्नाची प्रमुख बाब होती. म्हणून सर्वच पेशव्यांनी शेतीकडे लक्ष दिले. यामध्ये प्रामुख्याने नानासाहेब पेशव्याला प्रदीर्घ अशी २१ वर्षांची कारकीर्द मिळाल्यामुळे शेतीच्या विकासाकडे त्यांनी सतत लक्ष दिले. अधिकाऱ्यांना वारंवार सूचना दिल्या. शेती व्यवसायाला प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर शेती नियोजनामध्ये रयतेला खूष ठेवण्याचे तत्त्व नानासाहेब पेशव्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. महसूलाची निश्चिती करत असताना प्रत्यक्ष पिकाची जागेवर जावून पाहणी करणे आणि मगच सारा आकाणी करणे केवळ आज्ञा न देता किंवा अंदाजाने सारा केव्हाही आकारला नाही. आपल्या अधिकाऱ्यांना नानासाहेब पेशव्यांनी सारा आकारण्याच्या संदर्भामध्ये वेळोवेळी सूचना दिल्याचे दिसून येते. १७४७ मध्ये रेवदंड्याचे मामलेदार बहिरोपंत यांना ज्या सूचना दिल्या, त्याचे अवलोकन केले असता त्यांच्या सूचनेमधून त्यांच्याजवळची दूरदृष्टी दिसून येते. नारळाच्या झाडावर किती सारा घ्यावा, या संदर्भात नानासाहेब पेशव्यांनी १७४८-४९ मध्ये नारो त्रिंबक या राजापूरच्या प्रानत मामलेदाराला दिलेल्या सूचनेवरून स्पष्ट होते. रयतेने शेतीसाठी खरेदी केलेल्या म्हैशी असो, बैल असो यावर पाच वर्षे कोणत्याही प्रकारचा सारा आकारला जाऊ नये, अशी सक्त सूचना त्यांनी दिल्याचे निदर्शनास येते.

१७६० ते १७६१ या कालखंडात नानासाहेब पेशव्यांनी वनी दिंडोराचे मामलेदार लक्ष्मण भिकाजी यांना ज्या सूचना दिल्या, यावरून त्यांची महसूल आकारणी करत असताना रयतेबद्दलची असणारी भावना दिसून येते. खेड्याची पाहणी करून सर्व जमिनीची मोजमापणी करणे, जमिनीच्या प्रतवारीप्रमाणे तिची सरस, मध्यम, कनिष्ठ असे भाग पाडणे, त्याचबरोबर जिराईत व बागाईत, पाटस्थळ, मोटस्थळ असेही भाग केल्याचे दिसून येते. वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत सारा ठरवून दिला जात असे. वनी दिंडोरा येथील नापीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केल्याचे दिसून येते व तशा सूचना तेथील कमावीसदार आणि मामलेदारांना दिलेल्या होत्या.

यामध्ये जर कसूर झाला तर कमावीस तसेच मामलेदार या अधिकाऱ्यांना कामावरून बडतर्फ केले जात असे. तसेच आकारणी करत असताना सर्व व्यवस्थित असताना एखादे वेळेस पावसाने नुकसान झाल्यास किंवा शत्रूने हल्ला करून नुकसान केले असल्यास रयतेला आकारणीमध्ये सूट दिली जावी, असा दंडक असे. वरील सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांना नोकरीवरून दूर केले जात असे. यावरून नानासाहेब पेशवे जमीन महसुलीच्या आकारणी व्यवस्थेकडे किती आपलेपणाने पहात होते, याचे प्रत्यंतर येते. काही मामलेदारांना अशाही सूचना केल्या आहेत की, जर एखाद्या व्यक्तीला सारा भरता आला नाही म्हणून जमीन विकणे किंवा गहाण टाकण्याची जर त्याच्यावर आपत्ती आली तर त्याला ५ ते ७ वर्षे साऱ्यामध्ये सूट दिली जात असे आणि संकटकाळातून त्याला वाचवले जात असे.

या वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, नानासाहेब पेशवे यांचे जमीन महसूल आकारणीचे तत्त्व एक आदर्श तत्त्व म्हणून मानले गेले. हाच आदर्श पुढील काळातील पेशवे यामध्ये त्यांचा मुलगा माधवराव पेशवे, त्यांचा नातू सवाई माधवराव यांनी घेतल्याचे दिसून येते. १७७४-१७७५ या कालखंडामध्ये सवाई माधवरावांनी गुजरात प्रांतातील अधिकाऱ्यांना खालील सूचना दिल्याचे स्पष्ट होते.

१) पडीक जमीन जास्तीत जास्त लागवडीखाली आणणे. जी माणसे किंवा शेतकरी जमीन लागवडीखाली आणतील, त्यांना पेरणीच्या हंगामामध्ये तगाई मंजूर करण्यात आली.

२) संबंधित परगण्यामध्ये जमीनदार अरेरावीने वागत असतील तर त्यांना शासन करणे. जमीनदाराने जादा रक्कम वसूल केल्यास त्याचा अहवाल सरकारला ताबडतोब पाठवावा लागे.

३) एखाद्या परगाण्यामध्ये ज्या लोकांनी जमीन विकल्या असतील किंवा गहाण ठेवल्या असतील त्यांना परत कराव्यात.

अशा प्रकारे सवाई माधवरावांनी नानासाहेब पेशव्यांचे शेतीविषयक धोरणाचा वारसा पुढे चालवल्याचे स्पष्ट होते.

नानासाहेब पेशवे यांनी कमावीसदारांना सारा आकारणीविषयी दिलेल्या सूचना खालीलप्रमाणे -

१) जमीनदारांनी रयतेकडून अतिरिक्त सारा वसूल करू नये.

२) एखाद्या जमीनदाराने अरेरावी करून जर जादा सारा वसूल केला, त्याची सूचना सरसुभ्याच्या अधिकाऱ्याला कमावीसदाराने ताबडतोब करावी.

३) जमिनी गहाण टाकणे, विकणे हे प्रकार बंद केले.

४) जिराईत जमिनीची पाहणी करून गेलेल्या अधिकाऱ्यांना किती रक्कम द्यावी, यासंबंधीचा तपशील देण्यात येत असे.

५) १७४२ मध्ये नागोठाण्याच्या पाहणीसाठी गेलेल्या राघो बल्लाळ अमीन या अधिकाऱ्याला रुपये आठ व  हरी बाळाजी कारकून याला रुपये आठ असे एकूण १६ रुपये अधिकाऱ्यांना देण्याचे मान्य करण्यात आले. त्याचबरोबर दोन शिपाई, एक मोजणी कारकून यांनाही पैसे द्यावे लागत असे. अशा प्रकारच्या सूचना मावळ या प्रांतातीलही पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्याला दिल्याचा उल्लेख सापडतो.

## ५.१२ जमीन प्रतवारी धोरण (वर्गवारी) -

पेशवे कालखंडामध्ये शिवकाळा प्रमाणेच जमिनीची प्रत्यक्ष पाहणी करून वर्गवारी केली जात असे. प्रामुख्याने सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन भाग होते. काळी जमीन, डोंगराळ जमीन, बागाईत जमीन, जिराईत जमीन आणि पाटस्थळ व मोटस्थळ जमीन असे प्रकार होते. महसूल हा रोख रकमेच्या स्वरूपात किंवा धान्याच्या स्वरूपामध्ये घेतला जात असे.

## जमिनीच्या प्रकारावरून सारा आकारण्याची पध्दत

| जमीनीचा प्रकार | मण | प्रत्येक बिघ्याला (पायली) |
| --- | --- | --- |
| सरस | ३। | १ पायली |
| मध्यम | २।। | २ पायली |
| कनिष्ठ | १।।। | १ पायली |

त्याचप्रमाणे जिराईती व बागायती जमीनीची आकारणी पुढीलप्रमाणे दिसून येते.

| काळी जमीन | प्रत्येक बिघ्याला दर रूपये आ. पैसे | डोंगराळ जमीन | प्रत्येक बिघ्याला दर रूपये आ. पैसे |
| --- | --- | --- | --- |
| १ वर्षे | ० ४ ० | १ वर्षे | ० २ ० |
| २ वर्षे | ० ८ ० | २ वर्षे | ० ४ ० |
| ३ वर्षे | १ ० ० | ३ वर्षे | ० ८ ० |
| ४ वर्ष | १ ८ ० | ४ वर्षे | ० १२ ० |
| ५ वर्ष | २ ० ० | ५ वर्षे | १ ० ० |

वरील तक्त्यावरून लागवडीखालील आणावयाच्या जिराईती जमीनीचा सारा दिलेल्या तक्त्यानुसार आकारणी करावी. प्रत्येक बिघ्याला रू. २ सारा घ्यावा. डोंगराळ भागामध्ये प्रत्येक बिघ्याला रूपये १ सारा घ्यावा.

बागाईत जमीन - बागाईत जमीनीच्या व्यवस्थेचा विचार करीत असताना त्यामध्ये पाटस्थळ व मोटस्थळ असे दोन भाग केले आहेत.

पाटस्थळ बागाईत जमीनीचे दर खालीलप्रमाणे-

| | |
| --- | --- |
| १ वर्षे | रू. ५ प्रत्येक बिघ्याला |
| २ वर्षे | रू. ६ प्रत्येक बिघ्याला |
| ३ वर्षे | रू. ७ प्रत्येक बिघ्याला |
| ४ वर्षे | रू. ८ प्रत्येक बिघ्याला |
| ५ वर्षे | रू. १० प्रत्येक बिघ्याला |

मोटस्थळ बागाईत जमीनीचे दर खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| १ वर्षे | रू. १ प्रत्येक बिघ्याला |
| २ वर्षे | रू. २ प्रत्येक बिघ्याला |
| ३ वर्षे | रू. ३ प्रत्येक बिघ्याला |
| ४ वर्षे | रू. ४ प्रत्येक बिघ्याला |
| ५ वर्षे | रू. ५ प्रत्येक बिघ्याला |

अशा रितीने नानासाहेब पेशव्यांनी जमीनीची वर्गवारी करीत असताना स्थळ व कालक्रमानुसार जमीनीवर सारा निश्चित केला. सारा वसूल करीत असताना कोणत्याही प्रकारची सक्ती होणार नाही किंवा शेतकरी दुखावला जाणार नाही. याची दक्षता घेतल्याचे दिसून येते. १७४० ते १७४१ मध्ये बाळाजची बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांनी हवेलीच्या अधिकाऱ्याला जमीनीच्या वर्गवारीसंबंधात व महसूल आकारणीसंदर्भात खाली मार्गदर्शक सूचना केल्याचे निदर्शनास येते.

वरील सारा आकारणी पध्दतीसंदर्भात वर्गवारी दिसून येते. १९४०-४१ मध्ये बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबांनी हवेलीच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात महत्त्वपूर्ण सूचना केल्याचे निदर्शनास येते.

१) भाताच्या जमिनीला प्रत्येक बिघ्याला १० मण सारा घेणे.

२) ऊस जमिनीला प्रत्येक बिघ्याला ५ रु. सारा

३) भाजीपाला पिकवणाऱ्या जमिनीवर प्रत्येक बिघ्याला दोन रु. सारा

४) उन्हाळी पिकाच्या बिघ्याला १।। रु. सारा

याशिवाय बागाईत, जिराईत जमिनीचे दर ठरवून दिलेले होते. एवढेच नव्हे तर नानासाहेब पेशव्यांनी आंब्याच्या झाडाकडे सुध्दा लक्ष दिलेले दिसून येते. बागाईत जमिनीमध्ये असणारी आंब्याची झाडे यावर स्वतंत्र सारा बसवू नये. मात्र पाटील किंवा इतर खाजगी लोकांच्याकडे जी आंब्याची झाडे असतील त्यावर आंबे लागल्यापासून एक हजार आंब्यावर रु. एक सारा बसवावा. सरकारी आंब्याची झाडे, त्यांना कुंपण घालावे. वरील पेशव्यांच्या दक्ष सूचनेमुळे तत्कालीन सारा आकारण्याची पध्दत एक नि:पक्षपाती पध्दत होती, हे स्पष्ट होते. १९४५-४६ मध्ये नानासाहेब पेशव्यांना मावळ प्रांतातून रोख रकमेच्या संदर्भात होणारी वसुली ही अपेक्षित होती. हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| | | |
|---|---|---|
| तांदूळ | प्रत्येक खंडीस | ३० रुपये |
| नागली | प्रत्येक खंडीस | ३५ रुपये |
| वरी | प्रत्येक खंडीस | ३० रुपये |
| ज्वारी/बाजरी | प्रत्येक खंडीस | ७० रुपये |

## ५.१३ नारळ आणि इतर झाडे संदर्भातील साऱ्याबाबतचे धोरण

पेशव्यांनी कोकण भागाकडे विशेष लक्ष दिले आणि समुद्र किनाऱ्याला नारळाची झाडे लावण्यास प्रोत्साहन दिले. कारण अर्थव्यवस्था मजबूत करणे आवश्यक होते. डॉ. सेन यांच्यामते नारळाची लागवड ही पेशव्यांना अतिशय फायदेशीर होती. यामुळे पेशवे सरकारमध्ये उत्पन्नामध्ये निश्चित भर पडली जात असे. भंडारी लोक माडापासून दारू गाळण्याचे काम करीत. नारळाची झाडे लावल्यानंतर १८ ते २० वर्षे कोणताही सारा घेऊ नये. सुपारीच्या झाडासंदर्भात १५ वर्षे सारा घेऊ नये व इतर झाडासंबंधात १२ वर्षापर्यंत सारा घेऊ नये. भंडारी लोकांच्याकडून ज्यांनी ताड-माड लावले असतील, त्यांच्याकडून प्रत्येक एक सारा घ्यावा. नानासाहेब पेशव्यांनी कोकण भागातील सुवर्णदुर्ग तालुक्यामधील शेतकऱ्यांना या संदर्भातील आशयाचे कौलनामे दिल्याचे दिसून येते.

१) भाताच्या जमीनीला व शेतीला प्रत्येक बिघ्याला (एकराला) १० मण सारा घ्यावा. या साऱ्यामध्ये हक्कदारांचे कोणतेही वसूल असू नयेत.

२) ऊसाच्या शेती व जमीनीला प्रत्येक बिघ्याला ५ रू. सारा घ्यावा.

३) भाजीपाला पिकवणाऱ्या शेतीजमीनीला प्रत्येक बिघ्याला २ रू सारा घ्यावा.

४) उन्हाळी शेतीपिकाच्या जमीनीला प्रत्येक बिघ्याला रू. १।। सारा घ्यावा. एवढेच नव्हेतर नानासाहेब पेशव्यांनी आंब्यांच्या झाडाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिलेले दिसून येते. बागाईत जमीनीवरील आंब्यांच्या झाडावर स्वतंत्र सारा बसवू नये. मात्र पाटील किंवा इतर खाजगी व्यक्तींकडे आंब्यांची झाडे असतील तर आंबे लागल्यापासून १००० आंब्यांवर रू. १ सारा घ्यावा. सरकारी आंब्याची झाडे त्याचें रक्षण करावे अशाप्रकारे नानासाहेब पेशव्यांनी प्रत्येक पिकांला वेगवेगळा महसूल आकारल्याचे निदर्शनास येते.

| जमिनीचा प्रकार | प्रत्येक बिग्यास रू. आ. पै. |
|---|---|
| सरस | ५ ० ० |
| मध्यम | ४ ० ० |
| कनिष्ठ | ३ ० ० |
| रब्बी | १ ८ ० |
| वरकस | १ ८ ० |
| ताग | ५ ० ० |
| ऊस | ५ ० ० |
| ताड | प्रत्येक झाडाला ० ४ ० |
| नारळ | प्रत्येक झाडाला ० ८ ० |

अशा रितीने प्रत्येक पिकाला वेगवेगळा महसूल आकारला जात असे. प्रत्येक भागानुसारही महसूल आकारण्याची पध्दत होती. काठापूर तालुक्यातील मावळ भागामध्ये इतर भागातील दरापेक्षा वेगवेगळे दर दिसून येतात ते पुढीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| भात/तांदूळ लहान-मोठे | दरमणी | १। रू. |
| वरी | दरमणी | १। रू. |
| ज्वारी | दरखंडी | ३५ रू. |
| गहू | दरखंडी | ४० रू. |
| हरभरे | दरखंडी | ४० रु. |
| तीळ | १ रुपयास | ४ पायली |
| तूप | १ रुपयास | ४ शेर |

यावरून असे दिसून येते की वेगवेगळ्या भागामध्ये वेगवेगळ्या पिकांवर वेगवगेळे दर आकारल्याचे निदर्शनास येते. नानासाहेब पेशव्यांनी १७४५ ते १७४६ याकाळामध्ये मावळ प्रांतातून रोख रक्कमेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे अपेक्षा व्यक्त केल्याचे निदर्शनास येते.

| | | |
|---|---|---|
| तांदूळ | प्रत्येक खंडीस | ३० रू. |
| वरी | प्रत्येक खंडीस | ३० रू. |
| तीळ | प्रत्येक खंडीस | ७० रू. |
| ज्वारी/बाजरी | प्रत्येक खंडीस | ४५ रू. |
| गहू | प्रत्येक खंडीस | ७० रू. |
| तूप | एक रुपयास | २ शेर |

वरील ही महसूल व्यवस्था मावळप्रांतातील वेगवेगळ्या भागातील वेगवेगळ्या पिकांवर आकारण्यात येणाऱ्या महसूल व्यवस्थेमधील पिक उत्पादनाशी निगडीत आहे.

## ५.१४ नानासाहेब पेशव्यांचे पडीक जमिनीबाबत धोरण-

पेशव्यांनी पडीक जमिनीबद्दल स्वतंत्र धोरण आखले. कारण पडीक जमिनी लोकाभिमुख बनविणे आवश्यक होते. बाजीराव पेशव्यांपासून सवाई माधवरावपर्यंत जवळ जवळ सर्वच पेशव्यांनी पडीक जमिनीबाबत स्वतंत्र धोरण आखून जमिनी लागवडीसाठी प्रोत्साहन दिले. कोकणामधील अंजनवेल, सुवर्णदुर्ग या भागात पडीक जमिनी लागवडीखाली आणता येत नसत. तरीही तेथील शेतकऱ्यांना खास सवलती देऊन शेतकऱ्यांसाठी प्रदेश डोंगर फोडून चांगली जमीन केली जात असे. प्रोत्साहन दिले जात असे. जी व्यक्ती डोंगर फोडून जमीन तयार करील, त्या व्यक्तीला निम्मी जमीन दिली जात असे. एवढेच नव्हे तर २० वर्षे त्या व्यक्तीकडून सारा आकारला जात नाही. ज्या जमिनी समुद्रकिनाऱ्याला पाणीखाली जात तेव्हा बांध घालणाऱ्या व्यक्तीला इनाम दिले जात असे. गुहागर येथील नारो अनंत परचुरे याने रयतेच्या अडचणी पेशव्यांसमोर मांडल्या. तेव्हा पेशव्याने त्याच्या विनंतीला मान देऊन पहिली २० वर्षे सारा आकारला जाणार नाही, या संदर्भात आश्वासन दिले. पड जमिनी लागवडीखाली आणणाऱ्यांना विशेष साऱ्यात सूट दिली जात असे. दुष्काळ किंवा शत्रूने रोगराईमुळे पीकच झाले नसेल तर ही सूट दिली जात असे. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये सन १७४५-१७४६ मध्ये कानू नावाचे गाव आगीमध्ये जळले. तर संपूर्ण गावाचा सारा माफ केला. बावडा परगाण्यामधील रामचंद्र बल्लाळ या अधिकाऱ्याला १७४७-४८ मध्ये दुष्काळामुळे हलाखीची परिस्थिती निर्माण झाल्याचे समजताच पेशव्यांनी चार वर्षे सारा माफ केला. नानासाहेब पेशव्यांनी १७५०-

१७५१ मध्ये पाचोरा येथील गावकऱ्यांनी पीक न आल्याबद्दल विनंती अर्ज केला. तेव्हा नानासाहेबांनी या गावाला १३१३ रुपयांची सूट दिली. व बाकी रकमेचे हप्त्यात सवलत दिली. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी पड जमिनीबद्दलचे धोरण तसेच सारा सूट देण्यासंबंधीचे धोरण लोककल्याणकारी व लोकाभिमुख बनविण्याचे प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## ५.१५ तगाईची पध्दती व लिलावाची पध्दतीचे धोरण-

डॉ. सेन यांनी तगाईसंदर्भातील उपयोग स्पष्ट केले आहेत. तगाईचा फायदा शेतकऱ्याला होतो. दुष्काळ व टंचाईच्या काळात शेतकऱ्याला पैसा उपलब्ध करून देणे आणि सावकारी जोखडातून शेतकऱ्याची मुक्तता करणे, या संदर्भात तगाई हा रयतेचा पैशाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात नानासाहेब पेशवे काळामध्ये सोडविला गेला. तगाई म्हणजे सरकारी कर्ज होय. या कर्जाची वसुली करत असताना रयतेवर जुलूम, जबरदस्ती होणार नाही याची दक्षता घेतली जात असे. गरजू व्यक्तींना बिनव्याजीही तगाई दिली जात असे. नानासाहेबांनी १७५० ते १७५१ या कालखंडामध्ये पातोडे परगण्यामधील एका व्यक्तीला १५०० रुपये तगाईच्या रूपात देण्याची आज्ञा तेथील अधिकाऱ्याला केल्याचा उल्लेख पेशवे दप्तरातील दुसऱ्या खंडात दिसून येते. ही रक्कम दोन वर्षात परत करावी, अशीही सूचना राजापूर प्रांतातील रयतेलाही ७५ टक्के दराने तगाई मंजूर केल्याचे पत्र मिळते. या ७५ टक्क्याचा दर नानासाहेबांनी २५ टक्के इतका कमी करून रयतेला त्रास होणार नाही, एवढेच नव्हे तर काही वेळा धान्याच्या स्वरूपात तगाई देण्याची पध्दतही दिसून येते. १७४३ मध्ये नानासाहेबांनी इब्राहीम नाडकर या व्यक्तीला पिकाचे नुकसान झाले म्हणून त्याच्याकडून तगाई वसूल करू नये, अशी सूचना तेथील अधिकाऱ्यांना केल्याचे पत्र पेशवे दप्तरातील तिसऱ्या खंडात आज उपलब्ध आहे. तगाईची रक्कम ही कमावीसदार किंवा मामलेदार यांनी आपल्या महसुलामधून द्यावी, असा नियम आहे. काही कारणाने या अधिकाऱ्यांनी जर जबाबदारी उचलली नसेल तर पेशवे सरकार खर्चातून तगाई देत असे. अशा प्रकारे तगाई ही सरकारने दिलेले रयत शेतकऱ्यांना दिलेले मोठे अभिवचन होते, असे म्हटले तर वावगे ठरू नये. तीन ते सात वर्षासाठी तगाईची मुदत असे. न्या. रानडेंनी **'द राईज ऑफ मराठा पॉवर'** या ग्रंथामध्ये नानासाहेब पेशव्यांच्या महसूल पध्दतीची प्रशंसा केलेली दिसून येते. बाळाजी बाजीराव यांनी महसूल पध्दतीची उत्तम काळजी

घेतल्याचे नमूद केले आहे. उत्पन्नाची जुनी साधणे टिकवून धरली., नवीन निर्माण केली. महसुलाच्या बाबतीत रयत शेतकऱ्यावर पेशव्यांनी कधीच अन्याय केला नाही. मात्र आपला हक्कही त्याने गमावलेला दिसत नाही.

पेशवे काळातील लिलाव पध्दती ही जमीन महसुलाची महत्त्वपूर्ण पध्दत होती. या पध्दतीत नानासाहेब पेशव्यानंतर ज्यादा पैसे मिळविण्यासाठी दुसऱ्या बाजीरावाने ही पध्दत सुरू केली. या संदर्भात इंग्रज सेनापती एल्फीस्टन याने आपल्या Report on the Territories Conquered from the Peshwa' या अहवालामध्ये या वरील पध्दतीची समग्र माहिती स्पष्ट केली आहे.

## ५.१६ जमिनी दान देण्याच्या संदर्भातील धोरण-

शेतीच्या संदर्भात येणारे प्रश्न महत्त्वाचे असतात. त्यामध्ये जमिनीचा वापर कसा होतो, जमिनीचे मालक कोण वगैरे. जमीन कोणत्या व्यक्तीने किंवा संस्थेने धारण केली हे आपल्याला समजणे आवश्यक असते. त्यासाठी जमीन धारणेच्या प्रकाराची पध्दती, राजकीय, सामाजिक आणि धार्मिक महत्त्व समजते. जमीन धारणेच्या संदर्भात प्रो. इरफान हबीब, डॉ. अ. स. आळतेकर यांनी विचार मांडलेले दिसून येतात. शिवकालीन जमीन दान देण्याचे धोरण पेशवे काळातही पुढे चालूच ठेवल्याचे दिसून येते. नानासाहेब पेशव्यांच्या काळातही ही जमीन दान करण्याची उदारता दिसून येते. पुणे व परिसरात अनेक संस्थांना त्यांनी जमिनी दिल्याचे दिसून येते. सातारा व वाई येथील परिसरामध्येही आज जे घाट, बगीचे नदीकाठी असणारे मंदिरे व धार्मिक स्थळे यांना जमिनी दान दिल्याचे स्पष्ट होते. जमीन दान देण्याबाबतचा नानासाहेब पेशवे यांचा वारसा त्यांचा मुलगा माधवराव पेशवे यांनी पुढे सुरू ठेवल्याचेही स्पष्ट होते.

## ५.१७ आर्थिक धोरणांचे महत्त्व आणि गरज -

पेशव्यांच्या मालिकेमधील बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कार्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या आर्थिक, सास्कृतिक, सामाजिक, धार्मिक अशा सर्व क्षेत्रामध्ये नानासाहेब पेशव्यांच्या आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविलेला दिसून येतो. पुणे या शहराला त्यांनी आर्थिक राजधानीचे मुख्य केंद्र बनविले. या दृष्टीकोनातून नानासाहेबांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. नानासाहेबांच्या कालखंडाचे दोन भाग पडतात.

(१) १७४० ते १७४८ (२) १७४९ ते १७६१

या दोन्ही कालखंडातील त्यांचे कार्य पहाणे आवश्यक ठरते. पहिल्या कालखंडातील कार्य खालीलप्रमाणे -

१) पेशवा बनताच त्यांच्यासमोर खालील समस्या दिसून येतात.

अ) इराणचा प्रमुख नादिरशहाने लुटलेल्या दिल्लीची व्यवस्था लावणे

ब) छ. शाहूची आर्थिक घडी बसविणे.

क) छ. शाहूनंतर छत्रपती पदाचा वारस शोधणे

ड) स्वकिय शत्रू व निजाम या शत्रूचा बंदोबस्त करणे.

इ) माळवा सनद मिळविणे व कर्नाटकामधून चौथाई सरदेशमुखी गोळा करणे इत्यादी त्यांच्यासमोर महत्त्वाच्या समस्या होत्या. या समस्या त्यांनी प्रामाणिकपणे सोडविलेल्या दिसून येतात.

नानासाहेब पेशवे यांची दुसऱ्या कालखंडातील कार्य तितकेच महत्त्वाचे मानले जाते. या कालखंडात त्यांनी खालील समस्या सोडविलेल्या दिसून येतात.

१) छ. शाहूनंतर छत्रपती पदाचा वारस शोधून रामराजा यास छत्रपती बनविले.

२) दिल्लीची (उत्तरेची) घडी बसविण्यासाठी आपला लहान बंधू रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा यांच्याकडे उत्तरेची नेतृत्व देऊन त्यांच्या मदतीला शिंदे, होळकर हे मातब्बर सरदार दिले.

३) कर्नाटकमधून त्यांनी खंडण्या गोळ्या केल्या.

४) सातारा ऐवजी सर्व प्रथम त्यांनी पुणे येथे राजधानी स्थापन केली.

५) स्वकिय शत्रू रघुजी भोसले आणि कान्होजी आंग्रे यांचा बंदोबस्त केला.

६) आर्थिकदृष्टीने पेशवेपदाचे महत्त्व वाढविले.

अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी आपल्या २१ वर्षाच्या कालखंडामध्ये कौशल्याने अनेक संकटे, समस्यावर मात केली. त्यांच्या काळातील शेवटची दुःखद घटना म्हणजे पानिपतची तिसरी लढाई होय. या लढाईत मराठ्यांचा दारुण पराभव झाला. या पराभवास सर्वच इतिहासकारांनी नानासाहेब पेशव्यास जबाबदार धरल्याचे दिसून येते. हे जरी खरी असले तरी नानासाहेब पेशव्यांनी केलेल्या प्रशासकीय, आर्थिक धोरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पडत्या काळात राज्याचा आर्थिक डोलारा भक्कम करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. आपल्या २१ वर्षाच्या काळात त्यांनी

अवघ्या २१ वर्षाच्या काळात त्यांनी राजकीय कार्याबरोबरच अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने असणाऱ्या शेती व जमीन महसूल व्यवस्था त्याचप्रमाणे शेतसारा आकारण्याचे धोरण तगाई पाटबंधारे व चौथाई, सरदेशमुखी, मोकासा आणि साहोत्रा या अर्थव्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या धोरणांना प्राधान्य दिले आणि आर्थिकदृष्ट्या मराठा राज्य सक्षम बनवले.

## ५.१८ नानासाहेब पेशवा- आर्थिक धोरणाचा पुरस्कर्ता

नानासाहेब पेशवे हे उत्तम प्रशासक म्हणून सर्व पेशव्यांमध्ये प्रसिध्द होते. त्यांचे वडील बाजीराव पहिला हा लढवैय्या होता, तलवारबहाद्दर होता. १७२० ते १७४० या २० वर्षाच्या काळात त्यांनी उत्तर भारतामध्ये मराठी सत्तेचा मोठा विस्तार केलेला दिसून येतो. माळवा, बुंदेलखंड, गुजरात, दुआबचा प्रदेश व दिल्लीपर्यंत सर्व प्रांतावर त्यांनी चौथाई, सरदेशमुखी लादलेली दिसून येते. नर्मदा नदीच्या उत्तरेकडे मराठी राज्याचा विस्तार करणारा हा सर्वात मोठा पेशवा मानावा लागेल. लष्करी बाणा हा त्यांचा पिंड होता. असे हे बाजीराव पहिले फक्त लढाया.... लढाया करीत गेले. जिंकलेला प्रदेश, मुलूख त्यांची व्यवस्था त्यांच्या हातून घडली नाही. इ. स. १७४० मध्ये रावेरखेड येथे नर्मदा नदीकाठी त्यांचा मृत्यू झाला. सततच्या युध्दामध्ये बाजीराव पेशव्यांना मोठे कर्ज झाले. अनेक सावकारांच्याकडून बाजीराव पेशव्यांनी कर्जे घेतलेली दिसून येतात. उदा. बाबुजी नाईक बारामतीकर. याचबरोबर छत्रपती छ. शाहूंनाही मोठे कर्ज झाले होते. या सर्व कर्जाचा निपटारा करणे एक मोठे आव्हान नानासाहेब पेशव्यांसमोर होते. शिंदे, होळकर, पवार, गायकवाड या घराण्यांची स्थापना वडील बाजीराव पेशव्यांनी उत्तर हिंदुस्थानात केली होती व मराठ्यांचे उत्तरेत मोठे वर्चस्व निर्माण केले होते. मराठे किंगमेकर आहेत, ही जाणीव शत्रूंच्या मनात बाजीराव पेशव्यांनी निर्माण केली होती. हीच वडीलांनी निर्माण केलेली प्रतिष्ठा राखण्यासाठी नानासाहेब पेशवे यांनी मराठी राज्याची सूत्रे हाती येताच १७४० ते १७६१ अशा २१ वर्षाच्या काळामध्ये त्यांनी प्रामाणिकपणे राबविली. नानासाहेब हे वडिलांच्या तोडीचे लढवय्या नसले तरी त्यांच्याजवळ त्यांचे आजोबा बाळाजी विश्वनाथ यांच्यासारखे ते मुत्सद्दी, राजकारणी दिसून येते. आपल्या सुरुवातीच्या काळातच १७४८ काळातच त्यांनी स्वतः जावून परिस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित केले. १७४८ नंतर मात्र नानासाहेब उत्तर भारताकडे जावू शकले नाहीत. कारण

त्यांच्यासमोर या वरील सर्व प्रश्नांपेक्षा आर्थिक आव्हान मोठे होते. सुरुवातीसच त्यांनी बादशहाकडून माळव्याची लेखी स्वरूपात सनद मिळविली. नानासाहेब पेशव्यांना या सर्व कामामध्ये चुलते चिमाजीआप्पा यांचे महत्त्वाचे मार्गदर्शन मिळालेले दिसून येते. नानासाहेबांचा स्वभावाकडे लढायापेक्षा एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांनी राज्याची आर्थिक घडी बसविली. मराठा साम्राज्याला अच्युतम शिखरावर पोहोचविले. दक्षिण भारतामध्ये निजामाचा पराभव करून उदगीर तहानव्ये (३ फेब्रुवारी १७६१) ८२ लक्ष मुलूख मिळविला. कर्नाटकामध्ये आपल्या मराठी सत्तेचा दरारा निर्माण केला. एवढेच नव्हे तर उत्तर भारतामध्ये तर त्यांनी किंगमेकर म्हणून भूमिका पार पाडली. मुघल सम्राटाशी चौथाईचा तह करून दिल्लीच्या तख्ताची जबाबदारी मराठ्यांनी उचलली. दक्षिण भारत, उत्तर हिंद दोन्ही बाजूला नियंत्रण प्रस्थापित केले. उत्पन्नाच्या एकूण ६६ टक्के महसूल ते छत्रपतींना पाठवू लागले तर ३४ टक्के महसूल पेशवे व सरदारांना मिळत असे.

बाळाजी विश्वनाथची कारकीर्द ही आणिबाणीचा प्रसंग व छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यात गेले. केवळ ७ वर्षाची कारकीर्द १७१३ ते १७२०. या काळात त्यांनी छ. शाहूंना प्रामाणिक मदत केलेली दिसून येते. १७२० ला सासवड येथे मृत्यू झाला. त्यांचा मुलगा बाजीराव पहिला यांचे सारे आयुष्य जवळजवळ २० वर्षे लढाया करण्यात गेली. या दोघांनाही राज्याची आर्थिक घडी नीट बसविता आलेली दिसून येत नाही. याचे अवलोकन करता असे दिसून येते की नानासाहेबांनी मात्र या दीर्घ २१ वर्षाच्या काळात उत्तम प्रशासक राजकारणी धुरंधर या दृष्टीने राज्याची ध्येयधोरणे राबविली. राज्यात कटाक्षाने लक्ष देऊन आर्थिक डोलारा व्यवस्थित बसविण्यात आला.

डॉ. दिघे म्हणतात- बाजीराव पेशव्याला रचनात्मक प्रतिभेचा शिवरायांच्या बरोबरीने मानणे चुकीचे होईल. कारण बाजीरावने सर्वसामान्य लोकांचा फायदा होईल, अशा राजकीय संस्था निर्माण केल्या नाहीत. प्रशासन किंवा लोककल्याणकडे सहानुभूतीने पाहिले नाही. या दृष्टीने विचार करता नानासाहेब पेशव्यांनी मात्र लोककल्याण हेच प्रशासनाचे प्रमुख सूत्र मानले. नानासाहेब राजनीतिमध्ये प्रवीण होते. राज्याच्या खजिन्यात त्यांनी भर घातली. शेती, महसूल, व्यापार, अंतर्गत परराष्ट्रीय व्यापारी धोरणे, सरदारांच्या वतनदारांच्या संबंधातील त्यांचे धोरण विचार

करावयास लावते. या संदर्भातील नानासाहेबांची आर्थिक दृष्टी महत्त्वाची होती. त्यांचे सैन्य मोठे होते. आधुनिक फलटणी तयार केल्या होत्या. सैन्याची पुनर्रचना तयार केली होती. १८ व्या शतकामधील नानासाहेब पेशवा हा राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टीने महत्त्वाचा ठरला. पार ढवळून निघालेल्या पेशवाईच्या अर्थव्यवस्थेला नानासाहेब पेशव्यांनी आकार दिला. त्यांचा लष्करी बाणा जरी वडिलांसारखा नसला तरी अचाट मुत्सद्देगिरी त्यांच्याजवळ दिसून येते. सध्याचा काळ पाहिला तर नानासाहेबांचे आर्थिक धोरण मार्गदर्शक होते, असे म्हणावे लागेल. कारण तत्कालीन शेती, महसूल, प्रशासन, युध्द, लष्करखर्च किंवा खर्चाच्या बाबी काय होत्या, हे तपासणे आवश्यक बनले आहे. एवढा मोठा राज्याचा विस्तार केला, राज्यात आर्थिक शिस्त बसविली, दैनंदिन खर्च, काटकसर करून कर्जाला मर्यादा घातली. यावरून त्यांचे आर्थिक दृष्टेपण दिसून येते. म्हणून त्यांना आर्थिक धोरणांचा पेशवा असेच म्हणावे लागेल.

नानासाहेबांनी मिळालेल्या अधिकाराचा कधीच दुरुपयोग केला नाही. आपल्या कर्तव्याशी ते प्रामाणिक राहिले. छत्रपती छ. शाहूंचे संपूर्ण कर्ज त्यांनी फेडले. छत्रपती छ. शाहूने नानासाहेबांवर केलेल्या प्रेमाचे ऋण नानासाहेबांनी प्रेमाबरोबर पैशाने फेडले, बाजीराव पेशव्यांचे २८ सावकार १४ लाख एकूण कर्ज सव्याज नानासाहेब पेशव्यांनी फेडले. यावरून त्यांनी पुत्रधर्म सार्थ केला, असे म्हणणे योग्य ठरेल.

वडील बाजीराव पेशवे यांनी सततच्या युध्दासाठी घेतलेले सावकारांचे कर्जसुध्दा नानासाहेब पेशव्यांनी परतफेड केली. पुण्याचा आर्थिक विकास केला. शेती, महसूल, लष्कर व औद्योगिक, सांस्कृतिक नियोजित व मूलभूत नगररचना यादृष्टीने त्यांनी पुण्याचे (इन्फ्रास्ट्रक्चर) जडणघडण केली. पुणे खेड्याचे शहरीकरण केले. पेठा, बागा वसविल्या. प्लेग्राऊंड, स्वच्छतागृहे, मोठे रस्ते तसेच प्रशासकीय इमारती या दृष्टीने पुणे शहराची योजनाबध्द रचना केली. आज पुणे हे विद्येचे माहेरघर मानले जाते. त्याची खरी सुरुवात नानासाहेब पेशव्यांनी केली असे म्हटले तर वावगे ठरू नये. पुण्याला शैक्षणिक उत्तेजन दिले. मल्लविद्येला प्रोत्साहन दिले. शनिवारवाड्याचे सुशोभिकरण केले. पुणे शहराला पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून दिली. मुळा, मुठा या नद्यातून कात्रज परिसरातील घाटातून शनिवारवाड्यात पिण्यायोग्य पाणी

आणले. पुणे शहरात पोलीस चौकी, दरोगा, वकिलातीची स्थापना करून गुंड-पुंड दरोडेखोरांपासून पुणे शहराचे व शहरातील लोकांचे, व्यापाऱ्यांचे रक्षण केले. दारूबंदीला आळा घातला. निजामहैदर इंग्रज दिल्ली इत्यादींच्या वकिलांसाठी पुणे या ठिकाणी वकिलाती स्थापन केल्या. दिल्ली येथे पेशव्यांचे वकील महादेवभट हिंगणे होते. महसूल आकारणी, वसुलीबाबत निःपक्षपातीपणा ठेवला. महसूल तपासणीचे धोरण आखले. म्हणजेच महसुलामध्ये तपासणीपध्दती त्यांनीच सुरू केली. पुण्यामध्ये शांती, सुव्यवस्था निर्माण केली. आजपर्यंत नानासाहेबांच्या लढाया व इतर त्यांचे धोरण किंवा पानीपतच्या पराभवाबाबत त्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर या सर्वांचे खापर फोडलेले दिसून येते. परंतु याचबरोबर त्यांनी पुण्याला व आपल्या मराठी राज्याला दिलेले आर्थिक दृष्टीने योगदान विसरता येणार नाही. पुणे शहराला त्यांनी सुसंस्कृतपणा आणला. अवघाची वेळ शिपाईगिरीत घालविला नाही तर राज्यकारभार, प्रशासन यात ते तरबेज मग्न राहिले. म्हणून नानासाहेब पेशव्याला 'ग्रेटनेस पेशवा' महान आर्थिक धोरणाचा पेशवा असे म्हटले जाते. त्यांच्या काळातील अत्यंत दुर्दैवी घटना म्हणून पानिपतच्या लढाईकडे पाहिले जाते. या एका घटनेने मराठी सत्ता कोलमडली. त्यामुळेच नानासाहेब पेशव्यांची दोष (बदनामी करणेचा) देणेचा जो प्रकार होतो आहे तो चुकीचा आहे. कारण उत्तरेच्या राजकारणाची संपूर्ण जबाबदारी नानासाहेबांनी आपला लहान भाऊ रघुनाथराव दादांकडे दिली होती. शिंदे, होळकर मदतीला होते. त्यांच्यावर त्यांनी पूर्ण विश्वास टाकला. एकाधिकारशाहीचा वापर न करता आपल्या अधिकाराची विभागणी करून एक लोकशाही तत्त्व हे मूल्य जपण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नानासाहेबांना उत्तरेचे राजकारण मॅनेज करता आले नाही असे म्हणावे लागते. रघुनाथराव दादांनी केलेल्या सर्व चुकांचे खापर अप्रत्यक्ष-प्रत्यक्षपणे नानासाहेब पेशव्यांवर फोडले जाते. एकच गोष्ट सांगितले जाते ते म्हणजे नानासाहेब पेशवे उत्तरेकडे हजर झाले नाहीत. मात्र जेव्हा त्यांना पानिपतच्या घटनांची माहिती समजली जाते तेव्हा ते २० हजार फौजेनिशी मदत करण्यासाठी जात असतात. याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. नानासाहेबांनी दक्षिणेकडील राजकारणात घेतलेला भाग हैदर निजाम व इतर नबाबांच्या बाबतीतील त्यांनी राबविलेले धोरण व मराठी राज्याची केलेली आर्थिक भरभराट पुण्यात निर्माण केलेली शांतता सुव्यवस्था यादृष्टीने पुण्याच्या पर्यायाने देशाचा आर्थिक पाया मजबूत केला. पुण्याला संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी

बनविण्यामध्ये नानासाहेबांचे कौशल्य, कर्तृत्व निदर्शनास आणणे आवश्यक आहे. नानासाहेब हे मराठी राज्याचे खरे समन्वयक होते. म्हणूनच त्यांच्या आर्थिक धोरणांचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे. आजच्या राजवटीला, समाजाला, शैक्षणिक क्षेत्राला लागणाऱ्या मूलभूत गरजांची सुरुवात नानासाहेब पेशव्यांनी केली, हे जनतेच्या दृष्टीकोनातून बहुमोलाचे योगदान आहे.

नानासाहेब पेशवे हे आपले चुलते चिमाजीआप्पांच्या तालमीत तयार झालेले व्यक्तिमत्त्व होते. जे कार्य कोल्हापूरच्या विकासामध्ये, प्रगतीमध्ये राजर्षी छत्रपती छ. शाहूंनी केले. त्यामुळेच कोल्हापूरचा शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात मोठी प्रगती झाली. त्याचप्रमाणे पुण्याच्या सर्वांगीण विकासामध्ये नानासाहेब पेशव्यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात भरीव कार्य केले जे आज पुण्याला स्थान आहे त्याचे सर्व श्रेय नानासाहेब पेशव्यांना द्यावे लागेल.

नानासाहेब मुत्सद्दी, राजनीतिमध्ये प्रवीण, सेनापतीस आवश्यक असणारे गुण त्यांच्यात कमी प्रमाणात असतील मात्र उत्तम प्रशासक या दृष्टीने त्यांचा दर्जा अव्वल मानावा लागेल. नानासाहेबांचा खास गुण म्हणजे राज्याच्या हिशोबाचे परिपूर्ण ज्ञान होते. महसूल, शेती, उद्योग, व्यापार, अंतर्गत परराष्ट्रीय धोरणे यामधून त्यांनी राज्याच्या खजिन्यात भर घातली. आर्थिक दृष्टीने राज्याची अर्थव्यवस्था बळकट केली. सरदार, वतनदार, सावकार यांच्याबाबतीत त्यांची धोरणे विचार करावयास लावणारी आहेत. नानासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यामध्ये त्यांचा स्वभाव, चातुर्यपणा, शब्दांचे माधुर्य या गुणांमुळे मराठी राज्याला फायदाच झालेला दिसून येते. त्यांचे सैन्य उत्तम असून त्यांनी आधुनिक फलटणी तयार केल्या होत्या. सैन्याची पुनर्रचना करून राज्याच्या सुरक्षेबाबत काळजी घेऊन आपले राज्य नियंत्रणात ठेवले होते. पार ढवळून निघालेल्या पेशवाईच्या अर्थव्यवस्थेला नानासाहेबांनी आकार दिला म्हणूनच १८व्या शतकातील नानासाहेब पेशवा राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्टीने मजबूत व श्रेष्ठ ठरलेला दिसून येतो. पेशव्याच्या मालिकेतील आर्थिक व प्रशासकीय दृष्टीने सर्वात हुशार व उत्तम गुण असलेला पेशवा होता. त्यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यासाचे संशोधनपर लेखन म्हणजे मैलाचा दगडच मानावा लागेल. सर्व आर्थिक डोलारा सांभाळणे हे सोपे नव्हते परंतु त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी

राबविलेल्या उत्तम प्रशासकीय गुणांनी, कर्तबगारीने हे स्थैर्य मिळवून दिले, यामुळेच त्यांचे महत्त्व वाढलेले आहे. Sardesai says, He was famous nonpolitical work like is economic policy Revenue System socialological & cultural work is very good.

पेशव्यांचे पुणे शहरावर इतके प्रेम की, तळाहाताच्या फोडाप्रमाणे पुण्याच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत. नानासाहेबांनी पुण्याच्या बंदोबस्तासाठी लिहिलेले पत्र खालीलप्रमाणे-

'जागजागांचे हशमी लोक पुण्यास आणवले होते, ते आले न आले, त्याचा समाचार घेऊन आले नसतील त्यास पत्रे पाठवून जलदीने आणविणे. तूर्त आळंदीची यात्रा भरत असेल, वाणी उदमी यात्रेस आले असतील, त्यांची रखवाली झाली पाहिजे. तरी लोक जमा जाले असतील, त्यापैकी दोन-तीनशे आळंदीचे रखवालीस पाठवून देणे. पुण्यामध्ये चोऱ्या होतात म्हणून कळले. त्यास चौकीस माणसे देवून, चोरांचे पारिपत्य करून चोऱ्या न होते करणे. फासेपारधी, कोल्हाटी वगैरे चोऱ्या करतात, त्यास मुलुखातून काढून देणे.''

संदर्भ- (सरदेसाई गो. स., मराठी रियासत ३, पानिपत प्रकरण, नानासाहेबाचा मूत्यू आणि योग्यता)

## ५.१९ प्रकरण संदर्भ -


१) आंद्रे विंक, लँड अँड सॉव्हरिंटी - ॲग्रीरियन सोसायटी अँड पॉलिटिक्स अंडर द एटीन्थ सेंच्युरी पान १९२.

२) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र पान ३६५-६६

३) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र

४) भावे वि. ल., मराठे दप्तर रुमाल

५) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पान नं. ५८

६) चिटणीस के. एन., रेव्हेन्यू ऑफिशिअल्स मराठा हिस्ट्री सेमिनार (१९७१)

७) देशपांडे/कुलकर्णी-कुलकर्णी, सोहनी विरचित संपादक - पेशव्यांची बखर (१९६३) देशमुख प्रकाशन, पुणे.

८) गॅझेटियर ऑफ द बाँबे प्रेसिडन्सी पार्ट ३, खंड ९, १०.

९) गवळी डॉ. पी. ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, (२०००) कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

१०) जोशी शं. ना., मराठीकालीन समाजदर्शन पान नं. २-३

११) जोशी श. ना., मराठेकालीन समाजदर्शन

१२) कुलकर्णी अ. रा., शिवकालिन महाराष्ट्र पान नं. २२-२३

१३) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, पान १६

१४) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र

१५) कुलकर्णी अ. स., महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी

१६) कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास, (२००६) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

१७) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने

१८) पुरंदरेचे दप्तर

१९) पारसनीस द. ब., बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी

२०) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाने साधने खंड १ ते २०, २२

२१) रानडे गो. म., राईज ऑफ द मराठा पॉवर, पान ९८-९९

२२) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, ५५, ५६

२३) साने का. ना., संपादक, १९३२, भाऊसाहेबांची बखर, पुणे.

२४) सरदेसाई गो. स., संपादक, कुलकर्णी कृ. पा. व काळे या. मा., १९३३, ऐतिहासिक पत्रव्यवहार, पुणे.
२५) सेन एस. एन., ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ मराठा पान ५५, ६६, ३१६
२६) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर खंड ६, पान ६१९
२७) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड ६, २५, ३१, ३१
२८) सेन एस. एन., न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज्
२९) सेन एस. एन., ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ द मराठाज्
३०) सरदेसाई गो. स., नानासाहेब पेशवे चरित्र, (१९२६)
३१) सरदेसाई गो. स., मराठी रियासत
३२) वाड मावजी, पेशवा डायरी खंड ८, पान ८२०, ८२७ आणि भाग ६ पान ७५५
33) Baten B. - Powell - Study of the Decan Villages, their (1897) Origin and development.
34) Duff grand - A Histry of Maratha's (1921)
35) Mukharji Radhakamal - The Economic History of India
36) Mate M. S.- Maratha's Architecture
37) Mahajan T. T. - Aspects of Agrarian and Urban History of Maratha
38) Sardesai G. S., New Histry of the Maratha - Valum II & III, Bombay
39) Sinha H. N., Rise of the Peshwas - Alahabad 1931

## ब ) नानासाहेब पेशवे यांच्या सार्वजनिक खर्च व इतर खर्चाच्या बाबी

### ५.१ प्रस्तावना -

या प्रकरणामध्ये नानासाहेब पेशव्याच्या कालखंडातील राज्याचा उत्पन्न आणि खर्च याशिवाय महसूल व इतर बाबीवरील खर्च या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. त्या कालखंडाध्ये शास्त्रशुध्दपणे अर्थव्यवस्थेचा कोणत्याही पेशव्यांनी विचार केलेला दिसत नाही मात्र नानासाहेब पेशव्यांनी त्यावर सर्वमान्य व राज्यासाठी आवश्यक असणारा असा तोडगा काढून राज्य बळकटीस कसे येईल यावर भर दिला. त्यावेळचे अर्थशास्त्र, रीतीरिवाज व गरजा यावर अवलंबून असल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये सरकारी अधिकारी असो अथवा परकीय प्रवासी असो, सवलती मिळविण्यासाठी राजांना नजराणा देत असत. ही गोष्टही राज्याच्या उत्पन्नातील महत्त्वाची गोष्ट मानली जाते. असे डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी प्रकाशित केलेल्या खंडामध्ये नमूद केल्याचे दिसून येते. मराठी सत्तेच्या पतनास अनेक कारणे दिसून येतात. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मराठ्यांचे आर्थिक बाबीकडे झालेले दुर्लक्ष. त्यामुळे जमा आणि खर्च यांच्या तात्त्विक बाबींचा विचार होणे आवश्यक आहे. यादृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी जमा खर्चाच्याच तात्त्विक बाबीकडे गंभीरपणाने लक्ष दिलेले दिसून येते. विविध सुब्यामधून गोळा होणारा पैसा, विविध सरदारांनी गोळा केलेला पैसा प्रामुख्याने चौथाई सरदेशमुखीच्या माध्यमातून गोळा केलेला पैसा वेगवेगळया खात्यावर खर्च केला जात असे. तेव्हा पेशवे कालखंडामध्ये जमा व खर्च यांचा ताळमेळ लावणे सतत अवघड बनत गेले. यादृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी जमा-खर्चाचा ताळेबंद लावून महसूल व्यवस्थेमध्ये तपासणी पध्दत सुरू केली. पेशवेकाळामध्ये सुहुर ही कालगणना मानली जात असे. यासंदर्भात बाळकृष्ण प्रभाकर मोडक म्हणतात, दक्षिणेकडे सुहुर सन २८ मे ६०० पासून सुरू झाला. तसेच गौरीहर ओझा यांच्यामध्ये १५ मे १३४४ पासून सुरू झाला. सुहुर ही कालगणना ही अरबी भाषेत लिहिली जात असे. म्हणून सुहुरचा

उल्लेख अरबी सनावळी असा केला जात असे. तेव्हा हिशेबाचे वर्ष नानासाहेब पेशवे काळात सुहुर हेच असल्याचे दिसून येते. यामध्ये रोजकिर्द, खतावणी, घडणी यांचा प्रामुख्याने समावेश असे. रोजकिर्द ही सुट्या कागदावर लिहिली जात असे. यामध्ये रोजची जमा रक्कम दाखविली जात असे. याशिवाय विविध खात्यातून आलेली रक्कम जमा दाखविली जात असे. जिंकलेल्या व्यक्तीकडून आलेली रक्कम हारकी या नावाने म्हणून दाखवली जात असे तर जी व्यक्ती खटला हरते त्यांच्याकडून येणारी रक्कम गुन्हेगारी म्हणून मांडली जात असे. खंडणीची रक्कम जमेकडे दाखविली जात असे. नानासाहेब पेशव्याच्या काळामध्ये सरंजामदारांना काही रकमा सरकारी तिजोरीत भरण्याचा आदेश दिला जात असे. महसुलावर आधारित ही रक्कम सरकारकडे जमा करावी लागे. तिला 'वराता' असे म्हटले जात असे. याची नोंद खासुदुर्गा या खात्याखाली होत असे. याशिवाय इतर खर्चाच्या नोंदी जमादार खाना या शीर्षकाखाली केली जात असे. दागदागिने जवाहिर असतील तर त्याची नोंद जवाहिर खान्यामध्ये केली जात असे. अशा प्रकारे नानासाहेब पेशवे कालखंडामध्ये जमा आणि खर्च यादृष्टीने नानासाहेबांनी या व्यवस्थेमध्ये सुयोग्य असा बदल करून आर्थिकदृष्टीने समन्वयाचे धोरण स्वीकारून हा विभाग कार्यक्षम बनविलेला दिसून येतो. प्रामुख्याने या विभागातील खतावणी आणि घडणीची माहिती खालीलप्रमाणे -

**१) नानासाहेब पेशवा व खतावणी-**

नानासाहेबांनी जमा-खर्चाकडे कटाक्षाने लक्ष दिले. रोजकिर्दीमध्ये आलेल्या नोंदी खतावणीमध्ये प्रत्येक व्यक्ती किंवा खाते या शीर्षकाखाली दाखविल्या जात असत. प्रत्येक व्यक्तीकडून दिलेल्या तारखेला रक्कम जमा झाली किंवा नाही, किंवा किती रक्कम जमा झाली याची नोंद खतावणीमध्ये ठेवली जात असे. यामुळे प्रामुख्याने कर्जपट्टी, सरंजामपट्टी या बाबीवरील जमाखर्च लक्षात येतो. एखाद्या सरजामदाराला वराता किती दिल्या, याचीही माहिती मिळते, याचबरोबर सरंजामदार, वतनदारांची महालवार माहिती व जमा आकडा इत्यादीची इत्यंभूत माहिती मिळत असे.

२) घडणी -

नानासाहेबानी घडणीच्या माध्यमातून हिशोबाचे काम चोख ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. हिशोब सुट्या कागदावर लिहिलेले असत. घडणीमध्ये रोजकिर्द व इतर कागदपत्रामध्ये जमा खर्चाचे वर्गीकरण केलेले दिसून येते. प्रामुख्याने खर्चाच्या रक्कमा आद्य अक्षरानुसार नोंदलेल्या असत. प्रत्येक व्यक्तीच्या खात्यावर या नोंदी दाखविल्या जात असत. डॉ. वि. गो. खोबरेकर म्हणतात- घडणी दप्तरामध्ये आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती मिळते. त्याचे तीन कागद असतात. १) आर्थिक व्यवहाराचा पत्रव्यवहार २) निरनिराळ्या प्रकारचे हिशोब ३) मंजूर झालेले हिशोब. याशिवाय घडणी दप्तरामध्ये खालील विषयावर खतावण्या दिसून येतात. प्रामुख्याने देवस्थान, जप्ती केलेली मोकळी जागा, कमावीस व कर्ज चौथाई, सरकारी वतने, वर्षासन व खाजगी अंतस्थ इत्यादीची माहिती घडणी या सदरात खतावण्याची रूपात दाखविली जात असे.

## ५.२ सार्वजनिक उत्पन्नाची साधने -

सध्याच्या काळामध्ये आर्थिक इतिहासाला महत्त्वाचे स्थान आहे. राजकीय इतिहास आज मागे पडत चाललेला दिसून येतो. कोणत्याही राज्याच्या अथवा राजाच्या काळातील आर्थिक धोरणे आणि त्यांचा परिणाम महत्त्वपूर्ण असतो. त्या अनुषंगाने पेशवे कालखंडातील पेशव्यांची आर्थिक धोरणे महत्त्वपूर्ण ठरतात. नानासाहेब पेशव्यांच्या कालखंडामध्ये तत्कालीन भारताची राजधानी पुणे असून सर्व सूत्रे पुण्यामधूनच चालविली जात होती. नानासाहेबांच्या काळातील उत्पन्नाचे मुख्य साधन म्हणजे जमीन महसूल व्यवस्था होय. जमीन महसूल व्यवस्थेत त्यांनी तपासणी पध्दत (फडणीसी) त्यांच्या काळातील सार्वजनिक उत्पन्नाच्या बाबीमध्ये खालील गोष्टींचा समावेश दिसून येतो.

१) जादा महसूल

या काळामध्ये जादा महसूलामध्ये धूकपट्टी देशमुख व देशपांडे यांच्या जमिनीवर काम करण्यासाठी द्यावा लागणारा कर होय. हक्क चौथी यामध्ये एकूण पाव हिस्सा, त्याचबरोबर घरपट्टी, इनामपट्टी, वजनमापाची तपासणीसाठी द्यावा लागणारा कर, त्यास बातछापणी असे म्हणतात. याशिवाय विवाहावर

द्यावा लागणारा कर, गावातील मेंढी, म्हैशीवर द्यावा लागणारा, सरकारी कुरणे, जमीन, वतन, गावातील देवस्थाने त्याचबरोबर गावाच्या संरक्षणाबद्दलचे इत्यादी सर्व प्रकारचे कर या कालखंडामध्ये राज्याच्या तिजोरीमध्ये जादा महसूल स्वरूपात गोळा केला जात असे.

## २) सरकारी अधिकाऱ्यांना दिलेली सूट

या काळामध्ये समाजातील सर्व व्यक्तीकडून कर घेतला जात नसे. घरपट्टीसारखा कर सरकारी अधिकारी तसेच प्रभू व ब्राह्मण यांच्याकडून घेतला जात नसे. मात्र सरकारी अधिकाऱ्यांना त्याचबरोबर गरीब व्यक्तींनाही कर भरण्याची सवलत दिली जात असे. डॉ. सेन यांनी या पध्दतीला जीवनमाफक तत्त्व म्हटले आहे. या कर सवलतीमध्ये काही वेळा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असे, परंतु नानासाहेबांनी यामध्ये गैरव्यवहार होणार नाही, याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिलेले दिसून येते. न्या. रानडे यांनी 'राईज ऑफ पॉवर' या ग्रंथामध्ये सरकारी दप्तरातील अधिकाऱ्यांना जकातीमध्येही सूट दिली जात असे. याबाबतचे वर्णन केलेले दिसून येते. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये साधारणपणे १७४४ ते १७४५ या कालखंडात सरकारी अधिकाऱ्यांना कोणत्या प्रकारे सूट दिली पाहिजे, यासंबंधी काही सूचना दिलेल्या दिसतात. मासे खरेदी करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याकडून कोणताही कर घेऊ नये. २५ केळी, ५ नारळ, ५ शेर खजूर व साखर घेतली असेल तर यावर कर घेऊ नये. सरकारी नोकर व ब्राह्मण यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा कर घेऊ नये, अशा प्रकारे नानासाहेब पेशवे कालखंडामध्ये सरकारी अधिकाऱ्यांच्याबद्दल कर सवलती दिलेल्या दिसून येतात.

## ३) जंगले व टांकसळी

पेशवे कालखंडामध्ये जंगल खात्याकडून मिळणारे उत्पन्न ही महत्त्वाची बाब होती. काही विशिष्ट प्रकारची झाडे तोडण्यावर बंधने असून सरकारची परवानगी घ्यावी लागे. कोणत्या कारणासाठी झाड तोडत आहोत, हे नमूद करावे लागेल. जंगल विभागावर मामलेदारांचे नियंत्रण असे. मामलेदाराने दरवर्षी १६०० खंडी जळाऊ लाकूड व १५० खंडी कोळसा सरकारला द्यावाच लागे. या संदर्भामध्ये नानासाहेबांचे धोरण महत्त्वपूर्ण दिसून येते. ते

आपल्या सरकारी अधिकाऱ्यांना घरे बांधण्यासाठी माफक दरात जंगल तोडण्याची परवानगी देत. किंवा काही आणिबाणी प्रसंगी उदा. शत्रूने मोठे नुकसान केले अथवा सार्वजनिक उपयोगासाठी एखादी इमारत बांधायची असेल तर त्यासाठी सुध्दा जंगलातील लाकूड तोडण्याची सवलत दिली जात असे. या काळामध्ये टांकसाळीमधून मिळणारे उत्पन्न हे महत्त्वपूर्ण होते. न्या. रानडे यांनी आपल्या **'राईज ऑफ मराठा पॉवर'** या पुस्तकामध्ये टांकसाळीसंबंधीचे सरकारी धोरण स्पष्ट केलेले दिसून येते. कोणत्याही सरकारला टांकसाळी बंद करण्याचा हक्क नाही, तर हा हक्क सावकार, दुकानदार, व्यापारी यांचाच असतो. अशा लोकांना जर पैशाची गरज नसेल तर ते सोने-चांदी खरेदी करणार नाहीत. म्हणून रयतेला चलन पुरविण्याची जबाबदारी या वरील तीन व्यक्तींची दिसून येते. डॉ. सेन यांच्या मते शिवकाळामध्येही असेच धोरण होते आणि या धोरणाचा पाठपुरावा नानासाहेब पेशव्यांनीही केलेला दिसून येतो. पेशवे काळामध्ये पुणे, तळेगाव, दाभाडे, वसई, नाशिक, दौलताबाद, रहिमतपूर, चिंचवड, नागोठणे, धारवाड या ठिकाणी टांकसाळी दिसून येतात. येथे मोहरा, रुपये आणि चांदीची नाणी तयार केली जात असत. काही टांकसाळी पेशव्यांच्या मालकीचीही असत. या संदर्भात पेशवे दप्तरामध्ये नानासाहेब पेशवे यांनी पुणे येथे स्वतःची टांकसाळ निर्माण केली. काही ठिकाणी जमीनदारांच्या खाजगी टांकसाळी असत. त्यामुळे बिनसरकारी किंवा बनावट नाण्यांमुळे गोंधळही निर्माण झालेला दिसून येतो. धारवाड प्रांतामध्ये अशी बनावट नाणी तयार झाल्याचे दिसून येतात. या संदर्भात बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्या कालखंडातील एक पत्रात धारवाड प्रांतात होन, मोहरे व रुपये यांची बनावट नाणी व्यवहारात चालू असल्यासंबंधीचे एका पत्रावरून प्रकाश टाकल्याचे निदर्शनास येते. यावेळी नानासाहेबांनी पांडुरंग मुरार या सरदाराला धारवाड सुब्यात बनावट नाण्यांना विरोध करण्यासाठी पाठविलेले दिसून येते.

### ४) जमीनदार व मामलेदार

जकातीचा संपूर्ण व्यवहार जमीनदार व मामलेदार व दरगदार या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली होत असे. जमीनदार व दरगदार यांनी रयतेवर

जुलूम करू नये, इतकेच नव्हे तर जकात अधिकारीही जुलूम करणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना नानासाहेब पेशव्यांनी दिलेल्या दिसून येतात. यावरून नानासाहेबांचे आर्थिक दृष्टेपण दिसून येते. नानासाहेबानी जमीन महसुलात वाढ करण्यासाठी उत्तेजन देणारे व प्रोत्साहन देणारे धोरण आखल्याचे दिसून येते. व्यापाराच्या बाबतीतही कर व्यवस्थेत समतोलपणा राखल्याचे दिसून येते. यावरून त्यांचा आर्थिक व्यापक दृष्टीकोन दिसून येतो. प्रांतातील जकात गोळा करण्यासाठी कमावीसदाराकडे अधिकार दिलेले असत. अशा प्रकारे जमीनदार, मामलेदार, कमावीसदार यांना पेशव्यांनी हितकारक सूचना दिलेल्या दिसून येतात. यासंदर्भातील माहिती फडणीसाला दिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते. फडणीसाच्या संमतीशिवाय कोणत्याही व्यापाऱ्यावर कर लादू नये, फडणीसाने मालाचा जमाखर्च ठेवून त्याबाबतीतील पत्रव्यवहार स्वतः करणे आवश्यक आहे. फडणीसाबरोबर जमेनीस याही अधिकाऱ्याला काही सूचना दिलेल्या दिसून येतात. जमेनीसाने मामलेदार, जमीनदार यांच्याकडून येणाऱ्या सूचनांचा आधारावर जकातीचा आकडा तयार करून जमीनदाराला पत्रक सादर करावे. जमेनीसाने जे करार केले असतील ते मुजूमदाराने पडताळून पहावेत. त्यानंतर ते फडणीसाला दाखवावेत आणि मग फडणीसाने जमेनीसाला ठराविक रकमेसाठी सनद दिलेली असे. वर्षाच्या शेवटी जमेनीसाने जमाखर्च तयार करावा, जमीनदाराला दाखवून अंतिम खर्च मामलेदाराला सुपूर्द करावा. अशा प्रकारची ही जमीनदार व मामलेदार यांच्याबाबतीत आर्थिक व्यवहाराचे सूत्रण राबविले जात असे.

### ५) जादा महसूल व खानेसुमारी

पेशवेकाळामध्ये जादा महसुलामध्ये अनेक करांचा समावेश होत असे. हे सर्व कर गावचा पाटील स्वतः गोळा करण्याचे काम पहात असे. शहरामध्ये हा कर गोळा करण्यासाठी स्वतःत्र अधिकारी नेमलेला असे. हे सर्व कर सरकारचे जादा कर कायम महसुलाच्या बाबी म्हणून त्यांना महत्त्व असे. याशिवाय खानेसुमारी हा एक उत्पन्नाचा महत्त्वाचा घटक होता. खर्चातील तुटीची तोंड मिळवणी करण्यासाठी हा कर गोळा केला जात असे. त्याला खानेसुमारी किंवा जास्ती पट्टी असे म्हटले जात असे. जमीनदार, इनामदार

अशा लोकांच्यावर ही पट्टी बसविली जात असे. हा कर रोख रक्कम किंवा धान्याच्या स्वरूपात घेतला जात असे. नानासाहेबांच्या काळामध्ये हा कर गोळा करण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याला गावात पाठवून गावातील अशा लोकांची स्वतंत्र यादी तयार केली जात असे. या खानेसुमारी संदर्भात नानासाहेबांच्या काळातील एक बोलके उदाहरण खालीलप्रमाणे दिसून येते. घोसाळा या प्रांताची खानेसुमारे अशा स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत त्यांनी करून खानेसुमारी कर वसूल केलेला दिसून येतो. यावरून त्यांच्याजवळील आर्थिक नियोजनाचा मुत्सद्दीपणा दिसून येतो.

### ६) जकात व मोहतरफ्यावरील सवलत

नानासाहेब पेशवे यांचे धोरण जमीन महसुलीच्या व्यापाराबाबत अत्यंत दक्षतापूर्ण दिसून येते. जमीन महसूल व व्यापाराच्या बाबतीत समानता दिसून येते. ज्याप्रमाणे वेळप्रसंगी जमीन महसूलात सूट दिली, त्याप्रमाणे जकात व जकात व मोहतरफ्यामध्येही सवलत दिलेली दिसून येते. या संदर्भात डॉ. सेन यांनी आपल्या ग्रंथात असे म्हटले आहे की, नानासाहेबांनी जकात व मोहतरफाबद्दल कधीही ताठर भूमिका घेतलेली दिसत नाही. लवचिकता हेच त्यांच्या धोरणाचे खास वैशिष्ट्य मानावे लागेल.

वरील त्यांच्या धोरणावरून आपल्या रयतेला सुखावह आदर्श आर्थिक धोरणाचा स्वीकार केलेला दिसून येतो. यासंदर्भातील डॉ. सेन यांचे विधान विचार करावयास लावते.

### ७) दळण वळण व नव्या पेठा वसविणे

नानासाहेब पेशवचे नव्हे तर जवळजवळ सर्वच पेशव्यांनी दळणवळण, वाहतूक व नगररचनेबाबत विधायक दृष्टीकोन स्वीकारल्याचे दिसून येते. रस्ते, हमरस्ते यामध्ये सुधारणा केल्या. बऱ्याच वेळा लष्करांना जलद हालचाली करता याव्यात, त्याचबरोबर व्यापारी वर्गाला एक प्रकारचा दळणवळणासाठी फायदा व्हावा, व्यापार वाढावा या दृष्टीने रस्ते, नौका, जहाज व्यवस्था या दळणवळण व्यवस्थेकडे लक्ष दिलेले दिसून येते. या काळातील रस्ते अतिशय चांगल्या अवस्थेमध्ये होते या संदर्भात ड्यूक ऑफ वेलींग्टन हा इंग्रज अधिकारीही नानासाहेब पेशव्यांच्या वाहतूक रस्तेविषयक

धोरणाचे कौतुक करताना दिसून येतो. दळणवळणातील सुधारणांबरोबर व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी व व्यापार वाढावा, यादृष्टीने नानासाहेबांनी नव्या पेठा वसविल्याचे दिसून येते. व्यापारी वृध्दी वाढविल्याचे दिसून येते. उदा. १७५०-५१ या कालखंडामध्ये नानासाहेबांनी कसबा मुरवडे येथील शेटे-महाजन यांना त्याचबरोबर दुकानदारांना व्यापारास प्रोत्साहन देण्यासंबंधीच्या सूचना आपल्या अधिकाऱ्यांना दिल्याचे पत्र उपलब्ध आहे. कसबा बार्शी याठिकाणी नवी पेठ वसविल्याचेही दिसून येते. कर वसुलीमध्ये एखाद्या व्यापाऱ्यावर अन्याय झाला तर स्वतः जातीने नानासाहेब लक्ष घालून अन्यायाचे निवारण करीत असे. बेकायदेशीररित्या वसूल केलेली कराची रक्कम परत केली जात असे. व्यापारी वर्गाला नानासाहेब विशेष मान देत असत, प्रोत्साहन देत असत.

या संदर्भात गो. स. सरदेसाई यांनी आपल्या पेशवे दप्तरामध्ये याचा विशेष उल्लेख केल्याचे दिसून येते. उदा. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबांनी विठोजी कृष्णा कामत या व्यापाऱ्याला वसई येथे स्थायिक होण्याची तसेच व्यापार करण्याची परवानगी देऊन त्या व्यापाऱ्याला पालखीचा मान बहाल केला होता. एवढेच नव्हे तर काही वर्षे जकातीमध्येही सूट दिलेली दिसून येते. या वरील गोष्टीवरून नानासाहेब पेशव्यांनी वाहतूक, दळणवळण याचबरोबर नव्या बाजारपेठा वसविल्या. त्याचबरोबर त्यांची भरभराट कशी होईल याकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. यावरून त्यांची आर्थिक निति स्पष्ट होते.

### ८) सरकारी हस्तक्षेप व मक्तेदारी

पेशवे कालखंडामध्ये व्यापाराच्या बाबतीत काही ठिकाणी मक्तेदारी दिसून येते. व्यापाऱ्यांच्यावर बंधने दिसून येतात. यासंदर्भात डॉ. सेन म्हणतात, काही काळी युरोपात अस्तित्वात असणारे मुक्त व्यापार हे तत्त्व पेशव्यांना माहीत नसावे मात्र नानासाहेब पेशवे यांनी मक्तेदारी हे व्यापारातील तत्त्व नष्ट केले. त्याचप्रमाणे व्यापारातील सरकारी हस्तक्षेप याकडे बारकाईने लक्ष दिले. प्रत्येक व्यापाऱ्याला व्यापार करण्यापूर्वी दस्तक, पासपोर्ट घेणे आवश्यक असते. बाजारामध्ये येणाऱ्या वजनमापावर नानासाहेबांनी पूर्ण नियंत्रण कसे

राहील, याकडे लक्ष पुरविल्याचे दिसून येते. यावरून मक्तेदारी व सरकारी हस्तक्षेप या संदर्भातील नानासाहेब पेशव्यांचे नियोजन वाखाणण्याजोगे होते.

### ९) शेटे महाजन व जहाज व्यवसायाला प्रोत्साहन

नानासाहेबांनी नव्या बाजारपेठा निर्माण करण्यासाठी परवानगी दिली एवढेच नव्हे तर बाजारपेठा व्यवस्थित वसविण्याचे काम शेटे महाजन या वर्गाकडे दिले. हे काम व्यवस्थित करणाऱ्या व्यक्तीला शेटेपणाने वतन दिले जात असे. खेड्यातील पाटील कुलकर्णीप्रमाणे त्याला मानाचा हक्क दिला जात असे. आठवड्याच्या बाजारादिवशी एक सुपारी शेट्याला दिली जात असे. प्रत्येक दुकानदार पाच विड्याची पाने देत असे. तेली तेल, दुकानदार डाळ, भाजीवाला भाजी, खाटिक मटण अशा विविध गरजा शेटे महाजन यांच्या नव्या बाजारपेठातील व्यापारी वर्गाला पूर्ण कराव्या लागत. त्यामुळे शेटे महाजन नव्या पेठासंबंधात यशस्वीपणे आणि प्रामाणिकपणे काम करीत असत. नानासाहेबांनी जहाज बांधणी कार्यालाही प्रोत्साहन देऊन समुद्रमार्गाने व्यापार कसा होईल, याकडे लक्ष दिले. यासंदर्भात चिमणाजी गणेश व नरोत्तम जोशी हे व्यापारी जहाज व्यापारात अग्रेसर असल्याचे निदर्शनास येत आहे. चीन व इंग्लंड देशाबरोबरही पेशव्यांचा व्यापार होत असे. समुद्रातील चाचेगिरींचा बंदोबस्त केल्यानंतर मिळणारा पैसा सरकारजमा होत असे. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी जहाज बांधणी व जलमार्गाने व्यापार करणाऱ्यांना प्रोत्साहन व सहाय्य केल्याचेही निदर्शनास येते.

### १०) मद्यापासून मिळणारे कर

पेशवे काळामध्ये मद्यापासून मिळणारे उत्पन्न हे नाममात्र होते. यासंदर्भात डॉ. सेन यांनी आपल्या ग्रंथात अबकारी उत्पन्न मुख्यता मद्यापासून मिळणाऱ्या कराचे उत्पन्न म्हणून उल्लेख केल्याचे आढळून येते. असे जरी असले तरी नानासाहेब पेशवा हा या मद्यापासून मिळणाऱ्या नाममात्र उत्पन्नाबाबतही अतिशय बारकाईने पहात असे. धर्मशास्त्रानुसार राज्यात मद्यपानाला बंदी असल्याने आपल्या राज्यात मद्यपान होणार नाही, या संदर्भात विशेष काळजी घेतली जात असे. जरी मद्यपानावर बंदी घातली असली तरी काही ठिकाणी दारू गाळण्याचे कामही या काळात आढळून येते. इंग्रज आणि पोर्तुगीज या

परकियांच्या मुळे नानासाहेबा पेशव्याने मद्यपान विषयक धोरणात काही प्रमाणात शिथिलता ठेवावी लागत होती. तरीही ब्राह्मण व सरकारी नोकर प्रभू यांना दारू देऊ नये, अशी सक्त ताकिद नानासाहेब पेशव्यांनी दिल्याचे आढळून येते.

वरील मुद्यांचा विचार करता पेशवेकालीन विविध उत्पन्नाची साधने आणि त्यावर मिळणार कर राज्याच्या हिताच्या दृष्टीने तसेच व्यापाऱ्यांच्या व जनतेच्या दृष्टीकोनातून सर्वानाच हिताचा ठरेल, याकडे पेशव्यांनी लक्ष दिल्याचे आढळून येते. डॉ. चोक्सी आर. डी. आपल्या 'द पिरीयड ऑफ ट्रान्झीशन' या ग्रंथात म्हणतात, १८१८ पूर्वी राज्याची महसूल पध्दती अतिशय उत्कृष्ट होती, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

त्याचप्रमाणे ग्रँट व एलफिन्स्टन या इंग्रज अधिकाऱ्यांनी नानासाहेब पेशवे यांच्या जमीन महसूल विषयक गौरवोद्‌गार काढले आहेत.

## ५.३ उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन या दृष्टीने चौथाई व सरदेशमुखी यांची पार्श्वभूमी -

### अ) चौथाईचे विवेचन -

चौथाई ही शस्त्रबळाच्या आधारे वसूल केली जात असे. चौथाईचा अंमल देशाच्या कोणत्याही भागात लागू केला जात असे. मराठा कालखंडामध्ये उत्पन्नाची अनेक साधने दिसून येतात. त्यापैकी चौथाई आणि सरदेशमुखी या दोन गोष्टीपासून मराठ्यांना सतत उत्पन्न मिळत गेले. चौथाई व सरदेशमुखीचे स्वरूप अनियमित स्वरूपाचे दिसून येते. छत्रपती शिवरायांच्या काळापासून हे हक्क वसूल करण्यासाठी नेहमी शस्त्र बळाचा वापर करावा लागला. या चौथाई सरदेशमुखीच्या माध्यमातून शिवरायांनी आपले सैन्य, पैसा वाढविला. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख आधार म्हणून चौथाई सरदेशमुखीकडे पाहिले जाते. सर जॉन मालकम म्हणतात- चौथाई म्हणजे महसूलाचा चौथा हिस्सा किंवा एक चतुर्थांश हिस्सा होय. ए. सी. लॅल म्हणतात- चौथाई म्हणजे लुटमार, जाळपोळ या बदल्यात द्यावी लागणारी रक्कम होय. एल्फीस्टनच्या मते शत्रुपक्षाकडून कायमस्वरूपी वसूल केला जाणारा महसूल

म्हणजे चौथाई होय. रियासतकार सरदेसाई म्हणतात- चौथाईचा हक्क हा शिवपूर्वकाळापासून अस्तित्वात होता. जेव्हा शिवरायांनी पश्चिम किनाऱ्यावरील पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश जिंकला तेव्हा पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांना एक चतुर्थांश चौथाई देण्याचे मान्य केल्याचे निदर्शनास येते. डॉ. सेन यांनी शत्रुपासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण मिळविण्यासाठी दिला जाणारा कर म्हणजे चौथाई असे म्हटले आहे.

यावरून असे दिसून येते की चौथाईचा इतिहास पाहिला तर हा कर शिवपूर्वकाळापासूनही अस्तित्वात होता असे म्हणणे योग्य ठरेल.

चौथाईचा हक्क हा नियमित स्वरूपाचा नसून एखाद्या प्रबळ व्यक्तीने शेजारील प्रांतातील जनतेकडून वसूल करावयाचा एक जादा अधिकार कोणत्या ना कोणत्या तरी कारणाने शेजारच्या प्रदेशातून शस्त्राच्या जोरावर पैसा वसूल करणे, असेच चौथाईचे स्वरूप होते. शिवाजी महाराजांच्या चौथाईची तुलना दिल्लीचा बादशहा आपल्या सुभेदाराकडून वसूल करीत असलेल्या रकमेशी करतात. या विधानात तथ्य दिसत नाही. कारण सुभेदार हे बादशहाचे नोकर, बादशहापुढे त्यांचे सामर्थ्य पुढे फिके पडत असे. शिवरायांच्या बाबतीत मात्र असे दिसत नाही. कारण शिवाजी महाराजानी चौथाईचा हक्क शत्रूंच्या प्रदेशातून सतत वसूल केला. यासंदर्भात सरदेसाई 'द मेन करन्स ऑफ मराठा हिस्ट्री' या ग्रंथात त्यांनी चौथाईच्या हक्काचे स्वरूप वेगळे असल्यामुळे या हक्काबद्दल कोणत्याही प्रकारची कायदेशीर संमती दिसत नाही. मात्र हा हक्क वसूल करणाऱ्या मराठ्यांच्यावर एक नैतिक जबाबदारी होती. ती अशी- ज्या प्रदेशातून चौथाई वसूल करीत त्या प्रदेशातील रयतेला त्रास न देणे, जाळपोळ लुटालूट न करणे एवढेच नव्हे तर त्या प्रांतातील रयतेचे परकियांच्यापासून रक्षण करणे, अशा प्रकारची नैतिक जबाबदारी शिवाजी महाराजांनी अवलंबिली होती.

न्या. रानडेंनी **राईज ऑफ मराठा पॉवर** या ग्रंथात चौथाई हक्काबाबतची तुलना लॉर्ड वेलस्लीने सुरू केलेल्या तैनाती फौजेशी केलेली दिसून येते. जदुनाथ सरकार चौथाईबद्दल म्हणतात- शत्रूंच्या प्रदेशातील रयतेने मराठ्यांचे लष्करी व मुलकी अधिकारी यांचे संबंध टाळण्यासाठी केलेला

एक कर असा चौथाईचा उल्लेख केलेला आहे. फक्त आर्थिक दृष्टीकोनातून या हक्काकडे पाहिले जात असे. यावरून असे निदर्शनास येते की चौथाईचा हक्क एक समझोता होता, असे म्हटले तर वावगे ठरू नये. इंग्रज, पोर्तुगीज कागदपत्रातूनही चौथाईच्या हक्काबद्दल रयत सरकारी अधिकारी यांच्यातील संबंधाची माहिती उपलब्ध आहे. इंग्रजांच्या फॅक्टरी रेकॉर्डमध्ये चौथाई वसूल करण्याचा हा पर्याय शिवरायांच्या प्रशासनामध्ये योग्यच होता. चौथाई ही प्रामुख्याने सरकारी किंवा श्रीमंत लोकांकडून वसूल केला जात असे. सामान्य माणसांना कोणत्याही प्रकारचा त्रास दिला जात नसे. या संदर्भातील जेम्स फॉर्बेस यांनी लिहिलेल्या **'ओरिएन्टल मेमोरीज'** या ग्रंथात छत्रपती शिवरायांच्या चौथाई वसूल करण्यातील कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. अल्लाउद्दीन खिलजी किंवा तैमुरलिंग ज्याप्रमाणे लूटमार, जाळपोळ करून सर्वसामान्य जनतेकडून जबरदस्तीने पैसा वसूल करीत असे एकही उदाहरण शिवरायांच्याबाबतीत दिसून येत नाही. अशा प्रकारे चौथाई व सरदेशमुखी संदर्भातील मराठ्यांची आदर्शवत भूमिका वेगवेगळ्या इतिहासकार, संशोधकांनी मांडलेल्या विचारामधून स्पष्ट होते.

## छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे चौथाई सरदेशमुखीबाबतचे धोरण -

छत्रपती शिवरायांच्या मृत्यूमुळे मराठ्यांच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. दरम्यान औरंगजेबाच्या शहाजादा अकबर या मुलाने औरंगजेबाविरुध्द बंड केले. १६८२ ते १७०७ या कालखंडात औरंगजेब दक्षिणेत आला. त्याने महाराष्ट्रातील मुस्लिम शाह्या नष्ट केल्या. मराठ्यांचे छत्रपती संभाजी यांना ठार केले. छ. संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द सुरू झाले. दरम्यान १७०७ मध्ये मुघल बादशहा औरंगजेबाचा अहमदनगरजवळ खुलदाबाद येथे मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांच्यात वारसा युध्दाला सुरुवात झाली. जोपर्यंत औरंगजेब जिवंत होता, तोपर्यंत त्याने मराठ्यांचा कोणताही हक्क मान्य केला नाही. मात्र पुढील काळामध्ये छत्रपती छ. शाहूंची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. छ. शाहूंच्या आगमनामुळे मराठ्यांच्या दुही निर्माण झाली. छ. शाहू व ताराबाई असे दोन पक्ष निर्माण झाले.

दोन्ही पक्षांनी शिवरायांच्या स्वराज्यावर आपला हक्क सांगण्यास सुरुवात झाली. या यादवी संघर्षात शेवटी छ. शाहू यशस्वी होतात. याचे सर्व श्रेय छ. शाहूंचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यांना द्यावे लागेल. बाळाजी विश्वनाथने दिल्लीच्या राजकीय उठावात सय्यद बंधूंना मदत करून 'फरूखशियर' या मुघल बादशहाकडून दक्षिणेतील सहा प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळविला. या कालखंडात या हक्काला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. यासंदर्भातील दिल्लीचा बादशहा व मराठे यांच्यातील १७१९ चा करार महत्त्वपूर्ण ठरतो. खानदेश, गोडवण, वऱ्हाड, हैदराबाद, कर्नाटक इ. सहा प्रांतातील चौथाई गोळा करण्याचा अधिकार छ. शाहूंना मिळाला. बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर बाजीराव पहिला याने हैदराबादच्या निजामाकडून कर्नाटक, माळवा या सनदा मिळविल्या तर बाजीराव नंतर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांनी दिल्लीच्या बादशहाकडून चौथाई सरदेशमुखीची मोठी सनदच मिळविली. या सनदेने मराठ्यांचे संबंध प्रत्यक्ष दिल्लीच्या राजकारणाशी आले. याच कालखंडामध्ये मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये वसई, चौल या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशासंबंधीही एक स्वतंत्र करार होवून पोर्तुगीजांनी मराठ्यांना या प्रदेशातील ४० टक्के उत्पन्न देण्याचे मान्य केले. यावरून नानासाहेब पेशव्यांनी चौथाई सरदेशमुखीच्या माध्यमातून राज्याची पूर्ण आर्थिक घडी बसविली. जेम्स फॉर्बेस नानासाहेबांच्या या कार्याचे कौतुक करताना म्हणतो- पेशव्यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली मराठ्यांनी मुघल साम्राज्याची शक्ती पूर्णपणे खलास केली व मुघल साम्राज्याला धुळीला मिळविले.

### ब) सरदेशमुखी -

राज्याच्या एकंदर उत्पन्नापैकी सरदेशमुखी हा एक उत्पन्नाचा महत्त्वपूर्ण घटक मानला जात असे. सरदेशमुख हा हक्क स्वराज्यामध्येच लागू केला जात असे. सरदेशमुखी हे प्रामुख्याने एक वतन मानले जाते. या संदर्भात रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी **'मेन करन्स ऑफ मराठा हिस्ट्री'** या ग्रंथात सरदेशमुखी या वतनासंबंधीचे सविस्तर विवेचन केलेले दिसून येते. पाटील हा गावाचा मुख्य असून गावातील सर्वच घडामोडीकडे तो लक्ष देत

असे. तर कुलकर्णी हा लेखनिक गावाचे सर्व हिशोब लिहून ठेवणे हे त्याचे काम. पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे या प्रमुख वतनदारांना सरदेशमुखीचे वतन बहाल केले जात असे. सैन्य बाळगणे व आपल्या प्रदेशात शांतता, सुव्यवस्था राखणे जरुरप्रसंगी आपल्या सरकारला लष्करी मदत करणे हे या सरदेशमुखी बहाल केलेल्या वतनदारांचे मुख्य काम होते. प्रामुख्याने ग्वाल्हेर, धार, बडोदा, जमखंडी, सांगली, रामदुर्ग या प्रांतामध्ये प्रामुख्याने सरदेशमुखीचे वतन उपभोगणारे या घराण्यातील मातब्बर वतनदार होऊन गेले. सरदेशमुखी म्हणजे एखाद्या घराण्याला सरदेशमुखी बहाल केली तर त्याने त्या भागातील एक दशांश उत्पन्न स्वतःच्या खर्चासाठी घ्यावे व उरलेले ९/१० उत्पन्न सरकारला जमा करावे. सरदेशमुखीचा हक्क हा त्या घराण्याला वंश परंपरेने दिला जात असे. दुसऱ्या शब्दात सरदेशमुखी म्हणजे एकंदर उत्पन्नाचा १/ १० हिस्सा सरदेशमुखी बहाल केलेल्या घराण्याला मिळालेला हिस्सा होय. 'तारीके खाफी खान' या ग्रंथात काफीखान सरदेशमुख संदर्भात म्हणतो, मराठ्यांना रयतेकडून जागीरदाराकडून १० टक्के सरदेशमुखी मिळत असे. सरदेशमुख हा इतर वतनदारापेक्षा श्रेष्ठ मानला जात असे. न्या. रानडेंनी सरदेशमुख या हक्काबाबतचे आपले महत्व स्पष्ट केले आहे. दिल्लीच्या राजकीय उठावात मराठ्यांनी मुघल बादशहाला मदत केली आणि बाळाजी विश्वनाथच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या बादशहाकडून चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य अशा तीन सनदा १७१९ मध्ये मिळविल्या. या हक्कामुळे मराठ्यांना कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. या संदर्भात भीमसेन सक्सेना यांच्या ग्रंथात म्हणतात, 'सततची युध्दे व दुष्काळ यांनी ग्रासलेल्या दक्षिणेला या हक्कामुळे शांतता मिळाली. अशा प्रकारे सरदेशमुखीच्या हक्क छत्रपतींच्या घराण्याला खास हक्क म्हणून मिळाला. चौथाईचा उगम हा पोर्तुगीजांच्या वसाहतीमधून झाला. तर सरदेशमुखीचा उगम हा पूर्वापार चालत आला, असेच म्हणावे लागते. थोडक्यात चौथाई व सरदेशमुखी यांचे मूळ जरी वेगळे असले तरी त्याचे स्वरूप व ध्येय एकच होते.

## ५.४ नानासाहेब पेशवे कालखंडातील खर्चाच्या बाबी -

डॉ. वी. गो. खोबरेकर, डॉ. व. श. कदम या इतिहासकारांनी मराठी राज्याच्या खर्चाच्या गोष्टींचा सविस्तर विचार मांडलेला दिसून येतो. प्रामुख्याने सरकारी खात्यावरील खर्च, दरबारावरील खर्च, नोकर वर्गावरील खर्च संरक्षण, खाजगी, सार्वजनिक, धार्मिक या खर्चाच्या वेगवेगळ्या बाजूवर होणारा जमा खर्चाची माहिती विषद केली आहे. डॉ. कदम यांनी आपल्या प्रबंधामध्ये नानासाहेब पेशवे काळामधील खर्चाच्या बाजूंचा विचार स्पष्ट करताना चार विभागात खर्चाची वर्गवारी केली आहे.

१) एक बेरीज खर्च -

एक बेरीज खर्चावरून एकंदर जमा, एकंदर खर्च व सरकारची शिल्लक समजत असे. किती येणेबाकी आहे हेही एक बेरीज खतावणीवरून समजत असे. एक बेरीज ही हिशेबाची पहिली नोंदवही मानली जाते.

२) दुबेरीज -

यामध्ये जमा व खर्चाच्या दोन्ही बाजूची माहिती मांडली जात असे.

३) बदल मुशाहिरा -

या खर्चामध्ये एखाद्या व्यक्तीला कशा प्रकारे वेतन दिले जात असे, याची नोंद ठेवली जात असे. मुशाहिरा हा रोख वस्तूच्या रूपाने किंवा जमिनीच्या रूपाने नोंद ठेवला जात असे.

४) खेरीज मुशाहिरा-

या खर्चामध्ये प्रसंगानुसार दिलेल्या खर्चाची नोंद ठेवली जात असे. पेशव्यांना येणाऱ्या भेटी, धर्मादाय बाबी आणि मनोरंजनावर झालेला खर्च याची नोंद असे. त्याचबरोबर यादि आणि फेरीस्त या दोन खर्चाच्या नोंदीचा उल्लेख असून यादीमध्ये रोख बाबीचा उल्लेख असतो तर फेरिस्तामध्ये कोटीकडील खर्चाची नोंद असे.

### ५) पेशवेकालीन खर्चाच्या इतर बाबी -

१) प्रशासकीय खर्च -

इतर खर्चाच्या बाबीमध्ये प्रामुख्याने प्रशासकीय खर्चासंबंधी डॉ. कदम यांनी तीन बाबी सांगितल्या आहेत. त्यामध्ये कारकुनांना तैनात दिलेला खर्च

निळकंठ गोविंद, धोंडो मल्हार आणि शिवराम रघुनाथ, त्र्यंबक महिपत आदी कारकुनांवर प्रशासकीय खर्चाची नोंद दर्शविण्यात आली आहे.

२) अष्टप्रधान मंडळावरील खर्च -

पेशवे काळामध्ये या मंडळावर खर्चाची नोंद दाखविण्यात आली आहे. यामध्ये सचिव, प्रतिनिधी, मंत्री आणि पंडितराव यांच्यावर झालेल्या खर्चाची नोंद निदर्शनास येते. या नोंदीमध्ये पेशवा, अमात्य, सेनापती, न्यायाधीश यांच्यावरील खर्चाची नोंद मात्र दिसून येत नाही.

३) सरदारांच्यावरील खर्च -

पेशवे कालखंडामध्ये मोठमोठ्या सरदारांच्यावरही खर्चाची नोंद दाखविण्यात आलेली आहे. जवळजवळ ९५ टक्के खर्च सरदारांच्यावर केलेला दिसून येतो. तुकोजी होळकर याच्यावर ७५ लाख रुपये, महादजी शिंदे यांच्यावर ५५ लाख रुपये, गुजराथचे दाभाडे यांच्यावर २७ हजार रुपये, धारचे पवार यांच्या ६ लाख १९ हजार २७९ रुपये हा खर्च पवार घराण्यातील एकूण १२ सरदारांच्यावर झालेला दिसून येतो. वामनराव पटवर्धन यांच्या खात्यावर २४ लाख रुपये, नारोशंकर यांच्या खात्यावर १३ लाख रुपये, शिवाजी विठ्ठल याच्यावर खात्यावर १२ लाख रुपये, या काळामध्ये सरदार हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे त्याच्यावर खर्च करणे अनिवार्य होते. विशेष करून पेशवे काळामध्ये पटवर्धन सरदार २६ लाख रुपये, नरसी खंडेराव १२ लाख रुपये, माधवराव रास्ते १० लाख रुपये, परशुराम प्रतिनिधी ११ लाख रुपये आणि पवार यांच्यावर १० लाख रुपये असे वार्षिक खर्च सरदारांच्यावर खर्ची टाकण्यात आल्याचे दिसून येते. वरील खर्चाच्या बाबींवरून पेशवे कालखंडातील आर्थिक घडामोडी आणि राज्याची अर्थव्यवस्था मांडण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये करण्यात येत आहे.

अशा प्रकारे पेशवे काळ असो अथवा नानासाहेबांचा काळ असो, या काळात एकंदर खर्चाच्या विषयांची संख्या ७४ झालेली दिसून येते. त्याचे कारण राज्य विस्तार, लष्करी बाबींचा विकास, तत्कालीन लोकांचे राहणीमान इत्यादींचा नामोल्लेख होतो. खर्चाच्या बाबीसंदर्भात प्रा. डॉ. कदम यांनी आपल्या प्रबंधामध्ये १७७२, ७३ आणि ७५ या तीन वर्षाच्या कालखंडातील

नोंद केली आहे. त्यामध्ये धार्मिक बाब २ ते ५ टक्के, खैरातीवर १६ ते २७ टक्के, इनामतीवर २९ ते ३४ टक्के या सर्व बाबीवरील एकंदरीत खर्चाचा आकडा वाढत गेलेला दिसतो. बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे यांच्या काळातही या बाबीवरील खर्च वाढलेला असावा. कारण पेशव्यांचे उदार धोरण हे कारण असू शकेल. मात्र एकंदरीत नानासाहेबांच्या काळात या सर्व बाबींच्या खर्चाचा पडताळा केला जात होता.

या तीन वर्षाच्या पत्रकावरून संपूर्ण पेशवेकाळात असाच खर्च होता असे म्हणता येणार नाही. कारण या वरील कालखंडामध्ये नाना फडणीस, महादजी शिंदे या सरदारांचा राजकारणावर प्रभाव होता. तसे पाहिले तर बाजीराव पहिला असो अथवा माधवराव पेशवा असो, यांचा काळ धामधुमीचा होता. मात्र नानासाहेब पेशवे यांच्या कालखंडामध्ये राज्याला स्थिरता विस्तार मिळाल्यामुळे वरील चार बाबीवरील होणारा खर्च थोड्याफार प्रमाणात प्रा. डॉ. कदम यांनी मांडलेल्या प्रबंधातील वर्गवारीप्रमाणे दिसून येतो.

## ५.४ प्रकरण संदर्भ -


१) आंद्रे प्रो. विक - Land & Sovereignty

२) आंद्रे विक - लँड अँड सॉव्हरिंटी- अँग्रीयन सोसायटी अँड पॉलिटिक्स अंडर दि एटिन्थ सेंचुरी मराठा स्वराज्य, पान नं. १९२

३) बाळकृष्ण - शिवाजी द ग्रेट : खंड ४, पान नं. २२

४) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, पान नं. १६

५) खोबरेकर वि. गो., मराठी अंमलाचे स्वरूप, पान नं. ७८-७९.

६) चाफेकर ना. गो., - पेशवाईच्या सावलीत, पान नं. ५८

७) फोर्बेस जेम्स - ओरियंटल मेमॉयर्स : खंड १, पान नं. १४६

८) कदम व. शं., मराठा कॉन्फेडेरसी - ए स्टडी इन ओरिजनल अँड डेव्हलपमेंट, पान नं. ७३ व ७४.

९) कदम व. शं. - तत्रैव, पान नं. ९०.

१०) कुलकर्णी अ. रा., महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, पान नं. १०६

११) कुलकर्णी अ. रा. - शिवकालीन महाराष्ट्र, पान ९०

१२) कुलकर्णी अ. रा.- महाराष्ट्र इन दि एज ऑफ शिवाजी, पान नं. १३३

१३) कुलकर्णी अ. रा.- मराठा इतिहास व्याख्यानमाला, पान ९०

१४) ना. गो. चापेकर - पेशवाईच्या सावलीत

१५) रानडे गो. म., राईज ऑफ दि मराठा पॉवर, पान नं. ९८-९९

१६) सेन एस. एन., मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज, पान नं. ४१

१७) सेन एस. एन., ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पान ६६

१८) सेन एस. एन., मिल्ट्री सिस्टिम ऑफ मराठाज, पान ४०-४१

१९) सरदेसाई गो. स., मेन करंट्स ऑफ मराठा हिस्ट्री, पान नं. ८६-८७

२०) सरदेसाई गो. स., मेन करंटस् ऑफ मराठा हिस्ट्रीज, पान ८६-८८

## क) नानासाहेब पेशवे यांचे व्यापार, उद्योग धंदे

### ५.१ प्रस्तावना -

पेशवे कालखंडाची सुरुवात साधारणपणे १७१३ पासून सुरू होते. या कालखंडामध्ये प्रामुख्याने पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्या काळामध्ये छत्रपती छ. शाहूंचे आसन स्थिर करण्यामध्ये त्यांची संपूर्ण हयात गेली. तरीही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने लेखणीबहाद्दर बाळाजी विश्वनाथने मराठी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित बसविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो. दिल्लीच्या राजकीय उठावात सय्यद बंधुंना मदत करून मुघल बादशहाकडून स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी या सनदा मिळविल्या. मराठी राज्याच्या आर्थिक दृष्टीने या सनदाना अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ बाळाजी विश्वनाथ भटला सात वर्षाची कारकिर्द मिळाली. मात्र या काळामध्ये अगदी आणीबाणीचा प्रसंग असताना मराठी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित बसवून छ. शाहूंचे राज्य मजबूत केले. स्वराज्याचा वारस छ. शाहू हे सिध्द करून मुघल बादशहाकडून छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा खरा वारस छ. शाहू आहे हे स्वराज्याच्या सनदेतून बाळाजी विश्वनाथने सिध्द करून दाखविले. उत्कृष्ट सैन्यदल निर्माण केले. मराठा मंडळ स्थापन केले. अनेक सरदारांना छ. शाहूंच्या पक्षात आणून छ. शाहूंची बाजू बळकट बनविली. पेशवा या नात्याने बाळाजी विश्वनाथने केलेले सर्वांगीण आर्थिक विकासाची घडी बसवून दिली. त्यानंतर त्याचा मुलगा पेशवे बाजीराव पहिले यांनीही छत्रपती छ. शाहूंच्या राज्याची सर्वत्र वाहवा केली. मराठ्यांचे शत्रू निजामाकडून चौथाई, सरदेशमुखी या सनदा देण्याचे मान्य करून घेतले. एवढेच नव्हे तर दक्षिण कर्नाटक असो अथवा उत्तर हिंदचा भाग असो. या सर्व भागातून मराठ्यांचे वर्चस्व निर्माण करून मराठी राज्याची आर्थिक घडी बसविली. सिद्दी, पोर्तुगीज या सत्तांना नमविले. याकामी त्यांचे लहान बंधू चिमाजी आप्पा याचे सहकार्यही मोलाचे आहे. पेशव्यांच्या मालिकेतील बाजीराव पेशव्यांची कारकिर्द एकूण २० वर्षांची होती. या काळात सतत मोहिमा, युध्दे केल्यामुळे खर्चही मोठ्या प्रमाणावर झाला. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर आर्थिक भार पडला गेला. परिणामी

या काळामध्ये मराठी सत्तेचा विस्तार झाला असला तरी राज्याची आर्थिक परिस्थिती सतत बाजीराव पेशवे यांनी केलेल्या लढाईमुळे खालावत गेली. आर्थिक ताण सतत येत राहिला. पेशव्याबरोबर छत्रपतींपुढेही कर्जाचे डोंगर उभे राहिले. अनेक सावकारांचे कर्ज छत्रपती व पेशव्यांच्या आर्थिक सत्तेला सहन करावे लागले. अशा रितीने बाजीराव पेशव्यांनी मोठ्या मोहिमा आखल्या. त्यातून मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले, मात्र त्यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे मराठी राज्याचा संपूर्ण भार नानासाहेब पेशव्यांच्यावर पडला. परिणामी खूप मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर पडली.

## ५.२ नानासाहेब पेशवे यांचे व्यापार-उद्योगविषयक धोरण-

नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये उद्योग व्यापार या संदर्भातील कागदपत्रे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. शिवरायांच्या काळामध्ये स्वराज्य ही संकल्पना महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील काही ठराविक जिल्ह्यापुरतीच मर्यादित होती. मात्र नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. प्रचंड विस्तार झाला. वाहतूक, दळण वळण, रस्ते यामध्ये सुधारणा झाल्या. पूर्वीची स्वयंपूर्ण खेडी आता मोठी शहरे बनली. दळणवळणातील प्रगतीमुळे दूरदूरचे प्रांत जवळ वाटू लागले. त्यामुळे उद्योग, व्यापार यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळत गेली. नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठ्यांचे व्यवसाय, उद्योगधंदे यांचे स्वरूप बदलत गेले. यामध्ये मोठी क्रांती झाली. अशा रीतीने नानासाहेब पेशव्यांच्या काळातील वरील व्यापार उद्योगातील झालेला हा व्यापक बदलाचा अभ्यासाची माहिती खालीलप्रमाणे -

### १) नानासाहेब पेशवे यांचे व्यापारविषयक माहिती

नानासाहेब पेशव्यांच्या काळात अंतर्गत व बाह्य व्यापार होत असे. अंतर्गत व्यापारामध्ये तीन प्रकार होते. प्रामुख्याने अ) जमीनीवरील व्यापार ब) समुद्रमार्गे होणारा व्यापार आणि क) नदी मार्गे होणारा व्यापार.

या काळामध्ये समुद्रावरील व्यापार हा एक महत्त्वपूर्ण व्यापार होता, असे म्हणावे लागेल. कारण मराठ्यांचा पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार अतिशय फायदेशीर होता. या व्यापारामध्ये कधी-कधी परकीय व्यापाऱ्यांची अरेरावी, त्याचबरोबर काही चाचेगिरी करणारे यांचाही मोठा त्रास होत असे. मात्र हा

व्यापार किफायतशीर होता. कारण पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई, सुरत तर खंबायत उत्तरेकडे ही महत्त्वाची ठिकाणे होती. दक्षिणेकडे कारवार, मलवार ही ठिकाणे व्यापारी सोयीची बंदरे महत्त्वाची होती. पुर्वेकडे बंगाल हे व्यापाराचे मोठे केंद्र होते. तर महाराष्ट्रामध्ये मुंबई, वसई, बाणकोट, पेन, पनवेल, कल्याण, भिवंडी, नागोठाणे ही व्यापाराची प्रसिध्द ठिकाणे दिसून येतात. नानासाहेब पेशव्यांच्या काळात व्यापारी ठिकाणांना अत्यंत महत्त्व आले. व्यापारामध्ये तांदूळ, कापड, लीनन, मलमल, चीट, कॅलिको, रेशमी कापड, पटक्याचे कापड आणि शाल यांची मोठ्या प्रमाणात मागणी होती. पांढरे शुभ्र कापड तर प्रसिध्द होते. बंगालची मलमल तर जगप्रसिध्द मानली जात असे. बंगालमधून महाराष्ट्रात अफू, सुंट, चींच, ताग, साखर, गोणपाट आणि रेशीम कापड आयात केली जात असे. याचबरोबर रम आणि दारुचीही बंगालमधून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात मागणी केली जात असे. मलबार व कोचीन ही ठिकाणे कलाकुसरीच्या कामासाठी प्रसिध्द होती. गोव्यातून कागद, पत्रा, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, पारा, जस्त, तांबे, मेणबत्त्या, कच्चे रेशीम, चाफाच्या बंदुका, सुके खोबरे आयात केले जात असे. यासंदर्भात डॉ. टी. टी. महाजन यांनी मुंबईच्या ईस्ट इंडिया या कंपनीने महाराष्ट्राबरोबर केलेला व्यापार या संदर्भात दिलेली माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कालखंड - | एकूण व्यापार रुपये |
|---|---|---|
| १) | १७५१ ते १७५३ | ४,८४८३५-०० |
| २) | १७५५ ते १७५६ | ८,५१,६८०-०० |
| ३) | १७५८ ते १७६० | ८,७७,७१२-०० |

वरील आकडेवारीवरून या काळातील व्यापाराची कल्पना येते.

नानासाहेब पेशव्यांनी महाराष्ट्रामध्ये राजापूर व रोहे येथून मोठ्या प्रमाणात घोडी आणली. उत्तम प्रकारे घोडी खरेदी करण्यासाठी अश्वपरीरक्षक नेमलेले दिसून येतात. काबूलमधून घोड्यांची खरेदी केली जात असे. त्याचबरोबर अफगणिस्तान, इराण येथून साखर, बदाम, काजू, पिस्ता यांची आयात केली जात असे. चीनमधून साखर, रेशीमकापड यांची आयात केली जात असे. इराणमधून कच्चे रेशीम, युरोपमधून जस्त, मेणबत्ती, हस्तीदंती वस्तू,

दुर्बीण यांची आयात केली जात असे. अशा प्रकारे या काळामध्ये निर्यात व्यापारापेक्षा आयात व्यापार मोठा होता असे दिसून येते.

गुजरात, अहमदाबादमधून भारी किंमतीची पागोटे विक्रीसाठी येत असे. वराडमधून कापूस पुण्याच्या बाजारपेठेत आणला जात असे. त्याबदल्यात तांदूळ व मीठ यांचे कोकणातून वराडमध्ये निर्यात केली जात असे. मछलीपट्टणमधून चिटाचे कापड पुण्याच्या बाजारपेठेत येत असे. माळवा, गुजरात, बुंदेलखंड येथून बंदुका, तलवारी, धनुष्यबाण व इतर युध्द साहित्य पुणे हे राजधानी शहर असल्यामुळे विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आणले जात असे. तर सुरतमधून तोफा मोठ्या प्रमाणात आणल्या जात. पैठण, नागपूर, सोलापूर, जालना ही महाराष्ट्रातील व्यापाराची प्रसिध्द केंद्रे दिसून येतात. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांच्या काळातील व्यापार असो अथवा इतर पेशव्यांच्या काळातील व्यापार असो, याचे स्वरूप थोड्याफार फरकाने वरील प्रमाणेच निदर्शनास येते.

## २) पेशवेकाळ व उद्योगधंदे -

सर्वसाधारणपणे १७१३ ते १८१८ हा मराठ्यांच्या इतिहासामध्ये पेशवे कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडामध्ये अनेक पेशव्यांनी आपापल्या परीने मराठ्यांच्या अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यासाठी त्यांनी काही धोरणात्मक निर्णयही घेतल्याचे दिसून येते. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनीही स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी या मध्यमातून मराठ्यांची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. एवढेच नव्हे तर मराठा मंडळ स्थापन करून उत्कृष्ट लष्कर, सैन्य, घोडदळ, पायदळ, शस्त्रास्त्र साठा विभाग, आधुनिक बनवून मराठा राज्य लष्करी व आर्थिकदृष्ट्या बलवान करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यानंतर बाजीराव पहिले यांनी तर उत्कृष्ट घोडदळ तयार केले. त्यांच्या कर्तृत्वाचे वर्णन जदुनाथ सरकारने उत्कृष्ट घोडदळाचा असामान्य सेनापती पेशव्यांच्या मालिकेतील सर्वात पराक्रमी पेशवा असे केलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर बाजीराव पेशव्यांनी २० वर्षे अखंड मोहिमा आखल्या. उत्तर हिंद, दक्षिण हिंद, या भागातून मराठ्यांच्या वर्चस्व निर्माण करून

चौथाई, सरदेशमुखी वसूल केली व मराठ्यांचे आर्थिकदृष्ट्या पाया घालण्याचा प्रयत्न केला. परंतु सतत मोहिमा केल्यामुळे मोहिमेसाठी भरपूर पैसा खर्च झाला, याला पर्यायही नव्हता. त्यानंतर नानासाहेब पेशवे यांनी मात्र आपल्या प्रदीर्घ एकवीस वर्षाच्या काळामध्ये वडीलांचे राहिलेले कार्य पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. या एकवीस वर्षाच्या कालखंडात त्यांनी राजकीयदृष्ट्या प्रामुख्याने आर्थिक वृध्दी घडवून आणली. आर्थिक घडी उत्तम प्रकारे बसवून राज्य सुसंपन्न बनविले. याशिवाय राज्याच्या सुरक्षेच्यादृष्टीने उत्कृष्ट सैन्य, सैन्यासाठी घोडदळ, पायदळ, शस्त्रसाठा, पोशाख याशिवाय तोफखान्यासारखी मोठी शस्त्रांचा अद्ययावत करून घेतला. तोफखान्यासाठी तर अव्वल दर्जाचा इब्राहीमखान गार्दी याची नेमणूक करण्यात आली होती. प्रशासनाबरोबर आर्थिक क्षेत्रामध्ये राज्य आर्थिकदृष्ट्या प्रबळ तर केलेच परंतु हे राज्य प्रबळ करण्यासाठी विविध उपाय योजनांचा अवलंब करण्यात आला. त्यासाठी सुनियोजन करून वेगवेगळे टप्पे, विभाग करून त्यावर नियंत्रण करणारे अधिकारी, पदधिकाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली. या सर्वावर त्यांचे प्रत्यक्ष नियंत्रणसुध्दा त्यांनी केले होते. त्यामुळेच राज्याची उत्कृष्ट बांधणी होवून राज्य विस्तारत गेले. त्यामुळे मराठ्यांचे वर्चस्व निर्माण करण्यातसुध्दा ते यशस्वी झाले.

नानासाहेबांच्या काळामध्ये फार मोठे उद्योगधंदे निर्माण झाले नाहीत. मात्र लहान लहान उद्योग मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. या काळातील उद्योगधंदे **एस. एस. आय. (स्मॉल स्केल इंडस्ट्री)** असे लघु व कुटीरोद्योग निर्माण करण्यात आले. युध्द साहित्याचे कारखाने बऱ्याच मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आले. ते सरकारी मालकीचे होते. अशा प्रकारे एकूणच पेशवे कालखंडाचा विचार करत असताना सुरुवातीच्या चार पेशव्यांनी मराठी राज्याची आर्थिक घडी बसविण्याचा प्रयत्न केला असला तरी या सर्वांमध्ये नानासाहेब पेशवे यांच्या कालखंडाला २१ वर्षाची दीर्घ स्थिरता मिळाल्यामुळे व मराठी राज्याचा अटकेपार विस्तार झाल्यामुळे या काळातील मराठ्यांचे राज्य आर्थिकदृष्ट्या बळकट व सुसंपन्न बनले. या सर्वांचे श्रेय नानासाहेब पेशव्यांनाच द्यावे लागते.

### ३) पेशवे काळातील उद्योगधंद्यांची वैशिष्ट्ये -

१) या काळात लघुउद्योग, कुटीरोद्योग असे लहान लहान उद्योग मोठ्या प्रमाणात निर्माण झाले.

२) या काळातील उद्योगधंदे, शेती व आर्थिक बाबीशी निगडीत होते.

३) या काळातील उद्योगधंदे घरगुती तसेच कुटुंबाशी निगडीत असणारे होते.

४) ता काळातील उद्योगधंदे ग्रामीण क्षेत्राशी निगडीत असले तरी उद्योग धंद्याला लागणारा कच्चा माल शहरातूनच येत असे.

५) या काळातील उद्योगधंदे मागणी व पुरवठा या तत्त्वावर चालत असे. अशा प्रकारे पेशवे काळामध्ये उद्योगधंद्यामध्ये झालेली वाढ आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली.

### ४) नानासाहेब पेशवे यांचे उद्योग-व्यवसायविषयक माहिती

### १) विणकर उद्योग -

विणकर उद्योगाची सुरुवात मध्ययुगीन कालखंडापासून अस्तित्वात असली तरी हा उद्योग एक महत्त्वाचा उद्योग मानला जात होता. भिवंडी, नागपूर, येवला, चौल, पैठण या ठिकाणचे व्यावसायिक विशिष्ट परंपरेचे होते. नानासाहेब पेशव्यांनी खास करून विणकाम व्यवसायाला विशेष प्राधान्य व प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. विणकर व्यवसायात मोमीन आणि खत्री लोकांचा समावेश असे. हे लोक व्यावसायिक होते. प्रामुख्याने सोलापुरी धोत्रे, नागपुरी व चांदवडी धोतराच्या तोडीची असत. पुणे शहराच्या सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणात डॉ. धनंजय गाडगीळ यांनी असे म्हटले आहे की, इतकेच नव्हे तर नानासाहेब पेशव्यांनी विणकर व्यवसायाला चालना देण्यासाठी विणकरांना वतने दिल्याचे दिसून येते. विणकरांना पेशव्यांनी पुण्यात बोलावून त्यांची व्यवस्था करीत. येवले व पैठण येथील विणकर प्रसिध्द होते. त्यांचे मखमलीच्या कापडाचे हातमाग होते. असे सांगतात, रघुजी नाईक बारामती करांनीही येवले येथे गुजराती विणकरांना खास आणल्याचे दिसून येते. बंगाल, चीन, इराण येथून रेशीम आयात केले जात असे. विणकरांच्या संदर्भातील नानासाहेबांचे धोरण उदार मतवादी असल्याचे दिसून येते. अशा

प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी विणकर उद्योगाला प्रोत्साहन दिल्यामुळेच महाराष्ट्रात हा उद्योग वाढीस लागला. परिणाम राज्याची आर्थिक वाढ झाली. पैठण शहर तर रेशमी कापडासाठी प्रसिध्द होते. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये अनेक विणकरांना राजाश्रय मिळाल्यामुळे विणकामाच्या उद्योगात क्रांती घडून आली.

### २) लाकूड उद्योग -

नानासाहेब पेशव्यांच्या काळात खेडे आणि शहरातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी लाकूड कामावर आधारित अनेक उद्योग सुरू झाले. लाकूड कामातील शेतीसाठी लागणारी औजारे, शहरी फर्निचरसाठी असे छोटे-मोठे उद्योग या काळात सुरू झाले. प्रामुख्याने श्रीमंतांच्या गरजा भागविणे त्याचबरोबर वाहतुकीसाठी गाड्या, सामान वाहून नेण्यासाठी छकड्या, पालख्या करणारे सुतारही कुशल काम करू लागले. मोठमोठे वाडे बांधण्यातही सुतार वाक्‌बगार होते. १७५० ते ५१ या कालखंडात नानासाहेबांनी पुण्यामध्ये महाराष्ट्रातून चांगले सुतार बोलावल्याचे उल्लेख मिळतात. या सुतारांकडून श्रीमंतांचे मोठे वाडे, वाड्याला लागणारे लाकडी खांब, हस्तकला, त्याचबरोबर तोफांचे गाडे तयार करून घेतले जात. अहमदनगर येथील सुतार या कौशल्यामध्ये परिपूर्ण होते. जवळ जवळ सर्वच पेशवे धार्मिक श्रध्देवर विश्वास असल्याने अनेक नद्यांकाठी त्यांनी देवळे, मंदिरे बांधले. तीर्थक्षेत्र निर्माण केली. वैभव वाढविले. प्रामुख्याने गोदावरी, प्रवरा, कृष्णा, मुळा-मुठा या नद्यांवर मोठमोठी धार्मिक तिर्थक्षेत्रे दिसून येतात. आजही त्याच्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा दिसून येतात. **'पेशवाईच्या सावलीत'** या ग्रंथात ना. गो. चाफेकर यांनी लाकडी वाघ, कासव या वस्तूही पेशवे सुतारांकडून करवून घेत असल्याचे निदर्शनास येते. नानासाहेब पेशव्यांनीही सुतारकाम शैलीला वेगळे, विशिष्ट असे वळण देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांचा पुरोहित देवराव महादेव हिंगणे याने १७५० ते ५१ या काळामध्ये दिल्लीहून पारंगत व तरबेज असलेले मुस्लिम सुतार पुण्याला आणल्याचे निदर्शनास येते. त्यामुळेच आजही पुणे व नाशिक येथे ठिकठिकाणी मुस्लिम पध्दतीचे लाकूडकाम व सुतारकाम नक्षीचे कौशल्याचे

काम पहावयास मिळते. अशा प्रकारे लाकूड कामावरील आधारित उद्योगाला नानासाहेब पेशव्यांचे प्रोत्साहन व चालना दिली एवढेच नव्हे तर वतनेही दिली. म्हणूनच अर्थव्यवस्थेला मजबुतीकरणाचे स्वरूप आले.

३ ) धातूकामावर आधारित उद्योग -

नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठी राज्याला स्थिरता मिळू लागली. विस्तार होऊ लागला तसतसे नवीन व्यवसाय, उद्योग महाराष्ट्रात सुरू झाले. पूर्वी लोहार, सोनार, तांबट यांचे उद्योग फक्त खेड्यापुरते मर्यादित होते. या काळात मात्र या उद्योगाचे क्षेत्र व्यापक बनले. या उद्योगांना बाजारपेठा मिळाल्यामुळे लोहार, तांबट, सोनार यांच्या धंद्याचे स्वरूप बदलत गेले. त्यामधून नवीन धंदे सुरू झाले. लोहाराचा धंदा शेतीपूरता मर्यादित न राहता सैन्याला लागणाऱ्या लोखंडाच्या विविध वस्तूंची गरज भागवू लागला. घोड्याच्या खोगीराला लागणारी रिकीब, नाला, बैठक हे साहित्य लोहार तयार करू लागले. पनवेलजवळ शिरढोण येथे तोफा तयार करण्याचे काम लोहार करू लागले. नानासाहेब पेशव्याच्या प्रदेश विस्तार धोरणामुळे पुण्यामध्ये सैन्याची ये-जा वाढू लागली. शस्त्र-घोडे खरेदीचे प्रमाण वाढले. नाला-बंदीचे काम वाढले. त्यामुळे या कालखंडामध्ये लोहार धंदा तेजीला आला. याचबरोबर पितळी आणि तांब्याच्या पट्याच्या व्यवसायही पुण्यामध्ये जोरात सुरू झाला. तांबट तोफा तयार करू लागले. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांच्या प्रदेश विस्ताराच्या धोरणामुळे लोहार, तांबट, सोनार इत्यादी व्यावसायिकांना संधी मिळत गेली. परिणामी नानासाहेबांची अर्थव्यवस्था बळकट होत गेली.

४) हस्तीदंती उद्योग -

हस्तीदंती उद्योगामध्ये पेशवे काळामध्ये खऱ्या अर्थाने सुरुवात सवाई माधवरांच्या काळात सुरू झाली असे म्हटले जाते. असे जरी असले तरी हस्तीदंती उद्योगाला प्रोत्साहन देण्याचे काम नानासाहेब पेशव्यांनीही केल्याचे दिसून येते. नानासाहेबांनी 'आबाजी आवा' या कुशल कारागीराच्या सहाय्याने पुण्यात हस्तीदंती कारखाना सुरू करून हस्तीदंती व्यवसायातून राज्याची आर्थिक व्यवस्था बलवान केल्याचे उघडकीस येते.

### ५) कुंभार व्यवसाय -

नानासाहेब पेशव्यांनी कुंभार उद्योगालाही चालना दिल्याचे आढळून येते. श्रीमंत लोक तांब्याची व पितळेची भांडी वापरत नसत. त्यामुळे त्यांना मातीच्या भांड्याची गरज होती. पाटलाच्या घरातसुध्दा उतरंडीला मातीची गाडगीच असत. तेव्हा मातीची भांडी हा दैनंदिन गरजेचा भाग म्हणूनच नानासाहेबांनी या व्यवसायाकडे लक्ष दिलेचे दिसून येते. कुंभाराच्या चाकाला वार्षिक तीन रुपये कर घेतला जात असे. संकटप्रसंगी कुंभाराला या करातून सूट दिल्याचे इतिहासाच्या वर्णनामध्ये सांगितले आहे.

### ६) गुऱ्हाळ उद्योग -

पेशवे काळात गुऱ्हाळ उद्योग हा एक आवश्यक उद्योग होता. गूळ हा उद्योग शेतीसंबंधित असल्याने उसापासून गूळ तयार करण्यासाठी शेतीमध्ये ठिकठिकाणी गुऱ्हाळे लावली जात असत. त्यासाठी आपल्या राज्यात ऊस मोठ्या प्रमाणात पिकवला जात असे. ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यामध्ये सूट दिली जात असे. महाराष्ट्रात इंदापूर, करडे या भागात उसाच्या मोठ्या प्रमाणात गुऱ्हाळे दिसून येतात. गूळ तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, उंदिरगाव व सुपे या भागातून मागवला जात असे. गुळावर कर आकारणीच्या माध्यमातून महसूलात वाढ होत असे. यामुळेही नानासाहेबांच्या आर्थिक व्यवस्थेला थोडाफार आधार मिळत असे.

### ७) सोनार (सराफ) उद्योग -

नानासाहेब पेशव्यांनी या व्यवसायाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे दिसून येते. कारण श्रीमंत तसेच राजे, सरदार, उंबराव, वतनदार, देशमुख, देशपांडे हे लोक सोन्या-चांदीचे दागिने वापरणारे होते. हा व्यवसाय वंशपरंपरेने करणारे सोनार पुण्यात दिसून येतात. सोन्याच्या या दागिन्यामध्ये पाटल्या, बांगड्या, मंगळसूत्र, लफ्फा, कंठीमाळ, बाजूबंद, साखळी, झुबे, नथ, नुपूर, कर्णफुले, अंगठी, कडे आदि प्रकारचे सुवर्णालंकार तयार केले जात असे. याचबरोबर देवालयासाठी सोन्या-चांदीच्या मूर्ती, मुकुटे, वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार केले जात असत. नानासाहेब पेशव्यांनी पुण्याला पर्वती देवालयामध्ये सुवर्णलंकाराचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला अद्यापही आढळून येतो. वैद्य

व खाजगीवाले यांच्या दप्तरातून हिऱ्यांच्या दागिन्यांचीही माहिती मिळते. हिऱ्याचे ताईत तर पुण्यात प्रसिध्द होते. सोन्या-चांदीच्या धाग्यांचे काम केलेल्या कापडांसाठी आणि पागोट्यासाठी महाराष्ट्र प्रसिध्द होता. पैठणप्रमाणे जालनापूर हे सुती कापड व रेशमी कापड उत्पादनाचे प्रमुख केंद्र होते. पेशवा रोजनिशी खंड क्र. ८, पान नं. १०७६, ७७ सन १७९६ मधील एका पत्रावरून चांदीचा धागा बनविण्याची पध्दत समजून येते. अशा प्रकारे या व्यवसायाला नानासाहेब पेशव्यांच्या काळात भरभराट आल्यामुळे आर्थिकदृष्ट्या मराठी राज्याचा कणा सुव्यवस्थित व स्थिर झाला.

**८) गव्याच्या शिंगांचा उद्योग -**

नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये विजयदुर्ग, मालवण, राजापूर या भागातून कारागीर गव्याची शिंगे व विविध प्रकारच्या पक्षांच्या आकृती तयार करून विक्री करणारे कारागीर या काळात मोठ्या प्रमाणात होते. या गव्याच्या शिंगापासून टिकाऊ स्वरूपाच्या वस्तू तयार केल्या जात असत. उदा. प्रामुख्याने शाईची दौत ठेवण्यासाठी ट्रे, कप, देवतांच्या मूर्ती चहादाणी ठेवण्यासाठी ट्रे, तपकिरीच्या पेट्या, कंगवे, मूठ इ. आकर्षक व कौशल्यपूर्ण वस्तूंना मागणी असल्यामुळे किंमतीसुध्दा व्यवस्थित होत्या. हौसेला मोल नाही त्याप्रमाणे श्रीमंत सरदार, देशमुख, देशपांडे आदी लोक या वस्तू मोठ्या प्रमाणावर खरेदी करत असत. त्यामुळे या वस्तूमधून कर स्वरूपात चांगले उत्पन्न मिळत असे.

**९) खाद्य तेल उद्योग -**

महाराष्ट्रामध्ये तेल निर्मिती उद्योग हा महत्त्वपूर्ण व्यवसाय मानला जात असे. या उद्योगाला पेशवे काळामध्ये महत्त्वाचे स्थान होते. तेल काढण्याचे काम तेली करत असत. सरकी, भुईमूग, सूर्यफूल, जवळ, करडई, तीळ आदी पिकांच्यापासून तेल काढण्याचे तंत्र विकसीत होऊन हा उद्योग मोठ्या प्रमाणात केले जात असे. प्रत्येक भागामध्ये तेलघाणे असत. या तेलघाण्यावर ५-६ रुपये वार्षिक कर आकारला जात असे. पुणे व संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारचे तेल घाणे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याची नोंद आहे. या तेल उद्योगातून चांगला महसूल कररूपाने गोळा केला जात असे. त्यामुळे

ही उत्पन्नाची बाबही राज्याच्या आर्थिक दृष्टीकोनातून उपयोगाची ठरत गेली.

१०) जहाज बांधणीचा उद्योग -

मराठ्याच्या इतिहासामध्ये आरमाराला महत्त्वाचे स्थान होते. छत्रपती शिवरायांनी काळाची गरज ओळखून आरमाराची उभारणी केली. पेशवे काळातही महाराष्ट्रामध्ये पश्चिम किनाऱ्यावर आरमाराचा विकास होत गेला. त्यामध्ये जहाज बांधणी उद्योग हा एक महत्त्वाचा उद्योग होता. कोकणामध्ये कल्याण, भिवंडी, अलिबाग, कुलाबा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, मालवण, सुवर्णदुर्ग या ठिकाणी जहाजबांधणी उद्योग, मोठ्या प्रमाणात चालवला जात असे. मुंबई तर जहाज बांधणीच्या उद्योगासाठी प्रसिध्द बंदर होते. मुंबईच्या वाडीया घराण्याचा जहाज बांधणी उद्योगामध्ये हातखंडा होता. कोकणामध्ये जहाज बांधणीचे काम हिंदू लोक करीत असत तर वसई, दमण, गोवा या ठिकाणी ख्रिश्चन लोक जहाज बांधणीचा उद्योग करत असत. अलिबाग येथील आंग्रे घराण्याचा जहाज बांधणीचा डॉकयॉर्ड आणि विजयदुर्ग येथील धुळपांचा डॉकयॉर्ड प्रसिध्द होता. सागवाणी लाकडाचा उपयोग जहाजबांधणी मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात असे. जहाज तयार झाल्यानंतर त्याचा टिकाऊपणा वाढावा म्हणून खोबरेल व गोडेतेल यांचे मिश्रण करून, रेक्झीनमध्ये मिसळले जात असे व जहाजांना त्याचा लेप लावला जात असे. या पाठीमागे कीड लागू नये किंवा सागरी किड्यांपासून जहाजांचे संरक्षण व्हावे हा होता. नानासाहेब पेशव्यांनी १७४९ मध्ये माझगाव डॉकयॉर्ड जहाजबांधणी येथील उद्योगाला प्रसिध्दीस आणले. या ठिकाणी जहाज उद्येगाची भरभराट केली. जहाज उद्योगाला चालना, प्रोत्साहन दिले एवढेच नव्हे तर नानासाहेब पेशव्यांनी जहाज मालकाला जकातीमध्येही सूट देण्याची पध्दत सुरू केली. कारण जहाजांचा वापर समुद्रातील वरील चाचेगिरी, इंग्रज, पोर्तूगीज, सिध्दी यांची चालणारी अरेरावी, या परकीय सत्तेबरोबर संघर्ष करण्यासाठी युध्द कामात या शिबाड जहाजांचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेण्याचे धोरण पेशव्यांनी राबविले. अशा रितीने स्वराज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीकोनातून हा उद्योग अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला गेल्याने या धंद्यावर विशेष असे लक्ष ठेवण्यात आले होते.

### ११) बांधकाम उद्योग -

महाराष्ट्रामध्ये पुणे व परिसर या भागामध्ये नानासाहेब पेशव्यांच्या सत्तेला स्थिरता मिळाल्यामुळे आणि दीर्घ अशी २१ वर्षांची कारकीर्द मिळाल्यामुळे सरकारी व खाजगी स्तरावर पेशव्यांनी बांधकाम उद्योगाला चालना दिल्याचे निदर्शनास येते. खाजगी वाडे, धर्मशाळा, देवळे, मोठे घाट, नदीकाठची तीर्थक्षेत्रे, तलाव, लाकडी पूल इत्यादी बांधकाम व्यवसाय पूर्ण करण्यात आले. याशिवाय सर्व प्रकारच्या उद्योगास लागणारे बांधकाम, घरांसाठी आणि इतर कारणांसाठी बांधकाम उद्योग भरभराटीस आणला. पेशवे धार्मिक वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी भव्य अशी मंदिरे बांधली. त्यामध्ये वटेश्वर, देवदेवेश्वर, शंकुतेश्वर, बनेश्वर, शंभु महादेव आदी मंदिरांचा प्रामुख्याने नामोल्लेख करावा लागतो. पुणे, सासवड, वडूज, नाशिक, वाई, शिवगण, सुपे याठिकाणी उत्तम प्रकारची मंदिरे बांधली. विशेष म्हणजे वाईही नानासाहेब पेशव्यांची सासरवाडी असल्याने तेथे बांधलेली मंदिरे व मंदिरातील मूर्ती जर पाहिल्या तर एक कुतुहल निर्माण होईल असे वाटते. उमा महेश्वर, गोरा राम, अहिल्याबाई वास्तू, निळकंठेश्वर, काळा राम इत्यादी मंदिरे तर शिल्पकलेच्या बाबतीत नावारूपास व प्रसिध्दीस आली आहेत. बांधकाम क्षेत्रातील एक खास बाब उल्लेख करावीशी वाटते, ती अशी की, बांधकाम करीत असताना एखादा कामगाराचा मृत्यू झाला अथवा बांधकामावर अपघाताने दु:खापत किंवा इतर कारणाने दु:खापत झाली तर त्याच्या नातेवाईकांना त्याची नुकसान भरपाई देण्याची विशेष काळजी पेशवे घेत असत. उदा. मिरजेचा किल्ला बांधत असताना एका पाथरवटाचा मृत्यू झाला. तेव्हा पेशव्यांनी त्याच्या वारसाला वर्षाला २० रुपये नुकसान भरपाई दिल्याचे नोंद आढळून येते.

### १२) मादक द्रव्ये उद्योग -

पेशवे काळामध्ये या उद्योगाकडे दक्षतेने लक्ष दिले जात असे. कारण परवानगी असेल त्यालाच हा उद्योग करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असे. नारळ, नारळापासून मद्य तयार करण्याची प्रक्रिया कोकणातही कोळी व भंडारी या जमाती करीत असत. ख्रिश्चन लोकांनाही पेशव्यांनी दारू,

गाळण्याची परवानगी दिल्याची नोंद पेशवे दप्तरात आढळून येते. पेशवे दारू गाळणाऱ्यावर व हा व्यवसाय करणाऱ्यांच्याकडून कर रूपात महसूल गोळा केला जात असे. ज्याच्या ताडाच्या झाडापासून दारू निर्माण करण्याचे काम केले जात असे त्या झाड मालकावरही कर बसविल्याची नोंद पेशवे दप्तरात दिसून येते. या माध्यमातूनही राज्याच्या आर्थिक घडीसाठी कर स्वरूपाचा जो महसूल गोळा होत असे तो कामी येऊन राज्याच्या तिजोरीत भर पडत असे.

**१३) मत्स्य उद्योग -**

महाराष्ट्राच्या पश्चिमेला भव्य अशा स्वरूपाचा समुद्र किनारा लाभलेला आहे हे सर्वश्रुत असून या ठिकाणी मत्स्य उद्योग हा पूर्वापारपासून चालत आलेला आहे. मुंबई, साष्टी, वसई या ठिकाणी मासेमारीचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत असे. तलावामधील मासेमारीचे कंत्राट खाजगी लोकांच्याकडे असे. त्यामधूही पेशव्यांना कंत्राटदारांकडून मासेमारीच्या उद्योगामधून महसूल मिळत असे. मत्स्य उद्योगात प्रामुख्याने कोळी लोकांचा मासे मारण्याचा हातखंडा होता. खारवलेले मासे बाजारात मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आणले जात असे. पेन, पनवेल, कल्याण, रोहा, नागोठाणा, आष्टी याठिकाणी बाजारपेठामध्ये मोठ्या प्रमाणात हा मत्स्य व्यवसाय चालत असे. त्यामुळे या व्यवसायातून कर रूपाने भरपूर पैसे सरकारच्या तिजोरीत जमा होत असे. त्यामुळे या उद्योगालाही चालना देण्यात आली होती.

**१४) युध्द सामग्रीचे उद्योग -**

महाराष्ट्रामध्ये मराठ्यांच्या इतिहासामध्ये युध्द साहित्याचे कारखाने छ. शाहूंनी वाढविल्याचे निदर्शनास येते. त्यासाठी छ. शाहूंनी मुंबईच्या गव्हर्नरकडून १७१३ मध्ये युध्द सामग्री मागितल्याची नोंद छ. शाहू दप्तरात आढळून येते. पेशव्यांनीही पुणे आणि परिसरामध्ये युध्द साहित्याचे कारखाने सुरू केल्याची नोंद पेशवे दप्तरात मिळते. इंग्रज मराठ्यांना युध्द साहित्य देण्यास कधीही उत्साही दिसत नव्हते किंबहुना युध्द साहित्य देत नव्हते. छत्रपती शिवरायांनीही इंग्रजांचेकडे तोफा-बंदुकांची मागणी केल्याची नोंद आहे. परंतु त्यांनाही इंग्रजांनी नकार दिल्याचे आढळून येते. त्यामुळे शिवरायांनी राजापूर

वखार नुकसान भरपाईची घोंगडे भिजत पाडल्याचे निदर्शनास येते. कान्होजी आंग्रे या मराठी आरमार प्रमुखाने इंग्रजांच्याकडे दारू व तोफेच्या गोळ्याची मागणी केली. परंतु इंग्रजांनी त्याला दाद दिली नाही. बाजीराव पहिल्याने तोफा ओतण्यासाठी १७३९ मध्ये फौन्ड्री सुरू केली. तोफांचे गोळे तयार केले. इंग्रज अधिकारी जॉर्ज फॉरेस्ट म्हणतो, जुन्नर, नागोठाणे, कल्याण, आंबेगवाण येथे मराठ्यांचे युध्द सामग्रीचे कारखाने होते. नानासाहेब पेशव्यांनीही यामध्ये या उद्योगात वृध्दी करून, या उद्योगास प्रोत्साहन दिले होते. पेशवा माधवराव (पहिले) यांनीही पुणे आणि पुरंदर परिसरामध्ये युध्द साहित्याचे कारखाने काढल्याच्या नोंदी दिसून येतात. कारखान्यामध्ये सुतार, लोहार, बाणांचे कारागीर, गोळ्यांचे कारागीर, गोलंदाज, दर्यावर्दी जमादार, ढालाईत, सदुंकांचा हवालदार, बेलदार, जेजालदार, जासूद, भालदार, आरेकरू, शिंपी, पखालेवाले, परीट, खासदार, तबलेदार, कलाल, कोठावळे, फरास, रखवान, बारगीर आणि गार्दी जवळजवळ दीडशे ते दोनशे वेगवेगळ्या जातींचे लोक कारखान्यामधून युध्द साहित्य तयार करण्याचे काम करीत होते. नाशिक येथील रॉकेट-जेजालचा कारखाना प्रसिध्द आहे. तेथे जवळजवळ २७० रॉकेटस् तयार करण्याचे क्षमता दिसून येते. यावरून पेशवेकाळामध्ये हा उद्योगधंदा संरक्षणाच्या दृष्टीने नानासाहेब पेशव्यांनी स्वतः जातीने लक्ष पुरवून हा उद्योग मोठा केला आणि उद्योगाला भरभराटीस आणले.

**१५) मिठागराचा उद्योग-**

पेशवे काळामध्ये मिठागरे उद्योग हा स्वतंत्र उद्योग होता. ऋतुमानानुसार पश्चिम किनाऱ्यावर केळवे, भाईंदर, राजापूर, नागोठाणा, पेण, पनवेल, हवेली, दाभोळ, चिपळूण, ठाणे या ठिकाणी मीठ उद्योग हा महत्त्वपूर्ण उद्योग मानला गेला होता. प्रत्येक मिठागरावर कर आकारणी केली जात असे. साधारणपणे एका मिठागरावर एक टक्का कर आणि प्रत्येक मनावर २ रु. १० आणे जकात लावली असे. राजापूर येथील मिठागरावर प्रत्येक खंडीला सहा रुके जकात घेतली जात असे. मीठ तयार करणाऱ्यावर रोख स्वरूपात कर आकारला जात असे. बाहेरच्या राज्यातून कोणीही मीठ महाराष्टात आणणार नाही, याची दक्षता नानासाहेब पेशव्यांनी व इतरही

पेशव्यांनी घेतल्याचे दिसून येते. मुंबई, सातारा, पुणे व इतर परिसरामध्ये मीठ विक्री मोठ्या प्रमाणावर होत असे. या उद्योगातून राज्याच्या आर्थिक व्यवस्थेला कर रूपाने मोठा हातभार लागत असे.

१६) कागद कारखाने उद्योग -

पेशवे काळामध्ये कागद कारखाना उद्योग हा घरगुती स्वरूपाचा उद्योग होता. जुन्नर, दौलताबाद येथे चांगल्या प्रकारचा कागद तयार होत असे. नानासाहेब पेशव्यांनी स्वतः या उद्योगाला प्रोत्साहन देवून अशा लोकांना घरे व कारखाने उभे करण्यासाठी मोफत जागा देण्याचे धोरण आखल्याचे निदर्शनास येते. मात्र पुढील काळात हा उद्योग मागे पडत गेला.

१७) कपडे रंगविण्याचा उद्योग -

पेशवे काळामध्ये पुणे आणि पुणे परिसरामध्ये कपडे रंगविण्याचा उद्योग चालत असे. पुण्याबाहेरून वेगवेगळे रंग आणून आकर्षक कपडे तयार केले जात असत. अशा प्रकारे रंगकाम उद्योग हा एक उद्योग व्यवसाय म्हणून पेशवे काळात नावारूपाला आणला गेला.

१८) चर्मकार उद्योग -

पेशवे काळामध्ये चर्मकार म्हणजे चांभार उद्योग सुरू होता. चामड्याची पादत्राणे, चपला, बूट याशिवाय चामड्याच्या वस्तू, घोड्यांची घोगीरे, शेती औजारे, चामड्याची मोट, वेगवेगळी वाद्ये तयार केली जात होती. दोरा ही जमात चर्मकारांची एक स्वतंत्र जमात हे काम करीत असे. दोरा यांच्या दुकानावर वार्षिक ४ रुपये इतका कर लावला जात असे व तो वसूलही केला जात. नानासाहेब पेशव्यांच्या काळात मराठ्यांचा प्रदेश विस्तार या धोरणामुळे घोडदळाला खास महत्त्व आले. घोड्याचे खोगीर बनविण्याचे काम जिनगर जातीचे लोक करीत. त्यामुळे खोगीर बनविणे हा सुध्दा स्वतंत्र व्यवसाय बनून खोगीरासाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध करून देण्याचे काम पेशवे काळात झाल्याचे निदर्शनास येते.

दोरखंड तयार करणारे मांग होते. खेड्यात व शहरात हे दोरखंड विकले जात असून सैन्याच्या वापरासाठी दोरखंडाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे. या व्यवसायावर मोठ्या प्रमाणात काम करणारे कामगार होते.

यातून समाज व शासनाच्या गरजा पूर्ण होत असत.

अशा प्रकारे पेशव्यांच्या काळामध्ये उद्योग व्यवसाय विकसीत होत गेले. उद्योग व्यवसायात चांगलीच वाढ होत गेली. या उद्योग व्यवसायांना प्रगती करण्यासाठी, त्यात वाढ करण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी केलेले योगदान महत्त्वाचे वाटते. कारण या पेशव्यांच्या काळात या उद्योगधंद्यामार्फत आर्थिक भरभराटही होत गेली त्याचप्रमाणे राज्यासाठी लागणारा महसूल जमा होत होता व त्यातून राज्याची गरज भागत होती. राज्याला सुबत्ता, संपन्नता येत गेली. परिणाम मराठ्याच्या राज्याच्या आर्थिक विकासात भर पडली हेच वरील उद्योग विश्लेषणावरून स्पष्ट होत आहे.

## ५.३ नानासाहेब पेशवे व परराष्ट्रविषयक व्यापार धोरण

मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये मराठेकालीन उद्योग आणि व्यापार प्रामुख्याने कापड, रेशम, धातूची भांडी, कागद, साखर, मीठ, कातड्यांच्या वस्तू, अलंकार इत्यादींचा व्यापार व उद्योग मध्ययुगीन काळापासून मोठ्या प्रमाणात परंपरागत चालत आलेला आहे.

१७ व्या शतकामध्ये यादवांचा काळ सोडला तर परकीय सत्ताधीशांच्या वर्चस्वाखाली महाराष्ट्राची ससेहोलपट झाली. व्यापार वृत्तीस या काळात पोषक असे वातावरण मिळाले नाही. डोंगराळ प्रदेश, निकृष्ट जमीन जलवाहतुकीस योग्य अशा मोठ्या नद्यांचा अभाव, प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती यामुळे महाराष्ट्रातील व्यापार भरभराटीस आलेला दिसत नाही. मात्र १७ व्या शतकाच्या मध्यात या क्षेत्रात मूलगामी बदल होऊ लागले. याचे श्रेय छ. शिवरायांच्या कार्याला द्यावे लागेल. शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील व्यापार उद्योगांचा विकास होऊ लागला, नवनवीन संधी उपलब्ध होऊ लागल्या, सागर मार्गाने होणारा व्यापार, नदीमार्गाने होणारा व्यापार, खुश्की व घाट या मार्गाने होणारा व्यापार. त्यामुळे व्यापारात बदल होत गेले. मोठमोठ्या बाजारपेठा निर्माण झाल्या. कसबा आणि पेठ, ही शिवकाळातील व्यापारी केंद्रे होती. पेठेला अनेक कायम स्वरूपाची दुकाने वसलेली असत. बाजाराच्या दिवशी बाहेरील व्यापारी कसब्याच्या ठिकाणी आपला घेऊन जात असत. शेटे, महाजन हे वंश

परंपरागत अधिकारी पेठेतील व्यापार नियंत्रण ठेवीत. या काळामध्ये शिवरायांनी व्यापारविषयक धोरणाला प्रोत्साहन दिले.

पेशवे कालखंडातील औद्योगिक आणि व्यापारी केंद्रे महाराष्ट्रामध्ये सर्वसाधारणपणे १७१३ ते १८१८ हा कालखंड पेशवेकालीन मानला जातो. या कालखंडामध्ये परंपरागत चालत आलेला व्यापार, त्यामध्ये सागरी व्यापार, जमिनीवरील व्यापार आणि जलमार्ग व खुश्कीच्या मार्गाने होणारा व्यापार यामुळे पेशव्यांना विशेष या व्यापाऱ्यांकडे लक्ष द्यावे लागले. कारण शहरांची वाढ झाली होती. बंदरांची वाढ झाली होती. त्यामुळे पेशवे कालखंडामध्ये औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा नामोल्लेख करणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हितावर ठरले गेले.

**१) नानासाहेब पेशवे समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व्यापारी केंद्रे -**

पेशवे कालखंडामध्ये दाभोळ, कल्याण, चौल, भिवंडी, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, राजापूर, कोळसी आणि कोकण ही महत्त्वाची बंदरे असून शिवकाळातही या बंदरांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. पेशवे काळामध्ये विशेषतः नानासाहेब पेशवे काळात त्यांच्या राजवटीला स्थिरता मिळाल्यामुळे वरील बंदरे व्यापार उद्योगाकरिता प्रसिध्दीस आली. रेश्मी कपडे, सुती कापड, अफू, धान्य, मिरे, लाख या वस्तूंची निर्यात केली जात असे. वरील चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, विजयदुर्ग, सिंधुदुर्गसारख्या बंदरामधून महाराष्ट्राचा व्यापार परदेशासी इराण, चीन, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश व श्रीलंका या देशांसी व्यापार चालत असे. नानासाहेब पेशव्यांच्या काळात साखर, मसाले, सुका मेवा या वस्तू युरोपीयन लोकांमार्फत चीन, अफगाणिस्तान, इराण येथून आयात केल्या जात असत. कोकण किनाऱ्यावरील काही महत्त्वाची मोठी व्यापारी बंदरे प्रसिध्द होती. त्यामध्ये नागोठणे, मालाड, चिपळून, मालवण, बेलापूर, रत्नागिरी, वेंगुर्ला, पनवेल इत्यादी बंदरातून आयात निर्यात चालत असे. येथील व्यापार देशांतर्गत व देशाबाहेर बाजारपेठेत पोचवला जात असे. प्रामुख्याने लमाणी लोकांची काफिले बैल, उंट, घोडे यावरून वस्तू वाहून नेल्या जात असत. नानासाहेब पेशवे चैनीच्या वस्तू उदा. मेणबत्ती, गुलाबपाणी, रंगीत काच, आरसे, घड्याळे, चष्मे, कॅमेरे इत्यादी

वस्तू मुंबई, दमण, येथील इंग्रज व पोर्तुगीज आणि डच लोकांच्याकडून खरेदी करत. बंदुकीची दारू, शिसे, कापड या वस्तू परदेशातून आयात केल्या जात असत. पोर्तुगीजांच्याकडून बाजीराव पेशव्याने वसई, साष्टी जिंकल्यानंतर नानासाहेब पेशव्याने ही बंदरे विकसित करण्याचा तसेच या बंदरांची प्रगती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. उदा. 'पेशवा रोजनिशी'. या संदर्भानुसार १७४४ मध्ये नानासाहेब पेशव्याने दोन शेणवी व्यापारी - एक विठोजी कृष्णा कामत तर दुसरा पुंडलिक कृष्णा कामत यांना त्यांची पाच जहाजे घेऊन वसई प्रांताच्या अधिकाऱ्याला नानासाहेब पेशव्याने या जहाजातून व्यापारासाठी नेल्या जाणाऱ्या मालावरील जकात करात सवलत, माफी आदेश दिल्याचे नमूद आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी पुंडलिक कृष्णा कामत याला पालखीचा मान देवून, मानाची वस्तत्रे देऊन त्याचा गौरव करण्यास सांगितले. त्याच्या राहणीमानासाठी गोदामाची व्यवस्था केली. त्याचबरोबर नानासाहेब पेशव्यांनी वसई, साष्टी या ठिकाणी स्थायिक होणाऱ्या आणि दुकाने उघडणाऱ्या व्यापाऱ्यांना सवलती दिल्या. त्यांच्या व्यापारावर कर बसविला नाही. त्यांना राहण्यासाठी घरेही देण्यात आली. काही व्यापाऱ्यांच्या वस्तूवील जकात करात आर्धी सवलत देण्यात आली. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांनी समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रांचा विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. या विकासामधून राज्याच्या अर्थव्यवस्थेला आकार दिला.

**२) नानासाहेब पेशवे व अंतर्गत व्यापारी केंद्रे आणि बाजारपेठा**

पेशव्यांच्या कालखंडामध्ये बाळाजी विश्वनाथचा कालखंड असो अथवा बाजीरावचा कालखंड असो. या कालखंडामध्ये त्यांनी आपापल्या परीने अंतर्गत केंद्रे व बाजारपेठा स्थापन करण्याचा प्रयत्न केला असला तरी नानासाहेब पेशव्यांच्या काळात व्यापारी केंद्रे व औद्योगिक केंद्रे यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. याचे कारण नानासाहेब पेशव्यांनी छ. शाहूंच्या मृत्यूनंतर मराठ्यांची राजधानी सातारा ऐवजी पुण्याला आणली व पुण्याचे महत्त्वा वाढविले. त्याचबरोबर सातारा, कोल्हापूर ही शहरे राजधानीची शहरे असल्याने व्यापारासाठी व विविध उद्योगासाठी या शहरांना महत्त्व आले.

नाशिक, पैठाण, पंढरपूर ही तीर्थक्षेत्रे म्हणून या क्षेत्रांची वाढ झाली. तर येवले, सोलापूर, नागपूर ही शहरे औद्योगिक क्षेत्रे म्हणून प्रसिध्दीस आली. नंदूरबार, जुन्नर ही मोक्याची शहरे व्यापारामध्ये महत्त्वाची ठिकाणी झाली. बरामपूर, मिरज ही महामार्गावरील महत्त्वाची शहरे अशा रीतीने नानासाहेब पेशव्यांच्या कालखंडात वरील शहरांचा मोठा विकास होऊ लागला. या मोठमोठ्या शहरात अनेक व्यापारी येऊ लागले. मोठ्या बाजारपेठा व उद्योगधंदे सुरू झाले. नानासाहेब पेशव्याने या व्यापारी लोकांना नवी उपनगरे व पेठा उभ्या करण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निदर्शनास येते. नानासाहेब पेशव्यांच्या काळात प्रत्येक शहर हे बाजारपेठ असे. खेड्यामध्ये आठवड्यातून एकदा किंवा दोनदा बाजार भरत असे. शेतकरी व लहान व्यापारी यांचा माल वाहून नेण्यासाठी बैलगाड्यांचा वापर केला जात असे. शेतकरी हे जसजसे माल पिकवत असत तसतसे ते विकतही असत. नानासाहेबांनी पुण्याला राजधानी बनविल्यानंतर पुण्याची व्यवस्था बदलून शहराचा कायापालट केला आणि पुण्याला नावलौकिक प्राप्त करून दिला.

शहरे आणि मोठ्या पेठा वसविल्या. पुण्याला मराठा साम्राज्याची राजधानी बनविली. गणेशपेठ, गंजपेठ, सदाशिवपेठ, नारायणपेठ, मुसाफरजंग पेठ, नवी पेठ, मंगळवारपेठ, बुधवार पेठ, गुरुवार आणि रविवार पेठ, नागेश पेठ, नवपूरा, भवानी पेठ, मस्तानी पेठ, नरसिंह पेठ, घोरपडी पेठ, हणमंत पेठ व शिवपुरी अशा मोठ्मोठ्या पेठा त्यांनी वसविल्या. नानासाहेब तथा बाळाजी बाजीराव यांच्या कालखंडात या पेठांचा विकास मोठ्या प्रमाणात होऊ लागला. नानासाहेबांच्या काळातील मलकापूर पेठ प्रसिध्द आहे. १७४१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी नारो मल्हार आणि नारो नरहर यांना या मलकापूर उपनगराचे कुलकर्णीपद दिले. बुधवारी पेठेतील कारागीर प्रसिध्दीस होते. गवळी, पाथरवट, कोळशाची वखार चालविणारे, पेट्या बनविणारे अनेक कारागीर या कालखंडात पुण्यात जमू लागले. या कारागीरांच्या सहकार्याने नानासाहेब पेशव्यांनी पुण्याजवळील कात्रज घाटातून शनिवारवाड्यात कात्रजचे पाणी आणले. पुणे आणि परिसरातील नद्यांवर मोठमोठे पूल बांधले. जगातील पहिला लकडी पूल नानासाहेब पेशव्याने

मुळा-मुठा नदीवर बांधून घेतला. नानासाहेब एवढेच नव्हे तर १७४५ मध्ये ''रामजी नाईक आणि बालाजी नाईक भिडे'' यांना २५ हजार रुपयासाठी बुधवारपेठेचा कौल देण्यात आला. प्रतिष्ठित वजनदार स्वत:ची पेठ चालू रहावी किंवा गावामध्ये आपल्याला व्यापार करण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी पेशवे दरबारी विनंती अर्ज करीत. त्यांना पेशवे परवानगी देत असत. पेठेचे प्रमुख शेटे होते. त्यांना शेटे वतन मिळविण्यासाठी पेशव्यांची कायदेशीर परवानगी घ्यावी लागत असे.

त्याचप्रमाणे काही वेळा सरकारी व्यक्तींनाही नवीन व्यापारी नगरे वसविण्यास सांगितले जात असे. यामध्ये प्रामुख्याने जुनी ओसाड नगरे, त्यांचे पुन्हा पुनर्वसन करणेबाबत दक्षता घेतली जात असे. १७४९ मध्ये नानासाहेब पेशवे यांनी आपले वडील बाजीराव पेशवे यांनी पुण्यामध्ये हरीशेठ व सोमशेठ मीरकर या दोन महत्त्वाच्या व्यापाऱ्यांना शुक्रवार पेठ वसविण्यास सांगितली होती. तेव्हा बाजीरावच्या पेशव्यांच्या काळामध्ये व्यापारी पेठा, बाजारपेठा वसविण्यासाठी पेशव्यांचा कल दिसून येतो. मात्र या काळामध्ये बाजीराव पेशव्यांची कारकिर्द सतत मोहिमा व युध्द यामध्ये गेल्यामुळे व्यापारी वर्गाकडे विशेष लक्ष देता आले नाही.

तेव्हा त्यांचा मुलगा नानासाहेब पेशवे यांनी मात्र हरीशेठ व सोमशेठ वीरकर या दोन व्यापाऱ्यांना प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर शेटेपदाचेही वतन दिले. आणि बाजारपेठेच्या संदर्भात पुण्याची भरभराट घडवून आणली. नानासाहेबांनी पुण्याप्रमाणेच इतरही शहरांची आकर्षक बांधणी केली. इतरही शहरांमध्ये व्यापारी पेठा बसविल्या. व्यापारी वर्गाला प्रोत्साहन दिले. शिवापूर ही एक प्रसिध्द बाजारपेठ औद्योगिक केंद्र बनले. बाजीराव पेशव्याच्या काळात या पेठेचा उदय झाला असला तरी या शिवापूर पेठेला नावारूपाला आणण्यामध्ये व सर्वात मोठी एक औद्योगिक केंद्र बनण्यामध्ये आणि या पेठेमध्ये वेगवेगळ्या शहरातून, भागातून, व्यापारी वर्गाला येण्यासाठी प्रोत्साहन देणारे नानासाहेब पेशवे होते. म्हणूनच १७४१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी या पेठेची वाढीव विस्तार होण्यासाठी तेथील व्यापाऱ्यांना सात वर्षासाठी सवलत दिली. याशिवाय पेठेची भरभराट व विस्तार होण्यासाठी आवश्यक

ते सर्व सहाय्य देवून शिवापूर पेठेची यथायोग्य काळजी घेतली. याचबरोबर औरंगाबाद सुब्यातील कसबा, मुखेड याही पेठा अनेक कारणांमुळे बंदच पडल्या होत्या. तेव्हा नानासाहेब पेशव्यांनी १७५१ मध्ये तेथील शेटे, महाजन आणि वाणी यांना बाजार वाढविण्यासाठी पेशव्यांकडून आकर्षक सवलती जाहीर करण्यात आल्या. व्यापारी वर्गाला उत्तेजन देण्यात आले. व्यापाऱ्यांना करामध्ये सूट दिली. त्याचबरोबर नाशिक, धारवाड, येवला, नायगाव, अहमदनगर, देवगिरी इ. व्यापारी केंद्रे वाढविली. याचबरोबर या वरील ठिकाणी टांकसाळही उघडण्यात आल्याने ही शहरे औद्योगिक व व्यापारी केंद्रे म्हणून प्रसिध्द झाली. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये पैठण, नाशिक, नागपूर, सोलापूर, चांदवड, महेश्वर, धनवड, जालना ही कापड, पागोटी, धोतरजोड्या, लुगडी, चिटाचे कापड, सुती व रेशमी कापडांसाठी प्रसिध्दीस आलेली व्यापारी शहरे होती. अशा प्रकारे नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये पुण्यातीलच नव्हे तर पुणे आणि परिसरातील व्यापार भरभराटीला आला. कारखाने, उद्योगधंदे वाढले. पेठा वाढल्या. लोकसंख्या वाढल्या. औद्योगिक केंद्रे वाढली. यामुळे या काळातील व्यापाराला चांगले दिवस आले. त्यामुळे राज्यातील आर्थिक व्यवस्था बळकट होण्यासाठी वरील व्यापार वृध्दीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग झाला.

## ५.४ नानासाहेब पेशवे कालखंडातील व्यापार

इ. स. १३ व्या शतकापासून यादवांचा काळ सोडल्यास १७ व्या शतकापर्यंत महाराष्ट्र हा परकीय सत्तेच्या आणि परकीय आक्रमणाच्या वर्चस्वाखाली भरडला जात होता. व्यापारी वर्गाला पोषक असे वातावरण होऊ शकले नाही. डोंगराळ प्रदेश, निकृष्ट जमीन, जलवाहतुकीच्या अपुऱ्या सोयी, नद्यांचा अभाव, प्रतिकूल भोगोलिक परिस्थिती, व्यापारी वर्गाची उदासिनता यामुळे महाराष्ट्रामधील व्यापार हा भरभराटीला आलेला दिसत नाही. मात्र पुढील काळामध्ये विविध क्षेत्रात, नवे शोध, नव्या वाटा निर्माण झाल्या. क्रांतीकारक असे बदल निर्माण झाले. नव्या विचारसरणीचा उदय झाला. यामुळे महाराष्ट्राचा व्यापार वाढीस लागला. महाराष्ट्राच्या व्यापाराची वृध्दी करण्यामध्ये एक महत्त्वाची घटना म्हणजे १७ व्या शतकातील छ.

शिवरायांचा उदय होय. छ. शिवरायांच्या मूलभूत व उदारमतवादी धोरणांमुळे पुढील काळामध्ये व्यापारी वर्गाला चालना मिळत गेली. या दृष्टीने नानासाहेब पेशवे कालखंडातील व्यापारात प्रामुख्याने अंतर्गत आणि बाह्य या दोन गोष्टींचा समावेश असल्याने त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

### १) नानासाहेब पेशवे व सागरी व्यापार -

नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये महाराष्ट्रामध्ये साखर, मसाले, सुका मेवा इ. वस्तू चीन, अफगाणिस्तान, इराण या देशातून आयात कराव्या लागत असत. या काळामध्ये कोकण किनारपट्टीवर प्रामुख्याने चौल, राजापूर आणि दाभोळ ही सर्वात मोठी बंदरे होती. त्याचबरोबर नागोठाणा, चिपळूण, रत्नागिरी, मालाड, वेंगुर्ला, बलसार, पेण, मालवण, जंभुसार, कोलंबे, बैलापूर ही बंदरेही प्रसिध्दीस आलेली होती. कल्याण आणि भिवंडी ही दोन बंदरे तर नावारूपाला आलेली बंदरे होती. या ठिकाणी अनेक व्यापारी जहाजे भेट देत असत. देशांतर्गत व देशाबाहेर दूरवर निरनिराळ्या बाजारपेठांमध्ये येथील बंदरातून माल जात असे आणि माल आयातही होत असे. मेणबत्त्या, रंगीत काच, आरसे, चैनीच्या वस्तू, मुंबई, दमण या बंदरातून इंग्रज, पोर्तुगीज, डच लोकांच्याकडून पेशवे आयात करीत असत. तसेच बंदुकीची दारू, शिसे या वस्तू गोव्यातून येत असत. डच, फ्रेंच हे युरोपीयन लोक कापड आणत असत. भारताबरोबर व्यापार करण्यास अरबही इच्छुक असत. नानासाहेब पेशव्याने या बंदराच्या वाढीस उत्तेजन दिले. बाजीराव पेशव्यांच्या काळात त्यांचा लहान बंधु चिमाजीआप्पाने वसई साष्ठी ही बंदरे जिंकली मात्र ही बंदरे नावारूपाला आणण्यामध्ये त्याचबरोबर येथील व्यापार वाढविण्यामध्ये नानासाहेब पेशव्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

(संदर्भ- पेशवा रोजनिशी)

अशा प्रकारे छत्रपती शिवरायांच्यापासून चालत आलेल्या राज्यकर्त्यांनी व्यापारी वर्गाकडे आणि व्यापार वाढविण्याकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. यामध्ये विशेषकरून नानासाहेब पेशव्यांच्या कालखंडाला स्थिरता मिळाल्यामुळे त्याचबरोबर त्यांच्या कालखंडात मराठी सत्तेचा मोठा विस्तार झाल्यामुळे पश्चिम किनाऱ्यावर उत्तरेकडे दमणपासून तर दक्षिणेकडे गोव्यापर्यंत चालणाऱ्या

सागरी व्यापारावर त्यांनी नियंत्रण मिळविले. उदा. कोकण प्रदेशातील समुद्रात भ्रमण करणाऱ्या कोणत्याही जहाजासाठी नानासाहेब पेशवे सरकारकडून परवानगी घ्यावीच लागत असे. असे झाले नाही तर जहाज जप्त केले जात असे.

(संदर्भ- पेशवा डायरी, खंड २, ३, ७-८)

## ५.५ नानासाहेब पेशवे काळातील अंतर्गत व्यापार-

पेशवे कालखंडामध्ये अंतर्गत व्यापारामध्ये नदीमार्गाने होणारा व्यापार, घाटमार्गाने होणारा व्यापार आणि खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार यांचा समावेश होता.

### अ) नदीमार्गाने होणारा व्यापार -

महाराष्ट्रामध्ये या कालखंडामध्ये नदीच्या मार्गाने होणारा एक महत्त्वाचा व्यापार म्हणजे एक अंतर्गत व्यापार होता. नद्यांचे तीन विभाग होते. प्रामुख्याने कृष्णा नदी विभाग, गोदावरी नदी विभाग आणि भीमा नदी विभाग. कृष्णा, भीमा आणि गोदावरी आणि त्यांच्या उपनद्या या पश्चिमेकडे उगम पावून पूर्वेकडे वाहतात व रुंद होतात. त्या आंध्रप्रदेशामार्गे बंगालच्या उपसागराला जावून मिळतात. अरबी समुद्राला जावून मिळणाऱ्या मोठ्या नद्या या विभागात नव्हत्या. मात्र सह्याद्री पर्वतामधून लहान लहान नद्यांमध्ये पश्चिमेकडून २० मैलापर्यंत नौकानयन करणे शक्य होते. पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्यांमधून छोट्या बोटीतूनही वाहतूक चालत असे. पश्चिम किनाऱ्याकडील दाभोळ, चौल इ. बंदरामध्ये परदेशी माल पाठविण्यासाठी वस्तूंची ने-आण करणे या दृष्टीने नदीमार्गाने होणारा व्यापार हा एक महत्त्वाचा व्यापार होता. तसेच या कालखंडामध्ये माहीम परगाण्यामधून दांतिवारे या ठिकाणी नावेतून वाहतूक चालत असे. शिन्नर, मांडवे, उंदेरी, ठाणे, नाशिक, राहुरी, बेलापूर, संगमनेर इत्यादी ठिकाणी नावेतून वाहतूक चालत असे. १७५५ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी वरील ठिकाणच्या कमावीसदारांना शंभर ते सव्वासे प्रवासी नेता येतील, अशा भक्कम व मजबूत, सुसज्ज नावा तयार करण्यास सांगितले होते.

(संदर्भ- पेशवा डायरी, खंड २, ६ ते ८, खंड पे. द. खंड ३, ४६३-६४)

अशा प्रकारे नदीमार्गे होणारा व्यापार हा पेशवे कालखंडातील आर्थिकदृष्ट्या एक महत्त्वपूर्ण व्यापार होता. गोदावरील प्रवरा, भीमा, कृष्णा आणि घोडनदी इत्यादी नद्यांचा वापर पेशवे कालखंडामध्ये केला जात होता. या व्यापारातून राज्याची आर्थिक घडी बसविण्यास यथायोग्य मदत होत गेली.

**ब) घाटमार्गाने होणारा व्यापार -**

नानासाहेबांच्या काळामध्ये घाटमार्गाने व्यापार व वाहतूक होत असे. घाटमार्गाचा वरचा भाग आणि खालचा भाग या दोन गटामध्ये घाटमार्ग विभागला होता. सह्याद्री पर्वताच्या रांगामधून डोंगराळ रस्ते, वेडीवाकडे वळणे त्यामध्ये आंबाघाट, रडतोंडीचा घाट, आंबोली घाट त्याचबरोबर उंबरडे, कुंभर्ली, कमठा, कलेधोणे, तोरण, फोंडा, नाणे, रांगणा, भिमाशंकर, सालपा हे घाटमार्ग होते. तसेच विंद पर्वताच्या रांगामध्ये अजंठा, गणेश, गोवतला, चांदोरी, बालाघाट, पिंपलगाव, राजापूर, खेतबारी, सोमटना, शिंदवा, विंध्य पर्वतातील रस्ते सुकलदेवी असे घाट व खिंडीतील रस्ते हे प्रमुख घाटमार्ग पेशव्यांचे कालखंडामध्ये होते. पेशवे कालखंडामध्ये घाटमार्गाने वाहतूक व्यापार मोठ्या प्रमाणात होत होता. यामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणली.

घाटमार्गाच्या वाहतुकीचे नियंत्रण सुव्यवस्थित व योजनाबध्द करण्याकडे पेशव्यांचे लक्ष होते. घाटमार्गाने येणाऱ्या व्यापाऱ्यांना संरक्षण देणे त्याचबरोबर वाहतूक करांची वसुली करण्यासाठी घाटामध्ये मोक्याच्या ठिकाणी जकात नाकी उभा केली. प्रत्येक जकात नाक्यावर घाटपांडे नावाचा अधिकारी असे. त्याला मदत करणारे पानसडे पथकदार गुजर, गुमास्ते, मोधवी हे अधिकारी व अन्य शिपाईवर्ग नेमलेला असे. घाटमार्गातील रस्ते सुव्यवस्थित ठेवण्यासाठी व्यापाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी मोधवी हा अधिकारी प्रामाणिकपणे काम करीत असे. घाटातील रस्त्यावर प्रवास करणारे प्रवासी असोत अथवा व्यापारी असोत, त्यांना संरक्षण देण्याचे कार्य पथकदार हा अधिकारी करत असे. या पथकदाराच्या मदतीला गुजर व शिपाई असे. घाटमार्गावरून ये-जा करणारे फिरते व्यापारी यांची नोंद ठेवण्यासाठी 'बिडवई' हा अधिकारी

महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असे. त्याचबरोबर गुमास्ते हा घाटपांडेचा कारकून म्हणून काम करीत असे. प्रवासी तसेच व्यापारी व इतर रयत वाहतूक करणारे यांना संरक्षण देण्याचे काम या अधिकाऱ्यांना करावे लागे. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये ही व्यवस्था चोख ठेवण्यात आली. निरनिराळ्या प्रांतामध्ये, महालामध्ये कमावीसदार हे जकात अधिकारी नेमण्यात आले. मालाचे वजन आणि वाहनाचा प्रकार यावर जकात आकारली जात असे. अशा रीतीने पेशवे कालखंडातील घाटमार्गाने होणारा व्यापार एक महत्त्वपूर्ण आर्थिक बाजू सांभाळणारा मार्ग होता. या सर्व भागावर सर्वच दृष्टीने पेशव्यांनी नेमलेल्या सरकारी अधिकाऱ्यांचे नियंत्रण उपयोगी पडलेले दिसून येते.

### ३) खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार

पेशवे कालखंडामध्ये खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार राज्याची आर्थिक घडी बसविणारा महत्त्वपूर्ण टप्पा होता. मराठा साम्राज्याची राजधानी पुणे पासून पाच प्रमुख रस्त्याने हा व्यापार होत असे. त्यामध्ये पहिला बोरघाटामधून मुंबईला जाणारा मार्ग, दुसरा नाशिक, बरानपूर, उज्जैनी, झांशी, ग्वाल्हेर या मार्गाने उत्तरेला म्हणजे दिल्लीला जाणारा मार्ग, तिसरा चौथा मार्ग सातारा, मिरज, बंकापूर, सिरा, दोडबळापूर, रामेश्वरमार्गे दक्षिणेला जात असे तर पाचवा मार्ग कुंभार्ली घाटातून रत्नागिरीकडे जात असे. पुणे नाशिक, बरानपूर हे रस्ते उत्तरेकडील महामार्गाचे महत्त्वाचे भाग होते. बोरघाटातून जाणारे रस्ते कोकण आणि कोकणाकडे जाणारे महत्त्वाचे मार्ग होते. वरील महामार्गाचा विचार करता अशा प्रकारे पेशवे कालखंडामध्ये खुष्कीच्या मार्गाने केली जाणारी वाहतूक व्यापारासाठी महत्त्वाचा ठरला गेला. याशिवाय टपाल सेवा उपलब्ध होती. निरोप, जासूद, गुप्तहेर यांनासुध्दा खुष्कीच्या मार्गाने पाठवले जात असे.

## ५.६ वाहतुकीची साधने व व्यापारी जमाती-

पेशवे कालखंडामध्ये वाहतुकीच्या साधनामध्ये भौगोलिक परिस्थितीचा विचार करून वाहतुकीच्या साधनांचा उपयोग केला जात असे. परिस्थितीनुसार व्यापारासाठी वस्तूंची ने-आण करण्यासाठी उंट, बैल, घोडे, तट्टू यांचा वापर

केला जात असे. डोंगराळ भागात ओझी वाहून नेण्यासाठी हे प्राणी उपयोगी पडत. काही ठिकाणी मनुष्य बळाचाही वापर केला जात असे. जल मार्गाने नावा व जहाजे, गलबते यांचा वापर केला जात असे. खाड्या, समुद्रामध्ये तरांडे, गुराब, तरूस यासारख्या जहाजांमधून मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जात होती. व्यापार करण्यामध्ये वंजारी, बनिया, लमाणी इत्यादी मुख्य व्यापारी जमाती होत्या. हे लोक लुटारू, दरोडेखोर, हल्ला करणारे अशा संकटांना सामोरे जात. यासंदर्भात फ्रेंच प्रवासी डॉ. फायर यांनी आपल्या प्रवास वर्णनात सामान वाहून नेणारे काफिले पाहिल्याचे नमूद केले आहे. त्याच्या मते तीनशे बैलावरून सामान वाहून नेणाऱ्या एक काफिला त्याने नाणेघाटात पाहिल्याचे नमूद केले आहे. लमाणी जमात तर बंदरामधून देशावर बाजारपेठेवर वस्तू वाहून नेत असत. १० हजार लमाणी लोकांचा काफिला व्यापारी माल ने-आण करण्याचे काम करीत असे. प्रत्येक लमाणी जमातीकडे एक बैल असे.

(संदर्भ- वा. व. खरे ऐतिहासिक लेख संग्रह, खंड क्र. ५, पेशवा रोजनिशी खंड उ. प. क्र. ४५८)

## ५.७ अंतर्गत बाजारपेठा आणि व्यापारी वस्तू

पेशवे कालखंडामध्ये व्यापारी नगरे आणि बाजारपेठा या भरभराटीला आलेल्या दिसून येतात. शहरांची वाढ झाल्यामुळे बाजारपेठा वाढल्या. गावोगावी भटकणारे व्यापारी तसेच आठवड्याचे बाजार यामुळे शहरे व बाजारपेठा गजबजू लागल्या. खेड्यापाड्यातून बलुतेदारी पध्दतीने शेतकऱ्यांना लागणाऱ्या वस्तू बलुतेदारांकडून मिळत. शेतात पिकणाऱ्या वस्तू कापड दुकानदार, किराणा, भुसार व खेळणी इत्यादी वस्तू आठवड्याच्या बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असत. त्याचबरोबर व्यावसायिक व्यापारी परिस्थितीला पेशव्यांनी प्रोत्साहन दिल्यामुळे बाजारपेठा आणि व्यापाराच्या बाबतीमध्ये अनुकूलता निर्माण झाली. पुणे, सातारा, सोलापूर, बार्शी, पैठण, येवला, बरानपूर, नंदूरबार, वसई, कोल्हापूर इत्यादी शहरे गजबजली. या शहरातील बाजारपेठा व येथील व्यापार, उद्योगधंदे यांना सर्वच पेशव्यांनी उत्तेजन दिल्यामुळे अंतर्गत बाजारपेठा हा मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या

दिसून येतात. साधारणपणे या अंतर्गत बाजारपेठामध्ये व्यापारी वस्तू प्रामुख्याने अन्नपदार्थ यामध्ये तांदूळ, ज्वारी, गहू, मिरची, दूध, गुलकंद, साखर, तेल, मीठ, तूप, मासे, डाळी इत्यादी पदार्थांचा अन्नपदार्थ या विभागात समावेश होतो. फळांच्यामध्ये खजूर, आंबे, द्राक्षे, केळी, सफरचंद, चिक्कू आदींचा समावेश होत असे. मसाल्यांच्या पदार्थामध्ये हळद, हिंग, मिरे, जिरे, मोहरी, वेलदोडे, दालचिनी यांचा समावेश होता तर धातूमध्ये जस्त, तांबे, शिसे यांचा समावेश असे. कापड क्षेत्रात धोतरजोड्या, सुती कापड, जाडेभरडे, रंगीत कापड, शाली, मलमल, रेशमी कापड, कद इत्यादी विविध प्रकारच्या कापडांचा समावेश व्यापारी वस्तूमध्ये होत असे. प्राण्यांमध्ये गाई, म्हैशी, बैल, शेळया, मेंढ्या, घोडे, गाढव, उंट यांचा समावेश होत असे तर चैनीच्या वस्तूमध्ये घड्याळ, कंगवे, आरसे, हस्तीदंत, फर्निचर, गालांना, ओठांना लावण्याचे रंग आदि सौंदर्य प्रसाधनेंचा समावेश होता.

रोजच्या वापरातील वस्तूमध्ये मातीची भांडी, बूट, चपला, तंबाखू, कपडे, बैठकीची साधने आदींचा समावेश असे. नानासाहेब पेशव्यांच्या कालखंड म्हणजे इ. स. १७५६ मध्ये वस्तूंचे भाव, किंमत प्रत्येक रुपयाला आठ शेर इतकी होती. वस्तूंची किंमत मालाच्या दर्जानुसार बदलत असे. १७४० ते १७५० या कालखंडामध्ये विनाशकारक अशी युध्दे झाली नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रात शांतता, सुरक्षितता व स्थिरता लाभल्यामुळे उत्पादन मागणीपेक्षा अधिक होत गेले. गरजेच्या वस्तूमध्ये पीठ, अन्नधान्य यांच्या किंमती कमी होत गेल्या. अशा प्रकारे पेशवे कालखंडातील व्यापारी वस्तूंचे भाव अंतर्गत बाजारपेठा आणि किंमती इत्यादी बाबीवरून देशातील आर्थिक व्यवहार सुरळीतपणे पार पडलेले दिसतात.

### ५) पेशव्यांचे व्यापारी धोरण

व्यापाराबाबतीत सरकारचे धोरण आणि व्यापार यांचा जवळचा संबंध असतो. जर सरकारने व्यापारी वर्गाला प्रोत्साहन दिले तरच व्यापारी श्रीमंत होतील. प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे राज्याचा, देशाचा विकास होईल. आयात-निर्यातीच्या मार्गाने मोठ्या प्रमाणावर सरकारला कर मिळेल. व्यापार मंदावणार नाही, याकडे लक्ष देणारे सरकारचे धोरण असावे. व्यापारी धोरणाचा विचार

करता असे दिसते (संदर्भ- रामचंद्रपंत अमात्य यांचा आज्ञापत्र हा ग्रंथ). वरील ग्रंथामध्ये व्यापार आणि सरकारचे व्यापारी धोरण या बाबतीत अमात्यांनी छत्रपती शिवरायांच्या आदर्श व्यापार नितीचे कौतुक केल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे छ. शिवाजी महाराजांनी व्यापाराला उत्तेजन दिले, व्यापाऱ्यांना सवलती, सुविधा दिल्या तसेच धोरण पेशव्यांनी कमी जास्त प्रमाणात स्वीकारलेले दिसते. परंतु व्यापाराच्या बाबतीत छ. शिवाजी महाराजांच्या खालोखाल व्यापारी वर्गाला मग अंतर्गत असो अथवा बाह्य व्यापार असो, बाजारपेठा, शहरे या संदर्भातील धोरण असो. यामध्ये नानासाहेब पेशव्यांनी राबविलेली धोरणे, व्यापाऱ्यांच्या दृष्टीने हितावह दिसून येतात. त्यांनी व त्यांच्या सरदारांनी व्यापाराला महत्त्व दिल्याचे निदर्शनास येते.

(संदर्भ- पेशवा रोजनिशी खंड उ. प. क्र. ४५३)

नानासाहेब पेशव्यांनी करामध्ये सूट दिली. काही अंशी संकटप्रसंगी व्यापाऱ्यांच्यावर कर लादले नाहीत अथवा सक्ती केली नाही. उलट पेठा वसविण्यासाठी प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर ओसाड झालेल्या पेठा पुन्हा वसविण्यासाठी व्यापारी वर्गाला सहकार्य दिले. रस्ते, घाटमार्ग यामध्ये सुरक्षितता निर्माण केली. यासंदर्भात परकीय प्रवासी थॅवेनाट आणि टॅव्हनिअर यांच्या प्रवास वर्णनातून पेशव्यांची व्यापारी धोरणे, जकात व्यवस्था, कर वसुली, तत्कालीन अधिकारी इत्यादींची माहिती मिळत असे.

(संदर्भ- पेशवा रोजनिशी खंड उ. प. क्र. ४५४, ४५६)

पेशवे कालखंडामध्ये व्यापाऱ्यांवर नियंत्रण असे. त्यांचे आयात निर्यात धोरण, बाजारपेठा, नवीन बाजारपेठा, गावे, बंदरे, जकात नाकी इत्यादी बाबतीत पेशवे दक्ष असत. इ. स. १७४५ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी साष्ठी प्रांताचा जकातीचा मक्ता बाळाजी चाफाजी शेणवी यांना दरवर्षी २७०० रुपयाला दिला. त्याचबरोबर खोटा व फसवणुकीचा व्यवहार होणार नाही, याबाबत पेशवे दक्ष होते. यासाठी त्यांची स्वतःची यंत्रणा होती. उदा. १७४५ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी पुणे येथे आयात केल्या जाणाऱ्या व बाहेर पाठवल्या जाणाऱ्या कापडावर सरकारी छापाचे शिक्के मारण्याची खास

व्यवस्था केली. तसेच महादजी अनंत हवलदार यांना १००० रुपये किंमतीचा तंबाखू विकण्याचा परवाना दिला. असे परवाने देत असताना पेशवे यामध्ये फसवणूक किंवा लबाडी होणार नाही याकडे जातीने लक्ष देत. अशा प्रकारे पेशवे कालखंडात व्यापाराला उतेजन मिळाले. कसबा, सुपे येथील ओसाड झालेल्या बाजारपेठा पुन्हा वसविल्या. एवढेच नव्हे तर आयात निर्यातीला प्रोत्साहन दिले. सागरी व्यापारालाही प्रोत्साहन दिले व संरक्षणही दिले. यासंदर्भात नानासाहेब पेशव्यांच्या काळात १७५३-५४ मध्ये समुद्रावरील चाचेगिरी करणाऱ्या लोकांनी एका व्यापाऱ्याचे जहाज ताब्यात घेतले तेव्हा नानासाहेब पेशव्यांनी समुद्रावरील चाचेगिरी बंद केली. एवढेच नव्हे तर त्या व्यापाऱ्याचे जहाज त्याला परत मिळवून दिले आणि परदेशी जहाजांनी सरकारी परवाना घेतलाच पाहिजे, असे बंधन घातले. यावरून नानासाहेब पेशव्यांचे सागरी किनाऱ्यावरील व्यापारावर नियंत्रण व कौशल्य निदर्शनास येते. अशा रीतीने पेशवे कालखंडामध्ये पेशव्यांनी व्यापाऱ्यांच्या बाबतीत उत्तम प्रशासन राबविले. जकात, कर, वाहतूक यासंबंधी चांगली सुव्यवस्था निर्माण केली. आणिबाणी प्रसंगी, संकट प्रसंगी आयात निर्यातीवरील करात सूट दिली. व्यापारी वर्ग खुष तर सरकार खुष हे तत्त्व स्वीकारून शहरामध्ये नवे व्यापारी केंद्रे उभारली. शहरे नावारूपाला आणली. महामार्ग, रस्ते, घाटमार्ग या मार्गातून व्यापाऱ्यांना संरक्षण व सुरक्षितता दिली. वस्तूंची मागणी व नियंत्रण, परवाने, मक्ते या सर्वांच्यावर पेशव्यांनी जातीने लक्ष दिले.

## ५.८ नानासाहेब पेशवे यांचे आर्थिक प्रशासन व प्रमुख घटक

अठराव्या शतकातील मराठी राज्याची अर्थव्यवस्था मुख्यतः दोन पायांवर आधारलेल होती एक म्हणजे मुलकी महसूल व्यवस्था व दोन लष्करी अर्थव्यवस्था राज्यातील लहानमोठ्या वेगवेगळया आकाराच्या महसूली प्रदेशातील सरकारी वसुलीसाठी जे अधिकारी नेमलेले असत त्यांना कमाविसदार म्हणत. सरकारी अर्थव्यवस्थेच्या विशिष्ट पद्धतीमुळे- जी मुळात आर्थिक भौगोलिक परिस्थितीमुळे व बेभरवशी शेतकी उत्पन्नामुळे बहुतांशी निर्माण झाली होती, त्या पद्धतीमुळे कमाविसदारांना आपल्या महसूल प्रदेशासंबंधी

सरकारने ठरवलेल्या वसुलाइतक्या रकमेचा भरणा सरकारी तिजोरीत प्रत्यक्ष वसूल होण्यापूर्वी म्हणजे वर्षाच्या सुरूवातीसच आगाऊ भरावा लागे. काहीवेळा एकाहून अधिक वर्षासाठी असे आगाऊ भरणे करावे लागत. या पद्धतीमुळे, अर्थातच सरकारची वार्षिक उत्पन्नाची जमा अधिक खात्रीशिरपणे व नियमीतपणे होऊ शकत असे ; परंतु या व्यवस्थेने, अनियमित वसुलीच्या अनिश्चिततेला मात्र कमाविसदारांना तोंड द्यावे लागे. असे सरकारी तिजोरीत आगाऊ भरलेले महसूलीचे पैसे म्हणजे पर्यायाने कमाविसदारांना सरकारला दिलेले ते कर्जच असे. कारण, यावर त्यांना व्याजही मिळे. या पद्धतीचा एक महत्वाचा परिणाम असा झाला की कमाविसी व सावकारी अशा जोड-व्यवसाय सुरू होण्यास मदत झाली. कमाविसदार प्रत्यक्ष --अप्रत्यक्ष सावकारी करू लागले. तसे सावकारही कमाविसीकडे वळू लागले. सरकारला अशा पद्धतीने दिलेल्या महसुली कर्जाव्यतिरिक्त अनेक कमविसदार वेळोवेळी इतर शासकीय कामासाठीही सरकारला कर्जे देऊ लागले.

सरकारी सारा आणि इतर कर वगैरेची वसुली रोख पैशात किंवा धान्य, मीठ, तेल, तूप इत्यादी जिन्नसरूपातही केली जाई. अशा तऱ्हेने जमा झालेले जिन्नस सरकार आपल्या किल्ल्यावरील नोकरांना पगाराचा भाग म्हणून वाटीत असे. शिवाय जमा झालेल्या जिनसांचा काही भाग ठिकठिकाणच्या सरकारी दुकानांतून विक्रीसाठीही ठेवण्यात येई. तसेच राज्यकर्ते गिऱ्हाईकाच्या नात्याने प्रत्यक्षपणे किंवा मध्यस्थांमार्फत खुल्या बाजारात मोठ्या प्रमाणात वस्तू विकत घेत. कारण शासकीय कामासाठी विविध तऱ्हेचे जिन्नस वरचेवर मोठ्या प्रमाणात सरकारला लागत असत.

मराठी राज्यातील दुसरा महत्वाचा अर्थव्यवहार हा युद्धामुळे निर्माण झालेला होता. बाहेरील प्रदेशात लष्करी मोहिमा पार पाडण्यासाठी, सुरूवातीस खर्च करण्यासाठी म्हणून, मोठ्या प्रमाणावर पैसा लागे. तो बराचसा आपल्याच लोकांकडून गोळा करणे भाग होते. अशा वेळी केवळ सरकारी क्षेत्रातील कमाविसदार किंवा इतर महसूल विसंबून यंत्रणेवर भागत नसे. खासगी क्षेत्रातूनही पैसा उभा करणे आवश्यक ठरे. बाहेरील प्रदेशातून पैसा आणला की मोहिमांसाठी काढलेली फेडता येत असत.

तथापि, युद्धे व लष्करी मोहिमा आर्थिक दृष्ट्या मराठ्यांना नेहमीच लाभदायक ठरत असे नाही. हाती घेतलेल्या मोहिमांमुळे अनेकदा प्रचंड आर्थिक तोटेही सोसावे लागत. युद्ध जिंको की हरो, सैन्यावरचा आवश्यक खर्च टाळता येत नसे. बाहेरील जिंकलेल्या प्रदेशात विविध तऱ्हेच्या जमावबंदीची चोख व्यवस्था लावण्यास आवश्यक असलेली प्रशासकीय निपुणता व शिस्तबद्धता आणि ती राबविण्यास आवश्यक होती. शासकीय कार्यक्षमता मराठ्यांत होती असे दिसत नाही प्रशासकीय परंपरेचा अभाव हे एक त्याचे महत्वाचे कारण असू शकेल.

अशा परिस्थितीत स्थानिक पातळीवर छोटेमोठे सावकार महाराष्ट्रात निर्माण होणे व त्यांनी युद्धकर्त्यांना कर्जे देणे हे क्रमप्राप्त होते. घेतलेले कर्ज सरकारी तिजोरीतून वेळेवर परत करणे मराठी राज्यकर्त्यांना बरेचदा जमत नसे. मग कर्जफेड वेगवेगळ्या प्रकारे करावी लागे. जुने देणं भागविण्यासाठी नवे कर्ज काढीत. उदा. पुणे दप्तरखान्यात उपलब्ध असलेल्या वार्षिक तर्जुम्यांवरून (सरकारी जमाखर्चाच्या एकत्रित करून लिहीलेल्या हिशेबी कागदावरून) असे दिसते की सरकारने आपले जुने कर्ज फेडण्यासाठी १७६३-६४ साली २४ लाख रूपयांचे नवे कर्ज काढले होते वगैरे. एखाद्या लष्करी मोहिमेसाठी कर्ज देणाऱ्या सावकाराला ते परस्पर फेडून घेण्यासाठी एखाद्या प्रदेशाचे कमाविसी अधिकार देत. एक उदाहरण घेऊन सांगावयाचे तर १७३३-३४ मध्ये सरकारने राजापूरच्या मोहिमेसाठी खंडोजी गोगावलेकडून दरमहा तीन टक्के दराने कर्ज घेतले होते आणि मोहीम यशस्वी झाल्यानंतर कर्जफेड करावयाची होती. सरकारला परतफेड करणे न जमल्यास त्याबद्दल योग्य त्या उत्पन्नाचा प्रदेश खंडोजी गोगावलेला कमविशीने देण्याचे कलम करारातच घातले होते. लहानमोठ्या खंडण्यांच्या थकलेल्या बाक्या वसूल करण्यासाठी लष्करी मोहिमा काढीत आणि त्या मोहिमांच्या खर्चासाठी पुन्हा कर्ज काढीत असे हे लोकअर्थव्यवस्थेचे एक दुष्टचक्र निर्माण झाले होते.

सरकार जी कर्जे काढी त्यावर दरसाल साधारणपणे १५ टक्के व्याज त्यांचे सावकार आकारीत. काही विशेष बाबतीत व्याजाचा दर दरसाल ३६ टक्क्यांपर्यंतही गेलेला आढळतो. यामुळे प्रशासकीय व्यवहारासाठी किंवा

सैन्य उभारणीसाठी व लष्करी मोहिमांसाठी कर्जाऊ रकमा देणे किंवा उधारीवर सामान देणे हा एक मोठा किफायतशीर व्यवसाय महाराष्ट्रात अठराव्या शतकात बनून राहिला. पण त्यात धोका व अनिश्चततेचे प्रमाणही बरेच होते. धोका अशा साठी होता की जोवर मराठ्यांचे राज्य विस्तारीत होते तोवर खंडणी व अन्य उत्पन्नाच्या स्वरूपात बाहेरील प्रदेशातून कसे का होईना थोड्याफार प्रमाणात पैसे येत असत व दिलेल्या कर्जाची फेड कमीजास्त प्रमाणात होत असे. परंतु मराठी राज्याचा विस्तार थांबल्यास किंवा त्याचा संपूर्ण नाश झाल्यास युद्धकर्त्यांनी सैन्यासाठी काढलेल्या कर्जाची परतफेड होणे संभवनीय नव्हते आणि नंतर येणाऱ्या सत्तेलाही अशा कर्जफेडीची जबाबदारी स्वत: स्वीकारणे शक्य नव्हते. मराठी राज्याच्या उत्कर्षाच्या काळात त्या राज्याचा संपूर्ण पराभव होऊन वेगळीच परकीय सत्ता त्या जागी येईल व आपण दिलेल्या कर्जाची वसूली कदापि होऊ शकणार नाही अशी कल्पना तत्कालीन सावकारांना असंभवनीय वाटणे स्वाभाविक होते व त्यामुळेच ते आवश्यक तो व्यवसायिक धोका पत्करावयास तयार होते. या व्यवसायातील अनिश्चिततेचा भाग असा होता की, मराठ्यांच्या मोहिमा कधी यशस्वी होत तर कधी अयशस्वी. त्यामुळे दिलेले कर्ज ठरावीक मुदतीत वसूल होईलच याची शाश्वती नसे. तथापि कर्जाची सव्याज परतफेड या नाहीतर त्या मोहिमेनंतर अवश्य होईल असा भरवसा मात्र त्यांना वाटत असावा. एकंदरीने सर्व गोष्टींचा विचार करता व मिळणारा व्याजाचा दर लक्षात घेता, व्यवसायास आवश्यक तो धोका व तत्संबंधी अनिश्चितता पत्करूनही तो चालविणे त्यांना किफायतशीर वाटत असावे यात शंका नाही.

राजकीय घडामोडीमुळे अठराव्या शतकात महाराष्ट्राच्या अर्थकारणात अशा तऱ्हेने एक नाविन्यपूर्ण आणि महत्वाचा बदल घडून येऊ लागला या बदललेल्या सार्वजनिक अर्थव्यवहारासाठी किमान आवश्यक अशी पायाभूत अर्थसंरचना व आवश्यक ते विविध आर्थिक सुविधा समुच्चय व आवश्यक त्या आर्थिक संस्था निर्माण होणे व वाढीस लागणे अपरिहार्य झाले. ज्या राजकीय आर्थिक बदलामुळे अशी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली ती

युद्धमय स्थिती कायमची टिकून राहणे नवीन आर्थिक -मध्यस्थ वर्गाच्या दृष्टीने अर्थात जरूरीचे होते. त्या वर्गातील मंडळींना नवीन अर्थकारणासाठी आवश्यक व परस्परपूरक असे विविध अर्थव्यवहार करावयाचे होते. त्या वर्गात कमाविसदार, वसुली अधिकारी हिशेबनीस, सावकार, व्यापारी, कर्जे व लष्करी मोहिमांना लागणारी साधन सामग्री रोख किंवा उधारी स्वरूपात मिळवून देणारे मध्यस्थ, सैन्याबरोबर कर्जवसुलीसाठी जाणारे मध्यस्थ, सैन्याबरोबर कर्जवसुलीसाठी जाणारे सावकार किंवा त्यांचे प्रतिनिधी इत्यादी अनेक प्रकार होते आणि अशा परिस्थितीत मराठ्यांच्या युद्धप्रधान अर्थव्यवस्थेत, राज्यकर्त्यां व्यक्तींशी अधिक संबंधित असलेल्या आर्थिक मध्यस्थांना इतरांपेक्षा व्यावसायिक संधी अधिक प्रमाणात मिळणं स्वाभाविक आणि क्रमप्राप्त होते. या प्रतिकूल परिस्थितीत नानासाहेबांनी आर्थिक प्रशासन व प्रशासनातील घटकांना सक्षम कार्यक्षम बनविले.

## ५.९ व्यापारी-सावकार वर्गाचा उदय :

### अ) सावकार -

महाराष्ट्रातील विशेषत: देशावरील खेड्यातून सारावसुलीचे व कुळकर्णीकाचे काम पूर्वीपासून आणि मुसलमानी अंमलातही बहुतांशी देशस्थ ब्राम्हणाकडेच असे, मराठी सत्ता उदयास येऊ लागल्यावरही स्वाभाविकपणे सारावसुली व जकातवसुली यांच्या कामविसींची कामे देशस्थ ब्राम्हण मंडळी करू लागली. त्यातील काहींना छोट्यामोठ्या गावात हळूहळू जम बसवीत सावकारी व्यवसायास सुरूवात केली असावी. अशा व्यावसायिकांच्या याद्या निरनिराळ्या प्रसंगी व कारणाकारणाने तयार झालेल्या आहेत व त्या ऐतिहासिक कागदपत्रातून पहावयास मिळतात. त्यातील उपलब्ध असलेल्या तपशिलावरून इतिहासाच्या अभ्यासकांना काही अनुमाने काढता येण्यासारखी आहेत.

बाजीराव पेशव्यांना १७२५ मध्ये पुण्याची जहागीर मिळाली आणि साधारणपणे तेव्हापासून मराठी राज्यकाराभाराची राजधानी विस्तार होऊ लागला आणि परिणामत: पुणे शहराचीही वाढ होत गेली १४ जानेवारी १७३९ रोजी संक्रांतीचे दिवशी पेशव्यानी पुण्यात ज्यांना तिळगूळ वाटला अशा व्यक्तींच्या नावांची यादी पुणे दप्तरखान्यात उपलब्ध आहे. पुण्याची जहागीर

पेशव्यांना मिळाल्यावर १३-१४ वर्षानंतरची ही यादी आहे. त्यामध्ये सावकारांची १४ नावे आली आहेत. प्रा. धनंजयराव गाडगीळांना यापूर्वी तिचा उल्लेख केला आहे. त्या यादीत मोघे, कांबरस, नाईक, कडू, घम, दशपुत्रे, भिडे, कानडे, अनगळ, तांबवेकर दादाभाई, शास्त्री कोंडाभाई, शास्त्री, कोंडा, जोशी, कर्वे अशी नावे आली आहेत त्यात बरीचशी नावे देशस्थ ब्राम्हणांची असल्याचे दिसते. १७४० च्या सुमारास सरकारला कर्ज परविणारे सुमारे दीडशे छोटेमोठे सावकार पुण्यात व्यवसाय करीत असावेत असे पेशवे दप्तरातील प्रकाशित निवडक उताऱ्यांत आलेल्या उल्लेखावरून दिसते. काही सावकार प्रत्यक्षपणे सरकारास कर्जे देत तर काही कुणा मोठ्या सावकाराच्या मार्फत किंवा तेव्हाच्या भाषेत सांगावयाचे तर, कोणा सावकाराच्या 'गुजरातीने' कर्जे देत. हिशेबी कागदपत्रावरून वरचेवर उल्लेख होतो. अशी पेशवेकालीन पुणे सावकारांची घराणी म्हणजे अनगळ, ओंकार कर्वे, गर्द्रे, गाडगीळ, गुजर, गुणे, गोसावी, चिपळूणकर, जोशी, तांबवेकर, तुळशीबागवाले, थत्ते, दातार, दामले, दिक्षित-पटवर्धन, पटवर्धन, पाठक, बिवलकर, भावे, भिडे, भोकरे, मघवे, मोघे, रास्ते, लेले, वैद्य, श्रोत्री, साने इत्यादी प्रमुख सावकार होते.

सावकारात अनेक चित्पावन व देशस्थ ब्राम्हण घराणी होती. तसेच कऱ्हाडे, ब्राम्हण, शिंपी, सोनार, मराठा, शेणवी, इत्यादींतही महत्वाची सावकारी व्यापारी मंडली असल्याचे दिसते. पुणे शहरातील सावकाराच्या संख्येत चित्पावनांचे प्रमाण व त्यांचे व्यावसायिक वर्चस्व अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात वाढू लागले असे दिसते. स्वत: पेशवे हे भट घराण्यातील चित्पावनब्राम्हण असून त्यांचे अनेक सरदार व जहागिरदारही चित्पावन होते. पेशवेकालीन सावकारात चित्पावनांचे महत्व वाढण्यास ते एक महत्वाचे कारण होते हे उघड आहे. पेशवे आणि त्यांचे सरदार यांना लष्करी मोहिमेसाठी आणि नेहमीच्या राज्यकारभारासाठीही वारंवार पैसे लागत असत. अशा गरजेच्या वेळी सर्व संबंधित पक्षात परस्परासंबंधी विश्वास असणे आवश्यक होते. त्यामुळे राज्यकर्ते, युद्धकर्ते व व्यापारी, सावकार यांचे जास्त जवळचे संबंध येत राहणे स्वाभाविक होते.

मराठी समाज अनेक जाती व जमातींनी युक्त असा होता. पण त्यातील सर्वजण एकाच प्रादेशिक आर्थिक संस्कृतिचे घटक होते. त्यामुळे अठराव्या शतकात त्यातील बहुतेक सर्व कर्तबगार लोकांना विविध क्षेत्रात कमीजास्त प्रमाणात अनुकूल संधी उपलब्ध होत होत्या. उदा. होळकर, हे मुळातील धनगर जमातीचे पण नंतर एका मोठ्या राज्याचे प्रमुख झाले. शिंदेही त्याचप्रमाणे. पेशवे दरबारातील मुख्य न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे हेही बालपणी एका सावकाराकडे सामान्य नोकरच होते. मोरशेट करजे हे सुरूवातीस सातार्‍याला लहानसे दुकानदार होते. पण नंतर पेशवे सरकारला वेळोवेळी कर्ज पुरवठा करणारे एक मोठे सावकार झाले. खासगी पुरोहिताचे काम करणार्‍या अनेक ब्राम्हणांनी आपल्या दक्षिणा आणि इतर उत्पन्ने साठवून सावकारी सुरू केली आणि त्यातील काही मध्यम प्रतीचे तर काही मोठे सावकार बनले. मुत्सदेगिरी, युद्धकौशल्य, कारकुनीचे उत्तम ज्ञान अशांच्या जोरावर सामान्यातून वर आलेले काही ब्राम्हण पुढे सेनापतीही बनले. भिन्न आर्थिक स्तरावर असलेल्या आणि भिन्न व्यवसायात गुंतलेल्या पण एकाच जातीच्या असलेल्या कुटुंबात परस्परांत वैवाहिक संबंध जमून येणे शक्य असे आणि तसे जमतही असे आणि तसे झाल्यास त्यात काही खास विशेष घडले असे वाटण्याचे कारण नसे. याही परिस्थितीमुळे एकाच घटकात व्यवसायभिन्नता निर्माण होण्यास मदत होत असे. वर एके ठिकाणी याच संदर्भात म्हटल्याप्रमाणे इतर जातीजमातींच्या तुलनेने ब्राम्हण समाजातील व्यवसायांतराचे प्रमाण अधिक असावे असे दिसते. सावकार वर्गात महत्वाचे घटक जरी ब्राम्हण असले तरी ब्राम्हणात व्यापारी ब्राम्हण, सावकारी ब्राम्हण, अशा पोटजाती पडल्या नाहीत. त्याचप्रमाणे, महाराष्ट्रात सैनिकी पेशा करणार्‍यांचीही वेगळी जात निर्माण झाली नाही. एक तर सैनिक इतरही व्यवसायांशी, उदा. शेतीशी निगडीत असत आणि दुसरे म्हणजे सैनिकी पेशात मराठा, मावळे, ब्राम्हण, धनगर, महार अशा विविध जातींचे लोक गुंतलेले असत.

पारंपारिक पुरोहितपणाच्या व्यवसायात गुंतलेले काही भट भिक्षुक सोडले तर सर्वसामान्यपणे असे दिसते की, १८ व्या शतकातील मराठी ब्राम्हणवर्ग

साधारणतः इहवादी वृत्तीचा असावा. पैसे मिळवून देणारे असे अनेक व्यवसाय असत की ते अंगीकारण्याच्या बाबतीतही प्रस्थापित सामाजिक नैतिक मूल्ये ब्राम्हणांच्या आड फारशी येत नसावीत. याबाबत, जमेल तो व्यवसाय आणि मिळवता येईल त्या व्यवसायातून पैसा हा अर्थवादच तत्कालिक मराठी ब्राम्हणांच्या बाबतीतही प्रभावी असावा. त्यामुळे शेतकरी, आचारी, पाणके, स्वयंपाकी, जासूद, कारकून, सैनिक, सावकार, दुकानदर, व्यापारी, वैद्य असे विविध तऱ्हेचे व्यवसाय करणाऱ्या ब्राम्हणांसंबंधीचे असंख्य उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रातून आढळतात. ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकरासारखा (१६४९ ते १७४५) धार्मिक वृत्तीचा देशस्थ ऋग्वेद ब्राम्हण, स्वतःला मिळालेली दाने आणि देणग्या शिल्लक टाकीत पुढे एक मोठा सावकार झाला आणि पेशव्यांना व इतर सरदारांना कर्जे देऊ लागला हे सर्वज्ञात आहे. त्याने दिलेली कर्जे लाखांच्या घरात गेली होती.

महाराष्ट्रात गुजराती व इतर बाहेरील व्यापाऱ्यांचा, केव्हापासून आणि कसाकसा प्रवेश होत गेला यासंबंधीचे ऐतिहासिक संशोधनही मराठ्यांच्या व्यापारी इतिहासाच्या संदर्भात उपयुक्त आहे. यासाठी तत्कालीन याद्या, हिशोबाचे कागद, सरकारकडे केलेले विनंती -अर्जसंबंधात पत्रव्यवहार इत्यादी अस्सल ऐतिहासिक साधने पावी लागतील. उदा. १७५५-५६ साली पुण्यातील एका सावकारी पेढीशी शहरातील ज्या इतर महत्वाच्या सावकारांनी पत्र्यव्यवहार केला होता. त्या ७९ नावापैकी बारा नावे गुजराती सावकारांची दिसतात. सुमारे तेरा वर्षानंतरच्या म्हणजे १७६८-६९ च्या आणखी एका उपलब्ध यादीत पेशवे सरकारला कर्ज दिलेल्या नऊ सावकारी पेढ्यांची नावे आढळतात. त्या त्या सर्वांनी मिळून त्या वेळी साडेतेरा लाख रूपयांचे कर्ज सरकारला दिले होते, त्यापैकी त्या यादीतील केवळ दोनच सावकारांनी, परांजपे आणि काबरस यांनी सुमारे साडेसात लाख रूपये म्हणजे निम्म्याहून अधिक कर्ज दिले होते, त्या एकूण नऊ नावात फक्त एक बिगर मराठी नाव आढळते, ते म्हणजे वाघोजी बगाडिया या गुजराती सावकाराचे त्याने सरकारला फक्त ५३०३ रूपये इतकी रक्कम त्याप्रसंगी कर्जाऊ दिली होती.

यासंबंधात पुण्यापेक्षा थोडी वेगळी परिस्थिती थोड्या आधीच्या काळी सातारला असल्याचे एका वेगळ्या यादीवरून दिसते. युद्धानंतर झालेल्या दोन राज्यांमधील तहातील कलमात खंडणी संबंधीचे कलम बहुधा असे. आकारलेली खंडणी काही नेहमीच तिथल्या तिथे सर्वच्या सर्व रोख वसूल करणे शक्य नसे. अशा वेळी सावकारामार्फत हुंड्यांच्या स्वरूपात त्यांची वसूलकरणे शक्य नसे अशा वेळी सावकारांमार्फत हुंड्यांच्या स्वरूपात त्यांची वसुली होई. १७५३-५४ साली श्रीरंगपट्टणवर मराठ्यांनी दहा लक्ष नऊशे रूपयांची खंडणी आकारली होती आणि साताऱ्यातील बारा सावकारी पेढ्यांची नावाने ती रक्कम हुंड्यांच्या रूपाने मिळविली होती. या यादीतील बारा सावकारांच्या नावात, नऊ नावे गुजराती सावकरांची आणि दोन कन्नड लिंगायतांची आढळून येतात, म्हणजे, निदान या यादीप्रमाणे साताऱ्यातील बिगर मराठी सावकरांचे प्रमाण १७५० च्या सुमारास मराठी सावकरांच्या मानाने अधिक असण्याची शक्यता आहे. परंतु असा खंडणीसंबंधीच्या आणि इतर हुंड्यांच्या व्यवहारानंतर जेव्हा पुणे शहरातील सावकारांशी होऊ लागला तेव्हा तत्संबंधी यादीमध्ये मराठी सावकारांची नावे बऱ्याच अधिक प्रमाणात आढळतात. मराठ्यांची घटनात्मक राजधानी असलेल्या साताऱ्याला मराठी ब्राम्हण सावकाराची संख्या पेशवाई पुण्यापेक्षा तुलनने कमी असावी आणि त्यामुळे गुजराती सावकार तिथे तुलनेने अधिक संख्येत असावेत असे दिसते. शिवाय पेशव्यांनी १७६१ च्या पानिपतच्या पराभवानंतरच मुख्यत्वे आपली दृष्टी दक्षिणेकडे वळविली आणि खंडणी आणि इतर उत्पन्न मिळवण्यासाठी कर्नाटकावरील मोहिमा नियमीतपणे सुरू केल्या, म्हणून कर्नाटकाशी मराठी सावकारांचे हुंडीव्यवहार सामान्यपणे १७६० च्या दशकापासून वाढू लागला असे दिसते. १७७० च्या दशकाच्या अखेरीपर्यंत पुण्यातील गुजराती सावकारी पेढ्यांची संख्या कमी असल्याचे ऐतिहासिक कागदपत्रावरून कागदपत्रावरून दिसते. त्यानंतर बहुधा गुजराती सावकारांचे महत्व पुणे व महाराष्ट्राच्या इतर व्यापारी केन्द्रात हळूहळू वाढू लागले.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पेशव्यांना व इतर मराठी सरदारांना युद्धे अधिकाधिक खर्चिक होऊ लागली असावीत. याला दोन महत्वाची कारणे

होती. ती म्हणजे, एक तर सुमारे १७४० पासून पुणे व आसपासच्या मंडीतील वस्तूंचे बाजारभाव सतत वाढत चालले होते. त्यामुळे युद्धखर्च वाढत जाणे अपरिहार्य होते आणि दुसरे असे की, राज्यविस्ताराच्या धोरणामुळे स्वत:च्या डोंगरी प्रदेशातील जुन्या गनिमी पद्धतीची कमी खर्चाची युद्धनिती मराठ्यांनी सोडली होती. त्यांना त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील प्रदेशात पायदळ व स्वारनिशीच्या मैदानावरील खर्चिक युद्धनितीचा अवलंब करावा लागत असे. केवळ वाहतुकीवर व घोड्यांच्या खरेदीवरही मराठ्यांना सतत व वाढता खर्च करावा लागत असे. अधिकाधिक युद्धखर्च म्हणजे सावकारी कर्जावर अधिकाधिक विसंबणे हे ओघानेच आले पुणे ही केवळ पेशव्यांचीच राजधानी नसून अठराव्या शतकात साऱ्या मराठी घटकराज्यांचे ते राजकीय केंद्र बनले होते. त्यामुळे बाहेरील अनेक मराठी सरदारांना व सेनापतींना लष्करी मोहिमा व इतर कारणांसाठी पुण्यामधील सावकारांशी व व्यापाऱ्यांशी कर्जासाठी व वस्तूंच्या खरेदीसाठी पुण्याशी जवळचा आर्थिक संपर्क ठेवणे आवश्यक होते. शिवाय, बाहेरील मराठी घटक राज्यांनी पुण्यातील पेशवे सरकारला या ना त्या प्रकारे आपल्या उत्पन्नाचा काही ठराविक भाग द्यावा असे बहुतेक बाबतीत करारमदार असत. या व अशा इतर कारणांमुळेही पुणे व इतर शहरांत परस्परांत आर्थिक देवघेव बऱ्याच प्रमाणात होत असे. परिणामत: अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुणे हे भारतातील हुंडीव्यवहाराचे एक महत्वाचे केंद्र बनले. उदा. पुण्यातील एका दिक्षित -पटवर्धनांच्या सावकारी पेढीचा हुंडीचा व्यवहार, वाराणसी, बऱ्हाणपूर, जालनापूर, औरंगाबाद, नाशिक, थळनेर, पैठण, मुंबई, नारायण पेठ, शिवपट्टम इत्यादी केंद्राशी होत असल्याची नोंद त्यांच्या हिशेबी वह्यातून सापडते. तुळशीबागवाल्यांच्या पेढीकडे १७६९ साली केवळ एका महिन्यात देशातील वेगवेगळ्या ठिकाणाहून दीड लाख रूपये किंमतीच्या हुंड्या आल्या होत्या. त्यातील ५०,००० रू. ची एक हुंडी सुरतेच्या नागर लक्ष्मीदासच्या पेढीकडून आलेली होती.

पुणे व अन्य मराठी शहरात पैशाच्या देवघेवीचे व्यवहार लहान मोठ्या प्रमाणात बऱ्याच संख्येत होत असल्याने सावकार व उपसावकारांच्या व त्यांचे मध्यस्थ इत्यादींच्या संख्येत भर पडून महाराष्ट्रात अठराव्या शतकात

सावकारी व्यवहार करणारा एक महत्वाचा खास नवा वर्ग उदयास आला.

युद्धकर्त्यातर्फे कर्ज उभारणे, विविध युद्धांपयोगी साहित्य बाजारातून उधारीने आवश्यक त्या प्रमाणात गोळा करणे, वगैरे कामे करणे, वगैरे कामे करणारे जे मध्यस्थ असत ते ब्राम्हण, मराठा, प्रभू इत्यादी विविध जातींचे असत. मध्यस्थाचे कामजबाबदारीचे, नाजूक व कौशल्याचे असे. ते काम करणारा हरहुन्नरी, लोकांचा विश्वास संपादन करू शकणारा व मधुर बोलणारा असावा लागे. सरकारसंबंधित सेनापतीपेठेतील सावकार व व्यापारी या सर्वांशी त्याचे संबंध सलोख्याचे व विश्वासाचे असावे लागे. सैन्याच्या मोहिमेसाठी पैशांची कर्जे उधारीवर वस्तू जमविणे किंवा कौशल्याने, निर्धाराने व सर्व संबंधितांचा विश्वास संपादन करावा लागत असे.

राज्यकर्ते व सेनापती मोघली कर्जे घेत व अनेक सावकारांशी त्यांचा नात्यागोत्याचा किंवा अन्य जवळचा संबंधही असे. परंतु यामुळे धनकोंनी ऋणकोंच्या राजकारणात लुडबूड केली किंवा स्वत:ला मोठे राजकीय अधिकारपद मिळावे म्हणून अयोग्य खटपट केली असे सहसा घडले नाही. ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकरांचा उल्लेख या संदर्भात वर आलाच आहे. त्यांनी पेशव्यांना व इतरांना कर्जे दिली व इतर राजकारणाविषयी आपले मत मांडले. पण त्याचेही स्वरूप मर्यादित होते. या बाबतीत दुसरे उदाहरण सांगता येण्यासारखे म्हणजे बाबूजी नाईकांचे. पेशव्याईच्या सुरूवातीच्या काळात ते जवळचे आप्त होते. तसेच व्यवसायाने सावकारी आणि व्यवहार करणारे सेनापतीही होते. पहिल्या बाजीरावांच्या मृत्यूनंतर (एप्रिल १७४०) बाबूजी नाईकांनी आपण पूर्वी सरकारला दिलेल्या व वसूल न झालेल्या कर्जाच्या बळावर पेशवे पदावर आपला हक्क सांगितला होता. रघुजी भोसलेंनी याबाबत बाबूजी नाईकांचा पक्ष उचलून धरला होता. परंतु बाबूजी नाईकांच्या खटपटीला अखेर यश आले नाही. मराठी सावकार वर्गात बाबूजी नाईकांसारखी महत्वाकांक्षा व राजकारणी मंडळी फारशी झाली नाहीत असेच म्हणावे लागते.

### ब) व्यापारी -

सावकार वर्गाच्या जोडीला व्यापारीवर्गही महाराष्ट्रात अठराव्या शतकात तत्कालीन विशिष्ट राजकीय आर्थिक परिस्थितीमुळे उदयास येऊ लागला होता. कर्जाच्या बरोबरीने सरकारला अनेक कारणांसाठी प्रशासकीय, लष्कर, राजनैतिक, सण समारंभ अशा व इतर कारणांसाठी- विविध वस्तू, साहित्य सदैव लागत असे. त्यांचा सरकारला पुरवठा होण्याचे मुख्य मार्ग म्हणजे शेतसाऱ्याच्या रूपाने पिकातील काही भागाची वसुली, जकातीच्या रूपाने वसूल होणारा व वाहतुकीत गुंतलेला काही माल वगैरे होते. याशिवाय रोख किंवा उधारीने प्रत्यक्ष बाजारातून खरेदी केलेले साहित्य, वस्तू असतच. सरकारच्या खरेदी व्यवहारात कापड व इतर साहित्य होते. पेशवे सरकारच्या हिशेबी कागदपत्रात वस्तूच्या आयव्ययाचे सरकारी हिशेब, ऐनजिनसी या नावाखाली स्वतंत्रपणे नोंदून ठेवले जात. ते अभ्यासले असता ऐनजिनसी व्यवहारात कापडाला किती महत्वाचे स्थान होते याची कल्पना येते. पुणे दप्तरखान्यातील घडणी दप्तरातील रूमाल क्रमांक ७४८ मध्ये उपलब्ध असलेली काही वर्षसंबंधीची या विषयीची आकडेवारी उदाहरणादाखल पाहण्यासारखी आहे.

पेशवे सरकारने कापड व इतर जिन्नसा उधारीवर खरेदी केल्या त्यांच्या रूपयांत हिशेब-

पुढील आकडेवारीवरून इतर वस्तूंच्या मानाने कापडाची उधारीवर खरेदी सरकार किती मोठ्या प्रमाणावर करीत असे याची कल्पना येते.

| वर्ष | कापड | इतर जिन्नसा |
|---|---|---|
| १७६३-६४ | ३,१६,४०२ | १६,००४ |
| १७६५-६६ | १,५०,७१२ | २८,७४२ |
| १७६७-६८ | ३,३२,५१२ | १७,२०० |
| १७७१-७० | २,१७,६०० | ९,८४८ |
| १७७१-७२ | ५,१३,४३७ | १२,९२ |

उधारीच्या जोडीला रोखीनेही व्यवहार होत असे शेतसारा, जप्ती इत्यादीच्या रूपाने धान्यादी जिन्नस सरकारकडे मोठ्या प्रमाणावर जमा होत यातील

अतिरिक्त जिन्नस बाजारात विकून जे पैसे येत तेही आवश्यक त्या वस्तू रोखीने खरेदी करण्यासाठी सरकारला पुनः वापरता येत. अशा रोखीने केलेल्या कापड खरेदीचेच एखाद्या वर्षाचे उदाहरण घेता येईल, १७६३-६४ या एका वर्षी केवळ पेशवेसरकारने पंचवीस लाखाहून अधिक रूपये किंमतीचे कापड रोखीने बाजारातून खरेदी केल्याचे दिसते. कापड खरेदीचे हिशोबाचे कागदपत्र पाहिले तर हे लक्षात येत की अठराव्या शतकात महाराष्ट्रात व विशेषतः पुण्याच्या पेठेत कापड व्यापाऱ्यांची संख्या बरीच असावी. शिवाय दुसरे असे की सरकारने केलेल्या अनेक खरेद्या अगदी लहान प्रमाणातही झालेल्या असत.

पैशाचा कर्जव्यवहार करणारे अनेक सावकार, कापड व्यापाराचा व्यवसायही करीत असत. त्यामुळे पैशांच्या कर्जाच्या यादीमध्ये येणारी सावकारांची अनेक नावे, उधारीने कापड पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या याद्यातही आढळतात. १७६८-६९ साली पेशवे सरकारने ज्यांच्याकडून उधारीवर कापडांची खरेदी केली. अशा तीस कापड व्यापाऱ्यांची एक यादी उपलब्ध आहे. यामध्ये सरकारने पूर्वी ज्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेतले होते. अशा सावकारांची नावे आता कापड व्यापाऱ्यांची नावे म्हणून आली आहेत. त्यातील बारा नावे चित्पावन ब्राम्हणांची दिसतात, नऊ देशस्थ ब्राम्हणांची आहेत. आणि इतर याद्यांमध्ये मराठा, शिंपी वगैरे आहेत. यामध्ये एकही बिगर मराठी किंवा गुजराती नाव नाही. या तीस व्यापाऱ्यांकडून एकूण सुमारे तीन लाख रूपये किंमतीचे कापड सरकारने उधारीवर खरेदी केले. या यादीतील काही तपशील पहाण्यासारखा आहे. रामचंद्र नाईक परांजपे यांच्याकडूनची कापड खरेदी सर्वात मोठी म्हणजे रूपये ५४,७३२ ची आहे. काबरस, भिडे, पारगांवकर, ताटके वानवळे, इत्यादींकडूनच्या खरेद्या रू, १०,००० ते ३०,००० पर्यंतच्या आहेत आणि काही व्यापाऱ्यांकडून सरकारने फारच छोट्या म्हणजे १००० हून कमी किंमतीच्या खरेद्या उधारीवर किंवा सरकारी उधारी खात्यावर म्हणून केल्या आहेत. उदा. तांबेकरांच्याकडून रूपये ८६२ रूपयांचे आणि गोपाळ कानडे यांच्याकडून केवळ ५७३ रूपयांचे कापड सरकारने आपल्या उधारी खात्यावर घेतले होते.

काही सावकरांच्या व व्यापाऱ्यांच्या याद्यांचा वर उल्लेख केला आहे. त्यांच्यातील उपलब्ध माहितीच्या मर्यादा जमेस धरूनही असेच म्हटले पाहिजे अशा याद्यात केलल्या नावावरून, रकमांवरून तारखांवरून व त्या वेळेच्या राजकीय व आर्थिक घडामोडींवरून आपणास तत्कालीन महाराष्ट्रातील सावकारी व्यापारी व्यवसायाचा प्रकार, त्याचा आवाका, त्यांच्या प्रगतीची दिशा इत्यादींबद्दलची माहिती उपलब्ध आहे.

या व अन्य अशा यांद्यावरून असे दिसते की अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या संख्येने मराठी व्यापारी वर्ग विशेषत: कापड व्यापारात गुंतलेला, निर्माण झाला होता व महाराष्ट्रातील बाजारपेठेत तो प्रभावीपणे व्यवहार करीत होता. गुजरात्यांसारखे बाहेरचे संख्येने त्या काळात महाराष्ट्रात, विशेषत: पुणे आसपासच्या बाजारपेठेत कमी प्रमाणात होते. मराठी व्यापाऱ्यांत चित्पावन ब्राम्हण व त्या खालोखाल देशस्थब्राम्हण प्रमुख होते.

मराठी सावकारांनी वेळोवेळी दिलेल्या कर्जाचे जे हिशेबाचे कागदपत्र उपलब्ध आहेत ते पहाता एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते, ती म्हणजे अठराव्या शतकात एकाही मराठी सावकाराने पाच लाख रूपयांइतकीही रक्कम कधी एक रकमी कर्जाऊ दिल्याची नोंद आढळत नाही. सर्वसामान्यपणे एक-रकमी मोठा आकडा कर्जाऊ म्हणजे २०,००० ते ५०,००० रूपयेपर्यंतचा. दुसरे असे की, पेशवे सरकारने सावकारांकडून ज्या रकमा कर्जाऊ घेतल्या त्या अनेकदा एक हजार रूपयाच्या आतच असत. याचाच अर्थ असा की अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अल्प कर्जव्यवहाराची, त्याप्रमाणे छोटेखानी मराठी सावकारांची संख्या बरीच मोठी असावी. परंतु त्यातून, परप्रांतात काही ठिकाणी झाले तसे कुणी जगतसेठ किंवा वीरजी व्होरांसारखे कोट्याधीश धनाढ्य सावकार महाराष्ट्रात निर्माण झाले नाहीत. त्या तोलामोलाचे श्रेष्ठी किंवा व्यवहारी निर्माण होऊ शकतील अशी आर्थिक संरचना आणि आवश्यक त्या दर्जाच्या व तितक्या किफायतशीर व्यापारी घडामोडी तत्कालीन महाराष्ट्रात होत नसत असेच म्हणावे लागते.

पुणे येथील सावकारांचे व व्यापाऱ्यांचे ज्याप्रमाणे पेशवे सरकाराशी व इतर संबंधितांशी आर्थिक व्यवहार चालत तसे ते इतर बाहेरील मराठी

सत्ताधाऱ्यांशीही असत. त्याचप्रमाणे केवळ सरकारी स्तरावर नव्हे तर खासगी स्तरावरही कर्जाची देवाणघेवाण, रोखीने किंवा उधारीने वस्तूंची खरेदी विक्री इत्यादी व्यवहार होत असत. सरकारी व इतर दप्तरखान्यांत उपलब्ध असलेल्या या संबंधीच्या कागदपत्रावरून त्या व्यवहाराच्या प्रकाराबद्दल हुंडणावळीचे दर, व्याजाचे दर, पेढ्यांचे अंतर्गत व्यवस्थापन इत्यादीबद्दलही बरीच उपयुक्त माहिती मिळू शकते. अठराव्या शतकात पुणे व आसपासच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणात कर्जांची देवाण-घेवाण, वस्तूंची खरेदी-विक्री इत्यादींनी युक्त असा अपूर्व आर्थिक बदल मराठी समाजात घडून येत होता. त्या प्रक्रियेचा गुणक परिणामही इतर आर्थिक क्षेत्रात व आसपासच्या प्रदेशात पसरणे अर्थव्यवहाराला धरून होते.

पुण्यातील बाजारपेठेशी व्यवहार करणाऱ्या बाहेरील मराठी व्यापाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या व्यवहारांचे प्रमाण कालानुसार वाढत असावे. हे बहुधा छोटे व्यापारी किंवा वाणी असत. या व्यापाऱ्यांनी सरकारला केलेल्या विनंती अर्जात किंवा सरकारने त्यांना लिहीलेल्या उत्तरात किंवा सनदात, त्यांचा उल्लेख ‘गरीबसाहुकार’ असा होत असे. अशा वेळी यासंबंधीचे सरकारी कामाकरिता सूट किंवा माफी देत असे. अशा वेळी यासंबंधीचे सरकारी धोरण सनदांतून सहज व्यक्त होत असे. उदा. इ. स. १७६३-६४ ची एका सनदेतील मजकूर- ‘‘पुणे व जुन्नर प्रांतात’’ वाणी उदमी देशातून तेल, तूप, गूळ व हळद ऐसा जिनस घेऊन येतात त्यास सांप्रत या जिनसांची अमदानी जाहली पाहिजे... तरी सदरहू जिनसांस दसऱ्यापर्यंत जकात सुदामत शिरस्त्यापैकी निमे घेत जाणे माफ करीत जाणे.’’ तंबाखू मीठ, नारळ, तूप इत्यादी जिनसांच्या विक्रीचे वेगवेगळ्या प्रदेशांबाबत ठराविक काळासाठी मक्ते देण्यात येत आणि असे व्यापारी मक्ते महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत मुसलमान सुद्धा अनेक जातीचे व्यापारी लोक योग्य ती परवाना रक्कम भरून मिळवीत.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतून छोटे व्यापारी, वाणी, कारागीर इत्यादी विविध तऱ्हेचे व्यावसायिक पुण्याकडे मोठ्या संख्येने स्थलांतर करू लागले. तसे ते महाराष्ट्राच्या बाहेरूनही येऊ लागले. पेठेतील व्यापारी कारभारावर सरकारची देखरेखही आवश्यक असे.

त्यामुळे पारंपारिकपणे शेटेपण व महाजनपण करणाऱ्या मंडळीना नव्याने महत्व आले व त्यांचे कामही वाढले. परिणामत: शेटे, महाजनकीचे काम करण्यासाठी या क्षेत्रात नव्यानेच इतर क्षेत्रातील माणसेही पुढे येऊ लागली व यासंबंधी सरकारशी करारमदार करू लागली. अठराव्या शतकाच्या सुरूवातीस पुण्यात केवळ पाच पेठा होत्या. त्यांची संख्या वाढत जाऊन, त्या शतकाच्या अखेरीस शहरात अठरा पेठा झाल्या आणि त्या बसवण्यात सरकारी कारभारी व शेटे महाजनाबरोबर सावकार, मक्ता घेऊन बाहेरील कारागीर आणून पुरविणारे मध्यस्थ, इमारतीच्या बांधकामाचे मक्तेदार इत्यादी अनेकांचा सहभाग होत असे. नानासाहेबांनी याला प्रोत्साहन म्हणून नवीन सावकारांना, व्यापाऱ्यांना जकात माफी करणे, मानाची वस्त्रे देणे, पालखी इत्यादी मानाचे हक्क देणे, गावात राहण्यास मोफत वाडा देणे, किंवा कोठार बांधण्यास मोफत व जमीन देणे इत्यादी हक्क, सवलती दिल्या जाऊ लागल्या. सावकार वर्गाला मोठ्या प्रमाणात मदत व सहकार्य दिले.

### क) ठेकेदार व्यवस्था -

सरकारची तसेच पेशव्यांची व इतर सरदार जहागिंरदारांची खासगी कडील, विविध तऱ्हेची कामे असत ती त्या त्या कामांचे स्वतंत्र ठेके देऊन करवून घेतली जात. अशा तऱ्हेने ठेक्याने दिलेल्या कामासंबंधीचे पत्रव्यवहार, हिशेबी कागद इत्यादी मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. विविध तऱ्हेच्या कामांसाठी त्या त्या क्षेत्रातली अनुभवी निष्णात ठेकेदार व्यावसायिकांची आवश्यकता असे. उदा. इमारती बांधणे, पाट बांधणे, वाड्यात रोजच्या भोजनाची, पाटपाण्याची व्यवस्था ठेवणे, दिवाबत्तीची सोय करणे, फुलांचा पुरवठा करणे इत्यादी तसेच टपाल सेवा खाणी, नदीवर नावा चालवून वहातूक करणे, तोफांचे गोळे बनविणे, अग्निबाण बनविणे, कागद, शाई तयार करणे व पुरवणे इत्यादी अनेक कामांचे दिलेले ठेके व त्यांचे हिशेबी कागद मोठ्या प्रमाणात सापडतात. त्यात येणारी जवळजवळ सर्वच नावे मराठी आहेत. आणि ती अनेक जातीतील आहेत. सरकारचे अठरा तऱ्हेचे कारखाने चालविण्यासाठी व त्यात काम करण्यासाठीही सोनार, लोहार, तांबट, सुतार, विणकर, शिंपी इत्यादी विविध व्यावसायिकांची व कारागिरांची गरज असे.

खासगी कामासाठी लोकाडूनही अशा कारागिरांना मागणी असे. कारागिरांना मजुरी देऊन जसे काम करून घेतले जाई तसे ठेके देऊनही काम दिले जाई. अशा छोट्यामोठ्या अनेक ठेकेदारांचा एक नवा वर्गही महाराष्ट्रात विशेषत: पुण्यासारख्या शहरात अठराव्या शतकात तयार झालेला दिसतो. त्याची कित्येक उदाहरणे मराठी ऐतिहासिक कागदपत्रातून मिळतात.

एकंदरीत पाहता असे दिसते की महाराष्ट्रात अठराव्या शतात जो आर्थिक बदल घडून येत होता त्या प्रक्रियेचा गुणक परिणाम विविध आर्थिक क्षेत्रांत व निरनिराळ्या प्रदेशांत पसरत होता. तथापि त्या बदलाचा मुख्य गाभ्याचा भाग हा पैशांचे हस्तांतर, आर्थिक मध्यस्थी, व्यापारसेवेची ठेकेदारी इत्यादींचा होता. त्या बदलात औद्योगिक स्थित्यंतराचा भाग अल्प होता असे दिसते. जो काही आर्थिक बदल घडून येत होता त्याची सर्व मदार मुख्यत्वे राजकीय पायावरच आधारलेली होती.

प्रा. धनंजयराव गाडगीळांनी म्हटले आहे की महाराष्ट्रात एतद्देशीय वाणी समाज मुळात नव्हता व वाण्याची जातही जवळजवळ नव्हती. ते म्हणतात ते बरोबरच आहे. परंतु याकडे अशाही दृष्टीने पाहता येईल की ऐतिहासिक व आर्थिक भौगोलिक प्रतिकूल कारणामुळे महाराष्ट्रात मराठी वाण्यांची जात किंवा जमात मुळात नव्हती आणि मराठी व्यापारी सावकार वर्ग भारताच्या वाणिज्य नकाशावर येण्यास बराच उशीर लागला आणि तो जेव्हा आला तेव्हा आर्थिक-सामाजिक कारणापेक्षा राजकीय व सामाजिक बदलच त्याला प्रभावी कारण ठरले. त्यामुळे इतर प्रदेशांत क्रमाक्र माने उत्क्रांत झालेली व भिन्नपणे ओळखता येऊ शकणारी वाण्यांची प्रभावी जात महाराष्ट्रात निर्माण झाली नाही. अठराव्या शतकात महाराष्ट्रात क्रांतीकारक पद्धतीने नव्याने उदयास आलेल्या मराठी व्यापारी -सावकार वर्गात अनेक जातीचे लोक होते; व त्यात ब्राम्हण जातीचे लोक प्रामुख्याने होते. ब्राम्हणासह हा नवीन वर्ग स्वत: सामान्यपणे इहवादी व व्यवसायाच्या दृष्टीने जाती नियमांच्या अडथळ्यांपासून बराचसा मुक्त होता. व्यापारी व औद्योगिक स्थित्यंतराच्या व नव्या आर्थिक युगाच्या जडणघडणीच्या दृष्टीने अशा तऱ्हेने नवीन उदयास आलेला जातीनिरपेक्ष व्यापारी -सावकारी वर्ग कदाचित जास्त सुयोग्य ठरला

असता असेही म्हणता येईल.

प्रशासकीय व युद्धविषयक विशिष्ट तऱ्हेच्या आर्थिक कारभारपद्धतीमुळे मुख्यत्वे महाराष्ट्रात ब्राह्मण वर्गाचा उदय झाला होता. त्यातील बऱ्याच जणांचा राज्यकर्त्यांशी व युद्धकर्त्यांशी नात्यागोत्याचा संबंध होता. एखादी लष्करी मोहीम अयशस्वी झाली तर तिच्यासाठी दिलेल्या कर्जाच्या व उधारीच्या वसुलीसाठी मराठी व्यापारी सावकार पुढील एखादी मोहीम यशस्वी होण्याची, व्यवसायातील अनिश्चिततेचा एक भाग म्हणून वाट पाहू शकेल किंवा त्या कर्जाच्या वसुलीसाठी एखाद्या महसूल किंवा जकातीच्या कमाविसेचा हक्क किंवा एखादया मालाच्या विक्रीच्या मक्त्याचा हक्क मिळावा किंवा कर्ज वेळेवर फेडण्याविषयीच्या शर्तींच्या आधीच अशा हक्कासंबंधी उल्लेख कटाक्षाने करवून घेतला जात असे. परकीय व्यापारी सावकारांना तत्कालीन परिस्थितीत आपल्या आर्थिक व्यवसायासाठी मराठी व्यवसायाइतका राजकीय धोका पत्करणे सहसा शक्य नसे.

**ड) व्यापारी- सावकार वर्गाचा अस्त -**

सतराव्या -अठराव्या शतकात प्रथमच मराठी समाजाचे स्वतःचे असे प्रादेशिक राष्ट्र नव्याने उदयास आले. त्यास स्वतःच्या आर्थिक, सांस्कृतिक दीर्घ परंपरा नव्हत्या. त्या नसल्याने नव्या परिस्थितीला उपयुक्त ठरतील. अशा नव्या संस्था निर्माण करण्याची सामाजिक सुजनशक्तीही म्हणावी तशी मराठी समाजात स्वराज्यकालात निर्माण झाली नव्हती. त्यामुळे शेजारील कर्नाटकातील जैन किंवा लिंगायत कन्नड व्यावसायिक श्रेणीसारख्या किंवा गुजराती महाजनासारख्या आर्थिक संस्था मराठी समाजात अठराव्या शतकात निर्माण झाल्या नाहीत आणि अशा दीर्घायुषी संस्थांमुळे लाभणारे व्यावसायिक स्थैर्य व त्यांच्यायोगे आर्थिक सुविधा समुदायात पडणारी महत्वाची भर यांचा फायदा तत्कालीन मराठी समाजाला मिळाला नाही. भक्कम आर्थिक पायावर उभे राहू शकणारे व बाह्य बिगर-आर्थिक प्रकारच्या म्हणजे राजकीय वगैरे आधाराशिवाय चालू शकणारे उद्योगधंदे मराठी प्रदेशात सामान्यपणे निघालेच नाहीत. त्यामुळे अठराव्या शतकात मोठ्या संख्येत जो मराठी व्यापारी सावकार वर्ग पुढे आला तो प्रकार जवळजवळ अळवावरच्या

पाण्यासारखाच ठरला. नवीन उदयास आलेला व्यापारी-सावकारवर्ग अधिक काळ टिकून राहिला. तर कदाचित इष्ट ते अनुकूल आर्थिक बदल व नवीन आर्थिक संस्थांची जडणघडण महाराष्ट्रात होऊ शकली असती. पण हा 'जर तर' चा विचार आहे. एकोणीसाव्या शतकाच्या सुरूवातीस महाराष्ट्र ब्रिटीश सत्तेच्या अधिपत्याखाली येऊन जेव्हा मराठी व्यावसायिकांना मिळणारा स्वकीयांचा राजाश्रय व युद्धाश्रय संपला तेव्हा येथील व्यापारी-सावकार वर्गही पालापाचोळ्याप्रमाणे कुठल्या कुठे पार उडून गेला. महाराष्ट्रात ब्रिटीश राज्य आल्यावर अनेक मराठी सावकारांची व्यावसायिक पत पार लयास गेली. कारण त्यातील अनेकांनी लष्करी मेहिमासाठी किंवा इतर लष्करी कारणासाठी स्वकीय युद्धकर्त्यांना जी कर्जे दिली होती त्याची वसुली करणे ब्रिटीश सरकारच्या धोरणामुळे मराठी सावकारांना अशक्यप्राय होऊन गेले. पुढे प्रत्यक्षात ब्रिटीश सरकारने मराठ्यांच्या सैन्य उभारणीसाठी सावकारांनी दिलेली कर्जे रद्दबातलच ठरविली या बाबतीत २ जून १८३२ रोजी डेक्कनचे **ब्रिटीश डेप्युटी एजंट जॉन वॉर्डन** यांनी दिलेला निर्णय पाहण्यासारखा आहे.

अठराव्या शतकात उदयाला आलेल्या मराठी व्यापारी, सावकारवर्गाचे क्षेत्र मुख्यत्वे कर्जाच्या देण्यातून होणारा नफा व कमी अंतराची अंतर्गत वाहतूक व व्यापार एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले. त्या मर्यादित क्षेत्रातून तो वर्ग बाहेर पडण्याआधीच शिवपूर्वकालाप्रमाणे पुन्हा परकियांच्या अधिपत्याखाली गेला. स्वराज्याच्या काळात मराठी व्यापारी सावकारात फारशी कुणी व्यापारी उद्योजकता किंवा कल्पकता दाखविली नाही. किंवा कुठे खऱ्या अर्थाने भांडवल, गुंतवणूकही केली नाही. केली ती मुख्यत्वे पैशांची उलाढाल व त्या अनुषंगाने केलेले व्यवहार. एकोणिसाव्या शतकात ज्या वेळी नजीकच्या मुंबई शहराची व्यापारी व औद्योगिक प्रगती झपाट्याने होऊ लागली होती त्यावेळी पुण्यातील जुनी श्रीमंत व सावकारी घराणी या दृष्टीने पूर्णपणे निष्क्रिय राहिली.

पेशवे काळाच्या अखेरीपासून गुजराती, मारवाडीसारखे बाहेरील व्यापारी महाराष्ट्रात सर्वत्र पसरू लागले. एकोणिसाव्या शतकात ते सर्व लहान मोठ्या

मराठी गावात जाऊन बसले. शिवाय येथील शहरा-खेड्यातील सावकारी व व्यापारी व्यवसायावरही त्यांनी आपली पकड घट्ट केली.

अशा रितीने अठराव्या शतकापूर्वीच्या महाराष्ट्र, शेजारील माळवा, गुजरात, तेलंगण, कर्नाटक इत्यादी प्रदेशांशी तुलना करता आर्थिक आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने मागासलेला होता. सतराव्या शतकातील मराठी राजकीय सत्तेच्या स्थापनेमुळे व नंतरच्या शतकातील राज्यविस्तारामुळे मराठी समाजाला अनेक क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळाली. त्या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रात एक नवा अस्सल मराठी असा व्यापारी -सावकार वर्ग महाराष्ट्रात अठराव्या शतकात उदयास आला. त्यामध्ये अनेक जातींचे लोक होते. तथापि त्यात ब्राम्हणांचे स्थान प्रमुख होते. या वर्गाचा उदय व त्यांची प्रगती ही तत्कालीन राज्य अर्थव्यवहार व युद्ध अर्थव्यवहार यावर आधारीत व अवलंबून होती. ब्रिटीश राजवटीमुळे हा बाहेरील आधार जेव्हा नाहीसा झाला तेव्हा ब्रिटीश पूर्वकालात नव्याने उदयास आलेल्या मराठी व्यापारी-सावकारी वर्गही पार कोलमडून गेला.

अठराव्या शतकात भारतातील काही प्रदेशात कापसासारख्या व्यापारी पिकामुळे अनेक ग्रामीण व नागरी भागात महत्वाचा आर्थिक बदल घडून आला. यात स्थानिक शेतकरी, व्यापारी, सावकार इत्यादी सर्वांचे हितसंबंध गुंतलेले होते. गुजरातेत अधिकाधिक जमीन कापसाच्या लागवडीखाली येऊ लागली तर बंगाल व आंध्रमध्ये कापड व्यवसायासाठी बाहेरून कापसाची अधिकाधिक आयात होऊ लागली. असा उद्योगाधिष्ठित मूलगामी स्वरूपाचा आर्थिक बदल महाराष्ट्राच्या बाबतीत अठराव्या शतकात घडून आला असे म्हणता येत नाही.

भांडवल पूर्व उत्पादन पद्धतीच्या अर्थव्यवहारात सावकारी व्यवसायाचा महत्वाचा वाटा असतो. पण केवळ सावकारी व्यवहाराचे प्रमाण किंवा व्याप्ती वाढत गेल्याने उत्पादन प्रकारात आमूलाग्र बदल किंवा स्थित्यंतर होत असते. या दृष्टीने विचार केला तर, अठराव्या शतकात उदयास आलेला मराठी व्यापारी -सावकारवर्ग नवीन भांडवली उत्पादन, प्रकार घडवून आणण्याचे दृष्टीने खूपच अपुरा होता असे म्हटले पाहिजे.

भारतात सतराव्या अठराव्या शतकात राजकीय घडामोडीवर अवलंबून जे आर्थिक बदल घडून आले. त्यांचे स्वरुप बरेचसे वरवरचे होते. अठराव्या शतकात महाराष्ट्रात जो आर्थिक बदल घडून आला व नव्या व्यापारी - सावकार वर्गाचा उदय झाला तोही अशा वरवरच्या आर्थिक बदलाचाच एक प्रकार होता. या परिवर्तनाला नानासाहेबांनी आकार दिला.

## ५.१० नानासाहेब पेशवेकालीन चलन व्यवस्था -

पेशवे कालखंडामध्ये चलन व्यवस्थेत संभ्रम निर्माण झाला होता. कारण खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्यास पेशव्यांनी परवानगी दिली आणि दुसरी म्हणजे या काळामध्ये बेकायदेशीरपणे नाणी पाडण्याची पध्दत सुरू झाली. परिणामी कायदेशीर, बेकायदेशीर नाण्यांचा बाजारात सुळसुळाट सुरू झाला. नानासाहेब पेशव्यांनी टांकसाळीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पण तो फारसा यशस्वी झाला नाही. या कालखंडामध्ये चलन पध्दतीची काही वैशिष्ट्ये दिसून येतात. ती खालीलप्रमाणे -

१) रुपया हे नाणे व्यवहारासाठी वापरले जाऊ लागले.

२) पेशव्यांची नाणी चांदीची आर्काट ते दिल्लीपर्यंत या नाण्यामार्फत व्यवहार होत असे.

३) नाणे स्वीकारण्यापूर्वी प्रत्येक वेळी विनिमयाचा दर ठरवून घ्यावा लागत असे. याशिवाय टांकसाळीमध्ये रहिमतपुरी, सुरती, बागलकोटी, मलकापुरी, गंजीकोट या प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण नाणी होती.

४) या काळामध्ये चलनी हे रुपयाचे नाणे धान्य बाजारात तर पोते चाल हे नाणे सरकारी खजिन्यात स्वीकारले जात असे.

५) पेशव्यांनी खाजगी व्यक्तींनाही नाणी पाडण्यास परवाने दिले. हा चलन व्यवस्थेमधील मोठा दोष दिसून येतो. परिणामी खरी-खोटी अस्सल जुनी, नवीन अशा प्रकारचा गोंधळ नाण्यावरून उडालेला दिसून येतो.

६) या काळामध्ये मोहोर या सोन्याच्या नाण्यामध्ये अहमदाबादी, पुणेरी, तळेगावी, बनारसी, दिल्ली, पटनी अशा मोहोरांचा समावेश होत असे. ना. गो. चाफेकरांनी पेशव्याईच्या सावलीत या ग्रंथामध्ये तुळशी

बागवाले दप्तर, खाजगीवाले दप्तर, चिपळूणकर आणि वैद्य दप्तरात असलेल्या सोन्यांच्या मोहोरांची नावे दिली आहेत. त्यामध्ये पंचमेढ, लातुरी, अजमेरी, गंजीकोट वगैरे नाणी दिसून येतात.

७) चांदीची नाणी - ना. गो. चाफेकरांनी पेशव्याईच्या सावलीत या ग्रंथामध्ये चांदीच्या नाण्यांची मोठी यादी दिली आहे. त्यामध्ये रहिमतपुरी, चांदवड, मिरजी, मलकापुरी, पन्हाळी, शाहुशिक्का, आलमगिरी, हापशी चलनी इ. नाण्याचा समावेश होत असे.

८) पेशवे कालखंडातील चलनी नाण्यांची कोष्टकानुसार खालील माहिती दिसून येते. ३ रुके = १ पैसा, ४ पैसे = १ आणा.

९) पेढी व्यवहार - साधारणपणे महाराष्ट्रामध्ये यावेळचा बँक व्यवसाय किंवा पेढी व्यवहार कसा होता यासंबंधी प्रा. व्ही. जी. काळे यांनी भारतीय इतिहास संशोधन मंडळाच्या १९३० मधील अंकामध्ये बँकिंग व्यवसायासंबंधी चर्चा केली आहे. त्यानंतर सी. बी. जोशी यांनी १९३४ मध्ये सप्टेंबरमध्ये निघालेला भारतीय इतिहास संशोधन मंडळाच्या अंकामध्ये बँकिंग संबंधाची चर्चा केली आहे. तसेच ना. गो. चाफेकरांनी पेशव्याईच्या सावलीत यामध्ये बँक व्यवहार स्पष्ट केला आहे. प्रा. जी. टी. कुलकर्णी यांनी १९७३ च्या अर्थविज्ञान खंड १५ मध्ये पुण्यातील सावकार पटवर्धन, दीक्षित यांच्या हिशेब पुस्तकावरून पेशवे कालीन बँकिंग व्यवहारासंबंधी माहिती स्पष्ट केली आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील सावकार प्रामुख्याने पैशाच्या व्यवहारात देणे-घेणे संबंधी बँकिंग क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटनांची माहिती वरील विचारवंतांनी स्पष्ट केली आहे.

१०) पेशवेकालीन सावकार घराणी अर्थव्यवहारामध्ये पुढील कार्य करीत

अ) ठेवी स्वीकारणे- सरकार, व्यापारी, अधिकारी यांना कर्जे देणे

ब) चलन व सोन्या-चांदीची लगडी आणून विकणे. चलनाचा विनिमय दर ठरविणे.

क) रुपये किंवा इतर नाण्यांचे मूल्यमापन करणे आणि हुंड्या देणे.

इत्यादी कामे सावकार घराण्यांना करावी लागत असत. व्याजाचा भरमसाठ

दर असे. हा दर दरसालासाठी नसून दरमहा आकारला जात असे. शेकडा एक पासून ते पाच टक्क्यापर्यंत म्हणजे १२ टक्क्याहून ६० टक्केपर्यंत व्याजाचा दर आकारला जात असे. अशा प्रकारे पेशवे कालखंडातील आर्थिक व्यवहाराची चौकट दिसून येते. या चौकटीला नानासाहेब पेशव्यांनी सुनियंत्रित केले आणि मराठ्यांच्या अर्थव्यवस्थेला बळकट बनवले.

## ड) नानासाहेब पेशव्यांचे वतनदार व सावकारविषयक धोरण

### ५.१ प्रस्तावना -

१८ व्या शतकामध्ये मराठी राज्याचा विस्तारच नव्हे तर साम्राज्य विस्तार करण्याची मौलिक कामगिरी ज्यांनी बजावली, त्यामध्ये नानासाहेबांच्या कर्तृत्वाबरोबर बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये तयार झालेल्या अनेक घराणे व सरदारांनी केलेल्या पराक्रमालाच श्रेय द्यावे लागेल. छ. शिवाजी महाराजानंतर राज्य व्यवस्थेमध्ये खालोखाल नानासाहेब पेशव्यांना महत्त्व दिले जाते. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये मराठी राज्याला स्थिरता मिळाल्यामुळे, त्याचबरोबर तत्कालीन सरदार व वतनदारांनी बजावलेल्या कामगिरीला महत्त्व देणे आवश्यक आहे. मराठी सत्तेच्या विस्ताराला नानासाहेब पेशव्यांचे धोरण कारणीभूत झाले. ते अतिशय कुशल असे प्रशासक होते. छ. शाहूंच्या मृत्यूनंतर पतनाकडे जाणारी मराठेशाही नानासाहेब पेशव्यांनी खऱ्या अर्थाने सांभाळली. तो तलवारबहाद्दूर नव्हता किंवा नैतिकतेचा पुतळा नव्हता परंतु त्याने भारतीय द्विपकल्पामध्ये मराठी सत्तेचा दबदबा, प्रतिष्ठा, वाढवली. खऱ्या अर्थाने नानासाहेब पेशव्यांच्या काळात महाराष्ट्र सर्व बाबतीत पुढे आला. संपत्ती, शौर्य, पराक्रम, सत्ता, महत्त्वकांक्षा या सर्वामध्ये या काळामध्ये महाराष्ट्राचे नाव जगभर पसरले. मराठे किंगमेकर आहेत, ही जाणीव दक्षिणहिंद तसेच उत्तरहिंद अशा संपूर्ण भारतात पसरली. याचे कारण नानासाहेब पेशव्यांनी राबविलेली प्रशासकीय व आर्थिक धोरणे यांना देणे उचित ठरेल. त्याचबरोबर या काळामध्ये त्यांना साथ दिलेल्या वतनदार व सरदारांनी बजावलेल्या कामगिरीलाही देणे उचित ठरेल.

### पेशवे कालखंडातील वतनदार-

पेशवे काळामध्ये खेडेगाव, महाल किंवा परगाना, सुभा, किंवा प्रांत अशी महसुलाच्या व्यवस्थेसाठी राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी विभागणी केली होती. वेगवेगळे सरकारी अधिकारी, वतनदार महसूल गोळा करण्यासाठी नेमलेले असत. यामध्ये दोन प्रकारचे अधिकारी महत्त्वाचे होते. त्यामध्ये वतनदार आणि सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश असे.

१) वतनदार -

पेशवे कालखंडामध्ये देशमुख, देशपांडे हे मोठे वतनदार सारा वसुलीच्या कामावर लक्ष ठेवणे, सारा गोळा करणे आणि सरकारी दरबारी भरणे त्याचबरोबर नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीचा सारा निश्चित करण्याचे काम देशमुखाला करावे लागत असे. तर देशपांडे हा दुसरा वतनदार गावातील कुलकर्ण्यामार्फत कामावर देखरेख ठेवून महसुलाचा हिशेब तपासणीचे काम करत असे. तसेच तिसरा वतनदार पाटील हा गावातील सारा वसुलीला जबाबदार धरला जात असे. अशा प्रकारे देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी हे मोठे वतनदार पेशवे कालखंडातील महत्त्वपूर्ण घटक होते.

२) सरकारी अधिकारी -

सरकारी अधिकाऱ्यामध्ये कमावीसदार, सुभेदार, मामलेदार, खोत, अमीन, निरीक्षक, पाहणीदार आणि जमिनीस इत्यादी वतनदारांचा समावेश होत असे. कमावीसदार हा जेव्हा सारा निश्चित करीत असे, त्यावेळी त्याला संबंधित गावच्या पाटलाचा सल्ला घ्यावा लागत असे. गावामध्ये शत्रूचा हल्ला झालेला असेल अथवा रोगराई, दुष्काळ पडलेला असेल तेव्हा पिकांचे नुकसान झाले असेल तर पाटील हा वतनदार सारा कमी करण्याचे किंवा सारा रद्द करण्याची विनंती सरकारला करत असे. यावेळी कुलकर्णी हा पाटलाचा मदतनीस महत्त्वाचा होता. तो महसुलाचा हिशेब चोख ठेवत असे. पाटील व कुलकर्णी यांना एकूण महसुलाच्या १० टक्के रक्कम मानधन म्हणून मिळत असे. (संदर्भ- वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र)

पाटील, कुलकर्णी व गावातील वतनी नोकर हे कार्यक्षम असले पाहिजेत. या काळात देशमुख, देशपांडे हे वरिष्ठ वतनदार असूनही त्यांच्याकडे मात्र मोठी कार्यक्षमता आढळत नाही. तरीही पेशव्यांनी देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, महार हे वतनदार कायम ठेवून वतनदारांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी व त्यांच्याकडे जाणारा पैसा वाया जावू नये, यासाठी जमीन महसुलाच्या व्यवस्थेमध्ये प्रशासन करण्यासाठी हा पगारदार नोकर वर्गही निर्माण केलेला दिसून येतो. ते खालीलप्रमाणे-

१) सुभेदार- हा सरकारी नोकर पेशव्यांचा प्रांतामधील सर्वोच्च अधिकारी होता. प्रांताच्या महसुली व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याचे काम तो करीत असे. आपल्या हाताखाली मदत करण्यासाठी तसेच परगाण्यामधील मामलेदारांच्या निवडणुकाही घेण्याचा त्याला अधिकार होता. संबंधित प्रांताचा सर्व महसुली हिशेब त्याला काटेकोरपणे पेशव्यांना सादर करावा लागे. अशा प्रकारे वतनदार या प्रमुख घटकातील एक महत्त्वाचा सरकारी अधिकारी म्हणून सुभेदाराची नेमणूक केली जात असे.

२) मामलेदार - हा परगाण्याचा मुख्यच महसूल अधिकारी जनतेला सरकारकडून जमीन महसूलविषयक मिळालेल्या हक्कांचे रक्षण करणे, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण, त्यांना कर्जपुरवठा करणे, गावच्या पाटील या वतनदाराने पाठविलेला महसूल सरकारकडे जमा करणे, ही कामे मामलेदाराची होती. मामलेदारामार्फत महसूल वसुली हिशेबाची नोंद पेशव्यांच्याकडे पाठविली जात असे. जमीन किती लागवडीखाली आली, नव्याने जमीन किती कसण्यात आली, त्यावर सारा कसा आकारला पाहिजे या सर्व गोष्टींचा अहवाल पेशव्यांना देण्याचे महत्त्वाचे काम मामलेदार करीत असे.

३) कमावीसदार - कमावीसदार हा महालाचा महसूल वसूल गोळा करणारा महत्त्वाचा सरकारी अधिकारी असे. तो गावातील पाटील, कुलकर्णी या वतनदारांनी केलेल्या जमाबंदीनुसार महसूल गोळा झाला की नाही, हे पहात असे. दुष्काळ, रोगराई भागाची पाहणी करणे, नुकसान किती झाले हे पाहणे आणि रयतेला किती प्रमाणात सहाऱ्यात सूट देता येते का हे सर्व पाहण्याचे काम महत्त्वाचा अधिकारी होता.

४) खोत, अमीन, पाहणीदार आणि जमिनीस - पेशवे काळामध्ये वतनदारांच्यावर लक्ष ठेवणारे हे सरकारी अधिकारी महत्त्वाचे होते. खोत हा कोकणातील वसुली अधिकारी. तो कोकणामध्ये पाटील, कुलकर्णी यांचे महसुलाचे काम करीत असे. (संदर्भ- वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र) अमीन हा पेशव्यांचा खास अधिकारी होता. परगाना व महाल येथील मामलेदार, कमावीसदार यांच्यावर लक्ष ठेवणे, त्यांनी केलेल्या महसुलाच्या

नोंदी रकमा बरोबर आहेत का, हे तपासण्याचे काम करणारा तो तपासणी अधिकारी होता. गावातील पहारेकरी यामध्ये तराळ, महार हे असत. सर्वांच्या संमतीने जमाबंदी करून सारा निश्चितीचा अहवाल पेशव्यांच्याकडे पाठविला जात असे. तो निरीक्षक व पाहणीदार म्हणून काम करणारा महत्त्वाचा अधिकार मानला जात होता. याशिवाय फडणीस, दप्तरदार, चिटणीस, ठाणेदार आणि जमेनीस इत्यादी महत्त्वाचे अधिकारी पेशव्यांनी वतनदारांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेले सरकारी अधिकारी होते. या शिवाय पेशवे काळामध्ये वतनदार, सरकारी अधिकारी त्याचबरोबर मराठ्यांचे मातब्बर सरकार यांचेही आर्थिकदृष्ट्या प्रांतामधून मिळणारे उत्पन्न राज्याच्या अर्थव्यवस्थेचे दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेले दिसतात.

## ५.२ पेशवे काळातील प्रशासन

१८ व्या शतकात तसेच १९ व्या शतकाच्या प्रारंभिक वर्षातील मराठा प्रशासन म्हणजे हिंदू व मुस्लिम संस्थांचे उत्कृष्ट मिश्रण होते. हिंदू व मुस्लिम सरकारे व आर्थिक प्रणाली यांचा परस्परांवर अनेक शतकांपासून प्रभाव पडलेला होता आणि आणि अशा काळात मराठा राज्य उदयास आले. मराठा प्रशासनाची मूळ तत्वे हिंदू होती पण त्यात अनेक मुस्लिम वैशिष्ट्ये समाविष्ट झालेली होती. पेशवेकाळात त्यात अनेक बदल करण्यात आले. शिवाजीच्या कारकीर्दीतील मराठ्यांच्या शासनव्यवस्थेत मुघल सम्राटाला कोरतेही स्थान नव्हते. परंतु छ. शाहूच्या काळात मुघल सम्राटाची सर्वोच्च सत्ता मान्य करण्यात आली १७१९ च्या करारानुसार छ. शाहूने मुघल सम्राटाची १०००० ची मनसबदारी स्विकारून त्याला १० लक्ष रू. वार्षिक कर देण्याचे कबूल केले. स्वतः छ. शाहू मुघल सम्राटाचा आदर करीत असे आणि आपल्या सरदारांना त्याच्या कायम सूचना होत्या की, मुघल सम्राटाची योग्य ती प्रतिष्ठा राखली जावी. महादजी शिंदेने सम्राटाकडून छ. शाहूला वकील -ए- मुतालिकचे पद देवविले होते. मुघल सम्राटाच्या ह्या विशिष्ट स्थानाबद्दल शिवाजीच्या काळापेक्षा पेशवा काळात निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण लक्षणीय बदल झालेला दिसतो.

अ) छत्रपती-

मराठा राज्याची सर्वोच्च सत्ता छत्रपतीच्या हातात होती. हा छत्रपती शिवाजीचा वंशज असून पेशवेकाळात त्याची राजधानी सातारा होती. परंतु पेशवेपद बाळाजी विश्वनाथच्या घराण्यात वंशपरंपरेने कायम झाले तसे छत्रपतीची शक्ती व प्रतिष्ठा कमी होत गेली. स्वतः छ. शाहू राज्यकार्य व प्रशासनकार्य चालवित असे. परंतु त्याचा मुलगा नामधारी छत्रपती होता. १७५० च्या सांगोला कराराने तर छत्रपतींच्या नामधारीपणावर शिक्कामोर्तब करून राज्याची वास्तविक सत्ता पेशव्याकडे सोपविली. मात्र राजपद किंवा छत्रपतीपद शेवटपर्यंत कायम राहिले. अर्थात त्या पदाचे महत्व हळूहळू कमी होत गेले स्कॉटवारिंग म्हणतो, ''छत्रपतीकडून पेशव्याकडे सत्तेचे हस्तांतर इतके सहज, नैसर्गिक व क्रमाक्रमाने झाले की त्याचे कोणाला आश्चर्य वाटले नाही की कोणी या संक्रमणाकडे विशेष लक्षही दिले नाही'' छ. शाहूच्या उत्तरादिकऱ्याच्या काळात तर छत्रपतींच्या खाजगी खर्चावर पेशवा कार्यालयाची बारीक नजर राहत होती. आपले सेवक नियुक्त करणे किंवा त्यांना काढून टाकणे हेही अधिकार छत्रपतीला उरले नाही. सेवकगण पुण्याहून साताऱ्याला पाठविल्या जात असे. पेशवा छत्रपतीचे आदेश रद्द करीत असे. एवढेच नव्हे तर विशेष कामानिमित्त आवश्यक असलेला पैसा छत्रपती पेशव्याला मागत असे. यावरून पेशवेपदाचे महत्त्व स्पष्ट होते.

ब) पेशवा-

शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळात पेशवा एक मंत्री होता. मात्र त्याचे स्थान छत्रपती खालोखाल होते. शिवाजीने कोरतेही पद वंशपरंपरेने दिले नाही. पण बाळाजी विावनाथने स्वतःच्या कर्तबगारीने पेशवेपद आपल्याच घराण्यात कायम केले. पुढे बाजीराव प्रथमने पेशवापद मराठा प्रशासनात सर्वोच्च जागी नेऊन बसविले. प्रतिनिधीच्या विरोधाला न जुमानता बाजीरावने उत्तर भारतात मराठा सर्वोच्च जागी नेऊन बसविले. प्रतिनिधीच्या विरोधाला न जुमानता बाजीरावने उत्तर भारतात मराठा सत्तेचा प्रसार केल्याने दिवसेंदिवस पेशवा शक्तीशाली बनत गेला. राज्यहितविरोधी कारवाया करणारा मराठ्यांचा सेनापती त्रिंबकराव दाभाडेचा पराभव केल्यानंतर बाजीरावाच्या हाती

सेनापतीत्वाचे अधिकार केंद्रित झाले. **पोर्तुगीज गव्हर्नर जनरल मार्क्विस ऑफ अलोरनाच्या** दाखल्यानुसार छत्रपती इतका नामधारी बनला की लोक त्याची पुजा करत पण त्याच्या आज्ञा पाळीत नसत.

आंग्रे, भोसले, गायकवाड यासारखे जुने सरदार पेशव्याला आपल्या समान दर्जाचे मानीत व त्याच्या आज्ञा एवढ्यासाठीच पाळत कारण पेशवा छत्रपती खालोखाल होता. आंग्रे तर अशी अपेक्षा करत की, त्यांच्या पुणे आगमनसमयी स्वत: पेशव्याने नगराबाहेर यावे आणि घोड्यावरून उतरून त्यांचे स्वागत करावे, त्यांना मानमरातबाने घेऊन जावे. परंतु ही स्थिती नंतर बदलली शिंदे, होळकर, रास्ते यांच्यासारख्या नव्या सरदारांना पेशव्याने (बाजीराव प्रथम) समोर आणून महत्व प्राप्त करून दिल्याने ही सरदार मंडळी पेशव्यालाच आपला स्वामी मानू लागले. अशा प्रकारे पेशव्यांच्या उदयामुळे सरदारांमधील समानतेची भावना समाप्त झाली. भोसले व आंग्रे पेशव्यांशी फटकून राहू लागले. डॉ. एस. एन. यांच्या मते, ''यामुळे मराठा साम्राज्य पवित्र रोमन साम्राज्यासारखेच बनले. महत्वाकांक्षी सरदारांचे एक दुर्बल संघटन निर्माण झाले. रोमन सम्राटाप्रमाणेच पेशवा नेतृत्वस्थानी असला तरी त्याचा अधिकार त्याच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशावरच चालत होता. असे जरी असले तरी नानासाहेब पेशव्यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर न करता उलट छत्रपतींचा मानच राखला.

**क) केंद्रीय दप्तर-**

पुण्यातील केंद्रीय दप्तर जे हुजुर दफ्तर म्हणून ओळखले जाई, पेशव्याचे कार्यालय किंवा मराठा प्रशासनाचे केंद्र होते. त्यात अनेक विभाग होते. या कार्यालयाचे वर्णन जे मॅक्लाउड खालील शब्दात करतो. ''जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी सरकारला सादर केलेल्या जिल्ह्याच्या आयव्ययाचा अहवाल,गावातील अधिकाऱ्यांनी पाठविलेले विवरण, करात दिल्या गेलेली सुट, ती इनाम, सरंजाम किंवा कोणत्याही स्वरूपातील असो, शासकीय व ग्राम अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते, सैनिकांची संख्या व त्यांचे वेतन, सैनिक, असैनिक व धार्मिक कार्यासाठी खर्च झालेल्या रकमेचा हिशोब, दैनंदिन खर्चाची किर्द, करांची देवाणघेवाण, अनुदान व अदा राशी या सर्वांचा

तपशील या कार्यालयात रहात असे.'' संपूर्ण राज्याच्या आयव्ययाचा ताळेबंद येथे व्यवस्थितरित्या रहात होता. त्यावरून स्थितीची कल्पना येत होती. शिवाय वेगवेगळ्या विभागांचे उत्पन्न झालेला खर्च याची खतावणी करण्यात येत असे. केंद्रीय दफ्तर खऱ्या अर्थाने नावारूपास आणण्याचे श्रेय पेशवा बाळाजी बाजीरावला देणे उचित ठरते. तो स्वतः हिशोबकार्यावर कडक नजर ठेवीत होता. म्हणून त्याचा उल्लेख छ. शाहू यांनी **'हिशोबी पेशवा'** असा केला आहे. पुढे पेशवा माधवराव केव्हाही कार्यालयाची तपासणी करू लागल्याने हिशोब विभाग चोख व कार्यरत होता. त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या नानाफडणीसने जवळजवळ २५ वर्षे या विभागाचे नेतृत्व केले त्याने कार्यपद्धतीत अनेक सुधारणा केल्या. पण हा सर्व कारभार पेशवा बाजीराव द्वितीयच्या कारकिर्दीत चालू होत्या. यावरून नानासाहेबांच्या केंद्रीय दप्तरातील हिशोबी बाण्याचे धोरण लक्षात येते.

### ड) प्रांतीय व जिल्हा प्रशासन-

पेशवेकालीन प्रशासनात तरफ, महाल, परगना सरकार सुभा इ. शब्दांचा प्रयोग झालेला आहे. सामान्यतः सुभा म्हणजे प्रांत त्यावरील मुख्य अधिकारी सुभेदार होता. आपल्या सुभ्याची सर्व प्रकारची जबाबदारी त्याची होती. प्रामुख्याने आपल्या सुभ्याचे रक्षण करणे, तेथील जनतेचे कल्याण पहाणे, महसूलाची योग्य यंत्रणा राबविणे सुभेदाराचे कर्तव्यहोते. त्या कामात त्यालामदत करण्यासाठी दिवाण, मुजुमदार, चिटणीस इ. अधिकारी होते. सुभेदाराचे कर्तव्य होते. त्या कामात त्याला मदत करण्यासाठी दिवाण, मुजुमदार, चिटणीस इ. अधिकारी होते. सुभेदाराचे पद अत्यंत महत्वाचे असल्याने त्यावर एकनिष्ठ व कर्तृत्वसंपन्न अशा व्यक्तीची नियुक्ती होत होती. तरीही सुभेदाराच्या एकंदर हालचालीवर, कार्यपद्धतीवर केंद्रीय प्रशासन लक्ष ठेवून असे. गुजरात, कर्नाटकसारख्या मोठमोठ्या प्रातांवर सरसुभेदार होते. कर्नाटकचा सरसुभेदार आपले मामलतदार (अधिकारी) स्वतःच नियुक्त करीत असे.

सुभ्याचे विभाग म्हणजे परगना (जिल्हा) होय. तेथे कमाविसदार व मामलतदार हे अधिकारी होते. त्यांच्याकडे सर्वच प्रकारचे कार्य होते. कृषी व उद्योगाचा विकास, धार्मिक सामजस्य, महसूल व्यवस्था, शांतता व

सुव्यवस्था ही महत्वाची जबाबदारी होती. कमाविसदार व मामलतदारांचे वेतन व भत्ते जिल्ह्याच्या (परगणा) महत्वानुसार वेगवेगळे रहात. शिवाजीच्या काळात पदे पात्रता पाहून देण्यात येत. परंतु पेशवा काळात त्यातही वंशपरंपरा आलेली दिसते. त्यामुळे लाचलुचपत, भ्रष्टाचार वाढला. परगण्यातील इतर अधिकारी म्हणजे देशमुख व देशपांडे होत. त्यांची स्विकृती मिळाल्याशिवाय हिशोब संमत होत नसत. शिवाय दरकदार नावाचा अधिकारी होता. अशा प्रकारे देशमुख, देशपांडे व दरकदार हे अधिकारी जिल्हा प्रशासनावर नियंत्रण ठेवणारे होते. कारकून नावाचा अधिकारी जिल्ह्याचा अहवाल केंद्र प्रशासनाला पाठविण्याचे काम करीत होता.

परगण्याचे लहान लहान विभाग म्हणजे महाल होत. तेथे मुख्य अधिकारी हवालदार होता. त्याच्या हाताखाली मुजुमदार, फडणीस इ. अधिकारी होते.

**इ) ग्राम प्रशासन-**

प्राचीन काळापासूनच भारतात खेडे प्रशासनाचा महत्वपूर्ण व स्वयंपूर्ण घटक होता. त्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेख असली तरी खेड्याला कारभाराचे पूर्ण स्वातंत्र्य होते. खेड्याचा मुख्य अधिकारी पज्ञाटील होता. कर वसली, प्रशासन, न्याय हे सर्व अधिकार त्याच्याकडे होते. एकप्रकारे पाटील म्हणजे ग्राम व सरकारी अधिकारी ह्यांच्यातील दुवा होता. ह्या पदाच्या बाबतीत जवळजवळ वंशपरंपरा होती. पाटील खेड्यातील जनतेचा नेता होता आणि वसूल झालेल्या कातील काही भाग वेतन म्हणून तो स्तव:जवळ ठेवत असे. शेतीवरील कराची वसूली करून त्याचा राजकोषात व्यवस्थित भरणा करणे पाटलाचे महत्वाचे कार्य होते. त्यात काही गडबडझाल्यास त्याला सरळ तुरूंगाचा रस्ता दाखविण्यात येई. कोणत्याही राजकीय उलथापालथीत किंवा परकीय आक्रमणाच्या अवस्थेत आपल्या खेड्यातील लोक शासनाला एकनिष्ठ रहातील ही पाटलाची जबाबदारी होती.

खेड्याचा हिशोब ठेवण्यासाठी पाटलाच्या हाताखाली कुळकर्णी नावाचा अधिकारी होता. कुळकर्णीच्या हाताखाली चौगुला रहात असे. याशिवाय ग्राम प्रशासनातील महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बारा बलुतेदार होत. ग्रामाची

सवा करून मोबदल्यात त्यांना धान्य मिळत असे. परस्पर सहकार्याने खेड्याचा गाडा (गावगाडा) चालविणे ही त्यामागील भावना होती. खेड्याची स्वतंत्र न्यायव्यवस्था होती. सामान्यतः न्याय मागण्यासाठी खेड्यातील जनतेला बाहेर जाण्याची गरज नव्हती. त्यांना आपापल्या खेड्यातच पंचायतीद्वारा न्याय मिळत होता.

**फ) नगरप्रशासन-**

मराठ्यांचे नगरप्रशासन मौर्यकाळासारखे होते. नगराचे प्रशासन कोतवाल नावाच्या अधिकाऱ्याकडे होते. कोतवाल हा अधिकारसंपन्न असा होता. तो नगर पोलीसांचा प्रमुख व मुख्य दंडाधिकारी होता. त्यादृष्टीने नगरात शांतता व सुव्यवस्था ठेवणे किंमतीवर नियंत्रण ठेवणे आपसातील भांडणांचा निकाल लावणे इ. कर्तव्ये कोतवालास पार पाडावी लागत. आपल्या कामाचा मासिक अहवाल कोतवाल सरकारला पाठवित असे.

**ग) न्यायव्यवस्था-**

प्राचीन भारतातील हिंदू स्मृतिकारांचा सर्वात जास्त प्रभाव मराठ्यांच्या न्यायपद्धतीवरपडलेला दिसतो. प्राचीन संस्कृत स्मृतिग्रंथ, ननूस्मृति इ. वर मराठ्यांचे कायदेनियम आधारलेले होते. न्यायकक्षेत्रातील चढती कमान म्हणजे खेड्यात पाटील किंवा पंचायत, जिल्हयात मामलतदार, सुभ्यात सुभेदार आणि सर्वात वर छत्रपती अशी होती. नगरांमध्ये शास्त्रपंडीत असे स्वतंत्र न्यायाधीश असत. पेशवेकाळात कायद्यांची संहिता नव्हती खटल्यांचा कालावधी निश्चित नव्हता. आवश्यकतेप्रमाणे न्यायाचे कार्य चालत होते. शक्यतेवर आपसात समझौता घडवून आणण्यावर न्यायप्रणालीचा भर होता. आधुनिक न्यायाधिशांच्या जागी छत्रपती व पेशवा प्राचीन कुलपित्याची भूमिका पार पाडीत. दिवाणी खटल्यांचा निकाल देण्यासाठी पंचायत होती. पंचायतीला पंचपरमेश्वर संबोधून त्याने दिलेला निर्णय दोन्ही पक्ष मान्य करीत. पंचायतीच्या निर्णयाविरूद्ध अपील मामलतदाराकडे करता येत होती. पंचायत अप्रामाणिक आहे हे सिद्ध होत नाही. तोपर्यंत सामान्यतः मामलतदार, पंचायतीने दिलेला निर्णय उचलून धरत असे. कधीकधी पंचायतीसमोर चाललेला खटला स्वतः पेशवा तपासत असे.

फौजदारी खटल्यासाठी वेगळी व्यवस्था नव्हती. साधारणतः शिक्षा म्हणजे फटके मारण्याची होती. खून, दरोडे, देशद्रोह इ. गुन्ह्यांकडे कारावास किंवा संपत्ती जप्त करणे अशा शिक्षा होत्या. पेशवेकाळात मोठमोठ्या राजकारणी व्यक्तींना अशा शिक्षा भोगाव्या लागल्या. पेशवा माधवराव प्रथम न्यायप्रिय होता. त्याच्याच तालमीत तयार झालेल्या रामशास्त्री प्रभुणे ह्या न्यायाधीशाने खुद्द पेशवा रघुनाथरावास देहांत प्रायश्चिताची शिक्षा सुनावण्यास मागेपुढे पाहिले नाही. इतरांच्या देशद्रोही वृत्तीवर प्रतिबंध बसण्यासाठीच या कडक शिक्षा होत्या. खरे तर सुधारणा हेच शिक्षेमागील तत्व होते.

**च) पोलीस व्यवस्था-**

तत्कालीन पोलस व्यवस्था समाधानकारक होती. खेड्याची पोलीस व्यवस्था पाटील पहात असे. त्याच्या मदतीला चौगुला होता. खेड्यात गस्त घालणे, जाणाऱ्या येणाऱ्यावर लक्ष ठेवणे ही कामे बारकाईने केली जात. खेड्यात उपद्रव झाल्यास पाटील लष्कराची मदत घेई. मोठमोठ्या नगरांची पोलीस व्यवस्था कोतवालाकडे होती. पेशव्यांच्या निवासाचे ठिकाण म्हणून पुण्याला अतिशय महत्व होते. तेथील पोलिस प्रबंध अत्यंत कार्यक्षम होता. डॉ. सेन, एल्फिन्स्टन यांनी पुण्याच्या पोलीस व्यवस्थेची प्रशंसा केलेली आहे. डॉ. सेन यांनी तर पुणे पोलीसांची तुलना लंडन पोलीसांशी केली आहे. एल्फिन्स्टनच्या म्हणण्यानुसार या कार्यावर ९००० रू. वार्षिक खर्च केला जात असे. पोलिस विभागात अनेक कर्मचारी, घोडेस्वार, गस्त घालणाऱ्या तुकड्या व रामोशी होते. पुण्याच्या पोलिस विभागात अंदाजे १००० लोक होते. नगरात रात्री १० नंतर संचारबंदी असे. नियमांचा भंग करणाऱ्यास तुरूंगात टाकले जाई व त्यांची कसून चौकशी होई. या नियमाला स्वतः पेशवाही अपवाद नव्हता.

**य) कर व्यवस्था-**

भारताचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेतीवरील कर उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शिवाजी धान्याच्या रूपात कर घेत असे पण पेशवे काळात नगदी स्वरूपात कर घेणे सुरू झाले. सिंचनाच्या सोईनुसार कर आकारला जाई. शिवाय जमिनीची प्रत व उपज क्षमता ह्यानुसार वर्गीकरण करून

त्यावर कर आकारण्याची पद्धत होती. हा अर्थातच मुगल प्रभाव होता.

नवीन जमिन लागवडीखाली आणल्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कराचे प्रमाण कमी ठेवल्या जाई. पेशवा माधवराव प्रथमने पडीक व खडकाळ जमीन लागवडीखाली आणणाऱ्या शेतकऱ्यांना अर्धी जमीन इनाम देण्याची व उरलेल्या अर्ध्या जमिनीवर पुढील २० वर्षे कर कमी लावण्याची घोषणा केली होती. दुष्काळ, पूर अथवा परचक्र कोणत्याही कारणाने पीके नष्ट झाल्यास कर माफ केला जाई. सावकारांच्या तडाख्यातून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी कमी व्याजावर शासनाकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाई. त्याला तकावी म्हणत.

कर निर्धारणाची किंवा करवसूलीची व्यवस्था सर्व राज्यात सारखी नव्हती. अशाप्रकारे करदात्याला संरक्षण हा मराठा करपद्धतीचा उद्देश असला तरी पेशवा बाजीराव द्वितीयच्या काळात करवसूलीचे अधिकार ठेकेदारी पद्धतीने देणे सुरू झाल्याने संपूर्ण करव्यवस्था नष्ट भ्रष्ट झाली.

राज्याच्या उत्पन्नाची इतर साधने- चौथाई व सरदेशमुखी ही राज्याच्या उत्पन्नाची इतर साधने होती. मराठ्यांच्या आक्रमणापासून बचाव करण्यासाठी काही प्रदेश मराठ्यांना चौथाई व सरदेशमुखी कबूल करीत. चौथाई म्हणजे उत्पन्नाचा चौथा हिस्सा तर सरदेशमुखी म्हणजे दहावा हिस्सा होय. अशाप्रकारे केवळ दबावतंत्राचा उपयोग करून मराठे आपल्या राज्याच्या सीमेवरील प्रदेशातून व इतरही प्रदेशातून त्यांच्या एकूण उत्पन्नांच्या ३५% उत्पन्न वसूल करीत. प्रत्यक्षात मराठ्यांच्या पदरात काय पडत होते हा प्रश्न वेगळा. चौथाईचे वाटप पुढीलप्रमाणे करण्यात येई. बाबती किंवा २५% भाग छत्रपतीसाठी सहोत्री किंवा ६% भाग पंतसचिवासाठी, नाडगौडा किंवा ३% भाग छत्रपतीच्या मर्जीवर अवलंबून आणि उरलेला मोकासा किंवा ६६% भाग मराठा सरदारांना घोडेस्वार ठेवण्यासाठी वाटून दिला जाई. अशाच पद्धतीने सरदेशमुखीचेही वाटप होत असे. चौथाई व सरदेशमुखी देणारा प्रदेश मराठा राज्यात समाविष्ट झाला तर उरलेल्या ६५% उत्पन्नाला जज्ञागीक्षर म्हणत व त्याचे वाटप आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या व्यक्तीमागे केले जाई.

जंगले, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क ही राज्याच्या उत्पन्नाची इतर साधने होती. जंगलातून इंधनाचे लाकूड कापणे, इतर लाकूड कटाई, बांबू कटाई, मध गोळा करणे इ. कामाच्या निविदा काढण्यात येत. काही सोनारांना खाजगी टांकसाळ चालविण्यास सरकार परवानगी देत असे. त्यातून काही उत्पन्न मिळत होते. पेशव्याच्या उत्पन्नासंबंधी भिन्नभिन्न अंदाज आहेत. जे ग्रँटच्या मतानुसार १८ व्या शतकाच्या शेवटी वार्षिक उत्पन्न ६ कोटी रू. होते. ज्यात ३ कोटी रू. चौथाईचे होते. डिसेंबर १८१५ मधील आकडा एल्फिन्स्टनने दिला आहे. ज्यानुसार हे उत्पन्न ६९,७१७३५ रू. होते. मात्र त्यात चौथाई व सरदेशमुखीचा आकडा समाविष्ट नाही.

### ज) लष्करी व्यवस्था

मराठ्यांचे सैन्यसंघटन मुघल व्यवस्थेवर आधारीत होते. नियमही दक्षिणेतील मुस्लिम राज्यांच्या अधिनियमांवर आधारीत होते. पायदळापेक्षा घोडदळावर जास्त भर होता. वेतन अदा करणे, सैनिकांना चांगल्या कामगिरीसाठी प्रोत्साहित करणे, आश्रित ठेवून त्यांची व्यवस्था करणे इ. मध्ये सरळसरळ मुघल प्रभाव दिसून येतो. प्राचीन हिंदू पद्धतीपेक्षा तत्व आणि व्यवहारात मराठ्यांची ही व्यवस्था सर्व अर्थाने वेगळी होती.

शिवाजीने आपली लष्करभरती प्रामुख्याने महाराष्ट्रातून केली पण पेशवेकाळात ती संपूर्ण भारतातून होऊ लागली. म्हणूनच पेशवेकालीन सैन्यात तेलंगी, कर्नाटकी, बिदरी, राजपूत, शिख यांच्याबरोबरच रोहिल, अरब, हबशी, भारतीय ख्रिश्चन, पोर्तुगीज अंमलाखालील भारतीय प्रदेशातून आलेले शेणवी असे सर्व जातीधर्माचे, वर्णाचे सैनिक भरती होऊ लागले. मात्र सैन्याचे राष्ट्रीय स्वरूप जाऊन त्याला व्यावसायिक रूप आले. केवळ अर्थार्जनाचे उद्दिष्ट असलेल्या या सैन्यात एकजिनसीपणा रहाणे शक्यच नव्हते. मराठा सत्तेचा सर्वत्र प्रसार होण्याचा तो एक अपरिहार्य परिणाम होता. शिवाजीचे सैन्य सामंतशाही प्रथेवर आधारलेले नव्हते. तसेच शिवाजी आपल्या सैन्याला प्रत्यक्ष वेतन देत असे. पेशव्यांनी मात्र सामंतशाही प्रथा(जहागिरदारी, वतनदारी) कायम ठेवली. साम्राज्याचा बराच भाग अशाप्रकारचे सरदारांमधे वाटला गेला.

**घोडदळ-**

छ. शिवरायांच्या काळापासून घोडदळ मराठा सैन्याचे मुख्य अंग होते. मराठा राज्य सह्याद्रीच्या शिखर पठारावर, दऱ्याखोऱ्यात पसरलेले शिवाय गनिमी काव्याचा अवलंब त्यामुळे घोडदळाला अतोनात महत्व होते. सरदारांना एका निश्चित संख्येने घोडेस्वार ठेवावे लागत. त्यांचे वार्षिक निरीक्षण होत असे. पेशवा बाळाजी बाजीरावच्या कारकिर्दीत घोडे तीन प्रकारच्या श्रेणीचे होते. उत्तम घोड्याची किंमत ४०० रू. मध्यम घोडा २०० रू. आतणि कनिष्ठ प्रतिचा घोडा १०० रू. अशा किंमती होत्या. त्यापेक्षा कमी किंमतीचा घोडा लष्करी उपयोगाचा नव्हता. पेशवेकाळात स्वराज्य वेगाने साम्राज्याकडे वाटचाल करू लागल्याने मराठा सैन्य दूरदूरपर्यंत मजला मारू लागले. त्यामुळे घोडदळाचे महत्व कायम राहिले. मात्र इतक्या महत्वाच्या घोडदळाला प्रशिक्षण देण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. त्या काळात घोड्यांच्या मोठमोठ्या पागा असत आणि त्यात ५०० पर्यंत घोडे रहात. घोडेस्वारांचे दोन प्रकार होते. ज्याला राज्यातर्फे घोडा व शस्त्र देण्यात येई त्याला बारगीर म्हणत. शिलेदार स्वत:चा घोडा व शस्त्र बाळगीत असे.

**पायदळ-**

साम्राज्यविस्ताराच्या आकांक्षेने मराठा सैन्य सह्याद्रीच्या पार जाऊ लागले. विशेषत: नर्मदेच्या उत्तरेकडील मैदानी मुलुखात ह्या सैन्याने प्रवेश केला तेव्हा गनिमी कावा मागे पडून पायदळाला महत्व आले. परिणामी पायदळात राजपूत, शिख, अरब रोहिले यांची भरती सुरू झाली. काही प्रमाणात युरोपियनही भरती होऊ लागले. बॉयडतर्फे प्रशिक्षित तुकडीचा खर्च मासिक २६,२४२ रू. होता. (कमांडरला प्रति मास ३००० रू., कॅप्टनला ४५० रू., लेफ्टनंटला २५० रू, सार्जटला ९० रू. आणि हवालदाराला १५ रू. असे वेतन होते.) पायदळात भरती होण्यासाठी परकीयांना विशेष प्रलोभन दाखविण्यात येई. अरब सैनिकाला १५ रू. हिंदुस्थानी सैनिकाला ८ रू. आणि मराठा व दखखनी सैनिकाला ६ रू. मासिक वेतन मिळत असे. पायदळासाठी काही नियम होते. मिळालेली लूट स्वत:जवळ ठेवणे गुन्हा समजला जाई.

**तोफखाना-**

मराठ्यांच्या तोफखान्यात प्रामुख्याने पोर्तुगीज व भारतीय ख्रिश्चन काम करीत. पेशव्यांनी तोफा बनविण्याची व तोफगोळा बनविण्याचे कारखाने सुरू केले. साधारणतः बाळाजी बाजीरावच्या कारकीर्दीत याचा प्रारंभ झाला. निजामाचा प्रशिक्षित तोफखाना पाहून त्याचे महत्व मराठ्यांना कळून आले. म्हणूनच इब्राहिमखान गारदीच्या मार्गदर्शनाखाली मराठ्यांनी आपल्या तोफखान्याचे आधुनिकीकरण केले. पण पानीपतच्या लढाईत हा तोफखाना नष्ट झाला. म्हणून पेशवा माधवराव प्रथमने आपल्या कार्यशाळात आंबेगाव व पुणे येथे दोन कारखाने सुरू केले. पण एकंदरीत तोफा व तोफगोळे यांच्या बाबतीत मराठे पोर्तुगीज व इंग्रजावर विसंबून होते.

**आरमार-**

शिवाजीच्या काळात आरमाराला असलेले महत्व पेशवेकाळात राहिले नव्हते. पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज या परकीय आरमारी सत्तांना नियंत्रणात ठेवण्याचे काम आंग्रे करीत. पण आंग्रे स्वतंत्र वृत्तीने वागत. मराठा आरमाराचामुख्य उपयोग समुद्री चाच्यांना रोखणे, समुद्री दळणवळणापासून जकात वसूल करणे, आपल्या बंदरांचे रक्षण करणे अशा स्वरूपाचा होता. कान्होजी आंग्रेच्या मृत्यूनंतर (१७२९) मराठ्यांच्या आरमाराला उतरती कळा लागली. अशातच आंग्रे घराण्यात कलह सुरू झाल्याने त्याचा फायदा इंग्रजांनी घेतला व मराठा आरमार दुर्बल बनविले. बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत ॲडमिरलला ११८६ रू. वार्षिक वेतन व इतर भत्ते मिळत होते. शिवाय विजयानंतर भरपूर बक्षिसे दिली जात. सरतांडेलला प्रति मास १० रू. तांडेलला ७१/२ रू.व नाविकाला ४१/२ रू. ते ५ रू. वेतन होते.

किल्ले शिवकालीन किल्ल्यांना असलेले महत्व पेशवे काळात राहिले नाही कारण युद्धनीतीत झालेला बदल होय. पेशवेकाळात युद्धभूमी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात न रहाता महाराष्ट्राबाहेर दूरदूरपर्यंत पसरल्याने स्वाभाविकच किल्ल्यांना जुने स्थान उरले नाही. मात्र किल्ल्यांची परंपरागत व्यवस्था कायम होती.

गुप्तहेर-

छ. शिवरायांच्या काळात गुप्तहेरांना असलेले अती महत्वाचे स्थान पेशवेकाळात दिले गेले होते. या काळात गुप्तहेरांनी दैदिप्यमान कामगिरी केल्याचे दिसत नाही. पेशवा बाजीराव प्रथमने आपल्या लष्करी हालचालींसाठी काही प्रमाणात हेरखात्याचा उपयोग करून घेतला. पेशवा नानासाहेब व माधवराव प्रथमने यांनी या खात्यात कार्यक्षमता आणण्याचा प्रयत्न केला.

सारांश-

अशा प्रकारे नानासाहेब पेशव्याने प्रशासनाचा खऱ्या अर्थाने मूलभूत पाया तयार केला. छत्रपती, पेशवा याचबरोबर प्रांतीय प्रशासनामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. प्रशासनातील भ्रष्टाचाराला आळा घातला. हिशोबाची पध्दत सुरू केली. सुभेदार, मामलेदार, कमाविसदार यांच्या अधिकाराच्या वाटण्या निश्चित केल्या. अधिकारांचे नियमन केले. ग्रामप्रशासन, नगर प्रशासन, न्यायव्यवस्था, पोलिस व्यवस्था, लष्करी व्यवस्था आरमार आणि गुप्तहेर व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करून प्रशासन व्यवस्थेचा परिपूर्ण आकार दिला.

## ५.३ अर्थव्यवस्थेचे (पिलर्स) खांब

प्रामुख्याने १८ व्या शतकाच्या या काळामध्ये वतनदार म्हणून खालील सरदार घराणी उदयास आली. या घराण्यांतील वतनदारांनी महाराष्ट्राची पत आणि प्रतिष्ठा सर्वत्र पोचवली. अशा या मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेचे अर्थव्यवस्थेचे (पिलर्स) खांब खालीलप्रमाणे -

१) बडोद्याचे गायकवाड, २) गुजरातचे दाभाडे, ३) धारचे पवार, ४) इंदोरचे होळकर, ५) ग्वाल्हेरचे शिंदे, ६) नागपूरचे भोसले, ७) मिरजेचे पटवर्धन, ८) इचलकरंजीचे घोरपडे, ९) कराडचे खेर-बुंदेले, १०) नाशिकचे दीक्षित.

१) बडोद्यातील प्रसिध्द वतनदार गायकवाड -

१८ व्या शतकात मराठी राज्याचा विस्तार करण्याची जबाबदारी बडोदा घराण्यातील वतनदारांनी प्रामाणिकपणे पार पाडली. मराठा राज्याच्या विस्ताराला आणि शूर मराठी सरदारांच्या महत्त्वकांक्षेला नवे क्षेत्र मिळावे,

नावलौकिक मिळवावा, छ. शाहूने स्वराज्यालगतचे काही भाग, प्रदेश, शूर व धाडसी मराठा सरदारांना त्यांचे कार्यक्षेत्र म्हणून सोपविले आणि त्यांच्याकडे खालील जबाबदाऱ्या दिल्या.

अ) चौथाई व सरदेशमुखी वसूल करणे

ब) दिल्ली दरबारी लक्ष देणे व मदत करणे

क) दुआब- गंगा, यमुना नद्यांचा प्रदेश लक्ष घालणे

ड) मराठी राज्याचा विस्तार करणे

इ) छत्रपतींना ३४ टक्के साहोत्रा व मोकासा देणे व ६६ टक्के सावत्र मोकासा स्वतःकडे ठेवणे या वरील उद्दिष्टांसाठी छ. शाहूंनी धाडसी शूर सरदारांची, वतनदारांची नेमणूक करून त्यांना स्वराज्यातील भाग कार्यक्षेत्र म्हणून दिले. या बदल्यात हे वतनदार छत्रपतींना नानगौडा देत असत. १७४९ पर्यंत छ. शाहूंच्या कारकिर्दीपर्यंत हा नानगौडा छत्रपतींना व्यवस्थित मिळत असे. मात्र छ. शाहूंच्या मृत्यूनंतर पेशवे सर्वेसर्वा बनले. त्यामुळे तह असो, करार असो किंवा चौथाई, सरदेशमुख संदर्भातील व्यवहार असो, हे सर्व आर्थिक अधिकार पेशव्यांना आले.

गायकवाड हे गुजरातच्या दाभाडेकडे मुतालिक म्हणून काम करीत होते. पिलाजी गायकवाड हा दमाजी गायकवाडचा दत्तकपूत्र असून दमाजी गायकवाड हा पुण्याजवळील खेड जिल्ह्यातील दावडी गावचा रहिवासी. तो खंडेराव दाभाडेच्या लष्करामध्ये सामील झाला होता. बाळापूरच्या लढाईत त्याने मोठा पराक्रम केला होता. म्हणून छत्रपतीने दमाजीला समशेर हा किताब दिलेला होता. दमाजीचा दत्तक मुलगा पिलाजी हाही पित्यापेक्षा कर्तबगार होता. त्र्यंबकराव दाभाडेच्या गुजरात मोहिमेत पिलाजीनेही मोठा पराक्रम केला होता. त्यामुळेच गायकवाडांना मोगल आणि युरोपीयन अधिकाऱ्यांना शह देणे शक्य झाले होते. सोनगड या ठिकाणी गायकवाडांनी आपले लष्करी ठिकाण बनविले. गुजरातमधून मोघल सत्तेचे समूळ उच्चाटन करणे आणि गुजरातसारखा संपन्न प्रदेश मराठ्यांच्या हातात ठेवणे याकामी गायकवाडांनी केलेले योगदान महत्त्वपूर्ण ठरते.

पिलाजीप्रमाणेच कंठाजी कदम बांडे हा गुजरातमधील असणारा पराक्रमी सरदार, त्यानेही अनेक मोघल अधिकाऱ्यांना नाकीनऊ करून सोडले होते. पिलाजीने तर सुरत, भडोच या भागात चौथाई, सरदेशमुखी मिळविण्याचा अधिकार मिळविला होता. गायकवाड घराण्यातील पिलाजी गायकवाडसारख्या वतनदारांमुळेच गुजरातमध्ये दाभाडे घराण्याची सत्ता फोफावली. एवढेच नव्हे तर उत्तर हिंदमध्ये दाभाडे घराण्याने व या घराण्यातील पिलाजी व कंठाजी या दोन सुभेदारांनी संपूर्ण गुजरात प्रांतात प्रशंसनीय कामगिरी करून वाहवा मिळविली. मात्र बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये बाजीराव पेशवे स्वतः पराक्रमी असल्यामुळे सेनापती व पेशवे ही दोन्ही पदे त्यांना मिळाली. बाजीरावने गुजरातमध्ये मुघलांच्यावर दडपण आणून सरदेशमुखीचा अर्धा हक्क मिळवला. परिणामी त्र्यंबकराव दाभाडे याला पेशव्यांचे हे वागणे आवडले नाही. त्यातूनच बाजीराव व त्र्यंबकराव यांच्यात गुजरात प्रांतावरून दबईची लढाई होते (१७२९). या लढाईत त्र्यंबकराव मारला जातो. शेवटी छ. शाहूने या पेशवे आणि दाभाडे या दोन घराण्यात समेट घडवून आणला. त्र्यंबकरावचा धाकटा भाऊ यशवंतराव यास सेनापतीपद दिले. असे जरी असले तरी पेशवे दाभाडे या दोन घराण्यात कलहाचे बीज फोफावू नये, ही संपूर्ण जबाबदारी दाभाडेंचा गुजरातमधील मुतालिक पिलाजी गायकवाड याने प्रामाणिकपणे पार पाडला. पिलाजी गायकवाडच्या मृत्यूनंतर मात्र मराठ्यांचा गुजरातमधील दबदबा नष्ट झाला. परंतु दाभाडे आणि पेशवे यांच्यातील वैरत्व वाढत गेले. नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये गुजरात प्रश्नासंबंधात पेशवे आणि दाभाडे यांच्यात वाटाघाटी झाल्या. १७५२ मध्ये पेशवे व दमाजी यांच्यात करार होऊन दाभाडे यांच्या हाती असलेले गुजरात व काठेवाडचा निम्मा भाग पेशव्यांच्याकडे आला. तसेच जिंकलेल्या प्रदेशांची निम्मी वाटणी दमाजीने दंडादाखल १५ लक्षाची रक्कम द्यावी, दरसाल ५। लक्षाची खंडणी पेशव्यांना द्यावी तसेच पेशव्यांनी बोलविल्यास पेशव्यांच्या मदतीस १० हजार सैन्यानिशी यावे, गुजरातचा कारभार गायकवाडांनी पहावा, अशा प्रकारचा हा करार महत्त्वपूर्ण होता. पुढील काळात पेशवे व दमाजी यांच्यात सलोख्याचे संबंध राहिले. १७५३ मध्ये पेशवा व दमाजी यांनी

गुजरात मधील मोघलांची पूर्ण सत्ता नष्ट करून मराठ्यांची सत्ता लागू केली. पेशवा व गायकवाड यांच्यात गुजरातची वाटणी झाली. नानासाहेबांनी गुजरातमध्ये टांकसाळी सुरू केल्या. पानिपतच्या युध्दातही दमाजीने भाग घेतला. अशा रीतीने गुजरात हा प्रांत पुढील काळात बडोद्याच्या गायकवाडाकडे गेलेला दिसून येतो.

### २) गुजरातचे दाभाडे

दाभाडे हे मूळचे गुजरामधील प्रसिध्द वतनदार. पुण्याजवळील तळेगाव या घराण्यातील मूळ पुरुष येसू पाटील हे होते. त्यांचा भाऊ शिवाजी. त्यांचे मूळ नाव दाभाडे होते. छ. शिवरायांच्या मृत्यूनंतर मराठा मोघल संघर्ष सुरू झाला. स्वतः औरंगजेब दक्षिणेत आला. मराठा मोघल संघर्षात पहिली नऊ वर्षे छ. संभाजींनी नेतृत्व केले. छ. संभाजीनंतर छ. राजारामकडे नेतृत्व आले. या वेळी महाराष्ट्रात सर्वत्र मोघलसैन्य एकवटले. तेव्हा हुकूमतपन्हा रामचंद्रपंत अमात्याने राजारामला सल्ला दिला, दक्षिणेत जावून जिंजीचा आश्रय घ्यावा. तेव्हा जवळ जवळ बरीच वर्षे राजारामने मोघलांशी लढा दिला. औरंगजेबाचा सरदार सेनापती जुल्फिकार याने जिंजीचा किल्ला जिंकला. छ. राजारामने खंडो बल्लाळ चिटणीसच्या मार्फत वाटाघाटी करून किल्ला मुघलांच्या हवाली केला. यावेळी छ. राजारामचा जनानखाना, बायकामुले, महाराष्ट्रात सुखरूप आणण्याचे काम विश्वासू सेवक येसू पाटील दाभाडे व त्याचा भाऊ शिवाजी यांनी केले. छ. राजाराम कोंढाणा येथे रक्ताची उलटी होऊन २ मार्च १७०० मध्ये मरण पावला. दाभाडे यांनी प्रामाणिक सेवा केली असल्यामुळे मृत्यूपूर्वी छ. राजारामनी त्यांना सेनाखासकेल हा किताब दिला होता. नंतर मराठी राज्याचे नेतृत्व ताराबाईकडे गेले. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात छ. शाहूला सोडण्यात आले. परिणामी मराठ्यांच्यात दोन गट पडले. सेनापती धनाजी जाधव याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा चंद्रसेन जाधवला सेनापती पद दिले. पण तो प्रामाणिक नसल्यामुळे छ. शाहूंनी सेनापतीपदासाठी खंडेराव दाभाडेची नियुक्ती केली. खंडेराव दाभाडेने बाळाजी विश्वनाथ यांच्याबरोबर दिल्ली येथे मराठी सैन्याचे नेतृत्व करून स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी या सनदा छ. शाहूंच्या नावे

आणल्या. यावेळी छ. शाहूंचा दाभाडे घराण्यावर विश्वास बसला. खंडेराव दाभाडेला त्र्यंबकराव व विश्वासराव ही दोन मुले. बाळाजी विश्वनाथच्या मृत्यूनंतर बाजीराव पेशव्यांच्या काळात बाजीरावने उत्तर हिंद पादाक्रांत करण्यास सुरुवात केली. बाजीराव हा वडिलांसारखा केवळ प्रशासन नव्हता तर तो तलवारबहाद्दर होता. म्हणजेच लष्करी बाण्याचा होता. पेशवा पद व सेनापती पद ही दोन्ही पदे त्याने कर्तृत्वाने मिळविली. यावेळी खंडेराव दाभाडे नामधारी सेनापती राहिले. छ. शाहूने मुलुखगिरीसाठी पेशव्यांना माळवा हा प्रांत तर दाभाडेंना गुजरात प्रांत बहाल केला होता. खंडेराव बाजीरावच्या वाट्याला गेला नाही. त्याच्या मृत्यूनंतर गुजरात प्रकरणावरून पेशवा व दाभाडे यांच्यात तणाव निर्माण झाला. खंडेरावच्या मृत्यूनंतर दाभाडे निष्क्रीय बनले. म्हणून बाजीरावने आपला अर्धा हक्क गुजरातवर सांगितला. ही गोष्ट त्र्यंबकराव दाभाडेला आवडली नाही. त्र्यंबकराव दाभाडे व त्याचे मुतालिक कारभारी पिलाजी गायकवाड व त्र्यंबकरावची आई उमाबाई दाभाडे यांना रुचली नाही. मोठा तणाव निर्माण झाला. त्यातूनच १७२९ मध्ये बाजीराव व त्र्यंबकराव दाभाडे यांच्यात दबईची लढाई होते. यात त्र्यंबकराव मारला जातो. परिणामी नानासाहेबांच्या काळात उमाबाई दाभाडे व ताराबाई यांनी कट करून नानासाहेबांच्याबद्दल छ. शाहूच्या मनात पेशव्यांबद्दल गैरसमज निर्माण केला. परिणामी नानासाहेब पेशव्याला छ. शाहूंनी काही काळापुरते पेशवे पदावरून पदच्युत केले. परंतु पुढील काळा छ. शाहूंना यामधील सत्यता व नानासाहेबांचा प्रामाणिकपणा लक्षात येताच पुन्हा पेशवे पदावर नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते. अशा रीतीने गुजरातचे दाभाडे एक महत्त्वपूर्ण वतनदार या काळात प्रसिध्दीस आले. त्याचबरोबर त्यांचे मुतालिकही पिलाजी गायकवाड यांचेही योगदान गुजरातच्या विकासातील महत्त्वाचे मानले जाते.

मराठ्यांच्या इतिहासामध्ये अनेक घराण्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी आणि स्वराज्याच्या विस्तार करण्यासाठी पराक्रम गाजवला. अशा घराण्यांमध्ये धारच्या पवार घराण्याचा उल्लेख करावा लागेल. या घराण्याचा संबंध रजपूत, परमार या घराण्यांशी जोडला जातो. परमार घराण्याचे मूळ वास्तव्य माळवामधील धार या ठिकाणी होते. या घराण्याचा मूळ पुरूष साबूसिंग

ऊर्फ शिवाजी पवार होता. १६५७ मध्ये शिवरायांनी कोकण प्रांत जिंकला त्यावेळी महाराजांनी कल्याणवर स्वारी केली. या स्वारीमध्ये साबूसिंगाने मोठा पराक्रम केला. तेव्हापासून साबूसिंग हा शिवरायांच्या विश्वासातला बनला. साबूसिंगाने अहमदनगर, सुपे ही गावे वसविली. शिवरायांनी त्यास सुपे गावची पाटीलकी दिली होती. साबूसिंग हा एका झटापटीत मारला गेला. त्यानंतर त्याचा पूत्र कृष्णाजी पवार याने शिवरायांच्या स्वराज्य कार्यास वाहून घेतले. अफजलखान प्रकरणामध्ये कृष्णाजी पवार शिवरायांच्या बरोबर होता. यावेळी कृष्णाजीने अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी केली. म्हणून शिवरायांनी त्याला करणगाव व कणगी ही दोन गावे भेट दिली. कृष्णाजीच्या मृत्यूनंतर त्याचे वारस बुबाजी रायाजी व केरोजी यांनी त्यांचे कार्य पुढे चालवले. या तीन बंधुंनी शिवरायांच्याबरोबर कर्नाटक स्वारीत महत्त्वाची कामगिरी बजावली. अशा प्रकारे धारच्या या पवार घराण्याने शिवरायांचा काळ असो किंवा छ. राजाराम, महाराणी ताराबाई यांच्या तसेच छ. शाहूंच्या काळातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली दिसून येते.

पुढे धार घराण्याने पेशवा बाजीराव पेशवा यांच्या काळात अत्यंत विशेष अशी कामगिरी बजावली. त्यामुळे मोठा नावलौकिक मिळाला. गुजरात आणि माळवा हे दोन प्रांत धार घराण्याच्या ताब्यात आले. कृष्णाजी पवार हा या काळात चांगला प्रसिध्दीस आला. बाजीराव पेशव्यांच्या चित्रदूर्ग मोहिमेमध्ये त्याची कामगिरी कौतुकास्पद आहे. या कामगिरीबद्दल छ. शाहूंनी त्यास सरसुधा हा सन्माननीय किताब देऊन गौरविण्यात आले.

पवार घराण्याची मूळ परंपरा रजपूत परमार घराण्याशी जोडली. हे घराणे उज्जैन, धार, देवास या सभोवतालच्या प्रदेशात पसरले होते. पुढील कालखंडामध्ये तुकोजीराव पवार याच्याकडे या घराण्याची जबाबदारी आली. तेव्हापासून तुकोजीने देवास हे मुख्य ठिकाण बनविले.

बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर पवारांच्या पराक्रमाला खरे प्रोत्साहन बाजीराव पेशव्यानेच दिले, असेच म्हणावे लागते. कारण पवार घराण्याला पुढे आणण्यामध्ये बाजीराव पेव्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. हे ऋण पवार घराणे कधीही विसरणार नाही. त्यामुळेच तुकोजीरावने

पेशवा नानासाहेब यांच्याशी घनिष्ठ संबंध ठेवले. तुकोजीरावला संतती नव्हती. त्याने बुवाजीराव पवार यांचा विश्वासराव याच्या थोरल्या मुलाला म्हणजे कृष्णाजीरावला दत्तक घेतले. तुकोजीराव नानासाहेब पेशव्यांच्या बुंदेलखंड, रोहिलेखंड आणि रजपूतांना या स्वाऱ्यात प्रमुख होते. जाटांच्या कुंभेरीच्या वेढ्यातही तुकोजी पवारांच्या योगदान महत्त्वाचे आहे. १७५४ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यानंतर मराठ्यांच्या फौजा उत्तरेला पानिपतकडे निघाल्या. या पानिपतच्या युध्दासाठी तुकोजीचा दत्तकपुत्र कृष्णाजी पवार हा ससैन्यानिशी हजर होता. त्याने या लढाईत मोठा पराक्रम केला. मात्र या युध्दामध्ये मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे कृष्णाजीराव माळव्याकडे परत फिरले.

अशा प्रकारे शिवकालापासून ते पेशवे कालखंडापर्यंत धारच्या पवार घराण्याने केलेले योगदान विसरता येणार नाही.

### ३) इंदूरचे होळकर -

मराठ्यांच्या इतिहासामध्ये इंदूरच्या होळकर घराण्यांनी केलेली कामगिरीही महत्त्वपूर्ण मानली जाते. मल्हारजी होळकर यांचे पूर्वज पुणे जिल्ह्यामध्ये वाफगावी नंतर ते फलटण नीरा नदीच्या काठावर ‘होळ’ या खेड्यात स्थायिक झाले. या गावाच्या नावावरून त्यांना होळकर हे आडनाव मिळाले. हे नाव खंडोजी आणि त्याचा मुलगा मल्हारी यांना मिळाले. खंडोजी त्या गावामध्ये चांगली प्रतिष्ठा राखून होता. मल्हारी मोठा झाल्यावर लष्करात सामील झाला. मल्हारी रणकौशल्य, शौर्य यामध्ये वाक्‌बगार होता. स्वकर्तृत्वावर मल्हारी पुढे गेला. याचा उल्लेख होळकरांची कैफियतमध्ये मिळतो. मल्हारी स्वतंत्र बाण्याचा होता. बाळाजी विश्वनाथच्या काळात त्याने केलेला पराक्रम विसरता येत नाही. मल्हारी हा धाडसी होता. त्याचे धाडसपण पाहून १७२५ मध्ये तो सरंजामी सरदार झाला. मल्हारी हा कंठाजी कदम बांडे यांच्याकडे आला व स्वतःचा झेंडा बांड्याच्या झेंडासारखाच तयार करून स्वअस्तित्व निर्माण केले.

बाजीराव पेशव्यांने त्याने साहसी स्वभाव पाहून त्याला माळवा येथील इंदूरचा प्रमुख म्हणून नेमले. उत्तर भारतात मराठी सत्ता विस्तार करण्यामध्ये मल्हाररावांचे मोठे योगदान आहे. धनगर जातीची अनेक कुटुंबे त्याने इंदोरमध्ये

एकत्र आणली. धनगरांचे ऐक्य निर्माण केले. बाजीरावांच्या कालखंडामध्ये माळवा, बुंदेलखंड, खानदेश, गुजरात, दिल्ली या ठिकाणी त्याने मोठे पराक्रम केले. मल्हारराव होळकरने पानिपतच्या तिसऱ्या युध्दात मोठा पराक्रम केला. परंतु शिंदे, होळकर यांच्या वैमनस्य यामुळे पानिपतात मराठी हरले. या युध्दातून त्यांनी माघार घेऊन पुढील काळात इंदूरचा आर्थिक विकास केला. शेतीला उत्तेजन दिले. त्यांचा मुलगा खंडेराव हा जाट प्रकरणामध्ये कुंभेरीच्या वेढ्यात मारला गेला. तर खंडेरावाचा मुलगा मालेराव हा अल्पआयुषी ठरला. त्यामुळे मल्हारराव होळकरने आपली सून अहिल्याबाई होळकरकडे सर्व जबाबदार सोपवली. त्यानंतर त्याने तुकोजी होळकर यास दत्तक घेतले. मात्र पुढील काळात तुकोजी व अहिल्याबाई यांच्यात बेबनाव निर्माण होऊ लागल्यामुळे अहिल्याबाईने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून होळकर घराण्याला पुढे आणले. अशा प्रकारे मराठ्यांच्या इतिहासामध्ये मल्हारराव होळकरपासून अहिल्याबाई व तुकोजी होळकर यांनी केलेली कामगिरी मोलाची व अविस्मरणीय ठरली.

### ४) ग्वाल्हेरचे शिंदे -

मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत पराक्रमी या दृष्टीने ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचा नावलौकिक दिसून येतो. बाजीराव पेशव्यांच्या काळामध्ये उत्तर भारतामध्ये इंदोर येथे होळकर तर ग्वाल्हेर (उज्जैनी) या ठिकाणी शिंदे घराण्याचा उदय झाला. हे मराठा राज्याचे दोन खांब होते. ग्वाल्हेर घराण्यामध्ये नेमाजी शिंदे १७०४ मध्ये माळवा या ठिकाणी पराक्रम केला, असा उल्लेख पेशवा रोजनिशीमध्ये मिळतो. तसेच जयपूरच्या अखबारयामध्येही उल्लेख मिळतो. त्यामुळे नेमाजी शिंदे हा अव्वल सरदार असून, तो छ. शाहूंचा तो प्रसिध्द सरदार म्हणून गणला जात होता. मात्र त्याची पुढे जास्त माहिती उपलब्ध नाही. सातारा जिल्ह्यातील कण्हेरखेर गावचे पाटील शिंदे जमीन जुमला सांभाळून होते. पुढील कालखंडामध्ये या ग्वाल्हेरच्या घराण्यामध्ये राणोजी शिंदे हा मुख्य. त्याने शिंदे घराण्याचा खरा नावलौकिक केला. खऱ्या अर्थाने मराठी सत्ता विस्तारीत करण्यामध्ये राणोजीचा उल्लेख करावा लागेल. बाळाजी विश्वनाथच्या सेवेमध्ये तो दाखल झाला. बाळाजीच्या

मृत्यूनंतर त्याचा मुलगा बाजीराव पेशव्याने त्याचा पराक्रम पाहून त्यास सरदारकी दिली. दखखनचा मुघल सुभेदार मुरारबाजी खान याच्याविरुध्द बाजीराव पेशव्याने निजामास सहाय्य केले. तेव्हा फत्तेखरड्याच्या लढाईत राणोजीचा मोठा पराक्रम दिसतो. पालखेडच्या मोहिमेतही त्याने मोठा पराक्रम गाजवला. १७३० मध्ये त्याला माळवा या प्रांताची सरदेशमुखी व चौथाई वसूली करण्याची कामगिरी सोपवली. अशा प्रकारचे राणोजी शिंदेने बाजीराव पेशव्याला दक्षिण आणि उत्तर भारतामध्ये मोठे सहकार्य केले. १७४५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पहिल्या पत्नीपासून त्याला जयाप्पा, दत्ताजी आणि जोतिबा अशी तीन मुले झाली आणि दुसऱ्या पत्नीपासून महादजी आणि तुकोजी अशी मुले झाली. शिंदे घराण्यातील सर्व सरदारांनी उत्तर व दक्षिण भारतामध्ये शत्रूंचा जबरदस्त पराभव केलेला दिसून येतो. उत्तरेतील जाट, रोहिले, रजपूत, मुसलमान या सर्व राज्यकर्त्यांमध्ये शिंदे घराण्यातील सरदारांनी हाहाकार उडवला. मराठ्यांचा दबदबा सर्वत्र निर्माण केला. इराणचा प्रमुख नादिरशहाने जेव्हा दिल्ली लुटली तेव्हा नादिरशहाचा समाचार घेण्यामध्ये शिंदे घराण्याने केलेली कामगिरी महत्त्वपूर्ण होती. नादिरशहानंतर अहमदशहा अब्दालीने उत्तरेकडे उत्तर भारतावर स्वारी केली. तेव्हा शिंदे-होळकरांच्या फौजांनी पानिपतच्या तिसऱ्या लढाईत अब्दालीचा पराभव केला. छत्रपती छ. शाहूंनी मुघल बादशहाला दिलेले वचन पाळण्यामध्ये शिंदे घराण्याचा मोठा वाटा होता. नानासाहेब पेशव्यांनी शिंदे घराण्यातील दत्ता शिंदे, जनकोजी शिंदे यांच्या शौर्याची वाहवा केली. शिंद्यांनीच उत्तरेकडे मराठ्यांचा सर्वत्र दबदबा निर्माण केला आणि उत्तर भारतातून मोठ्या प्रमाणावर चौथाई, सरदेशमुखीच्या खंडण्या वसूल केल्या. जाट प्रकरणामध्ये कुंभेरीच्या वेढ्यामध्ये मल्हारराव होळकरचा पुत्र खंडेराव हा मारला गेला. जाट प्रकरण मिटविण्याचे काम जयाप्पा शिंदे यांनी केले. त्यामुळे शिंदे आणि होळकर यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. परिणामी अजमेर मारवाड प्रश्नामध्ये रजपूतांबरोबर संघर्ष करताना मल्हारराव होळकरने मदत न केल्यामुळे जयाप्पा शिंदेसारखा पराक्रम मोहरा कामी आला. अशा प्रकारे शिंदे घराण्यातील सर्वच सरदारांनी मराठी सत्तेचा विस्तार करण्यामध्ये केलेली कामगिरी महत्त्वाची मानली जाते.

पानिपतनंतरही शिंदे घराण्यातील महादजी शिंदे यांनी पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढला. उत्तरेतच नव्हे तर दक्षिणेत मराठ्यांची गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवून दिली. अशा प्रकारे शिंदे घराण्याने केलेली कामगिरी उल्लेखनीय ठरते.

### ५) नागपूरचे भोसले

छत्रपती शिवरायांचा कालखंड असो अथवा पेशवे कालखंड असो. भोसले घराण्याने मराठी सत्तेच्या विस्तारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मुधोजी भोसले हा नागपूरकर भोसल्यांचा मूळ पुरूष. मुधोजी आणि त्याचा भाऊ रूपाजी याने पुणे जिल्ह्यातील हिंगणी जवळील बेरडी या गावची पाटीलकी कर्तबगारीने मिळवली. तेव्हापासून त्यांना हिंगणीकर भोसले असे म्हटले जाते. मुधोजीचा मोठा मुलगा बापूजी याने वडिलांच्यानंतर पाटीलकी प्रामाणिकपणे चालविली. मुधोजींची दोन मुले परसोजी आणि साबाजी शिवरायांच्या सैन्यात सामील झाले. साबाजी पराक्रमी. शिवरायांनी त्यास काही गावे इनाम दिली. परसोजीला छ. राजारामने वराड, नागपूर या ठिकाणी चौथाई सरदेशमुखीची सनद दिली. परसोजीचा मुलगा कान्होजी भोसले यास सेनासाहेब सुभा हे पद मिळाले. बाळाजी विश्वनाथच्या काळात कान्होजीने मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. १७३५ नंतर नागपूर प्रांत कान्होजीचा चुलतभाऊ लिंबाजी, याचा मुलगा रघोजी भोसले याच्या वर्चस्वाखाली आला. रघुजीने छ. शाहूकडून नागपूर प्रांताची चौथाई, सरदेशमुखीची सनद मिळविली. एवढेच नव्हे तर बंगाल, बुंदेलखंड, लखनौ या मोघलांच्या प्रांतातून चौथाई, सरदेशमुखी वसूल केली. मोठा मराठ्यांचा सर्वत्र दबदबा निर्माण केला. एवढेच नव्हे तर छ. शाहूंचाही रघुजीने विश्वास संपादन केला. नानासाहेब पेशव्यांच्या काळात रघुजी भोसले व नानासाहेब पेशवे यांच्यात बंगाल प्रांतावरून मोठा तणाव निर्माण झाला. यावेळी नानासाहेबांनी इंग्रजांच्या मदतीने रघुजीचा बंदोबस्त केला. मराठ्यांच्यातील दुहीमुळे बंगाल हा प्रांत पुढील काळात इंग्रजांच्या कब्जात गेला. असे जरी असले तरी रघुजी भोसले हा भोसले घराण्यातील एक अव्वल सेनानी होता. कर्नाटकातील अनेक नबाबांना त्याने नमवले होते. चंदासाहेबाला तर पराभूत

केले होते. दक्षिणेत आणि उत्तरेत मराठी राज्याचा त्याने नावलौकिक केला. रघुजीचे मुख्य ठिकाण वराडात होते. अशा प्रकारे भोसले घराण्यातील मुधोजीपासून रघुजी असो, कानोजी असो, परसोजी असो किंवा जानोजी असो. यासारख्या सेनानींनी मराठी सत्ता विस्तारीत करण्यामध्ये आपले कौशल्य पणास लावले होते. अशा रीतीने भोसले घराण्याने मराठ्यांच्या इतिहासातील एक वतनदार या दृष्टीने केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे.

### ६) मिरज-सांगलीचे पटवर्धन -

एक वतनदार व सरदार या दृष्टीने पटवर्धन घराण्याने केले कार्य उल्लेखनीय मानावी लागेल. रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवडे हे पटवर्धनांचे मूळ गाव. पटवर्धन घराण्यातील आद्यपुरुष म्हणून हरभटबाबा यांचा उल्लेख केला जातो. त्याला सात पूत्र होते. पहिला कृष्णभट, बाळभट, त्रिंबकपंत, गोविंदपंत, महादेव, रामचंद्रपंत आणि भास्करपंत. या सात मुलांपैकी महादेव लहानपणीच वारले. बाकीचे सहापैकी कृष्णभट, त्र्यंबकपंत, गोविंदपंत व रामचंद्र पंत या चौघांनी शिपाईगिरी स्विकारली. कुरुंदवाड, मिरज आणि तासगाव ही त्यांनी मुख्य ठाणी बनवली. या पटवर्धन घराण्यामध्ये मुख्य गोविंदपंत होते. १७६३ मध्ये पेशव्यांनी गोविंदपंताला तैनात जाबता दिला आणि ८ हजार स्वार पदरी ठेवणे, प्रामाणिक चाकरी करणे एवढेच नव्हे तर २५ लाखांचा मुलूख सरंजाम म्हणून दिला. पेशवा बाळाजी विश्वनाथने दिल्लीच्या मोघल बादशहाकडून आणलेल्या सनदांमुळे मराठ्यांना कर्नाटकमध्ये चौथाई, सरदेशमुखी गोळा करण्याचा हक्क मिळाला. नानासाहेब पेशव्यांचा काळात गोविंदपंताचा पराक्रम मोठा होता. एका पत्रात खालील संदर्भ मिळतो. 'गोविंदपंत नानासाहेब हे श्री।। राजश्री पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ नानासाहेब यांच्याजवळ सन अशरीन मथ्या व अल्लफ (इसवी सन १७१९-२०) शके १६४१ विकारीनाम संवत्सरी सिव्हस्थी चाकरीस राहिले.[२] असा उल्लेख येतो. तसेच 'तीन पिढ्या थोरले नानासाहेबांपासून (आपण) दौलत मिळविली'' असे एका पत्रामध्ये[३] गोविंद हरी लिहितो.

गोविंदपंत हे प्रथम पेशव्याकडे खाजगी नोकरीस राहिले. गोविंदहरी १७३० मध्ये इंदोजी कदम यांची फडणीसी मिळविली. इंदोजीच्या मृत्यूनंतर

कदमांची फडणीसी गोविंदकडे देण्यात आली., असा उल्लेख बाळाजी प्रभाकर मोडक यांनी केलेला दिसून येतो. बाजीराव पेशवे काळामध्ये गोविंदहरी आणि बंधू रामचंद्र हरी यांना इचलकरंजीकडून तर त्रिंबकहरी अक्कलकोटकर भोसलेकडून पेशव्यांकडे नोकरीस आले. १७३७ मध्ये गोविंद आणि रामचंद्र हरी आणि भास्कर हरी यांच्याबद्दल साष्टी मोहिमेमध्ये समावेश असल्याचा उल्लेख मिळतो. मराठ्यांनी साष्टी किल्ला जिंकत असताना रामचंद्र हरीने तिथे मोठा पराक्रम केला. अशा प्रकारे पेशवा बाजीरावच्या काळात पटवर्धन बंधूंनी कोकणचा भाग रामचंद्र हरी उत्तर हिंदुस्थानचा गोपाळहरी यांनी विस्तारीत केल्याचे दिसून येते. पेशवा बाळाजी बाजीरावाच्या काळामध्ये पटवर्धनांची पतके माळवा, बुंदेलखंड या भागामध्ये अग्रेसर होते. १७४८ ते १७४९ या कालखंडामध्ये नानासाहेब यांच्या नेवाईच्या स्वारीमध्ये गोविंदहरी पुढे होते. एवढेच नव्हे तर गोपाळराव गोविंद आणि पुरुषोत्तम कृष्ण या पटवर्धन बंधुंनी या स्वारीमध्ये मोठा पराक्रम केल्याचे दिसून येते.

पटवर्धनांनी कर्नाटक प्रांतातून चौथाई सरदेशमुखी गोळा केली. पटवर्धनांचे मुख्य कार्यक्षेत्र कर्नाटक होते. कर्नाटकात त्यांनी पेशव्यांच्या मार्फत प्रवेश केला. पेशवा बाळाजी बाजीरावने कर्नाटक प्रांत चौथाई गोळा करण्यासाठी आपल्याला मिळावा म्हणून प्रयत्न केले. छ. शाहूने १७४६ मध्ये नानासाहेबाला चौथाई सरदेशमुखी गोळा करण्यासाठी सरदेशमुखी गोळा करण्यासाठी पाठवले. तेव्हा नानासाहेबांनी सदाशिवराव भाऊ यांना कर्नाटकातून खंडणी गोळा करण्यासाठी पाठविले. छ. शाहूंच्या मृत्यूनंतर संपूर्ण कर्नाटक प्रांत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबांच्या ताब्यात आला. अशा प्रकारे नानासाहेबांनी आपल्यामार्फत पुढील काळामध्ये कर्नाटकामध्ये पटवर्धन आणि रास्ते यांना कर्नाटकात मुलूखगिरी एवढेच नव्हे चौथाई, सरदेशमुखी गोळा करण्यासाठी नियुक्त केले. पटवर्धनांचे मुख्य केंद्र मिरज, नंतर तासगाव, सांगली, कुरुंदवाड राहिल्यामुळे दरवर्षी ते कर्नाटकातून चौथाई सरदेशमुख गोळा करू लागले. पुढील काळामध्ये पटवर्धनांच्या अनुपस्थितीमध्ये हैदर आणि टिपूने कर्नाटकातील बराचसा प्रांत जिंकून घेतला. पटवर्धन घराण्यामध्ये गोपाळराव पटवर्धन यांनी हैदर, निजाम व कर्नाटकातील नबाबांचा पराभव

केला. अनेक मोहिमांमधून त्यांनी खंडण्या वसूल केल्या. १७५३ ते १७५६ पर्यंत कर्नाटक प्रांतामध्ये गोपाळराव पटवर्धनांनी केलेले योगदान विसरता येणार नाही. सावनूरच्या स्वारीत तर गोपाळराव पटवर्धनांनी मोठा पराक्रम केला. यासंदर्भात सावनूरच्या स्वारीचे सर्व श्रेय इतिहासकार वि. का. राजवाडे हे गोपाळराव पटवर्धनांना देतात. अशा प्रकारे पेशवे कालखंडामध्ये पटवर्धन घराण्यांनी केलेली कामगिरी विसरता येत नाही.

### ७) मुधोळचे घोरपडे -

मराठी सत्तेच्या उदयामध्ये घोरपडे घराण्याची कामगिरी पाहणे आवश्यक ठरते. छत्रपतीकडून मिळालेल्या सनदापत्रामध्ये करवीर राज्याचे दुसरे शिवाजी राजे यांनी घोरपड्यांच्या पूर्वजाला दिलेली सनद उल्लेखनीय आहे. येथील मूळ पुरुष उदयपूरचे राणे ते विजापूर बादशाहीत रोजगार करू लागले. उदयपूरच्या शिसोदे घराण्यातील सुजनसिंह हा मूळ पुरुष. लष्करी सामर्थ्यावर त्याने महत्त्वाचे स्थान मिळवले. बहामणी राज्याचा हसनगंगू बहामणी आणि सुजनसिंह यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. सुजनसिंहाचा पणतू भोसाजी याच्यापासून शिसोदे घराण्याला भोसले नाव पडले असावे.

भोसाजीला देवराज आणि कर्णसिंह अशी दोन मुले होती. यापैकी देवराजचा नातू कर्णसिंह दुसरा हा अत्यंत पराक्रमी असून त बहामणी राजवटीत प्रसिध्दीस आला. तालिकोटच्या लढाईत कर्णसिंह दुसरा मारला गेला. त्याचा मुलगा चोलराजा पराक्रमी, शूर. त्याचाही १५७८ मध्ये झालेल्या लढाईत मृत्यू झाला. चोल राजाला पिलाजी हा अत्यंत पराक्रमी मुलगा होऊन गेला. तो मुधोळ येथे स्थायिक झाला. त्यालाच मुधोळच्या घराण्याचा पूर्वज मानले जाते. घोरपडे घराण्यामध्ये म्हाळोजी हे प्रसिध्दीस आलेले व्यक्तिमत्त्व. म्हाळोजीची तीन मुले. संताजी, बहिरजी व मालोजी होती. छ. राजारामच्या काळात घोरपडे घराण्यातील या बंधुंनी मुलूखगिरी गाजवली. लष्करी कर्तृत्व गाजवले. छ. संभाजीला घोरपडे घराण्याने मदत केल्याचे दिसून येते. घोरपडे घराण्यामध्ये संताजी घोरपडे हा अव्वल मराठी सरदार होऊन गेला. त्याच्या कामगिरीचे वर्णन इतिहासकारांनी पानापानावर केलेले दिसून येते. मराठ्यांच्यातील आपापसातील बेकीमुळे संताजीचा खून झाला.

त्याच्या मृत्यूमुळे मराठी राज्याची मोठी हानी झाली. युध्द नेतृत्व, संघटना कौशल्य, साहसी वृत्ती अशा अतुल पराक्रमाने मराठी सत्ता अच्युत शिखरावर नेणारा हा पराक्रमी मोहरा इतिहासात विलीन झाला. बहिरजी हिंदुरांवांनी सयाजीराव मुराराराव आणि शिदोजीराव अशी तीन मुले. छ. शाहू आणि ताराबाईंच्या संघर्षात ते प्रसिध्दीस आले. शिदोजीराव ताराबाईंच्या बाजूस मिळाला. त्यावेळी त्याने मोठा पराक्रम केलेला दिसून येतो. १७३०-३१ ला शिदोजीराव मरण पावला. त्याचा मुलगा मुराराराव हा पुढील काळात घोरपडे घराण्यामध्ये प्रसिध्दीस आला. पेशवे, निजाम, फ्रेंच, इंग्रज, हैदर या सर्व सत्तांबरोबर त्याला संघर्ष करावा लागला. स्वकर्तृत्वाचा त्याने ठसा उमटविला. मुराररावने पेशव्यांनाही विरोध करण्याचे ठरवले. दरम्यान नानासाहेब पेशव्याने १७५४ मध्ये मुराराराव घोरपडेला सावनूरच्या लढाईत आपल्या बाजूस वळवले. पुढील काळामध्ये दक्षिण कर्नाटकातील घोरपडे घराण्यातील एक मातब्बर वतनदार या दृष्टीने मुरारावने केलेले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या कर्तबगारीचे दखल खुद्द नानासाहेब पेशव्यांनी घेतल्याचे नमूद आहे. अशा प्रकारे घोरपडे घराण्याने पेशवे कालखंडामध्ये एक सरदार, वतनदार या दृष्टीकोनातून केलेली कामगिरी अनन्यसाधारण महत्त्वपूर्ण ठरली.

## ५.४ प्रकरण संदर्भ-

१) आपटे बी. के.- ए हिस्ट्री ऑफ दि मराठा नेव्ही अँड मर्चंट शिप्स, पान १६८

२) भावे वा. कृ.- पेशवेकालीन महाराष्ट्र पान ४२६

३) भावे वि. स., मराठी दप्तर रुमाल, खंड ३

४) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. २४८

५) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. १५१, २४८, २५९

६) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र पान नं. ४२६

७) भारतीय इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक १२ वा भाग, पान ३३

८) "Bombay Gazette" खंड क्र. १०, पा. नं. १७५

९) चिटणीस कृ. ना., मध्ययुगीन भारतीय संकल्पना संस्था भाग ४, चलन व पेढी व्यवहार पान ५२.

१०) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पान ३

११) चितळे वि. सी., पेठे दप्तर, भाग १ व २

१२) चौकसी आर. डी., इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ दि डेक्कन पा. ५-७

१३) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ. क्र. ७२-७३

१४) चाफेकर ना. गो.- पेशवाईच्या सावलीत पान ३

१५) चिटणीस कृ. ना.- चलन व पेढी व्यवहार पा. ४ पा. ६१

१६) चिटणीस कृ. ना., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग ३, पान १०१

१७) दत्त आर. सी., इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया पा. ४१-४३

१८) दीक्षीत म. श्री., पुण्याचे शिल्पकार, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.

१९) दता काली किंकर, सर्व्हे ऑफ इंडियाज सोशल लाईफ अँड इकॉनॉमिक कंडिशन इन दि एटिन्थ सेंच्युरी पा. ५१

२०) गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, पृष्ठ ४७-५०, १४६-१४७, १५५, १९३, ३६३, ४३१,

२१) गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, मराठी शाहीचा उत्कर्ष, आर्थिक बाजू पृष्ठ ५.

२२) गॅझेटियर ऑफ द बॉंबे 'प्रेसिडेन्सी' खंड १६, पान ५५
२३) गाडगीळ ध. रा., पुणे, सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे पार्ट १, पान १०३
२४) हबीब इरफान, दि ॲग्रेरियन सिस्टिम ऑफ मुघल इंडिया पा. ३६७
२५) हबीब इरफान- ॲन ॲटलास ऑफ दि मुगल एम्पायर शीट नं. ओबी
२६) हातेकर नीरज, इंडिया इकॉनॉमिक अँड सोशल हिस्ट्री रिव्ह्यू ३३.४
२७) जोशी भाऊ, छत्रपती रामराजा पृष्ठ ३१०
२८) कुलकर्णी अ. रा., मेडिव्हीयल चौल. (संपा) इंदू बंगा, पोर्टस् अँड देअर हिंटर लँडस् इन इंडिया- १७००-१९५०, पान १२०
२९) खरे ग. ह., हिंगणे दप्तर भाग १ व २
३०) खरे वासुदेवशास्त्री, मराठे व इंग्रज, प्रस्तावना पृष्ठ १८
३१) केळकर सं, ऐतिहासिक पोवाडे, खंड १ व २
३२) कुलकर्णी बी. टी.- बँकिंग इन दि एटिंथ सेंच्युरी- ए केस स्टडी ऑफ ए पुना बँकर (अर्थविज्ञान), पान १८०
३३) कुलकर्णी जी. टी., बँकिंग इन दि एटिन्थ सेंच्युरी, अर्थविज्ञान खंड १५, पा. १८१, १८३
३४) कुलकर्णी जी. टी., बँकिंग इन द एटिन्थ सेन्चुरी- ए केस स्टडी ऑफ ए पुना बँकर अर्थ विज्ञान पान १८०.
३५) महाजन टी. टी., इंड. ट्रेड अँड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरीयड पान १४२
३६) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर- सातारा जिल्हा पान ४०९
३७) मोडक गो. कृ., मुलांचा महाराष्ट्र, परिशिष्ट
३८) नानासाहेब रोजनिशी, खंड १, १४२
३९) पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा पृष्ठ २६५
४०) पांगारकर ल. रा., चरित्रचंद्र पृष्ठ २७९-२८६
४१) पेशवा डायरी, खंड, २, ३, ६,७, ८ पृ. क्र. ८७, ४५४, ४५७
४२) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर, खंड ३, १४८, १८७, १८८, २०२-२०३, २०६.

४३) पे. द. नि. का. खंड १८

४४) पे. द. खंड ३, ६९, ४६२, ४६४.

४५) पेशवे रोजनिशी खंड २, ३ सन ४९७, पान २१२, ९३३

४६) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर भाग १, २, ३ व ४

४७) पंत (डॉ.) डी, इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया अंडर द मुघल पा. ६३

४८) पेशवे दप्तर, भाग ८, पान नं. १९

४९) पेशवे रोजनिशी भाग ७, सनद ४६८, खंड ३, सनद ४९७

५०) राजवाडे वि. का., राजवाडे खंड, १ पत्र क्र. १, १६१, १६४,

५१) साने का. ना., काव्येतिहास संग्रह, पत्र क्र. ३८०, पृष्ठ क्र. १२१, १२२२१) शेजवलकर त्र्यं शं., पानिपत पृष्ठ क्र. २१६

५२) शर्मा रामशरण, परस्पेक्टिव्ह इन सोशल अँड इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ अर्लि इंडिया पा. २४, २५

५३) शेजवलकर लेखसंग्रह, नानासाहेब पेशवे, पृष्ठ क्र. ४०

५४) शेजवलकर त्र्यं. शं., पेशवे निजाम संबंध पृष्ठ ४८-४९.

५५) शिवकालीन पत्रसार संग्रह खंड क्र. २१८३

५६) सरदेसाई गो. स., मराठी रियासत ३, पानिपत प्रकरण, नानासाहेबाचा मृत्यू योग्यता.

५७) सरदेसाई गो. स., ऐतिहासिक पत्रव्यवहार, काव्येइतिहास संग्रह, ऐतिहासिक लेख, पत्रे इ.

५८) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, पृष्ठ १८, ३०-५०, १०१

५९) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, मध्यविभाग २, पृष्ठ २३-२४, ५८-५९, ८६-८८, ३१७, ४०४, ४०७

६०) सरदेसाई गो. स., मराठी रियासत ३, पृष्ठ २४४, पेशवे दप्तर १७ वा भाग ५६-७१, ७४, ७७ पत्रे

६१) सरदेसाई गो. स.- पेशवे दप्तर खंड ३१, पत्र क्र. ४८

६२) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर खंड १७-१८, ८५, ८६, १२६,

६३) सरदेसाई गो. स., मराठी रियासत पुण्यश्लोक, छ. शाहू पेशवा बाजीराव

६४) सुंठणकर बा. रं., सदाशिवराव भाऊ पृष्ठ क्र. ६०, ७५
६५) वैद्य सं. शं., वैद्य दप्तरातून निवडलेले कागद एकूण ५ खंड
६६) वैद्य चिं. वि., दुर्दैवी रंगू, संक्षिप्त आवृत्ती पृष्ठ ४८-४९, ५१
६७) वूड डायना- मेडिव्हीएल इकॉनॉमिक थॉट, पा. ७०-७१

**अप्रकाशित साधने -**

पुणे पेशवे दप्तरातील घेतलेली पत्रे संशोधनासाठी निवडलेली कागद -

द. क्र. १, पृष्ठ क्र. १- पत्र क्र. १७९५
द. क्र. १, पृष्ठ क्र. १- पत्र क्र. ७
द. क्र. १, पृष्ठ क्र. २- पत्र क्र. १५१६
द. क्र. १, पृष्ठ क्र. ३- पत्र क्र. ३६६
द. क्र. १, पृष्ठ क्र. ४- पत्र क्र. ६५०

सरदेसाई गो.स. पेशवे दप्तरातून निवडलेले कागद खंड ७,१०,१२,१३,१४,१५, १७,२०,३०,४०,४४,४५

पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १८९५
पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १८९७
पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १९००
पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १९०७, १९०८, १९११, १९१३

पेशवे दप्तर - संशोधनासाठी निवडलेले कागद (सां. नि. का.)

सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. ७११
सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. ७५३
सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. १८३८
सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. १८४४

शाहू दप्तर -

सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. १०२९५-७२४७९
सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. ३३५०
सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. १७९२

68) Desai S. V. Social Life in Maharashtra under the Peshwas
69) Duff. Grant 1. - 'History of the Mahratts' Vol. I & II (Ed. 1963)
70) Joshi P. M., 'Expansion of the Maratha Power

(1707-1761)' (Ed.1957)
71) Kulkarni A. R. Medieval Maratha Country
72) Kadam V. S., Maratha Confendenacy
73) Sardesai G. S.- 'Selections from the Peshwa Daftar' Vol. 1 to 45 (Ed. 1930-34). (In Marathi).
74) Sardesai G. S., Vol.- 7 : Poona Affairs (Ed. 1940)
75) Sardesai G. S., Vol.- 12 : Poona Affiars (Pt.I) (Ed. 1950)
76) Sardesai G. S., Vol.- 13 : Poona Affairs (Pt.II) (Ed. 1950)

प्रकरण ६

# सारांश व निष्कर्ष

६.१ प्रस्तावना

६.२ संशोधन समस्येचे शीर्षक

६.३ संशोधनाचे महत्त्व

६.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी

६.५ संशोधनाची गृहितके

६.६ संशोधनाची कार्यपध्दती

६.७ नमुना निवड पध्दती

६.८ समस्येसंबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा

६.९ प्रायोगिक पध्दती

६.१०) सर्वेक्षण पध्दती

६.११) ऐतिहासिक संशोधन पध्दती-

६.१२ उपसंहार

६.१३ बाळाजीच्या कार्याचे मूल्यमापन

६.१४ निष्कर्ष व अनुमान

६.१५ पुढील संशोधनासाठी विषय

प्रकरण ६

# सारांश व निष्कर्ष

## ६.१ प्रस्तावना -

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पेशवेकाळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पेशवे काळ म्हणजे एक मराठी राज्याच्या विस्ताराचा काळ मानला जातो. पेशवाईची सुरुवात १७१३ पासून झाली. ही एक क्रांती मानावी लागेल. कारण पिंगळे घराण्याकडून भट घराण्याकडे पेशवाई आली. या दृष्टीने पेशवे कालखंड एक महत्त्वपूर्ण कालखंड होता. पेशव्यांनी मराठ्यांची राजधानी पुणे या शहराचा मूलभूत पाया तयार केला. आज पुण्याला महाराष्ट्रात व देशात जे महत्त्वाचे स्थान आहे, त्याचे सर्व श्रेय पेशव्यांना देणे उचित ठरेल. पुण्याचा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात जो विकास झाला, त्याचे कारण पेशव्यांनी राबविलेल्या ध्येयधोरणांनाच द्यावे लागेल. पेशव्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक निर्णयांचा एकूणच महाराष्ट्राच्या समाज जनजीवनावर परिणाम झाला, त्याचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. मराठ्यांची राजधानी पुणे म्हणजे महाराष्ट्राचे भूषण मानावे लागेल. नानासाहेबांनी मनगटी बळाचा वापर करण्यापेक्षा बुद्धीचातुर्याच्या जोरावर आपली राजवट दैदिप्यमान केली.

## ६.२ संशोधन समस्येचे शीर्षक -

''नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास''

संशोधनाची समस्या -

नानासाहेब पेशवेंच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे व परिणामांचे विश्लेषण करणे, ही या संशोधनाची मूलभूत समस्या आहे. या समस्येचा संशोधकाने चिकित्सकपणे अभ्यास करून नानासाहेबांनी राबविलेल्या आर्थिक धोरणांचा व सुधारणांचा अभ्यास या संशोधनात मांडला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे -

१) नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांची चिकित्सक पध्दतीने मांडणी करणे.

२) पेशव्यांच्या सत्तेचा उदय कसा झाला? त्याचा शोध घेणे.

३) नानासाहेब पेशव्यांचे सत्तारोहण व कारकीर्द अभ्यासणे.

४) नानासाहेब पेशव्यांचे इतर राजकीय सत्ता स्वकियांशी झालेल्या संघर्षाचा अभ्यास करणे.

५) नानासाहेब पेशव्यांचे शेती व इतर व्यवसायविषयक धोरण अभ्यासणे.

६) नानासाहेब पेशव्यांचे व्यापार, उद्योग तसेच परराष्ट्रीय व्यापारविषयक आर्थिक धोरण अभ्यासणे.

७) नानासाहेब पेशव्यांचे पतपेढ्या, सावकारी व्यवहारविषयक धोरण अभ्यासणे.

८) नानासाहेब पेशव्यांचे महसूल, लष्कराच्या संदर्भातील आर्थिक धोरण अभ्यासणे.

९) नानासाहेब पेशव्यांचे वतनदारांच्या संदर्भातील आर्थिक धोरण अभ्यासणे.

## संशोधनाची व्याप्ती मर्यादा -

महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवाईच्या कार्याला अनन्यसाधारण महत्व आहे. पेशवे राजवटीतील निर्णयांचा अभ्यास केल्याशिवाय इतिहास संशोधकाला पुढे जाता येत नाही. पेशवाईमध्ये बाजीराव पेशवे आणि नानासाहेब पेशवे या दोघांच्या सत्तेला तुलनात्मकदृष्ट्या अधिक काळ मिळालेल्या आहे. बाजीराव पेशव्यांची सर्व कारकीर्द लढाईत गेली. विशेषतः नानासाहेब पेशव्यांच्या सत्तेला मोठे स्थैर्य मिळाले होते. त्यामुळे नानासाहेबांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक निर्णयाचा त्यांच्या सत्तेवर महत्त्वपूर्ण परिणाम झालेला आहे. म्हणूनच नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. आर्थिक धोरणामध्ये शेती, व्यापार, पतपेढ्या,

उद्योग व्यवसाय वतनदार, सावकारविषयक धोरणांचा अंतर्भाव आहे, ही या संशोधनाची व्याप्ती आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवे राज्यकर्त्यांचे आपापल्या परीने योगदान दिसून येते. विशेषतः नानासाहेबांचे या सर्वांमध्ये स्थैर्य, कालखंडाच्या दृष्टीकोनातून अधिक योगदान असल्याने नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणापुरताच हा विषय मर्यादित केला आहे. विशेष म्हणजे नानासाहेबांनी आपल्या कारकिर्दीत विविध निर्णय घेवून आपली धोरणे स्पष्ट केली होती. एका बाजूला स्थैर्य तर दुसऱ्या बाजूला पानिपतचा पराभव. त्यामुळे ढवळून निघालेली पेशवाई हे वास्तव नानासाहेबांच्या कारकिर्दीत घडले. म्हणूनच नानासाहेबांच्या एकूण जीवन पटावरील केवळ आर्थिक धोरणापुरतेच हे संशोधन मर्यादित करण्यात आले आहे.

## ६.३ संशोधनाचे महत्त्व -

मराठी सत्तेच्या प्रचंड विस्ताराचा कारणीभूत झालेल्या नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास केला असून, त्यांच्या दोन कालखंडातील आर्थिक कामगिरी महत्त्वाची ठरली आहे. तसेच संशोधनामध्ये पुणे व परिसर प्रामुख्याने सुपे, सासवड, बारामती व वाई या क्षेत्रातील आर्थिक घडामोडीशी निगडीत असणाऱ्या धोरणांवर प्रकाश टाकला आहे.

१) छ. शाहूंच्या हयातीत असताना १७४० ते १७४९

२) छ. शाहूंच्या मृत्यूनंतर कालखंड १७४९ ते १७६१

त्यांच्या आर्थिक धोरणांचा व कामगिरीचा, प्रशासकीय कौशल्याचा परिचय करून घेण्यासाठी व अभ्यासासाठी हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे. आजपर्यंत नानासाहेबांच्या राजकीय लढाया, धोरणे यांचा अभ्यास विद्यार्थी वाचकांसमोर मांडलेला दिसून येत असला तरी त्यांच्या राजकीय कारकिर्दीबरोबरच आर्थिक दृष्टीने केलेले नियोजन व सुधरणा या धोरणांचा चिकित्सक अभ्यास व्हावा या दृष्टीनेही हे संशोधन महत्त्वाचे वाटल्याने संशोधकाने नानासाहेब एक प्रशासक म्हणून त्यांच्या आर्थिक कार्याचा वेगळेपणा या संशोधनातून व्यक्त केला आहे.

नानासाहेबांच्या प्रदीर्घ अशा २१ वर्षाच्या कारकिर्दीत मराठी राज्याला स्थैर्य प्राप्त झाले, मराठी सत्तेचा मोठा फैलाव झाला म्हणूनच इतर पेशव्यांपेक्षा नानासाहेबांचे एक वेगळेपण या संशोधनातून मांडण्यात आले आहे.

## ६.४ सैध्दांतिक पार्श्वभूमी -

नानासाहेब पेशव्यांनी मराठी राज्याला एक स्थिर राज्य म्हणून मान्यता मिळविण्यास मदत केली. त्यांच्या कालखंडामध्ये मराठी सत्ता वैभवाच्या शिखरावर पोचली. परंतु पानिपतच्या लढाईच्या पराभवाचा कलंक त्यांच्या नावासमोर कायमस्वरूपी चिकटल्यामुळे त्यांना दुर्लक्षित करण्यात आले. परंतु पेशवे कालखंडामध्ये त्यांचे स्थान अजरामर आहे. त्यांनी केलेल्या शेती, उद्योग, व्यापार, वतनदारी, सावकार, चौथाई, सरदेशमुखी इत्यादीबाबत मराठी राज्याला आर्थिक स्थिरता मिळवून दिली, हे दाखवून देण्याचा प्रयत्न या संशोधनातून करण्यात आला आहे.

छ. शिवाजी महाराजांच्यानंतर राज्य व्यवस्थेत खऱ्या अर्थाने सुधारणा करणारा एकमेव प्रशासक म्हणून नानासाहेब पेशवे यांचे कार्य या संशोधनातून पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## ६.५ संशोधनाची गृहितके -

१) नानासाहेब पेशव्यांच्या राजकीय सत्तेला स्थान मिळाल्याने त्यांना राज्य कारभाराची आर्थिक घडी बसवता आली.

२) नानासाहेबांनी आर्थिक धोरणांना प्राधान्य दिले.

३) मराठी सत्तेचा नानासाहेबांनी महाराष्ट्राबाहेर विस्तार केल्याने त्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ झाली.

४) नानासाहेब पेशव्यांकडे सत्तेची सुत्रे केंद्रीत झाल्यामुळे त्यांना आर्थिक धोरण व निर्णय घेणे शक्य झाले.

५) नानासाहेब यांच्यामुळे पेशवाईतील कर्जाचा बोजा कमी झाला.

६) नानासाहेब पेशवे (बजेट मॅनेजमेंट) अंदाज पत्रकाचे व्यवस्थापन करण्यात कुशल होते.

## ६.६ संशोधनाची कार्यपध्दती -

संशोधनामध्ये संशोधन पध्दत हा भाग अत्यंत महत्त्वाचा आहे. या संशोधनामध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत, यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा आणि वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. एका विशिष्ट अशा सामाजिक, आर्थिक, राजकीय शक्तीच्या संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थिती संदर्भात नानासाहेब पेशव्यांनी कोणती धोरणे निर्धारित केली, याचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये केला आहे.

## ६.७ नमुना निवड पध्दती -

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुणे आणि पुणे परिसराची निवड केली आहे. कारण नानासाहेबांच्या कर्तबगारीची सुरुवात राजधानी पुणे शहरातच झाली.

बाळाजी बाजीरावच्या कर्तृत्वाने इतिहासाच्या पानेच्या पाने जरी भरली असली तरी तिचा अभ्यास संपूर्णपणे करणे अशक्य होईल. म्हणूनच नमुना निवड केली जाते. नमुना संपूर्ण जनसंख्येचा प्रातिनिधीक गट असतो. प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधकाने बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या फक्त आर्थिक धोरणांचा विचार निवड म्हणून केला आहे.

## ६.८ समस्येसंबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा -

संशोधकाने समस्येसंबंधित इतर संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेतला आहे. नानासाहेब पेशवा यांच्या आर्थिक धोरणाचा चिकित्सक अभ्यास या संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने आपले संशोधन विषया संदर्भातील सखोल माहिती अभ्यास करून घेणे आवश्यक आहे, हे त्यातून समजू शकेल. त्यामुळे समस्येची पुनरावृत्ती टाळता येईल. तसेच या अभ्यासामुळे संशोधकाला आपली समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे, स्पष्टीकरण उपलब्ध होईल व संशोधन पध्दतीही निवडता येईल. संबंधित संशोधन हे नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास

या विषयावरील असून, नानासाहेब पेशवे यांनी आपल्या २१ वर्षांच्या कालखंडामध्ये शेती, उद्योग, व्यापार, वेगवेगळे व्यवसाय, इतर कारागिरी व सुधारणा करून आर्थिक व्यवस्थापन कसे केले, त्यांच्या कालखंडाला स्थिरता लाभल्यामुळे तत्कालीन त्यांच्या काळातील सावकार, व्यापारी, वतनदार त्यांच्याबरोबर त्यांचे सहसंबंध काय होते, हे तपासणे आवश्यक ठरते. नानासाहेब पेशव्यांनी शेतीच्या बाबतीत केलेल्या सुधारणा राबविलेली धोरणे आजच्या राज्यकर्त्यांना विचार करावयास लावणारी आहेत. महसूल विषयक धोरणांचा तर त्यांचा आदर्श सर्वांनीच घ्यावा, असे त्यांचे योगदान दिसून येते. छ. शाहूंच्या कर्जाची फेड प्रामाणिकपणे केली. आज्ञापालन काय, कसे व एक प्रशासकीय पेशवा या दृष्टीने त्यांच्या कार्याचे मूल्यमापन या संशोधनामध्ये केले जाणार आहे.

नानासाहेबांनी सर्वत्र मराठी सत्तेचा दबदबा निर्माण केला. दक्षिण आणि उत्तर भारतात मराठ्यांची मोठी सत्ता निर्माण केली. पुणे शहराला राजधानी बनवून जगात नावलौकिक मिळवून दिला. चौथाई, सरदेशमुखीच्या बाबतीत त्यांचे धोरण अभ्यासणे आवश्यक आहे. या सर्व आर्थिक घटकातून त्यांनी राज्याची आर्थिक घडी नीट बसवलीच. एवढेच नव्हे तर छ. शाहूंचे आणि पेशवा बाजीरावांचे कर्ज फेडले. अनेक सावकारांची देणी निकालात काढली. राज्यव्यवस्थेची विस्कटलेली घडी पुन्हा व्यवस्थित करवून घेतली. या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते.

संशोधकाचे नाव- जावळे एस. एस.<br>
एम. ए. एमफिल

संशोधनाचा विषय- पेशवेकालीन महाराष्ट्रातील धंदे व व्यवसाय<br>
एम. फिल प्रबंध<br>
सन १९८९

संशोधनाची उद्दिष्ट्ये-

१) पेशवे कालखंडातील पेशव्यांचे व्यवसायविषयक धोरणाचे महत्त्व स्पष्ट करणे.

२) पेशवे काळातील पेशव्यांचे उद्योगाबाबतचे धोरण उद्योगाभिमुख कसे होते, ते स्पष्ट करणे.

३) १७१३ पासून ते १८१८ पर्यंत पेशवे काळातील धंदे व व्यवसाय विषयक धोरणांचा सर्वांगीण आढावा घेणे.

४) सर्वच पेशव्यांचे धंदे व व्यवसाय धोरणांचा या संशोधनामध्ये आढावा घेणे.

५) पेशव्यांनी उद्योग व्यवसायासाठी केलेल्या सुधारणा, सवलती व कामगिरीची माहिती स्पष्ट करणे.

६) पेशव्यांनी धंदे-व्यवसायासाठी घेतलेले धोरणात्मक निर्णय व सुधारणांचा मागोवा घेणे.

७) पेशवे कालखंडातील धंदे व व्यवसायविषयीची माहिती इतर अभ्यास व संशोधक यांच्यासमोर ठेवणे.

निष्कर्ष-

१) पेशवे काळातील उद्योगधंदे व व्यवसायाचे महत्त्व या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

२) पेशवे कालखंडात कोणकोणते व्यवसाय केले जात होते, याची माहिती या संशोधनातून समाजाला व इतिहासाच्या वाचकांना समजली.

३) पेशवे कालखंडातील वेगवेगळे व्यवसाय, वेगवेगळ्या जमाती कशा प्रकारे करीत होत्या, याची माहिती या संशोधनातून समजली.

४) पेशवे कालखंडातील वेगवेगळ्या उद्योगांची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

५) या संशोधनातून पेशवे काळातील धंदे व व्यवसाय, त्याचबरोबर पेशव्यांनी या संदर्भात केलेल्या कार्याची माहिती इतिहास अभ्यासकांना या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

७) पेशव्यांनी धंदे व व्यवसायासंदर्भात घेतलेले धोरणात्मक निर्णय आर्थिक बाबींशी असणाऱ्या गोष्टी व महत्त्व या दृष्टीने वरील संशोधन महत्त्वपूर्ण ठरले आहे.

८) पेशव्यांचे धंदे, व्यवसायविषयक निती व्यवसायासाठी त्यांनी तयार केलेल्या बाजारपेठे, रस्ते व इतर सुधारणांची माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

९) पेशवाईची सुरुवात १७१३ पासून सुरू होते ते १८१८ पर्यंतच्या कालखंडात पेशव्यांनी महाराष्ट्रातील धंदे, व्यवसायविषयक केलेल्या सर्वांगीण कार्याचा आढावा कसा घेतला ते या संशोधनातून स्पष्ट झाले.

१०) पेशव्यांनी महाराष्ट्रातील व्यवसाय व धंद्यासाठी दिलेल्या सवलतींची माहिती या संशोधनातून मिळाली आहे.

११) पेशवेकाळात महाराष्ट्रात वेगवेगळे कारागीर, वेगवेगळे व्यावसाईक, त्यांचे जीवनमान कसे होते इत्यादी माहिती संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

२) संशोधकाचे नांव - कदम प्रतिमा एस.
एम. ए. एमफिल

संशोधनाचा विषय - छत्रपती ऑफ सातारा (१७०७-१८१८)
एम. फिल प्रबंध

संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१) छ. संभाजीचा मुलगा मराठ्यांचा खरा वारसदार या दृष्टीने छ. शाहूंचे महत्व स्पष्ट करणे.

२) मुघलांच्या कैदेतून छ. शाहूंची कशी सुटका झाली आणि महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वप्रथम त्याला कोणत्या संकटाला सामोरे जावे लागले, त्याचा शोध घेणे.

३) छ. शाहूंच्या कामगिरीची माहिती इतिहास अभ्यासकांसमोर वाचकांसमोर आणणे.

४) छ. शाहू आणि मोघल यांचे संबंध या संशोधनातून स्पष्ट करणे.

५) छ. शाहू व महाराणी ताराबाई यांचा संघर्ष आणि यादवीचा आढावा घेणे.

६) छ. शाहूने सातारा ही राजधानी ठिकाण बनविले. या दृष्टीने साताराचे महत्त्व वाढले. त्याचा शोध घेणे.

७) १७०७ पासून म्हणजेच छ. शाहूंच्या सुटकेपासून ते १७४९ पर्यंत म्हणजे छ. शाहूंच्या मृत्यूपर्यंत छत्रपती या नात्याने छ. शाहूने केलेल्या सर्वांगीण कार्याचा आढावा या संशोधनामध्ये घेणे.

८) छ. शाहूंचे आणि त्याच्या सरदाराचे सहसंबंध स्पष्ट करणे या दृष्टीने छ. शाहूंचे धोरण अभ्यासणे.

९) छ. शाहू व त्यांचे प्रधान म्हणजे पेशवे यांच्या संबंधाचा आढावा घेणे.

**निष्कर्ष -**

१) स्वराज्याचा खरा वारसदार छ. शाहू आहे. तो तोतया नाही या दृष्टीने या संशोधनामध्ये छ. शाहूंचे महत्त्व स्पष्ट करणे.

२) छ. शाहूंनी केलेल्या कामगिरीची माहिती या संशोधनातून मिळाली आहे.

३) छ. शाहू हा मनमिळाऊ स्वभावाचा होता. त्यांनी केलेली प्रारंभीक कामगिरी या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

४) छ. शाहू औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलांच्या अंकित बनून महाराष्ट्रामध्ये परत आल्यानंतर छ. शाहूंचे आसन स्थिर कसे झाले, याची माहिती या संशोधनातून समजली आहे.

५) छ. शाहूने आपल्या सरदारांचे संघटन कसे केले, याची माहिती या संशोधनातून मिळाली.

६) छ. शाहूंनी दिल्लीच्या राजकीय उठावात पेशवा बाळाजी विश्वनाथ मार्फत सय्यद बंधुंना मदत करण्यास कशा पध्दतीने पाठविले इ. सर्वांगीण माहिती या संशोधनातून स्पष्ट झाली आहे.

७) छ. शाहू व महाराणी ताराबाई संघर्ष यामध्ये महाराणी ताराबाई ही कोल्हापूर येथे तर छ. शाहू सातारा येथे अशा मराठ्यांच्या दोन राजधान्या निर्माण झाल्या, याची माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

८) छ. शाहूने महाराणी ताराबाईंचा व इतर सरदारांचा कसा बंदोबस्त केला, याची माहिती या संशोधनातून समजली.

९) छ. शाहूने आपली राजधानी सातारा बनवून सरदारांचे केलेले संघटन १७०७ पासून ते १७४९ पर्यंत छ. शाहूंच्या कालखंडाचा सर्वांगीण आढावा या संशोधनातून घेतला आहे. छ. शाहूंची परिपूर्ण कामगिरीचा शोध या संशोधनातून स्पष्ट होतो.

१०) छ. शाहूंचे पेशवा बाळाजी विश्वनाथ, पेशवा बाजीराव पहिला आणि पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याबद्दलची आस्था व विश्वास या संशोधनातून स्पष्ट झाला आहे.

३) संशोधकाचे नांव- कांबळे आर. एच.
एम. ए. एम. फिल

संशोधनाचा विषय- Expanssion of Maratha Power History of the early Phase (Ph. D.) प्रबंध

संशोधनाची उद्दिष्ट्ये-

१) मराठी सत्तेचा विस्तार पेशवा बाजीराव पहिल्याने कसा केला, त्याच्या कामगिरीचा शोध घेणे.

२) मराठी सत्तेच्या विस्तारास बाजीराव पहिला कितपत कारणीभूत होता, हे स्पष्ट करणे.

३) बाजीराव पेशव्याने उत्तरेकडील माळवा, बुंदेलखंड, गुजरात, दिल्ली येथे दिलेली धडक इ. कामगिरीचा आढावा घेणे.

४) बाजीराव पेशव्याचे उत्तरेकडील धोरण अभ्यासणे आणि त्याने निर्माण केलेली उत्तरेकडील सरदार घराण्यांच्या कामगिरीचा शोध घेणे.

५) बाजीराव पेशव्याने कर्नाटकातून आणलेल्या चौथाई सरदेशमुखी सनदांचा आढावा घेणे.

६) बाजीराव पेशव्याने पालखेड आणि भूपाळ या दोन लढाईत मराठ्यांचा १८ व्या शतकातील प्रबळ शत्रू निजाम याचा केलेला पराभव व युध्दे यांची माहिती घेणे.

७) बाजीराव पेशव्याने वसई येथे पोर्तुगीजांचा केलेला पराभव तर जंजिरा येथे सिद्यांचा कसा बंदोबस्त केला याचे अवलोकन करणे.

८) बाजीराव पेशवे व बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल यांच्या संबंधाचा आढावा घेणे.

निष्कर्ष -

१) मराठी सत्तेचा विस्तार खऱ्या अर्थाने पेशवा बाजीराव पहिल्याने केला, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

२) मराठी सत्तेच्या विस्तारास सर्वांगीण म्हणून बाजीराव पेशवे कारणीभूत होते या संशोधनातून स्पष्ट झाले.

३) छ. शिवाजी महाराजांच्या नंतर मराठ्यांच्यात पराक्रमी एक लढवय्या पेशवा म्हणून बाजीराव पेशव्यांचा उल्लेख या संशोधनातून स्पष्ट होतो.

४) बाजीराव पेशवे यांनी माळवा, बुंदेलखंड, गुजरात या भागातून चौथाई, सरदेशमुखी कशी आणली आणि छ. शाहूंच्या राज्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसविण्याचा प्रयत्न केला आहे, याची माहिती या संशोधनातून मिळते.

५) बाजीराव पेशव्याने उत्तरेकडे प्रचंड साम्राज्य विस्तार करून सरदार घराणी निर्माण केली. त्याला बृहन्महाराष्ट्राचा निर्माता असे म्हणतात, असे संशोधनातून निष्कर्ष निघतो.

६) बाजीराव पेशव्याने कर्नाटकातील कनकगिरी, चित्रदुर्ग, सावनूर या मोहिमांमधून चौथाई, सरदेशमुख तेथील नबाबांकडून वसूल केली, याची माहिती या संशोधनातून अभ्यासकाला आढळून आली.

७) बाजीराव पेशवे लष्करीदृष्ट्या मजबूत होते, हे त्यांनी पालखेड येथे निजामावरील मिळविलेला अप्रतिम विजय होता. तर भूपाळच्या लढाईत निजामाचा केलेला पराभव हा बाजीरावच्या लष्करी कर्तृत्वाचा विचार करावयास लावणारा होता, हे या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

८) बाजीराव पेशव्यांनी वसई येथे चिमाजी आप्पाच्या सहाय्याने पोर्तुगीजांना वठणीवर आणले तर स्वतः परकीय सत्ता सिद्यांचा बंदोबस्त केला. याचा आढावा या संशोधनातून मिळतो.

९) बाजीराव पेशवे व बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याची त्याने मुघल सुभेदार बंगश याच्या तावडीतून कशी सुटका केली, त्याचबरोबर छत्रसाल राजाने बाजीराव पेशव्याला आपला तिसरा मुलगा मानून रूपवती मस्तानी भेट दिली, याची परिपूर्ण माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

९) बाजीराव पेशवे व छ. शाहू यांच्या संबंधाचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. त्याचबरोबर पुढील पेशवा नानासाहेब यांच्या कामगिरीचा मूलभूत पाया बाजीराव पेशव्याने स्वतःच्या कर्तबगारीने रचला हे या संशोधनातून पुढे येते.

४) संशोधकाचे नांव - देखणे के. डी.
पीएच. डी. प्रबंध

संशोधनाचा विषय - Agrarian System in Maharashtra Under the Peshwas 1982
(Ph. D.) प्रबंध

उद्दिष्ट्ये -

१) पेशवे कालखंडातील शेती व्यवस्थेची माहिती स्पष्ट करणे.

२) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील शेती, महसूल या बाबतीत पेशव्यांच्या धोरणांचा मागोवा घेणे.

३) साधारणपणे १७१३ पासून पेशवे कालखंड सुरू झाला असला तरी पहिले दोन पेशवे सोडले तर मराठी राज्याला स्थिरता नानासाहेब पेशवे यांच्या कालखंडापासून झाली, असेच म्हणावे लागते. तेव्हा शेती व इतर धोरणांच्या भूमिकेचा सर्वांगीण आढावा घेणे.

४) पेशव्यांच्या साम्राज्य विस्तारापाठीमागची भूमिका स्पष्ट करणे.

५) महाराष्ट्रामध्ये पेशव्यांनी शेतीविषयक राबविलेल्या धोरणांचा साकल्याने विचार करणे.

६) महाराष्ट्रातील सर्वच पेशव्यांचे शेतीबाबतीतील धोरण व केलेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

निष्कर्ष -

१) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील शेती पध्दतीची आणि शेती व्यवस्थेची माहिती सविस्तरपणे स्पष्ट केली आहे.

२) पेशवे कालखंडातील जमीन महसूल व्यवस्थेची माहिती स्पष्ट झाली आहे.

३) पेशव्यांचे महसूल आकारणीबाबतचे धोरण स्पष्ट झाले आहे.

४) पेशव्यांनी शेती व महसूल अर्थव्यवस्थेच्या अंगांना कसे महत्त्व दिले व राज्याच्या अर्थव्यवस्थेची घडी सुव्यवस्थित बसवली या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरले आहे.

५) १७१३ पासून ते १८१८ पर्यंत हा पेशवे काल महाराष्ट्रातील एक सुवर्णकाळ समजला जात असला तरी काही ठराविक पेशव्यांनी राज्याला स्थिरता प्राप्त करून दिल्याने शेती पध्दतीतील महत्त्वाच्या बाबींचा विचार या संशोधनातून समजतो.

६) महाराष्ट्रातील शेतीपध्दतीत पेशवे किती दक्ष होते, आपल्या अधिकाऱ्यांना त्यांनी महसूल आकारणी व शेती बाबतीत केलेल्या सूचनांवरून या संशोधनात स्पष्ट होते.

७) परंपरेनुसार भारताचा मुख्य व्यवसाय शेती म्हणूनच या अर्थव्यवस्थेच्या महत्त्वपूर्ण घटकाकडे पेशव्यांनी प्रामाणिकपणे लक्ष दिल्याचे या संशोधनातून लक्षात येते.

५) संशोधकाचे नांव - गवळी पी. ए.
पीएच. डी. प्रबंध

संशोधनाचा विषय - Society and Social Disabititys under the Peshwas, (Ph. D.) प्रबंध

उद्दिष्टये -

१) पेशवेकालीन सामाजिक जीवन व परिस्थिती समजावून घेणे.

२) पेशवे काळात महाराष्ट्रातील सामाजिक जीवनामध्ये विविध वर्ग जातींचा दर्जा समजावून घेणे.

३) पेशव्यांचे कनिष्ठ वर्गासंबंधीचे धोरण समजावून घेणे.

४) पेशवे काळात सामाजिक जीवनातील चार वर्गाची समाजातील व्यवस्थेची माहिती स्पष्ट करणे.

५) पेशवे कालखंडातील महाराष्ट्रातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेमधील कनिष्ठ वर्गाचा दर्जा स्पष्ट करणे.

६) पेशव्यांचे जातीबाबतचे धोरण स्पष्ट करणे.

७) पेशवे काळातील महाराष्ट्रातील जातीव्यवस्थेची माहिती वाचक व अभ्यासकांच्या समोर आणणे.

निष्कर्ष -

१) पी. ए. गवळी यांनी आपल्या संशोधनातून महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाची माहिती स्पष्ट केली आहे.

२) संशोधकांनी या संशोधनातून कनिष्ठ वर्गाला दिल्या जाणाऱ्या वागणुकीबाबतचा विचार स्पष्ट केलेला दिसतो.

३) पेशवे काळामध्ये सामाजिक जीवनातील चार वर्गाचे महत्त्व स्पष्ट करून, त्यांचा समाजातील दर्जा कसा होता याची माहिती मिळते.

४) पेशव्यांनी कनिष्ठ जातीविषयीचा दृष्टीकोन कसा ठेवला, परिणामी जातीभेदाची भावना कशी वाढली या दृष्टीने संशोधनात संशोधकाने मांडलेली भूमिका सडेतोडपणे समजून आली आहे.

५) पेशवे कालखंडातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेची माहिती स्पष्ट करून पेशव्यांचा कनिष्ठ वर्गाबद्दलचा सर्वांगीण आढावा या संशोधनातून घेण्यात आला आहे.

६) पेशवे काळात सामाजिक जीवनात कनिष्ठ जातींना तुच्छ लेखले जात होते. त्यांच्यावरील जाचक बंधने, अटी इ. बाबतीविषयी या संशोधनातून स्पष्ट होते.

७) पेशवे काळात सामाजिक जीवनाबरोबर राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात या चार वर्णांना करावी लागणारे कार्ये कोणत्या जातीने कोणते कार्य करावे हे निश्चित ठरले असून, जातींच्या उतरंडीची माहिती या संशोधनातून स्पष्ट होते.

६) संशोधकाचे नाव- देशमुख दि. बा.

एम. फिल प्रबंध

संशोधनाचा विषय- पेशवेकालीन कोकण १७५६ ते १८१८

सन २०००

उद्दिष्ट्ये -

१) पेशव्यांचे कोकणविषयक धोरण अभ्यासणे.

२) पेशव्यांचे कोकणामधील लोकांविषयी संबंध स्पष्ट करणे.

३) पेशवे यांनी कोकणातील अधिकाऱ्यांना कोकणाच्या संरक्षणासाठी दिलेल्या धोरणांचा पाठपुरावा करवून घेणे.

४) पेशवे काळामध्ये पेशव्यांनी कोकणातील वतनदार, देशमुख, जहागीरदार, यांचे बाबतीतील धोरणांचा विचार स्पष्ट करणे.

५) १७५६ ते १८१८ या काळातील पेशव्यांच्या सर्वांगीण कोकणविषयक धोरणांचा आढावा घेणे.

६) महाराष्ट्रात १७५६ मध्ये पुणे येथे नानासाहेब पेशवे हे सत्तेवर होते, हा कालखंड अमर्याद सत्तेचा काळ होता. या काळातील नानासाहेब पेशवे यांचे कोकणविषयक धोरण समजावून घेणे.

निष्कर्ष -

१) पेशव्यांनी कोकण हा मराठी राज्यातील महत्त्वाचा भाग मानला होता. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने कोकण भागाचे पुष्कळ महत्त्व होते, हे त्यांनी जाणले होते हे समजते.

२) कोकणातील सर्वच हालचालीकडे पेशव्यांनी प्रामाणिकपणे लक्ष दिल्याचे या संशोधनातून स्पष्ट होते.

३) देश व कोकण हे राज्याचे दोन भाग होते. या दोन्ही भागावर पेशव्यांनी आपली पकड घट्ट केली होती हे या संशोधनावरून लक्षात येते.

४) पेशव्यांनी कोकणातील घोणसरी, कुडाळ या समृध्द भागाकडे लक्ष दिल्याचे स्पष्ट होते.

५) पेशव्यांनी खेमा सावंत याच्या राष्ट्रविरोधी कारवायांना आळा घातला. कोकणातील अनेक बंडखोरांना वठणीवर आणून कोकण भागात शांतता, सुव्यवस्था निर्माण केली, हे या संशोधनातून समजून येते.

६) १७५६ मध्ये महाराष्ट्रातील पुणे येथे नानासाहेब पेशवे हे प्रमुख होते. त्यांनी कोकणातील आणि कोकण लगतील सर्व प्रदेशावर प्रामाणिक अधिकारी नेमून कोकणी समाजाला दिलासा मिळवून दिला, हे या संशोधनातून स्पष्ट होते.

७) कोकण या राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे भाग आहे, परकीय सत्ता सिद्दी पोर्तुगीज यांना वठणीवर आणण्यासाठी त्याचबरोबर तेथील स्थानिक लोकांचा पाठिंबा मिळवण्यासाठी पेशव्यांनी कोकण भागावर विशेष लक्ष दिल्याचे समजून येते.

८) १७५६ ते १८१८ या कालखंडातील पेशव्यांच्या कोकणविषयक सर्वांगीण धोरणांचा सर्वांगीण आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे.

९) पेशवे आणि कोकण तसेच कोकणी समाज, तेथील विविध व्यवसाय, रस्ते सुधारणा अशा विविध बाबींची माहिती या संशोधनातून समजून आली आहे.

## संबंधित साहित्याचा आढावा

संबंधित संशोधन हे नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधकाने या समस्येला महत्त्व दिले. या समस्येच्या माध्यमातून संशोधकाने नानासाहेब पेशवे यांनी आपल्या २१ वर्षाच्या दीर्घ राजवटीमध्ये मराठी साम्राज्याचा विस्तार केलाच एवढेच नव्हे तर मराठे अजिंक्य आहेत, ही भावना शत्रुंच्या मनात निर्माण केली. हे करीत असताना नानासाहेब पेशव्यांनी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित निर्माण केली. अर्थ व्यवस्थेच्या दृष्टीने प्रमुख असणारी महत्त्वाची अंगे त्यामध्ये, शेती, महसूल, उद्योग, व्यापार, चलन व्यवस्था, सावकारी, पतपेढी व्यवहार, वतनदारी पध्दती या अर्थव्यवस्थेशी निगडीत असणाऱ्या विविध अंगांचा सांगोपांग विचार करून राज्याचे आर्थिक नियंत्रण सुस्थिर बनवले. या पूर्वीच्या पेशव्यांची संपूर्ण

राजवट युध्द मोहिमा व धामधुमीत गेली. त्यामुळे राज्याला आर्थिक चणचणीला सामोरे जावे लागले. छत्रपती ही प्रमुख जबाबदारी पेलणारे शाहू राजे यांनाही आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले. या सर्व राज्यातील समस्या नानासाहेब पेशवे यांनी आपल्या प्रशासकीय मुत्सद्दगिरीने, कौशल्याने प्रामाणिकपणे सोडविल्या. या दृष्टीने संशोधकाने या समस्येचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक कागदपत्रे प्रामुख्याने पेशवे दप्तर, त्यामधील नोंदी आणि पेशवे कालखंडावरील विविध ऐतिहासिक लेखकांनी विचारवंतांनी लिहिलेली प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधने याचा अभ्यासासाठी वापर केला आहे. त्याचबरोबर संशोधकाने नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांची माहिती घेत असताना तत्कालीन विविध घराण्यांनी लिहिलेले लेख, पत्रे, नियतकालिके, रोजनिशी व दप्तरांचाही अभ्यास संशोधकाने केला आहे. संबंधित संशोधनाचा आढावा घेत असताना संशोधकाने यापूर्वी कोणकोणत्या व्यक्तींनी संशोधन केले आहे, काही लिखाण केले आहे का? याचाही आढावा या संशोधनातून घेतलेला आहे. नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा अभ्यास करीत असताना संशोधकाने प्राथमिक साधनांमध्ये प्रामुख्याने गो. स. सरदेसाई यांच्या रियासती, न्यू हिस्ट्री ऑफ मराठा, पेशवे दप्तर खंड ६, ३१, मराठी रियासती खंड ४, पारसनीस डी. बी. यांचे इतिहास संग्रह, अर्थविज्ञान, रा. ब. वाड- नानासाहेबांच्या रोजनिशी कैफयती व यादी (भाग १ ते ३), श्रीकृष्ण आठल्ये, हिंगणगावकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपंथांची बखर, अप्रकाशित साधने, न्या. रानडे एम. के. यांचे राईज ऑफ मराठा पॉवर, अ. रा. कुलकर्णी यांचे खंड, बॉंबे गॅझेट, गॅझेटियर ऑफबॉंबे प्रेसिडेन्सी भाग ३, खंड ९ व १०, खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, इतिहाससंग्रह भाग १ ते ७ पारसनीस संपादित- पेशवे दप्तर- ऐतिहास गोष्टी, चरित्रे, टिपणे व स्फुटनिका, ऐतिहासिक पत्रव्यवहार- संपादक गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी, य. मा. काळे, वि. का. राजवाडे यांचे मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १, २० व २२. तसेच प्र. न. देशपांडे- मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष, सेतू माधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द हिंदवी स्वराज्य व मोघल, त्र्यं. शं. शेजवलकर श्री शिवछत्रपती, पानिपत १९६१, निजाम पेशवे संबंध, न. र. फाटक- मराठी

सत्तेचा उत्कर्ष, कृ. न. चिटणीस- मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था खंड १ ते ४, आपटे व ओतूरकर संपादक- महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, सावंत आणि जाधव- मराठ्यांचा प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक इतिहास, वा. कृ. भावे- पेशवेकालीन महाराष्ट्र, डॉ. वि. गो. खोबरेकर- मराठा अंमलाचे स्वरूप, ग. ह. खरे व अ. रा. कुलकर्णी- मराठ्यांचा इतिहास भाग १ ते ३, सदाशिव आठवले आणि प्र. ल. सासवडकर- मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, डॉ. प्रभाकर गद्रे- मराठी राज्य व मराठी लोक, महाले-पाठक- मराठी सत्तेचा इतिहास, पेशवे दप्तर क्र. १२, १३ व २८; पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, पुडके क्र. ४, पत्र क्र. ५३३-३४, ८२, ८३; छ. शाहू दप्तर पुडके क्र. १६, पत्र क्र. ८६७, गो. स. सरदेसाई संपादित- बाळाजी बाजीराव उत्तर हिंद, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई १९३२, पृष्ठ क्र. ३४, वा. सी. बेंद्रे, संपादित मराठ्यांच्या इतिहासाची साधने, सेतू माधवराव पगडी- मराठी व निजाम संबंध., आपटे द. ब.- लेखसंग्रह पुणे, प्रमोद ओक- पेशवे घराण्याचा इतिहास, गर्गे स. म.- मराठी रियासती, करवीर रियासती पुणे १९६८, दिघे वि. गो.- मराठ्यांच्या उत्तरेतील मोहिमा, देसाई सु. धा. - सोशल लाईफ इन महाराष्ट्र बॉम्बे १९८०, चाफेकर ना. गो.- बदलापूर पेशवाईच्या सावलीत, पुणे. पारसनीस द. ब.,- ब्रम्हेंद्रस्वामींचे चरित्र, त्याचबरोबर गाडगीळ ध. रा.- पुणे सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे भाग १, गाडगीळ डी. आर.- पुणे शहरातील महाजन आणि नगरसेठ, जोशी शं. ना.- मराठेकालीन समाजदर्शन इत्यादी प्राथमिक साधनांचा अभ्यास करून संशोधकाने नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणावर त्याचप्रमाणे त्यांच्या शासकीय कामगिरीवर प्रकाश टाकलेला आहे. दुय्यम साधनांमध्ये संशोधकाने बखरी, आज्ञापत्रे लेख आणि साहित्य या साधनांचा वापर केला आहे. महाजन टी. टी. यांचे इंडस्ट्री ट्रेड अँड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरीयड, पानिपत बखर, चिमाजी आप्पांचे चरित्र, चित्रगुप्तांची बखर यांचा वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर संशोधकाने मराठी ग्रंथ, वाचन, लेखन प्रामुख्याने आपटे बी. के. यांचा लेखसंग्रह पुरंदरे पु. वा., चिमाजी आप्पांचे चरित्र, त्याचबरोबर निरीक्षण आणि वाचन करीत असताना कोश वाग्ङमयांचा वापर केला आहे. केळकर य. न. यांचे ऐतिहासिक

शब्दकोश १, २ पुणे. चित्राव, सिध्देश्वर शास्त्री, मध्ययुगीन चरित्रकोश, जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वखंड कोश ४, दाते य. र.- महाराष्ट्र शब्द कोश पुणे, त्याचबरोबर संशोधकाने संशोधनात्मक मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके यांचाही वापर अभ्यासासाठी केला आहे. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १ ते १६, भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, नियतकालिके, त्रैमासिके यांचा वापर संशोधकाने अभ्यासासाठी केला असून त्याचबरोबर इंग्रजी कागदपत्रांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये Choskey R. D.- Economic History of Bombay Deccan, Dighe V. G.- Bajirao I and Maratha Expansion Bombay, Duff Grant- History of the Marathas, Ranade M. G.- Introduction to Peswa's Dairies, Khare G. H- Select Articles Pune 1962, Sardesai G. S.- New History of Marathas Bombay 1971, Shina H. N.- Rise of Peswas Alahabad 1954, Sardesai G. S- I new History of the Marathas -II, Vol I, II,III., C. Kincaid and D. Parasnis- A History of Maratha people London 1918, Mahaja T. T.- Trade & Commerce during Peshwa period.

## ६.९ प्रायोगिक पध्दती -

प्रायोगिक संशोधनात प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला जातो. ही पध्दत वैज्ञानिक असून तिचा संशोधनात उपयोग होतो. वैज्ञानिक पध्दतीवर ती आधारित जरी असली तरी तिचे वैशिष्ट्य प्रयोग हे आहे. विशिष्ट घटकांचा उपयोग केला असता विशिष्ट परिणाम दिसतात, या परिकल्पनेचे निव्वळ परिक्षण येथे अपेक्षित नसून इतर सर्व घटकांना नियंत्रित करून फक्त एका घटकाच्या उपयोगाने कोणता बदल घडून येतो हे पाहण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर आवश्यक मानला जातो.

## ६.१० सर्वेक्षण पध्दती-

चिकित्सा सर्वेक्षण पध्दती- शैक्षणिक संशोधन संशोधनात अत्यंत महत्त्वाची सर्वेक्षण पध्दती असून या पध्दतीचा विशेष प्रमाणात उपयोग करून घेण्यात आला आहे. सर्वेक्षण म्हणजे चिकित्सक पाहणी होय. Sur म्हणजे वरून व

Veoir म्हणजे पाहणे. तटस्थपणे पाहणे, बारकाईने पाहणे म्हणजे सर्वेक्षण होय.

वेबस्टर विश्वकोष -

''अचूक माहिती देणारी चिकित्सक पाहणी म्हणजे सर्वेक्षण होय''

''विशिष्ट ठिकाणच्या परिस्थितीचा केलेला अभ्यास म्हणजे सर्वेक्षण होय''

सर्वेक्षणाचे प्रकार-

१) शालेय सर्वेक्षण

२) लोकमत सर्वेक्षण

३) सामाजिक सर्वेक्षण

या संशोधनाच्या काही पध्दती असून ऐतिहासिक पध्दतीचे संशोधन करत असताना होवून गेलेल्या घटकांचा अभ्यास करणे हेच तत्त्व ऐतिहासिक संशोधन पध्दतीत लागू पडते.

## ६.११) ऐतिहासिक संशोधन पध्दती-

ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्ट, वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय. ऐतिहासिक संशोधन भूतकाळाचा विचार करते. इतिहासाच्या अभ्यासक संशोधकांना घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती उपयुक्त ठरते.

प्रकरण एक मध्ये नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांची माहिती, महत्व व त्यांच्या कारकिर्दीचा सर्वांगीण आढावा घेणेत आला आहे.

प्रकरण दोन मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांचा साकल्याने विचार करत असताना संबंधित संदर्भ साहित्य आणि संबंधित संदर्भ साधनांचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने इतर संशोधकांनी आपल्या प्रबंधात पेशवे कालखंडाबद्दल मांडलेल्या कार्याची माहिती सांगून संबंधित साहित्य आणि प्रस्तावित साहित्य यामधील वेगळेपणा मांडण्यात आला आहे.

प्रकरण तीन मध्ये संशोधनाची पध्दती, संशोधकाची साधने यांची माहिती सांगण्यात आली आहे. याशिवाय संबंधित संशोधनात ऐतिहासिक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. कागदपत्रांची अंतर्गत आणि बाह्य मिमांस करणेत आली आहे.

प्रकरण चार मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या सत्तारोहन, शेती, उद्योग, व्यापार, सावकारी, पेतपेढी व्यवहार, वतनदार पध्दती इत्यादींची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर नानासाहेब पेशव्यांनी आपल्या दीर्घ अशा एकवीस वर्षाच्या राजवटीत छत्रपती शाहूंचे कर्ज परतफेड करून राज्याची आर्थिक घडी मजबूत केली. मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. याशिवाय नानासाहेबांचे स्वकियांचेबरोबर संघर्ष तसेच निजामाबरोबरचे संघर्ष व कर्नाटकातील मोहिमांचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर तत्कालीन सावकारी व्यवसाय, वतनदार पध्दती, चौथाई, सरदेशमुखी इत्यादी ठळक बाबींवर या प्रकरणामध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे.

प्रकरण पाच मध्ये नानासाहेब पेशवे यांनी आर्थिक धोरणे राबवत असताना घेतलेले निर्णय आणि एकूणच मराठा राज्याचे आर्थिक व्यवस्थापन त्याचबरोबर मराठी सत्तेचा केलेला प्रचंड विस्तार तसेच त्यांच्या प्रशासकीय कौशल्यांचा एक प्रशासक पेशवा म्हणून मूल्यमापन केले आहे आणि पुणे शहराचे जागतिक राजकारणात वाढवलेले महत्त्व अशा एकूणच त्यांच्या सर्वांगीण कामगिरीचा आढावा घेत असताना त्यांची कर्तबगारी निष्कर्ष आणि शिफारसीच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आली आहे.

## ६.१२ उपसंहार

पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करत असताना प्रामाणिकपणा, सचोटी, लढवय्येपणा, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वासाच्या जोरावर नवीन सरदार घराणी उदयास आणली. या सरदार घराण्यांचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सुरक्षिततेसाठी व मराठी राज्याच्या विस्तारासाठी उपयोग करून घेतला. मराठ्यांच्या इतिहासामध्ये **'सरदारकीने काम करावे'** या धोरणानुसार नानासाहेब पेशव्यांनी मराठी साम्राज्याचा विस्तार दिल्लीपासून ते श्रीरंगपट्टण आणि बंगालपासून गुजरातपर्यंत

केलेला दिसून येतो. खऱ्या अर्थाने मराठी सत्तेचा जरीपटका अटकेपार पोचवला. दक्षिणेकडील शत्रू प्रामुख्याने निजाम, हैदरअली व नबाबांचा बंदोबस्त केला. त्यांच्याकडून चौथाई, सरदेशमुखी वसूल केली. याचा उपयोग आपल्या राज्यातील विविध सुधारणा, लष्कर खर्च व सुरक्षितता यावर केला. याचबरोबर उत्तरेकडील मोघल असोत, रोहिले असोत अथवा इतर जाट, रजपूत या विरोधकांचाही त्यांनी बंदोबस्त केला व मराठी सत्तेला नावारूपाला आणले. या दृष्टीने पेशवे कालखंड म्हणजे एक महत्त्वपूर्ण कालखंड होता असेच म्हणावे लागेल. अशा या कालखंडातील एक महान **पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब** यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा विचार या प्रबंधामध्ये केला आहे. कारण या नानासाहेब पेशवेंच्या काळामध्ये मराठी सत्तेचा फैलाव 'न भूतो न भविष्यती' इतका झाला. हा पेशवा लढवय्यापेक्षा उतम प्रशासक असून मराठ्यांच्या इतिहासामध्ये राजकारण धुरंधर आणि प्रशासक म्हणून सर्वश्रेष्ठ व अव्वल म्हणून ओळखला जातो.

नानासाहेब पेशवे यांच्या विविध कौशल्यांचा आणि त्यांच्या आर्थिक धोरणांचा साकल्याने विचार या प्रबंधामध्ये करण्यात आला आहे. नानासाहेबांची शेती, महसूल, उद्योग, व्यापार, सावकार वर्ग, हुंडी व्यवहार या त्यांच्या कार्याबरोबर त्यांनी राबविलेली धोरणे या संदर्भात केलेल्या सुधारणा आणि या सर्वामध्ये त्यांनी मराठा राज्याचे आर्थिक घडी बसवून आर्थिक व्यवस्थापन निजोजनपूर्वक केलेले आहे. नानासाहेबांच्या कारकिर्दीत हिशोबाची व महसुलाची व्यवस्था सुधारली. पुणे येथे लष्करी, पोलीस दल तयार केले. न्यायव्यवस्थेमध्ये बाळशास्त्री गाडगीळ यांच्यामार्फत न्यायव्यवस्था निपक्षपाती बनविली. राज्यकारभारात धोरणात्मक निर्णय घेवून राज्याचे आर्थिक नियंत्रण अचूक केले. नानासाहेब यांच्याजवळ रसिकता होती. ते हौशी संगीतप्रिय होते. लोक रंजनाची कला त्यांच्याजवळ होती. प्रामाणिकपणा, मनुष्यस्वभाव ओळखण्याची पारख त्यांच्याजवळ होती.

नानासाहेबांच्या कालखंडामध्ये अनेक युध्द मोहिमा झाल्या. यामध्ये खर्चही मोठ्या प्रमाणात झाले. या सर्वामध्ये पानीपतचे तिसरे युध्द ही सर्वात मोठी मोहीम तिचा खर्च भागवून नानासाहेबांची सांपत्तिक स्थिती चांगली होती.

त्यांच्या २१ वर्षाच्या कारभारामध्ये छ. शाहूंचे संपूर्ण कर्ज वडील बाजीराव पहिला यांच्या युध्द मोहिमामुळे झालेले कर्ज आणि त्यांच्या व्याजाचे असलेले मोठे आकड्यांचे कर्ज फेडून त्यांनी निकालात काढले. त्यांच्या यशस्वी कारभाराचे रहस्य हे आर्थिक नियंत्रण व योग्य दाम यावर आधारित होते. त्यांच्या आर्थिक नियंत्रणाचे आणि हिशोबी बाण्याचे अनेक विद्वानांनी तपासणी करून मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. नानासाहेबांनी हिशोबी कचेरीची स्थापना पुणे येथे केली. नानासाहेबांचा उल्लेख प्रसिध्द लेखक असा केला जातो. त्यांच्याएवढा पत्रव्यवहार दुसऱ्या कोणाचाही नसेल. उदगीर आणि शिंदखेडच्या स्वारी दरम्यान त्यांनी लिहिलेली पत्रे, त्यामधील भाषा, लेखणी व वाक्‌बगारपणा इतरांच्यामध्ये दिसूच शकणार नाही. नानासाहेबांच्याजवळ चौकस दूरदृष्टी दिसून येते. जेव्हा पुण्याहून साताऱ्यास घोडा पाठवत असताना घोडेस्वारास चार रुपये खर्चास दिले, त्याचा हिशोब त्याने मागितला होता यावरून त्यांच्यामध्ये असणारी हिशोबाविषयी काटकसरीची दूरदृष्टी दिसून येते. नानासाहेब हे उत्तम लेखणी बहाद्दूर होते. त्यांचे अक्षर वळणदार, सुवाच्च व मनात भरणारे असे होते. संस्कृत भाषा त्यांना चांगली अवगत होती. त्यांचे ''श्रीगणेशामृत'' नावाचे संस्कृत काव्य उपलब्ध आहे. नानासाहेबांच्याजवळ सर्वांना समान उत्तेजन देणे हा महत्वाचे गुण होते. सर्वांनाच समान लेखण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या धोरणास अनुकूल ठरणारी होती.

नानासाहेब पेशव्यांनी आपल्या २१ वर्षाच्या कालखंडामध्ये राज्याची पत-प्रतिष्ठा दक्षतेने राखली. घोडे, हत्ती, पालख्या, जवाहिर पोशाख इत्यादी सेवेंचे गौरव अनेक सरदारांना त्यांनी दिले. लढाईत पडलेल्या कुटुंबाची पालन पोषणाची जबाबदारी घेतलीच एवढेच नव्हे तर जखमी झालेल्या सैनिकांची काळजीपूर्वक दक्षता घेतली. कैद्यांनाही समानतेने व सवलतीने वागविले. तुळाजी आंग्रे याच्याबरोबर तर चांगल्याप्रकारे वागण्याचे अनेकवेळा प्रयत्न केले. परंतु तुळाजी आंग्रेचा नादान स्वभाव आड आला. यावरून नानासाहेबांचे दृष्टेपण निदर्शनास येते.

नानासाहेबांच्याजवळ परिस्थितीचे अनवधान ओळखण्याचे चातुर्य होते. मात्र त्यांच्या या चातुर्य धोरणाला इंग्रजांच्या कूटनीतीला, कपटपणाला ओळखता

आले नाही. नानासाहेब पेशवे पैशाच्या बाबतीत सावध, दक्ष व हिशोबी होते. मृत्यूसमयी त्यांना फारसे कर्ज नव्हते. नानासाहेबांनी उद्योग, व्यापार व लष्कराच्या सोयीसाठी रस्ते, हमरस्ते तयार केले. इमारती, पूल बांधले. मात्र आरमार व इतर सोयीबाबतीत एकंदरीत त्यांचा कारभार अपुरा राहिला. असे जरी दोष दिसले तरी नानासाहेबांनी स्वपराक्रमाने मराठी राज्याची वाढ केली. त्यांनी मराठी राज्याचा इतिहास बनविला. शेती, उद्योग, व्यापार व सावकारी, महसूल व्यवस्था महत्वपूर्ण सुधारणा केल्या, एवढेच नव्हे तर मराठी राज्याची पतप्रतिष्ठा वाढविली. मराठ्यांचे अटकेपार झेंडे फडकावले. जणू त्यांच्या काळात मराठे किंगमेकरची भूमिका बजावत होते. ही गोष्ट अभिमानास्पद मानली पाहिजे. म्हणूनच त्यांच्या धोरणाची भूमिका योग्य होती असे म्हणणे उचित ठरेल.

नानासाहेब पेशव्यांनी पुणे नगरीचे ऐश्वर्य वाढविले. पुण्याला राजधानी बनविली. मुळा-मुठा नदीवर ब्रीज बांधले. शनिवारवाड्यात कात्रजचे पाणी नेले. पुण्याला सांस्कृतिक, सामाजिक, राजकीयदृष्ट्या सक्षम बनविले.

नानासाहेब पेशवे यांनी समाजाचे दोष नाहिसे करून त्यांना वरच्या पायरीवर नेण्यात पूर्ण यशस्वी झाले नसले तरी गुणदोष हे कोठेही अपरिहार्य आहेत. असे धरून त्यांच्यातील गुणांचा उपयोग करून घेणे आवश्यक ठरते. त्यांनी राज्याची केलेली भरभराट, हे कार्य सामान्य नव्हते. हिंमत, शौर्य, कष्टाळूपणा या गुणांचा वापर करून छ. शिवरायांनी मराठा राज्याची मुहूर्तमेढ रोवली. त्याचप्रमाणे नानासाहेब पेशवे अगदी तेच कार्य पुढे नेण्यात व वाढविण्यात यशस्वी ठरले. ही नानासाहेबांची राष्ट्र इतिहासातील ठळक कामगिरी ठरली. या कामगिरीमुळेच त्यांचे नाव राष्ट्रात संस्मरणीय झाले आहे. नानासाहेबांच्या कर्तबगारीचे विवेचन करताना सर्व पेशव्यांच्यामध्ये एकंदर सर्व राज्यकर्त्यांच्यामध्ये लागणाऱ्या गुणांचा विचार करता नानासाहेब पेशवा हा मुख्य सर्वश्रेष्ठ दिसतो. मराठेशाहीचा विचार करताही राज्यकारभाराच्या व प्रशासकीय कामकाजाबाबतीत शिवछत्रपतींच्या खालोखाल नानासाहेबांचा अनुक्रम लावावा लागेल.

नानासाहेब पेशवे यांचे सातारा, वाई या परिसरातील योगदान

नानासाहेबांनी वाई आणि सातारा परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास घडवून आणला. वाई परिसरामध्ये त्यांच्या काळात बांधलेले घाट सुप्रसिध्द आहेत. प्रामुख्याने ब्रह्मपुरी, गणपती मधल्या आळीतील, मंदिर परिसरातील घाट प्रसिध्द आहे. त्याप्रमाणे त्यांनी या परिसरात बांधलेली मंदिरे, त्यांचे दगडी बांधकाम व नदीकाठची मंदिरे त्यांचे सुशोभिकरणातील काम महत्वपूर्ण आहेत. त्याचप्रमाणे मेणवली व मेणवलीचा परिसर या भागातही त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. चिमाजीआप्पाने पोर्तुगीजांना पराभूत करून सुप्रसिध्द पितळी घंटा त्या ठिकाणी उभी केली आहे. तसेच या भागातील बगीचे, दगडी बांधकाम, नदीकाठचे बांधकाम, तेथील शिल्प स्थापत्ये आज व्यापारी व सर्वसामान्य जनतेसाठी उपयुक्त ठरली आहेत. अद्यापही याचा वापर होत असून नानासाहेबांनी या परिसरात केलेली आर्थिक मदत व राबवलेली धोरणे यशस्वी झाल्याचे दिसून येते.

पेशवाईतील मराठेशाहीच्या अपारंपार विस्तारामुळेच नानासाहेबांच्या कर्तबगारीचे महत्व मनात भरते. प्रत्येक व्यक्तींचा स्वभाव ओळखून त्यांच्याकडून आपले काम करून घेणे हे मोठे कठीण काम नानासाहेबांच्या समन्वयक गुणांमुळे शक्य झाले. म्हणूनच राज्याचा एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्कर्ष झाला.

## ६.१३ बाळाजीच्या कार्याचे मूल्यमापन -

एक सैनिक व राजकारणी मुत्सद्दी म्हणून बाळाजी आपल्या पित्याप्रमाणे अव्वल नसला तरी नेतृत्वाचे गुण त्यांच्यात विद्यमान होते. संधीचा फायदा घेत त्याने मराठा राज्याचा विस्तार केला व मराठा सत्ता शिखरावर नेऊन पोहोचविली. बाळाजी आपल्या सौम्य व्यक्तीमत्वासाठी प्रसिद्ध होता. न्यायपद्धतीने त्याने अनेक सुधारणा केल्या. त्याकाळात फौजदारी न्यायालय जनतेच्या अधिकारांचे संरक्षक बनले होते. शेतीवरील करातही सुधारणा करण्यात आली. सर्व गोष्टींचे व्यवस्थित रेकॉर्ड ठेवणे सुरू झाले. गुन्हेगारांना, समाजकंटकांना शिक्षा देण्यासाठी पुण्याला खास पोलीस बंदोबस्त ठेवला होता. व्यापाराला उत्तेजन देण्यात

आले. नवे राजमार्ग तयार करण्यात येऊन रस्त्याकडेला वृक्ष लावण्यात आले. नवीन मंदिरे निर्माण करण्यात आली व त्यांची व्यवस्था करण्यात आली. एकूण जनतेची स्थिती सुधारल्याने जनता बाळाजी बाजीरावला धन्यवाद देऊ लागली.

**किंकडे व पारसनीस-**

इंग्रज इतिहासकारांनी या व्यक्तीचे न्यायपूर्वक मूल्यमापन केले नाही. खरे तर त्यांनी या व्यक्तीचे आभार मानावयास हवे होते. कारण यानेच तुळाजी आंग्रेची नौशक्ती कमी करण्यासाठी इंग्रजांना मदत केली व फ्रेंच सेनानी बुसीला दक्षिणेतच अडकवून ठेवले. पित्याप्रमाणे बाजीरावइतका महान नसला तरी तो दूरदर्शी राजकारणी होता हे मान्य करावे लागेल. ताराबाईच्या कारस्थानांचा व दमाजीच्या बंडाचा त्यानेच फज्जा उडवून देताना अनन्यसाधारण कौशल्याचा परिचय दिला. एवढेच नव्हे तर निजामाला त्याने दाबून ठेवले जर पानिपत झाले नसते तर संपूर्ण दक्षिण भारतात मराठ्यांची सत्ता राहिली असती. आपल्या प्रशासकीय कार्यात पेशवा म्हणून तो इतका व्यस्त राहिला की कधीच दिल्लीला जाऊ शकला नाही. जर गेला असता तर पठाणांच्या संकटाचा त्याला अनुबोध झाला असता. Without the real greatness of BajiRoa, Balaji was a wise and far sighted politician. He met with rare skill and firmness the crisis caused by Tarabai's intrigues and Damaji's rebellion. He reduced to a shadow the power of the Nizam, and but for Panipat, would have added the whole of southern India to the Maratha kingdom. Occupied in the south, he never found time, while Peshwa, to go to Delhi. Had he done so, he would better have understood the Afghan menace.

A History of the Maratha people, P. 347

**जेम्स ग्रँट डफ-**

बाळाजी अशा महान व्यक्तीपैंकी आहे ज्यांचे भाग्य वेळेआधीच उजळले आणि आपल्या योग्यतेपेक्षाही त्यांना विशेषकरून आपल्या देशात अधिक प्रसिद्धी मिळाली. बाळाजी शांत स्वभावाचा, समजूतदार व शिष्टाचारसंपन्न असा होता. त्याच्या एकूण कार्यशैलीत मुत्सद्दीपणा दिसून येतो. खरे तर तो

प्रशासनात हुशार होता. His measures are marked by an excessive cunning, which bramins in general mistake for wisdom... त्याचे खाजगी जीवन विलासपूर्ण होते. तो दानी व उदार होता. तो शक्यतो हिंसा करीत नसे. सर्व गोष्टींचा विचार करता आपण असे म्हणू शकतो की तो एक भला माणूस होता. बाळाजीच्या कारकीर्दीत मराठा साम्राज्य चांगलेच शक्तीशाली बनले. अनेक ब्राम्हण कुळे बाळाजीच्या उदयापासून आपला इतिहास लिहू लागली. म्हणूनच असे म्हणतात बाळाजीच्या काळात जनतेची स्थिती सुधारली, विशेषतः शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याने ते बाळाजीला आशिर्वाद देऊ लागले. .... and most of the principal Bramin families can only date their rise form thawt period. In short, the condition of the whole population was in his time improved; and the maratha peasantry, sensible of the compartive amelioration which the began to enjoy, have ever since blessed the days of Nana Sahib Peswha.

History of the Marathas, Vol. 1. pp. 409-11

## ६.१४ निष्कर्ष व अनुमान

### पेशवा बाळाजी बाजीराव (१७४०-६१)

छ. शाहूने बाजीरावचा मोठा मुलगा बाळाजी बाजीराव यास पेशवेपदाची वस्त्रे दिली. २५ जून १७४० पेशवेपद आता वंशपरंपरागत बनले होते पण तेवढेच अत्यंत महत्वाचे बनले होते. बाजीरावने आपल्या कारकीर्दीत केलेल्या विजयी लढायामुळे मराठा सत्तेचा प्रसार भारतात दूरदूरपर्यंत होऊन मराठ्यांचा सर्वत्र दबदबा निर्माण झाला होता. आपल्या या तेजस्वी कार्याने बाजीराव मराठा राज्याचा वास्तविक शासक बनला होता. त्यामुळेच पेशवेपदावर आलेल्या बाळाजी बाजीरावची जबाबदारी अधिकच वाढली. त्याला पित्याच्याही पुढे जाणे, अधिकाधिक मराठा सत्तेचा विस्तार व विकास घडवून आणणे क्रमप्राप्त होते. बाळाजीचे वयही पेशवेपद मिळाले तेव्हा बाजीरावसारखे १९ वर्षे होते. अनेक युद्धमोहिमांमध्ये त्याने भाग घेतला होता. विशेषतः प्रशासकीय कामकाजात व हिशोबात तो जास्त तरबेज होता. राज्याची लंगडी आर्थिक

बाजू पाहून नानासाहेब पेशव्याने राज्य सुदृढ आर्थिक पायावर उभे करण्याचा चंग बांधला व त्यांनी पूर्ण केला.

### ६.१४.१ निष्कर्ष उद्दिष्टांना अनुसरून

१) नानासाहेब पेशव्यांच्या आर्थिक धोरणांमध्ये शेतीविषयक सुधारणा महत्त्वपूर्ण असून यामध्ये त्यांनी जमिनीची प्रतवारी ठरविली. तसेच योग्य महसूल गोळा केला.

२) पेशव्यांचा उदय शाहूंच्या काळात झाला परंतु नानासाहेब पेशवे हे आर्थिक धोरणांचा पुरस्कार करणारे पेशवे म्हणून ओळखले जातात. त्यांचा उल्लेख राज्याची आर्थिक घडी बसवणारा असा केला गेला आहे.

३) बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर ते सत्तेवर आले. सत्तेवर आल्यानंतर त्यांनी राज्याची घडविण्याचा बसवण्याचा प्रयत्न केला. दक्षिण व उत्तर भारतातील मराठी राज्याची घडी आर्थिकदृष्ट्या, प्रशासकीयदृष्ट्या सक्षम बनविली.

४) नानासाहेब पेशव्यांनी राजकीय सत्तेमध्ये स्वकियांशी नाईजालाजस्तव संघर्ष करावा लागला. रघुजी भोसले, तुळाजी आंग्रे यांच्याबरोबर त्यांचा संघर्ष घडून आला. परंतु त्यातून त्यांनी पेशवाईला सावरून राज्याचे अर्थकारण सुनियंत्रित केले.

५) नानासाहेब पेशव्यांनी शेतीमध्ये अमुलाग्र बदल केला. त्याचबरोबर शेतीला पूरक असणाऱ्या व्यवसायाला त्यांनी संधी उपलब्ध करून दिल्या. शेतजमिनीचे चार भाग केले. महसूल, मोकासा व साहोत्रा या स्वरूपात वसूल केला. महसुलाची व्यवस्था योग्य अधिकारी नेमून केली. दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना मदत केली. महसूल वसूल करताना प्रजेवर अन्याय केला नाही. जमीन महसुलाची जाचक आकारणी बंद केली. त्याचबरोबर इतर उद्योग धंद्यामध्येही त्यांनी आमुलाग्र बदल घडवून आणला व राज्याच्या खजिन्यात भर घातली.

६) नानासाहेबांच्या मुत्सद्दीपणाचे आणखी एक उदाहरण घेता येईल ते म्हणजे व्यापार, उद्योगधंदे व परराष्ट्र व्यापार. यामध्ये मराठी साम्राज्याच्या

प्रचंड विस्तारामुळे मोठी शहरे बनली. त्याचबरोबर मराठ्यांच्या व्यवसाय उद्योगधंद्यामध्ये बदल होत गेले. यावेळेला गुजरात, अहमदाबाद तसेच परकीय परदेशातूनही व्यापार सुरू केला. यामध्ये पैठण, नागपूर, सोलापूर हे केंद्रे प्रसिध्द झाली. यामध्ये एक गोष्ट सांगावी लागेल की, नानासाहेबांच्या काळामध्ये मोठे उद्योग निर्माण झाले नाहीत. मात्र लघुउद्योगाला त्यांनी सढळ हस्ते मदत केल्याचे दिसून येते. काही ठिकाणी विणकरांना पगार दिल्या गेल्याचेही नमूद केले आहे. महाराष्ट्रा बाहेरील भागातून सुतार बोलावून धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे यांना सुशिभित केले. सुवर्ण व्यवसाय भरभराटीला आला होता. नानासाहेबांच्या काळात हस्तीदंती उद्योगामुळे राज्याच्या आर्थिक व्यवस्थेला बळकटी आणल्याचे दिसून येते. याचबरोबर कुंभार व्यवसाय, गुऱ्हाळ, खाद्यतेल व्यवसाय, जहाज बांधणी, मादक द्रव्यांचा उद्योग, मत्स्य उद्योग, मिठागराचा उद्योग, युध्द सामग्रीचा उद्योग इत्यादी बाबतही नानासाहेबांच्या काळात भरभराट झालेली दिसून येते. कदाचित त्यामुळेच त्यांना आर्थिकदृष्ट्या सुधारणावादी प्रशासकीय पेशवा म्हणून त्यांचा नावलौकिक झालेला दिसून येतो. नानासाहेबांनी युरोपीय देशांबरोबरसुध्दा व्यापार केल्याचे दिसून येते. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावी लागते की, परकीय लोकांनी महाराष्ट्रामध्ये स्थायिक होण्यासाठी किंवा आपल्या वखारी स्थापन करण्यासाठी खास सवलती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे परकीय धोरण चिकित्सक दृष्टीने प्रभावी दिसते.

७) इतर जाती-जमातींच्या तुलनेत ब्राह्मणातील व्यवसायकरांचे प्रमाण अधिक दिसून येते. यामध्ये पेशव्यांना काही कर्ज पुरविणारे सावकार होते. तसेच महाराष्ट्र व गुजरातमधीलही सावकार या वेळेस होते. युध्दाचा खर्च भागविणेसाठी कर्ज घेणे ही प्रथाच पडून गेली होती. अगोदरच्या पेशव्यांनी सतत मोहिमेंसाठी घेतलेली कर्जे नानासाहेबांनी ती फेडल्याचे दिसून येते. सावकार दरसाल व्याजाने कर्जे देत असे. सावकारांनी पेशवाई कधीही बुडणार नाही म्हणून त्यांना कर्ज दिले. आर्थिक उलथापालथीमुळे कधी कर्जे वसूल होत तर कधी त्यांना वेळ

लागत असे. अशा वेळेला कर्ज वसुलीसाठी मोहिमांवर सावकारांचे प्रतिनिधीसुध्दा जात असत.

८) नानासाहेबांच्या काळात महसूल व्यवस्थेचा विचार करताना असे दिसते की, राज्याची भरभराट ही रयत व सरकार यांच्या चांगल्या संबंधावर अवलंबून असते. याचा विचार या पेशव्यांनी निष्पक्षपातीपणे केल्याचे निदर्शनास येते. जास्तीत जास्त लोकांना महसूल वयवस्था सुखकारक व हिताची कशी वाटेल याकडे त्यांनी लक्ष दिल्याचे निदर्शनास येते.

महसूलाचा हिशोब तपासणीबाबत नानासाहेब पेशवे यांचे धोरण अत्यंत दक्षतेचे दिसून येते. रयतेला त्रास होणार नाही याची खबरदारी त्यांनी घेतल्याचे स्पष्ट होते. महसूलाच्या बाबतीत ते दूरदृष्टीचे व व्यवहार चतुर होते.

९) लष्कराच्या बाबतीत शिवाजी महाराजांनी पाळलेली काही नितीनियम पेशव्यांच्या काळात पाळलेले दिसून येत नाहीत. यामध्ये शिवाजी महाराजांनी बंद केलेली सामंतशाहीची प्रथा पेशवाई काळात सुरू झाल्याचे दिसून येते. त्यामुळे मध्यवर्ती सत्ता कमकुवत होवून वतनदार व काही घराणी प्रसिध्दीस आले. तीच घराणी पुढे पेशवाईची पिलर्स (खांब) म्हणून ओळखली गेली.

१०) पेशव्यांच्या काळात गायकवाड, दाभाडे, पवार, होळकर, शिंदे, भोसले, पटवर्धन, घोरपडे, खेरबुंदेले, दीक्षित इत्यादी प्रसिध्द वतनदारांचा उदय झाल्याचे दिसून येते. त्यांच्याकडे चौथाई, सरदेशमुखी वसूल करणे, दिल्ली दरबारी लक्ष ठेवणे, मराठी राज्याचा विस्तार करणे इत्यादी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या गेल्याचे दिसून येते.

## ६.१४.२ गृहितकाना अनुसरून-

१) नानासाहेब पेशव्यांच्या राजकीय सत्तेला स्थैर्य मिळाले म्हणूनच त्यांनी राज्याची आर्थिक घडी सुव्यवस्थित बसविली.

२) राज्याच्या व्यवस्थेला आर्थिक घडी बसवत असताना त्यांनी जनसामान्यांचा विचार केल्याचे दिसून येते.

३) महाराष्ट्राबाहेरील आर्थिक धोरणांमुळे राज्याच्या तिजोरीत भर पडल्याचे

दिसून येते एवढेच नव्हे तर पेशवाईचे कर्ज तसेच छ. शाहूंचे कर्जही सव्याज फेडल्याचे दिसून येते.

४) नानासाहेब पेशव्यांची कुशल प्रशासन, नेतृत्व, मुत्सद्देगिरी व सरदारकीने काम करावे या तत्त्वानुसार मराठी राज्याचा महाराष्ट्राच्या बाहेरही प्रचंड दबदबा निर्माण झाला.

५) नानासाहेबांच्या काळात सत्तेची सर्व केंद्र पेशवाईमध्ये एकवटल्यामुळे त्यांना योग्य आर्थिक धोरण राबवता आले व योग्य निर्णय घेता आले.

६) नानासाहेबांनी स्वतः आर्थिक धोरणांमध्ये लक्ष घालून राज्यातील शेवटचा प्रतिनिधीही सुटणार नाही तसेच मोठे सावकारावरही जरब बसेल यासाठी नियोजनबध्द आर्थिक सुधारणा केल्याचे दिसून येते. त्यामुळेच नानासाहेबांच्या धोरणांमुळे एक आर्थिक क्रांतीच निर्माण झाल्याचे दिसून येते.

७) नानासाहेब पेशव्यांचे आर्थिक व राज्य विस्ताराची कामगिरी दुर्लक्षित राहिली, नानासाहेब पेशव्यांचे आर्थिक कामगिरीमुळे पुण्याच्याच नव्हे तर देशाच्या इतिहासाला वेगळी दिशा मिळाली हे नाकारता येत नाही.

## अनुमान -

१) महाराष्ट्राच्या इतिहासात पेशवे राज्यकर्त्यांचे योगदान मोलाचे आहे. परंतु या विषयासंदर्भात विचार करायचा झाल्यास नानासाहेब निसंशयपणे स्थैर्य निर्माण करणारे व आर्थिक घडी बसवणारे पेशवे म्हणून चिरकाल स्मरणात राहतील.

२) आर्थिक धोरणांचा पुरस्कार वैयक्तिक विचाराने केल्याचे दिसून येते.

३) बाजीराव पेशव्यानंतर मराठीशाहीमधील पोकळी नानासाहेबांनी भरून काढल्याचे दिसून येते.

४) परकीय व्यापाराला प्रोत्साहन दिले. तसेच व्यापारामध्ये राज्यातील सर्वात शेवटच्या घटकालाही मदत केल्याचे दिसून येते.

५) महसूल व्यवस्थेत क्रांतिकारक बदल केले.

६) वतनदारांमुळे मराठेशाहीला तारणहार मिळवून दिले.

७) नानासाहेबांनी आपल्या कारकिर्दीत विविध निर्णय घेतले. त्यामध्ये

युध्द मोहिमा असो, शेती असो, व्यापार असो, महसूल व्यवस्था असो, स्वकियांशी संघर्ष असो अथवा चौथाई सरदेशमुखीबाबत असो राज्याच्या हिताच्या बाबतीत असो अथवा प्रजेच्या हिताबाबत असो असे एकूणच त्यांचे निर्णय एक कुशल प्रशासक म्हणून सर्वश्रेष्ठ ठरले असे म्हणणे उचित ठरेल.

८) नानासाहेबांच्या कालखंडामध्ये राज्याला एकूण २१ वर्षांची दीर्घकालीन स्थिरता मिळाली. या काळामध्ये मराठ्यांच्या राज्याची कक्षा रुंदावत गेली. तर त्यांच्याच कालखंडामध्ये एका बाजूला स्थैर्य तर दुसऱ्या बाजूला पानिपतचा पराभव. त्यामुळे ढवळून निघालेली पेशवाई हे वास्तव सत्य नानासाहेबांच्या कारकिर्दीत घडले तरीही नानासाहेब आर्थिक धोरणांमुळे दीर्घकालीन स्मरणात राहतील व इतिहास त्यांची सदैव आठवण करेल. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्यानंतर महाराष्ट्रामध्ये आर्थिक धोरण व प्रशासनामध्ये एकसूत्रीपणा आणणारे पेशवा म्हणून नानासाहेबांची आठवण होत राहील. पानिपतच्या पराभवामुळे मराठेशाही मोडकळीस आली नाही तर नानासाहेबांनी केलेल्या वेगवेगळया सुधारणांमुळे सुयोग्य व्यवस्थापनामुळे पुढे त्याचा पुत्र पेशवा माधवराव याला मराठेशाही सुयोग्य चालविण्यास व मराठ्यांची गेलेली पत पुन्हा मिळवून देण्यास नानासाहेबांचे सर्व कार्यच जबाबदार ठरते, यात तिळमात्र शंका नाही.

असा हा महानायक पेशवाईला स्थिरता मिळवून देणारा, राजकारणी धुरंधर पेशवा म्हणजे नानासाहेब होय. एका व्यापाऱ्याचे पत्र त्यांना मिळाले. ''दोन मोती गळाले, २७ मोहरा हरवल्या. अनेक रुपये पैसा यांचा खुर्दा झाला.'' या पत्रावरून त्यांना पानिपतच्या दुःखद घटनेची हकिकत समजली. आणि २३ जून १७६१ रोजी पानिपतच्या युध्दातील पराभवाचा धक्का सहन न झाल्यामुळे नानासाहेबांचा पुण्यातील पर्वती येथे मृत्यू झाला.

धन्य तो नानासाहेब पेशवा...!

## ६.१५ पुढील संशोधनासाठी विषय -

१) नानासाहेबांच्या राजकीय धोरणांचा अभ्यास

२) नानासाहेबांचा महसूलविषयक धोरणाचा अभ्यास

३) नानासाहेबांच्या लष्करी व्यवस्थेचा अभ्यास

४) नानासाहेबांच्या परराष्ट्रविषयक धोरणांचा अभ्यास

५) नानासाहेबांप्रमाणेच इतर पेशव्यांचा आर्थिक धोरणांचा अभ्यास

६) नानासाहेब पेशव्यांचे परकियांशी असलेल्या संबंधाचा दुरगामी परिणामांच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास

७) नानासाहेब व छ. शाहू यांच्या धोरणांचा चिकित्सक अभ्यास

८) नानासाहेब व वतनदार यांच्यामधील आर्थिक धोरणांचा तौलनिक अभ्यास

९) नानासाहेबांचे बलुतेदारांसंदर्भात धोरणांचा चिकित्सक अभ्यास

१०) नानासाहेब पेशवे व आरमारी सामर्थ्य यांचा अभ्यास

११) नानासाहेबांची पाणीपुरवठ्याविषयी असणाऱ्या धोरणांचा चिकित्सक अभ्यास

१२) नानासाहेब पेशव्यांचा कर्नाटक धोरणांचा चिकित्सक अभ्यासक

१३) नानासाहेब पेशव्यांच्या रोजनिशीचा चिकित्सक अभ्यास

१४) नानासाहेबांचे गुन्हे व शिक्षेसंदर्भातील धोरण

१५) नानासाहेबांचे स्वकियांशी असलेले संबंध

## संदर्भ ग्रंथ सूची -

### अ) प्राथमिक साधने-


१) अ. रा. कुलकर्णी, खरे ग. ह., मराठ्यांचा इतिहास खंड क्र. २ व ३

२) आंद्रे विक - लँड अँड सॉव्हरिंटी (Land & Sovereignty)- अँग्रीयन सोसायटी अँड पॉलिटिक्स अंडर दि एटिन्थ सेंचुरी मराठा स्वराज्य, पान नं. १९२

३) आपटे बी. के.- ए हिस्ट्री ऑफ दि मराठा नेव्ही अँड मर्चंट शिप्स, पान १६८

४) भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल व इतिवृत्ते.

५) भावे वा. कृ.- पेशवेकालीन महाराष्ट्र पान ४२६

६) बाळकृष्ण - शिवाजी द ग्रेट : खंड ४, पान नं. २२

७) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र पान ३६५-६६

८) भावे वि. स., मराठी दप्तर रुमाल, खंड ३

९) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र

१०) भावे वि. ल., मराठे दप्तर रुमाल

११) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र

१२) "Bombay Gazette" खंड क्र. १०, पा. नं. १७५

१३) चाफेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत.

१४) चाफेकर ना. गो., - पेशवाईच्या सावलीत, पान नं. ५८

१५) चाफेकर ना. गो.- पेशवाईच्या सावलीत पान ३

१६) चिटणीस कृ. ना.- चलन व पेढी व्यवहार पा. ४ पा. ६१

१७) चितळे वि. सी., पेठे दप्तर, भाग १ व २

१८) चौकसी आर. डी., इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ दि डेक्कन पा. ५-७

१९) चिटणीस कृ. ना. सोशिओ इकॉनॉमिक अस्पेक्टस् ऑफ मिडव्हल इंडिया

२०) चिटणीस के. एन., रेव्हेन्यू ऑफिशिअल्स मराठा हिस्ट्री सेमिनार (१९७१)

२१) दीक्षीत म. श्री., पुण्याचे शिल्पकार, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.

२२) दता काली किंकर, सर्व्हे ऑफ इंडियाज सोशल लाईफ अँड इकॉनॉमिक कंडिशन इन दि एटिन्थ सेंच्युरी पा. ५१

२३) दत्त आर. सी., इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया पा. ४१-४३

२४) फोर्बेस जेम्स - ओरियंटल मेमॉयर्स : खंड १, पान नं. १४६

२५) गाडगीळ ध. रा., पुणे सोशिओ- इकॉनॉमिक सर्व्हे पार्ट १, पान १०३

२५) गॅझेटियर ऑफ द बॉंबे 'प्रेसिडेन्सी' खंड १६, पान ५५१०

२६) गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, पृष्ठ ४७-५०, १४६-१४७, १५५, १९३, ३६३, ४३१

२७) गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, मराठी शाहीचा उत्कर्ष, आर्थिक बाजू पृष्ठ ५.

२८) गाठाळ साहेबराव, मराठ्यांचा इतिहास.

२९) गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, (२०००), कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

३०) गॅझेटियर ऑफ बॉंबे प्रेसिडेन्सी पार्ट ३, खंड ९ व १०

३१) गर्गे स. मा., मराठी रियासत खंड ४, पृष्ठ ४१, ४३-४३, ४९, ८१, ३६२, ३६८,

३२) गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडन्सी पार्ट ३, खंड ९, १०.

३३) हबीब इरफान- ॲन ॲटलास ऑफ दि मुगल एम्पायर शीट नं. ओबी

३४) हबीब इरफान, दि अॅग्रेरियन सिस्टिम ऑफ मुघल इंडिया पा. ३६७

३५) हातेकर नीरज, इंडिया इकॉनॉमिक अँड सोशल हिस्ट्री रिव्ह्यू ३३.४

३६) जोशी शं. ना., मराठीकालीन समाजदर्शन पान नं. २-३

३७) जोशी भाऊ, छत्रपती रामराजा पृष्ठ ३१०

३८) जोशी श. ना., मराठेकालीन समाजदर्शन

३९) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने

४०) खरे ग. ह., हिंगणे दप्तर- खंड १, पृष्ठ क्र. १४-१८, पृष्ठ १७,

४१) कुलकर्णी अ. रा., शिवकालिन महाराष्ट्र पान नं. २२-२३

४२) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, पान १६

४३) कदम व. शं., मराठा कॉन्फेडेरसी - ए स्टडी इन ओरिजनल अँड डेव्हलपमेंट, पान नं. ७३ व ७४.

४४) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने, पान नं. १६

४५) कुलकर्णी अ. रा., - महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी, पान नं. १०६

४६) कुलकर्णी अ. रा.- महाराष्ट्र इन दि एज ऑफ शिवाजी, पान नं. १३३

४७) कदम व. शं. - तत्रैव, पान नं. ९०.

४८) खोबरेकर वि. गो., मराठी अंमलाचे स्वरूप, पान नं. ७८-७९.

४९) कुलकर्णी अ. रा. - शिवकालीन महाराष्ट्र, पान ९०

५०) कुलकर्णी अ. रा.- मराठा इतिहास व्याख्यानमाला, पान ९०

५१) खोबरेकर वि. गो., मराठी अंमलाचे स्वरूप, पान ७८-७९

५२) कुलकर्णी अ. रा., मेडिव्हीयल चौल. (संपा) इंदू बंगा, पोर्टस् अँड देअर हिंटर लँडस् इन इंडिया- १७००-१९५०, पान १२०

५३) कुलकर्णी बी. टी.- बँकिंग इन दि एटिंथ सेंच्युरी- ए केस स्टडी

ऑफ ए पुना बँकर (अर्थविज्ञान), पान १८०

५४) कुलकर्णी जी. टी., बँकिंग इन दि एटिन्थ सेंच्युरी, अर्थविज्ञान खंड १५, पा. १८१, १८३

५५) खरे ग. ह., हिंगणे दप्तर भाग १ व २

५६) केळकर सं, ऐतिहासिक पोवाडे, खंड १ व २

५७) खरे ग. ह., ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १, इचलकरंजीचा इतिहास

५८) काव्येतिहाससंग्रह - (खाने) पत्रे, यादी वगैरे, छ. शाहू महाराजांचे चरित्र, रामराजांचे चरित्र, पेशव्यांची खबर, रघुनाथ यादवांची पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर व कैफियत.

५९) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र

६०) कुलकर्णी अ. स., महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी

६१) कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास, (२००६) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

६२) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने

६३) खरे ग. ह., कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास भाग १,२,३.

६४) खरे वासुदेवशास्त्री, मराठे व इंग्रज, प्रस्तावना पृष्ठ १८

६५) मोडक गो. कृ., मुलांचा महाराष्ट्र, परिशिष्ट

६६) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर- सातारा जिल्हा पान ४०९

६७) ना. गो. चापेकर - पेशवाईच्या सावलीत

६८) ना. गो. चाफेकर, पेशवाईच्या सावलीत, पृ. क्र. ७२-७३

६९) नानासाहेब रोजनिशी, खंड १, १४२

७०) पारसनीस द. ब., संपादक, बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी भाग २, मुंबई ७

७१) पुरंदरेंचे दप्तर

७२) पारसनीस डी. बी. संपादित, इतिहास संग्रह भाग १ ते ७ - पेशवे दप्तरातील माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे आणि स्फुटनिक.

७३) पारसनीस डी. बी., इतिहास संग्रह, (१९०१) अर्थविज्ञान

७५) पेशवे दप्तर, खंड क्र. २५, ३१

७६) पेशवा डायरी, खंड, २, ३, ६,७, ८ पृ. क्र. ८७, ४५४, ४५७

७७) पे. द. नि. का. खंड १८

७८) पे. द. खंड ३, ६९, ४६२, ४६४.

७९) पेशवे रोजनिशी खंड २, ३ सन ४९७, पान २१२, ९३३

८०) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर (१९२९), भाग १, २, ३ व ४

८१) पंत (डॉ.) डी, इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया अंडर द मुघलक पा. ६३

८२) पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दप्तर, खंड ३, १४८, १८७, १८८, २०२-२०३, २०६.

८३) पवार जयसिंगराव, मराठेशाहीचा मागोवा पृष्ठ २६५

८४) पांगारकर ल. रा., चरित्रचंद्र पृष्ठ २७९-२८६

८५) पेशवे दप्तर खंड ३१ : २५

८६) पुरंदरेचे दप्तर

८७) पारसनीस द. ब., बाळाजी बाजीराव यांची रोजनिशी

८८) पारसनीस- द. ब., इतिहाससंग्राहातील प्रकरणे, भारतवर्ष, वर्ष १, २; बुंदेलखंडाची त्रुटित बखर, बुंदेल्यांची बखर;, रामचंद्र बाबाबी अप्रकाशित पत्रे, तह व करामदार.

८९) पारसनीस द. ब., पेशवे दप्तरातील माहिती, ऐतिहासिक गोष्टी, चरित्रे, टिपणे भाग १ ते ७

९०) पाठक महाले, मराठी सत्तेचा इतिहास

९१) राजवाडे वि. का.- मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, २२

९२) राजवाडे वि. का., ऐतिहासिक प्रस्तावना पृष्ठ १४३-१४५

९३) रानडे एम. जी., राईज ऑफ मराठा पॉवर

९४) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाने साधने खंड २०, २२

९५) रानडे गो. म., राईज ऑफ द मराठा पॉवर, पान ९८-९९

९६) रानडे गो. म., राईज ऑफ दि मराठा पॉवर, पान नं. ९८-९९

९७) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, ५५, ५६

९८) राजवाडे वि. का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ ते २२

९९) राजवाडे- खंड १, ४, ६.

१००) राजवाडे वि. का., राजवाडे खंड, १ पत्र क्र. १, १६१, १६४,

१०१) रानडे एम. के., राईज ऑफ मराठा पॉवर

१०२) राजवाडे वि. का., खंड २२

१०३) साने का. ना., काव्येतिहास संग्रह, पत्र क्र. ३८०, पृष्ठ क्र. १२१, १२२

१०४) साने का. ना., काव्ये इतिहास संग्रह, पत्रे, यादी, लेखांक ५६, पृष्ठ ५६, ६८, ७१.

१०५) साने का. ना. संपादित, भाऊसाहेबांची बखर, (१९३२) पुणे.

१०६) सरदेसाई, ४५ खंड, रियासती,

१०७) सरदेसाई गो. स., मराठी रियासती खंड ४, (१९९०) मध्य विभाग २, पृष्ठ १०, मध्य विभाग २, पृष्ठ ४०४, पृष्ठ ३१, पृष्ठ ४१६

१०८) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर खंड ६, ३१, पेशवे दप्तर २१, पत्र क्र. ८, पृष्ठ क्र. १४-३२

१०९) सरदेसाई गो. स., न्यू हिस्ट्री ऑफ मराठाज

११०) सरदेसाई गो. स., संपादक, कृ. पां. कुलकर्णी, य. मा. काळे, ऐतिहासिक पत्रव्यवहार

१११) सरदेसाई गो. स., कुलकर्णी, कृ. पा. व काळे या. मा., संपादित ऐतिहासिक पत्रव्यवहार, (१९३३) पुणे.

११२) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर खंड ६, पान ६१९

११३) सरदेसाई गो. स., मेन करंट्स ऑफ मराठा हिस्ट्री, पान नं. ८६-८७

११४) सरदेसाई गो. स.- पेशवे दप्तर खंड ३१, पत्र क्र. ४८

११५) सरदेसाई गो. स., ऐतिहासिक पत्रव्यवहार, (१९३३) काव्ये इतिहास संग्रह, ऐतिहासिक लेख, पत्रे इ.

११६) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, पृष्ठ १८, ३०-५०, १०१

११७) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, मध्यविभाग २, पृष्ठ २३-२४, ५८-५९, ८६-८८, ३१७, ४०४, ४०७

११८) सरदेसाई गो. स., मराठी रियासत ३, पृष्ठ २४४, पेशवे दप्तर १७ वा भाग ५६-७१, ७४, ७७ पत्रे

११९) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर खंड १७-१८, ८५, ८६, १२६,

१२०) सरदेसाई गो. स., मराठी रियासत पुण्यश्लोक, छ. शाहू पेशवा बाजीराव

१२१) सरदेसाई गो. स., मराठी रियासत ३, पानिपत प्रकरण, नानासाहेबांचा मृत्यू योग्यता.

१२२) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड ६ वा

१२३) सरदेसाई गो. स., नानासाहेब पेशवे चरित्र (१९२६)

१२४) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, (१९९०) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१२५) सरदेसाई गो. स., पेशवे दप्तर, खंड २, ३, ४, ३१

१२६) सेन एस. एन., - ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टीम ऑफ दि मराठाज्, पान नं. ६६

१२७) सेन एस. एन., ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ मराठा पान ५५, ६६, ३१६

१२८) सेन एस. एन., न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज्

१२९) सेन एस. एन., मिलिटरी सिस्टीम ऑफ दि मराठाज, पान ४०-४१

१३०) शिवकालीन पत्रसार संग्रह खंड क्र. २१८३

१३१) शर्मा रामशरण, परस्पेक्टिव्ह इन सोशल अँड इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ अर्लि इंडिया पा. २४, २५

१३२) सेन एस. एन., ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ द मराठाज्

१३३) सासवडकर, आठवले - मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास

१३४) शेजवलकर त्र्यं. शं., पेशवे निजाम संबंध पृष्ठ ४८-४९.

१३५) शेजवलकर लेखसंग्रह, नानासाहेब पेशवे, पृष्ठ क्र. ४०

१३६) शेजवलकर त्र्यं शं., पानिपत पृष्ठ क्र. २१६

१३७) श्रीकृष्ण वि. आठल्ये, रिंगणगावकर दप्तर, होळकरांची थैली, सोनपतची बखर व पत्रे, सर्व अप्रकाशित.

१३८) देशपांडे/कुलकर्णी-कुलकर्णी, सोहनी विरचित संपादक - पेशव्यांची बखर, (१९६३) देशमुख प्रकाशन, पुणे.

१३९) सुंठणकर बा. रं., सदाशिवराव भाऊ पृष्ठ क्र. ६०, ७५

१४०) वाड मावजी, पेशवा डायरी खंड ८, पान ८२०, ८२७ आणि भाग ६ पान ७५५

१४१) वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. २४८

१४२) वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. १५१, २४८, २५९

१४३) वूड डायना- मेडिव्हीएल इकॉनॉमिक थॉट, पा. ७०-७१

१४४) वैद्य चिं. वि., दुर्दैवी रंगू, संक्षिप्त आवृत्ती पृष्ठ ४८-४९, ५१

१४५) वैद्य सं. शं., वैद्य दप्तरातून निवडलेले कागद एकूण ५ खंड

१४६) वाड रा. ब., नानासाहेबांच्या रोजनिशा- कैफियती व यादी (भाग १-३)

१४७) वाकसकर- कोटेकर पंडितांची पत्रे (अप्रकाशित)

**१४८) अप्रकाशित साधने -**

पुणे पेशवे दप्तरातील घेतलेली पत्रे संशोधनासाठी निवडलेली कागद -

द. क्र. १, पृष्ठ क्र. १- पत्र क्र. १७९५

द. क्र. १, पृष्ठ क्र. १- पत्र क्र. ७

द. क्र. १, पृष्ठ क्र. २- पत्र क्र. १५१६

द. क्र. १, पृष्ठ क्र. ३- पत्र क्र. ३६६

द. क्र. १, पृष्ठ क्र. ४- पत्र क्र. ६५०

सरदेसाई गो.स. पेशवे दप्तरातून निवडलेले कागद खंड ७,१०,१२,१३,१४,१५, १७,२०,३०,४०,४४,४५

पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १८९५

पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १८९७

पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १९००

पे. द. संशोधनासाठी निवडलेले पुडके पत्र क्र. १९०७, १९०८, १९११, १९१३

पेशवे दप्तर - संशोधनासाठी निवडलेले कागद (सां. नि. का.)

सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. ७११

सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. ७५३

सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. १८३८

सां. नि. का. पुडके क्र. १ पत्र क्र. १८४४

शाहू दप्तर -

सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. १०२९५-७२४७९

सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. ३३५०

सां. नि. का. पुडके क्र. १, पत्र क्र. १७९२

भावे वा. कृ. - पेशवेकालीन महाराष्ट्र

भांडारकर पु. ल.- संशोधन पध्दती

भिंताडे वि. रा. - शैक्षणिक संशोधन पध्दती

चाफेकर ना. गो. - पेशवाईच्या सावलीत

चिटणीस कृ. ना. - सोशिओ इकॉनॉमिक अस्पेक्टस् ऑफ मेडिव्हियल इंडिया

चिटणीस कृ. ना.- मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग ३

देसाई सु. धा. - सोशल लाईफ इन महाराष्ट्र अंडर दि पेशवाज्

गवळी बा. आ. - पेशवेकालीन महाराष्ट्र

गाडगीळ ध. रा. - पुणे सोशिओ - इकॉनॉमिक सर्व्हे पार्ट १

गाडगीळ डी. आर. - पुणे शहरातील महाजन आणि नगरसेठ

गोखले म. वि. - छत्रपतींचे पंतप्रधान

जोशी शं. ना. - मराठेकालीन समाजदर्शन

महाजन टी. टी. - इंडस्ट्री ट्रेड अँड कॉमर्स ड्युरिंग पेशवा पिरीयड

मुळे रा. शं. व उमाटे वि. तु. - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे

नाईल्स टिन्सगार्ड - १७ व्या शतकातील आशिया खंडातील व्यापारक्रांती

प्रमोद ओक, पेशवे घराण्याचा इतिहास, (२००१) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

एम. बी. बुच (व्हल्यूम १, २, ३, ४)

ब) दुय्यम साधने -

बखरी, आज्ञापत्रे, लेख आणि साहित्य

**१४९) नियतकालिके -**

भारतीय इतिहास आणि संस्कृती

नवभारत अंक डिसेंबर ७ व ८

केळकर य. न., ऐतिहासिक शब्दकोश, खंड १, २ पुणे १९६२

चित्राव सिध्देश्वर शास्त्री - मध्ययुगीन चरित्रकोष पुणे

जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड ५, १३

दाते य. र.- महाराष्ट्र शब्दकोश पुणे १९८४

कर्वे, महाराष्ट्र शब्दकोश पुणे १९८६

१५०) संशोधनात्मक मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके -

भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे त्रैमासिक, वर्षे १३, अंक २,

वर्ष २१, अंक २-३.

भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई

त्रैमासिक वर्ष ३, पुरवणी १०

त्रैमासिक वर्ष १०, पुरवणी ३८

त्रैमासिक वर्ष १४, पुरवणी ५४

क) इंग्रजी साधने -

1) Asiatic Researches - Vol 3.

2) B. Baten - Powel - Study of the Dekkan Villages, their origin and development (J. R. A. S. 1897)

3) B. Baten - Powell - (1897) study of the Decan Villages, their Origin and development.

4) C. Kincaid and D. Parasnis - A History of Maratha people London 1918

5) Desai S. V. Social Life in Maharashtra under the Peshwas

6) Duff Grant J. S. - A History of the Maratha's London 1921.

7) Duff Grant (1921) - A Histry of Maratha's

8) Duff Grant- History of the Marathas.

9) Duf. Grant 1. - 'History of the Mahratts' Vol. I & II (Ed. 1963)

10) Duff. Grant 1. (Ed.1963), 'History of the Mahratts' Vol. I & II

11) Duff Grant J. S. - A History of the Maratha's London 1921

12) Elloit & Dowson - Hisotry of India - Vol. S.

13) Joshi P. M., 'Expansion of the Maratha Power (1707-1761)' (Ed.1957)

14) Joshi P. M., (1707-1761)' (Ed.1957), 'Expansion of the Maratha Power

15) Kadam V. S., Maratha Confenderacy

16) Kulkarni A. R. Medieval Maratha Country

17) Mahajan T. T. Trade and Commerce during the Peshwa

18) Mukharji Radhakamal - The Economic History of India

19) Mate M. S.- Maratha's Architecture

20) Mahajan T. T. - Aspects of Agrarian and Urban History of Maratha

21) New Histry of the Maratha - Sardesai G. S. Valum II & III, Bombay

22) P. Gadgil - Poona : A socio, Economic survey.

23) Sardesai G. S., (Ed. 1930-34). (In Marathi), 'Selections

from the Peshwa Daftar' Vol. 1 to 45 .

24) Sardesai G. S. (Ed. 1940), Vol.- 7 : Poona Affairs

25) Sardesai G. S. (Ed. 1950), Vol.- 12 : Poona Affiars- (Pt.I)

26) Sardesai G. S. (Ed. 1950), Vol.- 13 : Poona Affairs (Pt.II)

27) Sardesai G. S.- 'Selections from the Peshwa Daftar' Vol. 1 to 45 (Ed. 1930-34). (In Marathi). P. R. C. Vols.


28) Sinha H. N., 1931, Rise of the Peshwas Alahabad

# परिशिष्ट्ये यादी

| अ.क्र. | शीर्षक |
|---|---|
| अ) | पुणे पुराभिलेख विभागाचे पत्र |
| ब) | कोल्हापूर पुराभिलेख विभागाचे पत्र |
| क) | वि. स. खांडेकर व नगर वाचनालय सांगली यांचे पत्र |
| ड) | पेशवाईचा आलेख |
| इ) | नानासाहेबांच्या आर्थिक धोरणांचा आढावा आलेख |
| फ) | नकाशे<br>१) नानासाहेबांचे राज्य<br>२) मराठ्यांचा चौथाई संदर्भात नकाशा |
| ग) | नानासाहेबांची हस्ताक्षर प्रत व त्याचा मराठी अनुवाद |
| ज) | पडताळा सूची |


# पेशव्यांच्या कर्तबगारीचा समग्र आढावा


## १७१३-१८१८





# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांची कर्तबगारी


## १७४०-१७६१




मराठा साम्राज्य
(इ.स. १७५८)
पेशवा बाळाजी बाजीराव
काश्मिर
अटक
लाहोर
पंजाब
मुलतान
दिल्ली
मथुरा
आग्रा
जयपुर
सिंध
उदेपूर
प्रयाग
काशी
ग्वाल्हेर
झांशी
पाटणा
बंगाल
माळवा
भोपाळ
अहमदाबाद
सिहोर
इंदोर
धार
गु ज रा त
बडोदे
कलकत्ता
गों ड व न
बऱ्हाणपूर
नागपूर
कटक
वसई
मुंबई
औरंगाबाद
राजपुरी
उदगीर
पुणे
जयगड
को कं ण
बंगालचा उपसागर
हैद्राबाद
अरबी समुद्र
कोल्हापूर
विजयदुर्ग
विजापूर
फोंडा
गोवा
सावनूर
गुत्ती
कर्नाटक
कडापा
निजामाची सत्ता
मोगल सत्ता
मदास
श्रीरंगपट्टणम्
म्हैसूर
पांडेचेरी
त्रिचनापल्ली
महत्त्वाची गावे
नदी
मराठ्यांच्या सत्तेखाली आलेला प्रदेश
हिंदी महासागर


मराठा साम्राज्य
बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा
(इ. स. १७५८)
अटक
लाहोर
मुलतान
पंजाब
दिल्ली
मथुरा
आग्रा
जयपूर
सिंध
उदेपूर
प्रयाग
काशी
ग्वाल्हेर
झांशी
पाटणा
बंगाल
माळवा
भोपाळ
अहमदाबाद
सिहोर
इंदोर
धार
कलकत्ता
कटक
बऱ्हाणपूर
नागपूर
औरंगाबाद
वसई
मुंबई
राजापुरी
जयगड
पुणे
उदगीर
कोल्हापूर
विजापूर
विजयदुर्ग
गोवा
फोंडा
सावनूर
गुत्ती
कडापा
श्रीरंगपट्टणम
मद्रास
म्हैसूर
पाँडेचेरी
त्रिचनापल्ली
बंगालचा उपसागर
हिंदी महासागर
निजामाची सत्ता
मोगल सत्ता
महत्त्वाची गावे
नदी
मराठ्यांच्या सत्तेखाली आलेला प्रदेश


सन १७५८ तील हिंदुस्तान.
जाड्या रेषेच्या आंतील प्रदेश मराठ्यांच्या चौथाई खालीं आला होता.
तिबेट
नेपाळ
अयोध्या
काश्मीर
अटक
जंमू
लाहोर
मुलतान
सतलज
सरहिंद
कुंजपुरा
शुक्रताल
पानिपत
मीरत
दिल्ली
अनुपशहर
आग्रा
इटावे
काशी
प्रयाग
लखनौ
अजमेर
जयपूर
जोधपूर
उदेपूर
झांशी
जैतपूर
भोपाळ
उज्जैन
इंदोर
धार
सिहोर
अहमदाबाद
गुजराथ
द्वारका
सुरत
बडोदे
खंबायत
नागपूर
माळवा
बंगाल
गया
पंचकोट
मुर्शिदाबाद
बरद्वान
कलकत्ता
मेदिनीपूर
बालेश्वर
कटक
ओरिसा
जगन्नाथ
चितगांव
आसाम
उत्तर सरकार
विशाखपट्टण
मच्छलीपट्टण
नासीक
औरंगाबाद
मुंबई
कल्याण
कुलाबा
पुणे
अहमदनगर
सातारा
पंढरपूर
हैदराबाद
कोल्हापूर
विजापूर
धारवाड
सावनूर
कडाप्पा
मद्रास
म्हैसूर
श्रीरंगपट्टण
तेलिचेरी
मंगळूर
मदुरा
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
हिंदी महासागर
सिंहलद्वीप



पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांचे हस्ताक्षर

(नाना फडणीस यांस लिहिलेले पत्र - ता. ११ जुलै १७५५)

# पडताळा सूची

(Cheque List)

**'नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास'** या विषयावरील पडताळा सूची

१) पेशवे कालखंडामध्ये आर्थिक दृष्ट्या स्थिर राज्य देणारा पेशवा कोणता?

२) पेशवे कालखंडामध्ये योग्य प्रशासक म्हणून कोणत्या पेशव्यांचा उल्लेख केला जातो?

३) पेशव्यांच्या मालिकेमधील मुलकी प्रशासक पेशवा कोण?

४) नानासाहेब पेशवे १७४४ नंतर उत्तरेच्या स्वारीवर का गेले नाहीत?

५) नानासाहेब पेशव्यांच्या हातून कोण-कोणत्या राजकीय प्रशासकीय लष्करी चुका झाल्या असे वाटते का?

६) नानासाहेब पेशवे यांचे चौथाई बाबतीतचे धोरण काय होते?

७) नानासाहेब पेशवे यांचे सरदेशमुखीबद्दलचा विचार काय होता?

८) नानासाहेब पेशवे यांनी स्वकियांच्याबद्दल कोणते आर्थिक धोरण आखले?

९) नानासाहेबांचे पुणे शहराबद्दल कोणते आर्थिक धोरण होते?

१०) नानासाहेब पेशव्यांनी स्वधर्मियांशी कोणत्या प्रकारचे आर्थिक संबंध ठेवले होते?

११) नानासाहेब पेशव्यांनी सावकारांबद्दल कोणते धोरण ठेवले होते?

१२) नानासाहेब पेशवे यांचे जमीन महसुलाबाबतीत कोणत्या प्रकारचे धोरण आखले आणि त्यांची महसूल वसूल करण्याची नीती काय होती?

१३) नानासाहेब पेशवे यांनी महसुलाची वर्गवारी कोणत्या धर्तीवर अवलंबली होती?

१४) नानासाहेब पेशवे यांनी शेतीला उत्तेजन देण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले?

१५) नानासाहेब पेशवे यांच्या काळात उद्योगाला कसे उत्तेजन मिळाले?

१६) नानासाहेब पेशव्यांनी उद्योग धंद्यासाठी कोणकोणत्या सवलती दिल्या?

१७) नानासाहेब पेशव्यांना वतनदारी पध्दत का महत्त्वाची वाटली?

१८) नानासाहेब पेशव्यांच्या काळामध्ये कोणकोणत्या गोष्टी व्यापारामध्ये महत्त्वाच्या होत्या?

१९) नानासाहेब पेशव्यांनी इतर धर्मियांच्या व्यापारासंबंधी कोणते धोरण ठेवले होते?

२०) नानासाहेब पेशवे यांच्या आर्थिक धोरणांची व अर्थव्यवस्थेबद्दलची माहिती कोणकोणत्या साहित्य संदर्भातून मिळते?

२१) नानासाहेब पेशवे काळातील अबकारी कर कसा होता? त्याचे स्वरूप काय होते?

२२) नानासाहेब पेशव्यांच्या काळात व्यारामध्ये कोणत्या चलनांचा वापर केला जात असे?

२३) नानासाहेब पेशव्यांनी व्यापारी व उद्योगपती यांच्या संरक्षणासाठी कोणते कायदे / व्यवस्था केली होती?

२४) नानासाहेब पेशव्यांनी भूमी सुधारणेचे कोणते प्रयत्न केले?

२५) नानासाहेब पेशवे बनल्यानंतर त्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले? त्या त्यांनी कशा प्रकारे दूर केल्या?

२६) नानासाहेब पेशवे यांनी अर्थ व्यवस्था सुधारण्यासाठी कोणती यंत्रणा तयार केली?

२७) नानासाहेब पेशव्यांनी छत्रपती व राज्यांवरील सावकारांच्या कर्ज परतफेड केली, असे तुम्हाला वाटते?

२८) नानासाहेबांच्या काळामध्ये जमिनीवरील उत्पन्नाचा कर कोणत्या पध्दतीने घेतला जात असे?

२९) नानासाहेब पेशव्यांनी विविध व्यावसायिकांना कोणत्या सोयी सवलती दिल्या?

३०) नानासाहेब पेशव्यांनी राज्याच्या खर्चाचा विनियोग कसा केला?

३१) नानासाहेबांच्या काळातील व्यापाराचे स्वरूप कोणत्या पध्दतीचे होते?

३२) नानासाहेबांचे ठेकेदार / वतनदार / सावकार / व्यापारी यांच्याविषयीचे धोरण कोणते होते?

३३) नानासाहेब पेशव्यांनी राजधानी पुणे शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कोणत्या धोरणांचा अवलंब केला? त्यासाठी त्यांनी कोणकोणत्या उपाय योजना केल्या?

३४) नानासाहेब पेशव्यांनी व्यापारी पुणे येथे स्थायिक व्हावे म्हणून कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या?

३५) नानासाहेब पेशव्यांच्या काळात ब्राह्मणेत्तरांच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कोणते होते? यासाठी पेशवा म्हणून त्यांनी कोणती भूमिका घेतली?

३६) नानासाहेब पेशव्यांच्या काळातील वतनदार आणि त्यांच्या वतनसंस्था कशा प्रकारे कार्य करीत होत्या?

३७) नानासाहेब पेशवे काळात परंपरागत शेतीला फाटा मिळाला का? असे तुम्हाला वाटते का? मिळाला असेल तर तो कशा पध्दतीने मिळाला?

३८) नानासाहेब पेशवे यांनी गावातील अधिकारी / ब्राह्मण / विधवा पुनर्विवाह / टोल कर, जंगल कर / करारपत्र इत्यादीबाबतीत त्यांची भूमिका काय होती?

३९) नानासाहेब पेशव्यांच्या काळातील सावकार वर्ग कोणत्या पध्दतीने कार्यरत होता?

४०) नानासाहेब पेशव्यांचे पतपेढीविषयक धोरण मराठी राज्याला पोषक ठरले का? कसे?

४१) नानासाहेब पेशवे यांनी आपल्या योजना यशस्वी होण्यासाठी त्यांना कोणकोणाची मदत मिळाली?

४२) नानासाहेब पेशवे यांची कारकीर्द स्थिर स्वरूपाची होती का? तुमचे मत सांगा.

४३) नानासाहेब पेशव्यांच्या राजवटीत मराठी सत्तेचा मोठा साम्राज्य विस्तार झाला, असे म्हटले जाते यावर तुमचे मत सांगा.

४४) नानासाहेबांनी मराठ्यांची ढासळलेली अर्थव्यवस्था मजबूत केली असे तुम्हाला वाटते का?

४५) नानासाहेब पेशवे यांनी राज्याच्या आर्थिक नाड्या आपल्या हाती ठेवल्या, 'सबसे बडा रुपय्या' असे असताना त्यांनी प्रजेवर कराच्या बाबतीत जाचक धोरणांचा अवलंब केला असे तुम्हाला वाटते का?

- संशोधक -

**गौतम नामदेव ढाले**

एम. ए. इतिहास, एम. ए. मराठी,

बी. एड्., एम. फिल, सेट

श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर

- मार्गदर्शक -

**प्रा. डॉ. अमर पांडे**

(सहयोगी प्राध्यापक)

एम. ए. एम. फिल, पीएच. डी.

एन. डी. पाटील नाईट कॉलेज, सांगली.